
# पेशव्यांची बखर



## कृष्णाजी विनायकसोहनी



# पेशव्यांची बखर

कृष्णाजी विनायक सोहनी

ई साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े विनामूल्य वितरित केले जात आहे. आपण हे विनामूल्य फ़ॉरवर्ड करू शकता.

हे विक्रीसाठी नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

esahity pratishthan

eleventh floor. G1102

eternity

eastern express highway.

Thane. 400604

श्री.

कृष्णाजी विनायक सोहनी लिखित

# पेशव्यांची बखर.

ही अनेक प्रतींवरून शुद्ध करून, अर्थनिर्णायक [illegible]

आणि अवान्तर माहितीच्या विपुल टिपांसह,

रा० ब० काशिनाथ नारायण साने, बी. ए.

यांनी प्रकाशित केली.

आवृत्ती पांचवी.

( कॉपीराइट वगैरे सर्व हक्क प्रकाशकांनी आपल्याकडे ठेविले आहेत. )

शके १८४७—इसवी सन १९२५.

KRISHNAJI VINAYAK SOHANI'S

# CHRONICLE OF THE PESHWAS

## BEING A HISTORY OF THAT FAMILY

FROM 1713 TO 1818

EDITED WITH CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

R. B. KASHINATH NARAYAN SANE, B. A.

5TH EDITION,

*Right of translation and all other rights reserved.*

1925.

# उपोद्घात.*

इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः ।
पञ्चभ्यइव भूतेभ्यो लोकसंविधयस्त्रयः ॥
इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना ।
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम् ॥

**महाभारत.**

प्रसिद्धिपत्रकांत लिहिल्याप्रमाणें आम्हीं हा आमचे पुस्तकाचा प्रथम अंक रसिक जनांत सादर केला आहे. पूर्व संकेतान्वयें या प्रथमांकाच्या तीन भागांपैकीं ह्या एका भागांत महाराष्ट्रीयांनीं लिहून ठेवलेला मराठी राज्याचा इतिहास देण्यास सुरुवात करावयाची, ती करण्यापूर्वीं कांहीं गोष्टी आमच्या वाचकांस कळविणें आहेत, त्या येणेंप्रमाणें:—

१. **विषयमाहात्म्य**—ह्याविषयीं उल्लेख आम्हीं आपले प्रसिद्धिपत्रकांत केलाच आहे, व ह्या विषयाकडे आमच्या लोकांचें मन अलीकडे थोडथोडें लागत चाललें आहे, तेव्हां आपल्या लोकांनीं लिहून ठेवलेल्या ऐतिहासिक माहितीचे महत्त्वाविषयीं विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. तथापी ह्या पुस्तकाच्या स्वरूपावरून आम्हांस या गोष्टीविषयीं वारंवार लिहितां येणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां ही उत्तम संधी अगदींच दवडणें हें नीट नव्हे. मराठे लोकांचे मुख्य इतिहासकार जे ग्रांट डफ साहेब, त्यांनीं स्वतः असें लिहिलें आहे कीं, "मराठ्यांच्या इतिहासाच्या पुष्कळ बखरी व याद्या व पत्रकें मीं मिळविलीं होतीं. श्रीमंत पेशवे यांचें दफ्तर व कंपनी सरकारचें दफ्तर हींही मला सुगम्य होतीं. ह्या बखरींपैकीं कांहीं इतक्या मोठ्या होत्या कीं, त्यांतील एक एक खुद्द माझ्या ग्रंथा एवढी होईल. खेरीज खाजगी पत्रें व मुसलमानी ऐतिहासिक ग्रंथ मला उपलब्ध होते, व इतिहासांत लिहिलेल्या गोष्टी ज्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिल्या अशा वृद्ध पुरुषांपासूनही मला बरीच माहिती मिळे." याप्रमाणें साहेबांची सामग्री विपुल होती व ह्या सर्व विपुल सामग्रीचा उपयोग

* हा उपोद्घात **काव्येतिहाससंग्रह** हें मासिक पुस्तक १८७८ सालीं सुरू झालें तेव्हां पहिल्या अंकांत आला होता, तोच येथें दिला आहे.

साहेबांनीं आपल्या समजुतीप्रमाणें करवला तितका केलाही आहे. आज
त्यांचा ग्रंथ हिंदुस्थानचे जे इंग्रजी इतिहास आहेत त्यांतील उत्तमांत मोडतो-
किंबहुना हाच त्या सर्वांत उत्तम ठरतो, असें म्हटलें तरी चालेल.[1] असो;
साहेबांनीं इतकी विपुल सामग्री मिळविली होती तथापि त्यांस ज्यांची माहिती
मिळाली नाहीं अशा गोष्टी अनेक आहेत, असें म्हणण्यास पुष्कळ आधार
आहे. त्यांच्या ग्रंथांतही कोठें कोठें ही गोष्ट त्यांणीं स्वतः कबूल केली आहे.
तर अशा प्रकारची माहिती धुंडून काढणें किती उपयोगाचें आहे बरें ? तसेंच
साहेब लोक परद्वीपस्थ पडले, त्यांचें आमच्या लोकांशीं कितीही संघट्टण
असलें व त्यांनीं कितीही आमच्या भाषेवर व्यासंग चालविला, तथापि आमच्या
लोकांतील अंतस्थ गोष्टी, आमचें हृद्गत विचार, त्यांच्या आचारांहून व धर्म
पंथाहून अतिभिन्न असे आमचे आचार व धर्मपंथ वगैरे गोष्टी पूर्णपणें त्यांना
कळणें म्हणजे अशक्यच होय.[2] ह्या न्यूनतेमुळें अमुक एक गोष्ट अशी कां
घडली, असें सांगण्याचा प्रसंग आला म्हणजे कांहीं ठिकाणीं साहेबांस स्तब्ध
बसावें लागतें, किंवा कांहीं शुष्क तर्क करावा लागतो. ह्याबद्दल येथें विस्तार
करणें नाहीं. ह्याविषयीं दिग्दर्शन पुढील बखरींत व टिपांत प्रसंगानुसार होत
जाईल. येथें इतकेंच सांगणें पुरे कीं, अशा प्रकारची न्यूनता आम्हां महाराष्ट्रीयां
पैकीं कोणी सर्व उपलब्ध साधनें मिळवून आपल्या देशाचा इतिहास
लिहिण्यास पुढें सरून काढून टाकील तेव्हांच जाईल. हीं साधनें बखरी,

---

१. आमची अशी शिफारस आहे कीं, प्रत्येक 'महाराष्ट्रीय जन' म्हणविणारानें—किंबहुना प्रत्येक 'हिंदू' म्हणविणाऱ्यानेंही—ह्या इतिहासाची प्रत आपले संग्रहीं ठेवावी; निदान एकवार ती कोठें मिळवून वाचण्याची तरी तसदी घ्यावी. असें केल्यानें आमचे लोक म्हणजे गचाळ, वेडे, पौरुषहीन, अकल्पक असे जे आम्हांपैकीं पुष्कळांचे ग्रह झालेले आहेत, ते जाऊन आपल्या लोकांच्या पराक्रमाविषयीं, बुद्धीविषयीं, चातुर्याविषयीं वगैरे तथ्य कळून योग्य अभिमान जागृत होईल.

२. हें आमचें म्हणणें मराठी भाषाभिज्ञ जे क्यांडीसाहेब त्यांच्यांशीं ज्यांचा समागम झाला असेल त्यांस अगदीं रास्त वाटेल. खेरीज प्रसिद्ध कादंबरीकार कर्नल मेडोज टेलर हे बहुतेक जन्मभर या देशांत होते. त्यांचा आमचे लोकांशीं बराच परिचय होता. त्यांच्या कादंबरींतील पात्रें, आमच्या देशांतील असल्यामुळें त्यांनीं आमच्या रितिभाती, धर्माचार, स्वभाव इ॰ गोष्टींचें लक्षपूर्वक अवलोकनही केलें असावें. तथापि जो कोणी त्यांचे ताराप्रभृती ग्रंथ पाहील त्यांसही आमचा वरील लेख अयोग्य वाटणार नाहीं.

तहनामे, यादी इत्यादि जुने लेख हे होत. असो, ह्या शिवाय आणखी एक
गोष्ट डफ साहेबांच्या ग्रंथाच्या संबंधानें सांगणें आहे. ती ही कीं, साहेबांचा
ग्रंथ इतिहासपर पडला, चरित्रपर नव्हे. तेव्हां इतिहास लिहिण्याची जी पद्धत
यूरोपीय पंडितांनीं परिपक्व दशेस आणिली आहे, त्या पद्धतीस पुष्कळ अंशीं
धरून चालल्यानें त्यांना उपलब्ध असलेल्या बखरींतीलही पुरुषमात्राविषयीं
चमत्कारिक चमत्कारिक आख्यायिका त्यांणीं आपल्या ग्रंथांतून गाळिल्या
आहेत असें वाटतें. त्या फार मनोरंजक व उपदेशपर आहेत. म्हणून इंग्लंडामध्यें
जशा सर वॉल्टर स्कॉट यांणीं ऐतिहासिक कादंबऱ्या, म्हणजे ऐतिहासिक
पुरुषांच्या चमत्कारिक गोष्टींस अनुलक्षून तत्कालीन लोकांच्या स्थितिरीति
त्यांचे आचारविचार व आपल्या पात्रांचे इतिहास प्रसिद्ध स्वभाव यांस व्यक्त
करणाऱ्या चित्तवेधक कथा रचिल्या, तशा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारा
आमचे देशांत कोणी कादंबरीकार झाला असतां, किंवा प्रसिद्ध कवी शेक्सपीयर
यांणीं जशीं ऐतिहासिक नाटकें लिहिलीं तशीं नाटकें लिहिणारा कोणी महाराष्ट्रीय
नाटककार झाला असतां, त्यास अशा आख्यायिकांची अवश्यकता फार आहे
हें सांगणें नको.

याखेरीज या जुन्या ऐतिहासिक ग्रंथांच्या प्रसिद्धीपासून दुसरा एक मोठा
लाभ आहे. कविवर वामन, श्रीधर, मोरोपंत, इत्यादिकांचे कवित्वशक्तीनें
आमच्या मराठी भाषेंतील पद्य ग्रंथांचे दुर्भिक्ष घालविलें. परंतु गद्य ग्रंथांस
पूर्वीं मान कमी असल्यामुळें, किंबहुना मुळींच नसल्यामुळें, गद्य पद्धतीचा
प्रचार अर्थात कुंठित झाला व तिला सरकारी व खाजगी हिशेब, यादी, पत्रें
वगैरे मध्यें संकुचित होऊन बसावें लागलें. पुढें मराठी राज्याचा उत्कर्ष झाल्या-
वर निरनिराळ्या प्रतापी सरदारांच्या हकिकती लिहिण्याचा प्रसंग आला,
तेव्हां लोक लाहान लाहान टिपणें करून ठेवावयास लागले, व तदनंतर त्या
टिपणांच्या आधारें मोठमोठ्या बखरी रचिल्या. असा बखरी लिहिण्याचा
प्रघात पडला. त्या ह्या बखरींच काय त्या मराठी भाषेंतील जुने गद्य ग्रंथ होत.
इंग्रजी झाल्यावर गद्य पुस्तकें लिहिण्याचा प्रघात पडण्यापूर्वीं ह्यांशिवाय दुसरे
गद्य ग्रंथ होते, असें म्हणतां येत नाहीं. ह्या जुन्या गद्य ग्रंथांत व आधुनिक गद्य
पुस्तकांत भाषेच्या मानानें पाहिलें असतां महदंतर दिसून येतें. जुने लिहिण्याची
शैली निराळी. त्यांतील शब्द साधे असून वाक्येंही लाहान लाहान असत.

संस्कृत शब्दांचा भरणा कमी. मुसलमानी शब्दांची योजना जास्त. अलीकडच्या ग्रंथांविषयीं विशेष लिहिणें नको. वर सांगितलेल्या प्रकाराच्या उलट सर्व प्रकार सहज दृष्टीस येईल. तेव्हां मराठी भाषेंतील जुन्या गद्य ग्रंथाचें रक्षण न केल्यास पूर्वीची भाषा होती कशी, लोक बोलत होते कसे, शब्दयोजना कशी होती, व वाक्यरचनेचा प्रकार कसा, इत्यादी भाषेसंबंधीं गोष्टी महाराष्ट्र भाषेचें पूर्ण ज्ञान संपादणारांस कशा कळाव्या ? दुसरी गोष्ट. आमची मराठी भाषा अद्याप सुधारली नाहीं. तींत शब्दभरणा अद्याप पुष्कळ होणें आहे. वाक्यरचनेचे प्रकारही तींत सर्व प्रकारचे आले नाहींत. ह्याकरितां अलीकडील ग्रंथकार झटून एकीकडून संस्कृतांतील व दुसरेकडून इंग्रजींतील शब्द व भाषासरणी मराठींत आणूं पाहात आहेत. तर अशा वेळीं जे शब्द व जे भाषासरणीचे प्रकार महाराष्ट्र भाषेंत पूर्वी प्रचारांत असून आमच्या अज्ञानामुळें आम्हांस नाहींतसे झाले आहेत किंवा होत आहेत, त्यांचा संग्रह भाषेंत केला असतां तसें करणें किती उपयोगी होईल ? सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेली जी इंग्रजी भाषा तिजलाही जुन्या ग्रंथांपासून पुष्टीकरण होत आहे व त्यामुळें तिला एक विलक्षण शोभाही येत आहे. इंग्रज लोकांत जुन्या ग्रंथांचें किती मोल आहे, हें पाहावयास लांब जाणें नको. प्रत्येक इंग्रजी पुस्तकालयांत—मग तें खाजगी असो कीं सार्वजनिक असो—जुन्या ग्रंथकारांचे ग्रंथ नाहींत असें कधींच होणें नाहीं; ह्यावरून व युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस अशा ग्रंथांतील अमुक असलेच पाहिजेत असा त्यांमध्यें जो नियम आहे, त्यावरून ही गोष्ट चांगली ध्यानीं येईल. ही गोष्ट उत्तम प्रकारें सुधारलेल्या इंग्रजी भाषेची झाली. आपल्या मराठी भाषेस तर ती स्थिती येण्यास अद्याप पुष्कळ काळ गेला पाहिजे. तेव्हां अशा उपयुक्त गद्य ग्रंथांचें संरक्षण करून त्यांचा संग्रह करण्याचें श्रेय आपणांस घ्यावयास नको काय ?

शेवटीं मुख्य गोष्ट ही सांगणें राहिली कीं, ग्रांट डफ यांचा ग्रंथ छापून आज पन्नासांवर वर्षें झालीं. ह्या काळांतच कोणी महाराष्ट्रियानें आमच्या देशाचा इतिहास लिहावयाचा. पण तसा सुदिन अद्याप प्राप्त झाला नाहीं. यूरोपीय लोकांनींही कोठें विशेष शोध लावून आमचे देशाचा इतिहास लिहिल्याचें ऐकिवांत नाहीं. आम्हां मराठ्यांविषयीं ज्या कोणीं जें लिहिलें आहे तें सर्व डफ-कृत ग्रंथांच्या आधारें होय. स्वतंत्र निराळा ग्रंथ कोणीं अद्याप लिहिला

नाहीं. ह्या गोष्टीबद्दल आम्ही कोणास फारसा दोष देतों असें समजूं नये. कारण आमच्या मतें महाराष्ट्र देशाचा स्वतंत्र इतिहास लिहिण्यास जीं साधनें असावीं तीं पूर्णपणें अद्याप मिळविणें आहेत; तीं पूर्णपणें उपलब्ध होत तोंपर्यंत आमचे देशाचा इतिहास असावा तसा होणें मुष्कील आहे. हीं साधनें मिळवून प्रसिद्ध करण्याच्या कामांत कोणीं आजपर्यंत फारसे हातपाय हालविले नाहींत हें पाहून मात्र दिलगिरी वाटते. हल्लींचा वेळ हें काम करण्याचाच आहे. आतां हयगय करतां कामा नये. केली तर ती मोठी चुकीची गोष्ट होईल व ती चूक पुढें नीट करितांही येणें नाहीं. कारण जे कांहीं जुन्या माहितीचे लेख आमच्या लोकांपाशीं आज आहेत त्यांची स्थिती फार वाईट आहे. कोठें बखरी कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडल्या आहेत, कोठें मुलांनीं त्यांचीं लिखितें करून फाडून टाकिल्या आहेत, कोठें त्यांचीं पानें गहाळ झालीं आहेत, कोठें जुने लेख इतके जीर्ण झाले आहेत कीं, त्यांस हस्तस्पर्श करणें तो फार जपून करावा लागतो, व कोठें तर त्यांस वाण्याच्या हातून सोडवावें लागतें. ही जुन्या कागदपत्रांची स्थिती अती अनिष्ट होय. तेव्हां अशा पेंचांत सांपडलेल्या ग्रंथांचा जीर्णोद्धार लवकर झाला असतां आमच्या राष्ट्राच्या भावी इतिहासकारास त्यांचा किती उपयोग होईल, हें सांगणें नको.

हे सर्व विचार मनांत आणून जुन्या माहितीचे--इतिहासाच्या व पुरुषचरित्रांच्या उपयोगी पडणारे--बखरी, वंशावळी, तहनामे, पत्रें, स्वाऱ्यांच्या मुक्कामांच्या यादी वगैरे जे लेख मिळतील ते मिळवून त्या सर्वांचा एकत्र संग्रह करण्याचें व त्यांस टिपांनीं सुबोध करण्याचें काम आम्हीं अंगिकारिलें आहे तें किती महत्त्वाचें आहे हें सुज्ञांच्या ध्यानांत सहज येईल.

२. आतां जें काम आम्हीं हातीं घेतलें आहे त्याबद्दल साधारणतः सर्व लोकांस व विशेषतः आमचे वाचकांस ज्या सूचना करणें आहेत त्या करितोंः--

ज्या ह्या कामास आम्हीं आरंभ केला आहे त्याकरितां आमच्याजवळ सामग्री बरीच आहे. तथापी ह्या कामाच्या स्वरूपावरूनच तें एकादोघांचें नव्हे ही गोष्ट उघड होते तेव्हां सर्वांकडून यथाशक्ती सामग्रीचें साहाय्य झालें पाहिजे अशी सर्वांस विनंती आहे. याकरितां बखरी, तहनामे, पत्रें, यादी, ठराव, वंशावळी वगैरे हरएक प्रकारचे जुने इतिहासोपयोगी लेख ज्यांस जितके मिळतील तितके त्यांणीं आम्हांकडे पाठविण्याची जरूर तसदी घेतली पाहिजे--निदान आम्हांस स्थलनिर्देश तरी

केला पाहिजे. आपले पूर्वजांचे पराक्रम चिरस्थायी व्हावे अशी कोणाची इच्छा नसेल असें आम्हांस वाटत नाहीं. आमची अशी समजूत आहे कीं, हें काम करण्याची प्रत्येकास हौस असावी. तेव्हां मराठी साम्राज्याची जी मोठी अवाढव्य इमारत बांधली गेली होती, ( जिचीं पडकीं भिंताडें व गाटेगोटे या भरतखंडभर पसरलेले आज दृष्टीस पडतात,) ती बांधितांना कोणकोणाची कशी कशी मदत झाली, हें सांगणें त्यांचे त्यांचे वंशजांस व नातेवाइकांस आमच्या मतें भूषणावह होईल. " आमचें वैभव गेलें, आतां जुन्या गोष्टींचें व्यर्थ कथन कां करावें ? गेलेलें वैभव पुनः प्राप्त होतें कीं काय ? " असें कित्येकांचें म्हणणें पडेल. पण असा विचार अगदीं निरर्थक होय. त्यापासून औदासीन्य मात्र उत्पन्न होऊन कांहींच पौरुष आमचे हातून होणार नाहीं. पूर्ववैभव तर गेलें तें गेलेंच. परंतु हल्लींचें राज्य व तदनुगत प्रस्तुतची शांतता जीं कार्यें साधून घेण्यास उत्तम अनुकूळ, तीं कार्यें—आणि तीं अनेक आहेत—साधून घेण्यासही वरील औदासीन्यामुळें पुष्कळ नड आली आहे; असें सूक्ष्म विचारांतीं कळून येईल. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, " ज्या राष्ट्रास पूर्वकाल नाहीं त्या राष्ट्रास भविष्यकाळ कोठला ?" म्हणजे ज्या लोकांस आपल्या पूर्वजांचे पराक्रम, त्यांचें शाहाणपण, त्यांची विद्वत्ता वगैरे कोणत्याच प्रकारची गोष्ट हुरूप आणण्यास नाहीं, त्यांणीं पुढें प्रख्यातीस यावें कसें ? व उच्च स्थिती संपादावी कशी ? असो, तेव्हां अशा वेळीं अशा लोकांनीं सर्व औदासीन्य झाडून टाकून आपल्या घराण्यानें पूर्वीं काय काय केलें, आपल्या पूर्वजांनीं कोणकोणतीं अब्रूचीं कामें बजाविलीं, वगैरे वृत्तांत साभिमान पुढें येऊन प्रांजलपणें सांगावा व त्यांत लज्जेची गोष्ट न वाटतां उलटी प्रतिष्ठा मानावी.

इतिहासाच्या कामास प्रत्येक पुरुषाचा व स्थलाचा निर्णय झाला पाहिजे. ह्या बखरींत आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा व स्थलाचा जितका छडा लागला तितका

३. कीर्ती संपादण्यास हा काल प्रतिकूल आहे असेंही फारसें म्हणतां येत नाहीं. मार्ग मात्र निराळे व अवघड आहेत. पूर्वींप्रमाणें हल्लीं लढाया किंवा बंडाळी करण्यास फावणें नाहींच व तसा कोणाचा आशयही नसावा. तथापी आपल्या वाडवडिलांच्या नांवारूपाप्रमाणें करामत करून दाखवून कीर्ती मिळविण्याचे मार्ग या इंग्रजी राज्यांत अगदींच बंद पडले आहेत असें नाहीं. दुसऱ्या गोष्टींविषयीं असो, पण लष्करी नौकरींतही हल्लीं थोडा बहुत लौकिक संपादितां येईल असें थोड्या वर्षांपूर्वीं बडे लोकांस लष्करांत हुद्याच्या जागा द्याव्या असा जो ठराव झाला त्यावरून सहज कळेल.

आम्हीं लाविला आहे. जेथें माहिती देतां आली नाहीं तेथें प्रश्न चिन्ह (?) असें केलें आहे. तर ज्या कोणास त्या पुरुषाचा अगर स्थलाचा तलास लागेल, त्यांणीं आम्हांकडे त्याची माहिती पाठवावी. खेरिज आम्ही जी कांहीं माहिती टिपांत देतों त्यांत कमजास्त असल्यास ती सुधारून पाठविली तर त्या सुधारणेस ही अवश्य स्थल मिळेल. सारांश खऱ्या इतिहासाचे कामीं ज्यांकडून जितकी मदत होईल तितकी त्यांणीं आळस न करितां अवश्य करावी अशी आमची प्रार्थना आहे.

३. प्रस्तुत अंकांत जी बखर आम्हीं छापण्यास आरंभ केला आहे तिजविषयीं कांहीं माहिती देणें इष्ट आहे, ती येथें देतों:—

" **पेशव्यांची बखर** " हें तिचें नांव. ही **कल्याण** येथील एका प्रसिद्ध गृहस्थानें[४] आम्हांस दिली. ह्या बखरीचे तीन बंद गहाळ झाले आहेत व पुढें मध्येंच १२१ वा बंद हरवला आहे. ही बखर आरंभापासून बंदांच्या एका अंगानें लिहितां लिहितां २४० बंद पर्यंत जाऊन, तेथून बंदांच्या पाठीवर लिहीत लिहीत पहिल्या बंदापर्यंत आणून संपविली आहे. अशा रितीनें लिहिल्यामुळें पहिले बंद गहाळ झाले, तेव्हां अर्थात पाठीमागील शेवटचे बंदही त्यांजबरोबर गेले. हिचे खर्चीं कागदाचे २४० बंद पाठपोट आहेत, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. अक्षर दोन तीन प्रकारचें आहे, तरी पुष्कळ सुवाच्य आहे. हींत पहिले **पेशवे श्रीमंत बाळाजी विश्वनाथ भट** हे त्यांचा मूळ गांव **जो श्रीवर्धन** तेथून निघाल्यापासून तहत इंग्रज सरकारनें **पुण्यांत शनवारचे वाड्यावर** आपला बावटा चढविला तोंपर्यंत हकिकत आहे.

ह्या बखरीचे कांहीं बंद गेले आहेत म्हणून वर सांगितलें, परंतु आमच्या एका स्नेह्यानें[५] ह्याच बखरीची एक साद्यंत प्रत आम्हांस पाठविली तिजवरून तें ते बंद घेतले आहेत. ही प्रत आमच्या **कल्याणच्या** प्रतीवरूनच उतरून घेतली असावी असें मानण्यास सबळ आधार आहे; व ती **कल्याणच्या** प्रतीचे बंद हरवण्यापूर्वीं उतरली असावी असें हिचे सर्व बंद शाबूद असल्यावरून स्पष्ट होतें.

---

४. रा० रा० वासुदेव पांडुरंग काळे. ५ ' रा० ब० नीळकंठ जनार्दन कीर्तने.

ह्या खेरीज कुसुरघाटा खालीं भिंवपुरी म्हणून गांव आहे, तेथून ह्याच बखरीचें उत्तरार्ध[६] आम्हांस मिळालें आहे. पूर्वार्धाचा शोध चालू आहे.

शिवाय भिंवपुरी जवळच वैजनाथ म्हणून गांव आहे. तेथेंही ह्याच बखरीची अस्सल प्रत मिळवून देण्याचें एका वैजनाथकर गृहस्थानें[७] अभिवचन दिलें आहे.

ज्या जुन्या बखरी हल्लीं उपलब्ध होतात त्यांची बहुतकरून पहिलीं व शेवटचीं पानें गहाळ झालेलीं आढळतात. तेव्हां त्या केव्हां, कोठें व कोणीं लिहिल्या वगैरे माहिती आरंभीं अगर शेवटीं असावयाची ती अर्थात नाहींशी होते. कधीं कधीं बखरी संबंध मिळाल्याच तर वरील प्रकारची बखर लिहिणाराविषयीं वगैरे हकिकत त्यांत दिलेली आढळत नाहीं. असो प्रस्तुत बखर कोणीं व कोठें लिहिली हें समजत नाहीं असेंच आम्हांस लिहिणें प्राप्त झालें होतें, व ज्या अर्थीं ही बखर पेशवाईचे अखेरीपर्यंत आहे त्या अर्थीं ती त्या राज्याच्या शेवटीं अगर अव्वल इंग्रजींत लिहिली असावी हें सहज सिद्ध होतें, असें सांगून आमचे वाचकांस समाधान मानून घेण्याचें भाग पाडण्याचा प्रसंग आला होता. पण सुदैवेंकरून वर सांगितलेले वैजनाथकर गृहस्थ यांजपासून ह्या बखरीच्या उत्पत्तिस्थानाचा वगैरे बरीच माहिती मिळाली ती येथें सादर करितों:—

ही बखर सदरहू वैजनाथ गांवीं रा० रा० कृष्णाजी विनायक सोहनी यांणीं तोंडीं सांगितली व तेथील लोकांपैकीं कित्येकांनीं ती आदरपूर्वक लिहून घेऊन तिचा संग्रह केला. हे कृष्णाजीपंत पेशवाईंत सुभेदारीच्या कामावर होते. शेवटले पेशवे यांचे कारभारी श्री० चिंतोपंत देशमुख पावसकर यांचे कृष्णाजीपंत हे आप्त होते व देशमुख यांची त्यांजवर कृपाही होती असें म्हणतात. कृष्णाजीपंत हे कोंकणांत रत्नागिरी नजीक सोमेश्वर नांवाचा गांव आहे तेथील राहाणारे. पंतांविषयीं जास्त हकिकत मिळत नाहीं ही दिलगिरीची गोष्ट होय. अशी विलक्षण माहिती ज्या पुरुषास होती व ज्याणें इतके संगतवार तिचें स्वमुखानें निवेदन केलें, त्या चतुरस्र पुरुषाचे बाळपणचे दिवस

---

६. हें भिंवपुरी येथील करंदीकर यांजकडील रा० आबा अभ्यंकर मुजुमदार राहणार माहीम यांणीं पाठविलें. ७. रा. रा० रामभाऊ पेठे.

कोठें गेले, व तो पुढें उदयास कसा आला, वगैरे हकिकत तपशीलवार कळणें मोठें अगत्याचें होतें. पण ती मिळण्याचा योग सध्यां घडून येत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट समजली पाहिजे. असो, सोहनी यांजवर काल-चक्र फिरून विपत्तीचा पगडा पडल्यावर त्यांणीं सर्व संसारकार्यें सोडून वैजनाथ येथें नदी-तीरीं शिवालयांत आपलें उत्तर आयुष्य घालविलें. तेव्हां तेथील लोकांनीं त्यांचें कांहीं न्यून पडूं दिलें नाहीं हें त्यांस भूषणास्पद होय. तेथें पंत जटा वाढवून तपस्व्याप्रमाणें आपला काल ईश्वरोपासनेमध्यें घालवीत. हा क्रम वर्षानुवर्ष चालला होता. शेवटीं त्या शिवालयांत त्यांचा काल सुमारें इसवी सन १८५४-५५ या सालीं झाला. त्या वेळीं त्यांचे वयास सुमारें ७० वर्षें असावीं. यावरून त्यांचा जन्म इसवी सन १७८४।८५ चे सुमारास म्हणजे श्री० सवाई माधवराव यांचे कारकीर्दीत झाला असें होतें. असो आज ही हकिकत पुरी करितों. ह्या ग्रंथकर्त्यांची जी ज्यास्त माहिती मिळेल ती पुढें सादर करूं.

८ मूळ बखरींत आम्हीं कोणकोणते फेरफार करण्याचें योजिलें आहे तें वाचकांस पूर्वीं कळविणें अवश्य आहे.

जुने लेख मोडी असोत अगर बाळबोध असोत, त्यांत विरामचिन्हें नसतात हें सर्वांस माहीत आहेच. हीं विरामचिन्हें आम्हीं अर्थानुरोधें घातलीं आहेत, व तशींच विषयानुरोधें कलमेंही पाडिलीं आहेत, व सर्व कारकीर्दी एकसारख्या एकत्र लिहिल्या होत्या त्या निरनिराळ्या करून लिहिण्याचें योजिलें आहे. जेथें वाक्यरचनेच्या नियमाविरुद्ध रचना मूळांत दृष्टीस पडली, तेथें शब्द रूपें बदलून तीं नीट केलीं आहे, व पुनरुक्तभूत शब्द व वाक्यें होतीं तीं गाळलीं आहेत. ह्यावरून ध्यानांत येईल कीं, मूळग्रंथ जितका सुगम होईल तितका केला आहे; तथापी त्यांतील भावार्थ किंवा त्यांतील विशेष शब्दयोजना व वाक्यरचना ह्यांस बिलकूल धक्का न लावितां ती तशींच्या तशींच ठेविलीं आहेत.

---

८. तथापि एका विद्वान मित्राकडून ( प्रो. आ. वि. काथवटे ) सूचना आल्यावरून व ती आम्हांस योग्य वाटल्यावरून हा क्रम आम्हीं सोडून दिला व ग्रंथाची मूळ रचना जशीच्या तशीच कायम ठेविली.

## आवृत्ती तिसरी.

दुसऱ्या आवृत्तींत नजरचुकीनें राहिलेलीं अशुद्धें शुद्ध केलीं आहेत. टिपांतील माहिती सुधारून वाढविली आहे. मूळ बखर व टिपा मिळून पेशव्यांच्या घराण्याचा इतिहास चांगला अवगत होईल अशी प्रकाशकाची खात्री आहे. किंमत कमी केली आहे. इतर बाह्य सुधारणा वाचकांस सहज समजतील.

ग्रंथ-प्रकाशक.

---

## आवृत्ती चौथी.

हीं आवृत्ती तिसऱ्या आवृत्तीवरूनच काढिली आहे, फेरफार म्हणण्यासारखा नाहीं.

का० ना० साने.

---

## आवृत्ती पाचवी.

ही चौथ्या आवृत्तीचीच प्रतिमा आहे. मात्र त्या आवृत्तींत अशुद्धें राहिलीं होतीं तीं शुद्ध केलीं आहेत. टिपांमध्यें अलीकडे उपलब्ध झालेली नवीन माहिती नमूद केली आहे.

कल्याण, वैशाख वद्य १ शके १८४७.

७८/२५

काशिनाथ नारायण साने.

# अनुक्रमणिका.


विषय पृष्ठ

उपोद्घात ... ... ...(१)-(९)

बखरींची उपयुक्तता- बखरी इतिहासपर-बखरी चरित्रपर(१)-(२)

बखरीच जुने मराठींत गद्य ग्रंथ—भाषाशास्त्राच्या संबंधें बखरींची योग्यता. ... (३)-(४)

बखरी इतिहासाचीं साधनें.(४)-(५)

मदत करण्याविषयीं लोकांस प्रार्थना ... ... ... (५)-(७)

पेशव्यांची बखर- उपलब्धी- बखर रचणार सोहनी-(७)-(९)

**बाळाजी विश्वनाथ-१७१३-१७२०.**

पेशव्यांच्या इतिवृत्ताची पृच्छा- बाळाजी विश्वनाथ भट श्रीवर्धन सोडतो. ( १७०६ ) भट व भानू—"भाकरींत- चतकोर" भट व भानू जाधवा- कडे ( १७०६ )— शाहू खानदेशांत ( १७०८ )- धनाजी त्यास मिळतो— शाहूची व भटांची भेट. २- ३

पिंगळेपेशवे यांजवर शाहूची इतराजी, शके १६३५, बाळाजी विश्वनाथ पेशवे( १७१३) ४

विषय पृष्ठ

बाळाजी पुरंदरीं ( १७१६) लोहगड, आंग्रे व पेशवे— ओलवणास, तह फडनिशी— ४- ५

पेशवे व सय्यद, पेशवे दिल्लीस (१७१७)-बादशाहाशीं तह— राजकार्यासाठीं भानूंचें प्राणदान ( १७१८ ) ... ६- ७

फडनिशीवर योजना... ... ७

बाळाजी विश्वनाथ सासवडीं, (१७१९ ) मृत्यू. (१७२०) ९

वसुलाची पद्धत व मराठ्यांची जूट ... ... ९

**बाजीराव बल्लाळ १७२०-१७४०.**

पेशवाई कोणास द्यावी ? देशस्थ ब्राह्मणांचा रोख— १०

दक्षिणच्या सुभ्यावर बादशाहाची इतराजी, तो शाहूकडे मदत मागतो- ... ११- १२

मराठ्यांच्या दरबारीं मदतीस कोणीं जावें हा विचार--अंबाजी पंताची समयसूचकता- बाजीरावाची हिंमत-बाजीराव बल्लाळ पेशवे ... ... १२- १३

बाजीरावाची तयारी ... ... १४

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| नबाब व अंबाजीपंत ... ... | १५-१६ |
| बाजीरावाची व निजामाची भेट— मौक्तिकवर्षाव— खिजमतगार—"एक बाजी सब पाजी "( १७२८ ) | १७-१८ |
| नबाब पुढें व बाजीराव पाठी-वर— नबाबाची दिल्लीस कांघाई ... ... ... | १९-२० |
| " ए तो सैतान है ! " ... | २० |
| बाजीरावाशीं बादशाहाचा तह. ... ... ... ... | २१ |
| बाजीराव साताऱ्यास— शाबासकी— ... ... ... | २१ |
| बुंदेलखंड—दोहऱ्याचें पत्र, छत्रसाल खुशी-राज्यविभाग-गोविंदपंत बुंदेले (७३३)- | २२—२३ |
| चिमणाजी बल्लाळ-मस्तानी मस्तानी व बाजीराव— | २४—२५ |
| शनवारचा वाडा ( १७२९) | २६—२७ |
| चिमाजी आपा उत्तर कोंकणांत- (१७३४-३५ ) वाडा पुरा होतो (१७३५)- | २७-२८ |
| चिमाजी आपा वसईस (१७३९) किल्याचा भेद—फिरंगी याची बायको— चिमाजीस भीष्माची उपमा— वसई कौलांत येते- | २८—३० |
| बाजीराव हिंदुस्थानांत— कर्नाटकांत ३०—३६— | |
| बाजीराव व जयसिंग— 'शापादपि शरादपि'(१७३६) | ३१—३३ |
| पेशवे व दाभाडे— डभईची लढाई—दाभाड्याचें पतन, गायकवाड (१७३१ ) | ३३—३५ |
| बाजीराव कंचमीशीं लंपट (१७३९ )—... ... | ३५ |
| बाजीरावाचे पुत्र— ... ... | ३६ |
| पिलाजी जाधवास कामगिरी ( १७३४ ) ...... | ३६—३७ |
| राज्य जोरावर— शिंदे, होळकर यांची स्थापना— ( १७३२ ) – वसुलाची वांटणी- ... ... ... | ३७—३८ |
| मोंगलाशीं कटकट—रावेर येथें कैलासवास ( १७४० ) | ३९—४० |


## बाळाजी बाजीराव-१७४०—१७६१


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| बाजीरावाचें उत्तरकार्य— बाळाजी बाजीराव प्रधान-कोंकण सर करतो, ... | ४०—४१ |
| वाड्यांत पाणी—गवंड्यास इनाम- ... ... ... | ४२ |
| हिंदुस्थानांत स्वारी(१७४१-१७४२ ) ' छातीचा कोट असतां मातीचा कशाला ?' | ४३—४४ |
| सावनुरावर मोहीम१७५५)- नगरच्या किल्याचा भेद | |

| विषय | पृष्टें |
|---|---|
| ( १७५९ )- कर्नाटकावर स्वारी ( १७५५ ) व ( १७५६ ) ... ... | ४४–४६ |
| सदाशिव चिमणाजी उर्फ भाऊसाहेब व रामचंद्र-बावा ... ... ... | ४६–४७ |
| 'सोन्याच्या ताटासही उठिंगण लागतें' ... | ४७ |
| सांगोल्याची स्वारी, भाऊ-साहेब 'कोल्हापूरचे पेशवे' होण्याचा रंग, भाऊसाहेब कुल कारभारी, ( १७४९ ) | ४८–४९ |
| दादांची पंजाबची स्वारी, कर्ज, भाऊसाहेब मोहीम-शीर ( १७५८—५९ ) ... | ४९–५० |
| उदगीरची लढाई, तह १७६० | ५०–५१ |
| भाऊसाहेब नाशिक येथें, त्र्यंबकेश्वरीं, मशिदी मोडून देवळें. मुलुखाची वांटणी-गिरीपुरींच्या तंट्याचाउलगडा ( १७५५ ) ... ... | ५२–५३ |
| दादांची हिंदुस्थानांत मोहीम, हिंगणें, "रघुनाथराव ते कोणते ?" या प्रश्नाचा जबाब ( १७५५ ) ... | ५३–५४ |
| शाहू महाराज कैलासवासी-रामराजे ( १७४९ ) ... | ५४ |
| पर्वती संस्थान— गंडकी शिळेची मूर्ती-दक्षिण सम.-रंभ, त्याचा उद्देश-(१७५०)- | ५४–५६ |
| नानासाहेब हिंदुस्तानांत— काशीकर ब्राह्मणांवर संकट, पाटणकर दीक्षित— गुप्त गंगास्नान (१७४८) ... | ५७–५८ |
| दादासाहेब हिंदुस्थानांत— फत्तरगडास वेढा, विंचुरकर यांचा फितूर, फत्तरगडची लूट— ... ... ... | ५८–६० |
| रास्ते, पटवर्धन, विंचुरकर, राजेबहादुर इत्यादींस ... जहागीर.— दक्षिणेस ऐंशीं हजार ब्राह्मण ( १७५८ ) | ६० |
| अहमदशहा अबदाली (१७४८-१७६१) भाऊ-साहेबांची हिंदुस्थानांत मोहीम-पाणिपत येथील युद्धें-मोड-नानांचा शोक. | ६०–६३ |
| दादांची गिलच्यावर चाल, भीमाचें अनुकरण, नाना-साहेबांचा कैलासवास ... | ६४–६५ |

## माधवराव बल्लाळ, १७६१–१७७२.

| | |
|---|---|
| माधवराव बल्लाळ यांस वस्त्रें-माधवरावांस प्रतिबंध— त्याचा तापट स्वभाव ... | ६५–६६ |
| मोंगलांवर मोहीम—राक्षस-भुवनची लढाई (१७६३ )- | |

| विषय | पृष्ठें |
|---|---|
| माधवरावाचा पराक्रम ... | ६६–६९ |
| दादांस प्रतिबंध (१७६८)- | ६९ |
| सखाराम बापू बोकील-यांची ढवळाढवळ- त्यास प्रतिबंध- माधवरावाच्या कृपेंतील मंडळी. ... ... | ६९–७० |
| हैदरावर स्वारी (१७६६-६५) थेलगिरीचा किल्ला(१७६९) | ७०–७१ |
| भोसल्यांशीं बिघाड, पुण्यास आग, नागपुरास आग, दिवेलावणीचा कौल (१७६२–१७६३) ... ... ... | ६९–७० |
| विनीवाले, शिंदे, होळकर हिंदुस्थानांत— दिल्लीचा बंदोबस्त १७६९-७० बापूंचा फितूर— त्याचा परिस्फोट— | ७३–७४ |
| बापू व देवाजीपंत— बुद्धबळांचा डाव ... | ७५–७६ |
| मोंगलावर स्वारी, नारायणराव समागमें ... ... | ७६–७७ |
| बारामतीस मुक्काम— हत्ती मोकाट—पेशव्याचें धैर्य ... | ७७–७८ |
| दादा बाहेर पडतो, पाठलाग-कैद, ( १७६८ ) ... | ७८–७९ |
| मामांची कर्नाटकांत रवानगी ( १७७० ) माधवरावाचा दरारा-हैदराबादच्या ब्राह्मणाची दाद-चार ढालाईत दोन लाख फौजेस भारी ! ( १७७० ) | ७९–८४ |
| हैदरावर मोहीम करण्याची तयारी-माधवरावांचें दुखणें ( १७७० )— थेउरास मुक्काम ( १७७१ )- ... | ८५–८५ |
| तीन हेतू— नानाफडनिसाची हिंमत—कर्जाची फेड— तात्यांस बक्षीस ... ... | ८६–८७ |
| दादाची भेट-निरवानिरव- | ८७–८८ |
| कैलासवास ( १७७२ )- रमाबाई सती ... ... | ८८ |
| **नारायणराव बल्लाळ १७७२-१७७३** | |
| नारायणराव पंत प्रधान, दादांस प्रतिबंध --गंगापूर— फितूर गारदी वाड्यांत, गर्दी- वध-टिळेकर व फाटक यांची स्वामिभक्ती ( १७७३ ) | ८९–९२ |
| शहरांत हूल, चावडीवर जमाव, | ९३ |
| नारोजी नाइकाची हत्या— मालोजी घोरपडे व भवानराव प्रतिनिधी यांच्या स्पष्टोक्ती ... ... ... | ९३-९४ |
| वाड्यांतील शोक, साहा खून, नारायणरावाचा उत्तरविधी, -वाळूचीं लिंगें, शपथा ... | ९४-९५ |
| **रघुनाथ बाजीराव–१७७३.** | |
| रघुनाथ बाजीराव यास | |

| विषय | पृष्टें |
|---|---|
| वस्त्रें, मोंगलावर स्वारी १७७३ मुत्सद्दी यांची मसलत ... | ९५-९७ |
| बापू, नानाप्रभृती मंडळी पुण्यास परत, बाया पुरंदरीं, गंगाबाईच्या नांवचीं पत्रें. | ९८-९९ |
| माधवराव नारायण याचा जन्म ( १७७४ ) ... | ९९ |
| **माधवराव नारायण १७७४-१७९५** | |
| सवाई माधवराव यांस वस्त्रें, कारभाऱ्यांची व्यवस्था व नेमणुका-हरिपंताची दादा-वर चाल, त्र्यंबकराव मामाची अखेर... ... ... | १००-१०१ |
| नबाबाशीं तात्याचा तह-नबाब व हरिपंत-दादामार्गे लागनात ( १७७५ ) | १०२-१०५ |
| दादाचा इंग्रजांशीं तह, ( १७७५ ) – मराठ्यांचा व इंग्रजाचा पहिला बिघाड (१७७८- १७८२ )- ... | १०५ |
| इंग्रज घाट चढतो– कारभाऱ्यांची तयारी– तळेगांव वडगांवची लढाई– इस्टूर फांकडा याचें पतन— श्रीमंतांची, फत्ते( १७७९) | १०६-१०७ |
| बालमाधवानें "इंग्रज ठार मारिला" ती गोष्ट. ... | १०८ १०९ |
| दादाची कोपरगांवीं स्थापना. ( १७८२ )- ... ... | १०९ |
| आनंदराव धुळपाचा पराक्रम, श्रीमंत पुण्यास (१७७९) | १०९-१११ |
| सखारामबापूची फितुरी—शासन ( १७७८ ) ... | १११ |
| नारायणरावांना मारणारांस शिक्षा— शिंदे, होळकर हिंदुस्थानांत, पुण्यास हुजर | १११-११२ |
| फौजेचा बंदोबस्त, श्रीमंतां जवळील मंडळी— ... | ११२-११३ |
| खदोबाचें बंड १७७६-७७) | ११३-११४ |
| श्रीमंतांचा व्रतबंध-(१७७९) | ११४ |
| लग्न-समारंभ–( १७८२ ) | ११५-११६ |
| आमंत्रणें— पाहुण्यांची व्यवस्था ... ... | ११६-११७ |
| देवकस्थापना व सीमांतपूजन, दरबार— पन्नास काठी सोन्याची, आनंदाश्रू–... | ११७-११८ |
| तेलफळ, नवरीच्या मंडपांतील व्यवस्था-आहेर-रुखवत... | –११८ |
| वरप्रस्थान ... ... | १२०-१२१ |
| पाणिग्रहण--भोजनसमारंभ--वरात—मेजवान्या— ... | १२२ |
| पोलादजंग यांस जाफत—पाहुणे मंडळीची बोळवणी | १२३ |
| गारद्यांचा तंटा—करमरकर ठार होतो ... ... | १२३ |
| शिकारखाना, श्रीमंतांचे खेळ | १२४-१२५ |

| विषय | पृष्ठें |
|---|---|
| इंग्रजांचा वकील (१७८८)- | १२५ |
| भेट—लाल मेणा | ...१२५-१२७ |
| बदामीची मोहीम-(१७८४)- | १२८ |
| फडनीस नानाची बातमी | १२८-१२९ |
| अलीबहादर याची हिंदुस्थानांत रवानगी (१७८९) | १२९ |
| गिलच्यांचें व रोहिल्यांचें पारिपत्य ... | ...१३०-१३१ |
| इंग्रजांबरोबर टिपूवर मोहीम, तात्या व भाऊ १७९१ | १३२ |
| दिल्लीचें वर्तमान— गुलाम कादर- महादजी शिंद्या- कडून त्याचें पारिपत्य- | ...१३२-१३३ |
| शिंदे बादशाही वजिरात मिळवितात (१७८४) | १३३-१३४ |
| कर्नाटक— टिपूशीं तह— (१७९३) ... | ... १३४-१३५ |
| पुण्यांतील 'ब्ल्याकहोल— | १३५-१३६ |
| घाशीरामास शिक्षा (१७९१) ... | ... १३७-१३८ |
| शिंदे दक्षिणेंत (१७९२-९४)— शिंद्याची संपत्ती— | १३९ |
| त्याच्या फौजेची कवाईत- | १४०-१४१ |
| वजिरातीच्या वस्त्रांचा समारंभ ... ... ... | १४१-१४४ |
| मुतालिकी शिंद्यास... ... | १४४ |
| शिंदे नानास हिशेब विचारतो ... ... | १४४ |
| नाना काशीयात्रेस निघतो— नौकाक्रीडा— शिंद्याचें | १४५ |
| बोलणें व श्रीमंतांचें उत्तर | १४६ |
| तात्या व शिंदे—समेट | १४६-१४७ |
| तुळाराम मिरधे—' पटेल आगे देखो' ... ... | १४८ |
| हिंदुस्थानांतील राजांच्या गोष्टी | १४९ |
| दारूची लंका ... | ...१४९-१५० |
| रंगक्रीडा ... ... | ...१५१-१५३ |
| रमाबाईचा मृत्यू-माधवरावाचें दुसरें लग्न (१७९२) | १५४-१५५ |
| मल्हारराव होळकराची अनावळी व त्याचा बंदोबस्त | १५५-१५६ |
| शिंदे व तात्या यांचा कैलासवास (१७९४), त्यांच्या चिरंजिवांची व्यवस्था ... | १४६-१५७ |
| हैदराबाद- तमाशा· नबाबावर मसलत. १७९४-९५ | १५७-१५८ |
| काळे, पिंगळे व नाना— सरदारांस बलावणीं ... | १५८-१६० |
| हैदराबादवाले यांच्या वकिलांचीं बोलणीं ... | १६० |
| शिंदे, होळकर, भोंसले यांस पत्रें— दौलतराव शिंद्यास सरदारीचीं वस्त्रें | ...१६१-१६२ |
| मानकरी, सरदार, पागे अष्टप्रधान— ... | ... १६२-१६३ |
| मानाजी फांकडे याची— | |

| विषय | पृष्ठें |
|---|---|
| समजूत, फौजेचा तळ— | १६३ |
| पुण्याचा बंदोबस्त— | |
| श्रीमंतांचा डेरा गारपिरावर | १६३-१६४ |
| श्रीमंत बाहेर पडतात— | |
| स्वारीचा थाट ... ... | १६५ |
| गारदौंडेचा मुक्काम, मोंगलांच्या मुलखाची जप्ती ... | १६६-१६७ |
| मोंगलाची चाल, खरड्याचें मैदान ... ... ... | १६७ |
| मराठी फौजेचा तळ ... | १६७ |
| लढाई खरड्याची (१७९५) | १६८-१७१ |
| श्रीमंतांची फत्ते ... | १७२ |
| तहाचें बोलणें— नबाब व मश्रुन्मुलूख ... ... | १७२-१७३ |
| मश्रुन्मुलूख हस्तगत, इतर शर्ती, स्वारी परत, पुण्यांतील प्रवेशसमारंभ— सोन्या-रुप्याचीं फुलें ... | १७३--१७८ |
| मश्रुन्मुलूख याची व्यवस्था, तोफांची सरबत्ती ... | १७८ |
| सरदार मंडळीस निरोप | १७९ |
| “ राज्य कळसास आलें ” | १८० |
| ताइताचा प्रयोग-नागनाथ, | १८०-१८१ |
| गणपतीच्या दिवाणखान्यांतून उडी-मुत्सद्दी मंडळाची धांदल | १८१ |
| श्रीमंत निजधामास ... | १८३ |
| मागील बंदोबस्त, खटपटी— नानाचीं राजकारणें —उलट खटपटी. ... ... | १८३--१९१ |

| विषय | पृष्ठें |
|---|---|
| **बाजीराव रघुनाथ १७९६-१८१८** | |
| बाजीराव बाबासाहेब यांस वस्त्रें, बाजीरावाचें मंडळ. | १९१-१९२ |
| नानाची भेट—चिंतोपंत देशमूख ... ... | १९२ |
| खातारच्या महाराजांची बंडाळी— परशुरामभाऊची सुटका ... ... ... | १९३ |
| होळकरांची हकिकत— मल्हारराव होळकरास दगा, लाख्या बारगीर ... ... | १९४-१९५ |
| नाना फडनीस कैद (१७९७) | १९६ |
| सरजेराव घाटगे (१७९७-१७९८)--बायांचा दंगा--नानाची सुटका--मृत्यू, (१८००) ... ... | १९७-१९८ |
| नानास दत्तक--नानाच्या पक्षाच्या लोकांस कैद | १९८ |
| बाळोजी कुंजर कारभारी-(१८००) ... ... | १९९ |
| यशवंतरावाचें बंड, शिंद्याची त्याजवर चाल (१८००-१८०१) ... ... | १९९ |
| जहागिरींच्या जप्त्या ... | २०० |
| अमृतरावाशीं बेबनाव— यशवंतराव व अमृतराव | २०१ |
| फोजेची तयारी, यशवंतरावाची | |

| विषय | पृष्टें |
|---|---|
| रैाड, १८०१-१८०२ | २०२-२०३ |
| पुण्याची लढाई-- ( १८०२ ) यशवंतरावाचा पराक्रम— | |
| पेशवे व शिंदे यांचा मोड- | २०४ |
| होळकर पुण्यांत—दंगा-- | २०५-२०७ |
| बाजीराव वसईस ( १८०२-१८०३ ) ... ... | २०७ |
| इंग्रजांची चाल,-होळकर व अमृतराव हिंदुस्थानांत जातात | २०७ |
| इंग्रज नगरचा किल्ला घेतात. | २०८ |
| बोकरदनची लढाई,(१८०३)- | २०८ |
| शिंदे होळकरांचा तह— ( १८०५ ) ... ... | २०९ |
| होळकर व इंग्रज ( १८०४-५ )... ... | २०९-२१० |
| इंग्रजांचा उपदेश, श्रीमंतांची ढिलाई ... ... ... | २११ |
| दोन शास्त्रीत -- डेंगळे-- | २१२ |
| (१८१३)-अलपिंष्टन, मोदी, गंगाधर शास्त्री ( १८१३-१८१४ )- ... ... | २१२-२१३ |
| पंढरीची यात्रा, गंगाधर शास्त्री याचा वध ( ·८१५ ) | २१४ |
| त्रिंबकजी डेंगळे ठाणे येथें, ( १८१६--१७ ) पळतो-- ( १८१६ ) बंड कारतो- | २१४-२१५ |
| श्रीमंतांची तयारी,गोविंदराव काळे ... ... | २१६ |
| शिंदे होळकर वगैरेंस पत्रें, | २१७ |
| बेटावर हल्ला- ( १८ ७ )— सरदारांची फितुरी | २१७—२१८ |
| खडकीची लढाई ( १८१७) मोरुनाना पडतो--बाजीरावाचा अनिश्चितपणा ... | २१८ |
| येरवड्याची लढाई,आरब व गोसांवी यांचा नाइलाज ( १८१७ ) ... ... | २१९ |
| श्रीमंत " दिव्याच्या घाटाचा रस्ता धरतात "— | २१९ |
| कंपनी सरकारचा बावटा शनवारच्या वाड्यावर लागतो | २२० |
| श्रीमंतांचा पाठलाग-कोरेगांवची लढाई ( १८१८ ) सातारकर राजे श्रीमंतां-समागमें--फौजेच्या दोन टोळ्या,अष्टे येथील चकमक ( १८१८ )-बापू गोखले यांचें पाणिपत,गारपगारी—मराठे सरदारांचा इंग्रजावर इतरत्र हल्ला ... | २२०-२२२ |
| त्रिंबकजी डेंगळे चांडाळगडास—राज्याचा बेदावा-(१८१८) ब्रह्मावर्त ! ... | २२२ |
| चिमाजी आपा व वाराणशीबाई यांची रवानगी | २२३ |
| बखर- काराचे विचार- ग्रंथ समाप्ती | २२३ |
| पेशव्यांच्या घराण्याची वंशावळ माहितीच्या टिपासुद्धां | २२४-२२५ |

# शुद्धिपत्र.

( ह्यांत मुख्य अशुद्धें दिलीं आहेत तीं आधीं शुद्ध करून मग ग्रंथ वाचावा. )

| पान | ओळ अगर टीप | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | टीप २३ | दिल्लीच | दिल्लीच्या |
| १४ | शेवटची | रवना | रवाना |
| १५ | १६ | यते | येत |
| १७ | ६ | सांगतल्यावर | सांगितल्यावर |
| ,, | शेवटून २ | जेथ | जेथें |
| १९ | ३ | मेटीस | भेटीस |
| ,, | ५ | ता | तों |
| २४ | ८ | त्यणीं | त्यांणीं |
| ,, | ४ | याणीं | यांणीं |
| ४७ | खालून ४ | वेलूं | बोलूं |
| ,, | ,, ७ | झाली. | झालीं. |
| ५३ | ५ | यजुर्वेदा | यजुर्वेदी |
| ,, | खालून ३ | सखाराम बाप समागम | सखाराम बापू समागमें |
| ५९ | १५ | विनती | विनंती |
| ६१ | ६ | भाऊसाबांची | भाऊसाहेबांची |
| ,, | १७ | जाउन | जाऊन |
| ६३ टीप* | ओळ शेवटली | खुदा | खुर्दा |
| ,, | ,, | नाहा | नाहीं |
| ६४ | १४ | ब्रम्हणास | ब्राह्मणास |
| ६७ | खालून ३ | खावद | खावंद |
| ६७ | खालून २ | एकतांच | ऐकतांच |
| ,, | ,, | सांगितल | सांगितलें |
| ७३ | खालून ३ | कनार्टकांत | कर्नाटकांत |
| ८० | १ | मिरधे७९ | मिरधे४६ |
| ,, | २ | लिहिली | लिहिलीं |
| ८२ | ४ | ब्रह्माणास | ब्राह्मणास |
| ८३ | खालून २ | ताडांत | तोंडांत |
| ८७ | शेवटची | चालावणें | चालविणें |
| ९० | खालून ८ | तुळाजीन | तुळाजीनें |
| ९९ | ११ | सर्वांनी | सर्वांनीं |

| पान | ओळ अगर टीप | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १०० | ९ | टिप | टिपू |
| १०२ | १० | यांचें | यांचे |
| ,, | ११ | लढाईं | लढाई |
| १०७ | शेवटची | रा | वारा |
| १·४ | १२ | द्दांत | दांत |
| १२३ | ४ | ऐकाड | एकांडे |
| १२४ | खालून ४ | थाडासा | थोडासा |
| ,, | खालून ३ | खेळल | खेळले |
| १२५ | ७ | बंदोस्त | बंदोबस्त |
| १२९ | ५ | तू | तूं |
| ,, | १५ | चास | यांस |
| १३१ | खालून ४ | पारपत्य गिलच्यांच | पारिपत्य गिलाच्यांचें |
| ,, | शेवटची | केलीं | केली |
| १३८ | शेवटची | पारपत्य | पारिपत्य |
| १४३ | २ | तेचें | तेथें |
| ,, | खालून ७ | गुमास्तीगरीचीं | गुमास्तगिरीचीं |
| ,, | खालून ४ | खबाची | खांबाची |
| १४७ | ३ | चारोबर | ब·ोबर |
| ,, | ९ | पराकाष्टा | पराकाष्ठा |
| १५४ | खालून २ | बसूत | बसून |
| १५८ | १ | बसल | बसले |
| १६१ | १ | मंश्रुद्दौल[१०] | मंश्रुद्दौला[१०] |
| १६४ | टीप | २७ | २८ |
| १६६ | खालून ५ | भलखांत | मुलखांत |
| १६८ | १५ | ता | तो |
| १७० | १२ | कमरग्यांमध्यें[३३] | कमरग्यांमध्यें[३३] |
| १७९ | ४ | साडचिठ्या | सोडचिठ्या |
| १९५ | टीप ५ | पोहा | पाहा. |
| १९७ | १० | असता | असतां |
| १९८ | खालून ६ | चितोपंत | चिंतोपंत |
| ,, | शेवटची | शमुख | देशमुख |
| २०२ | ८ | यशधंतर व | यशवंतराव |
| ,, | खालून ५ | स्वरांचा | स्वारांचा |
| २०३ | ५ | यशवंतराव | यशवंतराव |

# शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र.

## केसरी काय म्हणतो ?

शककर्ते श्रीछत्रपतिमहाराज यांचें मल्हार रामराव चिटणीसविरचित सप्तप्रकरणात्मक चरित्र ( संशोधक व प्रकाशक रा. ब. काशिनाथ नारायण साने, कल्याण, जिल्हा ठाणें, किं. २ रु. ) हें रा. ब. साने यांनीं नुकतेंच अनेक प्रतींवरून शुद्ध करून अर्थनिर्णायक, विचिकित्सक आणि अवांतर माहितीच्या भरपूर टिपांसह प्रकाशित केलें आहे. रा. ब. साने यांच्या साक्षेपी स्वभावाची ज्यांना माहिती आहे त्यांना हें चरित्र किती काळजीपूर्वक प्रकाशित केलें गेलें असेल याची कल्पना येईल व प्रत्येक वाचकाचीहि हें पुस्तक हातीं धरतांच त्याविषयीं खात्री पटेल. चारहि प्रतींतून अक्षरानक्षर तपासून ताडून पाहून प्रत्येक पाठभेद टिपेंत नमूद केला आहे; आणि प्रत्येक प्रकरण संपतांच अर्थनिर्णायक व अवांतर टिपा दिल्या आहेत. पुस्तकाचीं पृष्ठें ३७६ असून त्यांतलीं ११४ पृष्ठें टिपांनीं व्यापलीं आहेत. या टिपांत आजतागायत झालेल्या सर्व शोधांचा समावेश केलेला असल्यामुळें हें एक पुस्तक वाचल्यास नुसती चिटणिसांचीच तेवढी बखर वाचल्याचें श्रेय प्राप्त होत नसून शिवाजीच्या चरित्राविषयींची आजपर्यंतची सर्व साद्यंत हकीकत वाचल्याचें श्रेय पदरीं पडतें.

शुद्धलेखन, व्याकरण व व्युत्पत्ति यांच्या यथार्थ ज्ञानाविषयीं रा. ब. साने यांचा विशेष कटाक्ष असल्याकारणानें त्यांनीं बखरींतील शब्दानुशब्दाची त्या दृष्टीनेंहि चिकित्सा केली आहे आणि जागोजागीं मोडी लिपी व बालबोध लिपी यांचें साम्य व विरोध यांचीहि चर्चा केली आहे. त्याचप्रमाणें व्याकरणदृष्ट्या शुद्धाशुद्धतेची त्यांनीं छाननी केली असून बहुतेक शब्दांच्या व्युत्पत्तीचीहि फोड केली आहे.

परंतु हा ग्रंथ ऐतिहासिक असल्यानें टिपांचा मुख्य भर ऐतिहासिक चर्चेवर आहे हें सांगावयास नकोच. चिटणिसांच्या लेखाचा जेथें जेथें इतर ग्रंथांशीं मेळ बसत नसेल तेथें तेथें वास्तविक प्रकार काय आहे याचा त्यांनीं ऊहापोह केला आहे. आणि मल्हार रामराव चिटणीस यांचें लिखाण तितकें साक्षेपी नसल्यानें त्यांच्या शेंकडों चुकांचा टिपांमधून निर्देश करावा लागला आहे.

अशीं विसंगत विधानें या चरित्रांत आहेत, पण रा. ब. साने यांनीं प्रत्येक विधान कसोशीनें तपासून पाहून सर्व चुकांची दुरस्ती नमूद केली आहे. अशा रीतीनें सविस्तर व साधार टिपा दिल्यामुळें हें सटीक चरित्र विद्यार्थ्यांस फारच उपयुक्त झालें आहे. चिटणिसांचें हें सप्तप्रकरणात्मक चरित्र कालानिर्णायक विधानांच्या दृष्टीनें हिणकस ठरत असलें तरी त्यांतील भाषा डौलदार व ठाकठिकीची आणि वर्णन रसभरित व चटकदार आहे. जुन्या बखरींत भाषेच्या दृष्टीनें भाऊसाहेबांची बखर अगदीं अप्रतिम आहे.चिटणिसांची ही बखर तिच्या तोडीची नसली तरी तिच्या खालोखाल हिचाच नंबर लागेल. जुन्या जोमदार भाषेचा नमुना हें सप्तप्रकणात्मक चरित्र वाङ्मयोपासकांना आदरणीय आहे. असल्या उत्कृष्ट चरित्राची शुद्ध व सटीक प्रत आजपर्यंत उपलब्ध नव्हती. रा. ब. साने यांनी इतक्या उतारवयांत निरलसपणें अत्यंत परिश्रम घेऊन ही उणीव दूर केली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. इतिहास व भाषाशास्त्र या दोहोंचेहि ते दर्दी असल्यामुळें त्यांच्या नजरेखालून निघालेली ही आवृत्ति अनेक दृष्टींनीं नमुन्यादाखल मानली जाईल.

अरबी साल, फसली साल, हिजरी साल, यांचे शकांत किंवा इसवी सनांत रूपांतर करावयाचें झाल्यास तें कसें करावें याविषयीं पृ ३६–३७ वर साने यांनीं जी माहिती दिली आहे ती संशोधकांस उपयुक्त आहे. अशीच आणखी किती तरी उपयुक्त माहिती या टिपांतून देण्यांत आली असून त्या योगानें इतिहासाच्या नवीन अभ्यासकांस हा ग्रंथ मार्गदर्शक होण्याजोगा आहे. रा. ब. साने यांच्या शुद्ध लेखनपद्धतीचा उत्कृष्ट नमुना म्हणूनहि हें पुस्तक उपयोगी पडण्यासारखें आहे.

# पेशव्यांची बखर.

## बाळाजी विश्वनाथ—ई० स० १७१३-१७२०.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
श्रीनिवासपंत दाजी, स्वामींचे सेवेशीं.

सेवक नारो मेघश्याम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें त्यांत मजकूर लिहिला कीं, श्रीमंत पेशवे यांस पेशवाई कशी प्राप्त झाली; व कोणत्या पुरुषानें शाहू महाराज यांचे येथें पराक्रम करून महाराजांची कृपा संपादन करून, कामगिरी मोठी कोणती बजाविली; म्हणून महाराज कृपावंत होऊन यांसच पेशवाई देण्याचें कारण कोणतें झालें; व कोणत्या पुरुषानें किती दिवस राज्य केलें; तें तपशीलवार लिहून पाठविणें. येविशीं पत्रीं आज्ञा झाली, त्यावरून सविस्तर मजकूर लिहून आपणांस पाठविला आहे त्याजवरून कळेल.

बाळाजी विश्वनाथ भट व जानोजी विश्वनाथ भट हे राहणारे *श्रीवर्धनचे. यांचें वतन देशमुखीचें. देशमुखीचा कारभार हे उभयतां बंधू करीत असतां, तें राज्य हबशी यांचें पडलें, जानोजी विश्वनाथ भट यांस हबशी याणें जंजिऱ्यास धरून नेलें आणि कैद करून गोणत्यांत घालून समुद्रांत बुडविलें. त्या दहशतीनें बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनाहून पळून मौजे *वेळास येथें बाळाजी महादेव भानू[१] यांचे येथें आले. भानू व भट यांचा स्नेह पूर्वीचा होता. बाळाजी विश्वनाथ तेथें येऊन भानूंस भेटले. ते समयीं भानू यांणीं बाळाजी विश्वनाथ यांस विचारिलें, "असे तुम्ही कां आलां?" मग भट याणीं मागील मजकूर झाला तो भानूंस सांगितला, आणि बोलिले:— "आतां या

---

* हीं दोन्हीं गांवें कोंकणांत सावित्री नदीच्या मुखाच्या टप्प्यांत आहेत. १. हे प्रसिद्ध नाना फडणीस यांचे पूर्वज.

प्रांतांत राहावयाचें नाहीं; बाहेर कोठें तरी रोजगारास जावें." तेव्हां बाळाजी महादेव बोलले, " आम्ही तुमचे समागमें त्रिवर्ग² बंधू येतों." हें ऐकून भट यांणीं उत्तर केलें, "बरें आहे, आम्हांस भाकर मिळेल तींत तुम्हांसही चतकोर मिळेल".

असें बोलणें झाल्यानंतर त्रिवर्ग बंधू भानू व भट, असे चारी असामी निघाले ते सातान्यास आले. तेथें धनाजी³ जाधवराव होते. त्यांजकडे बाळाजी विश्वनाथ व भानू तिघे बंधू गेले. महादाजी⁴ कृष्ण जोशी सातान्यास होतेच; त्यांची व रामाजी महादेव यांची ओळख पूर्वींची होती; त्याजवरून जोशी यांजकडे जाऊन ते भेटले. महादाजी कृष्ण जोशी व रामाजी महादेव भानू हे उभयतां शंकराजी नारायण⁵ सचिव यांजकडे चाकरीस राहिले. ते समयीं सातान्यास *ताराबाई राज्य करीत होती, तिजपाशीं धनाजी जाधवराव हे सरदार होते, व शंकराजी नारायण कारभार करीत होते. शाहू महाराज दिल्लीस⁶ गेले होते. ते दिल्लीहून सातान्यास यावयास निघाले, ते खानदेशांत आले. तेथून धनाजी जाधवराव, व खंडेराव दाभाडे, शंकराजी नारायण सचिव, व रामचंद्र⁷, व चिमणाजी दामोदर⁸ यांस पत्रें महाराज यांणीं पाठविलीं कीं, तुम्हीं भेटीस येणें. त्यावरून

२. त्रिवर्ग– हरी, बाळाजी, रामाजी महादेव. ३. धनाजी हा ताराबाईचा व पुढें शाहूचाही सेनापती. हा व याचा प्रतिस्पर्धी संताजी घोरपडे यांणीं राजारामाच्या वेळीं मोंगलांची दाणादाण उडवून बहुत कीर्ती संपादन केली. धनाजीचा धाक मोंगलास इतका वाटे कीं, त्यांचे घोडे पाण्यावर गेले असतां पाणी न प्याले तर ते त्यांस विचारीत, "कायरे,तुम्हांला धनाजी पाण्यांत दिसला कीं काय ? पाणी कां पीत नाहीं ?" ४. कृष्णाजी जोशी नाईक शाहूमहाराजांच्या लहापणापासून सेवेंत होते त्यांचे हे चिरंजीव असावे. ५. शंकराजी नारायण गांडेकर हा व किन्हईचा कुळकर्णी परशुराम त्रिंबक असे रामचंद्रपंत अमात्य यांजपाशीं कारकून होते. दोघांनींही राजारामाच्या वेळीं पराक्रम करून नांव मिळविलें. पुढें शंकराजी मल्हार सचिव आपलें काम सोडून काशीस जाऊन राहिले; तेव्हां शंकराजी नारायण यांस सचिवाचीं वस्त्रें दिलीं. परशुराम त्रिंबकासही पुढें " प्रतिनिधी " हा किताब दिला. *ताराबाई राजारामाची बायको. मोहिते यांची कन्या. हिणें शाहू हा कोणी तोतया आहे, असें लोकांस समजाविलें; व कांहीं सरदारांकडून शपथा करवून त्यांस आपणाकडचे केलें. ६. शाहू व त्यांचें कुटुंब हीं औरंगजेबाच्या लष्करांत दक्षिणेंतच होतीं. त्याच्या मरणानंतर त्याचा मुलगा अझीमशाहा याणें त्यांस आपल्याबरोबर नर्मदेच्या पलीकडे बरेंच नेलें होतें. तेथून झुल्फिकारखान याच्या सांगण्यावरून फक्त शाहूस मात्र मुक्त करून स्वदेशीं जाऊं दिलें. ७. ( ? ) ८. चिमणाजी दामोदर व परसोजी भोंसले हे सरदार त्या वेळीं खानदेशांत व वन्हाडांत सैन्यासह होते. चिमणाजी दामोदर हा पिंगळे पेशवे यांच्या तर्फेचा पांच हजारांचा सरदार होता.

धनाजी जाधवराव व खंडेरावें दाभाडे व चिमणाजी दामोदर, असे खानदेशांत जाऊन त्यांणीं श्रीमंत शाहूमहाराज यांची भेट घेतली. शंकराजी नारायण सचिव भेटीस गेले नाहींत, सातान्यास ताराबाईजवळ होते. धनाजी जाधवराव खानदेशांत महाराजांचे भेटीस गेले, त्यासमयीं बाळाजी विश्वनाथ देशमूख व हरी महादेव भानू व बाळाजी महादेव भानू, असे त्रिवर्ग धनाजी जाधवराव यांजवळ होते. ते तसेच त्यांच्यासमागमें खानदेशांत गेले. तेथें महाराजांच्या भेटी झाल्या. नंतर जाधवराव यांणीं बाळाजी विश्वनाथ यांची महाराजांची भेट करविली. नंतर शाहूमहाराज सातान्यास आले ते समयीं शंकरा[१०]जी नारायण साचिव यांणीं हिरकणी खाऊन प्राण दिला.

शाहू महाराज सातान्यास राज्य करूं लागले, त्यासमयीं बहिरोपंत पिंगळे पेशवे होते. महाराज राज्य करूं लागल्यानंतर एका वर्षा[११]नें बहिरोपंत पिंगळे पेशवे यांजकडे लोहगड किल्ला होता तो पिंगळे लोहगडास असतां कां[१२]न्होजी आंगरे यांणीं घेतला. हें वर्तमान सातान्यास समजलें. ते समयीं पिंगळे यांजवर इतराजी करून पेशवाई त्यांजकडील दूर करून दुसऱ्यास सांगावी हा विचार करीत असतां बाळाजी विश्वनाथ हे खानदेशापासून महाराज सातान्यास येत तों पावेतों महाराजांचे स्वारीबरोबरच होते, ते कांहीं मसलतींच्या[१३]

---

९. खंडेरावाबद्दल ग्रांट डफ याप्रसंगीं स्पष्ट लिहीत नाहीं. धनाजी प्रथम ताराबाईच्या तर्फे लढण्यास आला होता, त्यास शाहूकडे वळवून घेतलें. प्रतिनिधी परशुराम त्रिंबक—तसा न वळतां सातान्यास परत गेला. दुसरे सरदार शाहूस या वेळीं मिळाले ते—परसोजी भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे वगैरे. १०. यास घाटमाथा संभाळण्यास ठेविलें होतें. शाहू खरा मालक असतां ताराबाईचा अधिकार चालविण्याविषयीं शपथ केल्याचा पश्चात्ताप होऊन त्यानें जलसमाधी घेतली, असें ग्रांट डफ म्हणतो. त्याचा मुलगा नारो शंकर हा या वेळीं अगदीं लहान होता तरी शाहूनें त्यास सचिव करून आपलासा करून घेतलें. ११. ही गोष्ट इसवी सन १७१३ त झाली; म्हणजे शाहू राज्याभिषिक्त झाल्यावर सुमारें ५ वर्षांनीं. १२. कान्होजी आंगरे ताराबाईच्या तर्फे लढत होता. त्यानें बहिरोपंतास कैदही केलें होतें, व तो खुद्द सातान्यावर चाल करून येणार होता. सिधोजी गुजर मेल्यावर मराठी आरमाराचा मुख्य हाच झाला होता. याचें मुख्य स्थान कुलाबा. हा पूर्वी सातारचे महाराजापाशीं दिवट्या होता असें म्हणतात. १३. ह्या मसलती खरोखर मोठ्या महत्त्वाच्या होत्या. ह्या वेळीं महाराष्ट्रांत फारच घोटाळा होऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी अवस्था झाली होती. अशा वेळीं बाळाजी मसलतीनें व पराक्रमानेंही शाहूच्या उपयोगीं फार पडला; व शाहूनें ' सेनाकर्ते ' असें पद त्यास लौकरच दिलें.

उपयोगीं पडले होते, हें महाराजांच्या मनांत येऊन व बाळाजी विश्वनाथ शाहाणे, कर्ते, असें पाहून, त्यांस महाराजांनीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. शके १६३५ विजयनाम संवत्सरे, सन अर्बा अश्शर मय्यां व अल्लफ, या सालीं पिंगळे यांची पेशवाई काढून बाळाजी विश्वनाथ यांस सांगितली.[१४]

त्यासमयीं बाळाजी विश्वनाथ पेशवे यांणीं महाराजांस विनंती करून राज्याची फडणिशी आपल्याकडे मागून घेतली, आणि हरी महादेव[१५] भानू यांस फडणिशीचीं वस्त्रें पेशवे यांणीं दिलीं. पुरंदर किल्ला,[१६] व लोहगड किल्ला, असे दोन किल्ले बाळाजी विश्वनाथ पेशवे यांणीं मागून घेऊन, ते व हरी महादेव भानू फडणीस असे निघून पुरंदरास आले. त्यासमयीं किल्ल्यावरतीं सचिवां-कडून कारभारी बापूजीपंत होते. त्या बापूजीपंताचा व भानू यांचा स्नेह पूर्वींचा, म्हणजे ज्या समयीं भानू सचिवांजवळ चाकर होते त्या वेळचा होता. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांणीं किल्ल्याखालीं येतांच किल्ला खालीं करून द्यावा सबब हरी महादेव भानू यांस किल्ल्यावरतीं पाठविलें. ते किल्ल्या-वरतीं जातांच बापूजीपंत यांस घेऊन, किल्ल्याखालीं येऊन बाळाजी विश्व-नाथ पेशवे यांची व बापूजीपंतांची भेट केली. त्या वेळेस बापूजीपंत यांजपासून आण शपथक्रिया घेऊन मागती किल्ल्याचें काम त्यांजकडेसच सांगितलें.

असा पुरंदर किल्ल्याचा बंदोबस्त करून पेशवे तेथून कूच करून लोह-गडास आले. मौजे *ओलवण येथें मुक्काम केला आणि किल्ल्यावरतीं कान्होजी आंगरे होते त्यांजकडे मध्यस्तीकरितां शाहाणे मनुष्य पाठविले. त्यां-जवळ मजकूर सांगितला कीं, " तुमचा आमचा स्नेह पूर्वीपासून; जंजिऱ्यास

---

१४. सुरुसन आरबांअश्शर इत्यादी सन ११११ = शके १६३५ = इसवी सन १७१३ – छ. ९ जिल्काद रोजीं, मार्गशीर्ष शु॥ १०।११ सोमवारीं सूर्यास्तानंतर वस्त्रें झालीं. ग्रांट डफचे ग्रंथांत ' पेशवे ' ही पदवी लोहगड किल्ला हस्तगत करून व आंग्र्यास आपल्याकडे वळवून कुलाब्यास धाडल्यानंतर दिली असें आहे. ह्याच वर्षी ब्रन्स्विक घराण्याचा मूळपुरुष पहिला जॉर्ज, महाराणी विक्टोरिया यांचा पूर्वज, हा इंग्लंडचें राज्यपद पावता झाला. १५. ग्रांट डफ म्हणतो रामाजीपंत यास दिली. १६. हा किल्ला नारो शंकर सचिव यांची आई येसूबाई इणें आपण होऊन दिला. कारण, हिंगणगांवचा दमाजी थोरात यानें सचिवास कैदेंत घातलें होतें. तेथून त्याची सुटका बाळाजीनें मोठ्या युक्तीनें करून त्याचा प्राण वांचविला होता. ग्रांट डफ.

* ज्यास हल्लीं ' वलवण ' म्हणतात तें. हें लोणावळ्यानजीक आहे.

बहिरराव दौळवी यांणीं दास्तान[17] मांडिलें तेव्हां त्यांजवळ तुम्ही होतां व आम्ही श्रीवर्धनास देशमुखीचा कारभार करीत होतों. तेथील तुमचा आमचा स्नेह. हल्लीं शाहू महाराज यांणीं पेशवाई आम्हांस सांगितली व लोहगड किल्ला आम्हांस दिला, या साठीं लोहगड आमचे हवालीं करावा." असें कान्होजी आंगरे यांणीं ऐकून, संतोष पावून लागलेच बाळाजी विश्वनाथ यांचे भेटीस मौजे ओलवणास आले. येथें येऊन, उभयतांच्या भेटी होऊन बोलणीं चालणीं दोघांचीं झालीं. त्यांत उभयतांची आण शपथ परस्परें झाली कीं, उभयतांनीं एकमेकांचा भाऊपणा चालवावा. ह्याप्रमाणें होतांच लागलाच किल्ला पेशवे यांचे हवालीं करून आंगरे कुलाब्यास गेले. बाळाजी विश्वनाथ पेशवे किल्ल्यावर जाऊन किल्ल्याचा बंदोबस्त करून, किल्ल्याची सबनिशी[18] रामाजी महादेव भानू यांजकडे सांगितली व नाणे मावळची मुजमूं[19] हरी महादेव भानू यांस सांगितली. असें होऊन बाळाजी विश्वनाथ पेशवे चिंचवडास आले. तेथून रामाजी महादेव भानू लोहगडास गेले. त्या दिवसापासून हरी महादेव भानू व बाळाजी महादेव भानू हे बाळाजी विश्वनाथ यांजबरोबर होते. तेथून बाळाजी विश्वनाथ पेशवे निघून जेजुरीस आले. तेथें मुक्काम होता. त्या मुक्कामास हरी महादेव भानू फडणीस चार पांच महिने फडणिशीचें काम करून होते ते मृत्यू पावले. त्यांचा काल झाल्यानंतर बाळाजी महादेव भानू हे स्वारी-बरोबर होते, त्यांसच फडणिशीचीं वस्त्रें बाळाजी विश्वनाथ पेशवे यांणीं दिलीं.

पुढें बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा व सय्यद यांचा तह[20] होऊन उभयतां दिल्लीस स्वारीस गेले. त्यांबरोबर बाळाजी महादेव भानू फडणिशीचें काम

---

१७. शृंगारपूरचे [ ? ] दास्तान म्ह० धान्याची कोठी किंवा धान्यादि सामग्रीचा सांठा करणें. बाळाजीनें व त्याच्या भावानें जंजिऱ्याचे शिद्दीचे विरुद्ध आंग्र्याशीं कांहीं खटपट चालविली होती, असें ग्रांट डफच्या ग्रंथांत लिहिलें आहे, त्यास अनुलक्षून हें बाळाजीचें बोलणें असावें. १८. 'सबनीस' हा दरकदारांचा मुख्य कारकून. शिबंदी व दुसरे सरकारी नोकरांस पगार वांटणें हें यांचें काम. यासच कोणी दफ्तरदार म्हणत. सबनीस = सेनालेखक. राज्यव्यवहार कोश. १९. 'मुजुमदार' यांजकडे वसुलाच्या हिशेबाचें काम. खर्च होणें तो सर्व यांच्या मंजुरीनें. हल्लींचे अकौंटंट जनरल किंवा इंग्लंडांतील फिन्यान्स मिनिस्टर यांचें काम व मुजूमदाराचें काम हीं पुष्कळ अंशीं जुळतात. २०. हा तह ई० सन १७१७ सालीं सय्यद व मराठे यांजमध्यें झाला. पातशाहाची मंजुरी १७२० मध्यें मिळाली ( पुढें टीप २४ पाहा. ) हा सय्यद दक्षिणेचा सुभेदार होता. याचा भाऊ सय्यद अबदुल्ला हा दिल्लीस राज्यकारभार करी. हे दोघे भाऊ मोठे

करून होतेच. नंतर फौजेंत बाळाजी महादेव भानू व शंकाजी[२१] भोंसले असे मुख्यत्वें ठेवून पेशवे व सय्यद असे उभयतां शहरांत पातशाहाचे भेटीस गेले. पाठीमागें पादशाही फौज शहरांतून निघाली. बाहेर येऊन त्या फौजेनें पेशवे यांचे फौजेवर मोठी गर्दी करून फौजेमध्यें मारहाण केली. त्या गर्दींत बाळाजी महादेव भानू व शंकाजी भोंसले, असे लढाईंत सरकार कामास[२२] आले. इतक्यांत पातशाहाच्या भेटी होऊन बाळाजी विश्वनाथ पेशवे आपले फौजेंत शहराबाहेर आले. पाहतात तों बाळाजी[२३] महादेव फडणीस व शंकाजी भोंसले पडले. हें पाहून पेशवे यांणीं आपले फौजेचा मुक्काम दिल्लीपासून चार कोसांवर केला. सय्यद बरोबर होता, त्यास दक्षिणेचा सुभा * सांगितला. उपरांत पातशहाचें बोलणें होऊन तह[२४]

---

पराक्रमी होते. त्यांनीं जहांदरशाहाचा पराभव करून त्याचा वध केला. आणि बहादरशाहाचा नातू फरुकशीर यास गादीवर बसविलें. (१७१३) पुढें फरुकशीर पातशाहास त्याची ताबेदारी न आवडून त्यांचा नाश करण्याचें त्याणें मनांत आणिलें. सय्यद हुसेन यांस दक्षिणेंत पाठविलें व त्याचा नाश करण्यासाठीं निरनिराळ्या युक्ती योजिल्या. त्याच काळीं मराठ्यांनींही त्याजवर चोहींकडून हल्ले सुरू केले. याप्रमाणें दुहेरी पेंचांत सांपडल्यामुळें हुसेन याणें शाहूशीं तह केला व मराठ्यांच्या मदतीनें पादशाहाची खोड मोडून आपला अधिकार पूर्वीप्रमाणें चालवावा म्हणून तो दिल्लीस गेला. मराठ्यांची फौज १०-१२ हजार होती. २१. 'संताजी' भोंसले व १५०० लोक दिल्लीचे रस्त्यांत तेथील लोकांनीं ठार केले. हा भोंसला परसोजीचा दासीपुत्र. ग्रांट डफ. २२. कामास आले = लढाईंत पडले. २३. चौथ व सरदेशमुखी ह्या हक्कांच्या सनदा दिल्या त्या दिल्लीच दरबारी लोकांस न आवडून त्यांनीं असा बेत केला कीं, पेशवे सनदा घेऊन दरबारांतुन निघाले म्हणजे रस्त्यानें त्यांस गांठून, गर्दी करून त्या हिसकावून घ्याव्या. हा बेत बाळाजीस समजला. तेव्हां त्यांणीं बाळाजी महादेव यांस विचारिलें, याची मसलत कशी? भानूंनीं उत्तर दिलें, "ठीक आहे मी तुमचे पालखींत बसून जातों. तुम्हीं सनदा खाकेस मारून दुसऱ्या वाटेनें गोटास जावें." याप्रमाणें पेशव्यांच्या थाटानें जात असतां वरील हल्ला झाला. या वेळीं भानू किती उपयोगीं पडले बरें? * हा हुसेन सय्यद पुन्हां दक्षिणेंत येत असतां त्यास मारेकऱ्यांनीं ठार केलें; व अबदुल्ला शाहपूरचे लढाईंत पडला. (ई. सन १७२०.) ह्या दोन्ही गोष्टींस पातशाहा अनुकूल होता. सय्यदांचे मुख्य शत्रू निजामउलमुल्क व असफखान (अयोध्येचा सुभेदार) हे होते. २४. पूर्वी सय्यद हुसेन यानें केलेल्या तहास बादशाहाची मंजुरी मिळाली. ह्या तहानें दक्षिणचे सहा सुभ्यांची चौथ व सरदेशमुखी आणि स्वराज्य अशीं शाहूस प्राप्त झालीं. चौथ म्हणजे एकंदर जमाबंदीचा चतुर्थांश. सरदेशमुखी म्हणजे सर्व उत्पन्नाचा दशांश, (किंवा शेंकडा १० प्र०).

झाला. त्यांत सरदेशमुखी, बाबती व मोकाशे शाहू महाराज यांस † दिले.

याप्रमाणें पातशहाशीं तह होऊन सय्यदसुद्धां बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीहून निघाले. शहर औरंगाबाद येथें आले. तेथपावेतों फडणिशीचें काम बाळाजी महादेव फडणीस यांच्याबरोबर नारो बावाजी[२५] परचुरे दप्तरदार होते, त्यांणीं चालविलें. पेशवे औरंगाबादेस आल्यानंतर रामाजी महादेव भानू लोहगडास सबनिशीचें काम करीत होते, त्यांस बलावूं पाठविलें. ते समयीं रामाजी महादेव भानू यांणीं भिकाजी नारायण भानू मौजे पोस [च?]री कोंकणांत आहे त्यांस बोलावून आणून सबनिशीवर लोहगडास ठेविलें व फडणिशीचें काम करावयास आपले मायेचा फडावर कोणी तरी पाहिजे, म्हणून अंताजी नारायण[२६] भानू नाणेमावळचे मुजमूवर होते, त्यांस बोलावून आणून त्या कामावर हरी महादेव भानू यांचे कन्येचे पुत्र[२७] कृष्णाजी महादेव बोंपये यांस मुजमू दिली. नंतर रामाजी महादेव भानू, अंताजी नारायण भानू यांस समागमें घेऊन लोहगडाहून निघून औरंगाबादेस आले. तेथें आल्यानंतर बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची भेट झाली. ते समयीं पेशवे यांणीं भानूंस आज्ञा केली जे, "तुम्हीं आपले फडणिशीचें कामकाज करावें." ते समयीं रामाजी महादेव भानू यांणीं विनंती केली कीं, 'मी कानानें बहिरा असें, ऐकूं येत नाहीं. तेव्हां * फडावरील काम मला कसें आटपेल?" हें ऐकून बाळाजी विश्वनाथ पेशवे यांणीं आज्ञा केली कीं, "तुम्हीं दप्तर आटोपावें. तुमचे मायेचा कोणी असेल त्यास फडाचें काम सांगावें; त्याची असामी

सहा सुभे म्ह० औरंगाबाद, वऱ्हाड, बेदर, विजापूर, हैद्राबाद आणि खानदेश. यांशिवाय तंजोर, त्रिचनापल्ली, म्हैसूर हीं संस्थानेंही ह्या तहानें चौथ व सरदेशमुखी-खालीं आलीं. फक्त सहा सुभ्यांचें उत्पन्न या वेळीं १८,०५,१७,२९४ रुपये होतें. स्वराज्य म्ह० खुद्द शिवाजी महाराजांचे अधिकाराखालीं आलेले प्रांत– पुणें, सुपें, इंदापूर, वाई, मावळें, सातारा, कऱ्हाड, खटाव, माण, फलटण, मलकापूर, तारळें, पन्हाळा, अजरें, जुन्नर, कोल्हापूर आणि कोंकण व तुंगभद्रेच्या उत्तरेचे कांहीं परगणे. ह्या हक्कांबद्दल शाहूनें १५,००० स्वार तयार ठेवून देशाची स्वस्थता राखण्याच्या कामांत मोंगल सुभेदार यांस मदत देत जावी असें ठरलें. † शाहूचें कुटुंब व त्याची आई येसूबाई यांसही बाळाजीनें दिल्लीहून परत आणिलें. २५. बखर मोडी असल्यामुळें "बोवाजी" किंवा "बचोजी" असेंही वाचतां येईल. २६. हा भानू कोण तें समजत नाहीं तरी रामाजीपंताचाच कोणी निकटसंबंधी असावा असें दिसतें. २७. हरी महादेव यांस पुत्र नव्हता असें दिसतें. २८. पुढें टीप २९. पाहा. * फड = कचेरीची, कारभाराची जागा, देवघेवीची कचेरी, सेक्रेटरिअट.

वेगळी करून देऊं." त्याजवरून अंताजी नारायण भानू यांस पेशवे यांसि भेटविलें. तेव्हां त्यांची असामी वेगळी करार करून दिली. नंतर रामाजी महादेव भानू फडणिशीचें काम करूं लागले. उपरांत बाळाजी विश्वनाथ पेशवे औरंगाबादेहून देशीं आले. रामाजी महादेव भानू यांणीं फडणिशीचा कारभार पांच वर्षे केला. नंतर त्यांचा काळ झाला. ते समयीं बाबूराव राम व जनार्दन बल्लाळ भानू हे पांच सात वर्षांचे होते, ते मोठे होत तोंपर्यंत अंताजी नारायण भानू यांणीं फडणिशीचें काम चालविलें. पुढें बाबूराव राम व जनार्दन बल्लाळ मोठे झाल्यावर फडणिशी करूं लागले.[२९]

असा पेशवाईचा कारभार बाळाजी विश्वनाथ करीत असतां दोन § वेळां हिंदुस्थान पावेतों मोहीम करून आले. महाराजांची आज्ञा घेऊन सासवड मुक्कामीं राहूं लागले. तेव्हां पुरंदरे पेशवे यांजपाशीं चाकरीस राहिले. अंबाजी-[३०]पंत हे शहाणे पाहून त्यांस आपल्या दिवाणगिरीचीं वस्त्रें बाळाजी विश्वनाथ यांणीं दिलीं. मल्हारजी होळकर हे सातारे मुक्कामीं बांडे[३१] म्हणून सरदार होते त्यांचे पतकांत चाकरीस होते, त्यांस बाळाजी विश्वनाथ यांणीं आपले जवळ चाकरीस ठेविलें. तसेच आपले शिंदेही[३२] केले. अशी फौज जमवून

---

२९. भानूंची वंशावळ.

महादाजीपंत.

- हरिपंत
  - कन्या–महादाजीपंत बापये
    - कृष्णाजीपंत.
- रामाजीपंत
  - बाबूराव
    - मोरोबादादा.
- बाळाजीपंत
  - जनार्दनपंत.
    - बाळाजीपंत. ( नाना फडणवीस. )
      - महादाजीपंत ( दत्तक )

( त्यांत वडील कोण | हें समजत नाहीं. )

§ केव्हां ? ३०. अंबाजीपंत व बाळाजी विश्वनाथ हे उभयतां पूर्वी धनाजी जाधव यांचे कारकून होते. बाळाजीचा उदयकाळ आल्यावरही अंबाजीपंत त्यास आपली मसलत सदोदित देत असे. पेशवाई मिळाल्यावर बाळाजीनें अंबाजीपंतास आपला दिवाण केलें. हेच पुरंदरे यांचे मूळ पुरुष. ३१. कंटाजी कदम बांडे. मल्हारराव नीरा नदीचे कांठीं 'होळ' गांव आहे तेथील चौगुल्याचा मुलगा. सुमारें १०० स्वारांचें एक पतक किंवा पथक. ३२. राणोजी शिंदे हे बाळाजीच्या पागेंत बारगीर होते. हे कण्हेरखेडचे पाटील.

सासवड मुक्कामीं राहूं लागले. त्यांणीं आठ वर्षेपर्यंत पेशवाईचा कारभार केला. पुढें सासवड मुक्कामीं पेशवे यांचे शरिरास व्यथा होऊन तेथेंच मृत्यू पावले.

---

**२२.** ता. ४ एप्रिल १७२०. चैत्र शु॥७ सोमवारीं मृत्यू झाला. दिल्लीस जाऊन आल्याच्या व वसुलाची वांटणीची व उगवणीची पद्धती घालून देण्याच्या श्रमांनीं त्यांची प्रकृती जी एकदां बिघडली ती पुनः सांवरली नाहीं. इसवी सन १७२० सालच्या तहानें जे हक्क त्यांनीं मराठ्यांस मिळवून दिले त्यांच्या उत्पन्नांची उगवणी व वांटणी करण्याची विलक्षण पद्धती सुरू केली, ती देणें इष्ट वाटल्यावरून येथें संक्षेपतः लिहितों:– (१) सरदेशमुखीचें उत्पन्न—हें राजाचें वतन. ह्यावर गादीचे मालकाशिवाय दुसऱ्या कोणाचा हक्क नाहीं. ( २ ) बाकी सर्व हक्क मिळून जें उत्पन्न तें स्वराज्य. ( अ ) यांतील शेंकडा २५ प्रमाणें विभाग गादीच्या मालकाचा. याचें नांव ‘ राजबाबती. ’ (आ) बाकी शेंकडा ७५ उरले, तो ‘ मोकासा.’ यापैकीं साहोत्रा ( सर्व स्वराज्यापैकीं शेंकडा ६ प्रमाणें ) विभाग पंतसचिव यांचा. ( इ ) बाकी शेंकडा ६९ राहिले, तो ‘ऐन ’ मोकासा. या पैकीं ‘नाडगौडा’ ( स्वराज्यावर शेंकडा ३ प्र० ) विभाग तो राजानें इच्छेनुरूप पाहिजे त्यास द्यावा. ( ई ) शेंकडा ६६उरले. ते निरनिराळे सरदार लोकांस जहागीर देण्यांत जावे.(३) ‘ राजबाबती ’ वसूल करण्याचें काम पेशवे, प्रतिनिधी व सचिव यांजकडे. ‘मोकासा ’ सचिव यांणीं आपला वसूल करून घ्यावा. लांबलांबच्या प्रांतीं हा वसूल करण्याकरितां राजानें कामगार नेमावे. ‘नाडगौडा’ ज्याला दिला असेल त्यानें वसूल करावा. ‘जहागीर’ ज्याची त्यानें वसूल करावी. ( ४ ) सरदार लोकांस एकमेकांच्या मुलखांत त्या त्या मुलखाच्या उत्पन्नाच्या विभागावर किंवा तेथील गांवच्या उत्पन्नावर कांहीं हक्क मिळावे. अशी उत्पन्न विभागण्याची व वसूल करण्याची पद्धती घातल्यामुळें मराठे सरदारांत एकाचा फायदा तो दुसऱ्याचा, असें झालें. आणि म्हणून त्यांच्यांतच अलीकडे जी फाटाफूट होऊन बंडाळी चालली होती ती बहुतेक बंद होऊन त्यांचे हे हक्क जिकडे तिकडे वाढविण्यास त्यांस फावलें. मराठे शाहीच्या पारंब्या जिकडे तिकडे पुढें लौकरच फुटूं लागल्या, त्याचें मुख्य कारण ही वरील पद्धतीच होय.

# बाजीराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब.

## ई० स० १७२०–१७४०.

[ बाळाजीपंत मृत्यू पावल्या * ] नंतर बाजीराव बल्लाळ यांणीं झाडून सरंजामसुद्धां, अंबाजीपंत पुरंदरे समागमें घेऊन, शिंदे होळकर सहित सातान्यास येऊन महाराज यांची भेट घेतली. त्या वेळेस शाहू महाराज यांणीं सर्व मजकूर बाजीराव यांस विचारला. नंतर अंबाजीपंत यांणीं शाहू राजे यांस विनंती केली कीं, " आतां पेशवाई-पदाचीं वस्त्रें बाजीराव यांस देण्याची आज्ञा व्हावी. " तें ऐकून महाराज " बरें " म्हणाले. त्यास दोन चार दिवस गेल्यानंतर श्रीमंत शाहू महाराज यांणीं दरबार करून सकल अष्टप्रधान जमा करून अवघ्यांस सांगितलें कीं, " आतां पेशवाईचीं वस्त्रें बाजीराव यांस द्यावयाचीं. " हा मजकूर सर्वांस सांगितला. त्या वेळेस श्रीपतराव प्रतिनिधी यांणीं महाराजांस उत्तर केलें कीं, " आजच वस्त्रें देण्याची घाई कोणती आहे ? पुढें वस्त्रें देतां येतील. " तितक्यावरच ती गोष्ट तेव्हां राहिली. प्रतिनिधीसुद्धां अष्टप्रधान यांचे मनांत कीं, " हें पद कोंकणस्थांत द्यावयाचें नाहीं. " परंतु स्पष्ट कोणी बोललें नाहीं. त्या दिवसापासून तो मजकूर तसाच राहिला. बाजीराव बल्लाळ यांचा मुक्काम तेथेंच झाला. तेव्हां बाजीराव यांणीं नित्य असा पाठ चालविला कीं, नित्य महाराजांचे भेटीस जावें व विनंती करीत असावें; असा क्रम चालत असतां कोणे एके दिवशीं शाहू महाराज यांणीं बाजीरावांस उत्तर केलें कीं, " तुम्हांस वस्त्रें द्यावयाचीं हा मजकूर माझे मनांत आहे, परंतु श्रीपतराव प्रतिनिधी वगैरे अष्टप्रधान यांचे मनांत मतलब असा आहे कीं, हें पद कोंकणस्थांत द्यावयाचें नाहीं. "

---

* चौकटीच्या कौंसांतील शब्द मजकुराच्या जुळणीसाठीं आम्हीं पदरचे घातले आहेत.

१. प्रतिनिधीसुद्धां ९ प्रधान होते. या वेळीं हे ९ प्रधान होते तेः— १ पेशवे–जागा खालीं. २. अमात्य–अंबाराव बापूराव हनवंते. ३ सचिव–नारो शंकर. ४ मंत्री–नारोराम शेणवी. ५ सेनापति–जागा खालीं. ( खंडेराव दाभाडे यापूर्वी मृत्यू पावले होते. पुढें त्यांचे पुत्र त्रिंबकराव दाभाडे सेनापती केले. ) ६ सुमंत–आनंदराव. ७ न्यायाधीश–होनाजी अनंत. ८ पंडितराव–मुद्गल भट्ट उपाध्ये. ९ प्रतिनिधी–श्रीपतराव.

नंतर दोन चार महिने तसेच लोटले. शेव... ..हू महाराज यांणीं दुसरे वेळेस बाजीराव यांस असें उत्तर केलें कीं, आमचा निश्चय हाच कीं, तुमची पेशवाई काढून दुसऱ्यास द्यावयाची नाहीं; परंतु श्रीपतराव यांची भीड वस्त्रें न देण्याची पडून आहे." ह्या गोष्टीसही दिवस मास पक्ष लोटले.

इकडे औरंगाबादेस दिल्लीचे पातशाहाकडील दक्षिणेंत निजामन्मुलुख[3] हे दक्षिणचे साडेसहा सुभ्यांचा कारभार करीत होते. कारभार करीत असतां निजामन्मुलुख यांजकडून दहापांच वर्षे[4] दक्षिणेचे मुलुखाची रसद[5] दिल्लीस पोहोंचली नाहीं व हिशोबही नाहीं. यावरून पातशहाची निजामन्मुलुख यांजवर इतराजी होऊन सुभा तगीर[6] करावा, या मसलतीनें दिल्लीहून पादशहाची फौज निजामन्मुलुख यांजवर रवाना झाली तो मजकूर दिल्लीस वकील निजामन्मुलुख यांजकडील होते त्यांणीं सारा * नक्ते नबाब निजामन्मुलुख यांस लिहून कळविला. दिल्लीहून फौज रवाना झाली तिच्या सरदारांस हुकूम पादशाही झाला कीं, निजामन्मुलुख यांस कैद करून आणावें. हा सारा मजकूर नबाबास समजल्यावर नबाब घाबरले आणि मोठ्या विचारांत पडले. त्या-

---

२. बाजीराव व श्रीपतराव यांचें वैर नव्हतें याचें कारण हा जातीमत्सर होय. बाळाजी विश्वनाथ मरण पावल्यावर बरेच महिने बाजीरावांस पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला नाहीं. याचें कारण ग्रांट डफ यांचे ध्यानांत आलें नाहीं. आम्हांस वाटतें कीं, प्रतिनिधी वगैरे देशस्थ प्रधानांचा आग्रह हें पद बाजीरावास न देण्याचा असल्यामुळें शाहूस एकदम त्या सर्वांची भीड तुटेना, म्हणून तें काम टाळाटाळीवर त्याणें लोटिलें. बखरीचा आशय असाच आहे. पण अलीकडील शोधावरून १५ दिवसांनीं बाजीरावास पेशवाई मिळाली असें होत आहे. चैत्र व।। ७ सोमवार ता. १८ एप्रिल १७२०.

३. 'निजाम उल्मुल्क' यांची नेमणूक दक्षिणेच्या सुभ्यावर प्रथम १७१३ मध्यें झाली. नंतर १७१६ च्या सुमारास त्या सुभ्यावर सय्यद हुसेन हा आला, तो तेथें १७२० पर्यंत होता. हा सय्यद दिल्लीस असतां (१७२०) निजाम हा माळव्यांतून दक्षिणेंत येऊन सय्यदाच्या पक्षाचे लोकांचा बऱ्हाणपूर व बाळापूर येथें मोड करून आपणच दक्षिणेचा सुभेदार बनला (पुढें ७ व ८ टीप पहा.) ४. प्रथम १७१३ त नेमणूक झाल्यापासून (?) ५. कमावीसदारानें सरकारांत भरावयाची रक्कम ती 'रसद'. ६. तगीर करावा = दूर करावा. सुभ्यावरून त्यास काढावें. ७. निजामावर हुसेन सय्यद स्वतः बादशाहास घेऊन येत होता. पण निजामाच्या जातभाईनीं सय्यद याची खोड मोडून नायनाट करण्याचा गुप्त बेत करून हुसेनास मारेकरी घालून मारिलें व अबदुल्ला याचा शाहपूरच्या लढाईंत पराभव केला. अशा प्रकारें बादशाहा सय्यदांच्या कैदेंतून मुक्त होतांच परमानंदित होऊन त्याणें निजामास दक्षिणच्या सुभ्यावर कायम करून खेरीज आपल्या वजिरीचीं वस्त्रेंही दिलीं. * बडे, मोठे, मुख्य.

समयीं नबाब यांस असा विचार चला कीं, मराठे यांची फौज आपल्या कुमकेस बलावावी. असें मनांत आणून साताऱ्यास श्रीमंत शाहू महाराज यांजकडे, " आम्हांवर पातशहाचा रोष होऊन फौज रवाना झाली आहे यासाठीं तुमची फौज पंचवीस हजार आम्हांस मदत पाठवावी." म्हणून वकिलां बरोबर सांगून वकलि साताऱ्यास रवाना केले. ते वकील साताऱ्यास येऊन महाराज यांची भेट घेऊन सारा मजकूर त्यांणीं महाराजांस विदित केला. तो मजकूर शाहू महाराज यांणीं ऐकून घेऊन वकिलास उत्तर सांगितलें कीं, " तुम्ही मुक्काम करावा. फौजेची तजवीज करून देऊं. " तेव्हां वकील तेथें राहिला.

पुढें शाहू महाराज यांणीं चित्तांत विचार केला कीं, आतां मोंगलांचे मदतीस कोण पाठवावा ? मोंगलांकडील वकिलांची निकड फौजेविषयीं महाराजांस होऊं लागली. त्यामुळें शाहू महाराज झाडून अष्टप्रधान व सरदार बलावून आणून दरबार करून बसले. तेव्हां " मोंगलांकडील वकील आले आहेत, फौज मागतात," हा मजकूर सर्वांस सांगितला, आणि विचारलें, " पुढें याची तजवीज कशी ? व याची मसलत कोणती करावी ? हें सांगावें " तो मजकूर ऐकून घेऊन श्रीपतराव प्रतिनिधी यांणीं उत्तर केलें कीं, " पंचवीस हजार फौज आपल्यापाशीं आहे कोठें ? या मंडळींतही जाण्याची हिंमत कोणाची दिसत नाहीं." असें बोलणें राजे यांणीं ऐकून महाराज म्हणतात, " तुम्ही कोणी जात नाहीं तर राज्याचा आब जातो. पुढें आपलें राज्य राहाणें कठीण. " हें उत्तर ऐकून सारे मंडळीनें प्रति-उत्तर महाराजांस विनंती करून सांगितलें कीं, " पंचवीस हजार फौज आपलेपाशीं कोणाजवळ आहे ? " असें साऱ्यांचें बोलणें ऐकून शाहू महाराज यांणी चोपदारास सांगितलें कीं, " बाजीराव यांजकडील अंबाजीपंत पुरंदरे कारभारी आहेत, त्यांस बलावून आणावें." त्यासमयीं चोपदार जाऊन अंबाजीपंतास राजे यांजकडे घेऊन आले. अंबाजीपंत आल्यावर राजांस मुजरा करून हात जोडून उभे राहिले.

---

८. हें केव्हां घडलें तें समजत नाहीं. **ग्रांड डफ** या तहाविषयीं कांहींच लिहीत नाहीं, तरी शाहूशीं मैत्री ठेवण्याविषयीं निजाम झटत होता व यासमयीं प्रतिनिधीशीं स्नेह वाढवून त्याणें त्यास आपलासा केलें होतें, असें म्हणतो. ही हाकिकत सय्यदाच्या तहास अनुलक्षून लिहिली असावी. पण तो तह तर बाळाजी विश्वनाथ असतां झाला होता.

त्यावेळेस शाहू महाराज यांणीं अंबाजीपंत यास मजकूर सांगितला कीं, "मोंगलांकडील वकील आला आहे तो आमची फौज पंचवीस हजार कुमकेस मागतो; तेव्हां तुमच्यामध्यें मोंगलास कुमक जाण्याची हिंमत आहे किंवा नाहीं हें मला सांगावें." हें ऐकून घेऊन अंबाजीपंत यांणीं राजे यांस विनंती केली कीं, "महाराज! आपण असें विचारितां हेंच अपूर्व आहे! आम्ही सरकारचे चाकर, जिकडे सरकारचा हुकूम होईल तिकडे जाणें भाग आहे. तेव्हां एवढीं वस्त्रें[९] आमचे अंगावर पडलीं म्हणजे आम्हांस कोणे गोष्टीचा तोटा नाहीं.[१०]" असा मजकूर अंबाजीपंतांचा ऐकून राजे यांणीं आज्ञा केली कीं, "बाजीराव यांस घेऊन येणें, आतांच वस्त्रें देतों." असें ऐकतांच अंबाजीपंत माघारे येऊन बाजीराव यांस घेऊन राजांकडे आले. महाराजांची भेट झाली. त्यासमयीं अंबाजीपंतांस जसा मजकूर विचारला होता त्याप्रमाणेंच बाजीरावांस विचारला. त्यावेळेस बाजीराव यांणीं उत्तर केलें कीं, "मोंगल म्हणजे काय! आज्ञा झाली असतां मोठ्या काळाच्या तोंडांत देखील जाऊन सरकारचे पुण्यप्रतापेंकरून त्याचा बंदोबस्त करून येऊं. तेथें मोंगलांची कथा § काय!" असें ऐकतांच शाहू राजे यांणीं लागलीच पेशवाई-पदाचीं वस्त्रें बाजीराव यांस देऊन *शिक्के कटार हवालीं केली. शके १६४२ शार्वरी नाम संवत्सरे. त्या दिवशीं मोठा आनंद झाला.[११]

९. वस्त्रें पेशवाई पदाचीं. १०. येथें व पुढेंही अनेक प्रसंगीं अंबाजीपंताची तत्परता व समयसूचकता दिसून येते. § हें आवेशाचें भाषण मोंगल राज्यरूपवृक्षाच्या मुळावरच कुऱ्हाडीचा घाव घालणाऱ्या या विक्रमशाली पेशव्यास किती शोभतें हें सहज लक्ष्यांत येईल. मोंगल = पातशाही फौज. * बाळाजी विश्वनाथ यांचे मागें बाजीरावाची नेमणूक होईपर्यंत बाळाजीच्या शिक्क्यामोर्तबानेंच अंबाजीपंत हे पेशव्याच्या दप्तरचें काम चालवीत होते. पेशवाई ता० १८ एप्रिल १७२० रोजीं मिळाली. बाळाजी विश्वनाथ याचा शिक्का "श्री शाहू नरपती हर्षनिधान, बाळाजी विश्वनाथ (मुख्य ?) प्रधान" असा होता, व पुढें बाजीराव याचा, "श्री शाहू नरपती हर्षनिधान बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान" असा झाला. ११. ग्रांट डफ यानें दिलेली हकीकत ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ती अशीः— (मागें टीप ३, ७, ८ पाहा.) (१) सय्यदांचे मरणानंतर निजामावर बादशाहा खूष होऊन त्यास त्यांणीं दिल्लीस बलाविलें. परंतु १७२२ पर्यंत त्यास तिकडे जातां आलें नाहीं. (२) गेल्यावर १७२४ पर्यंत तो तिकडेच होता. (३) बाजीरावास १७२० चे एप्रिल महिन्यांत पेशवाईचीं वस्त्रें प्राप्त झालीं व त्याणें १७२४ पर्यंत नर्मदेपर्यंत ३ स्वाऱ्या केल्या. परंतु जरी त्यानें आपले कांहीं सरदार माळव्यांत पाठविले तरी या काळीं तो स्वतः नर्मदा उतरून पलीकडे गेलासें दिसत नाहीं.

नंतर राजे यांणीं बाजीराव यांस विचारलें कीं, " मोंगलांकडील वकील आला आहे त्यास काय उत्तर सांगावें ? " तेव्हां बाजीराव यांणीं उत्तर केलें, " वकील आला आहे त्यास मोंगलाकडे रुखसत[१२] करावें आणि आमची फौज तुम्हांकडे रवाना झाली असें सांगून त्यास पाठवावें." असें ऐकून शाहू महाराज यांणीं मोंगलाकडील वकिलास बलावून आणून त्यास सांगितलें कीं, " आमची फौज तुम्हांकडे रवाना झाली. तुम्हीं जाऊन हा मजकूर नबाबास सांगावा. " असें सांगून लागलींच वस्त्रें वकिलास देऊन माघारां मोंगल यांजकडे त्याची रवानगी केली.

नंतर बाजीराव पेशवे यांणीं सातारे मुक्कामीं लाख दोन लाख रुपये कर्ज[१३] घेऊन फौजेची तयारी करून स्वारीस जाण्याची आज्ञा राजे यांची घेतली. त्या समयीं आपले कनिष्ट बंधू चिमणाजी[१४] बल्लाळ यांस राजांस भेटवून महाराजांपाशीं ठेविलें, आणि आपण सारी फौज घेऊन स्वारीस निघाले ते दोहों तिहीं दिवसांत पुण्यास येऊन दाखल झाले. तेथें मुक्काम करून आणखी फौजेची तयारी करून तेथून कूच करून निघून गेले. साताऱ्यामुक्कामाहून वकील रवना झाले होते ते औरंगाबादेस पोहोंचून नबाब निजामन्मुलख यांस

---

( ४ ) खुद्द बाजीरावाची व निजामाची भेट १७२८ सालीं एक झाली व दुसरी १७३२ च्या सुमारास झाली. या वेळीं आपल्यावरील संकट टाळण्याकरितां निजामानें बाजीरावास हिंदुस्तानांत पातशाही मुलखांत स्वाऱ्या करण्यास अनुमोदन दिलें. ( ५ ) नंतर २ वर्षे बाजीराव आपला अंमल माळव्यांत बसवीत होता. (१७३२–३४) व पुढें १७३६ सालीं दिल्लीपर्यंत जाऊन त्या राजधानीपुढें त्यानें आपला तळ दिला व भोंवतालच्या मुलखांतून खंडणी घेतली. ( ६ ) त्यावर पुनः निजामास बादशाहानें दिल्लीस बलाविलें, व मराठ्यांस शिक्षा करण्यास सांगितलें. १७३८ सालीं निजामाची भोपाळ येथें बाजीरावानें फारच गाळण उडविली. शेवटीं निजामानें माळवा, नर्मदा व चंबळा या नद्यांमधील प्रदेश, व रोख ५० लक्ष रुपये बाजीरावास देऊं करून आपली सुटका केली. ( ७ ) ह्याच्या पूर्वींच राजा जयसिंग व खान दौरान यांचा बाजीरावास ह्या प्रांताची चौथ व सरदेशमुखी देण्याचा इरादा होता. ह्यांशीं व बखरींतील गोष्टींशीं पुष्कळ मेळ आहे. तरी बखरींत पुढल्या गोष्टी मागें व मागच्या पुढें असें झालें आहे, असें ग्रांट डफ य च्या ग्रंथावरून लक्षांत येईल. १२. पाठवणी करावी, निरोप द्यावा. १३. स्वाऱ्यांच्या खर्चामुळें बाजीरावास प्रथमपासून शेवटपर्यंत कर्ज फार होतें, व त्याचें प्रायश्चित्त त्याचा पुत्र जो बाळाजी यास बरेंच भोगावें लागलें. बारामतीकर नाईक हे त्याचे मुख्य सावकार. १४. चिमणाजीला नायब पेशवा केलें होतें.

भेटून झाला मजकूर तो सारा विदित केला. बाजीराव पेशवे पुण्याहून कूच करून निघाले ते कूचदरकूच गंगा[५१] उतरून औरंगाबादेच्या अलीकडे खराडी तुर्काबाद* आहे तेथें आले व श्रीमंत यांचा मुक्काम झाला.

ती बातमी औरंगाबादेस मोंगल यांस लागली कीं, मराठे यांची फौज तुर्काबादेवर येऊन उतरली. हें ऐकून नबाब यांणीं मराठे यांचे लष्करांत जासूद पाठविले कीं, फौज मराठे यांची आली आहे ती कशी आहे तें पाहून यावें. तेव्हां ते जासूद पेशवे यांचे लष्करांत येऊन फौज पाहून माघारे फिरले. शहरांत जाऊन नबाब यांस वर्तमान जाहीर केलें कीं, फौज आली आहे, परंतु बेसरंजामी. खराबी फौजेची बहूत आहे. तेव्हां निजामन्मुलुख म्हणतात, "अशा फौजेनें आमची मदतगारी करून आमचें काम शेवटास कसें जातें ?" ते समयीं बाजीराव पेशवे यांजकडील कारभारी अंबाजीपंत पुरंदरे यांस नबाब यांणीं जासूद पाठवून शहरांत बलावून नेलें. अंबाजीपंत शहरांत गेल्यावर पुरंदरे यांची व नबाबांची भेट झाली. भेट झाल्यानंतर अंबाजीपंतास नबाब यांनीं मजकूर विचारला कीं, "आम्हीं तुम्हांस आपले कार्यासाठीं आणिलें, तें कार्य आमचें तुमच्यानें शेवटास लागतें असें आमच्या दिसण्यांत यते नाहीं." हा मजकूर ऐकून पुरंदरे अंबाजीपंत नबाबास अर्ज करितात कीं, "आपण कशावरून म्हणतां कीं, 'तुमच्यानें काम शेवटास लागत नाहीं ?' हें आपणांस कशावरून समजलें ? आपलें काम कोणतें आमच्यानें शेवटास जाणार नाहीं असें आम्हीं कशावरून बोलावें ? आम्हांस कोणताही मजकूर विदित नाहीं, तेव्हां आम्हीं कार्यभाग होतो न होतो हें आपणांस कशावरून सांगावें ?" हें नबाब यांणीं ऐकल्यानंतर ते म्हणतात, "आम्ही ७।८ वर्षें दिल्लीस गेलों नाहीं व सरकारचा खजिनाही दिला नाहीं यामुळें पातशहाची आम्हांवर गैरमर्जी होऊन इतराजी झाली. यामुळें आमचा सुभा तगीर करून आम्हांवर फौज हुजूरची रवाना झाली आहे. यासाठीं तुम्हांस आम्हीं मदत आणिलें. त्या तुमचा प्रकार सारा खराबीचा पाहून आम्हांस असें वाटलें." हें ऐकून अंबाजीपंत नबाबास म्हणतात, "बोललां ही गोष्ट खरी. आम्ही फौजेविषयीं खराबींत आहों. परंतु काम करण्यास कोणासही

५१. गंगा=गोदावरी. * मूळांत 'दुर्गाबाद' असें आहे. या गांवचें मूळ नांव 'खराडी' असें होतें. पुढें तुरुक साजखां नांवच्या सरदाराला येथील पाटीलकी मिळाली तेव्हांपासून 'खराडी तुर्काबाद' हें नांव सुरू झालें.

हटणार नाहीं. सर्व गोष्टीनें हुशारी काम करण्याची आमची आहे. परंतु एक गोष्टीनें आम्ही बहूत अडचणींत आहों. तेवढी आमची तर्तूद झाली असतां मग पातशाहाच्या ‡ पलीकडे जाऊन बंदोबस्त करूं." तेव्हां नबाब म्हणतात "कोणती गोष्ट तुम्हांस कमती आहे ती सांगावी" तेव्हां अंबाजीपंत यांणीं नबाबास अर्ज केला कीं, "आम्हांपाशीं खजीना नाहीं, त्यामुळें आम्ही फार अडचणींत आहों." असा मजकूर ऐकिल्यानंतर नबाब म्हणतात, "तुम्हांस लागेल तो खजीना आम्हीं [१६]देतों." हें ऐकून अंबाजीपंत बोलतात, "आपण पैक्याचा पुरावा केला तर आम्हीं मोठ्या काळाच्या तोंडांतही जाण्यास मजबूत आहों. आतां आपण इतकाच बेत राखावा,—आपण शहराबाहेर दिल्लीस जाण्याच्या उद्योगें निघावें; आम्ही आपले पाठीवर पाठलाग करीत लागलेच [१७]येतों." असा नबाब यांणीं मजकूर ऐकिल्यावर अंबाजीपंतांस म्हणतात, "बरें आहे." असें म्हणून अंबाजीपंतांस निरोप दिला. अंबाजीपंतांनीं निघते वेळेस नबाबास अर्ज केला कीं, "आपण बाहेर निघाल्यावर आपले फौजेस थोडा कांटा द्यावा." असें बोलून अंबाजीपंत आपले लष्करांत येऊन बाजीराव साहेब यांस मजकूर शहरांत झाला तो सारा समजाविला.

नंतर नबाब यांणीं औरंगाबादेहून * पन्नास लक्ष रुपये श्रीमंतांचे लष्करांत पाठविले. तो खजीना लष्करांत पोहोंचतांच श्रीमंतांनीं नवी फौज चाकरीस ठेवण्याविषयीं कल[१८]मजारी केली. नित्य हजार दोन हजार फौजेची हजिरी होऊं लागली. असें इकडे होत असतां औरंगाबादेस नबाब यांनींही बाहेर निघण्याची तयारी केली.

त्या समयीं जनानखान्यामध्यें वर्तमान समजलें कीं, बाजीराव आले आहेत. ते फार देखणे [१९]सुरतपाक आहेत. तेव्हां त्यांस दृष्टीनें पाहावें हा मजकूर त्यांणीं नबाबांस सांगितल्यावरून नबाबांच्याही मनांत भरलें कीं, बाजीराव यांची भेट आपण घ्यावी. याप्रमाणें मजकूर नबाब यांचे मनांत येऊन बाजीराव

---

‡ पातशाहापेक्षांही मोठा शत्रु आला असतां त्याचा बंदोबस्त करूं (?) १६. १७३२चे सुमारास भेट झाली तेव्हां बाजीरावानें पैशाचें मागणें केलें खरें, पण तें निजामानें कबूल केलें नाहीं. फक्त पूर्वीप्रमाणें दक्षिणेच्या सुभ्यांची खंडणी देऊं इतकेंच सांगितलें. १७. ही विलक्षण युक्ती ग्रांट डफ देत नाहीं. * मागें टीप ११—(४) व १६ पाहा. १८. कलमजारी = नांवनिशी, चाकरीस ठेवणें. १९. चांगले चेहऱ्याचे, सुंदर.

यांजकडे वकील पाठविले आणि "तुम्हांस जाफत[20] करावयाची आहे यासाठीं तुम्हीं आमचे येथें यावें." असें बलावणें करायास सांगितलें. त्या वकिलांनीं श्रीमंतांस मजकूर समजाविला. त्या वेळेस श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, "आम्ही शहरांत येणार नाहीं. बाहेर कोठें बसावयाची जागा केल्यास तेथें येऊं. तुमची आमची मुलाखत होईल." असें श्रीमंतांनीं सांगितल्यावर तो मजकूर वकिलांनीं येऊन नबाबांस समजाविला. तें नबाबांच्या मनांत येऊन, बरें म्हणून "आम्ही शहराबाहेर सातान्यानजीक[21] मेजवानीची जागा करितों तेथें तुम्हीं यावें," असें सांगून पाठविलें. तें श्रीमंतांनीं कबूल केल्यानंतर नबाब यांणीं सातारें मुक्कामीं मेजवानीची तयारी केली, आणि श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं, "आतां आपण सडे पांच खिजमतगारांनिशीं यावें." तेव्हां ती गोष्ट श्रीमंतांचे मर्जीस येऊन श्रीमंतांनीं रुकार दिला. नंतर सातान्याजवळ मेजवानीची जागा करून, डेरे-दांडे देऊन, बिछायत करून, सभोंवतीं चिकोंचीं[22] वाडें चिरून आंत सारा जनानखाना मोंगलाकडील बसला. इकडून बाजीरावसाहेब स्वारी तयार करून निघाले. ते सातान्यापासून अलीकडे कोसावर सारी फौज ठेवून, खांसा स्वारी तेथून घोड्यावर स्वार होऊन निघाले ते डेन्याजवळ आले. नबाबही डेन्याबाहेर येऊन बाजीराव यांस आंत घेऊन गेले. उभयतांच्या भेटी होऊन बिछायतीवर जाऊन बसले. मग सान्या बायकांनीं बाजीराव यांस पाहिलें. तेव्हां मोहोरा चांगला पाहून सर्व बायका खूष होऊन दोन पायली मोत्यें बाजीराव यांजवर उधळलीं. नंतर श्रीमंतांचीं व नबाबांचीं बोलणीं बहूत झालीं. त्या वेळेस नबाब बाजीराव यांस म्हणतात, "आतां कसें ! आतां तुम्ही आमचे हातांत सांपडलां !! तुमचे शिंदे, होळकर ते कोठें आहेत ? आतां तुम्हांस येथें आम्हीं एखादा दगा केला तर कसें होईल ?" असें बाजीरावसाहेब यांणीं ऐकून श्रीमंत बोलतात, "मी जेथें आहें तेथें माझ्याजवळ सारे आहेत." असें उत्तर ऐकून नबाब म्हणतात, "कोठें आहेत ?" मग होळकर व शिंदे यांच्या भेटी नबाबांशीं करविल्या.[23] त्या

२०. मेजवानी. जाफत १७२८ तील भेटीच्या वेळीं निजामानें केली. ग्रांट डफ.
२१. हें सातारें गांव औरंगाबादेजवळ १॥ कोसावर मोंगलाईंत यज्ञेश्वर बाळकृष्ण दीक्षित यांस जाहगीर आहे. वरील जाफत दीक्षित यांचे पूर्वज नारायण दीक्षित व वासुदेव दीक्षित यांच्या सल्लेनें झाली. २२. बांबूचे कुड घालून, चिकाचे पडदे लावून. २३. वर पांचा खिजमतगारांनिशीं आले असें आहेच. तेच हे सरदार लोक.

समयीं निजामन्मुलुक यांची खातरजमा[24] झाली. नंतर नवाब बाजीराव यांस म्हणतात, " आम्ही तुम्हांस या वेळीं दगा करणार नाहीं, कारण यासमयीं आम्हांस तुमची गरज, तुम्हांपाशीं काम बहूत आहे. याउपर आमचे विश्वासावर आमचे भेटीस कोणीं येऊं नये. आम्ही दगा करावयास चुकावयाचे नाहीं." असें म्हणून नवाब बोलतात, " एक बाजी सब् पाजी. " हें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत नबाबांस बोलले, " एक निजाम, सब् हजाम. " अशीं परस्परें बोलणीं होऊन, श्रीमंतांस वस्त्रें, अलंकार, जवाहीर वगैरे देऊन समागमें सरदार होते त्यांसही पोषाग दिले. नंतर बाजीराव साहेब नबाबांचा निरोप घेऊन आपले लष्करांत येऊन दाखल* झाले.

इकडे मोंगलें[25] दिल्लीस जाण्यास निघाले ते अजिंठ्याचा घाट उतरून खानदेशांत आले. बाजीरावसाहेबही फौजेसुद्धां खानदेशांत आले. आणखी फौज कूचमुक्कामास[26] ठेवीत चालले. असें जातां जातां मोंगल फौजसुद्धां नर्मदा उतरून गेले. पाठीमागून श्रीमंतही उतरले. असे उज्जनी पावेतों पाठलाग करीत चालले. तेव्हां कोट्याचे[27] मैदानांत दिल्लीहून फौज आली होती तिची व निजामन्मुलुख यांची गांठी पडून भेटी झाल्या. तेव्हां दिल्लीहून सरदार आले होते त्यांणीं नबाबास विचारलें, " तुम्ही असे बदमस्त[28] कां झालां ? दाहा दाहा वर्षें पर्यंत पातशाहा यांची भेट नाहीं. अशी मस्ती पातशाहा बरोबर चालेल कीं काय? "

---

२४. खातरी, संशयनिवृत्ती. * हें भेटीचें वर्णन मोठें मनोवेधक आहे. यावरून बाजीरावाचा साधा शिपाईबाणा व समयसूचकता, निजामाच्या स्वभावाबद्दल त्याची माहिती व तद्विषयीं पुढील तरतूद वगैरे गोष्टी कळून येतात. तो रूपानें देखणा असून बोलणारा मोठा बांका होता असेंही ह्या वर्णनावरून निष्पन्न होतें. तसेंच निजामाचें कपट व आंत एक असून प्रसंगानुसार बाहेर दुसरेंच दाखविण्याचें त्याचें कसब हींही व्यक्त होतात. युरोपामध्यें अशाच राज्यस्थितीच्या एका प्रसंगीं दोन मोठे मोठे राजे भाऊपणाच्या नात्यानें भेटले. त्यांची प्रस्तुतच्या दोघां राजपुरुषांशीं तुलना चांगली करतां येईल. बाजीराव हा फ्रान्स देशाचा राजा पहिला फ्रान्सिस ह्यासारखा मोकळ्या मनाचा व शब्दाला मान देणारा होता. निजाम हा इंग्लंडचा राजा आठवा हेन्री ह्यासारखा कपटी व आपमतलबी होता. ह्या दोन्ही युरोपियन भूपतींची भेट मोठ्या थाटानें फ्रान्स देशांत क्याले जवळ आड्रेस येथें १५२० त झाली. तो थाटमाट इतका होता कीं, त्या स्थळाचें नांव ' किनखाफी अथवा भरजरी ठिकाण ' असें पडलें. ह्या भेटीची हकिकत ग्रांट डफचे ग्रंथांत नाहीं. २५. म्हणजे निजामाचे लोक. २६. निघतांना व तळ दिल्यावरही. २७. कोटा चंबळानदीचे तीरीं. २८. गर्वानें धुंद.

असें ऐकून दिल्लीचे सरदारांस निजामन्मुलुख म्हणतात कीं, "हल्लीं बंड आमचे पाठीवर येत आहे. अशीं बंडें दक्षिणेंत हरदम[29], नेहेमीं लढाईशीं गांठ; तेव्हां या बंडाचा बंदोबस्त करावा किंवा पातशाहाचे मेटीस यावें ? असा नित्य उठून दंगा. असो हल्लीं आमच्या पाठीवर बंड येत आहे, याचा आतां बंदोबस्त करावा." अशीं त्यांचीं ह्यांचीं बोलणीं होतात तो श्रीमंतांची फौज जाऊन पोहोंचली. तेव्हां दिल्लीचे फौजेची व श्रीमंतांचे फौजेची गांठ पडून लढाई होऊं लागली. लढाई होतां होतां पातशाही फौजेचा मोड झाला. त्यासमयीं पातशाही फौज पळूं लागली. त्यांच्यासमागमें निजामन्मुलुखही पळूं लागले. हें पाहून श्रीमंत फौजेसुद्धां पाठीमागें लागले. त्यांणीं शत्रूंस मजल दर-मजल नेऊन दिल्लीमध्यें घातलें. श्रीमंतांच्या फौजेनें दिल्ली भोंवती मोठी धूम[30] केली

नंतर निजामन्मुलुख पुढें गेले होते त्यांच्या व पातशाहाच्या भेटी झाल्या. तेव्हां पातशाहा मोठ्या घुश्शांत येऊन नबाबास बोलिले कीं, "ही तुमची रीत ! कीं दहा दहा वर्षेंपर्यंत तुमचा पैका सरकारांत दाखल नाहीं व हिशेबही नाहींत व तुम्हांस हुजूर येण्याचा गरज देखिल नाहीं !! असे तुम्ही जोरावर होऊन सरकाराशीं मस्ती करितां हें नीट नाहीं." असा सारा मजकूर ऐकून घेऊन निजामन्मुलुख हात जोडून अर्ज करितात, "आम्हीं सरकारास बदमामलेची[31] गोष्ट कधींही सांगितली नाहीं, व पुढेंही सांगावयाची नाहीं; परंतु दक्षिणेंत अशीं बंडें, यांचा बंदोबस्त राखावा किंवा सरकारची पैरवी[32] ठेवावी ?" अशा मतलबाचीं बोलणीं बोलून, "हल्लीं हें बंड आलें आहे; हुजूरची फौज गेली होती त्या फौजेचा मोड होऊन फौज पळून माघारी आली. हें बंड येऊन

२९. प्रतिक्षणीं, नेहमीं. ३०. बाजीरावानें १७३६ सालीं दिल्लीच्यापुढें तळ दिला, तेव्हां बादशाहीची अदबी राखावी म्हणून त्याणें बादशाहास निरोप पाठविला कीं, माझ्या फौजे-पासून कदाचित तुमच्या शहरच्या लोकांस इजा होईल, याजकरितां मी आपला मुक्काम जरा दूर करतों. असा निरोप जातांच दिल्लीवाल्यांस स्फुरण चढून आठ हजार लोक मराठ्यांवर चाल करून आले. मराठे तयार होतेच. बाजीरावानें हुकूम केल्याबरोबर दिल्लीवाल्यांस दोहींकडून घेरून त्यांनीं त्यांचा अगदीं चुरा उडविला. एकचतुर्थांश लोक शहरांत परत गेले असतील कीं नाहीं कोण जाणे. ग्रांट डफ. ३१. दांडगावा, उलट जाबसाल. ३२. जा ये करणें, भेट घेणें.

मुलुखामध्यें धूम मांडली आहे, त्याचा बंदोबस्त सरकारांनीं करावा," असा अर्ज नबाबांनीं केला. इतक्यांत बाहेरीलही बोभाट आले. त्यामुळें पातशाहाची खातरजमा झाली कीं, निजामन्मुलुख वर्तमान सांगतो हें खरें.

तेव्हां पातशहा यांणीं चितान्यास बलावून आणून हुकूम केला कीं, "बाजीराव धूम करितो तेव्हां तूं जाऊन त्याची तसबीर बाजीराव कसा असेल तशी लिहून आणावी.[३३]" तेव्हां चितान्यानें लष्करांत येऊन, बाजीराव साहेब यांची तसबीर लिहून नेऊन पातशाहास दाखविली. ती पातशाहा यांणीं कशी पाहिली ! बाजीराव घोड्यावर बसले आहेत, घोड्याची अनीन मानेवर टाकलेली आहे, एक पाय घोड्यावर आडवा टाकलेला आहे, खांद्यावर भाला, आणि घोडा चालला आहे, ते वेळेस शेतांतलीं कणसें हातानें तोडून, हातावर चोळून दाणे तोंडांत टाकीत असावें. अशी तसबीर पाहिल्यानंतर पातशाहा म्हणूं लागले, "ए तो सैतान है !" असें म्हणून नबाब निजामन्मुलुख यांस पातशाही हुकूम झाला कीं, "बाजीराव यांशीं समजूत पाडून वाटेस लाविलें पाहिजे.[३४]"

असा हुकूम होतांच नबाब बाजीराव यांजकडे येऊन बोलणीं चालणीं झालीं. त्या वेळेस श्रीमंतांनीं नबाबास सांगितलें, "आमचा स्वारी-खर्च काय झाला असेल तो द्यावा, आणि पातशाही मुलूख आहे इतक्याच्या सनदा बाबती सरदेशमुखी व चौथाई मोकासा या अमलाच्या शाहू महाराज छत्रपती यांचे नांवें करून द्याव्या." अशीं बोलणीं होऊन तो मजकूर नबाब यांणीं पातशाहास समजाविला. ते समयीं पातशाहा यांणीं मजकूर समजून

---

**३३.** ग्रांट डफ म्हणतात हीं गोष्ट प्रथम निजामउल्मुल्क व बाजीराव यांची लढाई होण्याचा प्रसंग आला तेव्हां घडली. त्या वेळीं निजामानें आपल्या चितान्यास बाजीराव जशा स्थितींत असेल तशा स्थितींत त्याचें चित्र काढून आण, असें सांगितलें, व त्याणें काढलेली तसबीर बखरींत लिहिल्याप्रमाणेंच होती. बाजीरावास पेशवाईचा डौल वगैरे कांहीं नव्हता. तो साधारण शिलेदाराप्रमाणेंच तोबरा, मेखा, पायबंद वगैरे घोड्याचे पिछाडीस बांधून जाई. ही तसबीर हैदराबादेस आहे असें ऐकिवांत आहे. **३४.** हे बादशाहा महंमदशाहा हे होत. (१७२०–४८). आयुःक्रमण करण्याच्या यांच्या रिती व संवयी बाजीरावाच्या रिती व संवयी यांपासून अगदीं भिन्न होत्या. तेव्हां असें चित्र पाहून त्यांचे आंगावर शहारे उठावे यांत आश्चर्य नाहीं. एकास ऐश्वर्य व कीर्ती मिळविण्याची अत्युत्कंठा व तदर्थ त्याचे श्रम चालले होते, दुसऱ्याच्या आज्या पणज्यांनीं सर्व मिळवून आयतें तयार करून ठेविलें होतें. ह्या फरकाचा इतका परिणाम !

घेऊन, त्या बोलण्यास रुकार देऊन नव्या सनदा सरदेशमुखी चौथाईच्या शाहूमहाराज यांच्या नांवाच्या करून दिल्या व स्वारीखर्चही दिला. तेव्हां श्रीमंतांची स्वारी माघारी आली. दिल्लीस, निजामन्मुलुख यांस हुकूम झाला कीं, "तुम्हीं दक्षिणेंत जावें. तेथील बंदोबस्त चांगला राखीत जावा." असें होतांच नबाबही हुकूम घेऊन दक्षिणेंत आले. या स्वारीला मोंगल यांणीं खानदेश येथील महाल सारे सरकारांत[35] दिले.

असा मजकूर झाला तेव्हां बाजीराव पेशवे कूच करून निघाले ते नीट साताऱ्यास आले. साताऱ्यास आल्यानंतर शाहू महाराज यांची भेट झाली. स्वारीचा सारा मजकूर महाराजांस विदित केला व नव्या सनदा पातशाही बाबती सरदेशमुखी चौथाईच्या आणिल्या होत्या त्या महाराज यांजपुढें ठेविल्या. तें पाहून शाहू महाराज यांची मर्जी बहुत प्रसन्न झाली. आणि बाजीराव यांस शाहू राजे बोलले "शाबास बाजीराव! खूप काम बजाविलें!" असें बोलून नंतर बाजीराव यांस महाराज आज्ञा करितात कीं, "तुम्हीं आपल्यास राहावयास जागा पेशवाईचे कारभाराजोगी, मध्यदेशीं पाहून, तेथें वाडा बांधून, शहर वसवून तयार करावी." अशी आज्ञा होतांच बाजीराव साहेब यांणीं महाराजांस विनंती केली कीं, "पुणें जागा मध्यदेश आहे. आज्ञा झाल्यास तेथें राहावयाची सोय करूं." अशी विनंती करितांच ती गोष्ट शाहू राजे यांचे चित्तांत येऊन राजे यांची आज्ञा श्रीमंतांस झाली. तेव्हां श्रीमंत बाजीराव महाराजांची आज्ञा घेऊन चिमाजी आपा बरोबर घेऊन पुण्यास आले. पुण्यास येऊन वाड्याची जागा पाहून वाडा बांधावयास आरंभ केला. वाड्यास काम लाविलें व शहर वसविण्यास आरंभ केला.[36]

---

३५. पेशवे यांस. ३६. पुणें या कारकीर्दींत पेशव्यांचें राहण्याचें ठिकाण झालें. याबद्दल ग्रांट डफ यांनीं कोठें स्पष्टपणें लिहिल्याचें आढळांत नाहीं. या पूर्वी पेशव्यांचीं मुलें माणसें सासवडास राहात असत. पुण्यासही कांहीं दिवस होतीं. वाडा शनवारचा. वाड्यास हीच जागा पसंत करण्याचें कारण बरोबर समजत नाहीं. तरी अशी गोष्ट सांगतात कीं, बाजीराव एके दिवशीं त्या रस्त्यानें जात असतां त्यांनीं कुत्र्याच्या मागें ससा लागलेला पाहिला. यावरून त्यांनीं असें अनुमान बांधिलें कीं, ह्या जागेवर वाडा बांधिला असतां आपला पराजय कधींही होणार नाहीं. कोणी म्हणतात त्यांच्या घोड्याचा पाय तेथें ठेंचाळला, यावरून आमचें राहणें येथेंच असावें असें श्री गणपतीचे मनांत आहे असें त्यांस वाटलें, व तेथेंच वाडा बांधावा असा निश्चय झाला. पुणें शहरचें वर्णन.

पुढें वर्तमान असें झालें. *मोंगल यांचा बंदोबस्त मराठी फौज कुमक घेऊन केला. तशीच मोहीम पातशाहा यांची बुंदेलखंडाचे राजावर झाली. त्यासमयीं त्या राजानें हा मजकूर मोंगलांचा ऐकिला होता, त्याजवरून सातान्यास वकील पाठविले. त्यांच्या बरोबर शंभर दोहऱ्यांचें पत्र बाजीराव यांस पाठविलें. त्यांत दर दोहऱ्यास तीन चरण आपल्या मजकुराचे व चवथे चरणांत मजकूर असा कीं, "असे राव बाजी राखे बुंदेलेके बाजी." असें पत्र वकील घेऊन आले तें बाजीराव साहेब यांस त्यांणीं दिलें, आणि शाहू महाराज यांजलाही मजकूर बुंदेलखंडाच्या वकिलांनीं समजाविला. त्याजवरून महाराज यांची आज्ञा बाजीराव पेशवे यांस बुंदेलखंडांत जाण्याची झाली कीं, "तुम्हीं बुंदेलखंडांत जाऊन त्या राज्याचा बंदोबस्त करून द्यावा." त्याजवरून श्रीमंतांची तयारी होऊन फौजेसुद्धां बुंदेलखंडांत जाऊन पोहोंचले. तेथील छत्रसाल राजा याच्या भेटी झाल्यानंतर दिल्लीहून फौज आली होती त्या फौजेची व श्रीमंतांची लढाई मोठी मातबर झाली. त्या वेळेस दिल्लीची फौज आली होती तिचा मोड होऊन फौज माघारी गेली. त्यासमयीं छत्रसाल राजा यांणीं बाजीराव पेशवे यांस मोठी शाबासकी दिली आणि सांगितलें कीं, "दोन बेटे माझे आहेत तसाच तूंही तिसरा माझा बेटा." मग आपले राज्याचे तीन विभाग करून दोघां लेंकांस दोन वांटे देऊन तिसरा

---

* मोंगल—निजाम उल्मुल्क. ३७. राजा छत्रसाल यावर महंदखान बंगश, अलाहबादेचा सुभेदार, हा चालून आला.(१७३३.) राजानें बाजीरावाचा लौकिक ऐकिला होता व मदतीकरितां त्याजकडे वकीलें पाठविले ह्या दोन्ही गोष्टी साहजीक होत्या. ३८. हें पत्र मोठें चमत्कारिक असेल. पण तें आतां सांपडण्याची मारामार! निबंधमालेच्या ३१व्या अंकांत का० ब० ह्या सहीचें पत्र आहे त्यांत एक दोहरा दिला आहे तो असाः—

"जो गति ग्राह गजेंद्रकी सो गत भइ है आज ।
बाजी जात बुंदेलकी राखी बाजीराव ।

अर्थ—

ओंवी ॥ जी गती झाली गजेंद्राची । तीच आज आमची साची ॥
बाजी जाते बुंदेलाची । राखी बाजी राजया " ॥

ह्या दोहऱ्याची शेवटची पंक्ती व बखरींतील चवथा चरण हीं बहुतांशीं जमतात. नक्रानें गजेंद्रास ग्रस्त करण्याकरितां तोंडीं धरिलें असतांना त्याणें श्रीविष्णूचा धांवा करून आपली सुटका करून घेतली, ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे.

वांटा बाजीराव यांस दिला[२९] आणि सांगितलें कीं, "मी आपले संतोषानें तुम्हांस आपले राज्यापैकीं मुलूख दिला. या मुलुखाचें राज्य तुम्हीं करून सुखरूप राहावें." त्या समयीं तेथें राहावयास कोणी कबूल होईना. तेव्हां गोविंदपंत[३०] कराडे स्वारीमध्यें उमेदवारी करून होते त्यांनीं श्रीमंतांस विनंती केली कीं, "मला आज्ञा झाल्यास मी येथें राहीन." असें श्रीमंतांनीं ऐकून "बरें आहे" म्हणून सांगितलें, आणि त्या मुलुखाच्या सनदा त्यांच्या नांवें करून देऊन, त्यांची स्थापना तेथें करून ठेविली. नंतर सरकारची स्वारी माघारी फिरली ती मागती पुण्यास येऊन, सातान्यास जाऊन, महाराज यांस भेटून, झाला मजकूर महाराजांस विदित केला.

इकडे बाजीरावसाहेब बुंदेलखंडांत गेल्यावर निजामन्मुलुख याजवर दिल्लीहून फौज रवाना झाली. याजमध्यें सरदार शाहाजतखान भडबुंजे दिल्लीहून रवाना केले. तो येऊन पोहोंचल्यावर निजामन्मुलुख यांणीं शाहू राजे यांजकडे वकील पाठवून राजाची फौज कुमक मागितली. तेव्हां राजास असें वाटलें कीं, बाजीराव बुंदेलखंडांत गेला, आतां मोंगलाकडे कोण पाठवावा? असे फिकिरींत असतां, चिमणाजी बल्लाळ, बाजीराव यांचे धाकटे बंधू, यांणीं राजांस विनंती केली कीं, "मजला आज्ञा होईल तर मी जाऊन मोंगलांस कुमक करीन." त्याजवरून त्यांजला आज्ञा झाली कीं, "तुम्हांजवळ फौज नाहीं, सारे सरदार बाजीराव यांबरोबर गेले." तेव्हां चिमाजी आपा यांणीं विनंती केली कीं, "जे सरदार गेले त्यांचे लेंक व पुतणे व भाऊ पाठीमागें आहेत त्यांजला घेऊन मी जातों." त्याजवरून

---

२९. पहिल्यानें झांशीचा किल्ला व त्या खालचा मुलूख सव्वादोन लाखांचा दिला, व मरण-समयीं सर्व राज्याचा तिसरा हिस्सा दिला! हा रजपूत राजा फार वृद्ध होता. मोंगलांपासून सुटका झाल्यानंतर तो लवकरच मृत्यूपावला. याच्या मुलांचीं नांवें जगत्-राजजीदेव व हरदेश अशीं होतीं. ह्यांची व बाजीरावाची मैत्री पुढें सदोदित चालली व ते त्यास सर्वदा मदत करीत. ग्रांट डफ. ४०. यासच पुढें गोविंदराव बुंदेले व गोविंदराव झांशीवाले असें म्हणूं लागले. हा कऱ्हाडा ब्राह्मण. याचें उपनांव खेर. यास नेवालकर असेंही म्हणत. हा ह्या प्रांतीं पेशव्यांचा सुभा झाला. झांशीचा मुलूख त्यांच्या वंशजांकडे लॉर्ड डलहौसे यांच्या कारकीर्दीपर्यंत चालला. पुढें दत्तक घेण्याचा प्रसंग आल्यावर माजी कंपनी सरकारच्या वहिवाटीप्रमाणें तें संस्थान खालसा करण्याचा निश्चय झाला. राणी लक्ष्मीबाईची पुढील हकिकत सर्वांस मशहूर आहेच. स्वतः गोविंदराव पुढें पाणिपतच्या मोहिमेंत पतन पावला.

महाराजांनीं आज्ञा दिल्यावर पंचवीस हजार फौज घेऊन गेले, ते मोंगलाकडे न जातां जो सरदार दिल्लीहून आला होता त्याजकडे जाऊन त्यास भेटले. त्यांणीं विचारिलें कीं, "तुम्हीं कोण आहां ?" तेव्हां आपासाहेब यांणीं सांगितलें कीं, "मी बाजीराव यांचा धाकटा भाऊ आहें. बाजीराव राजाकडेस चाकरीस आहेत; त्यांचें आमचें बनत नाहीं, म्हणून दुसरी निराळी चाकरी पाहावयास निघालों आहों. तुम्ही ठेवाल तर आम्ही राहूं." त्याजवरून शाहजतखान[४१] यांणीं चिमाजी आपा यांचे फौजेची हजिरी घेऊन चाकरीस ठेविलें व पुढें त्यांची बोली करून खर्चास यावें याप्रमाणें ठरविलें. दरम्यान एक दोन दिवस गेल्यावर दोनप्रहर दिवसाचे सुमारें चिमाजी आपा यांणीं आपले फौजेची तयारी करून शाहजतखान याचे फौजेवर छापा* घातला. ते वेळेस ते मुसलमान लोक बेसावध असून थंड हवा घेण्यास झाडांझाडांखालीं बसावयास गेले होते. त्यांजला मारामार करून उधळून दिलें. नंतर शाहजतखान याची कलावंतीण मस्तानी[४२] होती ती सांपडली. ती फार नाजूक होती. तिणें विडा खाऊन पीक गिळली तर दिसावी ! तिचे पिस्वीदीचे[४३] गुंडीस लाख रुपये किमतीचा एक हिरा होता. आणखी तिजजवळ जवाहीरही पुष्कळ होतें. अशी तिची बरदास्त शाहजतखान याणें ठेविली असतां तिजवर असा वख्त पडला. तेव्हां ती वीष खाऊन मरूं लागली. त्या समयीं चिमाजी

---

४१. हा शाहाजतखान कोण तें स्पष्ट होत नाहीं. कदाचित 'सादतखान' असेल. सादतखान हा इराणांतलि एका फेरीवाल्याचा मुलगा होता. पुढें तो अयोध्येचा नबाब झाला. चिमाजी आपा, एकदां (१७२४) उदाजी पवार यास घेऊन माळव्यांत गेला होता. तेव्हां माळव्याचा सुभेदार राजा गिरिधर याचा त्यानें पराभव केला, नंतर सारंगपुरावर येऊन तेथील मुसलमान सरदारापासून १५,००० रुपये खंड घेतला. माल्कम्, म० हिं०. पुनः एकदां दाभाड्याचा पराजय केल्यानंतर (१७३१) बाजीरावानें त्यास माळव्यांत पाठविलें होतें. ग्रांट डफ. * या गोष्टींचा उल्लेख ग्रांट डफ कोठें करीत नाहीं. ४२. मस्तानीबद्दल ग्रांट डफ कोठें बोलत नाहीं. 'समशेर बहादर' यवनीपासून बाजीरावास झाला इतकें मात्र तो लिहितो. अन्यत्र असें आढळतें कीं, ही छत्रसाल राजाची दासीपुत्री. ती त्याणें आपल्या राज्यविभागाबरोबरच बाजीराव यास दिली. मस्तानीवरील बाजीरावाची आसक्ती, निजामाची व त्याची भेट, तेव्हांची देशस्थिती व काल यांस अनुलक्षून, कांहीं गोष्टी मागें पुढें करून एक उत्तम प्रकारची ऐतिहासिक कादंबरी लिहितां येईल. लिहिणारा मात्र कुशल पाहिजे. ४३. झगा (कलावंतिणीचा).

आपा यांणीं विचारिलें, " तूं वीष कां खातेस ? " तेव्हां तिणें उत्तर केलें कीं, " माझा सांभाळ करील असा आतां कोणी नाहीं, तुम्ही आपले अंगाखालीं ठेवाल तर मी जीव देणार नाहीं. " त्यावरून चिमाजी आपा बोलले कीं, " माझे वडील भाऊ बाजीराव साहेब बुंदेलखंडांत गेले आहेत ते आल्यावर तुझा प्रतिपाळ ‡ करतील. " असें सांगितल्यावरून ती बरें म्हणून आपासाहेब यांजपाशीं राहिली.

नंतर चिमाजी आपा यांणीं शाहाजतखान याची कांहीं फौज राहिली होती ती आपण चाकरीस ठेवून मोंगलावर चढाई करून गेले, आणि मोंगलांस सांगितलें कीं, " तुमच्या म्हणण्याप्रमाणें तुमचे गलिमाचें पारिपत्य केलें, आतां आमचा स्वारीखर्च व आम्हांस काय देतां तें सांगावें; नाहीं तर तुमचें ठिकाण आम्ही घेऊं" त्या वेळेस निज़ामन्मुलुख यांणीं कसेंही करून आपले सर्व लोकांस विचारिलें कीं, " आतां कसें करावें ? गलीम मोडण्यासाठीं बलाविले त्यांणीं गलीम तर मोडला, परंतु तूर्त आपणांस हेच गलीम झाले. त्यांचें न ऐकावें तर ते आज फौजबंद असून यांचे भाऊ बाजीराव बुंदेलखंडांत गेले आहेत त्यांणीं तिकडे फत्ते केली आहे. आतां यांच्याशीं कज्जा करावा तर त्यांचा आपला वांकडेपणा पडून दोस्तींत अंतर §पडतें. " तेव्हां सर्व सरदार यांच्या मनांत आलें कीं, " दक्षिणेंत आपण एक व दुसरे शाहू राजे; त्यांशीं वांकडें होऊन तट करावा हें चांगलें नाहीं, आणि राजापाशीं आपण कुमक मागितली

‡ येथें वडिलांस मान देण्याची व त्यांची मर्यादा राखण्याची आमच्या लोकांची चाल स्पष्ट दिसून येते. खेरीज आपाचा मनोनिग्रहही व्यक्त होतो. § या गोष्टीस इतिहासाचा आधार नाहीं. निजामउल्मुल्कही अशा नुसत्या दांडदपटणीस ऐकणारा नव्हता. तो मोठा दूरदर्शी मुत्सद्दी असून उत्तम शिपाईही होता. तरी त्यावेळीं खानदौरान ( म्ह० बादशाही वजीर ) यांसारखे भेंकड व पोरकट बुद्धीचेही लोक होतेच. मझफरखान म्हणून एक सरदार या वजिरांनीं मराठ्यांस नर्मदेपलीकडे हांकून लावण्यास पाठविला होता. तो तर नुसता सिरोंजपावेतों येऊन परत दिल्लीस गेला. तेथें जसा काय तो मोठा दिग्विजय संपादून आला असा लोकांनीं त्याचा सन्मान करून वाहवा केली ! ( १७३५ ) सादत्खान याणें दुआबमध्यें होळकराचा मोड करून त्यास तेथून पाठीमागें वळविलें. इतक्या वरूनच बादशाहास एक लांबलचक पत्र लिहून, आपल्या पराक्रमाचें वर्णन करून मराठ्यांचें बंड मोडून टाकिलें असें कळविलें. ही वातमी बाजीराव यास कळल्यानंतर थोडेच दिवसांत त्यानें दिल्लीभोंवतीं प्रळय करून मराठे जिवंत आहेत असें दाखविलें ! ग्रांट डफ.

त्यापेक्षां त्यांचा स्वारीखर्च देऊन त्यांस कांहीं मुलूख देऊन पुनः त्यांचा आपला कब्जा न होतां एकमेकांस मदत करावी असा ठराव करावा." त्याजवरून निजामन्मुलुख यांणीं चिमाजी आपा यांजकडे वकील पाठवून तहाचें बोलणें करून त्यांचा स्वारीखर्च देऊन दौलताबाद किल्ला, बीड पाथरी वगैरे *मुलूख साठ लक्षांचा दिला.

याप्रमाणें ती मसलत पार होऊन चिमाजीआपा सातान्यास आले, व बाजीराव साहेब बुंदेलखंडांत गेले होते तेही आले. आपले स्वारीचा मजकूर चिमाजीआपा यांणीं बाजीराव साहेब यांस सांगितला. "मस्तानी कलावंतीण आणली आहे तिचें म्हणणें जे, 'मजला आंगाखालीं घालावें' त्याजवरून तिजला मीं सांगितलें कीं, 'आमचे वडील बंधू बाजीराव बुंदेलखंडांत गेले आहेत ते आल्यावर तुझा प्रतिपाळ करतील' असें सांगून तिचे सरंजामा सुद्धां तिजला बरोबर आणली आहे, आतां आपले मर्जीस येईल तसें करावें.' त्याजवरून बाजीरावसाहेब यांणीं तिला बलावणें पाठवून आपले डेन्यांत आणिली. तिचें स्वरूप पाहून बाजीराव साहेब भुलले, आणि तिजला सांगितलें कीं, तुजला मी आपले आंगाखालीं घालितों. त्याजवरून बाजीराव साहेब आपल्यास पाहून भुलले, आतां आपण जें मागूं तें देतील, असें चित्तांत आणून बाजीरावसाहेब यांस तिणें विनंती केली कीं, "महाराज, मी आपली आज्ञा कबूल करितें; परंतु माझें मागणें आपण कबूल केलें पाहिजे." तेव्हां बाजीराव साहेब बोलले कीं, "काय मागणें तें माग." त्याजवरून तिनें विनंती केली कीं, "माझे पोटीं आपले पासून बेटा झाला, तर त्याजला आपले संस्थानचा वांटा यावा." हें श्रीमंतांनीं ऐकून तिजजवळ कबूल केलें कीं, "माझे पासून † बेटा झाला तर त्याजला मी आपले संस्थानचा वांटा देईन." असें म्हणून तिजला आंगाखालीं घातली आणि तिची बरदास्त पहिले प्रमाणें ठेविली.

---

* हे प्रांत हल्लीं मोंगलाईंत आहेत. हे पुनः पुनः घेतले व परत केले गेले.
† हा बेटा समशेर बहादर. यास पुढें बुंदेलखंडांत मुलख दिला. असें म्हणतात कीं, या समशेर बहादरचें उपनयन करून त्यास ब्राह्मण करण्याचें बाजीरावाचे मनांत होतें पण ब्राह्मणांच्या पसंतीस न आल्यामुळें तो बेत तसाच राहिला. कदाचित हीं थट्टाच असावी

पुढें महाराज यांची आज्ञा घेऊन पुण्यास आले. वाडा बांधावयास प्रारंभ केला तोही मजकूर महाराजांस विदित केला. तेव्हां महाराज बोलले. "बरें आहे." पुढें स्वारीस जाण्याची आज्ञा मागितली, ते समयीं श्रीमंत शाहूराजे यांणीं पेशवे यांस सांगितलें, "कारभार कराल तितका सावधगिरीनें मोठ्या † जुर्तीनें करीत जावा." असें सांगून स्वारीस जाण्याची आज्ञा दिली. मग बाजीराव साहेब पेशवे पुण्यास येऊन दाखल झाले. वाड्याचा कारखाना चालता केला. वाड्याभोंवतीं तट बांधिला. तटास दहा बुरूज चांगले केले.

नंतर चिमाजीआपा यांचे मनांत आलें कीं, कोंकण काबीज करावें. असा विचार करून बाजीराव यांस विचारून कोंकणाकडे स्वारी तयार करून मावळांतून फौजेसुद्धां निघाले ते मावळचा अंमल बसवून *भीमाशंकर येथील दर्शन घेऊन § कोळवणांत उतरले. सारें कोळवण सर करून, अंमल बसवून, ‡ वज्ञर जोगिणीवरून देवीचें दर्शन घेऊन, तेथें अंमल चालता करून किल्ले ×माहुली येथें येऊन, किल्ल्यास + शह दिला. कांहीं दिवस किल्ला भांडला. शेवटीं किल्ला सर करून आपलें निशाण चढवून किल्ला सही केला[४४]. सभोंवतीं मुलूख होता तेथें अंमल बसवून, तेथून कूच करून, कल्याणास येऊन दाखल झाले. कल्याण भिंवडी वगैरे ठाणीं बसवून तेथून कूच करून स्वारी पुण्यास गेली. झाला मजकूर बाजीराव यांस समजावून आपासाहेब सातार्‍यास जाऊन शाहू महाराज यांची भेट घेतली. स्वारीस गेल्याचा मजकूर राजे यांस विदित केला, आणि महाराज यांची आज्ञा घेऊन पुण्यास निघून आले.

नंतर वाड्याचें काम पुरें झालें. बुरुज, दरवाजे व तट सारें काम तयार झालें. वाड्याची वास्तुशांती करून आंत राहावयास लागले.

---

† धारिष्टानें, हुशारीनें. * भीमाशंकर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक होय. हें खेड (पुणें) व कर्जत (कुलाबा) या तालुक्यांच्या हद्दीवर सह्याद्रींत आहे. § कोळी-वन, कोळी लोकांचा मुलूख. ठाणें जिल्ह्यांतील वाडें, शाहपूर वगैरे तालुके. ‡ वज्ञर जोगिणी = वयज्रोगिनी. मूळस्थान कांटी, ता० वाडें. पुढें एका भक्ताकरितां वडवली ता० भिंवडी येथें ही देवी गेली असें म्हणतात. हल्लीं वज्राबाई नांवानें प्रसिद्ध. या देवस्थानास इनाम गांव पांच आहेत. येथें तानसा नदीच्या पात्रांत उष्णोदकाचीं कुंडें आहेत. × हल्लीं शहापूर तालुक्यांत. (ठाणें जिल्हा). + वेढा. ४४. सही केला = घेऊन आपलासा केला.

मागती चिमाजीआपा कोंकणपट्टीला स्वारीला निघाले. ते कोंकणांत येऊन तळा, घोंसाळा, अवचितगड, बिरवाडी, करनाळा, रेवदंडा, बेलापूर, साष्टी, असा मुलूख[४५] आपले कबजांत आणून आपला अंमल चालता केला. पुढें मुलूख काबीज करावा अशा बेतानें जाऊन वसईला लागले[४६]. तेथें अंमल पहिला फिरंग्यांचा. तेव्हां शह जाऊन दिला. परंतु किल्ला समुद्रांत. एक आंग खुषकीला. त्यासमयीं आपासाहेब यांणीं जहाजें तयार करून, आरमार जमवून समुद्रांतून लढाईचा उद्योग केला. तीन वर्षें वसई भांडली. किल्ला हस्तगत होतां दिसत नाहीं. मनुष्य फार कामास[४७] आलें. नऊ लाख बांगडी फुटली. लढाईचा मोठा प्रसंग केला, परंतु किल्ला हस्तगत होत नाहीं. चिमाजीआपा यांचा तर किल्ला घेण्याचा निश्चय मोठा. तेव्हां सर्व सरदार आपले जमा करून त्यांजला आपासाहेब बोलले कीं, "किल्ला हस्तगत होत नाहीं, याजकरितां मजला तोफेचे तोंडीं बांधून माझें डोकें तरी किल्ल्यांत पाडावें, नाहीं तर किल्ला घ्यावा." तेव्हां सर्व सरदार यांणीं आपासाहेबांस सांगितलें कीं, "जो आपला निश्चय झाला तोच नेम आमचा आहे; परंतु कांहीं तरी किल्ल्यांतील भेद समजल्याशिवाय किल्ला हस्तगत होणें कठीण. यासाठीं याचा विचार करून कांहीं तरी मसलत काढली पाहिजे, मग दुसरा विचार किल्ला घेण्याचा ठरवूं. आधीं किल्यांतील भेद आणावा."

तेव्हां सर्वांनीं विचार करून खंडोजी माणकर[४८] यांस गुराखी करून त्यांणीं किल्ल्यांत जाऊन गुरें राखावयाची चाकरी पतकरिली. रोज किल्ल्यांत जाऊन

४५. तळा, घोंसाळा, अवचितगड व बिरवाडी हे सर्व किल्ले व त्यां खालचा मुलूख जंजिऱ्याच्या शिद्दीपासून घेतला. ( १७३५ ) ह्यावेळीं खुद्द बाजीराव कोंकणांत गेला होता. हे सर्व किल्ले हल्लीं माणगांव व रोहें ह्या तालुक्यांत येतात. ( जि० कुलाबा ) करनाळा, रेवदंडा, बेलापूर, व साष्टी हा मुलूख फिरंगी लोकांपासून घेतला. करनाळा, ता० पनवेल. बेलापूर, ता० साष्टी. रेवदंडा, ता० अलीबाग. साष्टी = ठाणें. इतका मुलूख घेण्यास बरींच वर्षें लागलीं. ४६. वेढा दिला. ता० १७ फेब्रुवारी १७३९ रोजीं वेढा दिला व ता० १६ मे रोजीं किल्ल्यावरील फिरंगी लोकांनीं किल्ला खालीं करून देण्याचें कबूल केलें. ४७. कामास आलें = लढाईंत पडलें. ४८. खंडोजी माणकर व वेंकटराव घोरपडे हे सरदार कोंकणांत पेशव्यांनीं ज्या लढाया केल्या त्यांत प्रसिद्धीस आले. माणकर यांचे वंशज माणगांव तालुक्यांत खरवली येथें राहतात. खरवली वगैरे गांव त्यांस इनाम आहेत.

लोकांचीं गुरें चारावयास न्यावीं, आणि फिरून किल्ल्यांत पावतीं करावीं, असा क्रम माणकर यांणीं चालविला. दुसरे *आंजुरकर पंचकळशे सुतार सरदार होते, त्यांणीं सुतार काम करावयास किल्ल्यांत जाण्याचें पतकरून रोज किल्ल्यांत जावें आणि लोकांचे घरीं सुतारकाम करावें. दुल्लबाजी §मोरे सरदार होते, त्याणीं कासारपणा पतकरून रोज किल्ल्यांतील लोकांचे बायकांस किल्ल्यांत जाऊन बांगड्या भरून बाहेर येत जावें.

याप्रमाणें तिघांनीं किल्ल्याचा भेद[४९] आणल्यावर आपले लष्करांतून सुरुंग खणून, किल्ल्याचे बुरुजाखालीं सुरुंग नेऊन, त्यांत दारूचे बुधले भरून बत्ती दिली. तेव्हां तो बुरूज उडाला तो मागती जागचे जागीं बुरूज बसला. नंतर दुसरा सुरुंग पाडावयास काम चालविलें. त्यासमयीं किल्ल्यांतील फिरंगी याची बायको जहाजांत बसून बाहेर निघाली. तें पाहून सरकारचीं जहाजें धांवून फिरंग्यांचें जहाज धरिलें आणि त्या बायकोस श्रीमंतांकडे आणिली, व ती बहुत देखणी, रूपवान होती म्हणून श्रीमंतांस दाखविली. त्यांणीं पाहून आपले लोकांस बोलले कीं, "ही कशाला धरून आणिली?" असें बोलून तिला साडी, चोळी नेसवून सोडून दिली. तेव्हां ती माघारी जाऊन आपले नवऱ्यास तिनें वर्तमान सांगितलें कीं, "तुम्ही त्याशीं कशासाठीं भांडतां? तो पुण्यवान आहे. मी तेथें गेलें असतां मला वांकडे दृष्टीनें पाहिलें देखील नाहीं, तेव्हां त्यांशीं लढून यश येईल असें दिसत नाहीं, व तुम्हांस दुसरेकडून कुमकही येत नाहीं" असा तिणें उपदेश + केला.

* आंजुरकर परशुराम नाईक सरपाटील यांचे वंशजाकडे आणजूर ( ता० भिंवडी ) हें गांव इनाम आहे. § मोरे किंवा मोडे? ४९ ह्या भेदाची तपशीलवार हकीकत कळली तर त्यापासून फायदा कसा झाला तें समजतें. ५०. चिमाजीआपा मोठा निश्चयी असून त्याचा मनोनिग्रह कांहीं विलक्षण होता, असें मस्तानीच्या व प्रस्तुतच्या उदाहरणा-वरून उघड होतें. शिवाजी महाराजांविषयींही असें एक उदाहरण आहे. अशा काळांत व लोकस्थितींत हे पुरुष शुक, भीष्म, मारुती यांचे अवतार होत असें कोणी म्हटल्यास शोभणार नाहीं असें नाहीं. + ही हकीकत ग्रांट डफ देत नाहीं. फिरंग्याची बायको हातीं लागली असतां श्रीमंतांनीं तिचा गौरव करून परत किल्ल्यांत पाठविली ही गोष्ट वसईचे किरिस्तांव लोक अजूनही मोठ्या आवेशानें सांगतात. वसईस पोर्तुगीज लोकांचा मुख्य सरदार सिलव्हेरा डी मिनेझिस् Silveira de Menezes हा होता. पण तो एका हल्ल्यांत पडल्यावर कपतन् डि सौझा पेरीरा De Souza Pereira हा त्यांचा मुख्य झाला. त्यानेंच शेवटीं नाइलाज झाल्यावर किल्ला खालीं करून देण्याचें कबूल केलें.

याजेंकरितां[५१] गलिमाशीं सल्ला करून, स्नेह ठेऊन, आपले खटल्यासुद्धां निघून जावें. याप्रमाणें ठरल्यावर फिरंगी यांणीं श्रीमंत यांजकडे बोलणारा पाठवून तह केला कीं, “ आमचे पदरीं कारकून आहेत त्यांचा सांभाळ आपण करावा आणि आमची जात आहे ; त्यांजला आपण हरऍक[५२] बेगार सांगूं नये; आणि आम्हांस आठ दिवसांची मुदत द्यावी, म्हणजे आम्ही आपला सरंजाम घेऊन जातों आणि किल्ला तुमचे हवालीं करितों. ” त्याजवरून आपासाहेब यांणीं कबूल करून त्यांचे पदरचे कारकून होते त्यांस दरसाल ३६ रुपये व पंधरा मण भात याप्रमाणें देऊं, त्यांजकडे कामकाज सांगणार नाहीं, व तुमचे जातीचे लोकांस बिगार सांगणार नाहीं, ” असें ठरल्यावर फिरंगी यांणीं आपली सर्व वस्तभाव सारें खटलें, आपले जहाजांत भरून किल्ल्यांतून निघून गेले. पुढें आपासाहेब यांणीं किल्ल्यांत शिरून भगवे झेंडे किल्ल्यावरतीं चढविले. वसईखालीं नवालक्षांचा मुलूख होता तितक्या मुलखाचा अंमल चालता केला. असा गुजराथ पावेतों अंमल बसवून श्रीमंत आपासाहेब मागती माघारे येऊन वसईवर मुक्काम केला. तेथें आल्यानंतर लढाईंत लोक जखमी झाले होते त्यांस कित्येकांस पालख्या दिल्या, व कित्येकांस गांव इनाम दिले. कित्येकांस जमिनी दिल्या. बौलपरवेशी[५३] पडलेले लोकांची चालविली. ज्याला संतती नव्हती त्याची नानपरवेशी[५४] चालविली, असा सारा बंदोबस्त करून शंकराजी केशव फडके यांजकडे वसई सरसुभा सांगितला. असा बंदोबस्त करून श्रीमंतांची स्वारी पुण्यास येऊन, बाजीराव साहेब यांस सारा मजकूर सांगून, साताऱ्यास जाऊन, शाहूमहाराज यांस भेटून, मुलूख सर केला हा मजकूर महाराजांस सांगून मागती चिमाजीआपा पुण्यास आले. वाड्याचा कारखाना चालला होता.

पुढें बाजीराव साहेब हिंदुस्थानांत मोहिमेस निघाले तेव्हां साताऱ्यास जाऊन महाराजांची आज्ञा घेऊन मोगलाईंतून वऱ्हाड प्रांतीं जावयाच्या उद्योगें चालिले. तेव्हां मोंगल यांणीं कटकट काढली त्याची लढाई करून

---

५१. मराठ्यांनीं पुष्कळ श्रम करून व जिवाची आशा न धरितां हल्ला करून बाहेरील तटबंदी फोडून आंत प्रवेश केला होता, हें मुख्य कारण होय. ५२. कोणतेंही वेठीचें काम सांगूं नये. ५३. बालपरवेशी, बाळपरवर्षा=लढाईंत पडलेल्या शिपायांच्या कुटुंबास दिलेला बैठा पगार, पेन्शन, गांव, जमीन इ० ५४. नानपरवेशी = लढाईंत मयत होऊन वंश नसेल तर बायकोच्याच निर्वाहापुरती देणगी.

मोंगल यांचा मोड झाला. त्या स्वारीला गंगथडीचे महाल मोंगलांपासून घेतले व खानदेशांत बऱ्हाणपूर[५५] शहर घेतलें. अशी स्वारी फत्ते करून पुढें श्रीमंत नेमाडांत उतरले. नेमाड मुलूख सर करून महेश्वर, मंडळेश्वर येथें अंमल आपला बसविला. तेथून निघून वऱ्हाडप्रांतीं येऊन चवथाई बाबती सरदेशमुखी यांचा ऐवज दोन चार वर्षांचा येणें राहिला होता तो ऐवज घेऊन, पुढें अंमल चालता करून, आणखी महालोमहालीं मामलेदार आपलेकडील ठेविले. इतका बंदोबस्त करून श्रीमंतांची स्वारी पुण्यास येऊन दाखल झाली. महिना दीड महिना पुण्यास मुक्काम करून, फिरून साताऱ्यास महाराजांचे भेटीस गेले. राजांस भेटून सारा मजकूर विदित करून पुढें विनंती केली कीं, " कर्नाटकास जाण्याची आज्ञा असावी."

पुढें बाजीराव महाराजांची आज्ञा घेऊन पुण्यास येऊन कर्नाटकांत[५६] जाण्याचे स्वारीची तयारी करून निघाले. प्रथम खानदेशांतून पंढरपूर वगैरे महाल सरकारांत घेऊन, आपला अंमल बसवून, पुढें विजापुरास जाण्याचा बेत करून स्वारी चालली. तेव्हां स्वारी चालतांना मोंगलाई महाल लागले त्यांच्या ठिकाणीं आपला चवथाई सरदेशमुखीचा अंमल यांची ठाणीं बसवून, आपलेकडील मामलेदार ठेवीत गेले. असे जातां जातां विजापुरास जाऊन, विजापूर घेऊन, तेथून माघारे फिरले ते मिरजेस येऊन लागले. मिरजेचा किल्ला मासपक्ष भांडला. शेवटीं कौलांत[५७] येऊन किल्ला श्रीमंतांस दिला. मिरजेखालीं मुलूख होता तितका सरकारांत घेतला. सारा मुलूख सर करून स्वारी करुंदवाडाकडून मुलूख घेऊन सोलापूर प्रांतीं जाऊन सोलापूर घेतलें. असा मुलूख घेऊन सारे मुलखाचा बंदोबस्त करून स्वारी साताऱ्यास येऊन सारा मजकूर महाराजांस समजावून फिरून हिंदुस्थानांत जाण्याची आज्ञा घेतली आणि निघून पुण्यास आले.

---

**५५**. ही मोहीम १७२४ सांपूर्वी ज्या तीन मोहिमा केल्या त्यांतील एक असावी. बऱ्हाणपूरच्या सुभेदाराचा निरनिराळे वेळीं बाजीरावानें पराभव केल्याचें ग्रांट डफ म्हणतो. तसाच दाउदखान ह्याचाही पराभव केला. हा दाउदखान माळव्याचे सुभेदाराकडून बाजीरावावर चालून आला होता. **५६** कर्नाटकांतील स्वारी—ही स्वारी १७२६ च्या सुमारास झाली असावी. या वेळीं श्रीरंगपट्टणपर्यंत गेले. ग्रांट डफ. कर्नाटकावर दुसरी एक स्वारी मराठ्यांनीं बाजीराव जिवंत असतां १७३९ मध्यें केली. पण खुद्द बाजीराव तींत नव्हता. **५७**. कौलांत येऊन = कांहीं अटीवर हवालीं करण्याचें कबूल करून.

पुण्यास घेऊन मुलूख सोडविला होता तेथें कामदार मामलेदार पाठविले. आणि हिंदुस्थानांत जाण्याची तयारी केली. ते औरंगाबादेवरून चालले तेव्हां नबाब निजामन्मुलुख यांणीं कटकट केली. त्या लढाईत मोंगलांचा मोड झाला. तेव्हां स्वारीखर्चाचा पैका घेऊन जुन्नर वगैरे मुलूख सरकारांत घेतला, व शिवनेरी किल्लाही नबाब यांजकडून घेतला आणि स्वारी खानदेशांतून नेमाडांतून नर्मदा उतरून *जांबाचा घाट चढून माळव्यांत आली. माळव्यांतील मुलूख सर केला. त्याचा अंमल बसवीत चालिले ते जाऊन उज्जनीस लागले. तेव्हां उज्जन जयसिंग राजे जयपूरवाले यांजकडे होती. त्यांणीं हें वर्तमान ऐकून जयसिंग राजे फौजेची तयारी करून श्रीमंतांवर चढाई करून आले. उभयतांची लढाई जुंपली. त्या लढाईत जयसिंग यांणीं पाहिलें तों बाजीराव यांचे मस्तकीं ईश्वराचें चक्र फिरतें. असें पाहून जयसिंग राजे यांणीं विचार केला कीं, "यांचे मस्तकीं ईश्वराचें चक्र रक्षण करतें, तेव्हां आम्हांस लढाईस आटोपतात असें दिसत नाहीं. त्यापेक्षां यांशीं तह करावा हें चांगलें." बाजीराव साहेब यांणींही जयसिंग राजे यांस पाहिलें तेव्हां श्रीमंतांस असें वाटलें कीं, "जयसिंग पुण्यवान, तेजस्वी आहे. हा आम्हांस आटोपतां दिसत नाहीं. तेव्हां याशीं समेट करावा तें उत्तम." असा विचार करीत आहेत, तों जयसिंग राजे यांजकडील वकील पेशवे यांजकडे बोलण्यास आले. परस्परें बोलणीं बहूत झालीं. त्या बोलण्यांत श्रीमंत यांचा मानस उज्जन घेण्याचा आहे असें समजून जयसिंग राजे यांणीं सांगून पाठविलें कीं, "आम्ही उज्जन येरवीं देत नाहीं; तुम्ही दान घेत असाल तर तुम्हांस देतों."

* जांबाचा घाट=हा विंध्याद्रीमधून जातो. इंदूरचे अलीकडे सुमारें ९ कोसांवर आहे. ५८. यास सवाई जयसिंग म्हणत. ह्यानें १६९९ पासून १७४३ पर्यंत राज्य केलें. याची व बाळाजी विश्वनाथाची दिल्लीस भेट झाली. तेव्हां बाजीरावाचीही त्याशीं ओळख झाली. पुढें बाजीरावाचा व जयसिंगाचा पत्रव्यवहार नेहमीं सुरू असे. हा जयसिंग मोठा ज्योतिषी असून साधारण सर्व विद्यांचाही भोक्ता होता. ज्योतिषशास्त्रसंबंधीं त्याचे ग्रंथ व कोष्टकें अद्याप सर्वमान्य आहेत. तो आपणाविषयीं सर्वदा तृतीय पुरुषीं लिहीत असे. त्याणें अश्वमेध यज्ञ करून आपल्याकडे ब्राह्मणांस भोजनें घातलीं. ( कर्नल टाड. ) असो ह्या वेळीं मराठ्यांस आड येणें व्यर्थ अशा समजुतीवर किंवा मराठ्यांशीं त्याचें आंतून सूत असल्यामुळें ( असा प्रकार असल्याविषयीं मुसलमानी ग्रंथकारांचा त्यावर आक्षेप आहे ) जयसिंगानें माळव्याच्या सुभेदारीचें काम बाजीरावाकडे देण्याविषयीं बादशाहाचें मन वळविलें. तरी मराठ्यांस माळवा इतक्या सलूख्यानें मिळाला नाहींच. ( माल्कम् ).

हें ऐकून श्रीमंतांनीं उत्तर सांगून पाठविलें कीं, "आम्हीं ब्राह्मण आहों दान घेण्यास आम्हांस प्रत्यवाय नाहीं." नंतर जयसिंग राजे यांची व श्रीमंतांची भेट झाली. परस्परें बोलणीं होऊन उज्जन श्रीमंतांचे हवालीं केली. मग श्रीमंतांची स्वारी पुढें चालली ते पुढें सुरंग, भेलसें, वगैरे मुलख सोडवून झांशी पावेतों सोडवून, झांशी घेऊन, झांशीचा मुलख सरकारांत घेतला. त्या झांशीचे कामावर कामदार ठेविले. पुढें स्वारी उदेपूर पावेतों जाऊन माघारे परतले. अशी स्वारी फत्ते करून माघारे पुण्यास आले.

पुण्यास आल्यानंतर इकडे दक्षिणेंत त्रिंबकराव दाभाडे हे राजाचे सेनापती मोठे जोरावर, फौजबंद, मोठे बंड होते. श्रीमंतांस मानीत नव्हते. तेव्हां बाजीराव साहेब फौजेची तयारी करून दाभाड्यावर चढाई करून गेले. दाभाड्याशीं व श्रीमंतांशीं मोठी लढाई झाली. दाभाडे आटोपत नाहींतसे झाले. तेव्हां फौजेंत फितूर केला आणि लढाई मोठी मातबर घेतली; त्या लढाईत दाभाडे यांचा मोड झाला. त्रिं[59]बकराव दाभाडे जखमा लागून लढाईत पडले. श्रीमंतांनीं सारी लूट केली. दौलत मुबलक सांपडली. त्यासमयीं दमा[60]जी गायकवाड हे दाभाडे यांचे घरीं चाकरीस होते. ते सरकारचे उपयोगीं पडले म्हणून दमाजी गायकवाड यांस श्रीमंतांनीं आपले जवळ चाकरीस ठेवून सरदारी सांगितली आणि आपले जवळ ठेविलें. तेव्हांपासून

---

५९. खंडेराव दाभाड्याचा पुत्र. त्रिंबकरावाचें बाजीरावाशीं बरेच दिवस वांकडें होतें. त्यांत निजामानें त्यास चिथावून मदत करण्याचें कबूल केलें. तें बाजीरावास कळतांच त्याणें दाभाड्याशीं सलुखाचें बोलणें लाविलें. परंतु त्याचे जवळ फौज पुष्कळ असल्यामुळें व निजामाचा आश्रय मिळाल्यामुळें तो ऐकेना. शेवटीं डुभई व बडोदें यांच्यामध्यें (सुमारें ता० ३ एप्रिल १७३१) दोघांची लढाई झाली. दाभाड्याची फौज ३५ हजार होती व त्याजकडे पिलाजी गायकवाड, कांताजी व रावोजी कदम बांडे, उदाजी आनंदराव पवार, च्मिणाजपिंत व कुवरबहादर (?) असे मोटमोठे सरदार मिळाले होते. प्रतिपक्षाची फौज १५–१६ हजार होती. दाभाडे हत्तीवर बसून आपले लोकांस धीर देत देत भांडत होता व बाजीराव घोड्यावर स्वार होऊन आपले स्वारांस पुढें नेत होता. शेवटीं त्रिंबकरावास गोळी लागून तो पडला. ग्रांट डफ. बाजीरावानें त्रिंबकरावाच्या मरणानंतर त्याचा भाऊ यशवंतराव यास सेनापतीचीं वस्त्रें देवविलीं व तो लहान होता म्हणून सर्व कारभार उमाबाईनें (त्रिंबकरावाच्या आईनें) चालवावा असें ठरवून पिलाजीस त्याचा मुतालीक नेमलें. ६०. 'दमाजी' चे बद्दल 'पिलाजी' असें असावें. गायकवाडाचें घराणेः—

गायकवाड सरकारचे चाकर झाले. नंतर वाड्याचें काम पुरें झालें. शहर मोठें वसविलें. नंतर गुजराथ प्रांतीं स्वारी सरकारची निघाली आणि सुरतेपावेतों सरकारचा अंमल बसला. सुरतवाला नबाब याणें लढाई केली. परंतु शेवट खालीं हारीस येऊन तह करून सुरतेखालचे अठ्ठावीस महाल सरकारांत दिले. तेथून स्वारी पुढें चालली. सारी गुजराथ सर करून अमदाबाद शहर घेऊन, काठेवाडांत अंमल बसवून द्वारकेपावेतों अंमल चालता केला[६१] अशी गुजराथ सर करून श्रीमंतांची स्वारी माघारी फिरली. त्यासमयीं अहमदाबादेस सरकारचा सरसुभा ठेविला. त्याणें द्वारके पावेतों अंमल करावा. दमाजी गायकवाड समागमें होते त्यांजला गुजराथेंत पाऊण कोटीचा मुलूख देऊन बडोदें त्यांस रहावयास दिलें. त्याच्या पुढें गुजराथेंत

---

दमाजी व जनकोजी हे दोघे बंधू. पैकीं खंडेराव सेनापतीच्या शिफारशीवरून दमाजीस 'समशेर बहादर' हा किताब शाहू राजानें दिला. तो बाळापूरच्या लढाईंत लौकिकास चढला. दमाजी १७२१ सालीं मृत्यू पावल्यावर त्याचा पुतण्या म्हणजे जनकोजीचा पुत्र पिलाजी ह्यास त्याचें पद प्राप्त झालें.

पिलाजी ( खून १७३२. )
|
दमाजी ( मृत्यू १७६८. )
|
- सयाजी ( वेडा. मृत्यू १७९२. )
- गोविंदराव ( मृत्यू १८००. )
  - आनंदराव ( मृत्यू १८१९. )
  - सयाजी ( मृत्यू १८४७. )
    - गणपतराव ( मृत्यू १८५६. )
    - खंडेराव ( मृत्यू १८७०. )
      - सयाजीराव ( दत्तक. )
    - मल्हारराव ( पदच्युत १८७५ )
- मानाजी ( मृत्यू १७९३. )
- फत्तेसिंग ( मृत्यू १७८९. )

**६१.** गुजराथेचा सुभेदार सर बुलंदखान यास मराठे लोकांस चौथाई व सरदेशमुखी द्यावी लागली. अहमदाबाद सन १७५३ सालीं मराठ्यांच्या हातीं आली. ग्रांट डफ.

जें उत्पन्न होईल तें निमें गायकवाडाचें व निमें सरकारचें हा ठराव झाला. सुरतेखालच्या अठ्ठावीस महालांपैकीं चवदा महाल सरकारांत ठेवून चवदा गायकवाड यांस दिले. असा गुजराथेचा बंदोबस्त करून स्वारी पुण्यास आली. कर्नाटक प्रांतीं धारवाडपावेतों सरकारचा अंमल बसवून धारवाड किल्ला सरकारांत घेतला. असें राज्य काबीज करून स्वारी पुण्यास आली. राज्य चालूं लागलें.

पुढें मस्तानी कलावंतीण आणली होती तिच्याशिवाय श्रीमंतांस चैन पडेनासें झालें. तिचें वेड भारीच लागलें. तिला घेऊन बाजीराव साहेब साताऱ्यास गेले. शाहू महाराज यांच्या भेटी झाल्या. सारा मजकूर राजांस विदित केला. परंतु वेड सारें कलावंतिणीचें! तिच्या शिवाय अगदीं एक घटका चैन नाहीं. साताऱ्यास मुक्काम दोन चार महिने केला. त्या समयीं सौभाग्यवती *राधाबाईचें नांव घेतनासे झाले. अहोरात्र कलावंतिणीशीं लंपट होऊन राहिले. हें वर्तमान शाहू महाराज यांस समजलें. तेव्हां बाजीराव यांचे स्नेही साताऱ्यास जोशी व अनगळ हे मोठे सावकार त्या वेळेस होते त्या उभयतांस महाराज यांणीं बोलावून सांगितलें कीं, "तुम्हीं उभयतां बाजीराव यांजकडे जाऊन त्यांस सांगावें कीं, तुम्ही येथें चार महिने असून दरबारांत एक दोन वेळां आलां, एरव्हीं आठही प्रहर कंचेनीस[६२] घेऊन पडतां ही गोष्ट नीट नाहीं. यामुळें तुमचें पद तुम्हांस देणार नाहीं. शुद्धीवर आलां तर चांगलें." असें जोशी व अनगळ यांजपाशीं सांगून त्यांजला बाजीराव यांजकडे पाठविलें. तेव्हां ते उभयतां बाजीराव यांजकडे येऊन त्यांची भेट घेऊन शाहू महाराज बोलले हा मजकूर त्यांस विदित केला. खेरीज अनगळ व जोशी यांणींही बहुत फजीत केलें. तेव्हां श्रीमंतांनीं उभयतांपाशीं करार केला कीं, "मी आतां पहिले चालीप्रमाणें चालतों; परंतु ही मला सुटेल असें घडत नाहीं." मग उभयतांनीं येऊन महाराजांस मजकूर विदित केला. महाराज "बरें आहे" म्हणून बोलले. नंतर बाजीराव साहेब आठ पंधरा दिवस तेथें राहून, नित्य दरबारास येऊन, महाराजांची आज्ञा घेऊन पुण्यास आले.

---

* राधाबाई हें नांव बाळाजी विश्वनाथाच्या कुटुंबाचें म्हणजे बाजीरावाच्या आईचें होय. बाजीरावाच्या कुटुंबाचें नांव काशीबाई हें होय. ही बखरकाराची धडधडीत चुकी आहे. ६२. कंचनी=वेश्या.

† नंतर राधाबाई यांचे पोटीं तीन पुत्र झाले. वडील पुत्र बाळाजी बाजीराव; त्यांच्याहून धाकटे रघुनाथ बाजीराव, त्यांच्याहून धाकटे जनार्दन बाजीराव, अशी संतती झाली. मस्तानीच्या पोटीं एक पुत्र समशेर बहादर झाला. बाळाजी बाजीरावादि तिघां पुत्रांचे व्रतबंध झाले. पुढें त्यांचीं लग्नें केलीं. वडील पुत्रास रास्ते यांची कन्या केली. जनार्दन बाजीराव यांचें लग्न केलें ते धाकटेपणींच लग्न झाल्यावर मृत्यू पावले. रघुनाथ बाजीराव यांस बर्वे यांची कन्या केली. अशीं त्यांचीं लग्नें झालीं. मस्तानी कलावंतिण इजला सरकारच्या वाड्यांत जागा वेगळी राहाण्यास बांधून दिली. असें राज्य जोरावर होऊन पुढें हिंदुस्थानांत जावयाची तयारी केली. चिमाजीआपा यांस एक पुत्र सदाशिव चिमणाजी झाले.

असें राज्य करीत असतां पुढें बाजीराव हिंदुस्थानांत जाण्यासाठीं निघाले. परंतु औरंगाबादप्रांतीं महाल होते तेथें अंमल सरकारचा बसला नाहीं. कारण नबाब निजामन्मुलूख औरंगाबादेस राहात होते. सबब अंमल सुरळीत न बसून तेथील पैका सरकारांत न येई. प्रयत्न बहुत केला, परंतु अंमल सुरळीत न चाले. तेव्हां पिलाजी जाधवराव यांनीं श्रीमंतांस विनंती केली कीं, "औरंगाबाद प्रांतींचे महाल येथील बाबती सरदेशमुखीचा अंमल व मोकाशाच्या सनदा मला करून दिल्यास मी तेथील अंमल बसवितों." असें ऐकून श्रीमंतांनीं गोष्ट कबूल केली आणि जाधव यांस सांगितलें कीं, "महालानिहाय येथील मोकाशे तुमचे फौजेचे खर्चास लावून देतों. बाबती सरदेशमुखी या अमलाची मामलत तुम्हांकडे सांगतों. त्याची रसद तुम्हीं सरकारांत द्यावी." ती गोष्ट पिलाजी जाधवराव यांणीं कबूल केली. नंतर त्या प्रांतींच्या सनदा जाधवराव यांस करून दिल्या. जाधवराव औरंगाबाद प्रांतीं जाऊन मोठी कष्टी मेहनत वर्ष दीड वर्षपर्यंत केली. घोड्यास नाल उलटे[६३]

† "नंतर ......... पुत्र झाले" हें बरोबर दिसत नाहीं. "नंतर पुत्र झाले ते सांगतों" असें घेऊन 'नंतर' ह्या क्रिया विशेषणाचा संबंध सांगतों ह्या क्रियापदाकडे घेतला पाहिजे; कारण नानासाहेब याचा जन्म शके १६४३ म्हणजे इ० स० १७२१, रघुनाथराव यांचा जन्म शके १६५६ म्हणजे इ० स० १७३४. जनार्दन बावा यांचा जन्म शके १६५७ म्हणजे इ० स० १७३५ ह्या सालीं झाल्याविषयीं दाखले सांपडतात.

६३. उलटे म्हणजे पुढील भाग मागें करून; पाठलाग येईल तो टाळतां यावा म्हणून?

बांधून दोन महिने घोड्याचें खोगीर उतरलें नाहीं, अशी मोठी मेहनत केली. तेव्हां अंमल औरंगाबादेसभोंवता बसला. शहरच्या दरवाजावर जाधवराव यांची चौकशी बसली. जकातींत अंमल घेत जावा असा तह झाला. तेव्हांपासून पिलाजी[६४] जाधवराव त्या महालाचा अंमल करूं लागले. पुढें बागलाण सर केलें. बागलाणांत अंमल चालू झाला. वऱ्हाडांत वर्धा नदीपावेतों पेशवाई अंमल बसला. खानदेश मागेंच घेतला आहे. आशेरी किल्ला नबाबापासून सरकारांत घेतला. असें राज्य जोरावर झालें. बाजीराव साहेब यांणीं बहुत पराक्रम करून बहुत मुलूख सोडविला व राज्यही वीस वर्षेपर्यंत चांगलें केलें.

हिंदुस्थानांत मुलूख सोडविला तेव्हां मल्हारराव होळकर † जनकोजी शिंदे यांस फौजेचे सरंजामास हिंदुस्थानांत मुलूख नेमून दिला व कांहीं स्वदेशांत दिला. त्या समयीं शिंदे यांनीं श्रीमंतांपासून उज्जन मागून घेतली. तसेंच होळकर यांणीं सरकारांत विनंती करून महेश्वर व इंदूर ह्या जागा मागून घेतल्या[६५]. असें राज्य सुरळीत चालूं लागलें.

पुण्यापाशीं तळेगांव ढमढेऱ्याचें. तेथील ढमढेरे पाळेगार होते. त्यांजवर दौड पाठवून तो गांव सरकारांत घेतला. ढमढेरे यांचें बंड मोडून टाकिलें. असा सारा बंदोबस्त करून श्रीमंतांची स्वारी हिंदुस्थानांत जाण्याविषयीं तयारी करूं लागली. त्या वेळेस नानासाहेब हे १५।१६ वर्षांचे

---

६४. मागें एकदां बाळाजी विश्वनाथाच्या पाठीमागें सेनापतीचे स्वार लागले असतां तो आपल्या पुत्रा.सह एका झाडींत लपून बसला. तेथें दोन शिलेदारांनीं पांडवगड येथें त्यास पोहोंचविण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें कांहीं स्वार त्यांनीं जमवून, शत्रूंशीं लढत लढत, त्याजला पांडवगडास सुखरूप नेलें. त्या दोन शिलेदारांपैकीं हा एक पिलाजी जाधव. हा माळव्यांतही बाजीरावाच्या तर्फे लढत होता. †बखरींत "जनकोजी" असें आहे, पण ती चुकी आहे. राणोजी किंवा जयापा असें पाहिजे. जनकोजी हा जयापाचा मुलगा. हा ह्या वेळीं फार लहान असावा; कदाचित् जन्मला देखील नसेल. असो, ह्या बखरींत नांवाच्या संबंधानें बऱ्याच चुक्या आहेत. पिलाजीच्या ठिकाणीं दमाजी गायकवाड. कोणत्याही दक्षिणच्या सुभेदाराबद्दल निजामउल्मुल्क. राणोजीच्या ठिकाणीं जनकोजी. हैदराच्या बदल टिपू वगैरे विपर्यास दृष्टीस पडतात. ६५. होळकर व शिंदे यांचीं घराणीं:—

झाले[६६]. बाजीराव साहेब हिंदुस्थानांत जावयास निघाले त्या समयीं मस्तानीला बरोबर घेतली. अगोदर शिंदे होळकर यांस हिंदुस्थानांत मुलूख दिला त्या वेळेस सरकारची फौज हिंदुस्थानांत राहावी असा नेम तेव्हांच झाला होता. त्याप्रमाणें सरकारची फौज राहूं लागली. तिन्ही फौजा मिळून दोन लाख फौज नेहेमीं राहून हिंदुस्थानचा बंदोबस्त ठेविला. त्याप्रमाणें गुजराथचा बंदोबस्त गायकवाड यांणीं व सरकारचे सरसुभे यांणीं राखावा. हिंदुस्थान प्रांतीं खंडण्या वगैरे मुलूख नवा घेणें असें झालें तर त्याचे तीन हिस्से बराबर व्हावे. असा नेम पूर्वींच हिंदुस्थान काबीज केलें तेव्हांच ठरला. त्याप्रमाणें तिन्ही फौजा त्या नियमाप्रमाणें चालूं लागल्या.

---

मल्हारराव होळकर ( मृत्यू १७६६. )
स्त्री गौतमाबाई.

खंडेराव ( मृत्यू १७५४. ) स्त्री अहल्याबाई. दत्तक पुत्र तुकोजी (मृत्यू १७९७.)

मालेराव ( मृत्यू १७६७. ) मुक्ताबाई

काशीराव. ( खून १८०६. ) मल्हारराव ( पुण्यास मारामारींत पडला. १७९७. ) यशवंतराव. विठोजी ( हत्तीचे पायीं १८००. )

खंडेराव ( खून १८०६ ) → मल्हारराव ( मृत्यू १८३३. )

हरीराव ( १८३३–४३. )

खंडेराव दत्तक ( मृत्यू १८४४. )

तुकोजीराव ( दत्तक. मृत्यू ता० १७ जून सन १८८६. )

शिवाजीराव ऊर्फ बाळासाहेब.

सवाई तुकोजीराव.

६६. म्ह० इ०स० १७३५–३६ मध्यें.

इकडे बाजीराव साहेब हिंदुस्थानांत जाण्यासाठीं निघाले ते औरंगाबादे-वरून चालले. तेव्हां मोंगल यांणीं कटकट काढली. त्यासमयीं तेथें राहून मोंगलाशीं लढाई घेऊन मोंगलांचा मोड झाला. त्यासमयीं स्वारीखर्च घेऊन पांसष्ट लक्षांचा मुलूख घेतला. आणखी दौलताबाद किल्ला मोंगल यांणीं तहामध्यें सरकारांत दिला. नंतर स्वारी सरकारची पुढें चालली. ती नर्मदेपावेतों गेली. नर्मदेच्या तीरीं मुक्काम जाहला. तेव्हां श्रीमंतांचे शरिरास विकृती झाली. यामुळें तेथेंच मुक्काम झाला. दिवसें दिवस शरीर क्षीण झालें. ते मौजे

---

राणोजी शिंदे ( मृत्यू १७४५. )
स्त्री मैनाबाई ( निंबाबाई )

चिमाबाई
( रजपुतणी राख )

राणोजी व मैनाबाई यांचे पुत्र:

- जयाप्पा. (नागोरास खून.)
  - जनकोजी. (१७६१ पाणिपत.)
- दत्ताजी. (रदबर येथें दिल्ली-नजीक लढाईत पडला ).
- जोतिबा. (कुंभेरीस मृत्यू.)

चिमाबाई यांचे पुत्र:

- तुकोजी.
  - केदारजी
  - आनंदराव.
    - दौलतराव. (महादजीस दत्तक दिला.) मृत्यू १८२७.
      - जनकोजी ( दत्तक. ) ( मृत्यू १८४३. )
        - भगीरथराव ऊर्फ जयाजी शिंदे ( दत्तक. मृत्यू ता० २० जून १८८६. )
          - माधवराव ऊर्फ भय्यासाहेब.
- महादजी. ( मृत्यू १७९४. )

६७. मोंगलाशीं लढाई—नाझिरजंग, निजामाचा मुलगा ह्या वेळीं भांडत होता. निजाम दिल्लीसच होता. इसवी सन १७४०. हा तह मुंगीपैठण येथें झाला. त्या वेळीं नर्मदेच्या तीरचे हांडें व खरगोण हे प्रांत पेशव्यांस दिले.

* कलमडें परगणें *रावेर या ठिकाणीं वैशाख शुद्ध १३, शके १६६२, त्या दिवशीं श्रीमंत बाजीराव साहेब कैलासवासी झाले.

---

# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब.

## इ० स० १७४०-१७६१.

[ श्रीमंत बाजीराव साहेब कैलासवासी झाले.] तें वर्तमान पुण्यास कळल्यानंतर तेरा दिवसपर्यंत तो विधी उरकून§ चिमाजीआपा पाठीमागें होते, त्यांणीं बाळाजी बाजीराव यांस समागमें घेऊन, साताऱ्यास जाऊन, श्रीमंत शाहू महाराज यांची भेट घेतली, आणि सर्व मजकूर विदित केला. त्यावरून शाहू महाराज यांणीं बाळाजी बाजीराव यांस पेशवाईचीं वस्त्रें देऊन शिक्के कटार हवालीं ‡ केली. आणि त्यासमयीं महाराज यांणीं नानासाहेब यांस आज्ञा केली जे, "आतां राज्याचा बंदोबस्त चांगला राखावा." असें सांगून निरोप दिला. महाराजांची आज्ञा घेऊन श्रीमंतांची स्वारी पुण्यास आली. राज्य करूं लागले.

पुढें नानासाहेब यांचे चित्तांत असें आलें कीं, "वडिलांनीं सर्व पृथ्वी कर्नाटक, हिंदुस्थान व गुजराथ व स्वदेश, खानदेश, बागलाण, गंगथडी, भिवरथडी वगैरे मुलूख मोंगलाईतून घेऊन स्वराज्य केलें; इकडे वसईपावेतों मुलूख काबीज केला; परंतु दक्षिण कोंकण येथें आपला अंमल चालत नाहीं,

---

* नर्मदा तटाकीं हीं दोन्हीं स्थानें खानदेशांत आहेत. येथें त्यांचे दहनस्थानीं वृंदावन आहे म्हणून कळतें. ६८. इ० स० १७४० एप्रिल ता० २५ या वेळेस बाळाजी व चिमणाजीआपा हे दोघेही कोंकणांत होते.

§ 'तो विधी उत्तर [ कार्य ] केलें' असा एका प्रतीचा पाठ आहे. ‡ बाजीरावाच्या पदारोहणास जसा श्रीपतराव प्रतिनिधी आडकाठी आणीत होता तसा बाळाजीच्या पदारोहणास रघुजी भोंसला आडकाठी आणीत होता. त्याणें बारामतीकर बापूजी नाईक यांस पेशवाईचें पद द्यावें अशी शाहूस शिफारस केली. शेवटीं ता० २५ जून १७४० रोजीं चिमणाजीआपाच्या यत्नानें बाळाजीस वस्त्रें प्राप्त झालीं.

सारे कोंकणांत सांवतांचे वाडीपावेतों आंगरे अंमल करितात हें नीट नाहीं." अशी मसलत मनांत आणून सरकारची स्वारी घाटाखालीं उतरून आपला अंमल रायगडाचे पलीकडून बसवीत चालले. सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरीपावेतों स्वारी सरकारची गेली. त्या वेळेस तुळाजी[1] आंगरे येऊन श्रीमंतांस भेटले; त्या समयीं श्रीमंतांनीं आंगरे यांस शाहू महाराज यांची आज्ञा सांगितली. त्याजवरून सारें कोंकण साळशी, देवगडपावेतों श्रीमंतांचे हवालीं केलें, आणि आंगरे निघून कुलाब्यास गेले. श्रीमंतांनीं तमाम तालुक्यानिहाय किल्लोकिल्लीं †हवालदार व * सरनौबत वगैरे माणसें विश्वासू धाडून किल्ल्यांवरून ठेविलीं. तालुकेनिहाय मामलेदार आपले सरकारचे ठेविले. § दरकदार, फडणीस, पोतनीस, मुजुमदार, दप्तरदार, दिवाण, हाशमनीस, सबनीस, कारखाननीस असे किल्लोकिल्लीं तालुकेनिहाय ठेवून मामलेदारही ठेविले. असा कोंकणचा झाडून बंदोबस्त करून स्वारी संगमेश्वराहून मळ्या घांट चढून साताऱ्यास येऊन दाखल झाली. श्रीमंत शाहू महाराज यांची भेट झाली. कोंकणचा झाला मजकूर महाराजांस विदित केला. तें ऐकून महाराजांची मर्जी संतोष झाली.

---

१. बाजीरावाच्या मृत्यूच्या वेळीं नानासाहेब आंग्रयांशीं लढत होता. पण त्यांत तुळाजी मुख्य नव्हता. या (१७४०) स्वारींत तुळाजीस कैद केलें होतें. पण पुढें बाजीराव मृत्यू पावल्याची खबर कळल्यावर चिमाजीआपा व नानासाहेब हे दोघेही पुण्यास जाऊन मग साताऱ्यास गेले व तुळाजीस मुक्त केलें. इ० सन १७५५–५६ च्या स्वारींत तुळाजीस विजयदुर्ग येथें कैद करून सोलापूरच्या किल्ल्यांत ठेविलें. तेथें तो मरण पावला. ह्या स्वारींत इंग्रजांनीं मदत केली व सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग त्यांच्या आरमारानें घेतले. ग्रांट डफ. † हवालदार=सुभेदारच्या हाताखालचा एक अधिकारी. याणें महालचा वसूल करून सुभेदाराकडे पाठवावा व लहानसहान फिर्यादींचा निकाल करावा. किल्ल्यावरील एका कामगारास हवालदार ही संज्ञा आहे. याचें काम चौक्या पहारे नेमणें वगैरे. * सरनौबत=हवालदाराच्या हाताखालचा एक कामगार. याजकडे नौबतींचा वगैरे अधिकार. § दरकदार=पोतनीस, फडणीस, चिटणीस वगैरे अधिकारी. पोतनीस=खजिनदार. फडणीस=सरकारी कामगारांचें जें लिहिणें त्यावरील मुख्य अधिकारी. सनदा वगैरे देण्याचें व सर्व खात्यांतील हिशेबाची देखरेख करण्याचें काम याजकडे असे. हाशमनीस=शिबंदी वगैरे शिपाई लोकांची हजेरी व हिशेब ठेवणारा. कारखाननीस=कोणत्याही कारखान्यावरील (फरासखाना, जिनसखाना, अंबरखाना, इ०) कामगार. त्यानें त्या त्या कारखान्याकडील हिशेब वगैरेची देखरेख ठेवावी.

मग महाराजांचा निरोप घेऊन पुण्यास स्वारी आली. नंतर वाड्याचा कारखाना चालू होता. तेव्हां वाडा मोठा मजबूत, बाहेरून तट संगीन, असें असतां पाणी आंत चांगलें प्यावयाजोगें नाहीं. त्या समयीं श्रीमंत नानासाहेब यांचे मनांत आलें कीं, नवें पाणी आंत नळ बांधून आणावें. अशी मनांत मसलत योजून चारचार कोस पांचपांच कोस सभोंवते कारकून पाणी पाहावयास पाठविले. ते सर्व पाहून माघारे आले. कातरज गांव इकडे जे गेले होते त्यांणीं श्रीमंतांस विनंती केली कीं, "कातरजेच्या तळ्यांत पाणी मुबलख आहे. तें पाणी उन्हाळीं देखील आटावयाचें नाहीं असें आमचे कल्पनेनें वाटतें. मग सरकारचे मर्जीस येईल तें खरें." अशी विनंती त्यांची ऐकून खांसा स्वारी पाहावयास निघाली. तेथें जाऊन पाणी सरकारानीं पाहिलें. ते दिवस उष्णकाळाचे. त्याकाळीं त्या पाण्याला दहा पांच मोटा अखंड अहोरात्र आठ दिवसपर्यंत चालवून पाहिल्या; परंतु तसूभर कमी झालें नाहीं. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन बेत झाला कीं, येथील पाणी नळ बांधून पुण्यास न्यावें. असा निश्चय होऊन गवंडी, पाथरवट बलावून नळास काम लाविलें. कातरजेपासून पुण्यांत काळेवावरांत नळ येई तेथपर्यंत संगीन चिरेबंदी नळ बांधून आणिला. तो असा आणिला कीं, त्या नळांतून कातरजेपासून काळेवावरपावेतों घोड्यावर बसून स्वार यावा. असा संगीन नळ चिरेबंदी बांधून आणिला. पुढें लहान केला. त्या समयीं वाड्यांत पाणी आणावयाचें तें कसें येतें ? वाड्याभोंवता संगीन तट चिरेबंदी. त्या वेळेस त्या वाड्याच्या कामावर गवंडी होते त्यांस बलावून आणून विचारिलें कीं, "पाणी वाड्यांत आणावयाचें याची तजवीज कशी करावी ?" तेव्हां गवंडी यांनीं सरकारास विनंती केली कीं, "हा विचार पूर्वींच आम्हांला समजला होता. एवढा वाडा बांधतात ते पाणी बाहेरून नवें आणतील, असा निश्चय करून गणेशदरवाज्याजवळ बुरुजामध्यें खजीना करून ठेविला आहे." असें ऐकतांच सरकारची मर्जी खूष होऊन, खजीना पाडून, गवंड्यास गांव इनाम दिला. मग पाणी आणून, त्या खजिन्यांत सोडून वाड्यांत पाणी खेळविलें.*

---

* नळ बाजीराव बल्लाळ यांच्या कारकीर्दींत बांधून आणिला असें कित्येक म्हणतात. ह्या तलावावर "खांसास्वारी बाजीरावांची" ११ दिवस जाऊन राहिली होती व तेथें १० मोटा रात्रंदिवस एकसारख्या ११ दिवस चालविल्या पण पाणी १ तसू देखील कमती झालें नाहीं. अशी परीक्षा करून नळ आणिला. तो प्रथम खापरी होता. पुढें बाळाजी बाजीराव यांनीं दगडी बांधिला. (पुणें शहरचें वर्णन.)

पुढें श्रीमंतांनीं बाहेर जाण्याची तयारी करून स्वारी डेऱ्यास दाखल झाली. तेथून तमाम फौज जमा करून हिंदुस्थानप्रांतीं जाण्याची तजवीज करून निघाले ते मजल दरमजल हिंदुस्थानप्रांतीं चालले. ते नेमाड, माळवा टाकून हिंदुस्थानांत स्वारी आली. तेथें राजेरजवाडे यांजपासून खंडण्या घेऊन उदेपुरावरून दिल्लीस येऊन दाखल झाले. तेथें † दिल्लीभोंवतीं मोठी धामधूम केली त्या समयीं बादशाहा यांणीं घासदाणा[२] फौजेस देऊन आणखी कांहीं मुलूख देऊन, तह करून, वाटेस लाविलें. ते ग्वालेरीस येऊन ग्वालेरीचा किल्ला घेतला. त्याच्या खालीं मुलूख नरवर वगैरे महाल घेऊन, अंमल बसवून, स्वारी[३] माघारी फिरली ती मग पुण्यास येऊन दाखल झाली. साताऱ्यास जाऊन शाहू महाराज यांची भेट घेतली. स्वारीचा झाला मजकूर महाराजांस समजावून, राजे यांची आज्ञा घेऊन श्रीमंत पुण्यास आले.

नंतर नानासाहेब यांचे चित्तांत आलें कीं, बाहेरून मोठमोठीं शहरें आहेत, त्या शहरांभोंवते तट सभोंवते बांधलेले आहेत, तसा तट आपले शहरास बांधावा. असें मनांत आणून ‡ शहर-पन्हा बांधावयास काम लाविलें. तें नाकझरीपासून चिरेबंदी शहर-पन्हा बांधावयास प्रारंभ केला. तो बांधीत चालिले. तट मोठा संगीन दाहा हात रुंदीचा असा बांधीत चालिले. हें वर्तमान साताऱ्यास शाहू महाराज यांस समजलें. त्या समयीं श्रीमंत नानासाहेब यांस बोलावूं पाठवून साताऱ्यास नेलें आणि राजे यांणीं श्रीमंतांस सांगितलें कीं, “ तुम्ही आतां शहरास गांवकुसूं घालून राज्य करणार, तेव्हां तुमचा पराक्रम समजला ! ज्यांचे छातीचा कोट नाहीं, त्यांस या कोटानें काय होणार ?

---

† दिल्लीभोंवतीं धामधूम केल्याचें ग्रांड डफ कांहीं लिहीत नाहींत. उलटें असें म्हणतात कीं, त्या वेळेस बादशाहाची व पेशव्याची सलूखीचीं बोलणीं चाललीं होतीं. माळव्याच्या सुभ्याबद्दल पेशव्यानें चार हजार स्वार ठेवून चाकरी करूं व लागतील त्या वेळेस बादशाहाच्या खर्चानें आणखी ८ हजार देत जाऊं असें आपणांस बांधून घेतलें. २. घासदाणा= चौथाई व सरदेशमुखी खेरीज कांहीं मराठे सरदारांनीं आपल्याच अधिकारानें वसूल केलेला एक कर. ३. ही स्वारी १७४२–४३ सालांतील. नर्मदेपर्यंत जाऊन पर्जन्यकाळीं नानासाहेबांनीं तेथेंच मुक्काम केला. पुढें रघूजी भोंसले बंगाल्यांत फार धामधूम करीत होते त्यांस मागें हटविण्याकरितां बादशाहानें नानासाहेबास तिकडे पाठविलें, व रघुजीचा पराभव झाल्यावर माळव्याची सुभेदारी नानासाहेबास बादशाहानें दिली. ‡ शहर-पन्हा=शहरची तटबंदी.

छातीचा कोट करून राज्य करावें." अशी महाराजांची आज्ञा होतांच गांवकुसाचें काम बंद केलें.

पुढें स्वारी कर्नाटकांत जाण्याचा बेत केला. आणि महाराजांची आज्ञा घेऊन पुण्यास श्रीमंतांची स्वारी दाखल झाली. आणि कर्नाटकांत जाण्याची तयारी करून डेरे दिले. तमाम सरंजामी लोक जमा करून स्वारी कर्नाटकांत नानासाहेब दरकूच चालिले. ते जाऊन सावनूरास लागले. लागून शहरास शह दिला. तेव्हां सावनुरामध्यें नबाब होता. त्याणें आठ पंधरा दिवस सावनूर लढविलें. शेवटीं सल्ला केला. सावनूर श्रीमंतांनीं घेतलें. सावनूरवाला नबाब यास पन्नास हजारांचा मुलूख देऊन त्याचें संस्थान राखिलें, बाकी मुलूख सरकारांत घेतला. तेथें सुभा ठेवून स्वारी सरकारची माघारी आली.

पुण्यास आल्यानंतर श्रीमंतांचे मनांत आलें कीं, अहमदनगर किल्ला एवढाच टापू मध्यें राहिला आहे; हा किल्ला सरकारांत घ्यावा. असा मनसुबा करून स्वारी तयार करून बाहेर निघाले ते नगरास येऊन नगराभोंवता शह देऊन उतरले. महिना दोन महिने शह देऊन राहिले. किल्ला म्हणजे हस्तगत होतो असें नाहीं. तेव्हां श्रीमंतांचे मनांत आलें कीं, फितुराशिवाय किल्ला यावयाचा नाहीं. असें मनांत येऊन किल्ल्यामध्यें कविजंग किल्लेदार मोंगलाकडील होता त्याशीं बोलणें लाविलें कीं, "किल्ला आमचे स्वाधीन केला असतां तुम्हांस ४०,००० चाळीस हजारांची जहागिरी इनाम करून देतों हेंच पक्कें मनांत तुम्हीं आणावें. तुम्हीं किल्ला न दिला असतां आम्ही किल्ला घेतल्याशिवाय माघारे फिरणार नाहीं हें पक्कें समजून ठेवणें." तेव्हां त्या किल्लेदारांनीं विचार केला कीं, "पेशवे म्हणतात ही गोष्ट खरी आहे.

† असें भाषण सखारामबापू यांणीं सदाशिवराव भाऊ यांस करून शत्रू इतका जवळ येण्यापूर्वीं तुम्हीं बातमी ठेवून तो इतका लगत न येई अशी तजवीज ठेवावी, असा त्यांस उपदेश केल्याचें कोणी सांगतात. कोणी बखरींत लिहिल्याप्रमाणें महाराजांनींच हा बेत नाकारिला असें म्हणतात. महाराज म्हणाले, "कुसूं खेडेगांवला जेथें प्रभू नाहीं अशा ठिकाणीं बांधावें. येथें तुम्ही सिंहासारखे शूर असतां शहराची कोंडी करून उंदराप्रमाणें राहण्यास कां इच्छितां" (पुणें शहरचें वर्णन.)

४. कर्नाटकांतील स्वारीवर सदाशिवराव भाऊ व महादजीपंत पुरंदरे यांस धाडिलें होतें. (इसवी सन १७४६.) कृष्णा व तुंगभद्रा यांच्यामधील मुलखाची खंडणी घेतली व बहादरभेंडा या नांवाचा किल्ला घेतला. स्वारीहून परत आल्यावर राजानें भाऊसाहेबास चिमाजीआपाप्रमाणें पेशव्याचा दिवाण नेमिलें.

पेशवे यांचा जोर मोठा आहे. आमच्या खावंदांनीं, आशेरी, दौलताबाद, शिवनेरी, अशा जागा पेशवे यांच्या स्वाधीन केल्या. तेव्हां आतां पेशवे यांचा जोर पोंचला म्हणजे हाही किल्ला यांचे हवालीं करतील." असा विचार मनांत करून पेशवे यांजकडील बोलणारा होता त्यास किल्लेदार याणीं सांगितलें कीं, "मी किल्ला हवालीं करितों, परंतु मला शेवटीं फसवूं नये." असें बोलणें मध्यस्थ यांचें श्रीमंतांनीं ऐकून लागलीच चाळीस हजार मुलखाच्या सनदा करून दिल्या. तेव्हां किल्लेदार यांस भरंवसा आला. नंतर किल्लेदार याणें सांगून पाठविलें कीं, "मी किल्ल्याचे दरवाजे मोकळे ठेवितों, आपण किल्ल्यावर चालून यावें." असा फितूर आंतून होतांत श्रीमंतांची स्वारी तयार होऊन किल्ल्यावर चालून गेले. तेव्हां आंतील किल्लेदार याणें किल्ल्याचे दरवाजे मोकळेच ठेविले होते. सरकारची फौज किल्ल्यांत चालून गेली. किल्ला सही केला. किल्लेदार यांस बाहेर काढून दिलें. तो येऊन श्रीमंतांस भेटला. त्याची खातरजमा बहूत प्रकारें केली आणि आपले जवळ ठेविला. त्याला जाहागीर द्यावयाची त्याच्या सनदा करून त्याचे हवालीं केल्या. असा नगरचा किल्ला फत्ते करून घेतला. तेथील काम नारो *बाबाजी लकडे याजकडे सांगितलें, आणि स्वारी सरकारची फिरून पुण्यास येऊन कर्नाटकांत मोहिमेस निघाली.

ते कर्नाटकांत जाऊन सावनुरास लागले. सावनूरवाला आठ चार दिवस लढला. शेवटीं श्रीमंतांनीं हल्ला करून सावनूर घेतलें. सावनूरवाला नबाब येऊन भेटला. त्यास थोडकेसा पोटापुरता मुलूख देऊन त्याची स्थापना करून ठेविली. सावनूर सरकारांत घेतलें. वरकड सावनूरवालचे महाल वगैरे सर्व घेतले. असें कर्नाटक फत्ते करून, तेथील, संस्थानी वगैरे होते ते सारे जरबेंत आणून, सालाबाद खंडणी द्यावी, याप्रमाणें तह ठरवून, ते आपले जागीं

---

५. हा किल्ला कविजंग यांस फितुर करून भाऊसाहेबांनीं घेतला. ह्यामुळें मोंगल व मराठे यांजमध्यें पुढें १७६०त तुंबल युद्ध होऊन मराठ्यांचा जय झाला. ६. ही कर्नाटकांतील 'मुलुखगिरी' १७५५–५६ त झाली. खुद्द नानासाहेब कृष्णातीरापर्यंतच गेले होते. या स्वारींत श्रीरंगपट्टणास वेढा घालून नंदीराज यास जेरीस आणलें व सावनूरवालाही शरण आला. बळवंतराव मेहेंदळे व गोपाळराव हरी हे मुख्य सरदार होते. ग्रांट डफ. * नारो बाबाजी यांचें अडनांव आभ्यंकर.

कायम करून ठेविले. पुढें स्वारी तुंगभद्रापार जाऊन, टिपूच्या * मुलखांत धूम करून, मुलुखाची लुटालूट करून, स्वारी मागती तुंगभद्रा उतरून माघारे आले. तुंगभद्रेपावेतों सरकारचा अंमल चालू झाला. अशी स्वारी करून माघारे पुण्यास आले.

या नंतर साताऱ्यास जाऊन, महाराजांची भेट घेऊन, कर्नाटकाचा मजकूर समजावून मागती पुण्यास आले. चिमाजीआपा साताऱ्या मुक्कामींच होते. त्यांस शरीरव्यथा होऊन कैलासवासी झाले. त्यासमयीं सदाशिवपंत भाऊसाहेब साताऱ्यासच होते. त्या गोष्टीला वर्ष साहा महिने लोटल्यानंतर नानासाहेब महाराजांचे भेटीस गेले. त्यावेळेस शाहूमहाराज यांणीं नानासाहेब यांस विचारलें कीं, "सदोबास पुण्यास न्यावयाचें नाहीं कीं काय?" असें महाराजांनीं विचारल्यावर श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, "घेऊन जातों." त्या स्वारीस भाऊसाहेब यांस पुण्यास घेऊन आले. त्या वेळेस § गोपीकाबाई-साहेब यांची मर्जी रुष्ट झाली. कारण असे भाऊबंद जवळ आणून आपले पोरांस ठिकाण नाहीं असें करतील. तो मजकूर नानासाहेब याणीं मनांत ठेविला. त्याचें उत्तर कांहीं केलें नाहीं. भाऊसाहेब यांस पुण्यास आणिलें, परंतु भोजन करून पंक्तीस होते. कामकाज कांहीं नाहीं. पंक्तीस जेवावें आणि दप्तरांत लिहावें. असें वर्षसहामहिने होत असतां रामचंद्रबाबा शेणवई

---

* 'टिपूचा मुलुख' अद्याप कोठेंच नव्हता. या वेळीं हैदर नाईक नुकते पुढें पुढें करण्यास लागले होते. हें राज्य म्हैसूरचें व नंदिराज तेथील प्रधान होता. ७. चिमाजी-आपा १७४१ च्या जानेवारी महिन्यांत वारला. बखरींतल्या गोष्टी मागें पुढें झाल्या आहेत. त्याचे मरणाचे पूर्वीं ११ दिवस खंडोजीनें पोर्तुगीज लोकांपासून रेवदंडा घेतला होता. हेंच एक स्थळ त्या लोकांपाशीं दमण व गोवें यांच्या दरम्यान राहिलें होतें. मरणाचे पूर्वीं ही बातमी ऐकिल्यावर आपास खरोखर मोठा आनंद झाला असेल! § नानासाहेबांची स्त्री, रास्ते यांची मुलगी. ८. रामचंद्र मल्हार शेणवी—अरवलीचा कुळकर्णी—साताऱ्यास पळून गेल्यावर बाजीरावानें राणूजी शिंद्याची दिवाणगिरी त्यास सांगितली. राणूजी मेल्यावर जयाप्पाचें व त्याचें जमेना म्हणून त्यानें सदाशिवरावास कांहीं नजराणा देऊन पेशव्यांकडून आपल्यास जयापाची दिवाणगिरी मिळावी म्हणून प्रयत्न चालविला. तों त्यास मल्हारराव होळकरानें आडकाठी घातली; आणि पेशव्यानें त्यास ती दिवाणगिरी दिली नाहीं. म्हणून पुढें होळकरांचें व भाऊंचें वांकडें पडलें व रामचंद्रबावा नानासाहेबांचा द्वेष करूं लागला. शिंद्याकडचा बेत सिद्धीस जाईना तेव्हां भाऊसाहेबानें रामचंद्रबावास खुद्द आपला दिवाण केलें. पुढें

हे कारभारांत वागत होते, त्यांजवर श्रीमंतांची मर्जी क्रूर होऊन त्यांस आज्ञा झाली कीं, "तुम्ही कारभारांत एकंदर बोलूं नये." अशी आज्ञा होतांच रामचंद्रबावा दरबारास येत परंतु कामकाजांत बोलावयाचें नाहीं. तेव्हां कोणे एके दिवशीं भाऊसाहेब दप्तरांत लिहीत आहेत. यांशीं कोणीं बोलूं नये अशी सरकारची आज्ञा पूर्वीच होती. तेव्हां त्यांशीं कोण बोलतो! परंतु रामचंद्रबाबा शेणवई यांस कारभाराविषयीं मनाई सरकारची झाली होती, तेव्हां त्यांस भाऊसाहेब यांशीं बोलावयाचें होतें, परंतु संधी कोठें सांपडेना. त्या समयास रामचंद्रबावा शेणवई भाऊसाहेब दप्तरांत ल्याहावयास बसले आहेत हें पाहून त्यांजपाशीं येऊन दूर बसले, आणि आपले ठिकाणींच आपणांपाशीं बोलतात कीं, "कांहीं पाणी असेल म्हणून आम्हीं म्हणत होतों, परंतु तें कांहीं दिसत नाहीं. यांणीं खरडेच लिहावे." असें बोलणें भाऊसाहेब यांणीं ऐकून तेही आपले ठिकाणीं बोलूं लागले कीं, "पाणी बहूत आहे. सोन्याचें ताट झालें तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे." हें बोलणें रामचंद्रबावा यांणीं ऐकून मग उभयतांची परस्परें गांठ पडून बोलणीं झालीं. त्यावेळेस रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेब यांस उपदेश केला. "तुम्ही दप्तरांत लिहावयास बसतां हें नीट नाहीं. श्रीमंत कारभार करावयास बसतात तेथें तुम्हीं बसत जावें. तुम्हांस तेथून उठून जा असें त्यांच्यानें म्हणवत नाहीं. तुम्हीं कारभारामध्यें बोलूं नये. त्यांणीं होऊन कांहीं विचारलें असतां त्याचा मात्र जाब द्यावा." असा उपदेश केल्यानंतर भाऊसाहेब यांणीं तो पाठ चालविला. अशा गोष्टीस साहा चार महिने लोटले. नंतर कोणे एके ठिकाणीं दरबार झाला आहे, सारे मुत्सद्दी वगैरे बसले आहेत, रामचंद्रबावाही

---

रामचंद्रबावाच्या सांगण्यावरून भाऊनें 'कारभार मजकडे द्यावा' असें पेशव्याशीं मागणें केलें. तें पेशव्याच्यानें कबूल करवलें नाहीं; कारण चिमाजी आपा मेल्यापासून सर्व कारभारांत व मसलतींत महादाजीपंत पुरंदरे याची मदत त्यास फार झाली होती. तेव्हां असा चांगला, हुषार व फार उपयोगी पडलेला कामगार काढून भाऊस ती जागा त्यास देतां येईना. तेव्हां सांगोल्याची स्वारी करून परत आल्यावर रामचंद्रबावाच्या खटपटीनें भाऊ कोल्हापुरास जाऊं लागला. अशा समयीं महादाजीपंत पुरंदरे यानें मोठ्या समंजसपणानें हा तंटा मिटविला. त्याणें आपल्या मुतालिकपणाचा राजीनामा दिला, व 'भाऊस तें काम सांगा' असें नानासाहेबास सांगून त्यास मोठ्या संकटांतुन काढिलें. राज्याचे कारभारांत सदाशिवरावास मदत ज्याणें केली तोच हा रामचंद्रबावा.

तेथें होते, त्याच समयास कर्नाटकांतील बोभाट बंडें झाल्याचीं पत्रें सरसुभा यांचीं व मामलेदार यांचीं आलीं. तीं पत्रें पाहून श्रीमंतांनीं विचारलें, "आतां बंडाचे बंदोबस्तास कोणास पाठवावा ?" हें ऐकून रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेब यांस इशारत केली कीं, आतां बोलायची संधी हीच आहे. तेव्हां भाऊसाहेब उठून श्रीमंतांस विनंती केली कीं, "मला आज्ञा झाली असतां मी जाऊन बंडाचा बंदोबस्त करून येईन. करणार स्वामींचा प्रताप !" असें उत्तर श्रीमंतांनीं ऐकून नानासाहेब म्हणतात, "तूं कधीं बाहेर गेलास नाहीं, व लढाईही कोठें केली नाहींस. म्हणून तुला जा म्हणावयाचें अनमान." तेव्हां भाऊसाहेब यांणीं उत्तर केलें कीं, "माझ्याकडे करणें न करणें कांहीं नाहीं, सर्व पुण्यप्रताप चरणांचा आहे." अशी गोष्ट ऐकतांच नानासाहेब यांणीं आज्ञा केली, "हाच मुहूर्त आहे; निघावें." असें ऐकतांच भाऊसाहेब यांणीं तोच नमस्कार केला आणि निघून सर्व फौजेस सरकारची आज्ञा बाहेर निघण्याची झाली. भाऊसाहेब डेऱ्यास जाऊन दाखल झाले. त्यावेळेस रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेबांस एकांतीं गांठून मजकूर सांगितला कीं, तुम्हांस जाण्याची आज्ञा झाली, परंतु तुम्हांस पाठीमागें यावें म्हणून सरकारचा सांडणी स्वार जाईल; यासाठीं येथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम करावा. तेथेंही माघारी येण्याची चिटी तुम्हांस येऊन पोंचेल, तरी तुम्हीं माघारी येऊं नये. त्या चिटीचें उत्तर पाठवावें कीं, "स्वामी राज्यावर आहेत; मी बेरोजगारी, तेव्हां मला पोटाचा उद्योग पाहिला पाहिजे. यासाठीं मला कोल्हापूरचे राजमंडळचें बोलावणें आलें आहे तिकडे मी जातों. हें खटलें संभाळावयास पाठवावयाचा असेल तो पाठवावा." त्या वेळेस कोल्हापूरचे राजाचीं पत्रें भाऊसाहेब यांचे नांवाचीं आणलीं होतीं तीं रामचंद्रबावा यांणीं भाऊसाहेब यांचे स्वाधीन केलीं.

असा मजकूर झाल्यानंतर भाऊसाहेब डेऱ्यास गेले होते तेथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम केला. इकडे पाठीमागें नानासाहेब व सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब यांची गांठ पडल्यानंतर श्रीमंतांचे बुद्धीस बाईनें भ्रंश केला. तो मजकूर श्रीमंतांचे मनांत भरला, आणि तेच समयीं चिटी लिहून सांडणीस्वार याजवळ देऊन भाऊसाहेब यांजकडे रवाना केला. सांडणीस्वार रात्रौ जाऊन भाऊसाहेब निजले आहेत त्यांजला उठवून चिटी दिली आणि मुख-जबानी सांडणीस्वार बोलला कीं, "आपणांस याच समयीं माघारें

बलाविलें आहे." तो मजकूर ऐकून चिटी वाचून त्या चिटीचा जाब लागलाच माघारा पाठविला कीं, "हें खटलें संभाळावयास कोण तो पाठवावा. मला कोल्हापूरचे राजाचें बलावणें आलें आहे तिकडे मी जातों." असें उत्तर लिहून सांडणीस्वार माघारा रवाना केला. तो उजाडाला पुण्यास येऊन श्रीमंतांचे हवालीं चिटी केली. चिटी वाचतांच नानासाहेब घाबरले, आणि मनांत विचार केला कीं, हें सारें कृत्य रामचंद्रबावाचें आहे. असा पक्का मजकूर ध्यानांत आणून, रामचंद्रबावास समागमें घेऊन, लगेच श्रीमंत, भाऊसाहेब होते तेथें येऊन, भाऊसाहेब यांची व नानासाहेब यांची भेट झाली. त्या वेळेस नानासाहेब याणीं भाऊस विचारिलें कीं, "तुझे मनांत काय आहे हें खरें सांग." हें ऐकून भाऊसाहेब बोलले माझे मनांत आपणांविषयीं कांहीं नाहीं. आपण राज्यावर आहांत, मला माझी सोई कांहीं तरी पाहिली पाहिजे, यासाठीं कोल्हापूरचे महाराजांचीं पत्रें मला बलावण्याविषयीं आलीं आहेत तिकडे मी जातों." असें बोलून राजपत्र[९] होतें तें श्रीमंतांस दाखविलें. त्यांत मजकूर "साताऱ्याचे राज्यांत पेशवे आहेत, आमचे राज्यांत कोणी पेशवे नाहींत. आम्ही आपले राज्याची पेशवाई तुम्हांस देतों." असा मजकूर नानासाहेब यांणीं वाचून घटकाभर उगेच राहून भाऊसाहेबांपाशीं बोलले "हेंच निदान शेवटील कीं काय?" तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, "आपले आज्ञेशिवाय नाहीं." तेव्हां नानासाहेब बोलले कीं "तूं पुण्यास चलावें." हें ऐकून भाऊ म्हणतात, "पुण्यास येऊन काय करावयाचें?" तें ऐकून नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, "सारा राज्यभार आजपासून तुझ्यावर ठेविला. सारा राज्याचा कारभार तूं कर, तुझ्या इतल्लयाशिवाय मी चालावयाचा नाहीं." अशी आण भाष क्रिया उभयतां बंधूंची झाली. भाऊसाहेब यांस पुण्यास घेऊन आले. कर्नाटकांत फौज रवाना केली तिचे बराबर दुसरा सरदार दिला. त्या दिवसापासून भाऊसाहेब राज्यकारभार करूं लागले.

पुढें दादासाहेब हिंदुस्थान प्रांतीं स्वारीस[१०] गेले ते अटक पावेतों मुलूख काबीज करून आले. परंतु त्या स्वारींत दादासाहेब यांणीं कर्ज केलें. अशी

---

९. या पत्रांत तीन किल्ले व पांच हजारांची जहागीर भाऊंस देऊं केली होती.

१०. ह्या स्वारींत दिल्ली घेऊन दिल्लीचा वजीर मीरशहाबुद्दीन याचे सांगण्यावरून लाहोर येथील अबदालीचे ठाणेदार उठवून लाविले. या कामांत खर्च अतोनात होऊन

मोहीम फत्ते करून पुण्यास आले. पराक्रम मोठा केला, परंतु स्वारीचें कर्ज पुण्यास आणिलें. यामुळें सरकारची मर्जी कायम राहिली नाहीं. त्यामुळें भाऊसाहेब नबाबावर स्वारी करूं निघाले.[११]

अगोदर नबाबाच्या तहामध्यें वांकडेपणा आला होता तोच मजकूर ध्यानांत ठेवून मोंगल यांजवर स्वारीस निघाले. त्यासमयीं नबाब निजामन्मुलुख औरंगाबाद शहरांत होते त्या वेळेस कैलासवासी बाजीराव साहेब यांणीं २।४ लढाया मोंगलाशीं घेऊन मोंगलाई मुलूख बहूत घेतला व औरंगाबाद प्रांतींचे झाडून महाल तेथें सरकारी अंमल बाबती सरदेशमुखी व चौथाईचा अंमल चालू केला. असें झालें असतां नबाबाशीं व पेशवे यांशीं बिघाड होऊन दौलताबाद किल्ला मोंगल यांणीं माघारा घेतला. त्यासमयीं भाऊसाहेब यांणीं मसलत केली कीं, मोंगल यांजवर मोहिम करावयाची, असें ठरवून मोहिमेस भाऊसाहेब निघाले. ही बातमी मोंगल यांजकडील वकील यांणीं औरंगाबादेस नबाब यांस जाहीर केली. त्याजवरून निजामअलीसां मोंगल लढाईच्या उद्देशें सरंजाम तयार करून बाहेर निघाले. इकडून श्रीमंतही लाख दीडलाख फौजेनिशीं समागमें तोफखाना घेऊन व खेरीज पायदळ, असा जमाव घेऊन भाऊसाहेब बाहेर निघाले. खेरीज सरंजामी सरदार अवघे समागमें चालले. त्या लढाईचा नेम *तांदुळजाचे मुक्कामीं ठरला. तिकडून मोंगलही कट्टा सरंजाम

---

अबदालीशीं वांकडेपणा आला. ( १७५६–१७५८. ) पुढें पुण्यास आल्यावर ऐशीं लक्ष कर्ज केलेलें पाहून भाऊसाहेबांची व दादांची बोलाचाली झाली. तेव्हां भाऊंनीं लढाईचा धंदा पतकरला व दादांनीं राज्यकारभार आपले आंगावर घेतला. हा कलहाग्नी पेट-विण्यास गोपिकाबाई ही प्रसिद्ध आनंदीबाईपेक्षां कमी होती असें नाहीं. दादा व भाऊ यांची बोलाचाली झाल्यावर एके दिवशीं भाऊ कचेरींत काम करीत बसले असत. एक मारेकरी त्यांवर पक्का वार करीत होता. पण पाठीमागें असणाऱ्या मनुष्यानें मारेकऱ्याच्या हात धरल्यामुळें, त्यापासून फारशी इजा झाली नाहीं. नारायणरावाचा खून करण्यास जसे कवाईत शिकलेले शिपाईच धजले, त्याप्रमाणें हा मारेकरीही कवाईत शिकलेल्या-पैकीं एक असून त्याच्या कवाईत शिकलेल्या वरिष्ठानेंच त्याची प्रेरणा केली होती–कोणाच्या सांगण्यावरून तें मात्र समजत नाहीं. ग्रांट डफ. ११. ह्या मोहिमेचें कारण मागें अहमदनगरचा किल्ला फितूर करून घेतला हें होय. इसवी सन १७६०. * तांदुळजाची लढाई पुढें झाली. हीस उदयगिरीची किंवा उदगीरची असें म्हणतात. उदगीरच्या लढाईत इब्राहिमखान गाडदी याणें पराक्रम केला. शेवटीं सलाबतजंग व निजामअल्ली यांचा अगदीं मोड होऊन तहाचीं बोलणीं लागलीं. पण भाऊसाहेब ऐकेनात

घेऊन त्या मुक्कामीं येऊन दाखल झाले. इकडुन पेशवेही त्या मुक्कामास येऊन उतरले. दोन्ही फौजेचे मुक्काम झाले. दोन्ही फौजेचें लढाईचें तोंड लागलें. लढाई होतां होतां श्रीमंतांची फौज लढाईस कच खाऊन फौजेनें पळ काढिला. तेव्हां चार कोस पाठीमागें पळाली. त्यासमयीं मोंगलांची फौज श्रीमंतांचे फौजेचे पाठीवर चालून आली. हें पाहून सरकारची फौज श्रीमंतसुद्धां सगळा जमाव एके जागीं करून उभे राहिले आणि मोंगलांची फौज पाठीवर आली हें पाहून श्रीमंतांची फौज पाठीमागें उलटली. त्या वेळेस मोंगलांची व सरकारचे फौजेची लढाई होऊं लागली. तेथें लढाई मोठे शरथेची होत आसतां बंदूक, भाला हे बंद होऊन तरवारीशीं गांठ पडली. त्यासमयीं लढाई मोठी हातघाईची एक प्रहरपर्यंत झाली· त्या लढाईत मोंगल माघारे हटले आणि फौजेनें पळ काढिला. त्या वेळेस नबाबसुद्धां पळूं लागले. तेव्हां श्रीमंतांची फौज पाठीमागें लागली. ते ७।८ कोशपर्यंत मोंगलांचा पाठलाग केला. तेव्हां मुसलमान लोक पाणी पाणी करून घाबरले. त्या वेळेस सरकारची फौज पाठीमागें लागली होती, त्यासमयीं नबाब जेरीस येऊन सलुखाचें बोलणें लाविलें. तेव्हां दोन्ही फौजेचे मुक्काम दोन कोसांचे छाट्यानें त्याच ठिकाणीं झाले. नंतर मोंगल यांजकडील वकील व श्रीमंतांकडील वकील तहाचें बोलणें बोलावयास गेले, त्यांणीं बोलणें मोंगल यांशीं केलें. "आमचा अंमल सारे मुलखांत चालता झाला. परंतु खानदेश वरघांट असा मुलखाचा कोंपरा राहिला आहे तो आम्हांस या तहामध्यें द्यावा. तो कोणता म्हणाल तर मालेगांव, सालेरचा किल्ला व मुल्हेरचा किल्ला व अणकाईचा किल्ला व त्र्यंबक व रतनगड व आंवढा पट्टा व कावनई, गेहोज व धोडप हे किल्ले सरकारांत द्यावे व महाल नासिक, वण, दिंडोरी, पाटोदें व चांदवड व आणखी किरकोळ महाल द्यावे" याप्रमाणें बोलणें झालें असतां नबाब यांगीं बोलणें कबूल करून वर लिहिल्याप्रमाणें किल्ले व महाल सरकारचे हवालीं केले. इतके ठिकाणीं सरकारचा अंमल चालू झाला. खेरीज खंडणी व स्वारीखर्च घेतला. अशी

---

तेव्हां निजामअल्ली याणें आपला शिक्का मोर्तब भाऊंकडे पाठविला; अशा अर्थानें कीं, जो मुलूख आपण घ्याल तो घ्यावा, व जो आम्हांस ठेवाल तो आम्हीं घेऊन राहूं. पुढें तह झाला. त्यांत दौलताबाद, अशीरगड, अहमदनगर वगैरे किल्ले व औरंगाबाद, विजापूर, व बेदरचा कांहीं भाग असा मुलूख ६२॥ लक्षांचा दिला. या वर्षी मराठ्यांच्या उत्कर्षांचा कळस झाला.

मोहीम फत्ते करून मुलूख घेऊन भाऊसाहेबांची स्वारी माघारी फिरली. इतक्या तहामध्यें दौलताबाद मोंगल यांस दिली होती ती माघारी घेतली. तेव्हां नबाब माघारे गेले ते औरंगाबादेस पोंचले. पोंचल्यानंतर नबाब यांनीं आपल्या ठिकाणीं विचार केला कीं, येथें राहिलें असतां नित्य उठून पेशवे-यांचे दंग्यांत येववत नाहीं म्हणून औरंगाबाद उजाड टाकून नबाब जाऊन हैदराबादेस राहते झाले.[१२]

इकडे भाऊसाहेब माघारे फिरले ते नासिक मुक्कामीं येऊन मुक्काम केला. नासिक जागा पाहून सरकारची मर्जी बहुत खूष झाली. यासाठीं कांहीं एक दिवस तेथें राहिले. तेव्हां मल्हारराव होळकर यांणीं सरकारांत विनंती करून चांदवड महाल आपणांस मागून घेतला. तसेंच विंचूरकर यांणीं पाटोद परगणा मागितला तो त्यांस दिला, व अणकाईचा किल्लाही त्यांस दिला. चांदवड परगणा होळकर यांचे हवालीं केला. नारो[१३] शंकर राजेबहादर यांणीं मालेगांव मागितलें तें त्यांस दिलें. बाकी मुलूख सरकारांत राहिला. किल्ले घेतले होते तितके किल्ल्यांवर सरकारचे मामलेदार गेले. नंतर भाऊसाहेब यांणीं नासिक मुक्कामीं गोदामाहात्म्य सारें ऐकिलें त्याजवरून सरकारची स्वारी श्रीत्र्यंबकेश्वरीं येऊन तेथें राहून त्र्यंबकच्या किल्ल्यावर ठाणें बसविलें. तेव्हां भाऊसाहेब यांचे मनांत आले कीं त्र्यंबकेश्वराचें देवालय बांधावें. असें मनांत येतांच मोंगलाई राज्यांतील मशिदी वगैरे होत्या तें सारें मोडून देवालयास काम *लाविलें. देवालय तयार झाल्यावर सारीं तीर्थें जागोजाग होतीं तीं बांधिलीं. कुशावर्त बांधावें असें श्रीमंतांचें मनांत येऊन कुशावर्त बांधावयास काम लाविलें त्यासमयीं ओढेकर यांणीं सरकारांत विनंती केली कीं, "देवालय सरकारांनीं बांधिलें, कुशावर्त बांधावयाची आज्ञा मला व्हावी." त्यासमयीं श्रीमंतांनीं ओढेकर यांस सांगितलें कीं, कुशावर्त बांधावयाचें सरकारचे मनांत आलें तें आम्ही बांधितों. तुम्हांस कांहीं बांधावयाचें तर पंचवटीस श्रीरामचंद्राचें

---

१२. निजामउल्मुल्क याणें गादीचें ठिकाण हैदराबाद शहर मागेंच केलें होतें. १३ दादासाहेबांनीं अमदाबाद वेढा देऊन सर केली तेव्हां नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांणीं मोठा पराक्रम केला होता. (१७५३.). * काळाचा महिमा अगाध आहे. हिंदूचीं देवळें मोडून मुसलमानांनीं ज्या मशीदी बांधिल्या त्याच कालपरत्वें हिंदूनीं मोडून त्यांचीं देवळें बांधिलीं !!

देवालय तुम्हीं बांधावें." अशी सरकारची आज्ञा ओढेकर यांस झाली. तें ओढेकर यांस बरें वाटून त्यांणीं ती गोष्ट कबूल केली, आणि पंचवटीचें देवालय श्रीरामचंद्र यांचें ओढेकर यांणीं बांधिलें. कुशावर्त सरकारांतून बांधिलें. कुशावर्त व देवालय तयार झाल्यानंतर दोन्हींची अर्चा भाऊसाहेब यांचे हातून झाली नाहीं. कारण ब्राह्मणांच्या तंट्यामुळें राहिली. यजुर्वेदी व आपस्तंब ब्राह्मण यांचा दक्षिणद्वाराविषयीं तट पडला. त्याचा निर्णय त्यासमयीं झाला नाहीं. सबब अर्चा तशीच राहिली. काम तयार झाल्यानंतर देवस्थानाचा बंदोबस्त नैवेद्य, नंदादीप, यांचा व त्रिकाळ पूजेचा वगैरे बंदोबस्त करून दिला. त्याप्रमाणें आजपर्यंत चालत आहे. सिंहस्थाचे सालीं गोसावी वगैरे यांचा मेळा त्र्यंबकेश्वरीं भरतो. त्या गोसाव्यांमध्यें गिरी व पुरी[१४] यांचा स्नानाचा तंटा पडून मोठ्या लढाया होऊं लागल्या. तेव्हां एका सिंहस्थास भाऊसाहेब यांची स्वारी त्र्यंबकेश्वरीं आली. गिरी, पुरी यांचा तंटा लागलाच होता. तें पाहून श्रीमंतांनीं दोघांस बलावून सांगितलें कीं, "आम्हीं सरकारांतून तुमचा तंटा तोडितों." तें त्यांणीं मान्य केल्यानंतर श्रीमंतांनीं गिरीचा व पुरीचा असे दोन्ही महंत हातीं धरून आपण खासा कुशावर्तांत स्नान केलें. त्या दिवसापासून गिरी व पुरी बरोबर स्नान करूं लागले. दोघांचा तंटा मिटला. हा मजकूर तांदुळजाचे[१५] लढाईचा असा झाला.

पुढें दादासाहेब हिंदुस्थान प्रांतीं स्वारीस गेले. कारण मागले स्वारीस कर्ज घेऊन पुण्यास आले त्यामुळें सरकारची मर्जी काईम राहिली नाहीं. त्या अटीस्तव दादासाहेब पुनः स्वारीस श्रीमंतांची आज्ञा घेऊन [१६]गेले, ते दिल्लीपावेतों मुलखाच्या खंडण्या घेऊन दिल्लीस गेले. त्यासमयीं सखारामबापू समागमें होते. तेव्हां दिल्लीस मुक्काम श्रीमंतांचा झाला. पूर्वीं बाजीराव साहेब यांणीं वकील दिल्लीस पाठविले होते. त्यांचें उपनांव हिंगणे. हे मोठे अक्कलवान म्हणून

---

१४. गिरी व पुरी असे दोन भेद गोसांवी यांत आहेत. १५. ग्रांड डफ 'तांदुळज्याची' हें नांव दुसऱ्या एका लढाईस देतात. या लढाईस 'उदगीर' ची लढाई हें नांव आहे. (१७६०.) १६. १७५८ ची अटकपर्यंत मोहीम करून आल्यावर दादा पुन्हां एकवार रजपुतस्थानापर्यंत मात्र गेले होते. दिल्लीस गेल्याचें ग्रांट डफ कोठें लिहीत नाहीं. तेव्हां पूर्वींच्या खेपेस झालेली गोष्ट बखरींत आतां दिली असेल. ही मोहीम १७५५–५६ मध्यें झाली ती असावी.

दिल्लीस श्रीमंतांनीं बादशाहा यांजकडे वकिलीस पाठविले. ते तेथें कामावर गेल्यावर सारे बादशाहीचा कारभार करूं लागले. दौलतही बहूत मिळविली. मोठे उन्मत्त झाले होते. तेव्हां श्रीमंतांचा मुक्काम तेथें झाला असतां श्रीमंतांस भेटण्याकरितां मेजवानीचें आमंत्रण केलें. दुसरे दिवशीं दादासाहेब भोजनास गेले. पंक्तीस श्रीमंत बसले असतां सखारामबापू बराबर आहेत, त्या समयीं खासे हिंगणे पितांबर नेसून, पायांत रुप्याच्या खडावा, आंगावर शालजोडी हातांत पंचपात्री जडावाची, असे पंक्तींत येऊन सखारामपंत यांस हांक मारून विचारिलें कीं, " रघुनाथराव ते कोणते ! " असें ऐकतांच सखारामबापू उभे राहून हात जोडून दाखविलें कीं, हे येथें बसले आहेत. हें दादासाहेब यांणीं पाहून उदक सोडलें होतें म्हणून आपोशणी करून पंचप्राणाहुती करून लागलेच उठले. पोषाग घेऊन, आपले लष्करांत येऊन लागलीच लष्कराची तयारी करून हिंगणे यांजवर चालून येऊन, हिंगणे यांची हवेली वेढून, लुटून फस्त केली. दिल्लींत हिंगणे होते नव्हते असें केलें. दौलत मुबलक सांपडली. तेथून स्वारीचा कूच होऊन, हिंदुस्तानांत येऊन जयपूर, उदेपूर येथील खंडणी घेऊन स्वारी पुण्यास येऊन दाखल झाली. त्या स्वारीला कर्ज झालें नाहीं. याजवरून श्रीमंतांची मर्जी प्रसन्न राहिली.

असा कारभार होत असतां शाहू महाराज छत्रपती यांचे शरिरास विकृती होऊन शके १६७१ मार्गशीर्ष वद्य ३ ते दिवशीं शाहू महाराज यांणीं कैलासवास केला. त्या समयीं नानासाहेब व भाऊसाहेब सातान्यास जाऊन, रामराजे यांस राज्याभिषेक करवून आपल्यास वस्त्रें नवीं घेऊन, शिक्के त्यांचे नांवाचे कोरून, नवी शिक्केकटार केली. तेथील बंदोबस्त करून स्वारी पुण्यास येऊन दाखल झाली.

नंतर पर्वतीस शाहू महाराज यांची स्थापना करून देवालयास काम लाविलें. देवालय मोठें बांधून देवाची स्थापना शिवलिंग स्थापिलें. सभोंवतें पंचायतन [१७] मांडिलें. शेजारीं विष्णूचें देवालय बांधिलें. त्या देवळांत विष्णूची स्थापना करावयाची. तेव्हां अवघे मंडळीचे मनांत आलें कीं, येथें गंडकी शिळेचा विष्णू स्थापन करावा. तेव्हां गंडकी शिळा कोठें न मिळे. याजकरितां

---

१७. पंचायतन मांडिलें = भोंवतीं दुसऱ्या देवांचीं–विष्णू, सूर्य, गणपती, व देवी यांचीं –देवालयें बांधिलीं.

जासूद तयार करून गंडकीचे राजाकडे पाठविले त्याणें तीं पत्रें पाहून जासूद रिकामे माघारे पाठविले. तें पाहून श्रीमंतांस विषाद वाटून हिंदुस्थान प्रांतीं होळकर शिंदे यांस पत्रें गेलीं कीं, "तुम्ही गंडकीस जाऊन त्या राजाकडून गंडकीची शिळा पुण्यास पोंचती होई असें करावें." त्याजवरून शिंदे होळकर यांणीं गंडकीकडे ढाली[१९] फिरवितांच तें वर्तमान त्या राजास गेलें. त्या समयीं त्यानें वकील पाठविले कीं, "तुम्हीं कांहीं येऊं नये, आम्ही शिळा पुण्यास पोंचती करितों." असा तह होतांच त्यांनीं शिळा काढून मूर्ती तयार करून पुण्यास पोंचती केली. त्या विष्णूची स्थापना पर्वतीस केली. तेथें श्रावण मासाचे दक्षिणेसाठीं रमणा[२०] बांधिला. पर्वतीस नेमणूक देवस्थानाची वगैरे सर्व करून देवस्थानाचा बंदोबस्त यथास्थित केला. श्रावणमासाची दक्षणा पूर्वी बाजीरावसाहेब यांणीं चालू[२१] केली होती परंतु ती दक्षणा खबुद्रखान्यांत[२२] पुण्यास वांटीत असत. तेथें ब्राह्मणांस अडचण होऊं लागली सबब हुजूरपागेंत[२३] वाटूं लागले. पांच दिवसपर्यंत ब्राह्मण भोजन करून मग दक्षणा सहावे दिवशीं द्यावी. तोच पाठ पुढें नानासाहेब यांणीं चालविला. त्यांचे कारकीर्दींत ब्राह्मण दक्षणेचे बहूत होऊं लागले. यामुळें पर्वतीस रमणा करून तेथें ब्राह्मणांस श्रावण शुद्ध १ पासून शुद्ध ५ पर्यंत खिचडी[२४] वाटून, षष्ठीस दक्षणेस प्रारंभ करून ते सप्तमीपर्यंत सायंकाळपावेतों दक्षणा देऊन ब्राह्मण मोकळे करावे.

---

१८. गंडकी नदी भागीरथीस मिळते. हिचा उगम नेपाळांत आहे. हिला 'शालिग्रामी' असेंही नांव आहे. 'गंडकीचा राजा' नेपाळवाला असावा. १९. ढाल = निशाण, बावटा. ढाला फिरविणें = चाल करून जाणें. २०. ह्या रमण्याच्या पडक्या भिंती अद्याप पर्वतीवर जातां येतां दृष्टीस पडतात. २१. सेनापति त्रिंबकराव दाभाडे आपल्या तळेगांवीं दरसाल कांहीं दिवस ब्राह्मणभोजन घालीत असत. पुढें १७३१ सालीं डुभईच्या लढाईंत ते पडले. तेव्हां बाजीरावानें तोच प्रघात पुण्यांत सुरू करून शास्त्री व वैदिक लोकांस तो दाक्षिणाही देऊं लागला. लोकांचीं मनें मिळवून घेण्याची ही बाजीरावाची युक्ती ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. लोकांचीं मनें क्षुब्ध कशानें होतात, तीं शांत कशीं करावीं, व त्यापासून आपलें कार्य कसें साधावें हें त्यास चांगलें माहीत होतें. याप्रमाणें पुण्यांत दाक्षिणेचा मूळारंभ झाला. २२. खबुद्रखाना— "हा गांवाबाहेर नदीचे कांठी (बाजीराव यांचे कारकीर्दींत) बांधिला. यांत पक्ष्यांस दाणा घालण्याकरितां चुनेगच्ची बांधिली होती व पाण्याकरितां हौद बांधिले होते." पु० श० व० २३. हें स्थळ हल्लीं बुधवार व शनवार पेठांचे दरम्यान सांगलीकर यांची बाग आहे तें. हल्लीं तेथें मुलींची इंग्रजी शाळा आहे. २४. पूर्वी बडोद्यास वांटीत त्याप्रमाणेंच असावी. ह्या प्रसंगाबद्दल मनोहर कवी म्हणतोः—

वर्षाचे वर्षास ब्राह्मण चढत चालले. त्या समयीं ब्राह्मणसमुदाय बहूत होऊं लागला. तेव्हां सरकारांतून ठरलें कीं, उत्तम वैदिक दशग्रंथी व उत्तम शास्त्री पंडित, तसेच ज्योतिषी व वैद्य, यांची परीक्षा घेऊन, नांवानिशी लिहून, वाड्यांत दक्षणा त्यांस द्यावी. त्या समयीं दक्षणेची आवई बहूत लांब जाऊन काशी, रामेश्वर, तैलंग व द्रविड देश व कोंकण देश व मैथिल[२५] व गुर्जर व मालव पावेतों ब्राह्मण मोठमोठे विद्वान अपसूर्य[२६] येऊं लागले. त्या दिवसापासून दक्षणेचाही श्रावण मासास तीन लाख चार लाख रुपये पावेतों खर्च येऊं लागला. अशी दक्षणा होऊं लागली. कोंकणचे ब्राह्मण येत, त्यांस पन्नास, पाउणशें, ऐशीं रुपयेपावेतों ब्राह्मण उत्तम विद्वान पाहून दक्षणा देऊं लागले. त्यामुळें ४०।५० हजार ब्राह्मण रमण्यांत होऊं लागला. तेव्हां एके वर्षीं अशी गोष्ट झाली कीं, दक्षणेस प्रारंभ होतांच पर्जन्यवृष्टी अतिशय होऊं लागली. शहरांतून ब्राह्मण बाहेर पडावयाचा नाहीं अशी वृष्टी पर्जन्यानें केली. त्या समयीं श्रीमंत नानासाहेब यांस मोठा राग येऊन बोलले कीं, " मी धर्म करितों हा शक्रास आवडत नाहीं." असें म्हणून आपण उघडे होऊन पर्जन्यांत येऊन बसले. ते दोन घटकापर्यंत उघडे पर्जन्यांत बसले असतां सर्व जन पाहात आहे, सर्वांच्या देखतां खडखडीत पर्जन्य उघडून, चांगलें ऊन पडलें ! तेव्हां श्रीमंत उठून, नवीं वस्त्रें घेऊन, दक्षणा वांटण्यास बसले. तों पर्जन्य सप्तमी प्रहर रात्रपावेतों ब्राह्मण शहरांत येऊन पोंचत तोंपर्यंत पडला नाहीं. पर्जन्य उघडल्याचे हर्षानें त्या वर्षीं दक्षणा सालाबादपेक्षां जास्ती दोन लक्ष रुपये वांटले. त्या आवईनें ब्राह्मण दूर देशींचे येऊं लागले. दुसरे वर्षीं श्रीमंतांनीं द्रव्याची खिचडी वांटली. मोहरा, पुतळ्या, होन रुपये हीं एकाजागीं करून वांटलीं. त्या वर्षीं रमण्यांत देकारास[२७] १६ लक्ष रुपये लागले. अशी कीर्ती दक्षणेची सर्व मुलखांत चार खुंटपर्यंत[२८] झाली.

---

" श्रावणमासीं मोठा धडाका। अन्नशांतिचा चालु तडाखा। रमण्यामध्यें छपऱ्या रावटया। सरोवर सुंदर निर्मळ पाणी। आंबेमोहराचे तांदूळ तिसडी। डाळ तुरीची पिंवळि बेगडी। लवण तांबूल गंडा रोकडी। प्रतिपदेपासून चालू खिचडी। षष्टी दिवशीं मुहूर्त वेळीं। गज उंटावर वाहे खजिना।" इ०(पु० श०ब०). २५. मैथिल=नेपाळाजवळील प्रदेश. मिथिल. मालव=माळवा, इंदूर वगैरे. २६. अपसूर्य =अपरसूर्य, प्रतिसूर्य. २७. देकार=दक्षिणा, धर्मादाय. २८. चार खुंट=चारी कोंपरे, चतुःसीमान्तपर्यंत, जिकडे तिकडे. 'चार खुंट जहागीर' ही व्याजोक्ति सर्वांस माहीत आहेच.

पुढें श्रीमंत नानासाहेब हिंदुस्थानांत स्वारीस गेले. तेथें जाऊन मुलखाच्या खंडण्या वगैरे घेऊन माघारे फिरले. त्या वेळेस श्रीमंतांचे मनांत गोष्ट वागली कीं, काशीस जाऊन काशी घ्यावी. ह्या बेतानें स्वारीच्या ढाला पाठीमागें काशीकडे फिरविल्या. पुढें काशीच्या अलीकडे १५।१६ कोशांवर मुक्काम झाला. त्या समयीं काशीस सुजाउद्दवले राज्य करीत होते. त्यांस असा मजकूर समजला कीं, पेशवे काशी घ्यावयास येतात. हा मजकूर पक्का त्यांजला समजतांच घाबरून सर्व क्षेत्रींचे ब्राह्मण जमा करून आणिले. त्या वेळेस नारायण दीक्षित पाटणकर* हे काशीस होते. तेही त्याणें आणिले. तेव्हां सुजाउद्दवला याणें सर्वांस सांगितलें कीं, "तुमचे ब्राह्मण राजे काशी घ्यावयास येतात त्यांस माघारें फिरवावें, नाहीं तर तुम्हां सर्वांस मुसलमान करीन." अशी जरब सुजाउद्दवला यांणीं देतांच सारे ब्राह्मण भिऊन सुजाउद्दवल्यास बोलले कीं, "आम्हीं त्यांस माघारें फिरवितों." असें बोलून तीन चारशें ब्राह्मण दीक्षितसुद्धां काशींतून उघडे बोडके निघाले, ते नीट श्रीमंतांचे लष्करांत चार साहा घटका रात्रीस येऊन पोंचले. ते ब्राह्मण आले हें पाहून नानासाहेब डेऱ्याबाहेर येऊन उभे राहिले. दीक्षित पाटणकर यांस पाहून श्रीमंत म्हणतात कीं, "असे उघडे बोडके कां आलां ?" त्या वेळेस नारायण दीक्षित यांनीं श्रीमंतांस सांगितलें कीं, "असा मजकूर झाला. तेव्हां आमचें ब्राह्मणपण राखावयाचें असल्यास आपण माघारें फिरावें हें चांगलें." असा मजकूर श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत दीक्षितांस म्हणतात "इतक्या ब्राह्मणांस दुःख आम्हांसाठीं होतें, तेव्हां या गोष्टीची गरज आम्हांस नाहीं, आपण स्वस्थ असावें." असें दीक्षितांनीं ऐकतांच दीक्षित श्रीमंतांस म्हणतात "या वेळेस आपण कूच करून माघारें फिरावें." हें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत बोलले, "आम्हांस गंगास्नान करावयाचें होतें तें कसें घडतें ?" हें ऐकून दीक्षित बोलले "आमचे मेळ्यांत आपण चलावें. गंगास्नान घालून माघारे लावितों." असें ऐकून, "बरें आहे." असें म्हणून त्यावेळेस लागल्याच ढाला फिरवून

---

२९. ही स्वारी १७४३ सालची. पुढील गोष्टही त्याच वेळेस घडली असावी. बखर लिहिणारानें शक दिले नाहींत. त्यास जशा गोष्टी आठवत गेल्या किंवा लोकांनीं सांगितल्या त्याप्रमाणें त्यानें लिहिल्या असाव्या हें स्पष्ट होतें. * नारायण दीक्षित पाटणकर हे कायगांवकर दीक्षित यांचे मूळपुरुष. श्रीमंत पेशवे यांचे हे गुरु. हे मोठे तपस्वी होते व सर्व जातीचे राजे, सरदार त्यांस मोठा मान देत असत.

फौजेचा कूच करून माघारे फिरले. नानासाहेब एकटेच, सडे, त्या ब्राह्मणांत मिळून, काशीस येऊन, गंगास्नान करून माघारे गेले. मग सारा मजकूर सुजाउद्दवला यास समजला कीं, "श्रीमंत स्नान करून माघारे गेले." "ही गोष्ट मोठी आमचे हातून ‡ गेली." मग श्रीमंत नानासाहेब कूच दरकूच पुण्यास येऊन दाखल झाले. दुसरे वर्षी ब्राह्मण दक्षिणेस ८०,००० झाले.[30]

पुढें दादासाहेब हिंदुस्थानांत स्वारीस जाण्यास निघाले. त्यासमयीं पुण्याची सरदार मंडळी व हुजुरात[31] व मानकरी अशी ६०।७० हजार फौज घेऊन खेरीज पायदळ व तोफखाना असे हिंदुस्थानांत जाऊन फत्तरगडास[32] लागले त्या वेळेस साहा महिनेपर्यंत फत्तरगड लढला. सभोंवते मोर्चे सरकारचे बसले आहेत, किल्यावर रसत§ जाऊं देत नाहींत. तेव्हां किल्ल्यावरील दारूगोळा व धान्य सारें सरलें. ही बातमी श्रीमंतांस पक्की लागली. त्यासमयीं वरचा किल्लेदार घाबरला, आणि आपले ठिकाणीं विचार करतो कीं, "दादासाहेब मला जिवंत सोडीत नाहींत." पूर्वीची जरब दादासाहेब यांची हिंदुस्थान-प्रांतीं अवघ्यांस माहीत*होती; त्यामुळें किल्लेदार विचारांत पडून मोठें संकट त्यास प्राप्त झालें. त्यासमयीं त्याणें पेशवे यांचे फौजेंत डोईजड माणूस मला पाठीशीं घालील असा कोण आहे असा विचार करितां, विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे आहेत. तेव्हां त्यांजकडे किल्लेदार याणें सूत्र लावून "मला जिवदान द्यावें," असें बोलणें त्याचें येतांच विंचुरकरांनीं त्यास आश्वासन देऊन किल्लेदार यास आपल्या गोटांत आणून ठेविलें, आणि आपले चिरंजीव शिवाजीपंत यांस दारूगोळा देऊन किल्यावरतें पाठविलें. तेव्हां दुसरे दिवशीं किल्ला मातक्यानीं† लढूं लागला. हें श्रीमंतांनीं पाहून श्रीमंत विचार

---

‡ हें म्हणणें सुजाउद्दवल्याचें. ३०. कल्याणच्या प्रतींत आंकडा ८,७८,००,००० असा आहे. त्यांत पहिल्या आठावर रेघ मारलेली आहे. तेव्हां तो खोडला आहे असें घेतलें तरी ७८ लक्ष ब्राह्मण होतात. ते इतके होऊं नयेत असें पुढील व मागील मजकुरावरून होतें. इंदूरच्या प्रतींत '८०,००० झाले' असें आहे तें बरोबर आहे. ३१. हुजुरात=खुद्द सरकारची फौज (जाहागीरदारांनीं दिलेली नव्हे.) ३२. फत्तरगड रोहिलखंडांत आहे तो. § रसत, रसद= दाणा गल्ला वगैरे सामान. * लांब लांब मुक्काम दादांचे होत त्यावरून 'राघू भरारी' (पोपटाची भरारी, उड्डाण) अशा अर्थाचें नांव त्यास हिंदुस्थानांत पडलें होतें. † मातक्यान=पुन्हां.

करितात, "हें कसें झालें ! कौल[33] किल्ल्यावर दारूगोळा व खावयास नाहीं असें असतां हें काय !" याची चौकशी करूं लागले. त्या समयीं कोणीं श्रीमंतांस मजकूर समजाविला कीं, "विठ्ठल शिवदेव यांणीं किल्लेदार पाठीशीं घालून आपले चिरंजीव शिवाजीपंत किल्यावर पाठवून, दारूगोळा पोंचवून, लढाईची तयारी त्याणें केली." हें ऐकून श्रीमंतांस मोठा राग येऊन, फौज तयार करून, हुकूम झाला कीं, "विंचुरकर यांचा गोट लुटावा. तेव्हां ती वातमी विंचुरकर यांस लागतांच पांच हजार स्वारांची तुकडी तयार होऊन आपला गोट आंवळून उभे राहिले. आणि सांडणीस्वाराचे हातीं सरकारची फौज उभी होती त्यांजला सांगून पाठविलें कीं, "विठ्ठल शिवदेव [व] जिवंत पांच हजार स्वारांच्या रांडा होतील, ते वेळेस किल्लेदार जिवंत तुमचे नजरेस पडेल. आज तुम्ही सारे मजवर चालून आले असतां इतके फौजेस मी पुरतों असें नाहीं; आज माझी गत, अशा तुमच्या गती उद्यां होतील." असा निरोप सांडणीस्वारांच्या तोंडचा ऐकल्यानंतर कोणी फौजेपैकीं किंवा[34] सरदार पुढें पाऊल घालीना. त्यावेळेस श्रीमंत म्हणतात, "अरे चला." तेव्हां अवघ्यांनीं श्रीमंतांस विनती केली "आम्ही विंचुरकर यांजवर लढाईला जाणार नाहीं." असें श्रीमंतांनीं ऐकून विठ्ठल शिवदेव यांस चोपदार बोलावूं पाठविला. तेव्हां तसेच निरोपाबराबर विंचुरकर येऊन श्रीमंतांस भेटले. त्यावेळेस श्रीमंतांनीं विचारलें कीं, "हें काय ! आपणांमध्यें फितूर !" हें ऐकून विंचुरकर यांणीं उत्तर केलें कीं, "अशीं[35] माणसें स्वामींच्या पदरीं असावीं यांत भूषण सरकारचें. आतां विनंती अशी करितों कीं, किल्लेदार याजला जीव माफ करून त्याला सोडून द्यावा. किल्ला आपले स्वाधीनच आहे." ती गोष्ट श्रीमंतांनीं कबूल करून विंचुरकर यांस सांगितलें कीं, "आतां सरकारचा हल्ला किल्यावर चढावयाचा." त्यासमयीं विठ्ठल शिवदेव याणीं जासूद आपले चिरंजिवास किल्यांत पाठविला कीं, "तुम्ही आतां लढूं नये. सरकारचा हल्ला किल्यावर होत आहे." असें पत्र जातांच शिवाजीपंत खालीं उतरून लष्करांत येऊन पोंचले. सरकारचा हल्ला किल्ल्यावर चढला. किल्ला सही केला. मालमत्ता, खजिना वगैरे किल्ल्यांत बहूत सांपडलें. सरकारांतही पैका महामूर आला. सारे लष्करांत त्या

३३. 'कालची बातमी अशी असतां' असा इंदूरच्या प्रतीचा पाठ आहे. ३४. मुळांत 'किंवा' च्या ठिकाणीं 'व' आहे. ३५. अशीं माणसें = किल्लेदारासारखीं.

दौलतेनें आभर झाले. कोणी रिकामा राहिला नाहीं. किल्ला सारा लुटून किल्ल्यावरील तोफा खालीं उतरून सरकारांत आणिल्या. अशी दौलत कोठेंही सांपडावयाची नाहीं. खेरीज जवाहीर व तलवारी व बंदुका व कटारी व पेषकबज[३६] व बिचवे व सांगा व बरच्या अशीं हत्यारें बहूत सांपडलीं. अशी स्वारी फत्ते करून स्वारी सरकारची पुण्याकडे यावयास निघाली.

पुण्यास येऊन दाखल झाल्यानंतर रास्ते यांस सरकारांतून सरदारी दिली. चार हजार फौजेच्या खर्चास दोन लक्ष[३७] रुपयांचा मूलूख जाहागीर दिला. तसेंच पटवर्धन सरकारांत चाकर राहिल्यावर दोन चार कामगिऱ्या त्यांणीं मोठ्या बजाविल्या; त्याजवरून त्यांस सरदारी देऊन मिरज प्रांत बत्तीस लक्षांचा मुलूख किल्ल्यासुद्धां पटवर्धन यांस जाहागीर दिला. तसेंच विंचुरकर यांसही वीस लक्षांचा मुलूख जाहागीर दिला. नारो शंकर राजेबहादर यांसही ३० लक्षांचा मुलूख जाहागीर फौजेचे खर्चास दिला. असे सर्व ब्राह्मण व मराठे मिळून सर्वांस जाहागिरी फौजेच्या खर्चाबद्दल दिल्या. राज्य जोरावर झालें.

जे सालीं श्रावण मासीं १६ लक्ष रुपये श्रीमंतांनीं खिचडी वांटली, त्याचे दुसरे सालीं ८० हजार ब्राह्मण दक्षणेस झाला. श्रीमंतांचे मनांत लाख ब्राह्मण दक्षणेस व्हावा; परंतु ती गोष्ट न[३८] घडली. श्रीमंतांची स्वारी पर्वतीस दर्शनास गेली म्हणजे पांच तोफा व्हाव्या, तेथून स्वारी निघाली म्हणजेही पांच तोफा सोडाव्या, असा बंदोबस्त करून सर्व राज्यांत हिंदुस्थानसुद्धां सरकारची जरब मोठी बसली.

पुढें रूमशामचे[३९] बादशाहाकडून दिल्लीस फौज रवाना झाली. हें वर्तमान पुण्यास येतांच 'पुढें होणार तशी बुद्धी होते' यासाठीं भाऊसाहेब यांचे मनांत आलें कीं, "आपण स्वारीस इराणी येत आहे याजवर जावें." असा निश्चय करून, फौजेची तयारी करून, तीन लाख फौज समागमें घेऊन,

---

३६. पेषकबज=एक प्रकारची कट्यार. ३७. रास्ते पेशव्यांचे निकट संबंधी असून त्यांस इतरांच्या मानानें जाहागीर इतकी थोडी कां? ३८. कल्याणच्या प्रतींत 'न' नाहीं ती चुकी आहे हें 'परंतु' ह्या शब्दावरून स्पष्ट होतें. वरील पाठ इंदूरच्या प्रतीचा. ३९. रूमशाम म्हणजे कान्स्टान्टिनोपल. तेथील बादशाहानें कंदाहारचा राजा अहमदशाहा अबदाली यास दिल्लीपतीचे मदतीस पाठविलें असा मराठी बखरींचा रोख असतो.

शिंदे, होळकर, गायकवाड, किरकोळ सरंजामी, विंचूरकर, पोंवार, निंबाळकर सेरीज हुजुरात व तोफखाना असा २।२॥ लक्ष फौजेचा जमाव करून निघावयाची तयारी झाली. त्या वेळेस पदरच्या लोकांनीं व मुत्सद्दी व कारभारी यांणीं जावयासाठीं भाऊसाहेब यांस वर्जिलें. परंतु कोणाचें ऐकिलें नाहीं. होणार तें कधीं चुकावयाचें नाहीं. याप्रमाणें सिद्धता होऊन श्रीमंत नानासाहेब यांणीं भाऊसाबांची रवानगी केली. समागमें वडील पुत्र चिरंजीव विश्वासरावसाहेब यांची [ रवानगी ] केली.

ते निघाले ते मोंगलाईतून चालिले. त्या वेळेस निजाम*अल्लीखां यांणीं कटकट काढून लढाईचा प्रसंग झाला. तेव्हां ती लढाई फत्तेकरून मोंगलांपासून खंडणी घेऊन स्वारी पुढें चालली. खानदेशांतून बऱ्हाणपुरावरून नर्मदा उतरून स्वारी माळव्यांत गेली. तेव्हां माळव्यांत व हिंदुस्थानांत सरकारच्या फौजा होत्या त्या भाऊसाहेब यांस मिळाल्या. बुंदेले व झांशीवाले तमाम समागमें निघाले. असे माळवा टाकून, †हाडोती †खेचिवाडा हा मुलूख टाकून हिंदुस्थानांत स्वारी गेली. त्या समयीं हिंदुस्थान-प्रांतींचे संस्थानी, राजेरजवाडे, पाळेगार, जयपूर, उदेपूर, भरतपूरवाले, डिंग, कुंभेरी, चितोड, रामनगर, असे सर्व भाऊसाहेब यांस येऊन भेटले. तेव्हां फौजेचा जमाव चार लक्षांचा झाला.

असे मजल दरमजल दिल्लीस जाउन पोंचले. चालतांना वाटेनें मुलूख वैरांण[४०] झाला. फौजेस खर्चास पैसा नाहीं[४१]. त्यासमयीं दिल्लीचे बादशाहांचें तख्त फोडून, खजीना काढून, तेथून निघून, कुंजपुरावर येऊन, सारा कुंजपुरा लुटून, पैका मुचलख घेऊन, तेथून स्वारी दरकूच यमुनातीरास येऊन, तेथें मुक्काम केला. पलीकडून, इराणी[४२] येत होता, त्याचा रस्ता कोंडून उभे राहिले. तेव्हां त्याची यांची लढाई मोठी होऊन त्या लढाईस भाऊसाहेब जय *पावले.

---

* निजामउल्मुल्क याचा पुत्र सलाबतजंग गादीवर होता. निजामअल्ली हा त्याचा कारभार करीत असे. † हे प्रदेश राजस्थानांतील होत. ४०. वैराण = ओसाड. ४१. तरी भाऊंनीं २ कोट रुपये बरोबर घेतले होते. ४२. म्हणजे अहमदशाहा अबदाली हा पूर्वी इराणचा बादशाहा नादिर याचे पदरीं सरदार होता. * ह्या स्वारीची व पानिपतच्या लढाईची हाकिकत काशीराय पंडित, सुजाउद्दवल्याचा कारभारी, याणें इत्थंभूत फारसी भाषेंत लिहून ठेविली. तिचें इंग्रजी भाषांतर एशियाटिक सोसायटीमध्यें

इराणी उतरून आलीकडे आला. त्याचेही फौजेचा जमाव दोन लक्षांचा होता. त्याच्या यांच्या लढाया मोठ्या शर्तीच्या झाल्या. त्या समयीं इराणी आपलेठिकाणीं हार मानून भाऊसाहेब यांशीं सलुख्याचें बोलणें लावलें. परंतु सदाशिवपंत भाऊ कोणाचें ऐकत नाहींसे झाले. आपापल्या मतें सर्व सरदार लहान थोर शिंदे, होळकरसुद्धां यांणीं विनंती बहुतां प्रकारें केली. परंतु सदाशिवपंत भाऊ यांचें म्हणणें "एक इराणी राहील किंवा आम्ही राहूं." असा निश्चय समजला तेव्हां मागती लढाईस उभे राहिले. एकूण चार लढाया मिळून पेशवे यांजकडील फौज बहूत खपली. इराणीची खपली. परंतु इराणी याचा पिछा चांगला पाठीमागून होता. त्यामुळें त्याला कुमकेस फौज आणखी नवीन येत गेली. पेशवे यांचा पाठीमागून पुरावा नाहीं. त्यामुळें सैन्य थोडें राहिलें. तें पांचवे लढाईत बहूतें खपलें. शेवटीं विश्वासरावसाहेब यांस अंबारींत गोळी कोणीं दुष्टानें मारली. त्याणें ते[४३] ठार झाले. ते सदाशिवपंत भाऊ यांणीं पाहून अगदीं निदान केलें. आतां दक्षिणेंत जाऊन काय तोंड दाखवावें! असा निश्चय करून, राहिलें सैन्य समागमें घेऊन मल्हारराव होळकर दाहा हजार फौजेनिशीं होते.

---

ठेविलें आहे. काशीराय स्वतः ह्या लढाईत होता व त्यानें निःपक्षपातानें प्रत्येक गोष्टीची बारीक चौकशी करून ही हकिकत लिहिली. त्याच्या ग्रंथाचें मराठी भाषांतर कांहीं वर्षांपूर्वी 'विविधज्ञानविस्तार' या मासिक पुस्तकांत छापिलें. अलीकडे 'लोकहितवादी' नेंही जी पानिपतच्या लढाईची हकिकत छापिली आहे ती ह्याचेंच भाषांतर आहे. खुद्द मराठ्यांनींही ह्या हानिकर युद्धाच्या निरनिराळ्या बखरी लिहिल्या. या बखरींपैकीं मल्हारराव होळकरांसारख्या त्या प्रसंगास असणाऱ्या लोकांनीं कांहीं लिहिल्या व कांहीं मागाहून लिहिल्या आहेत. आम्हांस पानिपतच्या लढाईच्या ५ बखरी मिळाल्या आहेत. पैकीं एक रत्नागिरीस मिळाली. दोन आमच्या दोन पुणेकर मित्रांनीं दिल्या व एक नगराहून एका मित्रानें पाठविली. यांतून रत्नागिरीस उपलब्ध झालेली व पुण्यांत उपलब्ध झाल्यापैकीं एक ह्या एकच बखरीच्या प्रती आहेत असें ताडून पाहतां कळून आलें. ह्या बखरींत ह्या लढाईची हकिकत फार चित्तवेधक व सविस्तर आहे.

४३. विश्वासराव पडेपर्यंत-सकाळपासून दुपारचे २ वाजतपर्यंत-मुसलमानांचाच मोड होत गेला. पण नंतर लौकरच पळापळ सुटली. पूर्वीं विश्वासरावास बादशाही तक्तावर बसविण्याचें भाऊसाहेबांच्या मनांत आलें होतें. त्याबद्दल कांहीं लोक त्यांस दोष देतात, पण कांहीं असें म्हणतात कीं, त्यांणीं तसें एकदम केलें असतें तर बरें झालें असतें. कारण त्या योगें रजपूत लोक ह्या नव्या हिंदु बादशाहाकडे आपली दिल्लीपतीवरील राजनिष्ठा दाखविण्याकरितां एकदम मिळाले असते. मॉलेसनचें महादजी शिंद्याचें चरित्र पाहा.

त्यांस भाऊसाहेब यांणीं सांगितलें कीं, "आतां तुम्हीं सर्वांचे § काबिले घेऊन बाजारबुणगे संभाळून माघारें दाक्षिणेंत जावें." तेव्हां नानफडणीस वगैरे मंडळी होती ती माघारी फिरली व भाऊसाहेब यांणीं युद्धास आरंभ करून आपण जातीनें तीन हजार स्वारानिशीं गिलच्याचे फौजेंत मिसळून गेले. त्या समयीं युद्ध मोठें घनचक्र झालें. शके १६८२ पौष शुद्ध ८ मीस भाऊसाहेब गर्दींत मिळाले. कोठें ठिकाण नाहींसें झालें. साडेतीन लाख फौज तितकीही तेथें [४४]खपली. त्या दिवशीं मोठे उल्कापात झाले. दिवसास तारा पडला. दिवाकर चार घटका असतां अंधःकार पडला. असें युद्ध मानवी मार्गें झालें नाहीं व पुढें होणार नाहीं. असा लौकिक सदाशिवपंत भाऊ यांणीं युद्धाचा मिळविला. मल्हार[४५]राव होळकर दाहा हजार फौजेनिशीं माघारे आले ते सर्व सटलें घेऊन पुण्यास पोंचले. तेव्हां श्रीमंत नानासाहेब यांस सर्व वर्तमान कळतांच भाऊसाहेब व विश्वासरावसाहेब गेल्यामुळें त्या शोकानें नानासाहेब यांची कंबर *बसली.

---

§ कबिले=कुटुंबें, बायका. ४४. ह्या लढाईंत भाऊसाहेबांनीं जे आपले आंगीं दोष दर्शविले व त्यांणीं ज्या चुक्या केल्या असें म्हणतात त्या येणेंप्रमाणें:—१. त्यांस उदगीरच्या लढाईंत जय मिळाल्यामुळें फार गर्व झाला होता. २. पूर्वींचा मराठी साधेपणा सोडून त्यांणीं मोंगलांचा डामडौल उचालिला. ३. पूर्वींची मराठी लढाईची रीत म्हणजे शत्रूला जिकडून तिकडून आडवून त्याचा दाणा वैरण बंद करणें, व त्याचे सैरावैरा फिरणाऱ्या लोकांस ठार करणें, फार मारा झाल्यास पळ काढणें, शत्रूस पाठीवर घेऊन एकदम उलटून त्यास दोहींकडून गांठणें वगैरे, ती सोडून कवाइती शिपायांच्या जोरावर त्यांणीं एकदम सामना केला. ४ सुरजमल्लजाटाचा उपदेश न ऐकतां वाईट शब्द बोलून त्यास त्यांणीं घालविलें. ५ होळकरांचें मन दुखविलें, तसेंच दुसऱ्या सरदारांवरही त्यांणीं जरब विशेष ठेविली. ६. पानिपत येथें खंदक खणून आपणास कोंडून घेतलें. ७ आपलें सर्व सैन्य एकदम लढाईंत आणलें, पाठीमागें राखून कांहीं ठेवलें नाहीं. ८. सुजाउद्दवल्यावर विश्वास फार ठेविला, भाऊंचीं जितकीं पत्रें त्यास जात तितक्यांचीं उत्तरें अबदालीच्या मसलतीनें तो पाठवी. ९. विश्वासराव पडल्यावर धीर न धरितां होळकरांस "कुटुंबें संभाळून न्या" असा निरोप त्यांनीं पाठविला व आपण अविचारानें नाशार्थच गर्दींत घुसले. इ० ४५. परत आलेल्या लोकांत मल्हारराव, दमाजी, राजेबहादर, नाना फडणीस, महादजी शिंदे वगैरे होते. त्या वेळची पळणारांची स्थिती कशी झाली होती ती 'नाना-फडणीसाचें चरित्र' अगर मॉलेसनचें 'महादजी शिंद्याचें चरित्र' यांत वार्णिली आहे.

* नानासाहेबांस ही वातमी बऱ्हाणपुरास लागली. तेथें एका सावकारास पत्र आल्यांत "दोन मोतीं गळालीं, २७ मोहरा हरवल्या, रुपये व खुर्दा यांचा पत्ता नाहा." असा

त्या वेळेस तो मजकूर दादासाहेब यांणीं पाहून, लागलीच स्वारीची तयारी करून, लाख सरंजाम समागमें घेऊन, हिंदुस्थानांत गिलच्यावर मोहिमेस[४८] गेले. ते मजल दरमजल जयपुरास जाऊन जयपूरवाले यांस सांगून पाठविलें कीं, "तुम्ही लढाईस घेऊन उभे राहा. नाहीं तर आम्हांस खंडणी द्या." असा मजकूर सांगून पाठवितांच जयपूरवाले यांणीं दादासाहेब यांस सांगून पाठविलें कीं, "तुम्ही आपली लढाईची तयारी करावी, आम्ही लढाईस येतों." असें सांगून पाठवून जयपूरवाले खांसा राजा पन्नास हजार साठ हजार मोठमोठे पुरभय्ये व रजपूत एका मांडीचे स्वार केशरी पोषाक करून बाहेर येऊन लढाईच्या तोंडीं उभे राहिले, आणि लढाईस गलीम कोण आला आहे हें मनांत आणतात, तेव्हां समजलें कीं ब्राह्मण आहे. त्या वेळेस जयपूरवाले राजे यांणीं दादासाहेब यांस सांगून पाठविलें कीं "आम्ही ब्राह्मणाशीं लढाई करीत नाहीं." हें ऐकून दादासाहेब यांणीं सांगून पाठविलें कीं, "तुम्ही लढाई करीत नाहीं तर आम्हांस खंडणी द्यावी." त्या वेळेस जयपूरवाले यांणीं दादासाहेब यांजकडे सांगून पाठविलें कीं, आम्हीं ब्राम्हणास खंडणी देत नाहीं, दक्षणा म्हणून घ्याल तर देतों. त्या वेळेस दादासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, "आम्ही ब्राह्मण आहों, दक्षणा घेतों." असें जयपूरवाले यांणीं ऐकल्यानंतर दाहा लक्ष रुपये दादासाहेब यांस पाठवून दिले व एक डेरा मखमाली सोन्याचे कळसाचा दिल्हा. तो घेऊन दादासाहेब पुढें दरकूच दिल्लीस जाऊन पोहोंचले. पोहोंचल्याच्या अगोदर गिलच्या दिल्लीस येऊन दिल्लीचा बंदोबस्त करून माघारा फिरला. त्या समयीं श्रीमंतांची स्वारी तेथें पोंचली. तेव्हां वर्तमान ऐकलें कीं, गिलच्या माघारा गेला. त्या वेळेस गिलच्याचा पाठपुरावा करीत श्रीमंत चालले. ते यमुना उतरून पार गेले. त्या मुलखांत हिंदूस पाणी प्यावयास मिळावयाचें नाहीं म्हणून मुक्कामाचे मुक्कामास नव्या विहिरी खणीत गेले असा पाठपुरावा करीत गेले. ते अटकनदीच्या तेथें त्यांची गांठ पडून लढाई मोठी झाली. त्या वेळेस गिलच्याचा मोड झाला.

---

मजकूर होता. त्यावरून खरें वर्तमान नानांच्या ध्यानीं आलें. नंतर थोडेच दिवशीं नाना फडणीस वगैरे मंडळी उत्तरेकडून येऊन पोंचली. ४८. ही दादांची स्वारी कोठें दिलेली आढळत नाहीं. ही बखरकाराची कल्पनासृष्टी दिसते.

भाऊसाहेब मेल्याचा त्वेष दादासाहेब यांचे मनांत होता. त्या रागानें घोड्यावरून उडी टाकून, हातीं पेशकबज घेऊन, मुख्य इराणी यास खालीं पाडून त्याचे छातीवर गुडघा दिला, आणि त्याचा गळा कापावा आणि त्याचें रक्त प्राशन करावें असा राग आला होता. गळ्याला पेशकबज लाविलें. त्या वेळेस रणजितसिंग[४७] शीक समागमें होते. त्यांणीं दादासाहेब यांचा हात धरून एकीकडे काढिलें. आणि म्हणतात, " मुसलमानाचें रक्त पिऊन ब्राह्मणपणा बुडवायाचा आहे कीं काय ! " असें बोलून दादासाहेब यांस शीक यांणीं एकीकडे घेतलें.

अशी स्वारी फत्ते करून माघारे फिरून लाहोरास येऊन, रणजितसिंग शीक याची तेथें स्थापना करून, तेथून श्रीमंत निघाले ते दिल्लीस येऊन, दिल्लीचा बंदोबस्त केला. तों इतक्यांत पुण्याहून श्रीमंत नानासाहेब यांची प्रकृती बिघडली म्हणून पत्रें पुण्याचीं आलीं. तीं पाहून तेथून दादासाहेब मजल दरमजल मोठ्या मोठ्या मजला करून पुण्यास येऊन पोहोंचले. नंतर नानासाहेब " भाऊ ! भाऊ ! " म्हणून शके १६८३ ज्येष्ठ शुद्ध ८ मीस कैलासवासी[४८] झाले.

---

# माधवराव बल्लाळ ऊर्फ रावसाहेब

## इ० स० १७६१–१७७२

[ नानासाहेब कैलासवासी झाले ] त्यांचें उत्तर कर्म होऊन पुढें रघुनाथराव दादा याणीं थोरले रावसाहेब यांस समागमें घेऊन साताऱ्यास जाऊन, ताराबाईसाहेब यांस भेटून, रामराजे यांजकडून श्रीमंत रावसाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं व शिक्के करून दिले. नंतर दादासाहेब श्रीमंतांस घेऊन पुण्यास आले. येऊन आपण राज्याचा कारभार करूं लागले. श्रीमंतांस आपले

---

४७. रणजितसिंग. पुढें प्रसिद्धीस आलेला रणजितसिंग ह्या वेळीं जन्मलाही नव्हता (१७८०–१८३९). तेव्हां बखरींतला शीक सरदार दुसरा कोणी असला पाहिजे.
४८. नानासाहेब पर्वतीच्या देवळा मागें कैलासवासी झाले. ज्येष्ठ वद्य षष्ठी मंगळवार असें इतरत्र आढळतें.

छापेंत ठेविलें. रावसाहेब यांणीं कारभारांत बोलूं नये अशा डौलानें श्रीमंतांस वाड्यांत बंदोबस्तानें ठेविलें. परंतु रावसाहेब याप्रमाणें राहतील असें न घडे. परंतु जातीनें लेंकरूपणा म्हणून चार दिवस त्यांच्या अनुसंधानानें राहिले. तत्रापी गंगोबा तात्या दिवाण, निजयत होळकर, हे कांहीं उणें उत्तर बोलले म्हणून खांसा स्वारी उठून आपल्या हातीं छड्या गंगोबास मारून पात फोडिली. दुसरे दिनकर महादेव जोशी हे वाड्यांत पंक्तीस जेवीत असतां, पंक्तींत श्रीमंत असतां कांहीं असेंच उत्तर बोलतांच तें श्रीमंतांनीं एक पळभर सहन न करतां दिनकर महादेव याच्या तोंडांत मारिल्या. तेव्हां साऱ्या वाड्यांत जरब बसली. कोणी समोर बोलेनासें झालें. समोर उभे राहणें कठीण. परंतु वडिलांची अमर्यादा करूं नये म्हणून त्यांच्या संधानानें वर्षें झाल्यापासून रावसाहेब होते.

तेव्हां पुढें मोंगलाचा बिघाड झाला. त्या स्वारीला सारी फौज घेऊन दादासाहेब निघाले. नबाब तिकडून राक्षसभुवन पावेतों चालून आले. तेव्हां श्रीमंत फौजेसुद्धां राक्षसभुवनास जाऊन पोंचले. नबाब निजामअल्लीखां मोठा सरंजाम घेऊन आले. त्या समयीं राजे विठ्ठल सुंदर दिवाण होते. त्यांच्या

---

१. चंद्रचूड यांचे मूळपुरुष. २. माधवरावाचा स्वभाव तापट असे व त्याला उणें उत्तर किंवा अवज्ञा अगदीं खपत नसे. गंगोबा तात्याबद्दलची गोष्ट ग्रांट डफ निराळ्या तऱ्हेनें सांगतो. कोणे एके दिवशीं दरबारांत गंगाधर यशवंत म्हणाले, "हल्लींच्या कारभारांत चाललेला सर्व पोरकटपणा ह्या वृद्ध दृष्टीस स्पष्ट कळत आहे." हें बोलणें माधवरावास न खपून त्यानें एकदम मसनदीवरून उठून भरदरबारांत गंगोबाच्या तोंडांत सडकून मारिली. हें पाहून सर्व आपापल्या जागीं थक्क झाले. यावरून पुढें दादांचें व माधवरावाचें वांकडें पडल्यानंतर गंगोबा तात्या दादांस मिळाला. (१७६८.) ३. ही मोंगलावरील स्वारी १७६३ सालीं झाली. यापूर्वीं निजामअल्लीस २७ लक्षांचा मुलूख देऊन मागें लाविलें होतें. नंतर दादांची व माधवरावाची लढाई सुरू होऊन माधवराव दादांस शरण गेला, तेव्हां दादांनीं त्यास नदरकैदेंत ठेवून आपण राज्यकारभार पाहूं लागले. त्यांत पुष्कळ सरदारांचीं मनें दुखावलीं. त्यामुळें ते सर्व जाऊन मोंगलांकडे विठ्ठल सुंदर याच्या मार्फत फितूर झाले. अशी ही १७६३ ची स्वारी उपस्थित झाली. ४. ह्या राक्षसभुवनच्या लढाईस मराठे तांदुळज्याची लढाई म्हणतात, असें ग्रांड डफ साहेब लिहितो. पण या बखरींत तसा प्रकार नाहीं. येथें उदगीरच्या लढाईस मात्र तांदुळज्याची लढाई असें नांव दिलें आहे. मागें पृष्ठ ५० पाहा. ५. विठ्ठल सुंदर—हे साडेतीन शाहाण्यांतील एक—यांस राजे प्रतापवंत असा किताब होता.

मनांत बहुत दिवसांची खुमखुम* लढाईची राहिली होती कीं, पेशवे यांशीं लढाई घेऊन त्यांचा मोड करावा. त्या उद्देशानें विठ्ठल सुंदर मोठा पोक्त सरंजाम घेऊन चालून आले. श्रीमंतही इकडून मोठ्या सरंजामानें गेले तेव्हां त्या लढाईच्या प्रसंगीं श्रीमंत रावसाहेबांस दोन कोसांचे छाप्यानें पाठीमागें ठेविलें. त्यांचे रखवालीस हजार पंधराशें स्वार मोठा निवडक, कीं दहा हजार फौजेस भारी, असा ठेविला. आणि दादासाहेब पुढें लढाईच्या प्रसंगास जाऊन उभे राहिले. लढाई सुरू झाली. पुढें लढाई होत आहे. त्या समईं दादासाहेब हत्तीवर अंबारींत बसले होते. त्या हत्तीस दारू पाजून पायांत अंदू§ खिळले असतां तेथून आपण अंबारींतून तिरंदाजी करीत होते. अशी सारी हुजुरात लढाई घेत आहे. परंतु विठ्ठल सुंदर जातीनें लढाईस उभे राहिले. लढतां लढतां नबाबाकडील फौजेनें मोठा लगट लढाईचा केला. एकसारखा ऐशी नव्वद हजार पठाण श्रीमंतांवर चालून आला. त्यानें लढाईची मोठी शर्थ केली. त्यामुळें श्रीमंतांच्या फौजेचा मोड होऊन फौजेनें पळ काढला. हें पाहून विठ्ठल सुंदर पुढें येऊन दादासाहेब यांचा ‡हत्ती वळविला. अशी शिकस्त लढाईची झाली. त्या समयीं दोन कोस पाठीमागें रावसाहेब उभे होते त्यांजपाशीं लढाईतून सांडणीस्वार येऊन, झालें वर्तमान कच्चें श्रीमंतांस विदित केलें. त्या समयीं रावसाहेब घोड्यावरच बसले होते. तेव्हां समोंवते रखवालीस स्वार होते त्यांस विचारलें कीं "आतां विचार कोणता करावा?" त्या वेळेस सर्वांनीं एकच उत्तर केलें "जशी सरकारची आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं." असें श्रीमंतांनीं ऐकतांच श्रीमंत मागती विचारतात, "इतके असामी माझे जिवाचे सोबती आहां किंवा नाहीं?" असें श्रीमंतांचें वचन ऐकतांच सर्वांनीं मागती उत्तर केलें, "हें काय विचारावें? आपण खावंद आम्ही चाकर; जिकडे खावंद जातील तिकडे येणें भाग आहे." असें सर्वांचें एकदिलाचें भाषण एकतांच श्रीमंतांनीं सांगितलें, "आतां घोड्याच्या अनीना* उचला." त्यासमयीं श्रीमंतसुद्धां पंधराशें

* खुमखुम असल्याचें कारण उद्‌गीरच्या लढाईंत झालेला पराजय. § अंदू= सांखळदंड. ‡ ही लढाई राक्षसभुवन येथें झाली. हें गांव गोदावरीचे तीरीं आहे. निजामअल्ली नदीपलीकडे उतरून गेला व विठ्ठल सुंदर आपल्या सैन्यासह जाणार तों मराठ्यांनीं त्यावर हल्ला सुरू केला. तेव्हां लढाईचा सर्व प्रसंग विठ्ठल सुंदर यांजवरच पडला. निजामअल्ली नदीपलीकडे असल्यानें त्याच्यानें आपल्या दिवाणास चांगलीशी मदत करवली नाहीं. ग्रांट डफ. * लगामाच्या दोऱ्या.

स्वारांची † मांड एकदांच उठली. तेव्हां त्या वाटेनें मल्हारजी होळकर भेटले त्याणीं रावसाहेबांस सांगितलें कीं, "माघारे चला. पुण्याचें राज्य करूं." ते वेळेस रावसाहेब बोलले कीं, "काका, भाऊसाहेब यांस आपण मागें बुडविलें असें ऐकत होतों तें आज खरें झालें." तें होळकर याणीं ऐकतांच मल्हारराव बोलले कीं, "बाळा, आतां चलावें आणि माझी तलवार पाहावी." तेव्हां रावसाहेब चढ्या घोड्यानिशीं होळकरासुद्धां गेले. दादासाहेब यांचा हत्ती घेरला होता त्याच्या आलीकडे नबाब निजामअल्लीखां हत्तीवर बसून उभे होते. तेथपावेतों रावसाहेब मारीत मारीत गेले. तेव्हां सारे लढाईची फळी फोडून जेथें नबाबाचा हत्ती उभा होता त्या हत्तीपाशीं जाऊन, श्रीमंत उभे राहून, समागमें स्वार होते त्यांस आज्ञा केली कीं, "अंबारीचें भारकस कापा." पुढें महात होता त्यास सांगितलें कीं, "हत्ती खालीं बशीव." त्या वेळेस नबाब अंबारींतून खवासखान्यांत बसले होते, त्याणीं रुमाल फिरविला. इतक्या अवकाशांत श्रीमंतांकडील फौज व हुजुरात व मानकरी पळाले होते ते सारे जरीपटकासुद्धां, माघारे येऊन रावसाहेबांभोंवते मिळाले. त्या समयीं फिरून लढाई सुरू झाली. लढाई करीत करीत जेथें दादासाहेब यांचा हत्ती उभा होता तेथपावेतों मारीत मारीत गेले. तेव्हां विठ्ठल सुंदर मागती लढाईला उभे राहिले. तेथें लढाई मोठी कट्टी झाली. त्या वेळेस श्रीमंतांकडील किंवा नबाबाकडील विठ्ठल सुंदर यांस गोळी लागून लढाईत ठार झाले. तेव्हां नबाबाचे फौजेचा धर सुटला. फौज पळूं लागली. ते वेळेस श्रीमंतांचे फौजेनें मोठा लगट करून दादासाहेब यांचा हत्ती माघारा आणिला. रावसाहेब पहिल्या तडाक्यास नबाबाचे हत्तीपावेतों पोंचत तोंपर्यंत पंधराशें स्वारांपैकीं साहाशें स्वार ठार झाले. खेरीज जखमी. याप्रमाणें युद्ध मोठें मातबर झालें. दादासाहेब यांस घेऊन

---

†मांड = तुकडी. थवा. ७पाणिपतच्या लढाईच्या वेळीं फितुरी केल्याचा, किंवा निदान कसुरी केल्याचा आरोप होळकरावर आला होता. ८. चढ्या घोड्यानिशीं = एकदांही घोड्यावरून न उतरतां, एका धांवें सरसे, थांबल्याशिवाय किंवा दम घेतल्याशिवाय. ९. भारकस-दोर, बंधन. १०, खवासखाना = अंबारीच्या पाठीमागें खिजमतगाराची जागा. तेथें शस्त्राघात चुकविण्याकरितां मागें गेले असावे. ११. रुमाल फिरविला = "आम्ही आपल्यां स्वाधीन होतों. हल्ला बस करा," असें रुमाल उडवून दर्शविलें. निजामअल्ली लढाईंत नव्हता. तो नदीच्या (गोदावरी) पलीकडे उतरल्यावर अलीकडे लढाई जुंपली, असें ग्रांट डफ म्हणतो.

रावसाहेब सगळी फौज समवेत घेऊन आपले तळावर आले. मोंगलाचा मोड झाला. खंडणी जी काय घ्यावयाची ती घेऊन सरकारचे स्वारीचा कूच होऊन, मजल दरमजल पुण्यास येऊन दाखल झाले.

तेव्हां दादासाहेब यांणीं रावसाहेब यांस सांगितलें कीं, "बाळा, तूं आतां राज्यकारभार संभाळावा." अशी वडिलांची आज्ञा होतांच रावसाहेब यांणीं कारभार संभाळला. जी रखवाली रावसाहेब यांजभोंवतीं होती तीच दादा-साहेब यांस ठेविली,[१२] आणि विनंती केली "आतां आपण स्वस्थ वाड्यांत स्नानसंध्या करून असावें; मी कारभार करितों याजवर आपण नजर ठेवून असावें." वरकड सखारामबापू वगैरे मुत्सद्दी मंडळी व कारकून वगैरे वाड्यांतील खासगीवाले,[१३] वांकनीस* या सर्वांस ताकीद सरकारची झाली कीं, "आज-पासून दादासाहेब यांजकडे कोणी गेला असतां त्याचें पारिपत्य करीन." अशी ताकीद होतांच त्या दिवसापासून दादासाहेब यांजकडे कोणी जाईनासें झालें. चार महिने गेल्यानंतर सखारामबापू यांची ढवळाढवळ करावयाची खोड जाईना असें श्रीमंतांनीं पाहून सखारामबापूंस आज्ञा केली कीं, "आजपासून तुम्हीं घरीं राहात जावें. बोलावूं त्या समयीं येत जावें." अशी आज्ञा होतांच बापू[१४] नमस्कार करून घरीं गेले. लगेच पाठीमागून दरवाजावर सरकारांतून

---

१२. दादांस कैद १७६८ सालीं केलें. दादांचें मन माधवरावाविषयीं शुद्ध कधींच नव्हतें. याचें मुख्य कारण आनंदीबाईचा उपदेश. अर्धें राज्य घेण्याविषयीं दादांच्या मनावर तिनें प्रेरणा केली होती. राज्यांत आवाडाव न करण्याविषयीं माधवराव त्यांस वारंवार सांगे व एकविचारानें चालण्याविषयीं दादांची प्रार्थना करी. शेवटीं २५ लक्ष रुपये रोख व १३ लक्षांची जहागीर तो दादांस देऊं लागला. पण दादांस अर्धें राज्य पाहिजे होतें तेव्हां त्यांणीं तें बोलणें नाकबूल करून युद्धाचा प्रसंग आणिला. त्यांत त्यांचा पराभव होऊन माधवरावानें त्यांस कैद केलें. बखरींत लिहिल्याप्रमाणें सलुख्यानें राज्यकारभार माधवरावाच्या स्वाधीन त्यानीं केला नाहीं पण ह्या शेवटल्या गोष्टी १७६८ सालीं झाल्या. ग्रांट डफ. १३. खासगीवाला = खासगीकडील रोकड ठेवणारा कामगार. * वांकनीस = वाड्यांतील भोजनाचा वगैरे जिनसांची व्यवस्था पाहणारा कारभारी. १४. सखारामबापू यांचें पुरें नांव 'सखाराम भगवंत बोकील' असें होतें. हा हिवरे येथील कुळकर्णी महादाजीपंत पुरंदरे यांच्या पदरीं कारकून होता. हे साडेतीन शहाण्यांपैकीं एक होत. हे पंताजीपंत—ज्याणें अफझुलखानाची व शिवाजी-महाराजांची प्रतापगडीं भेट करविली—त्याचे वंशज असें ग्रांट डफ म्हणतो. सखाराम-बापूचा दुटप्पीपणा प्रसिद्ध आहे. तरी त्याचा एकंदरींत कल दादासाहेबांकडे विशेष

दोन पहारे पाठविले. बापू यांस परवानगी खेरिज बाहेर जाऊं देऊं नये. असा बंदोबस्त सखारामपंत बापू बोकील यांचा केला. परंतु चार घटका रात्र झाली, दरबार बरखास्त झाला, म्हणजे तेवढे रात्रीस बापूंस श्रीमंतांनीं बोलावून आणून प्रातःकाळपासून जो कारभार केला तो वांकों[15] झाडून बापूंस सांगावा, त्याचें उत्तर बापूंनीं बोलत असावें, त्यामध्यें स्वहित किंवा गैरहित सांगतात याची मात्र *दुर्यासी श्रीमंतांनीं आपले ठिकाणीं करून बापूंस निरोप देत असावें. असा नित्य पाठ चालत होता. बापू जें काम करीत होते त्या कामावर मोरोबादादा फडणीस ठेविले. नाना फडणीस यांणीं फडणिशीचा कारभार केला. हरिपंत[16]तात्या यांजवर कृपा मोठी. तसेंच गोविंद शिवराम[17] खासगीवाले यांजवरही कृपा सरकारची होती. मामलेदारांमध्यें विसाजी केशव लेले हे सरकारचे कृपेंतील मोठे.

असा कारभार होत असतां स्वारी सरकारची कर्नाटकांत मोहिमेस[19] निघाली. ती येतगिरीचे किल्लयावर स्वारी सरकारची जाऊन पोहोंचली. किल्ला घ्यावा या बेतानें तेथेंच मुक्काम करून किल्लयावर मोर्चे लावून बसले. दोन महिने किल्ला भांडला. तेव्हां रावसाहेब यांणीं मनांत विचार केला कीं, एवढे किल्लया-साठीं लाख फौज घेऊन बसलों, तेव्हां पुढें आम्ही काय करणार? असा विचार करून, दुसरे दिवशीं किल्ला हल्ला करून घ्यावयाचा निश्चय करून, लष्करांत ताकिदीसाठीं भालदार फिरले,आणि सर्वांस सांगितलें कीं, "उदयीक किल्लयावर

होता. तो दिवाण असतांना माधवरावाचें वजन कारभारांत बिलकूल पडेना. तेव्हां माधवरावानें त्यास बलावून 'याचें कारण काय' असा प्रश्न केला. बापूनें सांगितलें कीं, 'मला घरीं बसवाल तर आपला अंमल चांगला चालेल.' मग त्याची जहागीर त्याजकडे ठेवून कारभार त्याजकडून काढिला. १५. वांका=हकीकत. * विचार १६. हरिपंततात्या—त्रिंबकराव दीक्षित म्हणून सावकार पुण्यास होते त्यांच्या पदरीं प्रथम हरिपंत फडके होता. पुढें तो सेनापती झाला. १७. गोविंद शिवराम खासगीवाले हा पुष्कळ उपयोगीं पडला होता. १८. विसाजी केशव हा बसणी (ता० रत्नागिरी) येथील राहणारा. वेठीस लोक धरूं नये असा आपला हुकूम तोडल्याबद्दल ज्यास माधवरावानें शिक्षा लाविली तोच हा. १९. ही स्वारी सन १७७०–७१ सालची असावी. त्यांत मलवळचा किल्ला हल्ला करून घेतला. या किल्लयास मराठे लोक निरनिराळीं नांवें देतात असें ग्रांट डफ म्हणतो. येथें बाजी व नागोजी घाटगे यांचा वतनाचा तंटा लागून असें ठरलें कीं, जो किल्ल्यावर आपलें निशाण प्रथम लावील तो वतनदार. नागोजीचें निशाण प्रथम लागलें.

हल्ला आहे. तर सर्वांनीं साज बंदुका बांधून पायउतारीं[20] यावें." अशी आज्ञा होतांच हल्ल्याच्या शिड्या वगैरे सरंजाम तयार होऊन श्रीमंत खासा स्वारी ढाल तरवार घेऊन पायउतारा लाख मनुष्य बरोबर तोडे शिलकावून[21] सभोंवते चालिले. सरकारचे मोर्चे बसले होते त्याच्या पलीकडे हल्ला चालून गेला. तेव्हां किल्लेदार यास बातमी लागली कीं, सरकारचा हल्ला किल्ल्यावर येतो. हें जाणून त्याणें वरून तोफांची मारागिरी[22] चालविली. शिवाय बंदुकी व जेजाला असा दुराठ्याचा[23] मार वरून होऊं लागला. त्यासमयीं अवघ्यांनीं श्रीमंतांस विज्ञापना केली कीं, "महाराज, वरून गोळ्यांचा पर्जन्य पडत आहे, यासाठीं सरकारांनीं हल्ल्यांत येऊं नये." अशी विज्ञापना सर्वांनीं केली. त्यावेळेस श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं, "गोळी लागून मी मरावयाचा असलों तर घरीं बसून वांचेन कीं काय?" अशी निश्चयाची गोष्ट सर्वांनीं ऐकली. त्यासमयीं सर्व फौज चोहींकडून लगट करून चालली. जो गोळी लागून पडला त्यास मागें ओढून टाकावा, आणि पुढें चालावें याप्रमाणें हल्ला सरकारचा चालला. दहा हजार मनुष्य ठार झालें. हल्ला निघाल्यापासून बारावे घटकेस किल्ल्यावर जाऊन भगवा झेंडा लाविला. असा येतगिरीचा किल्ला घेतला. किल्ला सहीकरून स्वारी कर्नाटकांत पुढें चालली. ते तुंगभद्रा पार होऊन *टिपूच्या मुलखांत आवाडाव मांडली. तेव्हां टिपू सावध होऊन लढाईच्या उद्देशें आला. त्या फौजेचा व या फौजेचा मुक्काम झाला. दोन्ही फौजांची गांठ पडून लढाई सुरू झाली. त्यावेळेस टिपू थोडासा चरकला हें पाहून श्रीमंतांचे फौजेनें मोठा लगट लढाईचा केला. लढाई मातबर झाली. शेवटीं टिपूनें सल्ला करून खंडणी देऊन श्रीमंत यांशीं बोलणें लाविलें कीं, किल्ला माघारा आम्हांस द्यावा. तें बोलणें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंतांच्या मनांत गोष्ट येऊन, किल्ला टिपूचे हवालीं केला. स्वारीखर्च घेऊन स्वारी माघारी पुण्यास आली.

---

२०. पायउतारा=पायीं. २१. तोडे शिलकावून=बत्या पेटवून. २२. मारगिरी=मारा. २३. दुराटयाचा=(?) *'टिपूच्या' बद्दल 'हैदराच्या' असें पाहिजे. (मागें पृष्ठ ३७ टीप † पाहा.) हैदर माधवरावाच्या पाठीमागें १० वर्षें होता. ही १७७०–७१ सालची लढाई माधवरावाच्या मृत्युकाळच्या सुमारास तह होऊन बंद झाली. हैदरावर या कारकीर्दींत स्वाऱ्या झाल्या त्या–१७६२ सालीं एक, १७६४–६५ सालीं दुसरी, १७६६–६७ सालीं तिसरी व १७७०–७२ सालीं शेवटली.

पुढें भोंसले यांशीं सरकारचा बिघाड झाला. त्यावेळेस मुधोजी[२४] भोंसले राज्यावर होते. त्यांचे पूर्वी नागपूरवाले भोंसले श्रीमंतांच्या कबज्यांत नव्हते. त्यासाठीं नवीन कटकट उत्पन्न करून भोंसल्यांच्या मुलखांत वऱ्हाडप्रांतीं सरकारचा अंमल बसविला. त्या समयीं भोंसले नागपुराहून निघून, पुण्याहून श्रीमंतही वऱ्हाडांत गेले. तेथें भोंसल्यांशीं लढाई झाली. तेथें लढाई होऊन मुक्काम झाला.

त्याच्या अगोदर गोपाळराव[२५] पटवर्धन यांशीं व सरकाराशीं बोलाचाली होऊन गोपाळराव श्रीमंतांवर रुसून गेले ते नीट हैदराबादेस जाऊन नबाब निजाम अल्लीखां यांस भेटले. तेथें राजकारण करून नबाबांची फौज घेऊन पुण्यावर चाल केली. ते नीट पुण्यास येऊन तेथें कांहीं फौज होती त्यांची व मोंगलांची लढाई होऊन ती फौज शिकस्त[२६] झाली. ते वेळेस नबाबांकडील सरदार करांडा म्हणून होता त्यानें शहरावर जाऊन आग लाविली. त्या समयीं वाड्याची खंडणी तीन लाख रुपये दिली. शहराच्या एक दोन पेठा जळाल्या इतक्यांत ही बातमी श्रीमंतांस होती. तेथून फौज रवाना मोंगल यांचे फौजेवर केली. ती येऊन पोहोंचे तों अगोदरच इकडे हें वर्तमान झालें. सरकारची फौज आली. तिणें मोंगलांच्या फौजेशीं लढाई करून करांडा आला होता त्यास मागें हटविला.

श्रीमंत वऱ्हाडांत होते त्यांशीं भोंसल्यांची लढाई दुसरी झाली. त्या लढाईत भोंसले शिकस्त होऊन पळूं लागले. त्यांच्या पाठीमागें श्रीमंतांची फौज लागली. तेव्हां भोंसले पळत पळत नागपूरचे पार झाले. श्रीमंतांचा मुक्काम

---

२४ 'मुधोजी.' ही बखर लिहिणाराची चुकी आहे. तेथें 'जानोजी' असें पाहिजे. जानोजी १७७२ सालीं वारला, नंतर मुधोजी व साबाजी यांमध्यें तंटे लागले. जानोजी भोंसल्यावर ही स्वारी १७६९ सालीं केली ती होय असें वाटतें. (मागें पृष्ठ ३७ टीप १ पहा) २५. गोपाळराव निजामअल्लीकडे १७६३ सालीं होता. (मागें पृष्ठ ६६ टीप ३ पाहा.) हल्लींच्या लढाईंत गोपाळरावास भोंसल्यावर पाठविलें होतें. परंतु त्याच्या फितुरीमुळें भोंसला पुण्याभोंवतीं लुटालूट करीत होताच ह्या दोन गोष्टींचा येथें घोटाळा केला आहे. बापू करांड्या म्हणून जानोजीचा सरदार होता तो या वेळीं व मागें १७६३ सालीं फार लुटालूट करीत होता. हल्लींच्या वेळीं त्याणें सिंहगड खालच्या खेड्यांस आग लाविली. तेणें करून पुण्याहून तेथें नेलेलें सर्व दप्तर जळालें. २६. शिकस्त झाली = पराभव पावली.

नागपुरावर झाला. श्रीमंतांनीं शहर जाळलें. त्यावेळेस मुधोजी भोंसले यांणीं श्रीमंतांकडे बोलण्यास वकील पाठवून सरकारांत सल्ला केला. स्वारीखर्च व खंडणी भोंसले यांणीं दिली. पुढें तह केला. तहामध्यें असा ठराव झाला कीं ज्या वेळेस तुम्ही बोलावाल त्या वेळेस तुम्हांजवळ येऊं. असा तह[27] होऊन भोंसले निरोप घेऊन माघारे नागपुरास गेले.

श्रीमंत तिकडून निघाले ते मोंगलाई मुलखांत जाऊन बेदर पावेतों मुलूख जाळून लुटून दोनदोन वर्षें दिवेलावणीचा कौलें[28] होई अशी अवस्था करून स्वारी माघारी पुण्यास दाखल झाली. पुण्याच्या पेंठा दोन तीन जाळल्या होत्या त्या पुनः वसवून, रस्ते दोरी धरून घरें बांधावयास जागा दिली. वाड्याच्या लगत घरें होतीं तीं मागें हटवून जागा सभोंवतीं पैसे[29] केली.

पुढें कारभार चालिला. हिंदुस्थानांत शिंदे, होळकर व रामचंद्र गणेश कानडे जरीपटका घेऊन होते. त्या वेळेस महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांणीं रामचंद्र गणेश यांची नालिस्ती सरकारांत लिहिली. त्याजवरून विसाजी कृष्ण बिनीवाले त्या कामावर पाठविले.[30] रामचंद्र गणेश यांस पुण्यांत आणविले सबब रामचंद्र गणेश रुसून जेजुरीस राहिले. पुढें समजी करून पुण्यास आणिले.

कर्नाटकांत स्वारी[31] जाऊन फिरून टिपूशीं लढाई घेतली. त्या लढाईंत टिपू हटला नाहीं. श्रीमंत तितक्यांतच उमजून पानावर, पान[32] ठेवून, कांहीं स्वारीखर्च दिला तो घेऊन स्वारी पुण्यास आली.

---

२७. या तहास ' कनकापूरचा तह ' म्हणतात. ( तारीख २३ मार्च १७६९. ) २८. ' दिवे लावणें चालवून दिलें. ' असा कल्याण येथील प्रतीचा पाठ आहे. दिवेलावणी =ओसाड देशाची किंवा निर्जन झालेल्या शहराची वसाहत करविणें. दिवेलावणीचा कौल =ओसाड देशांत वसाहत करण्यास दिलेली सनद. ह्या सनदेंत अमुक काळपर्यंत सरकारदस्त पडणार नाहीं असें वचन दिलें असतें. पुढें टीप ४८ पाहा. २९. यावरून पूर्वीं मंडई भरत होती तेथें घरें होतीं असें होतें. ३०. विसाजी कृष्णाशीं भांडण झाल्यामुळें रामचंद्र गणेश यास परत बलाविलें. विसाजी कृष्ण बिनीवाले हे मुख्य सरदार होते. ( १७७१ ) ग्रांट डफ. ३१. ही मुलूखगिरी १७६६-६७ सालची असावी ३२. पानावर पान ठेवून=आपला मान कमी न होऊं देतां, आपला मोठेपणा राखून.

गोपाळराव पटवर्धन रुसून मोंगलाईंत गेले होते त्यांची समजी करून मागती पुण्यास आणून त्यांचे कामावर त्यांस पाठविलें. विसाजीपंत बिनीवाले हिंदुस्थानांत गेल्यावर एक दोन संस्थानें हिंदुस्थानांत नवीं साध्य केलीं. दिल्लीस बादशाहापावेतों सरशी सरकारचे फौजेची झाली. असा पराक्रम चोहींकडे झाला. सरकारचा अंमल दिल्लीपावेतों चालूं लागला.[33]

इकडे श्रीमंत पुण्यास कारभार करीत असतां, सखारामबापू यांणीं दादासाहेबांकडे कांहीं फितूर केला. श्रीमंतांपावेतों चिठी जाण्याचा इलाज नाहीं म्हणून सरकारच्या कुळंबिणी नदीवर धुवावयास येत असत, त्या येण्याची संधी राखून बापू यांणीं आपल्या कुळंबिणी नदीवर धुवावयास पाठविल्या. त्यांच्या हातीं चिठी पाठविली. ती चिठी दादासाहेब यांचे कुळंबिणीजवळ देत आहेत तों इतक्यांत सरकारचा बातमीदार शिपाई फिरत होता त्यानें ती चिठी धरली आणि श्रीमंत रावसाहेब यांजपाशीं नेऊन दिली. त्या रात्रीं बापूंस बलावणें सरकारचें जाऊन बापू वाड्यांत आले. ते श्रीमंतांस नमस्कार करून एकांतास बसले. त्या समयीं श्रीमंतांनीं बापूंस विचारिलें "सरकार-अपराधी आहे† त्याचें पारिपत्य काय करावें !" तेव्हां बापूंनीं उत्तर केलें कीं, "पायांत बिडी घालून किल्ल्यावर टाकावें." असें उत्तर होतांच श्रीमंतांनीं बापूंपुढें चिठी टाकिली. ती बापूंनीं पाहून बापू उगीच राहिले. तेव्हां श्रीमंत बापूंस म्हणतात, "तुमचे अजून कुचेष्टा करावयाचे ढंग जात नाहींत." तेव्हां बापूंनीं श्रीमंतांस विनंती केली कीं, "आतां स्वामींपुढें आमची अक्कल चालून एकादें कुभांड होईल असें नाहीं. आतां फिरून आम्हांपासून अशी गोष्ट वांकडी व्हावयाची नाहीं." असें उत्तर ऐकून श्रीमंतांनीं सांगितलें, "आजचा अपराध तुम्हांस क्षमा केला. फिरून आढळलें असतां क्षमा होणार नाहीं. फिरून असे ढंग करूं नका." आणखी बारीक मोठीं वर्तमानें बापूंस विचारिलीं. त्यांचीं उत्तरें देऊन बापू घरीं गेले.

---

३३. हिंदुस्थानांत विसाजी कृष्ण, महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे सरदार होते. त्यांणीं शाहअलम यास दिल्लीस तक्तावर बसविलें, व रोहिले यांचा अगदीं मोड करून ते दुवाबामध्यें छावणी करून राहिले होते. अशा प्रकारें पुनः मराठ्यांचा दरारा हिंदुस्थानांत सर्वांस वाटूं लागला. (१७७१.) †म्हणजे सरकारचा अपराध ज्याणें केला आहे तो.

नंतर श्रीमंतांचे मनांत[३४] टिपूचे पारिपत्याची कांहीं ईर्षा राहिली होती. त्यासाठीं भोंसले यांस बलावणें सरकारचें गेलें. तेव्हां भोंसले येण्याची तयारी करून वकील पुढें रवाना झाले. देवाजीपंत पुण्यास येऊन श्रीमंतांची भेट घेतली त्या वेळेस *देवाजीपंत यांस विचारलें कीं, "राजे कधीं येणार ?" तेव्हां देवाजीपंतांनीं उत्तर केलें कीं, "नागपुराहून निघाले." ही बातमी सरकारचे डाकेचीच होती. तेव्हां त्या बैठकीस देवाजीपंत यांणीं विनंती केली कीं, "आज्ञा झाल्यास बापूंच्या भेटीस जाईन." हें ऐकून श्रीमंतांनीं उत्तर केलें, "बरें आहे." तेव्हां सरकारचा कारकून देवाजीपंत यांजबरोबर देऊन सखारामपंत बापू यांजकडे पाठविलें. ते जाऊन बापूंची भेट घेतली. त्या समयीं सखारामबापू लोडाशीं टेकून बसले होते. जवळ उपाध्या व एक कारकून बुद्बळें खेळत बसले आहेत. त्या समयास देवाजीपंत जाऊन बापूंस[३५] भेटले. सलामालकीचीं § बोलणीं बहूत झालीं. सरकारचा कारकून बराबर आहे हें पाहून बापूंनीं आणखी कांहीं मजकूर विचारले नाहींत. बुद्बळें खेळत होते त्या खेळण्यामध्यें एकजणास बापूंनीं डाव सांगितला कीं, "त्यांजकडील प्याद्याची चाल पुढें झाली आहे; तुम्ही आपला राजा दोन घरें पाठीमागें न्यावा." हें ऐकून देवाजीपंत उठून सखारामपंत बापू ह्यांचा निरोप घेऊन आपले बिऱ्हाडीं गेले. बरोबर कारकून होता त्याणें श्रीमंतांस येऊन सारा मजकूर विदित केला. तेव्हां श्रीमंतांनीं विचारलें, "बापू काय करीत होते ?" तेव्हां कारकून म्हणाला कीं, "बापू उगाच बसले होते; दोघेजण जवळ बुद्बळें खेळत होते." हें ऐकून श्रीमंतांनीं विचारलें, "बुद्बळांत बापू कांहीं बोलले किंवा नाहीं ?" ते वेळेस कारकुनानें सांगितलें कीं, "बुद्बळांत एक डाव बापूंनीं सांगितला कीं, 'त्यांच्या राजाचे प्याद्याची चाल झाली आहे, तुम्ही आपला राजा दोन घरें पाठीमागें न्यावा.'" हें ऐकून श्रीमंतांनीं कारकुनास सांगितलें, "असा आजचे तारखेचा बंद तूं आपले हातचा झाल्या मजकुराचा लिहून ठेवावा." असें सांगतांच त्या

---

३४. मागें पृष्ठ ७१ टीप * पाहा * हेही साडेतीन शाहण्यांपैकीं एक होत. ३५. ही सखारामपंतबापू व देवाजीपंत यांची भेट नारायणरावाच्या मृत्यूनंतर झाली, असें निबंधमालेंत म्हटलें आहे तें कशावरून तें समजत नाहीं. (निबंधमाला अंक १३ पृष्ठ २८ पाहा.) § सलामालकी=रामराम, नमस्कार चमत्कार, विचारपूस.

कारकुनानें बंद बातमीचा लिहून श्रीमंतांचे हवालीं केला. नंतर एकादोहों दिवशीं सरकारची डाक नागपुराहून आली, त्यांत लिहून आलें कीं, "भोंसले दोन मजला बाहेर गेले होते, ते माघारे नागपुरास आले." अशीं पत्रें पोंचतांच लागलेच देवाजीपंत यांस बोलावून आणून विचारलें कीं, "राजे दोन मजला आले ते अद्यापी कां येत नाहींत ?" हें ऐकून देवाजीपंतांनीं विनंती केली कीं, "आतां लवकरच येतील." त्या समयीं श्रीमंतांनीं नागपूरचे डाकेचीं पत्रें देवाजीपंत यांस दाखविलीं आणि सांगितलें कीं, "बाहेर आलेले माघारे गेले. हा उपदेश सखारामपंत यांणीं तुम्हांस केला, त्याजवरून राजे माघारे गेले. परंतु आजपासून पंधरा दिवसांत राजे पुण्यास आले तर उत्तम, नाहीं तर ब्राह्मण म्हणणार नाहीं. मेखसूं* खालीं डोकें फोडीन." अशी जरब श्रीमंतांनीं देतांच देवाजीपंत हात जोडून विनंती करितात, "आतां राजे पंधरा दिवसांत आपल्या जवळ दाखल होतील यांत संशय नाहीं." अशी खातरजमेची गोष्ट सांगून, श्रीमंतांची आज्ञा घेऊन आपले बिऱ्हाडीं गेले. जाऊन लागलींच पत्रें डाकेंत नागपुरास रवाना केलीं.

इकडे वर्तमान सोलापूर प्रांतीं मोंगलाईत बखेडा होऊन सरकार अंमल देण्यास मोंगलाईवाले यांणीं खलेल† केली. अशीं पत्रें बोभाटाचीं आलीं. त्याजवरून सरकारची मर्जी जाऊन तिकडे जाण्याच्या उद्देशें डेरे बाहेर दिले, आणि खांसा स्वारी[३६] बाहेर निघाली. समागमें नारायणरावसाहेब यांसही घेतलें. तमाम सरंजामी व सरकारी हुजुरात तोफखान्यासुद्धां लाख सरंजाम समागमें घेऊन पंढरपुरचे रोखानें चालले. मानदेशांतून वसमत नांदेडपावेतों स्वारी सरकारची गेली. तेथें नांदेडावर मोंगलाई फौज होती त्या फौजेशीं लढाई होऊन ती फौज माघारी मोड झाल्यामुळें गेली. सरकारची स्वारी त्यांच्याच मागें चालली. ते बेदरपावेतों गेले. तेथें भागानगराहून[३७] वकील बोलण्यास आले. ते श्रीमंतांची भेट घेऊन नबाब यांणीं मजकूर सांगितल्याप्रमाणें बोलले. तेव्हां श्रीमंत म्हणतात कीं, "आम्हांकडून बिघाड झाला नाहीं; तुम्हीच कटकट काढितां

---

* मेखसूं = तंबूच्या मेखा ठोकण्याची मोंगरी. † हा पाठ इं० प्रतीचा. क० प्रतीचा पाठ असाः—' सरकार अमलास सनद देण्यास मोंगलाई यांणीं [ सुरुवात ( ? ) ] केली.' ३६. ही मोंगलावर स्वारी कधीं झाली तें पक्कें समजत नाहीं. १७६३ सालची असावी असें वाटतें. ३७. भागानगर = हैदराबाद.

हें नीट नव्हे. म्हणून आम्हीं येथपावेतों आलों. तुम्हांस तहाप्रमाणें चालावयाचें असल्यास स्वारीखर्च आतां आम्हांस द्यावा, म्हणजे आम्ही येथून माघारें जाऊं. बिघाड यावयाचें असल्यास तसेंच सांगावें म्हणजे हैदराबाद येथून लांब नाहीं." असा मजकूर झाला तो नबाबाकडील वकिलांनीं हैदराबादेस लिहिला. तेथून नबाबाकडून उत्तरें आलीं कीं, "स्वारीखर्च देतों, माघारें जाणें." त्यासमयीं पंधरा लाख रुपये स्वारीखर्च घेऊन सरकारची स्वारी माघारी आली. ते पंढरपुरावरून मागती देवदर्शन घेऊन, बारामतीवर येऊन मुक्काम झाला. तेथें बारामतीकर †बाबाजी नाईक यांणीं श्रीमंतांस मेजवानी करायाची म्हणून चार मुक्काम सरकारचे तेथें झाले.

तेव्हां एके दिवशीं सरकारची स्वारी दरबारांत बिछायतीवर बसली असतां तेथेंच जवळ खंडेराव दरेकर व हिरोजीराव पाटणकर बसले होते. त्या समयीं लष्करांत सरकारचा हत्ती मस्त होता तो सुटला. त्या हत्तीच्या पाठीमागें शेंकडों मनुष्य *गडेकरी, महात वगैरे धांवत आहेत, भाले टोंचितात, चिरक्या§ दारूच्या सोडितात, परंतु हत्ती कोणाला आटोपत नाहीं. नीट हत्तीनें चाल सरकारच्या डेऱ्यावर केली. त्या समयीं उभयतां बंधू श्रीमंत बसले होते व दोन आसामी जवळ बसले होते. हत्ती समोर पाहातांच नारायणराव साहेब उठले. तेव्हां रावसाहेब यांणीं हातांत धरून खालीं बसविलें आणि सांगितलें कीं, "हत्तीचे पायीं आपला मृत्यू नसला तर ह्या हत्तीच्यानें आपलें कांहीं व्हावयाचें नाहीं." असें म्हणून बैसविलें. इतक्यांत हत्ती

† बाबाजी नाईक = बाबूजी–कवी मोरोपंत पराडकर यांचे यजमान. हे पेशव्यांचे आप्त होते. * गडेकरी = हत्तीपुढें चालणारा भालेकरी. § चिरक्या = चिरकांड्या.

३८. ही गोष्ट ग्रांट डफ निराळ्या रीतीनें सांगतो. तो म्हणतो पुण्याच्या नजीकच शुळटेंकडी आहे तेथें हत्तीचें झुंज लागलें होतें. तें पाहण्यास माधवराव व नारायणराव असे उभयतां गेले होते. पुढें झुंजणाऱ्या उन्मत्त हत्तींपैकीं एकजण ते बसले होते त्या स्थळाकडे रागानें धांवत येऊं लागला, तेव्हां जवळ असणारे लोक व चाकर मंडळी भिऊन पळूं लागली. तें पाहून नारायणरावही पळण्याकरितां उठूं लागला. तेव्हां माधवरावानें त्याचा हात धरून म्हटलें, "नारायणा, तुझ्याविषयीं अखबारनीस काय लिहितील ?" असें ऐकून नारायणराव मुकाट्यानें खालीं बसला. त्या वेळेस आपाजीराव पाटणकर म्हणून एक मराठा शिलेदार जवळ बसला होता त्याणें मोठ्या शौर्यानें हत्तीकडे आपली कट्यार झोंकिली ती त्याच्या सोंडेस लागून तो माघारा फिरला, व दोघां बंधूंवरचें संकट टळलें.

[३९]चांदणीचे तणाव्यापाशीं येऊन भिडला. पाठीमागें शेंकडों मनुष्य भाले बरच्या घेऊन लागले आहेत. तें पाहून, चांदणीजवळ येतो असें जाणून, खंडेराव दरेकर व हिरोजिराव पाटणकर उभयतां पुढें धांवून गेले. त्या वेळेस पाटणकर याचे हातांत कट्यार होती व दरेकर याचे हातांत सांग‡ होती. पाटणकर यांणीं कट्यार फेंकिली ती हत्तीचे गंडस्थळाखालीं सोंडेंत चार बोटें आंत घुसली. दरेकर याचे हातींची वीट[४०] कानामागें लागली ती हत्तीला [४१]कारागीर झाली. त्याणें हत्ती माघारा फिरला. तेव्हां भालेकरी होते त्यांणीं चोहींकडून भाले टोंचून हत्ती उभा करून वरतीं महात चढला. मग हत्ती ठाणावर नेला. इकडे श्रीमंत यांणीं पाटणकर यांस चौघडा दिला व दरेकर यांस सरलष्करी सांगितली. याप्रमाणें बक्षिसें देऊन, बारामतीकर यांची मेजवानी घेऊन स्वारी पुण्यास यावयास निघाली, ती पुण्यास येऊन दाखल झाली.

भोंसले पुण्यास यावयास निघाले त्यांस पत्र गेलें कीं, "तुम्हीं तूर्त येऊं नये." तेव्हां भोंसले यांचें यावयाचें राहिलें. पुण्यास श्रीमंत होते, त्या समयीं दादासाहेब पुण्यांत वाड्यांत होते. रात्रौ वाड्यांतून निघून गेले ते लागलेच नासिकचे वाटेनें जाऊन आनंदवल्लीस पोंचले. ही खबर श्रीमंतांस लागतांच श्रीमंतांची स्वारी तयार होऊन, फौज समागमें घेऊन, [४२]दादासाहेब यांचे पाठीमागें लागले. दादासाहेब पुढें गेले त्यांच्याबराबर दहापांच हजार फौज जमली. आनंदवल्लीभोंवतीं नासिक प्रांतामध्यें लुटालूट करीत गेले. इतक्यांत श्रीमंत रावसाहेब जाऊन पोंचले. तेव्हां त्या फौजेची सरकारचे फौजेशीं लढाई

---

३९. चांदणीचा = छताचा किंवा तंबूचा. तणावा = (तंबूचा) दोर. ‡ सांग = एक प्रकारचा भाला (हा सर्व लोखंडी असतो.) ४०. वीट = एक प्रकारचा भाला. ४१. कारागीर झाली = लागू पडली; तिनें हत्ती जखमी झाला. ४२. रघुनाथराव १७६५–६६ सालीं हिंदुस्तानांत स्वारीस गेले होते ते परत आल्यावर १७६८ सालीं २५ लक्ष रुपये रोख व १३ लक्षांची जहागीर नाकबूल करून अर्धे राज्याकरितां युद्धाची तयारी करीत होते. माधवरावानें त्यांजवर हल्ला करून धोडपच्या किल्ल्यांत घातलें आणि तेथून कैद करून पुण्यास नेलें. या वेळेस दादा पळून गेले नव्हते. मागें १७६४–६५ सालीं मात्र (जेव्हां माधवराव हेक्यानें कर्नाटकांत स्वारीस गेले तेव्हां) रुसून ते आनंदवल्लीस गेले होते; पण हैदराचा पराभव केल्यावर माधवरावांनीं त्यांची समजूत करण्याकरितां त्यांस तिकडे बलावून नेऊन हैदराशीं तह त्यांजकडून करविला. मागें पृष्ठ ७१ टीप* पाहा.

झाली. दादासाहेब यांजकडील फौज पोटभरूच होती. त्यांचा मोड झाला. दादासाहेब तेथून पळाले ते गोहजेच्या[४३] किल्ल्यावर गेले. ही बातमी श्रीमंतांस लागतांच श्रीमंत पाठीमागून जाऊन गोहजेस पोंचले. त्या वेळेस किल्ल्यावर सरकारचा किल्लेदार होता, त्यानें दादासाहेबांस वरतीं घेतलें, वरकड कोणांस वरतें घेतलें नाहीं. पाठीमागून सरकारची स्वारी येतांच किल्लेदार यानें दादासाहेबांस सरकारचे हवालीं केलें. मग दादासाहेबांस घेऊन श्रीमंतांची स्वारी पुण्यास दाखल झाली. तेव्हांपासून दादासाहेबांभोवती चौकी पाहारे कडोविकडीचे झाले. ज्याणें फितूर करून बाहेर काढिलें होतें त्याचें पारिपत्य करून त्यास किल्ल्यावर घातलें.

पुढें कर्नाटकांत[४४] स्वारी जाण्याचा बेत होता तिकडे पन्नास हजार फौज देऊन त्रिंबकरावमामा[४५] पेंठे यांची रवानगी केली. ते मजल दर मजल जाऊन तुंगभद्रा पार होऊन टिपूचे मुलखांत छावणी करून राहिले.

पेशवे यांचे वंशांत रावसाहेबांसारखा कोणी पुरुष झाला नाहीं. यामुळें परराज्यांतील फिर्यादी पुण्यास येत असत. हैदराबादेस नबाब ह्यांचे दिवाण रुखमतदौला होते. ते आपणांस हवेली बांधावयास लागले. तेव्हां त्यांचे शेजारीं एक गरीब ब्राह्मणाची जागा होती ती जागा रुखमतदौला याणीं जबरदस्तीनें घेतली. त्या ब्राह्मणाची दाद त्या दरबारांत लागली नाहीं. म्हणून तो ब्राह्मण तेथून उठून पुण्यास फिर्यादीकरितां निघाला. रुखमतदौला यास ब्राह्मण बोलूं लागला कीं, "ह्या जागेचा कोणी अधिकारी असला तर तेथें मी दाद लावीन, आणि आपली जागा घेईन, नाहीं तर तुम्हांस दिली आहे." असें बोलून निघाला, तो नीट पुण्यास आला. त्या दिवशीं चतुर्थी होती. श्रीमंतांची स्वारी थेउरास गणपतिचे दर्शनास निघाली. तेव्हां ब्राह्मण रस्त्यांत उभा राहून "फिर्याद!" म्हणून ओरडला. त्या वेळेस खासा स्वारी घोड्यावर बसले होते. फिर्याद ऐकून घोडा उभा करून ब्राह्मणास आलीकडे बोलावून वर्तमान विचारिलें. त्या वेळेस तो मजकूर ऐकून घेऊन ब्राह्मणास आज्ञा झाली कीं, "तुम्ही पुण्यास या." असें ऐकून ब्राह्मण म्हणतो. "माझा वाड्यांत प्रवेश होऊन माझी

---

४३. 'गोहजे' बद्दल 'घोडपेच्या असें पाहिजे. ४४. ही कर्नाटकांतील स्वारी १७७० सालची ४५. त्रिंबकराव पेठे; हे सदाशिवराव भाऊ यांचे मामा, मागें पृष्ठ ७१ टीप * पाहा.

व सरकारची गांठ कशी पडेल ? " हें ऐकून सरकारची आज्ञा मिरधे[४६] व खिजमतगार यांस झाली कीं, " ब्राह्मण वाड्यांत आला म्हणजे त्याजला घेऊन मजकडे आणावें." अशी आज्ञा समक्ष होतांच ब्राह्मण पुण्यास आला. स्वारी गणपतीस जाऊन, देवदर्शन घेऊन, सायंकाळीं माघारी वाड्यांत येऊन दाखल झाली. दुसरे दिवशीं ब्राह्मण वाड्यांत आला, तेव्हां खिजमतदार यांणीं नेऊन सरकारची गांठ घातली. त्या वेळेस ब्राह्मण पाहातांच लागलेच नबाबाकडील वकील धोंडोरामपंत यांस बोलावून आणून समक्ष आज्ञा झाली कीं, " ह्या ब्राह्मणाची जागा तुमचे दिवाण जबरदस्तीनें घेतात, ह्या-विषयीं तुम्हीं नबाबांस पत्रें लिहून भटजींची जागा भटजींस देववावी, हें चांगलें." हा मजकूर ऐकून वकिलानें विनंती केली कीं, "पत्र लिहून जाब आणवितों." त्यावेळेस श्रीमंतांनीं विचारिलें कीं, " किती दिवसांत जाब येईल ?" तेव्हां वकील ह्यांनीं कबूल केलें कीं, "आठ दिवसांत जाब येईल." असें ऐकून श्रीमंतांनीं भटजींस सांगितलें कीं, " आठ दहा दिवस आतां तुम्हीं स्वस्थ असावें." ह्याप्रमाणें झाल्यानंतर, दहा दिवस भरतांच ब्राह्मण फिरून वाड्यांत येऊन उभा राहिला. त्या ब्राह्मणास पाहून धोंडोरामपंत ह्यांस बोलावून आणून विचारलें, "त्या ब्राह्मणाचा जाबसाल काय आला ?" त्या समयीं वकील बोलले कीं, "अजून जाब आला नाहीं." तेव्हां श्रीमंत म्हणतात, " ह्याचा जाबसाल कधीं येणार ?" फिरून करार त्यांनीं आठदहा दिवसांचा केला. तेव्हां भटजींस "स्वस्थ असा " अशी आज्ञा झाली. असे दोन तीन करार ठरले. दुसरी चतुर्थी आली, त्यासमयीं श्रीमंतांची स्वारी थेउरास निघाली तेव्हां तो ब्राह्मण मौजे कवडी येथें जाऊन उभा राहिला. तों स्वारी त्या ठिकाणीं येतांच ब्राह्मण " फिर्याद !" म्हणून ओरडला. तेव्हां सरकारची स्वारी उभी राहून ब्राह्मणास जवळ बोलावून मजकूर विचारिला. तेव्हां ब्राह्मण बोलला "आज महिना जाहला, वाट पाहिली, आतां ब्राह्मण्य बुडालें म्हणून मला वाट फुटेल तिकडे जातों !" हें श्रीमंतांनीं ऐकून ब्राह्मणास सांगितलें कीं, " तुम्हीं येथेंच स्वस्थ बसा. मी देवदर्शन करून माघारा आल्यानंतर तुमचा बंदोबस्त होईल. कांहीं चिंता करूं नये." असें म्हणून स्वारी देवदर्शन घेऊन

---

४६. मिरधा=भालेकऱ्यांचा मुख्य नाईक.

माघारी येऊन, तेथें उभे राहून निळकंठराव रामचंद्र पागे यांस आज्ञा झाली, "तुम्हीं येथून आतां मोंगलाई मुलखांत चलावें. जेथून मोंगलाई मुलूख लागेल तेथपासून पुनः दिवे लावण्याचा कौल देत असें करावें. आम्हीं पुण्यास गेल्यानंतर तुम्हांकडे फौज व सरंजाम पाठवून देतों." याप्रमाणें आज्ञा करून श्रीमंतांची स्वारी पुण्यास येऊन, लागलीच फौज निळकंठराव रामचंद्र याजकडे १०।१५ हजार रवाना केली. डेरेदांडे, तोफखाना वगैरे झाडून सरंजाम पाठविला. खेरीज सरंजामी यांस पत्रें पाठविलीं कीं, "निळकंठराव रामचंद्र यांस मोंगलाई मुलखांत रवाना केले आहेत, त्यांसमागमें तुम्हीं आपापली फौज घेऊन पंढरपुरचे मुक्कामीं त्यांस जाऊन मिळावें." अशी ताकीद-पत्रें सर्वांस सरकारचीं गेलीं. त्याप्रमाणें निळकंठराव पंढरपुरास दाखल होतात तों झाडून सरंजामी तेथें येऊन मिळाले. पन्नास हजार फौजेचा जमाव झाला. सोलापूर पार होतांच मोंगलाई मुलखामध्यें फौज गेली. तेथें मुलखांत फौजेचा उपद्रव झाला. लूट भारी होऊं लागली. असे लुटीत, मारीत बेदरचे आलीकडे चाळीस पन्नास कोस गेले. त्या समयीं हैदराबादेस नबाब निजामअल्लीखां यांस वर्तमान मुलखाचे बोभाट गेल्यामुळें समजलें. तेव्हां नबाब ह्यांनीं पुण्यास पत्रें आपले वकिलाकडे पाठविलीं कीं, "राव पंतप्रधान ह्यांचा आमचा बिघाड नसतां आमचे मुलखांत त्यांची फौज येऊन उपद्रव दिला, ह्याचें कारण काय असेल तें तुम्हीं त्यांस विचारून लिहून पाठवावें." अशीं पत्रें येतांच वकिलांनीं सारा मजकूर पूर्वीपासून झाला होता तो लिहून पाठविला. त्या वेळेस नबाबांनीं तो मजकूर समजून, श्रीमंतांकडील वकील होते त्यांस बोलावून आणवून सांगितलें कीं, "ब्राह्मणाचे जाग्यासाठीं इतकी धूम केली ह्याचा विचार काय?" तेव्हां सरकारचे वकिलांनीं नबाबास अर्ज केला कीं, "त्याविषयीं दोन चार वेळां आपलेकडील वकिलांनीं मजकूर लिहून पाठविला परंतु तीं पत्रें मध्येंच दाबलीं; आपणांस मजकूर जाहीर केला नाहीं." रुखमतद्दौला दिवाण यांस नबाबांनीं विचारतांच त्यांणीं मजकूर सारा सांगितला. तेव्हां नबाब यांची मर्जी दौला यांजवर रोष* झाली. मग श्रीमंतांकडील वकील यांस नबाब यांणीं सांगितलें कीं, "तुम्हीं

४७. मुलख इतका उजाड करून टाका कीं, त्यांस त्यांची पुनः वसाहत करण्याकरितां लोकांस सनदा द्याव्या लागतील. मागें पृष्ठ ७३ टीप २८ पाहा. * रोष=रुष्ट.

आपले खावंदांस लिहा,त्या भटजींचा बंदोबस्त आम्ही करून देतों." याप्रमाणें नवाबाचें बोलणें ऐकून सरकारच्या वकिलांनीं पत्रें पुण्यास लिहिलीं. तीं पत्रें सरकारांत पाहून त्यांचीं उत्तरें तत्क्षणींच डाकेंत रवाना केलीं. "ब्राह्मणाची जागा ब्राह्मणास द्यावी, फिरोन त्यांचे सरकारांतून या ब्राह्मणास कोणे एके गोष्टीचा उपसर्ग न लागे असें करून द्यावें. आज आमचे हिमायतीनें[४८] जागा ब्राह्मणानें घेतली. येविशीं त्याचे मनांत कीं, 'मला कोणे गोष्टीचा उपसर्ग येऊं नये,' काळ आमचा कमजोर आला असतांही ब्राह्मणास उपद्रव लागूं नये, असें नबाब यांजपासून कुराण उचलून घ्यावें; व फौज आमची गेली आहे त्याचा खर्च ते आपले संतोषानें काय देतील तो घ्यावा म्हणजे फौज माघारी बलावून घेऊं." अशीं पत्रें जातांच गोविंदराव काळे वकील यांणीं तो मजकूर नबाबांस समजाविला. त्यांणीं गोष्ट कबूल केली. आणि नबाब यांणीं त्याप्रमाणें कुराण उचलून दिलें. मग पांच लक्ष रुपये स्वारीखर्चाचे दिले ते घेऊन, फौज माघारी आली. ब्राह्मण यास भागानगरास[४९] नबाब यांणीं नेऊन त्याची जागा त्याचे हवालीं केली.

इकडे हिंदुस्थानांत विसाजी कृष्ण बिनीवाले होते त्यांशीं व शिंदे, होळकर यांशीं कांहीं आपसांत चुरस वाढली. तो मजकूर बिनीवाले यांणीं पुण्यास हुजूर सरकारांत लिहिला. त्याजवरून महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांस पत्रें लिहून चार ढालाईत[५०] हिंदुस्थानांत रवाना केले. ते ढालाईत येथें पोंहचत तों मास पक्ष लोटला. इतक्या अवकाशांत उभयतां सरदार यांणीं बिनीवाले यांशीं मिळून घेऊन त्रिवर्गाची सफाई झाली[५१]. असा मजकूर तेथें होऊन पुढें पातशाहा यांचे भेटीस दिल्लीस जाण्याचा मजकूर ठरला होता. तेव्हां ढालाईत जाण्याच्या दिवशीं पातशाहा यांचीं बलावणीं भेटीचीं आलीं. तिघे सरदार फौज तयार करून अंबारींत बसून निघाले. त्या समयीं चालते स्वारींत ढालाईत जाऊन पोंचले. त्यांजला पाहतांच तिघांनीं हत्ती उभे करून अंबारीखालीं उतरून महादजी शिंदे व तुकोजी होळकर हात जोडून त्या ढालाइतांस विचारितात कीं, "श्रीमंतांची मर्जी कशी आहे ?" हें ऐकून ढालाईत यांणीं

४८. आमचे हिमायतीनें=आमचें पाठबळ होतें म्हणून. ४९. भागानगर म्हणजे हैदराबाद. या ब्राह्मणाच्या एकंदर हकिकतीबद्दल ग्रांट डफ याच्या ग्रंथांत उल्लेख नाहीं. ५० ढालाईत=ढाल बांधलेले शिपाई, परिचारक. ५१. सफाई झाली=तंटा मिटला.

लखोटे पुढें टाकिले. ते लखोटे उभयतांनीं फोडून वाचून पाहिले आणि ढालाइतांस सांगतात कीं, "आज तुम्हीं मुक्काम करावा. आम्हीं दिल्लीस पातशाहाचे भेटीस जाऊन येतों; उदयीक तुम्हांस रवाना करूं." त्या वेळेस ढालाईत यांणीं सांगितलें, "आम्हांस सरकारचा हुकूम नाहीं, आम्हीं आज तुम्हांस जाऊं देणार नाहीं, आम्हांस मार्गस्थ करावें, मग तुम्हीं भेटीस जावें." बहूत रदबदली केली परंतु ढालाईत यांणीं ऐकिलें नाहीं. तेव्हां तेथून फौजेंतून वकील पातशाहा यांजकडे रवाना केले आणि त्या वकिलांस सांगितलें कीं, "आज आमचें येणें होत नाहीं. आमच्या खावंदांचीं पत्रें घेऊन आले आहेत त्यांची रवानगी करून उदईक आपले भेटीस येऊं." असे वकील दिल्लीस पाठविले आणि स्वारी माघारी परतली. ते आपले डेऱ्यांत येऊन, तिघे खासे एक जागीं बसून पत्रांचीं उत्तरें सरकारास लिहिलीं. बिनीवाले यांणीं मागें गिल्ल्यांचीं पत्रें लिहिलीं होतीं, परंतु हल्लीं सफाई झाल्याचा मजकूर लिहून दिला. तसेंच शिंदे, होळकर यांणीं तशींच पत्रें सरकारास लिहिलीं. "आम्ही सरकारचे आज्ञेशिवाय नाहीं." अशीं पत्रें लिहून ढालाईत यांचे हवालीं केलीं. चौघांस चार पोषाग दिले व आणखी बक्षीस दिलें. अशी ढालाईत यांची रवानगी केली, हा मजकूर दिल्लीस पातशाहों[५२] यांणीं ऐकून ताडांत बोट घातलें कीं, "धन्य आहे कीं, चार ढालाईत यांणीं दोन लाख फौज माघारी फिरवून

५२. हे बादशाहा शाहाअलम हे होत. हे कांहीं वर्षें बहार, अलाहाबाद वगैरे प्रांतीं भटक्या मारीत फिरत होते. त्यांस विसाजी कृष्ण व महादजी शिंदे, यांणीं दिल्लीस आणून तक्तावर बसविलें. (१७७१.) माधवरावांस एकंदर सर्व सरदार वचकत असत. १७६९ सालीं शिंदे, होळकर वगैरे सरदारांस हिंदुस्थानांत जाण्याचा हुकूम माधवरावानें दिला त्याप्रमाणें तावडतोब सरदार निघून चालते झाले. महादजी शिंदे मात्र, आपल्यावर पेशव्यांची विशेष कृपा आहे असें पाहून, तसेंच टंगळमंगळ करीत आपले गोटांत राहिले. दोन तीन दिवसांनीं माधवराव घोड्यावर बसून थेउरास जात असतां शिंद्यांचें लष्कर त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांची जाण्याची तयारी देखील नाहीं, असें पाहून माधवरावांनीं महादजीस बलावून आणिलें आणि म्हटलें, "महादजी, तुमचें हें अवज्ञेचें व धिटाईचें वर्तन पाहून मी थक्क होत आहें! थेउराहून परत येतांना जर येथें एक तंबू अगर एक माणूस उभा माझ्या दृष्टीस पडला, तर तुमची छावणी लुटून फस्त करीन व जाहागीर हिसकावून घेईन याची याद राखा." हें ऐकून शिंदे निमूटपणें परत जाऊन आपला गोट मोडून एकदम चालते झाले. या वेळीं पाटीलबोवांचा हेतू यजमानाचें पाणी जोखण्याचाही कदाचित असेल!

नेली हा ज्याचा हुकूम, तो खावंद कसा असेल ! !" असें बोलून मोठा विस्मय केला. दुसरे दिवशीं पातशाहाचे भेटीस तिघे सरदार गेले. त्यांच्या यांच्या भेटी होऊन परस्परें बोलणीं होऊन तिघांस पोषाग देऊन मार्गस्थ केलें. ढालाईत पुण्यास दाखल जाहल्यावर पत्रें पाहून श्रीमंत संतोष पावले.

पुढें त्रिंबकराव मामा पेंठे फौजेसुद्धां पेशजी जाऊन, तुंगभद्रापार होऊन टिपूचे मुलखांत छावणी करून होते,त्यांस पत्रें सरकारचीं गेलीं, "सालमजकुरीं आमची स्वारी[५३] टिपूवर करावयाचा बेत आहे. बरसात गेली म्हणजे त्या रोखानें डेरे देतों; तुम्हीं टिपूस सावध करावें." अशीं पत्रें त्रिंबकराव मामा पेंठे यांस गेलीं. इकडे श्रीमंतांचे शरिरास कांहीं विकृती झाली. ती दिवसानुदिवस जडकावत चालली. त्यामुळें श्रीमंतांची प्रकृत फारच बिघडत चालली. तसेच श्रीमंत डेऱ्यास दाखल झाले. तेथून निघाले ते मजल दरमजल कर्नाटक प्रांतीं चालले. कृष्णेपावेतों गेले. तेव्हां शरिरास फार विकृती झाली, म्हणून कृष्णातिराहून स्वारी माघारी फिरली. ते दरकूच पुण्यास येऊन दाखल जहाले. तेव्हां शरिरास दिवसेंदिवस बहूतच विकृती होत चालली. वैद्यही बहूत आणिले. हिंदुस्थानांतून गंगा[५४] विष्णू मोठे नामांकित वैद्य त्यांसही आणिलें. परंतु उताराची जात[५५] नाहीं. दिवसेंदिवस शरीरही क्षीण होत चाललें. वैद्य यांनीं मोठे उपाय केले. परंतु औषध लागू पडेना. झाडून वैद्य मिळून रोगाची चिकित्सा करून निदान ठरविलें, "या रोगाचें नांव राजयक्ष्मा." असें जहालें त्या-समयीं श्रीमंतांचे मनांत अशी गोष्ट आली कीं "आतां येथें राहून उपयोग नाहीं. आतां थेउरास श्रीगणपतीचे चरणाजवळ जाऊन पडावें. मग तेथें काय होणार असेल तें होईल."

---

**५३.** या १७७०–७१–७२ च्या मुलुखगिरीचें वर्णन येथें दिलें नाहीं. या वेळीं हैदराची खोड खूपच मोडली. श्रीरंगपट्टणास वेढा घालून त्यास दुसऱ्या ठिकाणीं इतकें जेरीस आणिलें कीं, श्रीमंतांच्या बळकट दुखण्याच्या बातमीवरून त्रिंबकराव मामा घाबरत परत आले तरी शिवाजी महाराजांच्या तीर्थरूपांच्या जहागिरीचे पांच प्रांत–कोल्हार, बंगलूर, उसकोटा, बालापूर व सीरा–३६ लक्ष रुपये मागील बाकी व स्वारीखर्च, आणि १४ लक्ष रुपये दरसाल खंडणी, इतकें कबूल करण्यास हैदरास भाग पाडलें. ५४. लागवणकर वैद्याविषयीं एक गोष्ट प्रसिद्ध आहे, तीस येथें आधार नाहीं. ५५. जात =अवलेश.

असा निश्चय करून झाडून सरदार व मानकरी व हुजुरात व सरंजामी लोक तमाम फौजेसुद्धां कारभारी झाडून थेऊरच्या मुक्कामीं यावें, अशी आज्ञा सरकारची जहाली. त्याप्रमाणें सर्व फौजा व कारभारी व मुत्सद्दी व दरकदार झाडून थेऊर मुक्कामीं येऊन राहिले. तमाम फौजा सभोंवत्या डेरे देऊन उतरल्या. अठरा* कारखाने तेथेंच राहिले. याप्रमाणें सर्व निघून थेऊरचे मुक्कामीं येऊन राहिले. पुण्यांत फक्त दादासाहेब व आणंदीबाई अशीं राहिलीं. व आणखी वाड्याचा बंदोबस्त करून सारे थेउरास येऊन राहिले. तेथें दैवी उपाय अनुष्ठानास ब्राह्मण घातले. गणपतीची आराधना मांडली. वैद्य उपायही चालला. नारायणरावसाहेब सुद्धां थेऊरचे मुक्कामास जाऊन राहिले. पुढें त्रिंबकराव मामा पेंठे कर्नाटकांत टिपूच्या मुलखांत छावणी करून होते त्यांस पत्रें पूर्वीं सरकारचीं गेलीं होतीं कीं, " खांसा स्वारी मोहिमेस येते, तुम्हीं टिपूस सावध करावें." त्यांस फिरून पत्रें पाठविलीं कीं, आमचे शरिरास फारच विकृती झाली. तत्रापी कृष्णातीरपर्यंत आलों होतों; पुढें येण्याचें अवसान राहिलें नाहीं म्हणून परत माघारे आलों. तों शरिराला फारच व्याधीनें ग्रस्त केलें म्हणून हल्लीं थेऊरचे मुक्कामीं येऊन राहिलों, तर तुम्हीं फौजेसुद्धां निघोन माघारें यावें." अशीं पत्रें कर्नाटकांत जाऊन पोंचतांच त्रिंबकरावमामा पेंठे फौजेसुद्धां तुंगभद्रा उतरून, आलीकडे येऊन, तेथून दरकूच येऊन पुण्यास पोंचले. तेथून थेउरास येऊन श्रीमंतांची भेट झाली. सर्व बारीक मोठें वर्तमान श्रीमंतांस समजाविलें. थेऊरचे मुक्कामीं झाडून मुत्सद्दी येऊन थेउरास राहिले.

मग नाना फडणीस व मोरोबादादा फडणीस, हरिपंततात्या फडके, त्रिंबकरावमामा पेंठे व सखारामबापू व महादाजीपंत गुरुजी, बाजीपंत अण्णा, गोविंद शिवराम खाजगीवाले व आनंदराव जिवाजी पानसे, विंचुरकर, पटवर्धन, राजेबहाद्दर, अशी सर्व लहान थोर सरदार मंडळी व मुत्सद्दी मंडळी

---

* अठरा कारखाने = सरकारी मुख्य अठरा खातीं. हीं उष्टर- खबुतर- जनान- जवाहीर- जामदार- जिकीर- तालीम- तोफ- थट्टी- दप्तर- दारू-दिवान- नगार- -पील-फरास -बंदी-मोदी- शिकारखाना. हे अठरा कारखाने निरनिराळ्या प्रकारें दिले आहेत. ( मोलस्वर्थकृत कोश पृष्ठ १४. ) यांतील बहुतेकांचे अर्थ स्पष्ट आहेतच. ' जिकीरखाना ' म्हणजे अडगळ टेवण्याची जागा. पीलखाना = गजशाळा. मोदी-खाना = लष्करचे धान्याची वगैरे कोठी.

येऊन दरबारीं बसले आहेत. त्या वेळेस श्रीमंत आंगांत आंगरखा घालून डोकीस पागोटें, वरून शालनाम्याचा रुमाल बांधून पायांत विजार घालून बसले. त्या वेळेस श्रीमंतांनीं गोष्ट काढली कीं, "आमचे कारभाराचे हेतू बहुतेक पुरते झाले, परंतु तीन गोष्टी मनांत राहिल्या." असें सरकारचें बोलणें ऐकतांच नाना फडणीस व हरिपंत फडके यांणीं विनंती केली कीं, "कोणत्या गोष्टी मनांत राहिल्या असतील त्या आतां बोलावयास मनांत संशय येऊं नये, सेवकांच्यांनीं पार व्हावयाजोग्या असल्यास रुकार देऊं; नाहीं तर उगेच राहूं." असें ऐकतांच श्रीमंत म्हणतात, "पूर्वीं भाऊसाहेब, विश्वासरावसाहेब पाणिपतास लढाईंत गर्क झाले तें वर्तमान ऐकून गिलच्यांचें पारिपत्यास तीर्थस्वरूप दादासाहेब गेले; त्यांणीं पारिपत्य केलें; तथापि गिलच्यांचें पारिपत्य माझे मनाजोगें झालें नाहीं." असें बोलून नाना फडणीस व हरिपंततात्या फडके यांस उत्तर सांगतात कीं, "तुम्हीं मघाशीं विचारलें कीं, काय असेल ती आज्ञा करावी म्हणून त्याचें उत्तर तुम्हांला सांगतों. एक गिलच्यांचें पारिपत्य, दुसरें टिपूचें पारिपत्य, तिसरें मला कर्ज जहालें व माझीं खतें सावकारीं गुंतलेलीं आहेत तीं आणून द्यावीं, तर माझे हेतू पूर्ण झाले असें होईल."

त्या वेळेस सर्व मंडळी बसलेली होती, परंतु कोणाच्यानें हिंमतीचें उत्तर झालें नाहीं. त्या समयीं नाना फडणीस यांणीं छातीला हात लावून श्रीमंतांची खातरजमा केली, "या तिहीं गोष्टींची काळजी सरकारनीं ठेवूं नये, तिन्ही गोष्टी आम्ही पार करितों." तें ऐकून श्रीमंत रावसाहेब संतोष पावले आणि म्हणतात, "सावकाराकडे खतें आहेत तीं माझ्या डोळ्यांदेखत मजजवळ आलीं पाहिजेत, तर माझा प्राण गुंतणार नाहीं." असें ऐकतांच नाना यांणीं रामचंद्र नाईक परांजपे यांस जवळ बोलावून सांगितलें कीं, "नाईक, तुह्मीं सावकाराचे पंचवीस लक्षांचे हवाले घेऊन, तुह्मी आपले नांवाचे चिठ्ठे देऊन, श्रीमंतांचे नांवाचीं खतें आहेत तीं आणून श्रीमंतांपुढें ठेवावीं." असें नानांनीं सांगतांच, परांजपे यांनीं सर्व सावकार यांजकडे जाऊन, सरकारचे कर्जाचे हवाले घेऊन, आपल्या नांवाच्या चिठ्या देऊन सरकारच्या नांवाचीं खतें होतीं तीं माघारीं आणलीं आणि श्रीमंतांपुढें ठेविलीं. तीं खतें पाहून श्रीमंतांची मर्जी प्रसन्न जाहली.

त्यावेळेस हरिपंत तात्या फडके तेथें होतेच, त्यांस श्रीमंत बोलनात कीं, "तुम्हीं माझी सेवा एकनिष्ठपणें केली, तुम्हांस काय द्यावें?" तेव्हां तात्या यांणीं हात जोडून विनंती केली, "जें स्वामी कृपा करून देतील तें घेईन." असें ऐकतांच श्रीमंत यांणीं उत्तर केलें कीं, " तुम्हांस गांव इनाम देईन अथवा महाल मागितले तरी देईन, परंतु माझे मागें चालणें कठीण. अनेक तऱ्हेचे कारभार होतील तेव्हां तुम्हांस श्रम वाटतील कीं, 'श्रीमंतांनीं दिलें आणि आतां याला हे हिसके देतात.' हें नीट नाहीं. यास्तव असें देणें देतों कीं ज्यावर कोणाचा वारसा नाहीं." हें ऐकून फडके यांणीं गोष्ट कबूल केली. त्या समयीं आपले श्रीवर्धनचे देशमुखीपैकीं आपले जातीचा हिस्सा हरिपंततात्यांस बक्षीस देऊन, पत्रें करून दिलीं. असें देणें दिलें.

पुढें दादासाहेब यांस थेऊरचे मुक्कामीं भेटावयास आणिलें. त्यांची व रावसाहेब यांची भेट होऊन[५६], दादासाहेब यांस जवळ बसवून, सर्व राज्य-प्रकरणीं बोलणीं दादासाहेब यांशीं बोलून, नारायणराव साहेब यांस जवळ आणवून दादासाहेब यांचे हातीं दिलें; आणि सांगितलें कीं, " आतां याचा प्रतिपाळ करणें सर्व तुम्हांकडे; जसा नानासाहेब यांणीं सर्वांचा प्रतिपाळ केला, तसा तुम्हीं आतां या मुलास जवळ घेऊन राज्यकारभार करावा. आतां मनांत कोणते गोष्टीची आढी ठेऊं नये. सर्व तुमचें आहे असें समजून, त्या मुलावर दृष्टी देऊन राज्य चालवावें. या परतें आतां सांगणें काय ? आपण सर्व जाणत आहां. मीं लेंकरानें काय सांगावें ? " असें दादासाहेब यांणीं ऐकून रावसाहेब यांची खातरजमा केली कीं, " बाळा, तूं आतां या गोष्टीची चिंता कांहीं करूं नको. जसें वडिलांनीं चालविलें तसेंच पुढें चालवीन, यांत संशय तिळप्राय मनांत येऊं देऊं नको." अशी खातरजमा दादासाहेब यांणीं रावसाहेब यांची केली.

नंतर सखारामबापू यांस जवळ बोलावून, श्रीमंतांनीं जवळ बसवून बापूंस सांगितलें कीं, " आतां पुढें राज्य चालावणें तुम्हांकडे आहे. आजपर्यंत ज्या

५६. ह्या शेवटल्या भेटी—माधवरावांचीं अंतकाळचीं भाषणें—रमाबाईचा शोक—तिचीं भाषणें व सती जाणें—ह्या सर्व गोष्टी विनायक ज० कीर्तने यांच्या थोरले माधवरावांच्या नाटकांत उत्तम प्रकारें वर्णिल्या आहेत—त्यांतच रामशास्त्रीबावांची निस्पृहता—रमाबाईची व माधरावांची परस्पर प्रीती—दादांचा हेकटपणा—वगैरे गोष्टींचेंही चांगलें वर्णन केलें आहे.

गोष्टी जाहल्या त्या मनांत न आणितां निःसंशय राज्यकारभार चालवावा." त्या वेळेस नारायणराव साहेब यांस बोलावून बापूंचे हातीं दिलें कीं, " हें लहान लेंकरूं, याणें कांहीं पाहिलें नाहीं, याचा संभाळ चांगला करून, राज्य कारभार न्यायनीतीनें चालवावा. आतां दुसरा अर्थ मनांत न आणितां काम करावें." हें ऐकून बापूंनीं श्रीमंतांचे पायास हात लावून बोलले, " आतां मजकडून वांकडी वर्तणूक कांहीं व्हावयाची नाहीं." असें श्रीमंतांचे पायास हात लावून सांगितलें.

पुढें रामचंद्र नाईक परांजपे यांणीं सावकारी हवाले घेऊन सावकारांच्या चिठ्या माघाऱ्या आणिल्या. त्याबद्दल सरकार परांजपे यांजवर कृपावंत होऊन पालखीचीं वस्त्रें परांजपे यांस दिलीं.

पुढें नाना फडणीस व मोरोबादादा फडणीस, हरिपंत फडके, रामचंद्र गणेश, गोविंद शिवराम, बाजीपंत अण्णा, महादजीपंत गुरुजी असे सर्व बोलावून आणून, राज्याची निरवानिरव केली. सर्व नारायणराव साहेब यांस निरवून शके १६९४, नंदननाम संवत्सरे, सन् सल्लास सबैन मयां व अल्लफ, कार्तीक वद्य ८ बुधवार, प्रातःकाळीं, प्रहर दिवसास थेउरास श्रीगणपतीजवळ कैलासवास केला.

त्यासमयीं रमाबाई[५७]साहेबही बरोबर जाण्याचा निश्चय करून, प्रेतासमीप घेऊन बसलीं. तें पाहून कारभारी वगैरे मंडळी यांनीं बहुतां प्रकारें वारिलें; परंतु कोणाचें न ऐकतां निश्चयात्मक गोष्ट खाचित सांगितली कीं, " मला पाठीमागें राहावयाचें नाहीं." दादासाहेब व पार्वतीबाई[५८]साहेब यांचेंही वचन मान्य केलें नाहीं. तेव्हां साऱ्यांस समजलें कीं, जाण्याचा निश्चय खरा. तेव्हां जाण्याची तयारी करून साहित्य केलें. समागमें रमाबाईसाहेब वाणें वांटून, सर्वांस द्यावयाचें तें देऊन, निघते वेळेस फिरून रमाबाई यांणीं दादासाहेब व सखारामबापू या दोघांस नारायणराव याविषयीं बहुत प्रकारें निरविलें कीं, " हें लहान लेंकरूं, याचा प्रतिपाळ तुम्हीं आतां चांगला करावा. दुसरा भाव दाखवूं नये." मग बाई सहगमनास निघाली. सर्व मंडळी मुत्सद्दी व कारकून व कारभारी बरोबर मानकरी व सरदार सर्व निघाले. स्मशानांत जाऊन बाई सती गेली. सर्व क्रिया बारा दिवस पर्यंत नारायणराव साहेब यांणीं केली.

---

५७. ही सोलापूरकर जोशी यांची कन्या. ५८. पार्वतीबाई=सदाशिवरावांची पत्नी.

# नारायणराव बल्लाळ इ० स०–१७७२–१७७३.

[माधवराव यांस ] तेरा दिवस झाल्यानंतर दादासाहेबसुद्धां सर्व कारभारी व मुत्सद्दी व कारकून व सरदार व मानकरी असे मिळून नारायणराव साहेब यांस घेऊन पुण्यास आले. नंतर साताऱ्यास जाण्याचा निश्चय ठरला. नारायणराव साहेब यांस घेऊन दादासाहेब व सखारामबापू, पुरंदरे बजाबा व नाना फडणीस व हरीपंत फडके अशी सर्वत्र मंडळी पुण्याहून निघून, साताऱ्यास जाऊन, राजे यांस भेटून, सर्व मजकूर विदीत करून, पुढें ' नारायणराव यांचे नांवें पेशवाईपदाचीं वस्त्रें द्यावीं," अशी सर्वांनीं विनंती केली. नंतर राजे यांनीं पेशवाईचीं वस्त्रें नारायणराव यांस देऊन शिक्के कटार हवालीं केलीं.[1] मग तेथून महाराजांचा निरोप घेऊन पुण्यास आले. नंतर कारभार करूं लागले. तेव्हां दादासाहेब यांस पहिल्याप्रमाणेंच ठेविलें.[2] तें दादासाहेब यांचे मनास वाईट वाटून मोठा विषाद वाटला. पुढें कारभाराचें अंग दादासाहेब यांजकडे कांहीं नाहीं असें जाणून दादा यांणीं तपश्चर्या मांडली. त्या समयीं नारायणरावसाहेब यांणीं दोन चार वेळां जवळ जाऊन विनंती केली की, " आतां आपण राग सोडून राज्यकारभारांत चित्त घालून तुम्ही आम्ही एकचित्त होऊन राज्य चालवूं. " अशी वारंवार नारायणराव साहेब यांणीं विज्ञापना केली. परंतु तें दादांचे मनांत येईना. सारा हेतू हाच की, " मीच राज्य करीन." असा निश्चय दादांचा जाणून रावसाहेब[3] कारभार करूं लागले. मध्यें नारायणराव साहेब गंगापुरास गोपिकाबाईयांस[4] भेटावयास गेले. तेव्हां पाठीमागें दादासाहेब

१. वस्त्रें दिसेंबरांत मिळालीं. या वेळीं सखारामबापूस कारभाऱ्याचीं वस्त्रें दिलीं, बजाबा पुरंदरे दिवाण झाले व नानांस फडणिशीचे जागेवर कायम केलें. २. दादा कांहीं दिवस मोकळे होते. पण लौकरच त्यांस सर्व कारभाऱ्यांच्या अनुमतें कैदेंत ठेविलें; बापूंच्या मनास मात्र हा विचार आला नाहीं. ३. माधवराव, नारायणराव व सवाई माधवराव या सर्वांस " रावसाहेब " असेंच या बखरींत म्हटलें आहे. ४. ही माधवराव व नारायणराव यांची आई. राघोबादादावरून हिचें माधवरावाशीं बिनसल्यावरून ती पुण्याहून एकदां निघून गोदातिरीं गेली ती पुनः परत आली नाहीं. सवाई माधवरावांच्या मुंजीच्या वेळीं नाना फडणीस यांणींही समारंभास येण्याविषयीं बहुत आग्रह केला, परंतु त्या बाईनें ती गोष्ट कबूल केली नाहीं !

यांणीं फितूर केला. ती बातमी गंगापुरास रावसाहेब यांस समजल्यानंतर लागलेच टाकोटाक पुण्यांत येऊन, सारा मजकूर मनास आणून, बराबर बंदोबस्त करून, सारे फितुरवाले धरून किल्यावर टाकिले.

असा बंदोबस्त केला. आणखी फिरून दादासाहेब यांस रावसाहेब यांणीं वारंवार हेंच सांगितलें कीं, "आपण राग सोडून द्यावा. तुम्हीं आम्ही एकत्र होऊन राज्य चालवूं" याप्रमाणें नारायणराव सांगत गेले. परंतु तें दादा यांचे चित्तास न येई. वाड्यांत सदरबारगीर होते ते बापू यांणीं दूर केले. दादा-साहेब यांचेभोवतीं चौकी पहारे कडोविकडीचे ठेविले. तेव्हां पासून दादासाहेब उपवास करूं लागले. इकडे राज्यकारभार चालूं लागला. असें करीत असतां सहा महिने लोटले.

नंतर दादासाहेब यांणीं गारदी यांजकडे फितूर मांडला. नऊ लाख रुपये गारद्यांस देऊं म्हणून कागद लिहून दिला आणि नारायणराव साहेब यांस कैद करावें. या मसलतीस सखारामबापू यांचे आंग होतें तें बाहेर दृष्टीस येऊं दिलें नाहीं. आणखी एक दोन असामी यांचा सल्ला त्यांत होता. हा मजकूर सारा आनंदीबाई यांणीं केला. तेव्हां जे कागदपत्र केले, ते आनंदीबाई यांणीं पाहून 'धरावें' असें जें होतें त्या 'ध' चा 'मा' केला. ही गोष्ट सखारामपंत यांस माहीत नव्हती.

राज्यकारभार करीत असतां श्रावणमासाचा *उत्साह जाहल्यानंतर गणेश चथुर्थीचे उत्साहास † आरंभ झाल्यानंतर उत्साहाचे संधींत कुलाब्यास राघोजी आंगरे यांस बलावणें सरकारचें गेलें होतें. तेहि पुण्यास निघून आले. उत्साह जहाल्यानंतर रावसाहेब आंगरे यांस भेटावयास गेले. त्यांस भेटून, त्यांस राहण्याचें सांगून, स्वारी सरकारची पर्वतीस देवदर्शनास जाऊन माघारी फिरली. त्यासमयीं फितुराची गुणगूण समजली वाटेनें हरिपंत फडके यांस

---

५. सदरबारगीर = वाड्यांतील पाहऱ्यावरील स्वार. ६. गारदी = गार्दी. हा शब्द पोर्तुगीज Guarda इं० Guard या शब्दापासून मराठींत आला. ७. मजकूर = खटपट

* दाक्षिणेचा समारंभ. † हा टोलेजंग उत्सव गणपती-महालांत ११ दिवस होत असे. तेथें केळीच्या खुंटा एवढाल्या मेणबत्या हरदासाचे दोन्ही बाजूंस लावीत व प्रत्येक झुंबरांत व झाडांत ७०।७५ मेणबत्या लागत. ह्या ११ दिवसांचे ११ विडे ज्यांस मिळत त्यांचीं पानें व चुना शिवाय करून विड्याच्या साहित्याची वर्षाची बेगमी होई! (पुणें शहराचें वर्णन पाहा.) ८. ता.३० आगष्ट १७७३ रोजीं.

श्रीमंत बोलले, "हें काय ? हा मजकूर तुम्हीं मनास आणिला कीं, नाहीं ?" त्या समयीं हरिपंत यांनीं उत्तर केलें, "आतां जेवून आल्यानंतर याचा विचार करूं." असें बोलून हरिपंत आपले घरीं गेले. श्रीमंत वाड्यांत आले. भोजनास उशीर झाला म्हणोन वांकनीस यांस सांगितलें कीं, "उदईक गोसांवी[९] यांस भोजनास बोलावूं." असें बोलून श्रीमंत भोजनास बसले. भोजन करते वेळेस ही गुणगूण सारी समजली. परंतु होणार तें चुकत नाहीं; तें सर्व घडून येतें. श्रीमंत भोजन करून उठल्यानंतर विडा घेऊन महालांत निजावयास गेले.

ती संधी राखून तुळाजी पोंवार, खिजमतगार, निसबत दादासाहेब, हा गारदी यांस कळवावयास गेला. आणि गारदी यांस सांगितलें कीं, "आतां तुम्हीं उशीर करूं नका. तुमचा फितूर सारा वाड्यांत समजला आहे. अशा वेळेस संधी साधेल तरच कार्य शेवटास लागेल. नाहीं तर सारे अवघे फाशांत पडाल." असें वर्तमान तुळाजीनें सांगून, गारदी तयार करून, हजार दोन हजार गारदी कंबरबस्त होऊन, दिल्ली दरवाज्यावर[१०] येऊन, आंत जाऊं लागले. तेव्हां चौकीदार यांणीं मनाई करतांच गारदी यांणीं दरवाज्यांत तोडातोड करून आंत नीट चालले आणि वाड्याचे तटावर गेले. त्या समयीं इच्छारामपंत ढेरे, पागा हुजूर, हे जेवून वाड्यांत येत होते त्यांनीं गारदी पाहून, "काय आहे ? काय आहे ?" म्हणोन बोलूं लागले. तें तुळाजीनें ऐकून, तुळाजी गारद्यांस बोलतो "याला मारा, पहातां काय ?" असें गारद्यांनीं ऐकून गारदी निःसंग ढेरे यांजवर चालून आले ते इच्छारामपंत यांणीं पाहून गोशाळेंत शिरले कीं, "गाईचा आसरा केल्यानें तरी वांचेन." परंतु ते गारदी निष्ठुर, त्यांजला दया कोठून ? इच्छारामपंत गाईच्या आड पडला असतां, गाईसुद्धां गारद्यांनीं इच्छारामपंतास ठार केलें. अशी मारामार करीत वाड्यांत शिरले. शिरून वाड्यांत दिवाणखान्यांत चढले. तेथें आबाजीपंत होता, तो कवाडें लावूं लागला. तें पाहून गारदी बोलले, "कवाड लावितां तोडीन." तें आबाजीपंत याणें ऐकलें.

---

९. गोसांवी— उत्सवाचे हरदासबोवा. १०. दिल्ली दरवाजा = मुख्य द्वार. हें द्वार दिल्लीकडच्या बाजूस म्हणजे उत्तरेस ठेवण्याची चाल होती. हें दिल्लीपतीच्या सन्मानार्थ असावें. हा दिल्ली दरवाजा अद्याप आहे. ह्याच्या पुढील मैदानांत मंडईचा भाजीबाजार थोडे वर्षांपूर्वी भरत होता. आतां त्याचे समोर चार सडका होऊन मोठा चौक साधिला आहे. ग्रांट डफ म्हणतात गारदी उत्तरेच्या दरवाज्यानें म्हणजे (दिल्ली दरवाज्यानें) न शिरतां पूर्व द्वारानें (गणेश दरवाज्यानें) आंत गेले.

परंतु कवाड लावूं लागला. तेव्हां गारदी धांवून, आबाजीपंत यांस ठार केला, आणि गारदी आंत शिरले. अशी गर्दी वाड्यांत मोठी पाहून सफेली[11] वरती गारदी चढले आहेत हें पाहून, शहरांत मोठी हूल* पडली. मोठी गडबड जाहली. लोक चोहींकडे पळूं लागले. बाजारकरी यांणीं दुकानें लाविलीं.

इकडे वाड्यांत रावसाहेब निजले होते ते उठून, गणपतीचे रंगमहालांतून, कोठीच्या[12] जिन्यानें चढून, दादासाहेब यांजकडे चालिले. त्या समयीं चापाजी टिळेकर खिजमतगार व नारोबा फाटक शिष्या, असे दोघेजण बरोबर होते. त्यांसुद्धां दादासाहेब यांजकडे जाऊन रावसाहेब म्हणतात कीं, "गारद्यांनीं वाड्यामध्यें मोठी धूम करून मारामारी केली, म्हणून मी तुम्हांपाशीं आलों, तुम्हीं हा फितूर केला. ते गारदी आतां समजावून वाटेस लावावे. तुम्हांस राज्य करणें असल्यास मला कैदेंत घालून, सुखें राज्य करावें." असें बोलणें बोलतात ती बातमी गारद्यांस लागतांच, गारदी निःसंग होऊन दादासाहेब यांजकडे आले. तें पाहून नारायणराव साहेब यांनीं दादासाहेब यांच्या कंबरेस मिठी घातली. हें पाहून खरगसिंग[13] व सुमेरसिंग व महंमद इसब हे तलवारा उपसून धांवले. त्या समयीं तुळाजीनें जाऊन श्रीमंतांस ओढून[14] आणिलें आणि तोंडानें बोलतो, "आतां कां पळतोस !" असें म्हणून ओढिलें. तेव्हां चापाजी टिळेकर यानें गारद्यांस सांगितलें, "अरे ! लहान लेकरूं ! यास मारूं नका." असें म्हणून चापाजी श्रीमंतांचे आंगावर पडला. त्या समयीं अगोदर चापाजीस तोडिलें हें पाहून नारोबा फाटक जवळ उभा होता तोही श्रीमंतांचे आंगावर पडला. तेव्हां फाटक यांचें डोकें उडविलें. नारायणराव साहेब यांची शुद्धी गेली. कांहीं सुचेनासें झालें. मग गारद्यांनीं वारावर वार केले. कोथळा फुटून बाहेर पडला. अशी मारामार झाली.

---

११ सफेली=तटाची गच्ची. *हूल=गडबड, धांदल. १२. दिल्ली दरवाज्याप्रमाणें हीं स्थानें पाहाण्याची कोणास आशा नको. हल्लींच्या अमलाच्या प्रारंभींच वाड्याचें दहन झालें. हल्लीं दिल्ली दरवाजा व त्याच्या संगतीणी–भोंवतील भिंती–मात्र येथें एकदां असें स्थल होतें असें सांगत उभ्या आहेत. हल्लीं वाड्याची जागा खोदून कारंजीं हौद वगैरे यांचें संशोधन चाललें आहे. १३ खरगसिंग वाड्यांत पहाऱ्यावर होता तो आपल्या सोबत्यांस–सुमेरसिंग व महंमद येसूफ यांस–सामील झाला. १४. तुळाजी पोवार यास नारायणरावानें पूर्वीं सर्वांदेखत फटके दिले होते म्हणून त्यानें सूड घेण्यासाठीं हें काम केलें. ग्रांट डफ.

इकडे शहरामध्यें मोठी हूल पडली. त्यामुळें सरदार तयार होऊन आले. ते कोण कोण ? अगोदर हरिपंत फडके घोड्यावर स्वार होऊन वाड्यापाशीं येऊन, उभे राहून पहातात तों गारदी मोठे चवताळले, निष्ठूर झाले, असें पाहिलें. हें पाहून हरिपंत माघारे फिरले. तसेंच सरदार मोठे मोठे व उमराव आले. आपाजीराव पाटणकर, खंडोजी जगताप, रास्ते आनंदराव, गणपतराव दुसरे–मामा त्रिंबकराव. आपा बळवंतराव, गोविंदराव गायकवाड, भवानराव प्रतिनिधी, मालोजी घोरपडे, मालोजी निंबाळकर, आणखी पागा हुजुरांतील, सखारामचापू, बजाबा पुरंदरे, मोरोबादादा फडणीस, हरिपंत फडके, आनंदराव जिवाजी, राघोजी आंगरे, नाना फडणीस, बाळाजीपंत दामले, पानशे असे किती गणतीस धरावे ! असे सर्व मिळोन बुधवारचे चावडीवर जमा झाले. तेव्हां तेथें जमा होऊन विचार करितात, "आतां उपाय कोणता करावा ?" तेव्हां सारे सरदार व पागे म्हणतात, "वाड्यावर हल्ला करूं आणि गारदी मारून बाहेर काढूं. गारद्यांचा हिशेब आम्हांपुढें तो काय ?" अशी मसलत करितात. ती मसलत बापूंचे [१५]ध्यानांत येईना. कारण "राव वाड्यांत गुंतले आहेत, तेव्हां आम्ही बाहेरून हल्ला करण्यास जाऊं तर ते गारदी वाड्यांत एकादा अनर्थ करितील. यासाठीं हल्ला करितां येत नाहीं. वाड्यांतली खबर बाहेर समजत नाहीं."

इकडे वाड्यांत रावसाहेब यांस मारल्यानंतर गारदी यांणीं वाड्यांत लुटालूट फार केली. सोंवळें, ओंवळें कांहीं पाहिलें नाहीं. असा अनर्थ करून दादासाहेब यांस गारदी यांनीं पोषाक करून, [१६]सदरेस आणिलें. दादासाहेब विडा घेऊन सदरेस येऊन बसले. सर्व गारदी दादासाहेब यांस सलाम करून जवळ उभे राहिले. त्या समयीं नारोजी नाईक जासूद दादासाहेब यांजपाशीं येऊन स्पष्ट भाषण करिता झाला. "चांगलें केलें ! तुम्हीं पेशव्यांचे वंशांत येऊन मोठी कीर्ती मिळविली ! काय लौकीक केला !!" असें बोलत आहे तों गारद्यांस इशारत होतांच, लागलेंच नारोजींचें शीर उडविलें. मग दादासाहेब यांणीं चोपदार बाहेर पाठविला. त्यास सांगितलें कीं, "बाहेर मंडळी चावडीवर जमा झाली आहे तेथें तूं जाऊन, मालोजी घोरपडे व बजाबा पुरंदरे, या दोघांस

१५. ध्यानांत येईना=मनास येईना, पसंत पडेना. १६. सदरेस = दरबारच्या दिवाणखान्यांत.

बलावून घेऊन यावें." त्या समयीं तो चोपदार चावडीवर येऊन, मालोजी घोरपडे व बजाबा पुरंदरे यांस त्यानें सांगितलें कीं, 'तुम्हांस उभयतांस वाड्यांत बलाविलें आहे.' हें ऐकून, सर्व मंडळी त्यांस म्हणूं लागली, "तुम्हीं उभयतां जाऊन, वाड्यांतला समाचार घेऊन यावें." असें सर्वांनीं सांगितल्यावरून निघाले ते नीट गणेश दरवाज्यानें वाड्यांत आले. तों कचेरींत दादासाहेब बसले आहेत. त्यांस पाहून, मालोजीनें रामराम करून बजाबा यानें नमस्कार केला. तेव्हां झालें वर्तमान त्यांस सांगितलें. तेव्हां मालोजीनें ऐकून उत्तर केलें, "चागली कीर्ती मिळविली! चांगला लौकीक संपादिला!!" हें दादासाहेब यांनीं ऐकून दादासाहेब बोलतात, "झाली गोष्ट येत नाहीं. आतां आमची शहरांत द्वाही फिरवून शहराचा बंदोबस्त करावा." असें सांगून दोघांस बाहेर जाण्याचा निरोप दिला. त्यांनीं चावडीवर येऊन सर्व मजकूर मंडळीस सांगितला. तेव्हां सर्वांचीं अवसानें निघून गेलीं. दुसऱ्यानें भवानराव प्रतिनिधी यांस बोलावून नेलें. तेव्हां भवानराव पंत वाड्यांत जाऊन दादासाहेब यांस भेटले. तेव्हां भवानराव यांणीं चांगलें उत्तर केलें. "फार लौकीक मिळविला! गारदी म्हणजे हिशेब काय? इतके गारद्यांस मी एकटा पुरेन. परंतु तुम्हीं नांवलौकीक चांगला मिळविला! असो गारद्यांचा हिशेब आम्हीं ठेवीत नाहीं." असें गारद्यांनीं ऐकतांच गारदी चपापले. मग भवानराव यांनीं चावडीवर येऊन मजकूर जाहला तो सर्व सांगितला. तेव्हां साऱ्यांचीं अवसानें जाऊन, सर्व मंडळी आपापले घरोघर गेली. फौज मानकरी वगैरे जमा झाले होते तेही सर्व आपले ठिकाणांस गेले.

वाड्यांत मोठी रडारड होऊन पार्वतीबाई व सगुणाबाई[१७] व गंगाबाई यांणीं जो आकांत केला आहे तो वर्णितां येत नाहीं. त्या समयीं गंगाबाई यांणीं निश्चय समागमें जाण्याचा केला. कोणाचें ऐकत नाहींत. त्या समयीं सौभाग्यवती आनंदीबाई इणें गंगाबाईचा हात धरून, एकीकडे नेऊन, खोलीमध्यें घालून बाहेरून कडी लावून घेतली. असा मारा वाड्यांत गारदी यांनीं केला. शके १६९५ जयनाम संवत्सरे, सन आर्बा सबैन मया व अल्लफ, भाद्रपद शुद्ध त्रयोदशी सोमवारीं दोन प्रहराचे समयास वाड्यांत गर्दी करून सुमेरसिंग व खरगसिंग व महंमद

---

१७. सगुणाबाईही बाजीरावाचा तिसरा मुलगा जो जनार्दनबाबा त्याची स्त्री.

इसब व तुळाजी पोवार यांणीं नारायणराव साहेब यांजवर जखमा करून ठार मारिलें. दुसरे इच्छारामपंत ढेरे, तिसरे आबाजीपंत, चौथा नारोबा फाटक, पांचवा चापाजी टिळेकर ‡खिजमतगार, साहावा नारोजी नाईक जासूद असे वाड्यांत मारिले. याप्रमाणें मजकूर झाला.

सायंकाळीं सर्व मंडळी मुत्सद्दी उघडे बोडके होऊन, सखारामबापू, नाना फडणीस, मोरोबादादा फडणीस, हरिपंत फडके, त्र्यंबकराव मामा पेंठे व महादाजीपंत गुरुजी, बाजीपंत अण्णा जोशी, रामचंद्र गणेश, असे सर्व लहानथोर, बजाबा पुंरदरे, आनंदराव रास्ते, सर्वत्र उघडे होऊन, वाड्यांत येऊन श्रीमंतांचें प्रेत बाहेर काढिलें. तशींच सर्वांचे घरचे येऊन सर्वांचीं प्रेतें बाहेर काढून नदीवर नेलीं. दादासाहेब समागमें अशा सर्व मंडळीसुद्धां नदीवर जाऊन विधियुक्त अग्निसंस्कार श्रीमंतांस झाला. मग सारे आपले घरोघर गेले. याप्रमाणें दहा दिवसपर्यंत उत्तरकर्म होऊन दहावे दिवशीं झाडून मंडळी कारकून व मुत्सद्दी तमाम नदीवर तिळांजळीस आले. त्या समयीं त्र्यंबकराव-मामा पेंठे व नाना फडणीस व सखारामबापू व हरिपंत फडके असे चौघे एकीकडे बसून, वाळवेचीं लिंगें करून, परस्परें चौघांच्या आणाक्रिया लिंगावर हात ठेवून झाल्या कीं, "नानासाहेब यांचा वंश चालवायाचा. त्या वंशाशिवाय कारभार चालावयाचा नाहीं. या वंशास* नमस्कार करावयाचा नाहीं. असें चौघांचें बोलणें होऊन, तिळांजळी देऊन, आपापले घरोघर गेले. नंतर तेरा दिवसपर्यंत उत्तरविधी केला.

विधी उरकल्यावर दादासाहेब यांनीं सातान्यास कारकून पाठवून, आपले नांवाचीं वस्त्रें पेशवाईचीं आणून, शिक्केकटार घेऊन आले. तेव्हांपासून दादासाहेब राज्यकारभार करूं लागले. तेव्हां त्यांनीं आपलें मंडळ सभोंवतीं मिळविलें. त्यांत मुख्य चिंतो विठ्ठल. असा कारभार चालत असतां सारे जुने मुत्सद्दी ह्यांची गरज नाहींशी झाली. त्या समयीं सखारामबापू यांणीं मोंगलाईत फितूर करून पेशवे अंमल होता तितके मुलखाचीं ठाणीं पेशवे यांचीं उठवून दिलीं. हे बोभाट पुण्यास आले. म्हणोन दादासाहेब मोंगलाईत

‡ चापाजीचे वंशजास येखतपूर, ता० पुरंदर, हा गांव इनाम चालत आहे. इतरांविषयीं तजवीज काय झाली ती कळत नाहीं. *रघुनाथरावांच्या. १८. आपलें मंडळ—सदाशिव रामचंद्र, चिंतो विठ्ठल, आबाजी महादेव, सखाराम हरि इत्यादी.

स्वारीस निघाले. त्यासमयीं नाना फडणीस व हरिपंत फडके व मोरोबा फडणीस व सखारामबापू यांस समागमें घेतलें. त्र्यंबकराव मामा पेंठे हे जरीपटका वागवीत होते ते तसेच दादासाहेब यांणीं, त्यांजकडेसच फौजेचें काम सांगून, स्वारी बराबर घेतले. बाकी मंडळी कैद करून बरोबर चालविली. तेव्हां मोंगलाईत जाऊन आपला अंमल चालता करून, नबाबाशीं लढाई घेऊन, स्वारीखर्चाचा पैका घेऊन, पुढें श्रीमंत हिंदुस्थानांत जाण्याच्या उद्देशानें खानदेशांत उतरले. तेव्हां बऱ्हाणपूरपावेतों स्वारी सरकारची गेली. बऱ्हाणपुरावर आठ पंधरा दिवस मुक्काम झाला. त्या मुक्कामीं सखारामपंत बापू यांणीं श्रीमंतांचा निरोप पुण्यास जाण्याचा घेतला, तेव्हां निरोप घेऊन आपले राहुटीस आले आणि नाना फडणीस वगैरे मंडळी यांस आपले राहुटीस बापू यांणीं बोलावून आणून नाना व हरिपंत तात्या यांस मजकूर सांगितला कीं, "आम्हीं श्रीमंतांचा निरोप पुण्यास जाण्याविषयीं घेतला. तेव्हां तुम्हांस पुण्यास यावयाचें आहे कीं, नाहीं ?" असें बोलणें ऐकून, नाना व तात्या यांणीं उत्तर केलें कीं, "आम्ही स्वाधीन आहों कीं काय ? आम्हांस निरोप कसा होतो !" हें ऐकून बापू त्यांस म्हणतात, "तुम्हांस निरोप देवविला तर तुम्ही याल ?" असें बापू बोलतांच मग सर्वांनीं बोलण्यास रुकार दिला, "तुम्ही आतां निघत असलां तरी आम्ही निघतों." अशीं बोलणीं ऐकून बापूंनीं सर्वांस आपले बिऱ्हाडीं जाण्याचा निरोप दिला. नंतर सर्व मंडळी आपले बिऱ्हाडीं गेली.

मग सखारामपंत बापू यांणीं दादासाहेब यांजकडील कारभारी मंडळी चिंतो विठ्ठल वगैरे होते त्यांस आपले राहुटीस बलावून आणून सांगते झाले

---

१९. पुण्यांत आपसामध्यें तंटे चालू झाले हें पाहून निजामअल्ली व हैदर यांचें फावलें. दोघांनीं पेशव्यांचीं ठाणीं उठवून लाविलीं. साबाजी भोंसलाही लढाईस निघाला. दादांनीं प्रथम निजामाची खोड मोडण्याचा बेत केला. स्वारीस जाण्याचे दिवशींच प्रसिद्ध रामशास्त्री यांची व दादांची भेट झाली व याच वेळीं नारायणरावास मारण्याच्या कामांत कोणकोणाचीं अंगें होतीं हें दादांस शास्त्रीबावांनीं सांगितल्यावर "ह्यास प्रायश्चित्त काय ?" असें दादांनीं विचारितां "देहांत प्रायश्चित्त, दुसरें कांहीं नाहीं." असें सांगून व "दादा, या राज्यांत आहां तोंपर्यंत पुण्यांत पाय ठेवणार नाहीं," अशी प्रतिज्ञा करून शास्त्रीबावा आपले गांवीं निघून चालते झाले. असो. पुढें निजामाचा पराभव करून दादांनीं त्रिंबकराव मामांस साबाजीवर धाडिलें व आपण हैदराकडे वळले. अशा वेळीं कारभारी मंडळींत कट करण्याचे बेत सुरू झाले.

कीं, "तुम्हीं कारभार करितां परंतु तुम्हांस कारभाराचें धोरण अगदीं नाहीं." तेव्हां ते बोलूं लागले, "कसें नाहीं तें सांगावें." तेव्हां बापू म्हणतात, "नाना फडणीस व हरिपंत फडके वगैरे मंडळी तुम्हीं कैद करून समागमें चालविली आहे, हे तुम्हांस कोणे ठिकाणीं, कोणे वेळेस *घालवतील याचा नेम कळावयाचा नाहीं. यासाठीं तुम्हीं श्रीमंतांस विनंती करून सर्व मंडळी पुण्यास पोंचती करावी. ज्याचे त्याचे घरीं ठेवून दरवाज्यावर चौकीपहारा ठेवून आपले आपले घरीं राहतील, सरकारचे परवानगीशिवाय बाहेर जाऊं नये, असें करणें हें मला चांगलें दिसतें. हे बराबर असल्यानें जशी खिशांत आग बाळगावी तसें आहे. इतक्यावर सरकारची मर्जी. मी मजकूर बोललों हा मजकूर तुम्हीं श्रीमंतांचे कानावर घालावा काय उत्तर होतें तें मला कळवावें." त्या समयीं कारभारी यांचे चित्तास ती गोष्ट आली. मग चिंतो विठ्ठल वगैरे श्रीमंतांकडे जाऊन, बापू बोलिले हा सारा मजकूर श्रीमंतांस समजाविला. त्यावेळेस श्रीमंत बोलिले, "बरें आहे. सखारामपंत त्यांस संभाळून नेत असल्यास आम्ही सर्वांची रवानगी पुण्यास करून देऊं." असें बोलणें श्रीमंतांचें होतांच तो मजकूर चिंतो विठ्ठल यांनीं सखारापंत बापूंस सांगितला. मग श्रीमंतांकडे जाऊन, सारे मंडळीस बोलावून सर्वांस निरोपाचे विडे दिले आणि दादासाहेब यांनीं सर्वांस सांगितलें कीं, "सखारामपंत पुण्यास जात आहेत, त्यांच्या बरोबर तुम्हीं जावें." अशी सरकारची आज्ञा होतांच सर्वत्र लहान थोर श्रीमंतांस नमस्कार करून निघाले. मग सखारामपंत बापू यांणीं विनंती केली कीं, "यांचे रखवालीस कांहीं सरंजाम सरकारचा पाहिजे. माझे घरचे पतकाचे हजार बाराशें स्वार आहेत व आणखीही सरकारांतून नेमून द्यावे, म्हणजे यांस संभाळून घेऊन पुण्यास नेतों." असें बापूंचें बोलणें ऐकतांच, हजार स्वार व हजार गारदी नेमून दिले. बापूंचे घरचा हजार बाराशें सरंजाम घेऊन सर्व मंडळी नाना फडणीस व हरिपंत तात्या व मोरोबा दादा फडणीस, बाजीपंत जोशी व बजाबा पुरंदरे असे सर्व मुत्सद्दी कारकून पुण्यास यावयास निघाले.

दादासाहेब यांची स्वारी ज्या वेळेस पुण्याहून निघाली त्या समयीं शहरचा बंदोबस्त व वाड्याचा बंदोबस्त नारो आपाजी तुळशीबागवाले यांजकडे सांगितला होता. बाकी खासगीवाले, वांकनीस वगैरे जुनें मंडळ होतें. आणखी

* घालवतील = दगा करतील.

दादासाहेब यांणीं आपले तर्फेचे कारभारी वाड्यांत ठेविले होते. वाड्यांत पार्वतीबाई व गंगाबाई व सौभाग्यवती[20] दुर्गाबाई अशा होत्या. इकडे सारी मंडळी श्रीमंतांचा निरोप घेऊन सखारामपंत बापूंसुद्धां निघाले ते मजल दरमजल येऊन पुण्यास दाखल जहाले.मग सर्व मंडळी घरोघर ज्यांच्या त्यांच्या घरीं ठेऊन दरवाज्यावर सरकारचे पहारे ठेविले. सरकार-परवानगीशिवाय कोणी बाहेर जाऊं नये, अशी ताकीद सर्वांस जहाली. याप्रमाणें जहालें.

त्यास आठ पंधरा दिवस गेल्यावर सखारामपंत बापू यांणीं नाना फडणीस व हरिपंत तात्या फडके, यांस आपले येथें बलावून आणून त्यांशीं बापूंनीं बोलणें केलें कीं, "आपण कोणे मसलतीनें पुण्यास आलों ! " त्यास पुढें विचार कसा करितां !" हें बापूंचें बोलणें ऐकून नानांनीं उत्तर केलें कीं, " या मसलतींत कांहीं फौज आपल्याजवळ पाहिजे, म्हणजे कोणतें एक राजकारण करितां येईल," तेव्हां बापूंनीं उत्तर केलें कीं, " आपल्या जवळ २-२॥ हजार सरंजाम बराबरचा आहे व पुणें मुक्कामीं फौज आहे ही फौज आपल्यास अनुकूल होईल." असें बापूंचें बोलणें ऐकून नाना म्हणाले " बरें आहे." त्या वेळेस बापूंनीं नारो आपाजी तुळशी-बागवाले यांस बलावून आणून त्यांस विचार सांगितला कीं,"आम्हांस उभयतां बाया वाड्याबाहेर काढावयाच्या यास तुम्हीं अनुकूल झालें पाहिजे." तें ऐकून नारो आपाजी यांणीं उत्तर केलें कीं, "मीं आपले आज्ञेशिवाय नाहीं, जें आपणांस कर्तव्य तें आम्हांसही अवश्य आहे, परंतु सध्यां श्रीमंतांचा शब्द मजवर न येईल असें करणें आपणांकडे आहे." अशी मसलत करून सर्व सरदार, मानकरी पुणें मुक्कामीं होते त्यांचा अवघ्यांचा समुच्चय होऊन सर्वांचे रुकार पडले. अशी सर्व तयारी होऊन बापू व नाना व तात्या असे वाड्यांत जाऊन गंगाबाई व पार्वतीबाई व सगुणाबाई व दुर्गाबाई अशा वाड्यांत गर्दी करून बाहेर काढिल्या. त्यासमयीं दादासाहेब यांजकडील कारभारी वाड्यांत होते त्यांणीं थोडीशी गडबड मांडिली ती पाहून, तत्क्षणीं त्यांचा बंदोबस्त करून बायांसुद्धां सारे मुत्सद्दी सरदार, मानकरी व पागे जे पुणें मुक्कामीं होते तितक्यांसहित पुरंदर किल्ल्यास दाखल झाले. किल्ल्यावर चढून, किल्ल्याचा बंदोबस्त करून, सभोंवते चौक्यापहारे मोर्चेबंदी करून सभोंवतीं कोणी न येई

---

२० दुर्गाबाई ही दादांची कन्या. ही बारामतीकर यांजकडे दिली होती.

असा बंदोबस्त करून, सखारामपंत बापू यांचे अनुमतानें मसलतीचा आरंभ करिते झाले.

मग दादासाहेब यांचे समागमें स्वार व पागे व ऐकांडे[२१], शिलेदार व मानकरी व सरदार होते तितक्यांस श्रीमंत गंगाबाईसाहेब यांचे नांवाचीं पत्रें पाठवून जासूद रवाना केले. त्यांत मजकूर, "तुम्हीं सर्वांनीं निघोन पुरंदरचे मुक्कामीं यावें. दादासाहेब यांचे समागमें राहिलें असतां सर्वांचे घरादारांचा बदोबस्त सरकारांतून देशीं केला जाईल. हें समजून सर्वांनीं निघून यावें. अशीं ताकीद-पत्रें सर्वांस लिहून पाठविलीं. तीं पत्रें घेऊन जासूद ज्या ठिकाणीं दादासाहेब यांचें लष्कर होतें त्या ठिकाणीं जासूद जाऊन सर्वांस पत्रें सरकारचीं दिलीं. मग तितके लोकांनीं तीं पत्रें घेऊन, श्रीमंतांस दाखविलीं आणि सर्वांनीं विनंती केली, "आम्हांला काय आज्ञा ती सांगावी. येथें राहावें तर तिकडे मुलामाणसांची आशा सोडावी, असा प्रकार झाला आहे. याची तजवीज कशी करावी ?" असें सर्वांचें बोलणें दादासाहेब यांणीं ऐकून सर्वांस उत्तर केलें कीं, "ज्याला आमचें अगत्य असेल त्याणें येथें राहावें. जाईल त्यास आमची मनाई नाहीं." असें उत्तर होतांच सर्व सरदार व शिलेदार व मानकरी व एकांडे, हुजुरात, पागे सर्व देशीं निघाले ते येते झाले. येऊन सर्व पुरंदरास कारभारी यांस भेटले. पुढें शिंदे, होळकर, गायकवाड, व भोंसले व विसाजी कृष्ण बिनीवाले, यांसही पत्रें अशींच गेलीं कीं, "दादासाहेब यांस कोणीं सामील होऊं नये." असा सर्व बंदोबस्त केला.

पुढें बाईसाहेब यांचे गर्भास नऊ मास भरले. त्यासमयीं दादासाहेब यांची कन्या सौभाग्यवती दुर्गाबाई, इला बारामतीहून आणवून, गंगाबाई यांजजवळ ठेविली. बहुत ब्राह्मण अनुष्ठानास बसविले होते. कारण पुत्र व्हावा अशी आराधना करीत होते. नवसही बहुत ईश्वरास केले. असा प्रयत्न करीत असतां शके १६९६, अधिक वैशाख शुद्ध ५, त्या दिवशीं बाईसाहेब प्रसूत झालीं. पुत्र झाला. मोठा समारंभ करिते झाले. बारा दिवस होतांच माधवराव असें नांव ठेवून हत्तीवर साखरा वांटल्या.

---

२१. एकांडया=सडा शिपाई ( याच्या पदरीं स्वार वगैरे कांहीं नसतें व हाही कोणाच्या पदरीं नसतो. )

# माधवराव नारायण ऊर्फ सवाई माधवराव

## इ० स० १७७४–१७९५.

[ सवाई माधवराव यांस ] सातान्याहून महाराज यांजकडून वस्त्रें अलंकार व शिक्केकटार, पेशवाईचा अधिकार येता झाला. असें होतांच माधवराव नारायण प्रधान, अशीं पत्रें सर्व मुलुखांत व महालोमहालीं व किल्लोकिल्लीं व सरसुभे होते तितक्यांसही पत्रें पाठविलीं. त्यांजला मजकूर कीं, "आतां रघुनाथ बाजीराव अशीं पत्रें येतील तीं कोणीं मानूं नये. रघुनाथ बाजीराव बंड आहेत. त्यांजकडे कोणी गेलें असतां व कोणी सामील जाहला आसतां, त्याचा बंदोबस्त सरकारांतून केला जाईल." बुंदेलखंड व झांशी व गुजराथ व काठेवाड व हिंदुस्थान येथें विसाजी कृष्ण बिनीवाले होते त्यांस व शिंदे, होळकर व भोसले व गायकवाड व कर्नाटक प्रांतीं सर्वांस अशींच पत्रें गेलीं. परराज्यांतील टिपू सुलतान, नबाब निजामअलीखां यांस पत्रें पाठविलीं कीं, "रघुनाथ बाजीराव बंड आहेत. यांस कोणीं आपण सामील होऊं नये." आणखी हिंदुस्थानांत राजे रजवाडे, संस्थानी, पाळेगार, वगैरे सर्वांस पत्रें सरकारचीं गेलीं. असा चोहींकडील बंदोबस्त करून, सर्व आपणांकडे रुजू घेतला*. पुणें शहराचा बंदोबस्त आपला केला. दादासाहेब यांजकडील कारभारी लोक पुण्यांत होते, त्यांचा सर्वांचा बंदोबस्त करून कैद केले. शहरांत द्वाही माधवराव नारायण म्हणून फिरली.

असा बंदोबस्त चोहींकडे करून, पुढें रघुनाथराव दादा यांजवर फौज रवाना करून त्यांचा बंदोबस्त करावा, अशी मसलत कारभारी यांची ठरली. तेव्हां पुढें पाठवावा कोण? त्याची तजवीज कशी? असा विचार करीत असतां, अवघ्यांच्या मतें ठरलें कीं हरिपंत फडके यांस सरकारांतून बक्षीगिरीचीं वस्त्रें देऊन, जरीपटका हवालीं करून, समागमें फौज हुजरात सरंजामी देऊन

---

१. माधवरावास वस्त्रें प्राप्त झालीं त्यावेळीं तो ४० दिवसांचा होता. * रुजू घेतला= आपल्या कबजांत घेतला. २. बक्षीगिरीचीं=सेनाधिपत्याचीं.

पाठवावें व सरदार यांस सरकारची ताकीद जहाली कीं, " सर्वांनीं हरिपंत यांचे आज्ञेंत चालावें, हरिपंत सांगतील तसें वर्तावें." याप्रमाणें राजश्री सखारामपंत बापू व नाना फडणीस व मोरोबा दादा फडणीस, आनंदराव रास्ते, विंचुरकर व परशुराम भाऊ पटवर्धन व मानकरी घोरपडे, निंबाळकर, जाधव, भोइटे, दरेकर, पाटणकर, थोरात, पागे, निकम, निमकपायघुडे, व निळकंठराव रामचंद्र वगैरे सर्वांनीं रुकार दिला कीं, " योग्य आहे. " असें ठरून, " हरिपंत तात्या जसें सांगतील तसें वर्तू. त्यांच्या आज्ञेप्रमाणें चालूं " असा सर्वांचा नेम झाला.

मग हरिपंत फडके यांजकडे फौजेचें काम सांगितलें. तेव्हां हरिपंत फडके यांचे हाताखालीं दुसरा कोणी नेमला पाहिजे, तेव्हां सर्वांच्या मतें बापू यांणीं सांगितलें कीं सदाशिवपंत करमरकर यांजला नेमावें." असें बापूंनीं सांगितलें असतां नाना फडणीस यांचे मनास ती गोष्ट आली. मग सदाशिव अनंत करमरकर यांस समक्ष बोलावून सरकारची आज्ञा झाली कीं, " तुम्हीं हरिपंत यांचे समागमें जावें. हरिपंत जसें सांगतील तसें वर्तावें. "

अशी सर्व तयारी होऊन, हरिपंत यांची रवानगी झाली. तेव्हां हरिपंत यांचे बरोबर चाळीस हजार फौज निघाली. [ शिवाय ] सरंजामी यांची फौज, असे जमावसुद्धां, जिकडे दादासाहेब गेले होते, त्या रोंखानें कूचदरकूच चालते झाले. ते खानदेशांतून बऱ्हाणपूर, अशेरी, यांच्या मैदानांत त्यांचे फौजेचा व यांचे फौजेचा मुक्काम जाहाला. त्या समयीं त्र्यंबकराव मामा पेंठे दादासाहेब यांजकडे होते, परंतु मामा यांचें लक्ष सारें इकडे होतें हें दादासाहेब यांस माहीत होतें. सरकारचे फौजेचें व दादासाहेब यांचे फौजेचें लढाईचें तोंड लागलें. लढाई मोठी होऊं लागली. त्या समयीं दादासाहेब यांचे फौजेंत आपसामध्यें फितूर होऊन, कोणी शिपायानें गोळी मामांस मारिली. तिनें मामा लढाईंत पडले. ही बातमी हरिपंत तात्याकडील फौजेस लागतांच

३. ग्रांट डफ म्हणतो दादा कर्नाटकांतून येत होते त्यांजवर त्रिंबकराव मामा, साबाजी भोंसले व हरिपंत असे चालले होते. निजामही तयारी करून जिकडून फायदा त्या बाजूस मिळूं म्हणून सिद्ध होता. पुढें मामांची व दादांची लढाई पंढरपूर व कासेगांव यांच्यामध्यें झाली त्यांत त्रिंबकरावास मोठ्या जखमा होऊन त्यास कैद केलें. असा दादांचा जय झाला. पुढें ते बऱ्हाणपुराकडे शिंदे, होळकर यांचें साहाय्य

लढाईचा मोठा लगट केला. तेव्हां दादासाहेब यांजकडील फौज कच खाऊन माघारी फिरली. हें सरकारचे फौजेनें पाहून लढाईची दाटी केली. तेव्हां दादासाहेब यांची फौज लढाईचा धर सोडून पळूं लागली. दादासाहेब सुद्धां पळूं लागले. सरकारची फौज पाठीमागें लागली. तेव्हां दादासाहेब यांणीं फौजेसुद्धां नेमाडांतून वऱ्हाडचा रस्ता धरिला. पुढें ते चालतात, पाठीमागें ही फौज लागली आहे, असे वऱ्हाडांतून पार झाले ते मोंगलाईंत उतरले. त्या समयीं दादासाहेब यांणीं आपले फौजेचा बंदोबस्त करून, एक जागीं जमाव करून राहिले. त्या समयीं सरकारची फौज तेथें मुक्काम करून राहिली. असें जाहलें असतां पुनः दुसरी लढाई झाली. त्या समयीं सरकारची फौज त्या लढाईत थोडीशी कचली. तें पाहून दादासाहेब यांचें फौजेनें मात्त्याभें जोर करून लढाई केली. तें सरकारचे फौजेस वैषम्य वाटून आणखी लढाई झाली. त्या लढाईंत दादासाहेब यांच्या फौजेनें पळ काढिला. ते बेदर पावेतों पळाले. तेथपावेतों सरकारचे फौजेनें पाठलाग केला. तेथून बेदरापासून दादासाहेब माघारे उलटले ते मागती वऱ्हाडचा रस्ता आटोपिला.

त्या समयीं हरिपंत तात्या फडके यांणीं विचार केला कीं, दादासाहेब आपले इतक्या फौजेस आटपत नाहींत. असें समजून, हैदराबादेस नबाब निजामअलीखां यांशीं राजकारण केलें कीं, "आमचे घराचा फितूर होऊन श्रीमंत रघुनाथराव दादा यांणीं बंड केलें आहे. त्यांचे बंदोबस्तास आपण आम्हांस सामील व्हावें. आणि फौजेसुद्धां आपण खासा आम्हांस कुमक यावें."

---

मिळविण्यासाठीं गेले. येथें बखरींतला मजकूर थोडा निराळा आहे. त्रिंबकराव पेंटे हे सदाशिव चिमणाजी यांचे मामा हें पूर्वी सांगितलेंच आहे. वरील लढाईंत कैद केल्यावर आनंदीबाई ही त्यांस नेहमीं फटके मारवी व "आतां कसें! मेले चालले मसलती करून राज्यांत बखेडे घालायाला!!" असें त्यांस टोंचून बोले. त्या वेळचें या निधडच्या शूराचें उत्तर लक्षांत ठेवण्याजोगें आहे. तो तिला खडखडीन जाबसाल करी कीं, "दुष्टे, मी एक मेलों तरी हरकत नाहीं. तुझे दुसरे × × × पुण्यास पुष्कळ बसले आहेत ते तुझ्या हातीं कधीं राज्य लागूं देणार नाहींत. ४. दादासाहेब मामांचा पराभव करून पुढें उत्तरेकडे गेले ते नर्मदा उतरून, शिंदे होळकर यांची फौज बरोबर घेऊन, तापी नदीच्या कांठीं येऊन उतरले. तेथून शिंदे व होळकर हे कारभारी मंडळीस मिळाले असें कळल्यावर गुजराथेंत गेले. दादा गुजराथेंत गेल्यावर इंग्रजांशीं बोलणें लाविलें. कोंकणांत आधीं उतरल्याचें ग्रांट डफ लिहीत नाहीं. पुढें टीप ७ पाहा

असें ठरवून, वकील नबाबांकडे पाठविले. वकील तेथें जाऊन, वकिलांनीं नबाबांची भेट घेऊन सर्व मजकूर निजामअल्लीखां नबाब यांस विदित केला. तो मजकूर ऐकून घेऊन, बंदगानअल्ली यांणीं उत्तर केलें कीं, " तुमारे घरका कज्जा. इस कजियेमे हमारी आनेकी जरूर नही. तुमारे तरफ हम् आये तो उनके दावेदार ठरे. " अशा प्रकारचीं बोलणीं नबाब यांचीं झालीं तीं वकिलांनीं हरिपंत तात्या फडके यांजकडे सारे मजकुराचीं लिहून पाठविलीं. तीं पत्रें तात्यांनीं पाहून तो मजकूर पुरंदर मुक्कामीं कारभारी यांजकडे लिहून पाठविला. त्यांचीं उत्तरें तात्यांस गेलीं कीं, " तुम्ही खांसा नबाबाकडे जाऊन, बोलणें करून ते मदत घेत असा विचार करावा. " हीं उत्तरें तात्यांकडे येऊन पोंचत तों पुढें बरसातीचे दिवस आले. त्याजमुळें फौजेच्या छावण्या झाल्या. श्रीमंत दादासाहेब यांचे लष्करची छावणी झाली. तेव्हां दोन महिने मुक्काम झाला. त्या अवसरांत तात्या यांणीं हैदराबादेस जाऊन, नबाब निजामअल्लीखां यांची भेट घेऊन सारीं बोलणीं उभयतांचीं झालीं परस्परें एकमेकांचीं वचनें शपथा झाल्या. त्या समयीं नबाब यांस तात्या यांणीं लाख रुपये कुचाचे व लाख रुपये मुक्कामाचे असे ठरवून, तात्या आपले लष्करांत येऊन दाखल झाले.

बरसात कमी झाली तेव्हां नबाब यांची तयारी होऊन, खांसा स्वारी फौजेसुद्धां बाहेर निघाले, ते हरिपंत फडके यांचा मुक्काम जेथें होता तेथें येऊन उतरले. ती बातमी दादासाहेब यांस कळतांच ते आपले लष्करची तयारी करून, बंदोबस्तानें राहिले. तात्या यांच्या फौजेचा कूच झाला. समागमें नबाबही निघाले. ती बातमी दादासाहेब यांस समजतांच त्यांनीं लष्करचा बंदोबस्त करून, लढाईचा बेत केला. तेव्हां या दोन्ही फौजा त्यांचे नजीक येऊन दाखल झाल्या. दोन्ही फौजांचा व दादासाहेब यांचे फौजेचा मुक्काम झाला. थोडेंसें लढाईचें तोंड लागलें. त्या वेळेस मोंगलाई फौजेचा जोर पाहून दादासाहेब यांचे फौजेनें पळ काढिला. ते पळों लागले असें पाहून या दोन्ही फौजा पाठीमागें लागल्या. ते मागती वऱ्हाडांतून नेमाडांत आले. महेश्वरचे रोखें चालले. नर्मदा उतरून दादासाहेब यांची फौज गेली. त्यांचे

५. कारभारी मंडळीनें निजामअल्लीस दोनदां तह करुन त्यास आपणांकडे वळविलें एकदां १३ लक्ष रुपयांचा मुलूख निजामास देऊं केला व दुसरे वेळीं १८ लक्षांचा देऊं असें ठरविलें.

मागें याही फौजा मागोमाग नर्मदेच्या कांठीं येऊन उतरल्या. तेव्हां दादासाहेब यांचा मुक्काम पलीकडे झाला. त्या समयीं नबाबाचें बोलणें हरिपंत यांजपाशीं पडलें कीं, "आतां तुमच्या समागमें आम्ही येत नाहीं." हें ऐकून तात्यांनीं विचारिलें कीं, "तुम्हीं कां येत नाहीं?" ते वेळेस नबाब म्हणतात कीं, "हम् तुमारे सात नै आते. दादासाहेब लढवाई असता तर कां पळता? आम्हीं त्याचे मागें लागत नाहीं." हें ऐकून तात्यांनीं नबाबास उत्तर केलें कीं, "तुम्ही आमच्या समागमें येत नाहीं तर चिंता नाहीं. आमचा घरचा कलह आहे. याची आम्हीं कांहीं चिंता करीत नाहीं. तुम्हीं मात्र आपले ठिकाणीं मजबूत राहावें. आम्ही व दादासाहेब एकत्र होऊं. ते आमचे खावंद आहेत. आम्हांवर कांहीं परचक्र आलें असें नाहीं. ते आम्ही एक होऊन, तुम्हांवर येऊन याचा सूड घेऊं." असें तात्यांचें बोलणें ऐकून, हरिपंत फडके यांस नबाब निजामअल्लीखां यांनीं विचार करून उत्तर केलें, "तुम् जे कहता ये बात दुरुस्त है. हम् तुमारे सात आते." मग त्या समयीं हरिपंत तात्यांस नबाबांनीं 'वैजारतामहा' असा किताब दिला. नंतर नबाब व तात्या फौजेसुद्धां नर्मदा उतरून पार झाले. दादा फौजेसुद्धां पुढें पळतात. पाठीमागें दोन्ही फौजा लागल्या आहेत असे नेमाडांतून नबाब घाट चढून माळव्यांत गेले. ते पुढें पळतात, या फौजा पाठीमागें लागल्या आहेत, असे उज्जनीपावेतों पळाले. तेथून कोट्यापावेतों गेले. तेथून पुनः माघारे उलटले ते मागती मंढलेश्वराहून ओंकार मांधाता यांचें दर्शन घेऊन, मागती महेश्वराच्या रस्त्यानें फिरले. असा मुलूख फिरतां तीन महिने लोटले. पुढें महेश्वरावरून धारेस गेले तेथें मुक्काम झाला. त्या मुक्कामीं श्रीमंतांस पुत्र झाला. ते वेळेस अपशकूनही फार झाले. त्यांची शांती करून, नांव बाजीराव असें ठेविलें. ती बातमी पुरंदरास आली. मागती कूच करून, दादासाहेब नर्मदा उतरून आलीकडे आले. पुरंदराहून तात्यांस पत्रें आलीं कीं, "कोणीकडून दादासाहेब यांस हस्तगत करून द्यावें." हें वर्तमान दादासाहेब यांस कळल्यावर नर्मदेच्या आलीकडे आले. त्यांचे मागून तात्या व नबाब आलीकडे येऊन उतरले. हें दादासाहेब यांणीं पाहून, तेथून कूच करून आशेरी बऱ्हाणपुरावरून खानदेशांत येऊन,

६. वजारतामहा—वजरत-मआब्—वजीरी करण्यास योग्य.

घाट चढून वरतीं आले, मागती गंगा उतरून जुन्नरावरून कोंकणचा मार्ग धरिला. ते माहुलीवरून कल्याणास आले.

दादासाहेब घाट उतरले त्या वेळेस, निजामअलीखां बहादर हरिपंतास बोलले कीं, "आतां आम्ही माघारे जातों. आतां तुमच्या मुलखांत रघुनाथराव आले यांचा बंदोबस्त तुम्हीं राखावा." असें बोलून नबाब माघारे फिरले. ते फौजेसुद्धां भागानगरास दाखल झाले.

इकडे दादासाहेब कल्याणास येऊन इंग्रजांशीं राजकारण करून, आपण फौजेसुद्धां मुंबईस दाखल झाले. मग तेथून सरकारच्या फौजा माघाऱ्या फिरल्या. त्या पुरंदर मुक्कामीं जाऊन दाखल झाल्या. इकडे दादासाहेब मुंबईस गेल्यानंतर त्यांनीं इंग्रज लोकांचें आपल्यास साह्य मिळविलें. इतक्या मसलतीस तीन वर्षे लागलीं. त्या वेळेस श्रीमंत महाराज रावसाहेब तीन वर्षांचे झाले. दादासाहेब मुंबईस गेल्यावर इंग्रजांशीं बोलणें लाविलें कीं, "आम्हांस तुम्हीं राज्य साधून दिलें असतां आम्ही आपले राज्यांत दोन आणे तुम्हांस देऊं." अशीं बोलणीं करून कागदपत्र झाले.

---

७. मागें पृष्ठ १०२ टीप ४ पाहा. ८. हें राजकारण सुरतेस केलें. बखरींत हरिपंताच्या कर्नल कीटिंग याशीं गुजराथेंत झटापटी झाल्या त्यांचें वर्णन नाहीं.

९. हा तह ता० ६ मार्च १७७५ रोजीं ठरला. या तहांत दादांनीं साष्टी व मुंबईजवळचीं दुसरीं बेटें, वसई व गुजराथेंतील कांहीं प्रांत मिळून १९ लक्षांचा मुलूख इंग्रजांस देऊं केला. खेरीज फौजेच्या पगाराकरितां कांहीं रोख पैसाही कबूल केला. असा इंग्रजांचा मराठ्यांशीं पहिला बिघाड झाला. (१७७५–१७८२.) खालीं लिहिलेल्या गोष्टी बखरींतील वर्णनाशीं ताडून पाहाव्या. (क) गुजराथेंत कीटिंग साहेबांची व हरिपंत फडक्यांची 'आरास' येथें लढाई झाली. तींत दोघांचाही पुष्कळ नाश झाला. ही मराठ्यांची व इंग्रजांची पहिली मुलाकत. ता० १८ मे, इ० सन १७७५. (ख) ही लढाई झाल्यावर गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज यांणीं मुंबईच्या गव्हरनरानें राघोबाशीं तह केला तो अगदीं अन्यायाचा व राज्यरीतीस विरुद्ध असें ठरवून स्वतः कर्नल अपटन् यांस पुरंदर मुक्कामीं कारभाऱ्यांकडे पाठविलें. त्याणें बापू व नाना यांशीं पुरंदरचा तह केला. (ता० १ मार्च, सन १७७६) यांत राघोबास इंग्रजांनीं आश्रय देऊं नये व त्यांणीं साष्टी गव्हरनर जनरलची मर्जी असल्यास ठेवावी, असें ठरलें. (ग) तथापी इंग्रजांनीं राघोबास आश्रय दिला व नाना फडणीस फ्रेंच लोकांस आश्रय देऊं लागला वगैरे कारणांनीं पुनः बिघाड इ० सन १७७८ मध्यें झाला. (घ) बंगाल्याहून गाडर्ड साहेबाची रवानगी झाली. इतक्यांत, मुंबईवाले इंग्रज

त्या समयीं इंग्रजाचीं पलटणें गाडरसाहेब[10] घेऊन आले. दादासाहेब समागमें असे बोरघाट चढून खंडाळ्यास आले. ही बातमी पुरंदरास पोंचतांच फौज रवाना झाली. ती येऊन इंग्रजांशीं लढाई होऊन, इंग्रजांचा मोड झाला. तेव्हां गाडरसाहेब दादासाहेब सुद्धां मागती पळून मुंबईस गेले. तेव्हां फिरून दादासाहेब यांणीं इंग्रजांशीं बोलणें करून, फिरून पहिले दोन आणे कबूल केले ते व आणखी दोन आणे कबूल करून, एकूण चार आणे आम्ही आपले राज्यांत तुम्हांस देत जाऊं,[11] अशीं करारपत्रें होऊन ईष्टुर[12] फांकडा इंग्रज पलटणें घेऊन, मोठा कट्टा सरंजाम घेऊन, समागमें दादासाहेब, असे बोरघाटाखालीं येऊन घाट चढूं लागले. ती बातमी पुरंदरीं कारभारी यांस कळतांच सरकारच्या फौजा इंग्रजांचे तोंडावर रवाना झाल्या. पूर्वी दादासाहेब हिंदुस्थानप्रांतीं पळत होते त्या समयीं महादजी शिंदे हिंदुस्थानांत होते. त्यांस बलावण्याचीं पत्रें सरकारचीं अगोदरच गेलीं होतीं. त्याजवरून शिंदे

---

लोक राघोबास घेऊन आपटें व पनवेल येथें उतरून बोरघाटानें वरतीं आले. यांत मुख्य कर्नल इगरटन होता. क्याप्टन् स्टुअर्ट (बखरींतील 'इष्टुर फांकडा') हा पुढें आला होता. तो लढाईत कारलें येथें पडला. पुढें तळेगांवापर्यंत इंग्रज आले. तेथून पुढें जाण्याचा उपाय न चाले म्हणून माघारीं जाण्याचा बेत करून निघाले. परत जातांना मराठ्यांनीं त्यांस फार मार दिला. इंग्रजांनींही मराठ्यांचा पुष्कळ नाश केला. शेवटीं वडगांवास तह करून, दोन कामदार ओलीस देऊन इंग्रज परत गेले. (च) इकडे गाडर्ड साहेब गुजराथेंत दाखल झाल्यावर वडगांवचा तह नाकबूल करून इंग्रजांनीं पुन्हा लढण्याची तयारी केली. शिंदे व होळकर यांस गाडर्ड साहेबानें गुजराथेंतून हांकून लाविलें व वसई घेतली. कोंकणांत हार्टले साहेबानें कल्याण घेतलें. असा पराक्रम इंग्रजांनीं केला. (छ) पुढें गाडर्ड साहेब बोरघाटांत येऊन छावणी करून राहिला. तेथें हरिपंत तोंडावर व कोंकणांत पाठीमागें होळकर व परशुराम भाऊ असे उभे राहून त्यांनीं इंग्रजांच्या निरनिराळ्या टोळ्यांस जेर केलें. तेव्हां गाडर्ड साहेब बोरघाटांतून निघून खालापुरावरून पनवेलीस आला. इतकी हकिकत इ० सन १७८१ साल अखेरपर्यंत झाली. मग शिंद्यांच्या मार्फत 'सालबाईचा' तह झाला. तो असा. राघोबादादांस २५,००० रुपये दरमहा देऊन त्यांनीं कोपरगांवास राहावें; साष्टीशिवाय सर्व मुलूख इंग्रजांनीं परत द्यावा; भडोच शिंद्यांस द्यावी वगैरे. इ० सन १७८२. १०. गाडर=गाडर्ड. ११. दुसऱ्या वेळीं दादांस माधवरावाचा कारभारी मात्र करण्याचें इंग्रजांनीं कबूल केलें होतें. १२. इष्टुर फांकडा=क्याप्टन् स्टुअर्ट हा मोठा शूर होता. यावरूनच 'फांकडा' हें उपपद मराठ्यांनीं त्यास दिलें. तो कारल्यास पडला. मागें टीप ९ (घ) पाहा.

दरकूच निघाले ते पुरंदर मुक्कामीं येऊन दाखल झाले. सर्वांच्या भेटी झाल्या.

इकडे इंग्रज घाट चढून वरतीं येतांच सरकारच्या फौजा पुढें येऊन, दाभाडे यांचे तळेगांवावर सरकारचे फौजेचा मुक्काम झाला. खालून इंग्रज सरंजामासुद्धां आला. त्याणेंही मुक्काम तळेगांवावर केला. पुढें फौज सरकारची तोंडावर उतरली आहे हें पाहून इंग्रजही तेथें उतरला. लढाई मोठी झाली. तेव्हां इग्रज आटोपत नाहीं हें पाहून शिंदे पुरंदरास आले होते त्यांचीही रवानगी इंग्रजांवर केली. शिंदे तेथें आल्यानंतर तिसरी लढाई झाली. इंग्रजांचा जोर मोठा, हें पाहून सारे दिलगीर झाले. इंग्रजांची लढाई, आगीचा मार मोठा, यापुढें कोणाचा टिकाव निघत नाहीं. हें पाहून सरकारचा तोफखाना बरोबर पानशे देऊन रवाना केला. तोही येऊन तेथें दाखल झाला. चार लढाया मोठ्या मातबर झाल्या. तितक्या लढायांत इंग्रजांची सरशी हें पाहून तशा वर्तमानाचीं पत्रें पुरंदरास आलीं. त्यासमयीं सरकारची आज्ञा पुण्यांत कारभारी होते त्यांस अशी झाली कीं, “ इंग्रेजांचे लढाईची सरशी आहे. याजकरितां शहरावर इंग्रज चालून आला असतां, शहरांत व सरकारवाड्यांत कडबा भरून आग लावून द्यावी. ” अशी आज्ञा झाली.

इकडे सरकारचा तोफखाना येऊन मिळाल्यावर पाटीलबोवा व हरिपंत तात्या यांचा विचार ठरला कीं, “ उद्यांची लढाई मोठ्या शर्तीची करावी. ” असें ठरून लढाईचा बंदोबस्त ठेऊन, पुढें आघाडीस तोफखाना पसरून, त्याचे पाठीमागें पायदळ उभें करून, त्याच्या मागें स्वार उभे राहिले. सरकारचे तोफखान्याकडील गोलंदाज व तोफखान्याचे सरदार पानसे, यांस महादजी शिंदे व हरिपंत तात्या यांणीं समक्ष सर्वांस बलावून सांगितलें कीं, “ आजची लढाई मोठे शर्तीची करून इंग्रजांचा मोड होईल तें केलें पाहिजे ” गोलंदाज यांस तात्यांनीं आज्ञा केली कीं, “ लढाईची मोठी मर्दुमी करून, खांसा लढाईत पाडाव झाला पाहिजे, अशा बेतानें तोफा लागू कराव्या. ” अशी आज्ञा तात्यांची होऊन आणखी तात्या गोलंदाजांस सांगतात, “ आज बक्षीस मिळावयाची वेळ आहे. कामगारी बजावून बक्षीस घ्यावें. ” असा लढाईचा बंदोबस्त करून लढाईस उभे राहिले.

तिकडे इंग्रजही लढाईचा बंदोबस्त करून, त्याणें आपला पोक सरंजाम करून घेऊन लढाईस उभा राहिला. त्या समयीं पेशवे यांचे फौजेवर रा

पाठीमागें चालला. इंग्रज यांचे तोंडावर वारा चालला. ईश्वरी कृपा मोठी, प्रभूचें दैव मोठें उत्कृष्ट ! पुण्याई मोठी सबळ ! ! लढाई मोठे शर्तीची झाली. सरकारची फौज लाख सव्वा लाख होती. तोफांशीं तोफा चालूं लागल्या. पायदळाच्या बंदुकींचा मार, त्याणें गर्दी धुराची मोठी झाली. कोणी कोणास दिसेनासें झालें. त्यावेळेस ईश्वराची करणी—सरकारचे फौजेच्या पाठीशीं वारा, इंग्रजांचे तोंडावर वारा, त्या वाऱ्याचे गर्दीत लढाईची गर्दी. असा मोठा लढाईचा आकांत वर्तला. त्या समयीं इष्टुर फांकडा इंग्रज घाबरला. तेव्हां त्याला असें वाटलें कीं, पेशवे यांची फौज किती आली आहे याचा नेम कळत नाहीं. इतक्या संधींत खांसा गोरा झाडावर चढून दुर्बीण लावून फौजेचें अवलोकन करून पाहतो तों इतक्या संधींत गोलंदाजास तात्यांची आज्ञा झाली कीं, "समय हाच आहे. आतां शिस्तबी[१३] करून, निशाण लावून, तोफ डागावी[१४]." इतकी आज्ञा होतांच गोलंदाजानें निशाण धरून, गोरा झाडावर आहे हें पाहून, तोफ लागू करून, शिस्त लावून, तोफेस गोळा घालून बत्ती दिली. श्रीमंतांचा प्रताप मोठा ! इंग्रजास गोळा लागून, खांसा ठार पडला. हें पाहून सरकारच्या फौजेनें लढाईचा मोठा लगट केला. खांसा पडतांच पलटणांची मोठी दाणादाण झाली. इकडून लढाईची मोठी सरशी झाली. तेव्हां इंग्रजांचे फौजेनें पळ काढिला, सरकारची फौज पाठीमागें लागली. असा मोठा जय संपादन केला. इंग्रजांची फौज घाट उतरून पनवेलीस गेली.*

पूर्वीं डांक पुरंदरास गेली ती दिलगिरीची हें पाहून सारे कारभारी जेथें श्रीमंत रावसाहेब निजले होते, त्यांच्याभोंवतीं जाऊन, सखाराम बापू, नानाफडणवीस, अशी प्रमुख मंडळी दिलगीर बसली होती. श्रीमंत जागे होऊन पाहातात तों सारी मंडळी दिलगीर बसली आहे. त्यांस पाहून श्रीमंत विचारितात, "तुम्ही अवघे कां असे बसलां ?" त्या वेळेस बापू म्हणतात, 'महाराज इंग्रज मोडत नाहीं, म्हणून असे दिलगीर बसलों आहों." असें श्रीमंतांनीं ऐकून श्रीमंत म्हणतात, 'इंग्रज मोडत नाहीं कीं काय ?' असें बोलून आणखी म्हणतात कीं, "तयारी करावी." खिजमतगार जवळ होता, त्यास रावसाहेब बोलले कीं, "माझी तलवार आण." असें म्हणून पलंगावरून उठून उभे

---

१३. शिस्तबी करून=नेम धरून. १४. तोफ डागावी=तोफेस बत्ती द्यावी. * मागें टीप ९ (पृष्ठ १०५) पाहा.

राहिले. आणि तलवार घेऊन, फिरवून सांगितलें कीं, "इंग्रज ठार मारिला!" इतक्या अवकाशांत फत्ते झाल्याची डांक दुसरी त्या वेळेस येऊन पोंचली कीं, "इंग्रज फौजेसुद्धां घाट उतरून पळून गेले. खांसा इष्टुर फांकडा लढाईंत ठार झाला." अशीं पत्रें वाचलीं. तो मजकूर सर्वांस समजला. सरकारची फत्ते झाली. मोठा आनंद झाला. सैदोंने[१५] वाजों लागले. तोफा सोडण्याविषयीं सरकारची आज्ञा झाली.

इष्टुर फांकडा लढाईंत ठार झाला तेव्हां राहिली फौज होती ती घाट उतरून मुंबईस गेली. त्या वेळेस दादासाहेब माघारे गेले नाहींत. सरकारची फौज हुजरात, महादजी शिंदे वगैरे मानकरी होते, त्यांजमध्यें येऊन दादासाहेब मिळाले. ह्या समयीं घाटसरीचा[१६] बंदोबस्त करून, साऱ्या फौजा श्रीमंत दादासाहेब यांस घेऊन माघाऱ्या फिरल्या. त्या पुरंदारास येऊन दाखल झाल्या. सर्वांच्या भेटी झाल्या. त्या समयीं दादासाहेब यांस सर्व भेटले. मग दादासाहेब यांचा बंदोबस्त करून, समागमें फौज देऊन कोपरगांवास गंगातीरीं दादासाहेब यांची रवानगी केली. समागमें गोविंदपंत गडबोले देऊन, दहा पागा समागमें नेमून दिल्या. आणि गारदी बंदोबस्तास नेमून दिले. आणि सर्वांस ताकीद झाली कीं, "गोविंदपंत सांगतील त्याप्रमाणें अवध्यांनीं चालावें." अशी नेमणूक होऊन कोपरगांवास रवानगी केली. कोपरगांवास बेटांत नेऊन ठेविलें. मग खांसा श्रीमंत रावसाहेब यांस पुण्यास न्यावें असा सर्व कारभारी यांचा निश्चय झाला.

इकडे दादासाहेब मुंबईस गेले होते त्या समयीं शके १६९७।९८ यांत इंग्रजानें कोंकण सारें घेतलें होतें. त्या समयीं धुळप आरमाराचे सरदार यांणीं मोठी लढाईची सरशी करून, पांच सातशें गोरे धरिले[१७] होते. हिंदुस्थानांत

---

१५. सैदोन=एक प्रकारचे मोठे नगारे. १६. घाटसरी=घाटमाथ्याचा प्रदेश. १७. आनंदराव धुळपानें 'रेंजर' नांवाचें इंग्रजांचें तारूं रत्नागिरीचे सुमारास हल्ला करून घेतलें. सालबाईचा तह २४ एप्रिल १७८३ रोजीं पुरा झाला. त्यापूर्वीं (ता० ८ एप्रिल रोजीं) ही लढाई झाली. ह्याबद्दल इंग्रजांस खूप राग आला. व नाना फडणिसास आपली चूक कबूल करावी लागली. ही लढाई रत्नागिरी नजीक झाली असा अदमास आहे. ह्या लढाईचा पोवाडा 'विविधज्ञानविस्तार' या पुस्तकांत पहावा.

महादजी शिंदे यांणीं लढाई करून पांच सातशें गोरे धरिले. त्यामुळें इंग्रज जेरीस येऊन तह[१९] करून कोंकणपट्टी सारी त्यानें सोडिली. त्या वेळेस इंग्रजानें भडोच वगैरे मुलूख वीस लक्षांचा सरकारांत दिला. त्या समयीं इंग्रजाचें बोलणें पडलें कीं, " साष्टी एवढी आम्हांस द्यावी." तें सरकारचे मनास आलें. " वीस लक्षांचा मुलूख आपल्यास आला, आतां तो होऊन साष्टी मागतो. ती देण्यास चिंता नाहीं, " असें ठरवून, साष्टी व साहा लक्षांचा मुलूख साष्टी खालीं होता तो इंग्रजास दिला. याप्रमाणें तह झाला. भडोच वगैरे मुलूख नवा घेतला तो महादजी शिंदे यांणीं आपल्यास सरकारांतून मागून घेतला. साष्टी खेरीज सारें कोंकण सरकारांत राहिलें.[२०]

इकडे श्रीमंतांस पुण्यास न्यावयाचा बेत ठरला. त्या वेळेस श्रीमंतांस चार वर्षे होऊन पांचवें वर्ष लागावयाचा सुमार झाला होता. तेव्हां अशी मसलत करून, सर्व सरदार – शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन, विंचुरकर व मानकरी – घोरपडे, निंबाळकर, थोरात, मोहिते; व हुजुरात, असा जमाव, तोफखाना व पायदळ, असे सरंजामानिशीं, मुहूर्त पाहून पुण्यास येण्यासाठीं सरकारची स्वारी, सर्व कारभारी, मुत्सद्दी व सर्व कारखाने निघाले. दोन दिवसांनीं स्वारी पुण्यास दाखल झाली. त्या दिवशीं शहरांत मोठा समारंभ झाला. सारे शहराचे रस्ते झाडून कुंकुमाचे सडे घालून, गुढ्या तोरणें उभारून, रात्रौ चिराकदानें लावून, मंगळ वाद्यें वाजवून, वाड्यांत सुमुहूर्तानें स्वारी सरकारची दाखल झाली. सर्वांनीं नजर-नजराणे करून, मग झाडून सरदार सरकारचे आज्ञेवरून ज्यांची जेथें उतरावयाची जागा तेथें जाऊन फौजांसह उतरले. मानकरी, सरदार आपले जागीं जाऊन उतरले. सर्व * कारखाने ठिकाणचे ठिकाणीं दाखल झाले. महालोंमहालीं सरकारचीं पत्रें पुण्यास स्वारी आल्याचीं गेलीं. बाहेरचे परराज्यांतील वकील होते, त्यांणींही

---

१८. शिंद्याचे मुलखांत कर्नल पोफ्याम्, कर्नल मूर व कर्नल क्याम्याक् यांनीं खूप धूम उडविली. शिंद्यांनींही त्यांस जेर केलें. पुढें कर्नल मूर यानें तह करून यमुनेपलीकडे जाण्याचें कबूल केलें व शिंद्यांनीं उज्जनीस जाण्याचें कबूल करून देशांत शांतता असावी असें ठरविलें. १९. मराठ्यांशीं लढून विशेषकांहीं प्राप्त झालें नाहीं. तशांत हैदराशीं लढाई सुरू झाली म्हणून तह इंग्रजांनीं केला. २०. हें सर्व सालबाईच्या तहांत ठरलें. (१७८२–८३) * मागें पृष्ठ ८५ टीप पाहा.

आपले खावंदांस पत्रें रवाना केलीं कीं, श्रीमंत सर्व सरंजामसुद्धां पुण्यास दाखल झाले. अशीं पत्रें सर्व वकिलांचीं गेलीं.

इकडे कारभार चालू झाला. त्या वेळेस सखारामबापू व नाना फडणीस मुख्त्यार. हरीपंत हे फौजबक्ष. असा प्रकार होत असतां मध्यवर्ती[21] असा प्रकार झाला कीं सखारामबापू यांणीं फितूर केला. तीं पत्रें नानांनीं धरिलीं. त्या समयास महादजी शिंदे यांस नानांनीं आपल्यास अनुकूळ करून घेतलें. आणि " सखारामपंत यांस नेजरबंद करावें, " असा इत्यर्थ नाना, पाटीलबाव। व तात्या यांचा ठरला. या फितुरांत मोरोबादादा फडणीस व बाळदीक्षित कर्वे अशी मंडळी होती. तितक्यांस कैद करावें असा मंडळीचा नेम होऊन शिंदे यांचे हातें सारी मंडळी कैद करविली. ज्या वेळेस सखारामपंत बापू यांस शिंद्यांनीं कैद केलें त्या समयीं बापूंचीं बोलणीं बहूत झालीं. तेव्हां फितुराचीं पत्रें स्वदस्तूर बापूचीं बापूंस दाखविलीं. त्या वेळेस बापू म्हणतात, " असे फितूर माझे ह्मिशांत बहूत आहेत. कोणीकडून सरकारचा कारभार निर्विघ्न चालावा. " अशीं बहूत प्रकारचीं बोलणीं झालीं. परंतु अवघ्यांचें एक मत झालें होतें. त्यामुळें कांहीं उपाय चालला नाहीं. सखारामपंत यांस कैद करून किल्ले सिंहगड येथें रवाना[22] केलें. मोरोबादादा यांस नगरचे किल्ल्यांत रवाना केलें. बाळदीक्षित कर्वे यांस रायगडास पाठविलें. कामदार वगैरे मंडळी होती त्या सर्वांस किल्लोकिल्लीं रवाना केलें. तेव्हांपासून नानांची आज्ञा सर्व राज्यांत सुरू झाली. नानांचे आज्ञेशिवाय कांहीं होऊं नये.

बाळाजीपंत[24] दामले, गारद्यांचे रिसालदार होते. त्या रिसाल्यांतील गारद्यांनीं वाडा बळकावून श्रीमंत नारायणराव साहेब यांस मारिलें याजकरितां दामले मजकूर यांस सरकारची आज्ञा झाली कीं " तुम्हीं पुण्यांत राहूं नये. निघून काशीस जावें. अतःपर सरकारची मर्जी कोणावेळेस काय होईल याचा नेम नाहीं. यासाठीं आतां निघून जावें. " अशी आज्ञा होतांच बाळाजीपंत निघून काशीस गेले. महंमद इसब, खरगसिंग, सुमेरसिंग, व

---

२१. मध्यवर्ती=मध्यें. २२. सखाराम बापूंस सालबाईचा तह होण्याच्या पूर्वीच कैद केलें होतें. २३. बापूंस सिंहगडाहून प्रतापगडावर ठेविलें. तेथून रायगडास नेलें. तेथें ते मृत्यू पावले. ग्रांट डफ. २४. जोगेश्वरीच्या बोळांतील दामले यांचे हे पूर्वज असावे.

तुळाजी पोंवार हे पळोन परराज्यांत गेले होते, तेथून धरून आणून त्यांचीं पारिपत्यें यथास्थित करावयाच्या रितीनें केलीं. त्यांचें वर्णन काय करावें ? सर्वांचे बोटांस सुया टोंचून, कांकडे बांधून, पेटवून असे मारिले. शेवटीं कोणास हत्तीचे पायीं बांधिलें, कोणास तोफेचे तोंडीं दिलें, कोणाचीं डोकीं मारिलीं. जितके दादासाहेब यांचे फितुरांत नारायणराव साहेब यांस मारण्याविषयीं जे जे होते, तितक्यांचीं पारिपत्यें केलीं. जे जे मारावयास योग्य ते मारिले. ब्राह्मण होते त्यांस किल्ल्यांवर टाकिलें. त्यांचा काळ तेथें कैदेंत झाला. असे सारे निवडून, तितक्यांचा बंदोबस्त नाना यांणीं केला.

याप्रमाणें सारा बंदोबस्त झाला. राज्यकारभार नाना चालवूं लागले. शिंदे यांस हिंदुस्थानांत जाण्याविषयीं निरोपाचीं वस्त्रें दिलीं आणि आज्ञा झाली कीं, "हिंदुस्थानांत जाऊन तेथील बंदोबस्त चांगला राखावा." अशी आज्ञा सरकारची होतांच शिंदे दरकूच हिंदुस्थानांत गेले. होळकर यांस सरकारची आज्ञा तशीच झाली. त्यांसही निरोपाचीं वस्त्रें देऊन रवानगी हिंदुस्थानांत केली. तेही कूच करून हिंदुस्थानांत गेले. तसेंच गोविंदराव गायकवाड यांसही आज्ञा सदर्हू प्रमाणें होऊन त्यांस निरोपाचीं वस्त्रें देऊन गुजराथेंत रवाना केलें.

पुणें मुक्कामीं फौज हुजूर ठेविली तिचा चांगला बंदोबस्त केला. तीस हजार स्वार हुजरातेचा, खेरीज मानकरी, एकांडे व शिलेदार, खेरीज सरंजामी, मिळून पन्नास हजार स्वार नेहमीं पुणें मुक्कामीं राहिले. शिवाय आरब रोहिले, पठाण, शिद्दी, दक्षणी लोक, मुसलमान, रजपूत, रांगडे व परदेशी असे पन्नास हजार पायदळ, पुणें मुक्कामीं ठेविलें. शहरांत जागोजाग चौक्या नाकेबंदीच्या ठेविल्या, त्या हशमी[२५] लोकांच्या. शहराच्या गिर्दीला[२६] रामोशी लोक यांचे पहारे चौक्या पाठविल्या. सरकार वाड्याभोंवतीं तटबंदीच्या बाहेर गिर्दीला झाडून सभोंवतीं छपरबंदी करून हशमी लोक ठेविले. वाड्यांत सदरबारगीर हजार बारार्शे ठेविले. त्यांणीं रात्रंदिवस दोनशें असामींनीं कंबरबस्ता करून, तोडे शिलकावून पहाऱ्या पहाऱ्यानें नेहमीं उभें असावें. दिल्ली दरवाजा व गणेश दरवाजा येथें दोन दोनशें स्वारांचा छबीनों[२७] तयार

२५. हशमी=पादचारी शिपाई लोक. २६. गिर्दी=घेरा. २७. छबीना=किल्ल्याभोंवतीं वगैरे स्वारांचा पाहरा.

घेऊन घोड्यावर स्वार कंबरबस्ता करून बसलेले, असे छाबिने उभे रात्रंदिवस असावे. त्यांच्या नेमणुका पागे यांच्या केल्या[28]. असा सारा बंदोबस्त झाला.

श्रीमंतांपाशीं नेहमीं चारअसामी ब्राह्मण मंडळीपैकीं, दाजिबा आपटे, मोरोपंत भावे व बाळाजीपंत केळकर यांणीं नेहमीं रात्रंदिवस श्रीमंतांपाशीं असावें. रात्रौ जेथें श्रीमंत निजतील तेथें पलंगाभोंवतीं यांणीं निजावें. याप्रमाणें जवळ शागिर्द, खिजमतगार, आचारी व खटपटे, अशी सारी मंडळी विश्वासू, वतनदार, असे पाहून ठेविले. इतक्यांवर चौकशी नित्य नानांची. याप्रमाणें बंदोबस्त केला. शिवाय खासगीवाले, वाकनीस व वाड्यांतील मंडळी झाडून यांस अवघ्यांस ताकीद कीं, " श्रीमंतांस जपत जावें. "

असा बंदोबस्त केला असतां पुढें सरकारचा व्रतबंध करण्याचा बेत ठरला तों इतक्यांत बंड[29] उत्पन्न झालें. पानपतास भाऊसाहेब लढाईचे गर्दींत नाहींसे झाले. त्या नांवाचा भाऊसाहेब असा तोतया झाला. तो कांहीं फौज ठेऊन, मुलखांत खंडणी घेऊं लागला. त्याला सरकारी लोक सामील झाले. त्यामुळें बंडाची बळकटी बहूत झाली. किल्ले घेऊं लागला. राजमाचीकर यांणीं पांच सात किल्ले बंडाचे हवालीं केले. असें बंड जमवून खालीं कोंकणांत उतरले. तळें, घोंसाळें वगैरे किल्ले घेतले. असे किल्ले घेत दक्षणेंत कोंकणांत रत्नागिरी-पावेतों बंड जमवून रत्नागिरी घेतली. रत्नागिरी घेण्यास कारण रामचंद्र नाईक परांजपे हे त्यास मिळाले. त्यामुळें रत्नागिरी किल्ला तोतयानें घेतला. चोहींकडे तोतयाचा अंमल चालूं लागला. त्याच्या बंदोबस्तास सरकारच्या फौजा व सरदार रवाना झाले. ते तोतयाचा बंदोबस्त जागोजाग करीत चालले. अशा कर्मास एक वर्ष लागलें. किल्ले घेतले होते ते सारे माघारे घेतले. असा बंदोबस्त करीत असतां तोतयानें फौजेशीं थोडीशी लढाई केली. परंतु तें बंडच ! पोटभरू लोक सभोंवतीं मिळाले त्यांच्यानें लढाई होते कीं काय !

---

२८. त्यांच्या नेमणुका पागे यांच्या केल्या = पागे यांच्या नेमणुकीस जो पगार, मान वगैरे हक्क तेच या नेमणुकांसही करून दिले. २९. हें बंड इ० सन १७७६ सालीं झालें. सदोबास इंग्रज लोकही अनुकूल झाले होते. पुढें रामजी पाटील व भिवराव पानशे यांनीं त्याचा पराभव केला. पुढें आंगरे यांणीं धरून आणिल्यावर त्यास हत्तीच्या पायीं दिलें. तो कनोजाब्राह्मण किंवा सोनार होता असें म्हणतात. ग्रांट डफ.

त्या वेळेस त्यांचा मोड होऊन पळूं लागले. त्या वेळीं सरकारची फौज पाठीमागें लागली. तोतया बहूत मुलूख फिरला. कोठें टिकाव न निघे. शेवटीं आंगरे यांचे मुलखांत धरून, पुण्यास आणून, सर्वांनीं ओळखिलें. नाना फडणीस व श्रीमंत पार्वतीबाईसाहेब यांणींही ओळखिलें. फडणीस वगैरे मंडळी होती त्यांणींही ओळखिलें. कोणाची ओळख भाऊसाहेब म्हणून पुरली नाहीं. असें झालें. नंतर तोतयास कैद करून पायांत बिडी ठोकून किल्ले सिंहगड येथें पोंचविलें. त्याच्या अगोदर सखारामबापू त्याच किल्ल्यावर[30] होते. तेथें तोतयास पोंचविलें. तोतयाचा अंत[31] किल्ल्यावर झाला.

त्या वेळेस जे जे मिळाले होते तितक्यांचीं पारिपत्यें केलीं. राजमाचीकर यांजकडे सात आठ किल्ले होते ते सरकारांत घेतले. रामचंद्र नाईक परांजपे यांजकडून रत्नागिरीचें काम दूर करून तेथील मामलत सदाशिव केशव दांते यांजकडे सांगितली. दांते यांजकडे तीन वर्षें काम रत्नागिरीचें होतें. तेथील बंदोबस्त सदाशिवभट दिवाणजी यांणीं चांगला केला. जे जे तोतयास मिळाले तितक्यांचीं पारिपत्यें रत्नागिरी तालुक्यांत चांगलीं केलीं. असा सारा बंदोबस्त झाला. पुढें तीन वर्षांनंतर साठे[32] यांची भीड सरकारांत मोठी पडली. सबब पुनः रत्नागिरीचें काम परांजपे यांस सांगितलें. तसेंच राजमाचीकर यांजकडे राजमाची ठेवली. पुढें मुलुखांत किल्ले वगैरे येथें सरकारचा अंमल बसवून अंमल सुरळीत चालूं लागला. याप्रमाणें तोतयाचा बंदोबस्त झाला.

इकडे श्रीमंतांची मुंज करावयाचा नेम ठरवून साहित्याची व सरंजामाची तयारी करूं लागले. शके १७०१ त श्रीमंतांचा व्रतबंध झाला. चार दिवस मोठा समारंभ झाला. श्रीमंतांचे घरचें कार्य, तेथील वर्णन काय करावें? पुढें लग्नाचा समारंभ मोठा व्हावयाचा म्हणून संकळिनें[33] सांगितलें. पुढें कारभार चालू झाला. व्रतबंध झाला त्यावेळेस श्रीमंतांचें वय साहा वर्षांचें झालें.

---

३०. " सखारामबापू त्याच किल्ल्यावर होते ते मृत्यु पावले त्याच किल्ल्यावर तोतयास पोंचविलें " असा इंदूर प्रतीचा पाठ आहे. ३१. अहमदनगरच्या किल्ल्यावर तो मृत्यु पावला, असेंही म्हणतात. ३२. साठे हे माधवरावाचे आजे असें वाटतें. ३३. संकळित = संकलित = थोडक्यांत.

शके १७०४ मध्यें श्रीमंतांचे लग्नाचा बेत ठरला. तेव्हां अगोदर सरंजामाची तयारी होऊं लागली. तमाम लोकांस बलावणीं करावयाचा बेत ठरला. हिंदुस्थान प्रांतींचे राजेरजवाडे वगैरे संस्थानी यांजकडे बलावण्यासाठीं वकील पाठविले. बुंदेले व कोटेवाले, जयपूरवाले व उदेपूर, डीग, कुंभेरी, भरतपूर [येथील] संस्थानी यांस बोलावणीं लग्नाचीं केलीं. नागपूरवाले भोसले यांसही लग्नाचें बलावणें गेलें. मारवाडांत जोधपूरवाले राजे यांसही बलावणें केलें. तसेंच गायकवाड यांसही बलावणें सरकारचें गेलें. तसेंच हिंदुस्थानांत सरकारच्या फौजा बाळगणारे शिंदे, होळकर, विसाजी कृष्ण[३४] बिनीवाले, यांसही लग्नास येण्याची आज्ञा सरकारची झाली कीं, " आपापले जागीं सर्व बंदोबस्त करून, जेथें ठाणीं अंमल बसलेले असतील तेथें बंदोबस्त चांगला राखून, तितक्या फौजा तेथें ठेवून खाशाखाशांनीं लग्नास यावें, " अशी आज्ञा होतांच त्याच बेतानें अवघा बंदोबस्त करून खासे लग्नास निघाले. समागमें हिंदुस्थान प्रांतींचे राजे रजवाडे, संस्थानी ज्यांस ज्यांस बोलावणीं होतीं तितक्यांस समागमें घेऊन निघाले. कोणी खासे आले व कोणी कारभारी आले. अशा समुदायानिशीं निघाले. तसेच गुजराथेंतून गायकवाड, आपला गुजराथेचा बंदोबस्त करून निघाले.

इकडे पुण्याहून हैद्राबादेस नबाब निजामअल्लीखां यांस लग्नाचें बलावणें करावयास पुण्याहून कारकून सरंजाम देऊन पाठविले. ते हैद्राबादेस वकील सरकारचे होते त्यांणीं नेऊन नबाबांस भेटविले. सर्व मजकूर नबाबांस विदित केला कीं, " आपण वडीलपणें घेऊन समारंभ केला पाहिजे. " त्यावेळेस नबाब खुषवक्तींत होते. म्हणोन संतोष पावले. नंतर नबाब बोलले " बहूत आच्छा है;" असें बोलणें झाल्यानंतर नबाब निजामअल्लीखां यांणीं आपले फर्जंदास[३५] हुकूम केला कीं, " राव पंडत प्रधान इन्की शादी होती है तुंमने साथ फौज लेके सरंजाम समेत पुणें शादीकू जाना." असा हुकूम नबाब पोलाजंग ह्यांस झाल्यानंतर सरंजाम फौजसुद्धां पोलाजंग डेरे दाखल झाले.

---

३४ विसाजी कृष्ण हे हिंदुस्थानांत नव्हते असें वाटतें. इ० सन १७७३ सालीं परत आले. त्यावर पुन्हा हिंदुस्थानांत गेल्याचें कोठें आढळत नाहीं. ३५. फर्जंद=पुत्र.

इकडे दक्षिण प्रांतीं संस्थानी होते त्यांस लग्नाचीं बलावणीं झालीं. कितूरवाले देसाई, सुरापुरकर बेरड, रामदुर्गवाले भावे, नरगुंदकर भावे, सावनुरवाले नबाब, टिपूसुलतान यांस कारकून बलावण्यासाठीं गेले. त्यांणीं जाऊन टिपूसुलतान यांस बलावणें केलें. तेव्हां टिपूनें जबाब केला कीं, "बहूत आच्छा है. हम् आते."

सातारकर महाराज लग्नासाठीं पुण्यास आणिले. कुरंद्वाडकर, मिरजकर, तासगांवकर, अशी पटवर्धन मंडळी लग्नास निघाली. कोंकणांतून राघोजी आंगरे कुलाब्याहून लग्नास आणिले. आनंदराव हरबाजीराव धुळप हेही लग्नास आले. मराठे सरदार राघोजी घोरपडे, निंबाळकर, अक्कलकोटवाले भोसले, शिंद्खेडकर जाधव, भोइटे, धायबर, असे सर्व सरंजामी, पोंवार सुपेकर, मलठणकर, अमदाबाद्कर, धारची पोंवार मंडळी, नगरदेवळेवाले सुद्धां लग्नास आले. जितक्यांना बलावणीं पोंचलीं, तितके सरंजामासुद्धां पुण्यास निघाले. असा समुदाय शहराभोंवतीं जमा झाला. तमाम फौजा आपापले मिसळीनें आपापल्या जाग्यावर उतरल्या.

अशींच तमाम मामलेदार यांस सरकारचीं पत्रें लग्नास येण्यासाठीं गेलीं होतीं ते मामलेदार पुण्यास येऊन पोहोंचले. गुजराथ, कर्नाटक, खानदेश, वऱ्हाड, माळवा, बागलाण, कोंकण व गंगथडी व कृष्णाथडी व नरीथडी, व सातारा प्रांतींचे व पंढरपूर प्रांतींचे व भाणदेशांतील व औरंगाबाद प्रांतींचे असे मामलेदार, आपले आपले सरंजमानिशीं पुण्यास दाखल झाले. तसेच सरसुभे खानदेश व बागलाण व कर्नाटक, गुजराथ व गंगथडी व कोंकण, असे सर्व सरसुभे पुण्यास येऊन पोहोंचले. सरदारही आले. ज्यांस पुढें इस्तमेल[३६] जाण्याची योग्यता, त्यांस श्रीमंत जाऊन घेऊन आले. ज्यांस कारभारी सामोरे जाऊन आणावयाचे त्यांस कारभारी यांणीं जाऊन आणिलें, अष्टप्रधान, पंत-प्रतिनिधी, पंत-सचिव, पंत-मंत्री, पंत-सुमंत, पंत-अमात्य, पंत-न्यायाधीश, पंत-राजाज्ञा, पंत-डबीर, असे सारे बलावण्याबरोबर पुण्यास आले. तितक्यांस श्रीमंत सामोरे जाऊन, बहुत मानानें पुण्यास येऊन आले. सातारकर महाराजही आले. नबाब पोलाजंग* यांस श्रीमंत पुढें जाऊन,

---

३६. इस्तमेल=इस्तमाली=चाल, चालीप्रमाणें. * 'पोलादजंग, असें असावें. पण मुळांत सर्व ठिकाणीं 'पोलाजंग, असेंच आहे.

इतमामानें घेऊन आले. त्यांजला मुक्कामावर उतरून त्यांचे खाण्यापिण्याचा व सर्व फौजेचे घोडे व हत्ती, उंट इतक्यांच्या दाण्या रतिबाचा, जेथपर्यंत राहतील तेथपर्यंत एकदांच बंदोबस्त योग्यतेनुरूप करून दिला. तसेच भोंसले व गायकवाड, होळकर व अष्टप्रधान, किरकोळ सरंजामी, पटवर्धन, विंचुरकर, रास्ते व घोरपडे व निंबाळकर, दरेकर व पोंवार, असे सर्व मानकरी व पागे, इतक्यांचे शिलेदार, एकांडे, पथकी असा सर्व समुदाय जमा झाला. सर्वांची नांवनिशी लिहितां मोठा विस्तार होईल.

याप्रमाणें तयारी होऊन, वधू निश्चय बाळाजी बहिरव थत्ते यांची कन्या नेमस्त झाली. लग्नाचा नेम माघमाशीं ठरला. कृष्णाजी नाईक थत्ते यांच्या येथें लग्नसमारंभ करावयाचा ठरला. शहरांत आमंत्रण सर्व शहरास झालें. सरकारी मंडळी, मामलेदार मंडळी, एरवीं शहरचे लोक, ब्राह्मण मंडळी, गृहस्थ, भिक्षुक, अग्निहोत्री व दीक्षित व शास्त्री व वैदिक व ज्योतिषी, अशीं सर्वांस आमंत्रणें लग्नास झालीं. खेरीज उद्मी, व्यापारी व सावकार व सराफ, अशीं सर्वांस आमंत्रणें केलीं. बाहेरचे सरदार गायकवाड व भोसले व होळकर व नबाब, खेरीज राजे रजवाडे हिंदुस्थानचे, इतक्यांचे वकील होते तितक्यांचे फौज सरंजामी सुद्धां बलावणीं केलीं. अष्टप्रधानसुद्धां आमंत्रणें झालीं.

अशी सर्व सिद्धता होऊन दोन्ही मंडपीं देवस्थापना झाली. नवरीची उष्टी हळद श्रीमंतांस आली. देवस्थापना झाली त्या दिवसापासून शहरांत लाख घरास सिधे चालू झाले. घरांतील घरधन्यांस, आणखी बिऱ्हाडें होतीं त्यासुद्धां टीप घेऊन सिधे पंचपक्वान्नांचे दहा दिवसपर्यंत चालू झाले. तसेंच बाहेरून लष्करें होतीं त्यांस सरंजाम पोंचते होऊं लागले. उत्तम सिधे पक्वान्नासुद्धां द्यावयाची आज्ञा झाली. ज्या दिवशीं देवस्थापना झाली, त्या दिवसापासून आहेराचा समारंभ पांच दिवसपर्यंत होत होता. आहेराच्या कापडाचे शतावधी भोत भरले. *श्रीमंतपूजन थत्ते यांजकडून यावयाचें त्या दिवशीं वाड्यांत मोठा समारंभ झाला. सर्वत्र लहान थोर सरदार होळकर, भोसले, गायकवाड, पाटणकर, दरेकर, घोरपडे, निंबाळकर, सितोळे, मोइटे, धारकर, पोंवार, असे किती गणतीस धरावे? तसेच सर्व पागे, तसेच शिलेदार, तशीच सर्व मंडळी त्या

---

३७. हे थत्ते दाणेआळींतील राममंदिरांतले. यांस नवलाखे थत्ते म्हणत असत.
* 'सीमान्तपूजन', याचा अपभ्रंश 'श्रीमंतपूजन'.

सभेस आली. ब्राह्मण सरदार पटवर्धन, विंचुरकर, रास्ते, राजे बहादर, आपा बळवंत, बन्याबा बापू मेहेंदळे, बहिरो अनंत बेहेरे, बारामतीकर, आंगरे, नबाब पोलाजंग तसे अष्टप्रधान, सारे त्या सभेस आले. महाराज सातारकर यांस तख्त बसावयास केलें होतें, तेथें येऊन महाराज बसले. सारी मुत्सद्दी मंडळी व कारभारी व कारकून व नाना फडणीस व हरिपंत तात्या, बाजीपंत अण्णा, रामचंद्र गणेश, विसाजीपंत बिनीवाले, विठ्ठलपंत वाकनीस, महादाजीपंत गुरुजी, नारोपंत परचुरे, बाळाजीपंत लेले, बाबुराव केशव, लक्ष्मणपंत देशमुख, नारोपंत चक्रदेव, सदाशिवपंत करमरकर, गोविंदराव काळे, गोविंदराव पिंगळे, फडचे[३८] व बेहेड्यांतील[३९] व जामदारखान्यांतील व एकबेरजेंतील[४०] व शिलेखान्यांतील[४१] व जिन्नसखान्यांतील व तोफखान्यांतील व हशमांकडील, त्या त्या कारखान्यांतील दरोगे[४२] सरदार कारकुनांसमवेत त्या सभेस येऊन बसले. गोविंद शिवराम खासगीवाले व पानशे व बजाबा पुरंदरे, पोतनीस, चिटणीस, मुजुमदार, असे सर्व त्या सभेंत येऊन बसले. कोंकणचे सरदार धुळप व खानविलकर वसई आरमारचे सरदार सर्व त्या सभेंत उभे आहेत. त्या सभेंत ५० पन्नास काठी[४३] सोन्याची उभी राहली आहे. खेरीज रुप्याचे काठीवाले यांचा नेम[४४] नाहीं. धत्ते यांजकडील मंडळी श्रीमंतपूजन घेऊन आली. तीही सभेंत येऊन बसली. सारी सभा नानांनीं अवलोकन करून पाहिली आणि चोपदारास विचारलें, "कोणी यावयाचा राहिला कीं काय!" असा शोध करितां दादाजी गंगाधर निसबत होळकर व बाळाजीपंत टोंसर असे राहिले होते, त्यांस बलावणें जातांच तेही येऊन हजर झाले. अशी सारी मंडळी येऊन बसली. कळवांतिणीचे नाच होतात, वाजंत्र्यांचे बाजे होतात, चौघडे वाजतात. त्या समयीं शिलेदार

---

३८. फड=सरकारी लिहिणें, वसूल घेणें, इत्यादी व्यवहाराचें स्थल. ३९. बेहडा=मामलेदार वगैरे कामदारांनीं भलती वहिवाट करूं नये म्हणून अमुक रितीनें वहिवाट व्हावी, अमुक शिबंदी राखावी, अमुक इनाम, धर्मादाय चालवावें; अमुक रितीनें वसूल घ्यावा इ० सरकारांतून झालेले नियम किंवा अशा नियमांचा लेख. ४०. एकबेरीज=सर्व प्रकारचा एकत्र केलेल्या जमाखर्चाचा लेख. ४१. शिलेखाना=चिलखतें, ढाल, तरवारी, बंदुका इत्यादी युद्धोपकरणांचें स्थान. ४२. दरोगा=देखरेख करणारा. ४३. सोन्याची काठी=सोन्याच्या काठीचे चोपदार=असे चोपदार असणारे राजे. ४४. नेम नाहीं=अमुक असें सांगवत नाहीं, संख्या सांगतां येत नाहीं.

कारकून असामी दोघे नानांनीं जवळ बोलावून त्या उभयतांस सांगितलें, "तुम्ही आरसे महालांत जाऊन दाजिबा आपटे व मोरोपंत भावे यांस सांगावें कीं, सकळ मंडळी घेऊन बसली आहे व महाराज येऊन तख्तावर बसले आहेत. थत्ते यांजकडील श्रीमंतपूजनविधी* घेऊन बसले आहेत. अशी विनंती करून श्रीमंतांस लवकर घेऊन यावें." असा निरोप कळतांच उभयतां आंत जाऊन त्यांनीं श्रीमंतांस विनंती केली. विनंती करितांच सरकारची स्वारी उठली. आंगावर पोषाक तमामी[४५] केला. डोकीस फेटा तमामी, आंगांत निमा[४६], पायांत विजार घालून समागमें दाजिबा आपटे प्रमुख मंडळी निघाली. श्रीमंतांचे मस्तकीं शिरपेंच व कलगी व तुरा मोत्यांचा व कानांत चौकडा, गळ्यांत मोत्यांच्या व पाचेच्या माळा, हातांत पोंच्या, अशी स्वारी सरकारची निघाली समागमें खिजमतगार मंडळी आपआपले हुद्दे घेऊन[४७] चालते झाले. अशी स्वारी सरकारची जेथें मंडळी सभा होऊन बसली होती त्या दरवाज्याजवळ येतांच सारे चोपदार ललकारतांच समोर महाराजांनीं पाहिलें. त्यावेळेस दाजिबा आपटे यांनीं श्रीमंतांचे हातावरून फुलांचा हार गुंडाळून[४८]. तेथून श्रीमंत आदब[४९] बजावीत चालले. ते तख्तापाशीं जाऊन, मुजरा करून, राजापुढें उभे राहिले. त्या वेळेस सकळ सभा, नबाब पोलाजंग सुद्धां, उभी राहिली. त्या समयीं एकदांच साऱ्या चोपदारांची ललकारी झाली. तें पाहून नानासुद्धां कित्येकांचे नेत्रांस आनंदाश्रू लोटले. मग राजांनीं श्रीमंतांस बसावयास जागा दाखविली तेथें श्रीमंत महाराजांचे उजवे बाजूस तख्तानजीक बसले. नंतर श्रीमंतपूजन विधी झाला. त्या वेळेस भिक्षुक, ब्राह्मण, शास्त्री, पंडित, ज्योतिषी, अग्निहोत्री वैदिक बसले होते, त्यांस देकार वांटिला. सर्वत्रांस पानसुपारी झाली. अत्तरगुलाब, हार, गजरे तुरे, सर्वत्रांस मानकरी व शिलेदार व परराज्यांतील आले होते त्यांस देऊन समारंभ झाला. अवघी मंडळी श्रीमंतांची आज्ञा घेऊन जाती झाली. महाराज राजे उठले. त्यांस श्रीमंत दरवाज्यापावेतों पोंचवीत गेले. तेथून महाराज यांनीं श्रीमंतांस आज्ञा केली कीं, "माघारे

---

* विधी = समारंभाचें साहित्य. ४५. तमामी = ज्यांत उभें सूत जरीचें व वाणा रेश[illegible]
असतो अशा कापडाचा. ४६. निमा = आंगरख्याच[illegible]
[illegible]त्यारें किंवा सामान. ४८. हातांवरून फुलांच[illegible]
गुंडाळतात. हें सेवकत्वाचें दर्शक होय. ४९[illegible]

जावें. " नंतर जेथें महाराज उतरले होते तेथें गेले. तसेच नबाबांसही पोहोंचविलें. असा श्रीमंतपूजनाचा विधी झाला.

दुसरे दिवशीं तेलफळ नवरीकडे सरकारांतून निघालें. त्या समयीं थत्ते यांचे मांडवांत वऱ्हाडी व मानकरी व मुत्सद्दी व सरदार व बाहेरील संस्थानी वगैरे लग्नास येतील त्यांची मुँदारत[५१] करण्याविषयीं थत्ते यांचे मांडवांत राघोजी आंगरे सरखेल यांची व हरिपंत फडके यांची नेमणूक झाली. वऱ्हाडी मानकरी यांची बसविण्याची योग्यता पाहून ज्या ज्या ठिकाणीं जे जे बसावयाचे त्या त्या ठिकाणीं बसवून, अत्तरगुलाब, पानसुपारी, हार, तुरे, गजरे, वांटावयास सरकारांतून कारकून नेमून दिले. त्यांस ताकीद कीं, "तात्या व सरखेल[५१] सांगतील त्याप्रमाणें तुम्हीं चालावें." अशी नेमणूक तेथील झाली.

इकडे सरकारांत आहेराचा समारंभ चालला. राजे महाराज सातारकर, अष्टप्रधान, नबाब, भोसले, होळकर, गायकवाड, मानकरी मंडळ घोरपडे निंबाळकर वगैरे मुत्सद्दी मंडळी यांचे व मामलेदार मंडळी व सरसुभे, संस्थानी राजे रजवाडे यांचे, सर्व वकिलांचे, तसेच पागे, पथके, शिलेदार, रिसालदार या सर्वांचे आहेर सरकारांत झाले. तेलफळ गेलें होतें तें माघारें येऊन थत्ते यांजकडून रुखवत सरकारांत आलें. रुखवताचा समारंभ होत आहे तों वर न्यावयास थत्ते यांजकडून आलें. वर-प्रस्थानाची सिद्धता झाली.

श्रीमंत देवांस नमस्कार करून स्वारी बाहेर निघाली थोरला हत्ती बिनायक गज, आणवून त्याजवर रुप्याची अंबारी ठेविली. त्यांत श्रीमंत बसले. पाठीमागें खवासखान्यांत आपा बळवंत व अमृतराव पेंठे हातीं चवऱ्या घेऊन बसले. पुढें खास जिलबीस बोथाटीबारदार, विटेदार व बाणदार व लगी, त्यांच्यापुढें खाँसबदार[५२] अशी जिलीब पुढें चालली. जिलबीपुढें वाजंत्र्यांचे ताफे ताशेमरफे दोनशें वाजूं लागले. त्यापुढें चौघडे वाजतात. त्यांचे पुढें जिलबीचे हत्ती शेंपन्नास चालिले आहेत. त्यांमध्यें जरीपटक्याचा हत्ती. मागें कोनवाल घोडे पांचसातशें सोन्याचे गंडे पट्टे व पाठीवर भरगच्ची झुली, गळ्यांत मोहोरा-

---

...कार. ५१. सरखेल = आंगरे यांचें उपपद ( मुलाचें ... आहे. ) ५२. खासबदार = खासबरदार =

पुतळ्यांच्या माळा, [ असे चालले. ] जिलबीच्या हत्तीपुढें पांच हजार खांसे, घोड्यावर स्वार होऊन बंदुकांचे अवाज करीत चालिले आहेत. त्यांच्यापुढें सांडणीस्वार शेंदोनशें व सुतरस्वार[५३] शेंपन्नास, तोफांचे आवाज करीत चालले. त्यांच्यापुढें दहा हजार स्वार चालिला. अशी स्वारी लग्नास वाडा डावा घालून निघाली. तेव्हां आघाडी पानशे यांचे वाड्यापाशीं होती. श्रीमंतांच्या अंबारीमागें साहेबनौबती[५४] वाजत चालल्या. वाड्यापासून तोफखान्यापावेतों एकसारखा फौजेचा थाट उभा राहिला आहे. सरकारचे अंबारीमागें वऱ्हाडिणी बायका यांणीं चालावें. बायकांमध्यें पुरुषांची दाटी न होई अशा बेतानें सभोंवतीं शिपाई चालिले. त्यांच्या मागें भिक्षुक मंडळी, शास्त्री, पुराणिक, अग्निहोत्री, ज्योतिषी व वैदिक, असा समुदाय चालला. त्यांच्यामागें मोठाले सरदार, मानकरी, होळकर, गायकवाड, भोसले, विंचुरकर, पटवर्धन, राजे बहादर, गणेशपंत बेहरे, बाहिरो अनंत, घोरपडे, निंबाळकर, जाधव, दरेकर, पाटणकर, थोरात, मोहिते, भोइटे, अक्कलकोटवाले, असे मानकरी चालिले. त्यांच्यामागें सातारकर महाराज, अष्टप्रधान समवेत व त्यांच्या मागें नबाब पोलाजंग आणि राजे रजवाडे, संस्थानी, परराज्यांतील वकील, असा समुदाय मिरवत चालला असतां, त्यांच्यामागें सरकारची मुत्सद्दी मंडळी, नाना फडणीस सुद्धां समागमें कारकून मंडळी, शेट सावकार, उदमी, असा पुण्यांतील समुदाय चालला.त्यांच्या मागें पागे सकल व कारखानदार सरकारचे व दरकदार पोतनीस, चिटणीस, मुजुमदार असे मिरवत असतां, त्यांच्या पाठीमागें पागा घोड्यावर स्वार होऊन चालले. उंटावरील नौबती शतावधी वाजतात. अशा थाटानें व अशा समुदायानें मोठ्या सरंजामानें चालत असतां शहरचे लोक दुरस्ता माड्यांवर व गच्च्यांवर उभे राहून तमाशा पाहातात. त्या समयीं शहरचे लोकांनीं सोन्यारुप्याचीं फुलें श्रीमंतांवर उडविलीं. अशी स्वारी समारंभानें नवरीचे मंडपांत पोहोंचली.

त्या समयीं जलकुंभ मस्तकीं घेऊन दासी पुढें उभ्या. दहींभात वरून ओंवाळून टाकिले. कुळंबिणी घागरी घेऊन उभ्या होत्या त्यांस देणगी देऊन, स्वारी मंडपांत दाखल होऊन वरासनीं बसले. वरकड मंडळी मंडपांत दाखल झाली. अगोदरच राघोजी आंगरे व हरिपंत तात्या सोयऱ्यांचे मंडपांत

५३. सुतरस्वार=उंटावरील स्वार. ५४. साहेब नौबत=हत्तीवरील मोठी नौबत.

तरतुदीस ठेविले होते, त्यांनीं पुढें येऊन, सारे मंडळीस आंत घेऊन जाऊन, ज्या ज्या ठिकाणीं योग्यतेनुरूप बसावयाचे तसे बसविले. श्रीमंत बसले त्या ठिकाणीं आपा बळवंत व अमृतराव पेंठे व दाजिबा आपटे वगैरे झाडून मंडळी बसली. नंतर मधुपर्क-विधी होऊन पाणिग्रहण-विधी झाला. त्या समयीं वाजंत्र्यांचे बाजे, चौघडे व नौबती, अशीं एकदांच सारीं वाजूं लागलीं व तोफांची सरबत्ती झाली. मग विवाहहोम होऊन ब्राह्मणांस दक्षिणा मंडपांत वांटिली. मंडपांत वऱ्हाडी होते त्यांस पानसुपारी, हार, गजरे, तुरे, वांटिले. मग सर्वत्र मंडळी सरकारचा निरोप घेऊन निघाली ती आपापले ठिकाणीं गेली. श्रीमंत मात्र राहिले.

तेथें चार दिवस समारंभ भोजनाचा झाला. मुत्सद्दी मंडळी व बाहेरचे वऱ्हाडी सरदार वगैरे ह्या अवघ्यांस चार दिवस यथासांग सोहळा झाला. बाहेरचे सरदार मंडळी व मराठे मानकरी यांस भोजनें सरकार वाड्यांत झालीं. मोठी दक्षणा देकार रमण्यांत झाला. चार दिवस झाल्यावर साडे[५५] होऊन वरातेची मिरवणूक निघाली. त्या दिवशीं शहरांत सारे रस्ते झाडून, सडे टाकून, चिराकदानें लाविलीं. सरकारची स्वारी अंबारींत बसून वाड्यांत यावयास निघाली. सारे सरदार, मानकरी, राजे रजवाडे, सातारकर महाराज, अष्टप्रधान व पोलाजंग, आपले सरदार लोकसुद्धां जसे जाते वेळेस लग्नास गेले तसेच येते वेळेस त्याच थाटानें मिरवत हवया, नळे, चंद्रज्योती, झाडें नाना तऱ्हेचीं सोडीत सोडीत मिरवत सुमुहूर्तानें वाड्यांत दाखल झाले. नाच रंग सर्व होऊन, लक्ष्मीपूजन होऊन, सर्वांस पानसुपारी वगैरे अत्तर गुलाब हार, तुरे, वांटले. मग सर्वांस घरीं जाण्याचा हुकूम झाला. सर्वत्र आपापले ठिकाणीं गेले.

दुसरे दिवसापासून सर्वत्र लोकांस मेजवानीचीं आमंत्रणें करून भोजनास बलाविलें. मंडळी तितकीच आली. वाढावयास सर्व कारकून मंडळी नेमिली. तूप वाढावयास शहरचे सराफ[५६] नेमिले. एक एका पदार्थास एक एक कारकून नेमिला. सारे कारकून पीतांबर नेसून, शालजोड्या कंबरेस बांधून, वाढावयास लागले. चार चार कारकुनांमागें एकेक शिप्या हातीं ओलीं धोत्रें घेऊन

---

५५. साडे=ऐरणीपूजनाचे वेळीं वधूस वस्त्रें देण्याचा समारंभ. ५६. सराफांच्या नेमणुकीचें विशेष कारण काय? काटकसरीनें खर्च करणारे म्हणून यांस नेमिलें असावें?

वाढणारांचे घाम पुशीत असे. असा रोज समारंभ होत राहिला. होळकर, गायकवाड, भोसले, व सरकारचे मानकरी-घोरपडे, जाधव, निंबाळकर, पाटणकर, दरेकर, मोहिते, शिरके, थोरात, धुळप, खानविलकर अशी मंडळी व पागे, पथकेसुद्धां, शिलेदार, एकांडे, अशा अवघ्यांस भोजनास घालून सर्वांस पोषाग योग्यतेनुरूप दिले. तसेंच ब्राह्मण सरदार विंचुरकर, पटवर्धन, रास्ते, बेहरे, बहिरो अनंत, राजे बहादर, बारामतीकर, आपा बळवंत, बन्या बापू मेहेंदळे, पुरंधरे, पानशे, अशा सर्वांस अलंकार, वस्त्रें योग्यतेनुरूप दिलीं.

शेवटीं नबाब पोलाजंग यांस जाफत करण्याचें बलावणें केलें. त्या दिवशीं पंधरार्शे खांसा नबाबाचे समागमें आला. त्यांस भोजनास पंधराशें रिकाबा[५७] रुप्याच्या नव्या करविल्या त्या सर्वत्रांस भोजनास मांडिल्या. खालीं बिछायती घालून, वरतीं चादरा पांढऱ्या सफेत पसरून, त्याजवर पंक्ती मांडिल्या. कारकून मंडळी आंगांत जामे निमे घालून पायांत विजारी घालून कंचरेस पटके बांधून, वाढावयास लागली. सर्वत्रांचीं भोजनें झालीं. अवघ्यांनीं वाहवा केली. मग विडे, पानसुपारी, अत्तरगुलाब, हारतुरे, गजरे, देऊन सर्वत्रांस पोषाख दिले. नबाबांस जवाहीर दिलें. असें होऊन सर्व आपले गोटांत गेले. सरदार मानकरी व शिलेदार कोणी राहिला नाहीं. असे सर्वत्रांचे सत्कार झाले.

पाठीमागून मामलेदार मंडळी, सरसुभे, या सर्वांचीं आतिथ्यें झालीं. असें लग्न एक मास* पर्यंत झालें. सर्वांस निरोप झाला. सर्व सरदार होळकर, गायकवाड, नबाब, भोसले सुद्धां सरकारचा निरोप घेऊन आपापले ठिकाणास गेले. तसेच सर्व संस्थानिक हिंदुस्थानचे आले होते तेही गेले. सातारकर महाराज पुण्यास आणिले होते त्यांस मोठे समारंभानें साताऱ्यास पोहोंचविलें. दीड महिनापर्यंत लग्नाशिवाय कारभार दुसरा झाला नाहीं. लग्नसंबंधीं सर्व कारभार आटोपिल्यापुढें राज्यसंबंधी कामकाजें करूं लागले. फौजेच्या खर्चाचे बंदोबस्त केले. तेव्हां कोणे एके समयीं फौजेचें धरणें तात्यांचे येथें बसलें. शिलेदार गार्दी धरण्याला असतां सदाशिवपंत करमरकर यांशीं

---

५७ रिकाबा—रिकाब्या=ताटें. * ह्या लग्नाच्या व्यवस्थेची तपशीलवार यादी 'पत्रें यादी वगैरे' मध्यें प्रसिद्ध झाली आहे. लेखांक ३३१ पृष्ठें २७५-२१६.

गार्यांची कटकट झाली. त्या कज्जांत सदाशिवपंत ठार झाले. पुढें फौजेचे खर्चाचा बंदोबस्त सरकारांतून झाला. सदाशिवपंत यांच्या जागेवर नारोपंत चक्रदेव कारभार करूं लागले. मध्यें इंग्रज यांचें बोलणें सरकारांत पडलें कीं, "आमचा एक वकील नेहमीं पुण्यास सरकारांत असावा."

इकडे श्रीमंत रावसाहेब लग्न झाल्यानंतर नऊ वर्षांचे झाले. तेव्हां श्रीमंतांचे मनांत आलें कीं, नानातऱ्हेचे खेळ खेळावे, शिकारखाने बाळगावे. असा मजकूर जवळच्या मंडळीनें नानांचे कानांवर घातला. त्याजवरून नानांनीं तऱ्हेतऱ्हेचीं श्वापदें व पक्षी मिळविले. सात आठ मैना बंगाली बोलणाऱ्या, तसेंच बोलणारे पोपट, यांचे पिंजरे चांगले मिळविले. तसेंच चंडोलपक्षी यांचे पिंजरे सात आठ आणविले. त्याजवर सात आठ माणसें ठेवून त्यांनीं नेहमीं पिंजरे पाहात बाळगीत असावें, असें केलें. तशींच बदकें, पाणकोंबडीं, मोरांच्या जोड्या दाहापांच आणून ठेविल्या, तशींच हरणें शेंदोनशें, काळवीटसुद्धां वाड्यांत आणून ठेविलीं. चित्ते दोन चार आणून बांधिले. पांच सातशें ससे, काळे, पिंवळे, अबलॅक[५८] असे पर्वतीच्या वाटेवर बागेंत तळ्याचे कांठीं खोली बांधून, तींत ठेविले. त्यांजवर माणसें चाकर ठेविले. तसेच दाहा वीस वाघ पर्वतीस मोठा सोपा बांधून त्यामध्यें सांखळदंडानें बांधून ठेविले. त्यांत संभू वाघ म्हणून मोठा पटाईत, नुसता एक जात पिंवळा, लहानशा घोड्याएवढा होता. त्याजवर दर्वेशी चाकर ठेविले. गेंडे हिंदुस्थानांतून महादजी शिंदे यांणीं पाठविले. दाहावीस जोड्या एडक्यांच्या ठेविल्या. पहिलवान कुस्त्या घेणारे सरकारांत चाकर ठेविले. तसेंच वज्रमुष्टी[५९] यांच्या जोड्या सरकारांत पांच सात चाकरीस ठेविल्या. छडी खेळणेवाले व दांड खेळणेवाले, असे नेहमीं हुजूर ठेविले. तिरंदाजी खेळणारेही असामी दोन चार श्रीमंतांपाशीं हुजूर ठेविले. तिरंदाजी व दांडछडी यांचा थोडा अभ्यास श्रीमंतांनीं केला. सायंकाळीं तालिमखान्यांमध्यें सरकारची स्वारी जाऊन तोही अभ्यास थोडासा करी. मुद्गल पेलणें व लेजीम खेळणें खेळे. श्रीमंत रावसाहेब बहुत खेळत. नेहमीं दोहों चोहों दिवशीं पहिलवानांच्या कुस्त्या व वज्रमुष्टींच्या लढाया होऊं लागल्या. ज्याची सरशी होईल त्यास सरकारांतून बक्षीस मिळत असावें. असा

---

५८. अबलक=चित्रविचित्र रंगाचें. ५९. वज्रमुष्टी=मल्लाचें एक आयुध. तें आयुध वापरणारे मल्ल.

नित्य खेळण्याचा पाठ चालविला. घोडीं फिरविणें व बोथाड्या खेळणें हाही अभ्यास श्रीमंतांनीं केला. खुले हत्तीवर हत्तीच्या किलाव्यांत[६०] बसून हत्ती चालविणें हाही अभ्यास श्रीमंतांनीं केला. नित्य हत्तीवाघांच्या लढाया व एडक्यांच्या लढाया व सांबरांच्या लढाया होत. चित्ते स्वारीमध्यें चालवून शिकार खेळणें, हाही पाठ आठ पंधरा दिवशीं स्वारींत चालत असे. नानातऱ्हेचे खेळ! खबूतरें बहूत पाळिलीं होतीं. त्यांजवर माणसें ठेविलीं. इतक्यांचे खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेविला. तसाच वाघांचे खाण्यापिण्याचा बंदोस्त केला. दर वाघास,वाघ पाहून मांसाची नेमणूक करून दिली. याप्रमाणें नानातऱ्हेचे खेळ खेळत सायंकाळच्या समयीं चार घटका दरबारही करीत असावें असा नित्य पाठ चालविला.

[ आमचा एक वकील नेहमीं पुण्यांत सरकारांत असावा असें ] इंग्रजाचें बोलणें नानांचे मनास येऊन, 'बरें आहे' म्हणून बोलून शंभर लोकांनिशीं संगमावर बेटांत जागा नेमून दिली. तेथें बेटांत एक खासा गोरा व शंभर कुडतीवाले असे रहावे[६१]. बहिरोपंत मेहेंदळे इंग्रजांचे बोलण्यास नेमून दिले. बहिरोपंताखेरीज दुसऱ्याचे हातून बोलणें इंग्रज याणें बोलूं नये असा नेम ठरवून इंग्रजास ती जागा दिली. तेव्हां इंग्रज याणें सरकारांत विनंती केली कीं, "आमचे खाण्यापिण्याचे जिन्नस मुंबईहून नेहमीं हरहमेश येतील त्यांस सरकारची आज्ञा बोरघाटावर असावी." असें बोलणें इंग्रजाचें पडलें असतां तो मजकूर बहिरोपंत यांणीं सरकारांत समजाविला.त्या समयीं नानांची आज्ञा झाली कीं, "तीन म्याणे जिनसांचे तुमचे खाण्याचे येतील.त्यास हरहमेशा सरकारांतून मनाई व्हावयाची नाहीं. एखादी गैरवाजवी गोष्ट करूं लागल्यास त्या गोष्टीचा मुलाजा[६२] सरकारांतून होणार नाहीं." अशी निक्षून नानांची आज्ञा झाली. तो

---

६०.किलावा = हत्तीच्या गळ्यांत सुताच्या दोरीचें पेंडें महाताचे पाय अडकविण्यास घालतात तें. ६१ पुण्याच्या दरबारांत पहिले इंग्रज वकील मि० मॉस्टिन् इंग्रज याची नेमणूक श्री० माधवराव बल्लाळ यांच्या कारकीर्दींत झाली. पेशव्यांचे घराण्यांतील कलह वाढवितां आल्यास तसें करून मराठ्यांस हैदराकडे मिळूं देऊं नये म्हणून हुकूम आंतुन मुंबईसरकारनें मि० मॉस्टीन् यास दिला होता. तो कितपत बजाविला गेला हें कळत नाहीं. असो, मि० मॅलेट याची नेमणूक इ० स० १७८५ सालीं झाली. ग्रांट डफ.
६२. मुलाजा = कानाडोळा, क्षमा.

मजकूर मेस्तर मालिट यांजपाशीं मेहेंदळे यांणीं सांगितला. तेव्हां ती गोष्ट मालिट याणीं कबूल केली. मग तो मजकूर बहिरोपंत यांणीं सरकारांत कळविला. त्याजवरून सरकारची आज्ञा जकाते यांस झाली कीं, "इंग्रज यांजकडील तीन म्याणे हरहमेशा येतील त्यांस तुम्हीं मनाई करूं नये." असें झालें असतां कांहीं एक दिवशीं इंग्रज यांचे मनांत विकल्प येऊन त्यांणीं आपले ठिकाणीं मसलत केली कीं, "आम्ही येथें वकिलीचे कामावर राहातों परंतु आम्हांजवळ तोफा नाहींत. याची तजवीज केली पाहिजे. म्हणून सरकारची आज्ञा तीन म्याण्यांची आहे त्या म्याण्यांमध्यें दोन जंबुरे घालून आणावे" अशी मसलत करून इंग्रज याणें मुंबईहून मेण्याची निघावयाची वेळ झाली त्या समयीं दोन म्याणे खावयाचे भरले. एक तांबडा मेणा होता त्याजमध्यें दोन जंबुरे घातले आणि तिहींला कुलपें घालून, मेणे मुंबईहून रवाना झाले. रवाना होतांच ती बातमी टाकोटाक नानांस येऊन पोहोंचली. त्या समयीं नाना यांणीं बळवंतराव जकाते यांस बोलावून आणून समक्ष आज्ञा केली कीं, "या खेपेस इंग्रज यांचे म्याणे येत आहेत, त्यांत दोन म्याणे वरते येऊं द्यावे, तांबडा म्याणा आहे तो चौकीवर पाडून ठेवावा." अशी आज्ञा सरकारची होतांच त्या समयींच जकाते यांचा शिपाई बोरघाटास टाकोटाक येऊन म्याणे तेथें येतात तों तांबडा म्याणा चौकीवर पाडून ठेविला. दोन म्याणे पुण्यास येऊन दाखल झाले. तेव्हां इंग्रज पाहून घाबरला. आणि बहिरोपंत मेहेंदळे यांस मालिट याणें बलावून नेऊन सांगितलें कीं, "आमचे तीन म्याणे यावयाची आज्ञा सरकारची आहे. असें असतां आजच्या खेपेस आमचा एक म्याणा कां अडकाविला? त्यास हा मजकूर नानांचे कानावर घालून मेणा आमचे येथें येऊन पोहोंचे असें करावें." तेव्हां बहिरोपंत मेहेंदळे नानांकडे आले. मालिट याणीं मजकूर सांगितला होता तो ऐकून घेऊन नानांनीं उत्तर केलें, "आज नेहमीं मेणे येतात, कधीं अडकावा झाला नाहीं, आतांच कां अडकाविला?" तेव्हां बहिरोपंत यांणीं उत्तर केलें, "हा मजकूर मला समजला नाहीं." त्या समयीं नाना यांणीं बहिरोपंतास सांगितलें कीं "त्यांस तुम्हींच विचारा कीं, 'नेहमीं तुमचे मेणे येतात आणि आजच्या खेपेस कां अडकाविला?' असें नानांनीं विचारलें म्हणून मालिट साहेब यास विचारावें." त्या समयीं बहिरोपंत

मागती बेटांत जाऊन सरकारांत मजकूर झाला तो मालिट यांस समजाविला, आणि बहिरोपंत त्यांस म्हणतात, "काय मजकूर आहे ? कां अडकाविला ? असें नानांनीं विचारलें." तेव्हां मालिट साहेब याणें उत्तर केलें कीं, "नानांची व माझी भेट झाली पाहिजे म्हणजे याचा खुलासा होईल". तेव्हां मेहेंदळे यांनीं पुनः नानांकडे येऊन विनंती केली कीं, "नानांची माझी भेट झाली पाहिजे," असें त्याचें बोलणें आहे. त्या समयीं नानांनीं उत्तर केलें कीं, "उद्ईक दरबारचे वेळेस त्याजला घेऊन यावें." अशी आज्ञा होतांच बहिरोपंत यांणीं त्याजकडे सांगून पाठविलें कीं, "उद्ईक दरबारचे वेळेस यावें म्हणून नानांची आज्ञा झाली आहे." मग दुसरे दिवशीं बहिरोपंत यांनीं वाड्यांत येऊन नानांस विनंती केली कीं, "त्यांला येण्याची आज्ञा झाली पाहिजे." तेव्हां बहिरोपंत हे सरकारचा जासूद घेऊन, कुंभार-वेशीपाशीं जाऊन, तेथील चौकीवर परवानगी सांगून, मालिट साहेब यास शहरांत घेऊन आले. त्या दिवशीं वाड्यांत दरबार केला होता. तेथें इंग्रज येऊन सलाम करून बैठकीवर बसला. मग इंग्रज यास आपली भाषा येत नव्हती तेव्हां दुभाषी याणें नानांस विनंती केली कीं, "साहेब यांचें म्हणणें असें आहे कीं, आमचा मेणा घाटावर अडकाविला आहे त्यास पुण्यास येण्याची आज्ञा असावी." त्या वेळेस दुभाष्या याशीं नानांनीं उत्तर केलें, "आजपावेतों मेणे कधींही अडकाविले नाहींत, आतांच कां अडकाविले ! म्हणून त्यांस विचारावें." तेव्हां दुभाष्यानें मालिट यास मजकूर सांगितला. तो ऐकून घेऊन मालिट साहेब याणें उत्तर केलें, "आजपासून अशी गोष्ट आम्हांपासून होणार नाहीं. झाली येवढी सरकारनें आम्हांस माफ करावी." तो मजकूर नानांस समजाविला. त्या वेळेस नानांनीं उत्तर केलें कीं, "मेणा माघारा जाईल. फिरून अशी गोष्ट झाली असतां त्याची तजवीज सरकारांतून होईल." असें सांगितल्यावर जकाते यास सरकारची आज्ञा झाली, "मेणा माघारा जाऊं देणें." त्या समयीं घाटांतून मेणा माघारा मुंबईस गेला. त्या समयीं इंग्रज याणें आपले बुकावर लिहून ठेविलें कीं, "या राज्यांत नाना आहेत तोंपावेतों या राज्याची गोष्ट कोणी बोलूं नये."[६३]

---

६३. हा इंग्रजांचा युक्ती लढविण्याचा प्रयत्न कोठें इंग्रजी पुस्तकांत आढळांत येत नाहीं. 'बातमी ठेवण्याविषयीं नानांची हद्द असो!' असे उद्गार मात्र कोठें कोठें.

पुढें टिपूशीं बिघाड सरकारचा झाला तेव्हां टिपूवर मोहीम सरकारची झाली. त्या स्वारीस खुद्द नाना फडणीस व हरिपंत तात्या गेले ती स्वारी बदामीची.[६४] त्या वेळेस नबाब हैद्राबादेहून टिपूवर चालून आला. बारा महिने मोहिमेस लागले. त्या समयीं कर्नाटकांत मुलूख घेतला व बदामीचा किल्ला घेतला. मोंगलांनीं आदवणी वगैरे महाल घेतले.

त्या स्वारीस अशी गोष्ट झाली. नबाब रात्रीचे ठिकाणीं जनानखान्यामध्यें बसले असतां नबाबांची मर्जी बहूत दिलगीर होऊन खप्पा झाले आहेत हें पाहून बक्षी बेगम यांणीं नबाबांस अर्ज केला कीं, "आज सरकारची मर्जी अशी दिलगीर, खप्पा कां झाली ? आज आपल्यास कोण्या गोष्टीची चिंता आहे असें नाहीं, व आपल्यास तूर्त शत्रूही कोणी नाहीं. मोहिमशीर आहों. असें असतां मर्जी खप्पा होण्याचें कारण काय ? पेशवेही आज आपल्यास अनुकूल आहेत. असें असतां मर्जी गेली याचें कारण मला समजलें पाहिजे." तेव्हां तो मजकूर ऐकून घेऊन नबाब बक्षी बेगम यांस बोलले कीं, "काय मजकूर तुजला सांगू ?" तेव्हां ती म्हणते, "मला मजकूर कळूं नये अशी कोणतीही गोष्ट नाहीं, मग एवढीच मला कळूं नये कीं काय ?" त्या वेळेस नबाब बोलतात, "तूं विचारलेंस त्याचें उत्तर असें आहे कीं, आपण सर्व गोष्टींनीं मजबूत आहों. परंतु आमचे दौलतींत माणूस कोणी नाहीं म्हणून माझी मर्जी जात राहिली."[६५] मग दुसरे दिवशीं नबाब जनानखान्यांत बसले आहेत, बक्षी बेगम जवळ आहेत, अशा समयास नाना फडणीस यांची चिठ्ठी जाऊन पोहोंचली. नाना यांणीं फारसनीस[६६] बोलावून फारशी चिठ्ठी लिहविली, "काल आपली मर्जी जात राहिली कीं दौलतींत माणूस

---

आढळतात. या वरील वाक्याप्रमाणेंच कर्नल पामर, दुसरे एक रेसिडेंट, नाना मृत्यू पावल्याचें वर्तमान ऐकून म्हणतात, "नाना गेले, व त्यांचेबरोबर मराठीशाहींतील शाहाणपणा व बातचेतही गेला !" ६४. ही मोहीम १७८६।८७ सालची. हींत बदामीचा किल्ला सर करीपर्यंत नाना फौजेंत होते. नंतर पुण्यास आले. हरिपंत व तुकोजी होळकर हे पुढें कोपाळ, बहादर भेंड्यापर्यंत गेले होते. पुढें टिपूनें एकदम तहाचें बोलणें लाविलें. त्यांत पेशव्यांस बदामी, कितूर, नरगुंद व दुसरे त्यांणीं घेतलेले प्रांत दिले व रोख ३० लक्ष रुपये देऊन १० लक्ष आणखी देण्याचें कबूल केलें. ६५. दौलतींत माणूस कोणी नाहीं=राज्यांत किंवा पदरीं योग्य चाकर नाहींत. ६६. फारसनीस = फारशी लिहिणारा कारकून.

कोणी नाहीं, ह्यासाठीं मर्जी खप्पा झाली, तर येवढ्यासाठीं आपली मर्जी जाऊं देऊं नये. आम्ही आपले ठिकाणीं आमचे पेशवे सरकार व आपलें सरकार हीं दोन मानीत नाहीं. जसे आम्ही पेशव्यांचे चाकर तसेच आपले. जो हुकूम करणें तो आम्हांस फर्मावीत जावा. आम्ही बजावून देऊं." अशी चिठ्ठी वाचून बक्षी बेगम यांस नबाब बोलिले कीं, "काल तू आणि मी येथें ही गोष्ट बोलत होतों ही बातमी नानांस पोहोंचली कशी! आणि त्यांची चिठ्ठी येथें आली कशी! अशीं माणसें आमचे दौलतींत नाहींत म्हणून माझी मर्जी गेली होती." मग दुसरे दिवशीं नाना फडणीस यांस नबाब यांणीं "मदारुलमहा[67]" असा किताब दिला. मग टिपूशीं तह होऊन दोन्ही फौजा खंडणी घेऊन माघाऱ्या आल्या, हिंदुस्थान प्रांतीं महादजी शिंदे व सरकारच्या फौजा होत्या. त्या वेळेस महादजी शिंदे मोठे जोरावर झाले. त्या समयीं हिंदुस्थानांत सरकारची हुजूरची फौज जरीपटका घेऊन राहावी असें पाठीमागून चालत आलें होतें. हल्लीं हिंदुस्थान प्रांतीं सरकारचें कोणी नव्हतें. शिंदे, होळकरच मात्र होते. सबब अली बहादर, म्हणजे समशेर बहादर यांचे चिरंजीव, मस्तानीचे नातू, यांस हिंदुस्थानांत फौज समागमें देऊन रवाना करावें, अशी मसलत सर्वांची हुजूर पुणें मुक्कामीं ठरून, अली बहादर यांची रवानगी हिंदुस्थानांत करावी असा निश्चय झाल्यानंतर तयारी व्हावयाची सरकारची आज्ञा झाली. त्यासमयीं अली बहादर यांचेसमागमें सरंजामीपैकीं फौज व हुजूरातपैकीं कांहीं पागे, अशी फौजेची तयारी होऊन, जरीपटका समागमें देऊन, मुतालिकीची शिक्केकटार अली बहादर यांचे स्वाधीन केली. त्यासमयीं अली बहादर यांस श्रीमंतांची आज्ञा झाली कीं, "तुम्ही हिंदुस्थानांत जाण्याची तयारी करावी." असें सांगून समागमें डेरेदांडे फरासखाना[69] नेमून दिला. दहा पंधरा हत्ती समागमें नेमून दिले जरीपटका त्यांचे स्वाधीन केला. वरकड दरकदार, फडणीस, पोतनीस, मुजुमदार, चिटणीस, यांणीं आपापले

---

६७. मदारुलमहा = मदारुल् महाम्=मुख्यप्रधान, बडा कारभारी. ६८. नानाची बारीक रीतीनें बातमी ठेवण्याची तजवीज मोठी कडेकोट असे असें वरील दोन उदाहरणांवरून स्पष्ट होतें. ही बारीक रितीनें बातमी ठेवण्याची पद्धती त्यांनीं थोरल्या माधवरावापासून उचलली. ही आख्यायिकाही इंग्रजी ग्रंथांत कोठें नाहीं. ६९. फरासखाना = तंबू वगैरे सामान ठेवण्याची जागा.

कारकून अली बहादर यांचे स्वाधीन केले. आणखीही कारकून सरकारांतून बरोबर दिले. चौघडा दिला साहेबनौबत समागमें दिली. अशी मोठीं इतमामानें रवानगी हिंदुस्थानांत केली.[७०] अली बहादर व त्यांचे चिरंजीव समशेर बहादर, असे उभयतां बापलेक कबिलेसहित हिंदुस्थानांत जाण्यास निघाले. त्यावेळेस सरकारचीं पत्रें शिंदे होळकर यांस दिलीं कीं, "चिरंजीव अली बहादर यांची रवानगी हिंदुस्थानांत समागमें जरीपटका फौज देऊन व थोडा तोफखाना गारदी देऊन रवानगी केली आहे. त्यास हे तुम्हांपाशीं येऊन पोहोंचल्यानंतर हे व तुम्हीं उभयतां एक विचारें राहून काम-कारभार करीत जावे. यांचे विचाराशिवाय तुम्हीं कोणतेंही काम करूं नये."

अशीं पत्रें घेऊन अली बहादर पुण्याहून श्रीमंतांची आज्ञा घेऊन, निघाले ते मजल दरमजल कासार-बारीचा घाट उतरून बऱ्हाणपुरास पोहोंचले. त्या समयीं सरकारचे मामलेदार खानदेश व बागलाण व वऱ्हाड व वरघाट, असे सर्व येऊन भेटले. सर्वांच्या भेटी अली बहादर यांशीं झाल्या. घास-दाण्याची तजवीज अवघे मामलेदार यांणीं राखिली. नर्मदापावेतों जाऊन पोहोंचत तेथ पावेतों मामलेदार समागमें होते. सर्वांनीं आपापल्या महालाचे घास-दाणे पोहोंचविले. नंतर अली बहादर खांसा नर्मदा उतरून पार झाले. त्या समयीं सर्व मामलेदार यांस निरोप देऊन वाटेस लाविले. नंतर कूच दर कूच माळव्यांतील हडोती खेचीवाडा टाकून, हिंदुस्थानांत शिंदे, होळकर होते तेथें जाऊन पोहोंचले. सर्वांच्या भेटी झाल्या. सरकारचीं पत्रें होतीं तीं उभयतांस दिलीं. तीं पत्रें वाचून शिरीं वंदन केलीं आणि महादजी शिंदे पाटिलबोवा व तुकोजी होळकर सुभेदार यांणीं अली बहादर यांस सांगितलें कीं, "आपण जसें सांगाल तसेच चालूं. आपल्या विचाराशिवाय कोणतेंही काम व्हावयाचें नाहीं."

नंतर अली बहादर यांणीं हिंदुस्थानात गेल्यावर फौज आणखी ठेविली.

---

७०. अली बहादर व तुकोजी होळकर यांस महादजी शिंद्यांच्या मदतीस म्हणून १७८८चे सुमारास पाठविलें. ग्रांट डफ. ७१. अली बहादर व तुकोजी हे शिंद्यांस अडथळा आणण्यासच पुण्याहून पाठविले होते. त्याप्रमाणें शिंद्यांच्या बेतांत त्यांनीं पुष्कळदां लफडीं आणिलीं. ग्रांट डफ.

हिम्मतगीर गोसावी[७२] यास वीस हजार गोसाव्यानिशीं आपले जवळ चाकरीस ठेविलें. डगई प्रांत कोट रुपायांचा मुलूख नवा अली बहादर यांनीं सोडविला. तेथील राज्य अली बहादर करूं लागले. शिंदे, होळकर व अली बहादर एक विचारानें राहिले. अली बहादर हिंदुस्थानांत पोहोंचल्यानंतर शिंदे, होळकर, अली बहादर [ हे ] मसलत व स्वारी शिकारी करणें, ती एक विचारें करूं लागले.

अली बहादर येथें पोहोंचल्यावर शिंदे, होळकर मिळून गिलच्यावर चालून गेले. कारण गिलच्या इराणी अटक नदी उतरून अलीकडे आला. सबब शिंदे व होळकर सरकारच्या फौजा घेऊन त्याजवर चालून गेले. तेव्हां सरकारच्या फौजेची व गिलच्यांची लढाई मोठी मातबर झाली. गिलच्यांचे पारिपत्य शिंदे यांणीं श्रीमंतांचे पुण्यप्रतापें करून यथास्थित केलें. पूर्वीं भाऊसाहेब हे गिलच्यांशीं लढाई करून यश मिळवून शेवटले लढाईंत गिलचा यश घेऊन तीन लाख फौजेनिशीं भाऊसाहेब गर्द झाले, त्यांचा सूड शिंदे यांणीं यथास्थित घेतला. गिलच्यांचें पारिपत्य सरकारचे मनांत होतें तसें करून खंडणी घेऊन गिलचे व इराणी यांस अटके पार घालविले. असें पारपत्य गिलच्यांच चांगलें केलें. आणि फौजा माघाऱ्या हिंदुस्थानांत छावणीचे छावणीवर येऊन दाखल झाल्या. आणि सरकारांत डांक झाले वर्तमानाची लिहिली. तो डांकेचीं पत्रें पुण्यास येतांच पत्रें पाहून सरकार फार खूष होऊन तोफेची सरबत्ती केली.[७३]

---

७२. हिंमत बहादर गोसावी शिंद्यांच्या पदरीं होता. गोसाव्यांच्या फौजेचा तोच सरदार होता. पुढें शिंद्यांच्या मनांत अंदेशा आल्यावरून हिंमत बहादरास धरावयास त्यांणीं एक स्वारांची टोळी पाठविली. पण हिंमत अली बहादरांच्या गोटांत पळून गेला. तो अलीनें शिंद्यांच्या हातीं दिला नाहीं. ७३. ही गिलच्यावरील स्वारी कोणती तें समजत नाहीं. गिलचे लोक येण्याचें भय मात्र शिंद्यांस होतें. तेव्हां ही इष्मायल बेग यावरील स्वारी असावी. इष्मायल व त्याचा बाप महंमद बेग हे दोघेही शिंद्यांचे हाडवैरी होते. पुढें महंमद बेग पडला, व इष्मायलचा मोड पाटनच्या लढाईंत होऊन त्याच्या फौजेचा फडशा उडाला. इ० सन १७९०. ह्या लढाईंत होळकर एका बाजूस उभे होते. गिलच्यांस अटकेपार घालविल्याचें पुढें लिहिलें आहे तें बरोबर दिसत नाहीं. शिंद्यांनीं इष्मायल याची व रोहिले लोकांची मात्र खूप खोड मोडिली, असें ग्रांट डफ याचे ग्रंथांत लिहिलें आहे.

या पुढें इंग्रजानें सरकारांत बोलणें लाविलें कीं, " आम्हांला टिपूवर मोहीम करायाची आहे. यासाठीं तुम्हीं आम्हांस साह्य व्हावें. " अशीं मसलतीचीं बोलणीं लागलीं. त्या मसलतीस साहा सात महिने लागले. फौजेची तयारी होऊं लागली. तेव्हां इंग्रजाचें बोलणें सरकारांत पडलें, " टिपू जेर होऊन उत्पन्न होईल त्याचे तीन हिस्से सारखे करावे, त्यांपैकीं एक हिस्सा मोंगल, एक हिस्सा पेशवे व एक हिस्सा इंग्रज. " असे तीन हिस्से ठरले. नबाब हैदराबादेहून टिपूवर जाण्यासाठीं निघाले. तसेच पेशवे यांच्या फौजेसह टिपूवर जाण्यासाठीं हरिपंत तात्या यांची रवानगी कर्नाटकांत झाली व परशुराम भाऊ पटवर्धन यांस सरकारची आज्ञा कर्नाटकांत जाण्याची झाली. तेही तयारी करून निघाले. वरकड सरदार व मानकरी व हुजरात व जरीपटका हरिपंत तात्यांसमागमें रवाना झाला. परशुराम भाऊ, हरिपंत तात्या, मिळून सरासरी लाख सवा लाख फौज कर्नाटकांत टिपूवर रवाना झाली. गारदी, पायदळ व सरकारी तोफखाना, मिळून दीड लक्षाच्या जमावाची टिपूवर रवानगी झाली. ते लोक मजल दरमजल कर्नाटकांत दाखल झाले. हे चालून येतात ही बातमी टिपूस होती. त्यानेंही जमाव मोठा फौजेचा केला. तीन राजे त्याच्यावर चालून गेले, तितक्यांसही टिपू लढाईस पुरवला. अठरा महिने फौजेशीं टिपू भांडत होता. पेशव्यांचे फौजेनें टिपूच्या मुलखांत भारी धूम करून मुलूख लुटला व सरकारचीं ठाणीं टिपूच्या मुलखांत बसलीं. अशी लढाई होत असतां अठरा महिने त्या मोहिमेस लागले.

इकडे वर्तमान पुणें मुक्कामीं काय झालें ! पाठीमागें हिंदुस्थानांत महादजी शिंदे यांणीं गिलचा मोडला. त्याजवर दिल्लीचे बादशाहा अल्ली गौर यांणीं दिल्लीस आपले वजीर होते, त्यांत गुलाम कादर हा नवा वजीर केला. तो कारभार करूं लागल्यावर त्यानें बादशाहा याचे डोळे काढिले. कारण, गुलाम कादर हा पूर्वीं लहान होता त्या वेळेस फार देखणा, अति रूपवान असतां बादशाहा याणें नामर्द करून खोजा केला होता. मग गुलाम कादर हा फार शहाणा, चांगला लिहिणारा असल्यामुळें बादशाहाची त्याजवर मेहेरबानी होती म्हणून त्याजकडे वजिराचें काम सांगितलें. तें सांगितल्यावर मुखत्यारीचा

---

७४. हा तह इ० सन १७९० सालीं झाला व लढाई १७९२ पर्यंत सुरू होती. ७५. 'अल्ली गौर' यास 'शहाअलम्' असेंही म्हणतात.

कारभार गुलाम कादर करूं लागला. सर्व हुकूम गुलाम कादर याचा चालूं लागल्यावर त्याला पूर्वीचें स्मरण झालें. नंतर त्याचे चित्तांत मोठा पश्चात्ताप झाला कीं, "बादशाहानें मला नामर्द करून माझें विषयसुख नाहींसें केलें." तें [७६]शैल्य स्मरून मोठ्या रागानें त्यानें बादशाहाचे डोळे काढिले. तेणेंकरून बादशाहा आंधळा झाला. असें झाल्यावर बादशाहास मोठा विषाद वाटला. त्यावेळेस गुलाम कादर याचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य स्वाधीन राहिलें नाहीं. असें जाणून बादशाहानें महादजी शिंदे यांशीं राजकारण केलें कीं, गुलाम कादर यास धरून द्यावें म्हणजे तुम्हांस बादशाही वजिरात सांगूं. असे करार मदार तहनामे ठरले.

मग शिंदे त्या उद्योगास प्रवृत्त झाले. [७७]गुलाम कादर याणें लढाया दोन चार मोठ्या शिंयांशीं केल्या. शेवटीं महादजी शिंदे यांणीं गुलाम कादर यास धरून कैद केलें. आणि बादशाहाचे भेटीस दिल्लीस जाऊन सारा मजकूर बादशाहास विदित केला. त्या वेळीं बादशाहाची मोठी मेहेरबानी शिंदे यांजवर झाली आणि महादजी शिंदे यांस बादशाहा बोलिले कीं, "शाबास! अच्छा काम तुम्ने मेरा किया! तूं मेरा बेटा!" असें बोलले. तेव्हां महादजी शिंदे उभे राहून कुर्णु[७८]सात करून, अर्ज करितात जे "गुलाम कादर याजविषयीं काय हुकूम आहे?" तेव्हां बादशाहा बोलिले, "उस्से पिंजरेमे डालकर रखना." असा हुकूम बादशाहाचा ाला. पुढें गुलाम कादर यास पिंजऱ्यांत घालून मारिलें. मग महादजी शिंदे यांस दिल्लीची वजिरात बादशाहा सांगूं लागले, त्या वेळेस शिंदे यांणीं अर्ज केला कीं, "आमचे सावंदांचे नांवें वजिरातीचीं वस्त्रें व [७९]मरातब काय द्यावयाचे ते द्यावे. आम्ही आपले सावंदांचे तर्फेनें येथील कारभार वजिरातीचा करणें तो करूं." असा

---

७६. 'वैर' असा इं. प्रतीचा पाठ आहे. ७७. गुलाम कादर हा नजीबउद्दवल्याचा नातु. याचा बाप झाबिताखान हा इ० सन १७८६ त मृत्यु पावल्यावर, गुलाम त्याच्या रोहिलखंडांतील जहागिरीचा मालक झाला. पुढें आपल्यास वजिरी मिळावी म्हणून त्याणें बंड करून दिल्ली घेतली. व बादशहाचा व त्याच्या मुलांचा नाना तऱ्हेनें छळ करून शेवटीं त्याचे डोळे काढिले. दिल्लींत मग याचें वर्चस्व झालें. इ० सन १७८८।८९. पुढें त्यांस शिंद्यांचे हातुन प्रायश्चित्त यथायोग्य लवकरच मिळालें. ७८. कुर्णुसात्= कोर्निषात्= भुईस हात लावून नम्रतेनें सलाम करतात तो. ७९. मरातब=मान, पदवी.

अर्ज ऐकून बादशाहा बोलेले, " बहूत अच्छा है." मग श्रीमंतांचे नांवें वजिरातीचीं वस्त्रें, कांहीं मरातब व मोरचल, शिवाय श्रीमंतांस जवाहीर यावयाचें तें शिंदे यांजपाशीं दिलें. पेशवे यांचे वजिरातीचा कारभार शिंदे दिल्लीस करूं लागले.

इकडे कर्नाटकांत सरकारची मोहीम टिपूवर झाली होती त्या मोहिमेस मुख्यत्वें हरिपंत तात्या गेले होते. समागमें परशुराम भाऊ पटवर्धन होते. त्या मसलतीस अठरा महिने झाले. यासाठीं पुणें मुक्कामाहून हिंदुस्थानांत महादजी शिंदे यांस सरकारचीं पत्रें बलावण्याचीं गेलीं. यामुळें शिंदे यांची तयारी देशीं येण्याची झाली. तेथील बंदोबस्त दिल्लीसुद्धां करून, जिवबादादा बक्षी यांस तेथें मुकत्यारीनें ठेवून खासा पाटीलबोवा समागमें कंपू व फौज व पोक्त लाख सरंजाम घेऊन, देशीं येण्यास निघाले. ती बातमी हरिपंत तात्यांस कर्नाटकांत कळली. तेव्हां तात्यानीं विचार केला कीं, " शिंदे देशीं येऊन इकडे त्यांची रवानगी झाली असतां आमचे हातचें यश जातें." हा विचार मनांत आणून टिपूसुलतानाशीं समेटाचें बोलणें घातलें. इंग्रजही लढाईस जेर झाला होता. त्यामुळें त्याणें समेटास रुकार दिला. नबाबही सल्ला करण्यास राजी झाले. टिपूसुलतान याचेही चित्तांत ही गोष्ट बरी आहे असें वाटून, तात्या बोलणीं बोलत होते त्यांस रुकार टिपूनें दिला. तेव्हां हरिपंत तात्यांचे विद्यमानें तिन्ही राजांचा तह झाला. तिघांस तीन कोट रुपये खंडणी यावयाची ठरली. खेरीज हरिपंत तात्या यांणीं तुंगभद्रापार मुलूख वीस लक्षांचा घ्यावयाचा ठरला. खेरीज सतरा तोफा टिपूनें पेशव्यांस दिल्या. असा तह होऊन तिन्ही फौजा तेथून निघाल्या. सरकारची फौज तात्यांसुद्धां, शिंदे पुण्यास येऊन पोंचले नाहींत तों पुण्यास येऊन दाखल झाली. सर्वांच्या भेटी झाल्या. श्रीमंतांचीही भेट झाली. सर्व मजकूर श्रीमंतांस विदित झाला. पाठीमागून खंडणीचे टिपूकडील एक कोट रुपये येऊन पोहोंचले. जिकडे तिकडे फौजेचे हिशेब लागले. नालबंदी वाटली. याप्रमाणें कर्नाटकचे स्वारीचा विचार झाला.

---

८०. 'बकिली मुतालक' अशी पदवी पेशव्यांस दिली. ही मागें निजामउल्मुल्क यास दिली होती. बकिली मुतालक्=मुख्य प्रतिनिधी. ८१. पेशव्यांचे हिश्शास ४० लक्षांचा मुलूख बेलारी पावेतों व एक कोट रुपये असे आले. १७ तोफा लॉर्ड कॉर्नवालीस याने साहेबानें पेशव्यास नजर केल्या. ग्रांट डफ. ८२. नालबंदी=रोजमुऱ्यांतून दर महिन्यास कांहीं बाकी राखून साल-अखेरीस देतात ती रकम.

फौज कर्नाटकांत बहूत खराब झाली. सरकारांत धान्याची महर्गता बहूत झाली. त्यामुळें खर्च फार झाला. उंटें, हत्ती, घोडे व शिपाई लोक महागाईच्या सपाट्यानें बहूत खराबी झाले. परंतु श्रीमंतांचा पुण्यप्रताप विशेष, दैव शिकंदर, म्हणून टिपूची मसलत पार करून, यश संपादून, सरकारचा मतलब साधून, तात्या पुण्यास येऊन दाखल झाले. एरवीं टिपू म्हणजे हारीस येऊन खंडणी देता अशी गोष्ट नव्हती. परंतु श्रीमंतांची पुण्याई सबळ म्हणूनच ही गोष्ट घडली. लढाईची मर्यादा टिपूसुलतान यानें ठेविली नाहीं. लढाईचा पुरावा मोठा केला. इंग्रजांवर मार लढाईचा सारा पडला. पेशव्यांच्या व नबाब यांच्या फौजा इंग्रजांचे मागें होत्या. त्यामुळें त्यांचे फौजांवर लढाईचा मार पडला नाहीं. सारें लढाईचें तोंड इंग्रजांवर होतें. आणखी चोहोंकडून रस्त बंद केलेली, खावयास दाणा मिळेना, त्या वेळेस इंग्रजांचें लष्करांत खावयाची मोठी अडचण पडली. त्यासमयीं सोजीर लोकांनीं ढोरें कापून खाल्लीं. अशा समयीं परशुराम भाऊ पटवर्धन यांनीं इंग्रजांवर उपकार केले. चोहींकडून इंग्रजांचे लष्करांत धान्याची पोंचती केली. मग खाण्यापिण्याची उठवण इंग्रजांचे लष्करची मोडली. इंग्रजांचें खासे लाट साहेब व मेडुस साहेब होते. त्यांणीं लढाईची मोठी सरशी केली. तत्रापी टिपूसुलतान मोठा जोरावर. टिपूनें असें जाणिलें कीं, पेशव्यांची फौज इंग्रजांस रस्त पोंचविते हें जाणोन, तात्यांशीं टिपूनें सल्ल्याचीं बोलणीं लावून तह केला. एरवीं तह म्हणजे होता अशी गोष्ट न घडती. असा मजकूर कर्नाटकचे स्वारीचा झाला.

पुढें पुण्यांत असें वर्तमान झालें कीं, श्रीमंतांनीं जातीनिशीं एक गोष्ट मोठे नेटाची केली. त्यासमयीं ती न करण्याविषयीं नानासुद्धां कोणाची आज्ञा

---

८३. शिकंदर=प्रबल, अत्यनुकूल (आलेक्झांदर=आस्कंदर=शिकंदर.) ८४. क० प्रतींत 'रस्ता बंद केलेला' असा पाठ आहे. त्यापेक्षां वरील इंदूर व शिवपुरी प्रतींचा पाठ चांगला आहे. रस्त=रसद=धान्य वगैरेचा पुरवठा. ८५. "पोरें व ढोरें" असा कल्याण प्रतीचा पाठ आहे. ८६. परशुराम भाऊ या वेळीं इंग्रजांपासून फार लांब होते. मदत हरिपंतांकडून मिळाली. ह्या सर्व हकीगतीबद्दल बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर लिहितात, "दाणा व सामान ह्यांचा फार तोटा पडला ओझ्याचीं जनावरें हैराण होऊन त्यांचीं केवळ हाडें राहिलीं...ह्या कारणावरून लॉर्ड साहेबांस श्रीरंगपट्टणाहून परत जावें लागलें. पुढें वाटेनें...हरिपंत येऊन दाणा वैरणीचा व जनावरांचा पुरावा झाला." ८७. मेडुस=मेडोज (मद्रासचे गव्हरनर.)

चालली नाहीं. शहरची कोतवाली घाशीराम करीत असतां कोतवालीची जरब मोठी होती. अशी कोतवाली मागें कोणी केली नाहीं व पुढेंही करणार नाहीं. त्यांत घाशीराम याजवर नानांची कृपा मोठी. त्यामुळें कोणास तो मोजीत नव्हता. म्हणून त्याजपासून मोठें अनुचित कर्म घडलें. श्रावणमासीं तेलंग देशांतले ब्राह्मण दक्षिणा घेऊन भाद्रपदमासीं आपल्या देशांत जावयास निघाले. ते ब्राह्मण पुण्याहून सांयकाळाचे समयास निघाले. ते घाशीराम कोतवाल याचे बागेंत* जाऊन उतरले. ही बातमी कळतांच घाशीराम याणें शिपाई पाठवून, सारे ब्राह्मण पंचवीस तीस होते ते लुटून घेऊन, त्या बागेंत लहानशी कोठडी होती तींत नेऊन कोंडिले; आणि बाहेरून कवाड लावून कुलूप घातलें. तेव्हां जागा लाहान, आंत वारा नाहीं, असे दीड दिवस तेथें होते. त्यामुळें सारे ब्राह्मण मृत्यू पावले. त्या कोठडींत लहानसें गवाक्ष होतें. त्या गवाक्षाशीं तोंड लावून जे उभे होते त्यांचा प्राण वांचला. अगोदर गर्मी, आंत वारा नाहीं, व दोन दिवस अन्न नाहीं, त्यामुळें त्या दोघां ब्राह्मणांचा प्राण व्याकूळ होऊन जीव मात्र राहिला होता.

पुढें तिसरे दिवशीं मानाजी फांकडे कोठें बाहेर गेले होते, ते त्या वाटेनें आले. त्या समयीं हे दोन ब्राह्मण उभे होते. त्यांणीं पाहून मानाजी फांकडे यांस हांक मारिली. तें ऐकून फांकडे यांणीं घोडा दटावून, त्या गवाक्षापाशीं येऊन उभे राहिले. त्या समयास त्या ब्राह्मणांनीं सारा मजकूर सांगितला. त्याजवरून मानाजी शिंदे यांणीं शिपायास सांगितलें कीं, " कवाडाचें कुलूप तोड. " मग कुलूप तोडून, कवाड उघडून सारीं प्रेतें बाहेर काढिलीं. त्यांत दोन ब्राह्मण जिवंत होते. त्यांस साखर पाणी वगैरे देऊन सावध केलें. मग त्यांणीं सारा मजकूर मानाजी फांकडे यांस सांगितला. त्यासमयीं दोन ब्राह्मण

---

८८. घाशीराम कोतवालावर एका रावबहादुरांनीं एक पुस्तक रचिलें आहे, त्यांत त्याजविषयीं कांहीं माहिती दिली आहे, परंतु तो जितका लोभी व क्रूरकर्मी होता तितकाच, किंबहुना जास्ती, मूर्ख होता असें दाखविण्याचा प्रयत्न ग्रंथकारांनीं केल्यामुळें वगैरे त्यांत पोरकट व अविश्वसनीय गोष्टी पुष्कळ आल्या आहेत. असो, हा क्रूरकर्मी पुरूष अशा मोठ्या कामावर खुद्द पुण्यांत इतके दिवस राहिला ही गोष्ट नानांच्या कारभारास मोठें लांछन होय! *हें स्थळ लष्करांत घाशीरामाचे तळ्यानजीकच असावें. ८९. ह्या कोटडीचें व कलकत्त्यांतील प्रसिद्ध 'अंधार कोटडी ' ( ब्लॅक होल ) चें साम्य वाचकांच्या लक्षांत येईलच.

जिवंत होते त्यांजपाशीं चार शिपाई रखवालीस ठेवून मानाजी फांकडे तसेच शहरांत येऊन, वाटेनें सर्व ब्राह्मणांस हांका मारून, त्यांनीं वर्तमान सर्वांस जाहीर केलें. आणि सर्वांस सांगितलें कीं, " ब्राह्मण असेल त्यानें वाड्यापाशीं यावें." असें सांगत मानाजी फांकडे श्रीमंतांकडे जाऊन पाहतात तों श्रीमंत निजले आहेत. इतके कर्मास तीन प्रहर लोटले. सायंकाळचा समय. लोक दरबारांत यावयाची वेळ. इतक्या संधींत वाड्याभोंवते पांच सात हजार ब्राह्मण जमले. तेव्हां जो कोणी पालखींत बसून येईल त्यास पाहून, ब्राह्मण आहे असें ओळखून, आपले जमातींत बसवावें, अशा पालख्या आल्या तितक्या तेथें बसविल्या.

मग श्रीमंत निजून उठल्यानंतर श्रीमंतांची गांठ मानाजी फांकडे यांशीं पडली. तेव्हां सारा मजकूर इत्थंभूत श्रीमंतांचे कानावर घातला. इतका कारभार झाला तरी घाशीराम कोतवाल यास कोणतीही खबर नाहीं. आपण चावडीवर कारभार करीत आहे. असें होत असतां सायंकाळ झाला. तेव्हां चोपदार वाड्यांतून येऊन, नानांचे वाड्यांत जाऊन, [ त्यानें ] नानांस सांगितलें कीं, " घाशीराम कोतवाल यास श्रीमंतांनीं बलाविलें आहे." असें ऐकतांच नानांनीं शिपाई पाठवून, घाशीराम यास आपले वाड्यांत बलावून आणून त्यास मजकूर सारा विचारला. तेव्हां घाशीराम याणें नानांपाशीं उत्तर केलें कीं, " ते भामटे कोमटी असे होते. शहरांतून चोऱ्या करून निघाले ती बातमी ठेवून त्यांस धरून कोठडींत कोंडिलें." असें बोलणें होत आहे तों रात्र दोन घटका झाली. त्यावेळेस दुसरा चोपदार वाड्यांतून आला. तरी घाशीराम वाड्यांत गेला नाहीं. मग चार ढालाईत येऊन त्यांणीं नानांस सांगितलें कीं, " सरकारची मर्जी फार जात राहिली आहे. तर घाशीराम यास लवकर आम्हांबरोबर पाठवावें." ढालाईत पाहून नानांनीं घाशीराम यास सांगितलें कीं, " तुझें कपाळ फुटलें. आतां आमचा उपाय नाहीं."

मग ते ढालाईत घाशीराम यास घेऊन वाड्यांत आले. मग समक्ष मजकूर सारा घाशीराम यास विचारला. तेथेंही त्याचें बोलणें तसेंच पडलें. तेथपर्यंत कोतवाल यास भरंवसा होता कीं, नाना मला वांचवितील. तें बोलणें श्रीमंतांनीं ऐकल्यावर ढालाइतांस हुकूम झाला कीं, " पागोटें फाडून, मुसक्या बांधून, छड्या माराव्या." असा हुकूम झाला.

त्या समयीं ढालाईत यांणीं पागोटें फाडून, मुसक्या बांधून छड्या मारावयास आरंभ केला. छड्या मारल्यानंतर पायांत बिडी ठोकून तोफखान्यांत पानशे यांजकडे पाठवून दिला. आणि ब्राह्मण जमा झाले त्यांजकडेस श्रीमंतांनीं बाळाजीपंत केळकर यांचे हातीं सांगून पाठविलें कीं, "आतां रात्र झाली आहे. आतां तुम्हीं सर्वांनी असेंच असावें. प्रातःकाळीं घाशीराम याची शहरांत धिंड फिरवून तुमचे स्वाधीन करूं. मग त्याला तुम्ही मारा किंवा ठेवा." असा निरोप बाळाजीपंत यांणीं सांगतांच समस्त ब्राह्मण यांणीं मजकूर ऐकून आवध्यांनीं "बरें आहे" म्हणून सांगितलें.

मग प्रातःकाळ झाल्यानंतर शहरांत दवंडी पिटली कीं, "आज घाशीराम याचें पारिपत्य होत आहे. त्याचें पारिपत्य झाल्याशिवाय कोणी शहरांत जेवूं नये." अशी ताकीद होतांच शहरांत कोणी जेवला खाल्ला नाहीं. चार घटका दिवसास घाशीराम यास वाड्यांत आणिलें. वाड्यांत आणून फिरून श्रीमंत यांणीं समक्ष विचारलें, "ते भामटे किंवा कोमटी होते [कीं काय] तें सांग." तेव्हां घाशीराम यांणें उत्तर केलें नाहीं. मग वाड्यांतून बाहेर काढून चावडीपाशीं झेंड्याखालीं आणून, मुसक्या बांधून, उंटावर उलटा**कडे तोंड करून बांधिला; आणि डोकीचे पांच पाट काढून, तेल शेंदूर वरतीं घालून दवंडी पुढें देऊन, सोळा पेंठा शहरच्या फिरून शेवटीं चावडीपाशीं आणिला.

मग श्रीमंतांची आज्ञा झाली, कीं "तसाच उंटासुद्धां घाशीराम यास गुल-टेंकडीकडे न्यावें. आणि तेथें ब्राह्मण जमा होतील त्यांचे स्वाधीन करावें." इकडे ब्राह्मणांस आज्ञा झाली कीं "साऱ्यांनीं तुम्हीं आतां गुलटेकडीपाशीं जावें. तेथें तुमचे स्वाधीन घाशीराम यास करतील." त्या समयीं दहा पंधरा हजार ब्राह्मण गुलटेकडीकडे गेले. इतक्या कर्मास सायंकाळ झाला. तेव्हां घाशीराम यास गुलटेकडीस नेऊन, उंटावरून सोडून ब्राह्मणांचे स्वाधीन केला. तेव्हां त्या ब्राह्मणांनीं घाशीराम यास दगडांखालीं मारून ठार केला आणि त्याचा मुरदा उलटा झाडास टांगून ठेविला. असें पारिपत्य घाशीराम याचें झालें.

९०. या सर्व हकीगतीवरून पुण्याच्या लोकांस, व विशेषतः ब्राह्मणांस, कोतवालानें किती त्रासिलें होतें व त्यांचा त्यावर दांत कसा होता हें दिसून येईल. नानांचें पाठबळ कोतवालास असल्यामुळें लोकांचें कांहीं चालेना. परंतु त्यांना आश्रय मिळाल्याबरोबर त्यांणीं त्याचा सूड घेतला. ही हकिकत इंग्रजी ग्रंथांत कोठें आढळत नाहीं.

इकडे महादजी शिंदे यांस पेशजी बलवण्याचीं पत्रें सरकारचीं गेलीं त्यांवरून शिंदे बादशाही वजिरातीचा मरातब घेऊन देशीं यावयास निघाले. हिंदुस्थानांतून अंतर्वेदीसुद्धां दिल्लीचे कारभाराचा बंदोबस्त करून, जिवबा दादा बक्षी यांचे स्वाधीन पाठीमागें सर्व कारभार करून, पाटिलबोवा देशीं यावयास निघाले. ते कूच दरकूच हिंदुस्थानांतून उज्जनीवर येऊन, मुक्काम करून, तेथून कूच करून, ब्न्हाणपुरास येऊन दाखल झाले. ब्न्हाणपुरास आठ पंधरा दिवस मुक्काम करून, खानदेशांत कांसारबारीचा घांट चढून गंगा उतरून, जांबगांवास येऊन दाखल झाले. जांबगांवास मुक्काम आठ पंधरा दिवस करून तेथून कूच करून निघाले. ते पुण्यास येऊन दाखल झाले. त्या वेळेस श्रीमंत सामोरे जाऊन नाना फडणीस व हरिपंत तात्या वगैरे सर्व मंडळी समागमें जाऊन, सर्वांच्या भेटी झाल्या. भेटी होऊन सरकारची स्वारी माघारी फिरावयाच्या वेळीं, शिंदे आपल्या मुक्कामावर जावयाचे, त्या वेळीं महादजी शिंदे यांणीं सर्व बोलणीं श्रीमंतांस समजाविलीं. नंतर श्रीमंतांस विनंती केली कीं, " मी हिंदुस्थानांतून पुण्यास आलों. माझे समागमें लाख फौज आहे, इला सरकारचें दर्शन कधीं व्हावें ? व फौजेचा सलाम सरकारास कोणते वेळीं व्हावा ? यासाठीं सरकारांनीं आतां अंबारींत स्वार होऊन उभें असावें, म्हणजे सर्वांचा मुजरा सरकारास होईल व सरकारची नजर सर्व फौजेवर होईल." असें पाटीलबोवांचें बोलणें ऐकून श्रीमंत हसून, " बरें आहे " म्हणून बोलले.

त्या समयीं सरकारची स्वारी हत्तीवर बसावयाची म्हणून विनायकगज हत्ती आणून रुप्याचे अंबारींत खासा स्वारी बसली. पुढें बाबा माहात हातीं अंकुश धरून बसला. तो हत्ती बिनझोल चालत असतां माणसाला वर डोलावें लागत नसे. यासाठीं खासा स्वारीस तो हत्ती नेमिला होता. जरी-बादली[९१] मस्तकीं सारी, पाठीवर मखमाली गाशा, सभोंवतीं झालर कलाबतूची, गाशावर वेलबुट्टी कलाबतूची काढलेली, गळ्यांत घांगुरमाळा रुप्याच्या व घंटा रुप्याच्या व दांत सोन्याचे मढविलेले, मस्तकीं सडकों[९२] व सोन्याचीं पिंपळपानें, पायांत रुप्याचे तोडे, सोंड रंगविलेली; अशा हत्तीवर सरकारची स्वारी बसली. खवासखान्यांत आपा बळवंत व अमृतराव पेंठे हातीं चवरी घेऊन श्रीमंतांवर

---

९१. जरी-बादली = सुवर्ण-तंतुमय वस्त्र. ९२. सडका = सखलाद वगैरेच्या पट्ट्या, गोंडे.

उडवितात व हातीं रुमाल घेऊन आपा बळवंत वारीत बसले आहेत. सरकारची स्वारी हत्तीवर बसून उभी राहिली त्या समयीं सरकारचे मुत्सद्दी व कारभारी आपले वाहनारूढ होऊन उभे राहिले. जरीपटक्याचे हत्ती, खेरीज जिलबेचा हत्ती असे चौघे सजविलेले; शिवाय कोतवाल घोडे चारशें, सोन्याचे गंडे पट्टे घातलेले, गळ्यांत मोहनमाळा, पायीं पैंजण, पाठीवर भरगच्ची झुला, त्याजवर कलग्या, असा कोतवाल घोड्यांचा समाज उभा; त्यांच्या पाठीमागें हत्ती उभे; जेथें श्रीमंतांचा हत्ती उभा, त्या पुढें खास जिलबेचे लोक बोथाटी-बारदार, विटेबारदार, व खासबदार, व बाणदार व लगी, अशी खासी जिलीब उभी; व जरीपटक्याचा हत्ती उभा, तेथें सरकारची हुजरात, पागे, मानकरी, व शिलेदार उभे; श्रीमंतांच्या मागें झाडून सरंजामी उभे. पटवर्धन, विंचुरकर, दरेकर, पाटणकर, घोरपडे, निंबाळकर, जाधव व पुरंदरे, अक्कलकोटवाले, असा समुदाय सरकारचे स्वारीचा उभा राहिला आहे. चौघडे वाजतात. साहेब नौबतीचे बाजे होतात. खेरीज घोड्यावरील नगारे व उंटावरील नौबती वाजतात. असा सरकारचे स्वारीचा थाट उभा राहिला आहे व चोपदार, भालदार, छडीदार, व नकीब[९३] असे ललकारत आहेत.

त्या समयीं महादजी शिंदे यांणीं आपली फौज दुरस्त फऱ्या[९४]नें उभी सरकारचे मुजऱ्यासाठीं केली. एक तर्फेनें घोडदळ उभें राहिलें. त्यांत पागे व शिलेदार व पठाण हुजरात शिंदे यांची उभी राहिली. दुसऱ्या तर्फेनें चार कंपू उभे केले. त्यामध्यें तोफा उभ्या राहिल्या. बैल तोफेस जुंपलेले. असा सरंजाम सरकारचे सलामासाठीं उभा केला. त्या वेळेस शिंदे यांचे दौलतीची वर्णना काय करावी! कीं रावणासारखी ज्यास दौलत अशी उपमा!! घोडेस्वार घोड्यांवर स्वार झालेले. त्यांचे डोकीस मंदील, आंगांत झगा, आंगावर शालजोड्या, हातांत शालनाम्याचा रुमाल, पायांत किनखापी विजारा, असे साज बंदुका बांधून मुजऱ्यासाठीं उभे राहिले. हातांत सोन्याचीं कडीं, गळ्यांत कंठी, कानांत चौकडे, असे स्वार, भालेकरी व आड-हत्यारी व कैरोल[९५], उभे राहिले. तसेच हत्ती उभे. वरतीं अंबाऱ्या ठेविलेल्या. याप्रमाणें कोतवाल घोड्यांचा सरकारचे मुजऱ्यासाठीं फरा उभा

---

९३. नकीब=चोपदार, भाट. ९४. फरा=ओळ, रांग. ९५. करोल= घोड्यावरचे बंदूकवाले.

राहिला आहे. दुसरे* तर्फेनें कंपू साहा दोन कोसपर्यंत तोफा सुद्धां उभे केले आहेत. तेव्हां सरकारची स्वारी मुजरा घेत चालली. दुतर्फा मुजरे होऊं लागले. भालदार नांवें घेऊन बोलतात. याप्रमाणें दोन कोसपर्यंत स्वारी सरकारची मुजरे घेत आली. शेवट झाला तेथें स्वारी उभी राहिली. आणि तोफा सोडावयाची कवाईत करण्याची आज्ञा सरकारची झाली. त्या वेळेस कंपूची कवाईत व तोफेचे आवाज एकदम होऊं लागले. तेव्हां तोफांच्या धुराची दाटी झाली. माणसाला माणूस दिसेनासें झालें. बाराशें तोफेचा आवाज सुटला. त्यासमयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन स्वारी वाड्यांत जावयास फिरली. शिंदे आपली फौज घेऊन आपले तळावर जावयास निघाले. याप्रमाणें होऊन शिंदे वानवडीचे तळावर जाऊन उतरले. महादजी शिंदे मोठे जोरावर, दौलत मोठी व म्हणून त्यांस अभिमानही मोठा. त्यामुळें सरकारचे दौलतीचा व राज्याचा कारभार आपण करावा असा मजकूर मनांत आणून पाटीलबोवा यांणीं सरकारांत बोलणें लाविलें होतें. इतक्यांत दिल्लीहून वजिरातीचे मरातब बादशाही आणिले होते ते सरकारांत दाखल करावे, असा मनसोबा मनांत आणून सरकारांत विनंती करावयास महादजी शिंदे वाड्यांत आले. श्रीमंतांस विनंती केली कीं, "सरकारच्या नांवें दिल्लीचे बादशाहा यांणीं वजिरातीचीं वस्त्रें वगैरे दिलीं आहेत तीं सरकारांत प्रविष्ट व्हावयाची आज्ञा काय ती सांगावी." तेव्हां श्रीमंत बोलले, "सर्व कारभारी जमा करून सुमुहूर्त पाहून निश्चय ठरवावा." असें श्रीमंतांचें बोलणें होतांच दुसरे दिवशीं दरबार करावयाचा बेत ठरवून शिंदे आपले डेऱ्यास येऊन दाखल झाले.

मागती दुसरे दिवशीं दरबारचीं बलावणीं सर्वांस झालीं. लहान थोर मुत्सद्दी व कारभारी व मानकरी व पागे व पथके व तमाम सरदार दरबारास आले. शिंदे वानवडीहून वाड्यांत आले. सकळ दरबार झाला आहे. त्या समयीं महादजी शिंदे यांणीं सर्वांस सांगितलें कीं, "दिल्लीचे बादशाहा यांणीं सरकारच्या नांवें वजिरातीचीं वस्त्रें वगैरे दिलीं तीं सरकारांत प्रविष्ट करावयाचीं; त्याचा विचार सर्वांनीं करून सुमुहूर्त पाहून निश्चय ठरवावा.

* "दुसरे तर्फेनें कंपूवाले एकसाहा दोन कोसांपर्यंत तोफा सुद्धां उभ्या केल्या आहेत" इंदूर प्रतीचा पाठ.

म्हणजे त्याप्रमाणें समारंभ करावयाचा बेत ठरवूं." असें सर्वांनीं ऐकतांच नाना, तात्या व वरकड कारभारी यांणीं रुकार दिला. "चांगलें आहे." त्या समयीं जोशी बलावून, दिनशुद्धी चांगली पाहून, श्रीमंतांचे राशीस चंद्रबळ उत्तम व आणखी दोन चार ग्रह अति सुंदर, श्रीमंतांस मोठे अनुकूल, असा दिवस पाहून, त्या दिवशीं मरातब घेण्याचा निश्चय ठरवून पाटीलबोवा यांस सर्वांनीं रुकार दिला.

मग त्या दिवशीं महादजी शिंदे यांणीं आपले लष्करांत श्रीमंत बसावयाची जागा करून, मखमाली डेरे देऊन, मखमाली बिछाईत घालून, कळावंतिणींचे नाच उभे करून, शिंदे श्रीमंतांस न्यावयास पुण्यास येऊन त्यांनीं विनंती केली. तेव्हां स्वारी सरकारची तयार होऊन निघाली.

बरोबर तमाम मानकरी, शिलेदार, सर्व पथके, व हुजुरात सुद्धां जरीपटका घेऊन सर्व मुत्सद्दी, तात्या, नाना, आपा बळवंत, अमृतराव पेंठे, रामचंद्र गणेश, विसाजीपंत बिनीवाले, बाजीपंत अण्णा, नारोपंत चक्रदेव, महादजीपंत गुरुजी; ब्राह्मण सरदार—पटवर्धन, विंचुरकर, गणेशपंत बेहरे, बाहिरो अनंत, राजे बहादर; मराठे सरदार—अक्कलकोटवाले भोसले, घोरपडे, निंबाळकर, जाधव, भोइटे; असा सारा फौजेचा जमाव करून, श्रीमंतांची स्वारी पुण्याहून निघाली.

त्या वेळीं खांसा स्वारी अयन्याच्या अंबारींत बसून चालले. खवासखान्यांत आपा बळवंत व पेंठे बसले. श्रीमंतांच्या मार्गें नाना फडणिसही अंबारींत बसून चालिले. तसेच तात्या व महादजी शिंदे अंबारींत बसून [चालले, व] त्यांच्यामागून झाडून सरदार निघाले. खांशी स्वारी सरकारची चालत असतां खासगी जिलीब पुढें चालली. असे शिंदे यांजकडील जिलबी पुढें वल्लभ[९६] वगैरे चालतात. त्या पुढें भालदार, चोपदार, सरकाचे मिरधे, पुढें हाका मारून सांगतात. त्यांच्या पुढें कोतवाल-घोडे. अशा थाटानें स्वारी वानवडीस जाण्यासाठीं निघाली.

ती स्वारी शनवारांतून वाडा डावा घालून, आदितवारांतून, नाकझरी उतरून तहत वानवडी पावेतों आघाडी स्वारीची व रास्ते यांचे पेंठेपावेतों

९६. वल्लभ=एक प्रकारचा भाला किंवा बर्ची; तो भाला धरणारे.

एक सारिखा स्वारीचा थाट चालिला. अशी स्वारी जात असतां लष्करांत दाखल झाली.

जेथें बसावयाची जागा केली होती, तेथें जाऊन श्रीमंत बसले व सर्व मंडळी मानकरी, मुख्य कारभारी, लहान थोर सरदार, आपआपल्या ईरीाद्याप्रमाणें कचेरीच्या डेऱ्यांत जाऊन बसले. नाच होत आहे. असा दोन तीन घटका नाच झाला. नंतर महादजी शिंदे यांणीं दिल्लीहून बादशाही वजिरातीचे मरातब आणिले होते, तीं भूषणें सारीं कचेरीस आणविलीं. नंतर श्रीमंतांपुढें पाटीलबोवा येऊन हात जोडून विनंती केली, "बादशाही मरातब सरकारांत बादशाहा यांणीं पाठविले, ते आतां खाशांनीं घ्यावे." असे बोलून वस्त्रें श्रीमंतांपुढें ठेविलीं. नंतर मंदील पठाणी तऱ्हेचा बांधिलेला होता तो डोकीस घातला. तसाच आंगांत जामानिमा तमामी, पायांत विजार घालून, कंबरेस पटका बांधून श्रीमंत खालीं बसले. मग मस्तकीं शिरपेंच व तुरा व कलगी मंदिलावर बांधिली. हातांत मनगटीं, पोंच्या, भुजबंद, गळ्यांत मोत्यांचे व नवरत्नांचे हार घातले. कानांत चौकडा घातला. पायांत घालण्याकरितां बादशाही जोडा आणिला होता तो पाटीलबोवा यांणीं पुढें ठेविला. आणखी, मोरचल शिंदे यांणीं हातांत घेऊन, श्रीमंतांवर वारून, पाठीमागें खिजमतगार उभे होते त्यांच्या हातीं दिलें. मग नालकी व कांहीं मरातब आणून पुढें ठेविले. नंतर "दिल्लीस वजिरातीचा कारभार करावयाचा तो श्रीमंतांचे तर्फेनें महादजी शिंदे यांणीं करावा," अशी विनंती शिंदे यांणीं केली असतां सर्वांच्या मनास येऊन, "उत्तम आहे," असे सर्वांचे रुकार आले. नंतर हरिपंत तात्या यांणीं विनंती केली कीं, "पाटीलबोवा यांस वजिरातीच्या गुमास्तीगरीचीं वस्त्रें, नालकी वगैरे द्यावयाची ती सरकारची स्वारी वाड्यांत दाखल झाल्यानंतर तेथें द्यावी," ती गोष्ट सर्वांचे मनास आली. तेव्हां शिंदे यांणीं सर्वांस पोषाख दिले. शिंदे यांची अंबारी एक-खांबाची होती ती त्यांणीं सरकारांत नजर केली. मग पानसुपारी, अत्तर गुलाब, हारगजरे वांटिले.

मग सरकारची स्वारी पुण्यास निघाली तेव्हां मशाली लावून, हत्तीवर हवया लावून, श्रीमंत नालकींत बसून निघाले. त्यासमयीं सरकारचे राजमंडळचें

---

९७ या समारंभाकरितां शिंद्यांनीं संगमावर तयारी केली होती. ग्रांट डफ. लष्करांत =शिंद्यांच्या तळावर. ९८. इरादा=इलाखा ,हक, योग्यता.

मानकरी व सरदार होते ते नालकी बरोबर चालले नाहींत.[९९] अघाडी पिछाडीस चालले व सरकारचाकर होते ते मात्र नालकी समागमें चालिले. महादजी शिंदे व हरिपंत तात्या फडके हे नालकी धरून दोहींकडे चालिले. बादशाही पोषाग अंगावर होता त्यासुद्धां सरकारची स्वारी नालकींत बसली, एकीकडे मोर्चेल एकीकडे चवरी, पुढें जिलीब बादशाही मरातब चालले. अशी स्वारी शहरांत येई तों चार घटका रात्र झाली. तेव्हां मशाली हवाया लावून त्या उजेडांत बादशाही डौलानें चालले. असे येऊन वाड्यांत दाखल झाले. नंतर बादशाही पोशाक अंगावर होता तो काढून नवा पोशाक घेतल्यानंतर स्वारी सरकारची जाऊन गादीवर बसली. तेव्हां सारे मानकरी व सरदार व पागे व सरकारचे कारभारी व मुत्सद्दी शिलेदार असे सर्वांचे मुजरे व नजरनजराणे झाले. नंतर महादजी शिंदे यांस वजिरातीच्या गुमास्तगिरीचीं वस्त्रें द्यावयाचीं तीं तेथें वाड्यांत समक्ष दिलीं. आणखी मरातब बादशाही द्यावयाचे ते दिले. सर्वांस पान-सुपारी, अत्तर-गुलाब, देऊन सर्वांस निरोप दिला. महादजी शिंदे यांस निरोप झाला. सर्व लोक आपआपले ठिकाणीं गेले, व महादजी शिंदेही आज्ञा घेऊन आपले लष्करांत गेले. याप्रमाणें बादशाही वजिरातीचा समारंभ झाला.

पुढें महादजी शिंदे यांणीं सरकारांत बोलणें लाविलें कीं, "दौलतीचा कारभार व सरकारची दिवाणगिरी मीं करावी असा हेतू ठेऊन हिंदुस्थानांतून दक्षणेस सरकारचे दर्शनास आलों. तेव्हां माझा मनोदय सरकारांनीं शेवटास न्यावा." अशी विनंती शिंदे यांणीं सरकारास केली. परंतु सरकारचें उत्तर त्या दिवशीं कांहीं झालें नाहीं. इतक्यावर ती गोष्ट तशीच राहिली. फिरून नाना व तात्या यांस पाटिलबोवा बोलले कीं, "मीं सारें हिंदुस्थान सर करून गिलचाचें पारिपत्य करून, बादशाही वजिरात श्रीमंतांचे घरीं आणिली, अटकेपर्यंत लौकिक श्रीमंतांचा राखिला. इतक्याही गोष्टी श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून झाल्या. आतां माझ्या मनांत सरकारचे गादीची चाकरी हुजूर श्रीमंतांचे करावी [ असें आहे. ] आतां इतके दिवस

९९. साताऱ्च्या महाराजांच्या तर्फेनें आलेले सरदार वगैरे शिंद्यांनीं या समारंभाकरितां उभ्या केलेल्या बादशाही तंबूंत पेशव्यांबरोबर गेले नाहींत व त्यांनीं त्यांस नजरही केली नाहीं. ग्रांट डफ.खुद्द नानाही बादशाही मरातब स्वीकारण्याच्या विरुद्धच होते.

मुलूखगिरी करून सरकारचा लौकिक संपादिला. व शत्रू सारे पराभविले, याकरितां माझे दौलतीचा हिशेब आपण घ्यावा व सरकारचे दौलतीचा हिशेब मला द्यावा." अशी गोष्ट पाटीलबोवा यांची ऐकून नाना व तात्या यांस मोठा विषाद वाटला. त्या बैठकीस कांहीं उभयतांनीं उत्तर सांगितलें नाहीं. "याचा विचार करून बोलूं" इतक्यावरच ती बैठक झाली.

पुढें दिवसेंदिवस बोलणें वाढत चाललें. त्या समयीं नानांनीं विचार केला, "आतां गोष्ट बरी नाहीं. आपण कारभार सोडून काशीस जावें. दुसरा उपाय नाहीं. सरदार जोरावर, तेव्हां याशीं बिघडलें तर राज्याचा नाश होतो. चांगलें नव्हे. आपणच सर्व गोष्टीस तऱ्हा द्यावी ही गोष्ट चांगली." अशी मसलत करून नानांनीं आपले ठिकाणीं महायात्रेस जाण्याची तयारी केली व हरिपंत तात्यांचाही मनसोबा तसाच ठरला. इतक्या गोष्टी झाल्या परंतु कच्चा मजकूर श्रीमंतांस विदित नाहीं. हीं बोलणीं मध्येंच होतात. असा दोन चार महिने घाट घातला. महादजी शिंदे श्रीमंतांस विनंती करावयास बहूत दिवस जपत होते. परंतु सवड सांपडली नाहीं. सभोंवतीं नानांची बातमी. आठही प्रहर श्रीमंतांभोंवतीं कारकून आहेत. तेव्हां बोलायास सवड नाहीं. पुष्कळ प्रयत्न केला. परंतु बोलावयाचा इलाज न चालला.

तेव्हां कोणे एके समयीं स्वारी पर्वतीस दर्शनास गेली. त्या दिवशीं महादजी शिंदे स्वारीसमागमें होते. त्या वेळेस देवदर्शन करून सरकाची स्वारी खालीं आली. तेव्हां हिराबागेपाशीं स्वारी उभी राहून, श्रीमंत पर्वतीचे तळ्यांत नाव खेळावी म्हणून हत्तीखालीं उतरून नावेंत बसावयास चालिले. त्या समयीं महादजी शिंदे यांचा हात धरून उभयतां नाव खेळावयास लागले. कोणी एक

१०० तऱ्हा देणें = विलक्षण, चमत्कारिक, कृत्य करणें; वळण. १. शिंद्यांचें प्राबल्य व माधवरावांचें मन आपणाकडे वळविण्याचे प्रयत्न पाहून नानांनीं माधवरावांची एकांतीं गांठ घेतली. तेव्हां नाना म्हणाले "ब्राह्मणांचें वजन राज्यांतून नाहींसें करून आपण सर्व राज्यावर अंमल करावा वगैरे शिंद्यांचे मतलब आहेत, आणि त्यांत आपण जर त्यांस पाठबळ दिलें तर ब्राह्मणी राज्य बुडण्यास फार विलंब नको. मला जर पाठबळ न देतां आतां सोडून दिलें, तर आज इतकीं वर्षें मोठ्या प्रयत्नानें जें हें राज्य राखिलें तें खचित जाईल. तेव्हां माझी पाठराख आपण करावी. नाहीं तर मला काशीयात्रेस जाण्याची आज्ञा व्हावी." असें बोलतांना नानांचे डोळ्यास पाणी आलें. भेटीनंतर त्यांचें वजन पुनः बरेंच बसलें. ग्रां. ड.

दुसरें नाहीं. एक श्रीमंत, दुसरे महादजी शिंदे, तिसरा नावाड्या; चवथें मनुष्य नाहीं. अशी संधी पाटीलबोवा यांणीं पाहून श्रीमंतांपाशीं बोलावयास प्रारंभ केला. आणि म्हणतात, "महाराज! मी हिंदुस्थानांतून आलों तो हेतू महाराजांनीं पूर्ण केला पाहिजे. पुणें मुक्कामीं सरकारची दिवाणगिरी करावी व सर्व राज्याचा कारभार करावा, याप्रमाणें माझा हेतू आहे. सरकारांनीं शेवटास नेला पाहिजे. नाना जो कारभार करतात तो मजकडे सांगावा." अशीं बोलणीं श्रीमंतांनीं ऐकून घेऊन श्रीमंत त्यांस म्हणाले, "तुम्ही बोललां ही गोष्ट बरी आहे. परंतु माझा मनोदय असा आहे. हा तुम्हांस सांगतों. माझा उजवा हात नाना फडणीस व डावा हात महादजी शिंदे. हे दोन्ही हात कायम आहेत तेथपर्यंत मी राज्यकारभाराविषयीं बेफिकीर आहें. म्हणून राज्य करितांना खेळ खेळतों! नानातऱ्हेचे खेळ, वाघांच्या लढाया व जेठी मल्ल यांच्या कुस्त्या, वज्रमुष्टींच्या लढाया, शिकारखाने, नानातऱ्हेचे खेळवितों. असे किती प्रकारचे खेळ खेळतों! तेव्हां या दोहों हातांतील एकादा माझा हात मोडला, तर सारें खटलें माझे गळ्यांत येऊन खेळ खेळावयास रिकामपण होणार नाहीं. यासाठीं जें चाललें आहे तें चांगलें आहे. याला तुम्हीं काहीं फांटा फोडूं नये." असें बोलणें श्रीमंतांचें ऐकून महादजी शिंदे यांस पुढें उत्तर सुचलें नाहीं. मग नाव खेळून सरकारची स्वारी बाहेर निघाली. ती हत्तीवर स्वार होऊन वाड्यांत दाखल झाली. मग महादजी शिंदे सरकारची आज्ञा घेऊन आपले लष्करांत गेले.

हा सारा मजकूर नाना व तात्या यांस समजला. या गोष्टीस आठ चार दिवस गेले. नंतर हरिपंत तात्या फडके दोन प्रहरच्या समयांत जेवून खाऊन, स्वारीच्या खिजमतगारास समागमें घेऊन, पालखींत बसून शिंदे यांचे लष्करांत गेले. त्या वेळेस पाटीलबोवा जेवून निजावयाचे डेऱ्यांत गेले [होते.] त्या संधींत तात्या जाऊन तेथें पोहोंचले. ती बातमी पाटीलबोवा यांस चोपदार याणें जाऊन सांगितली कीं, "बाहेर हरिपंत तात्या आले आहेत." असें ऐकतांच पाटीलबोवांस मोठें आश्चर्य वाटून चोपदारास बोलतात, "हें तूं काय बोलतोस?" तेव्हां चोपदार म्हणाला, "महाराज, खरेंच तात्या आले." असें ऐकून पाटीलबोवा डोकीस पागोटें घालून बिचोब्याबाहेर[3]

२. हीं बोलणीं लोहगांवीं झालीं असें ग्रांट. ड. लिहितो. ३. बिचोबा = लहान तंबू; यांस काठी नसते.

आले. तात्या डेऱ्यांत दाखल झाले. मग महादजी शिंदे यांणीं तात्यांचा हात धरून, उभयतां येऊन लोडापाशीं बसले. मग महादजी शिंदे तात्यांस म्हणतात, "असे उन्हाचे, सडी स्वारी, कोणी बारोबर नाहीं, असें यावयाचें कारण कोणतें?" हें ऐकून तात्या म्हणतात, "अहो बोवा! यावयाचें कारण तुम्ही सरकारचा कारभार करणार, नानांनीं व मीं कारभारांत नसावें, आम्ही उभयतां सरकारचे अपराधी, म्हणोन तुम्हांजवळ आलों. काय पारिपत्य करावयाचें असेल तें करावें. कोणीकडून श्रीमंतांचें राज्य निर्विघ्न चालावें हा संकल्प आमचा आहे." असें बोलणें तात्यांचें ऐकून महादजी शिंदे तात्यांस म्हणतात, "शाबास! तुम्हांपुढें आमची पराकाष्टा झाली! बोलावयास कोणते गोष्टीनें जागा राहिली नाहीं!! आतां जशी तुमची मर्जी असेल तसेच चालूं. आमचे मनांत कारभार करावा हा हेतू धरून होतों. परंतु सावंदांचे मर्जीपुढें आमचें कांहीं चालत नाहीं. एक दोन वेळां विनंती करून पाहिली व एकांतीं बोलणें केलें. परंतु सरकारचे मर्जीचा कल या बोलण्यावर रुकार येत नाहीं, असें पाहून मींही बोलणें सोडून दिलें. त्यांत सर्वांचा मनोदय चालत आहे तसें चालवावें. तेव्हां माझा एकट्याचा आग्रह कसा निभावतो? त्यापेक्षां तुम्ही म्हणतां तसे चालूं." असें बोलणें तात्यांनीं ऐकिल्यावर तात्या म्हणतात, "हें बोलणें खचीत आहे, आतां मनामध्यें कांहीं किंतू राहिला नाहीं, असें मला स्वच्छ मन करून उत्तर सांगावें." हें ऐकून पाटीलबोवा तात्यांस म्हणतात, "इतकें बोलणें मी बोललों यांत कांहीं संशययुक्त बोललों असा तुमच्या मनांत संशय वाटत असल्यास मला सांगावें." असें ऐकून तात्या म्हणतात, "कांहीं बोलण्याचा संशय राहिला नाहीं. परंतु खचीत याप्रमाणें झालें म्हणजे ठीक." असें तात्यांचें बोलणें ऐकून पाटीलबोवा यांनीं शपथपुरःसर सांगितलें. तेव्हां तात्या व शिंदे या उभयतांची श्रीमंतांचे पाय स्मरून परस्पर शपथ झाली. त्या वेळेस दोघांचे चित्तांतील *दहन गेला. मग पानसुपारी, अत्तर-गुलाब होऊन तात्यांस पोषाग जवाहीर देऊन मार्गस्थ केलें. उभयतांचीं बोलणीं राज्यप्रकरणीं बहूत झालीं. त्या बोलण्यांत महादजी शिंदे यांची खातरजमा हरिपंत तात्या यांणीं केली. तेव्हां उभयतां निःसंशय झाले. मग तात्या निरोप घेऊन आपले डेऱ्यांत

*दहन=राग, आढी.

ते पर्वतीस जाऊन जागोजाग बसले. जिकडे तिकडे मशाली दुशाके[५] लाविले आहेत. तेव्हां सारा पर्वतीचा डोंगर फुलून निघाला. सरकारची स्वारी येऊन बसली. नंतर महादजी शिंदे यांस दारू सोडण्याची आज्ञा झाली. मग पाटीलबोवा ह्यांनीं दारू सोडण्यास आरंभ केला. ते प्रहररात्री पासून दोन प्रहर रात्रपर्यंत दारू लंका सुटत होती. नानातऱ्हेचीं झाडें, त्यामध्यें तारे तुटूं लागले हनुमंत दारूचा केला होता तो उडून जागजागीं बसूं लागला, तेव्हां दारू सुटत चालली. असा मोठा समारंभ दारूचा झाला. सारी दारू सुटल्यानंतर मग पाठीमागून तोफेची धडेबाजी[६] करून दाखविली. असा तीनप्रहर रात्र पावेतों दारूचा समारंभ झाला. नंतर स्वारी पुण्यास आली. सर्व लोकही आले. ते दिवशीं तोफेची मनाई[७] होती.

आतां पुढें रंगाचा समारंभ करावयाचा असें नाना व तात्या व पाटीलबोवा यांचें बोलणें होऊन, तिघेही उठून, श्रीमंत आरसे महालांत होते तेथें त्रिवर्ग जाऊन, श्रीमंतांपाशीं पाटीलबोवा मुजरा करून बसले. तसेच नाना व तात्या नमस्कार करून बसले. त्या दिवशीं दरबार आरसे महालांतच झाला. असे बसले आहेत तों पाठीमागून आपा बळवंत व अमृतराव पेठे व माधवराव रामचंद्र, बन्याबापू मेहेंदळे, निळकंठराव खाजगीवाले, महादाजीपंत गुरूजी, त्रिंबकराव राजे बहादर, बहिरो अनंत, पुरंदरे, परशुराम भाऊ पटवर्धन, रंगराव ओढेकर, विंचुरकर, पानसे, मराठे सरदार मंडळी असा दरबार त्या आरसे महालांत झाला असतां, महादजी शिंदे यांणीं श्रीमंतांस विनंती केली कीं, "हिंदुस्थानांत मोठे राजे रजवाडे हुताशनीचा रंग खेळतात तसा रंग पुण्यांत व्हावा. आतां हुताशनी तर गेली. परंतु चैत्र शुद्ध प्रतिपदेस तसा रंग करावा असें माझे मनांत आहे. परंतु सरकारच्या मर्जीस येईल तें खरें." तेव्हां समस्त कारभारी, मुत्सद्दी, सरदार, मानकरी व पागे बसले होते तितक्यांचा

---

५ दुशाका = अनेक कांकडे लावितां यावे म्हणून एका काठीच्या टोंकास लोखंडाचीं शिंगें लाविलेलीं असतात. ती दीपयष्टी = दुशाखा. ६ धडेबाजी = धडाधड एका मागून एक आवाज. ७. तोफेची मनाई = रात्रौ १० वाजतां तोफ उडाली म्हणजे परवानगीशिवाय रस्त्यांत कोणी फिरूं नये अशी मनाई होती, ती या रात्रीं लोकांच्या सोईकरितां बंद केली. ही मनाई पुण्यांत इंग्रजी अमलांत ही पुष्कळ दिवस होती ती सुमोरें ५०।६० वर्षांपूर्वीं बंद झाली.

रुकार रंगाविषयीं पडला. " साऱ्यांचे मनांत ही गोष्ट आली. आतां सरकारची आज्ञा काय ती व्हावी." असें बोलणें महादजी शिंदे यांचें ऐकून श्रीमंत म्हणतात, "तो रंग राजे रजवाडे कसे खेळतात हें सांगावें." त्याजवर महादजी शिंदे यांणीं जयपूरचा व उदेपुरचा व मथुरेचा व आग्र्याचा व गोकुळचा व वृंदावन येथील रंगाचा मजकूर श्रीमंतांस विदीत केला. तो ऐकून श्रीमंतांचे मनांत गोष्ट भरली व सर्वांचे रुकार पडले होते त्याजवरुन श्रीमंतांचे मनांतही वाटलें, "आपण तसाच रंग खेळावा." असें झाल्यानंतर चैत्र शुद्ध १ चा नेम ठरला. पाटीलबोवांस आज्ञा झाली कीं, "रंगाची तयारी करावी." वाड्यांत रंग करावयाची आज्ञा खाजगीवाले यांस झाली. खेरीज ज्या रस्त्यानें स्वारी जावयाची त्या रस्त्यानें कारभारी व मुत्सद्दी व सरदार व पागे होते तितक्यांस सरकारची आज्ञा झाली कीं, "इतक्या मंडळींनें तुम्हीं रंगाची तयारी आपापले ठिकाणीं करावी." त्यांत हरिपंत तात्या फडके व माधवराव रास्ते यांस आज्ञा झाली कीं, " तुम्हीं दोहीं ठिकाणीं रंग मोठा करावा." अशी आज्ञा सर्वांस होऊन दरबार बरखास्त झाला. पाटीलबोवा आज्ञा घेऊन वानवडीस गेले.

मग शिंदे यांणीं तयारी रंगाची आपले लष्करांत केली. तसेंच ज्या ज्या रस्त्याचे लोकांस आज्ञा झाली त्यांणींही आपले ठिकाणीं रंगाची तयारी दुरस्त केली. तसेंच शिंदे यांचें लष्करांत रंगाची तयारी केली. खेरीज जागोजागीं वाटेनें सरकारचे व शिंदे यांजकडील हौद भरून ठेवले. गुलालाची तयारी झाली. सरदार व मानकरी व पागे, पथके, शिलेदार, एकांडे मुत्सद्दी व मानकरी व कारकून मंडळी असे तमाम तयार होऊन वाड्यापाशीं आले. तशीच सर्व फौज व हत्ती व सांडणीस्वार असे तयार होऊन उभे राहिले. सरकारचीही निघण्याची तयारी झाली. निघावयाचे वेळेस वाड्यांत थोरल्या चौकांत बिछायत करून सरकारची स्वारी येऊन तेथें बसली. त्या वेळेस नाना व तात्या व आपा बळवंत, पेंठे, त्रिंबकराव परचुरे, नारोपंत चक्रदेव असे सर्व लहान थोर; खेरीज ब्राह्मण सरदार-रास्ते, विंचुरकर, ओढेकर, बहिरो अनंत, राजे बहादर, पानशे, पुरंदरे, माधवराव रामचंद्र; मराठे मंडळ-घोरपडे, निंबाळकर, पाटणकर, मोहिते, दरेकर, मानाजी फांकडे, जोत्याजी जाधव; पाठीमागोन पटवर्धन, माधवराव रामचंद्र

बिनीवाले व बेहरे—असे सर्व येऊन नाचास बसले. तमाम पागे धायबर, निकम, भोइटे, थोरात, बाबूराव अनंत, भास्कर जगन्नाथ, निळकंठराव रामचंद्र, अवधूतराव यशवंत, असे बावन्न पागे बैठकेस येऊन दाखल झाले. वानवडीहून महादजी शिंदे तयार होऊन सरकारची स्वारी न्यावयास आले. असे समाज वाड्यांत मिळाले. तेथें रंग खेळावयास प्रारंभ झाला. त्या रंगाची वर्णना किती करावी ? हजारों गुलालगोटे उडूं लागले. रंगाचे बंब चालूं लागले. तसाच गुलाल खंड्याचे खंड्या वाड्यांत उडाला.

असा रंग खेळून सरकारची स्वारी सायंकाळचे दहा घटका दिवसास वानवडीस जाण्यास अंबारींत बसून खवासखान्यांत महादजी शिंदे व आपा बळवंत पाठीमागें बसले. वाडा डावा घालून, सरकारची स्वारी बुधवारांतून, कापडआळीनें आदितवारांत हरिपंत तात्यांचे वाड्यापाशीं येई तोपर्यंत वाटेनें सरकारचे लोकांनीं रंग करून ठेविला होता, त्यांनीं एकच गर्दी रंगाची केली. तसेंच हरिपंत तात्यांचे वाड्यापाशीं स्वारी आल्यानंतर तेथें दोन घटिकापर्यंत रंगाचा मार झाला. त्या रंगाच्या योगानें रस्त्यानें चिखल पडला. व शेंकडों पल्ले गुलाल उधळला. असा दोन घटिका येथें रंग खेळून सरकारची स्वारी पुढें रंग खेळत चालली. शेंकडों पल्ले गुलाल हत्तीवर ठेविला होता तो रस्त्यांत उधळीत चालले. असे नाकझरी उतरून रास्ते यांचे पेठेंतून चालले असतां, तसे खेळत रास्ते यांचे वाड्यापाशीं आले. तेथें रास्ते यांनीं रंगाचा समारंभ केला. गच्च्यांवरून रंगाचे बंब उडूं लागले. तेव्हां स्वारीमध्यें जसा पर्जन्य पडतो असा रंग पडूं लागला ! दोन घटिका तेथें रंग खेळून वानवडीस स्वारी दाखल झाली.

मग जेथें श्रीमंत बसावयाची जागा केली होती तेथें ते जाऊन बसले. तेव्हां झाडून सरदार व मानकरी व पागे व मुत्सद्दी व कारकून त्या कचेरीस येऊन बसले. बसल्यानंतर दोन घटिकापर्यंत नाच व गाणें झालें. नंतर रंग खेळावयास प्रारंभ झाला. रंग खेळतां खेळतां रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापारयुगीं श्रीकृष्ण भगवान खेळले. तसा कलियुगीं श्रीमंत सवाई

---

८ गुलालगोटे = पातळ कांचेचे किंवा कागदाचे पोकळ गोळे, आंत गुलाल भरून एकामेकांवर होळीच्या सणांत उडविण्याकरितां तयार करतात ते.

माधवराव खेळले. असा कोणी पुढें खेळावयाचा नाहीं व मागेंही कोणी खेळला नाहीं ! रस्त्यांमध्यें गुलालाचा पेर व रंगाचा चिखल झाला तो किती गणतीस धरावा ! असा रंग खेळल्यानंतर सरकारची स्वारी स्नानास उठली. त्या समयीं शिंदे यांनीं शेकडों कढया पाण्याच्या तापत ठेविलेल्या होत्या. शेकडों ब्राह्मण पाणक्ये [हातांत] घंगाळ घागरी घेऊन उभे. असा बंदोबस्त स्नानाचा ब्राह्मण मंडळीचा झाला. तसाच मराठे सरदार, मानकरी यांचा केला होता. मग अवघ्यांचीं स्नानें झाल्यानंतर ज्या कचेरीस रंग खेळले त्याच मखमाली डेऱ्यांत फरास यानें येऊन, ती बिछायत काढून, नवी बिछायत घालून तयारी केली. सर्व मंडळी लहान थोर स्नानें करून, नवीन वस्त्रें घेऊन येऊन कचेरीस बसली. मग नाचास प्रारंभ झाला. मग महादजी शिंदे यानीं श्रीमंतांस सर्व पोषाग जवाहीर, शिरपेंच व तुरा वगैरे गळ्यांत मोत्यांच्या माळा असा दिला. तसेंच सर्व कारभारी, मुत्सद्दी व कारकून मंडळी व शिलेदार लोक व मानकरी व हुजरातेचे लोक व पागे, पथके असे सर्वांस शिंदे ह्यांनीं पोषाग वांटून नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब, हार, तुरे गजरे दिले. इतका समारंभ होई तों तीन घटिका रात्र झाली.

मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली. तेव्हां हजार पांचशें दुशाका हत्तीवर लावून मोठ्या थाटानें स्वारी मोठ्या डौलानें चालली. ज्या समयीं स्वारी माघारी आली त्या समयीं शहरांत दुरस्ता चिराकदानें करून, लोक आपापल्या माड्यांवरून दिवे लावून तमाशा पहावयास उभे राहिले. त्यांनीं त्या दिवशीं सोन्या रूप्याचीं फुलें श्रीमंतांचे अंबारीवर उडविलीं. अशा थाटानें स्वारी वाड्यांत दहा घटका रात्रीचे अमलांत दाखल होऊन श्रीमंत मसनदीवर बसले. सर्व मंडळीस पानसुपारी, अत्तरगुलाब देऊन घरीं जाण्याची आज्ञा सर्वांस झाली. त्या समयीं सर्वांनीं नजर नजराणे करून आपले ठिकाणीं सर्व लहान थोर गेले. असा रंगाचा समारंभ झाला.* चैत्र शुद्ध १ शके १७१५, प्रमाथीनामसंवत्सरे. सल्लास तिस्सैन मय्या व अल्लफ. [११९३]

* या रंगाविषयीं मनोहर कवीनें केलेलें एक गाणें बायकांच्या म्हणण्यांत येतें त्यांतील वर्णन व वरील वर्णन हीं पुष्कळ अंशीं जमतात. ९.हे सर्व खेळ भावी स्थितीचे सूचक होत असें कित्येक सूक्ष्म दृष्टीच्या पुरुषांच्या लक्षांत तेव्हांही आलें असेल. आरसे महालांत रंग खेळण्याबद्दल व दारूकाम सोडण्याबद्दल दरबार जेव्हां भरूं लागले, व गोळ्यांच्या वर्षावाचे

पुढें राज्यकारभार चालूं लागला. पुढें रमाबाई साहेब यांचे शरिरास विकृती रोगाची झाली. बहूत उपाय केले, परंतु गुणास आलें नाहीं. शेवटीं त्याच व्यथेनें बाईसाहेब यांस देवाज्ञा झाली.

मग तेरा दिवस झाल्यानंतर लग्न करावयाचा बेत ठरला. नंतर मुली पाहाण्यास कारकून व ब्राह्मण गेले. मुली पाहात पाहात कोंकणांत विजयदुर्ग तालुक्यांत *धालवलीस गणेशपंत गोखले यांची कन्या पाहिली. सुलक्षणी पाहून रास नक्षत्र छत्तीस गुण मिळवून पाहिले. ते छत्तीस मिळून नंतर पुण्यास लिहून पाठविलें. मग पुण्यास लिहून आल्यानंतर सर्व कारभारी यांचे मनास येऊन गंगाधर गोविंद भानू यांस लिहून पाठविलें कीं, "गोखले मशारनिल्हे यांची कुटुंबसह परिवारेंसहित पुण्यास रवानगी करावी." अशीं पत्रें जातांच भानू यांनीं गोखले यांस पालख्या व डोल्या देऊन पुण्यास रवाना केलें. ते गणेशपंत गोखले पुण्यास आल्यानंतर लागलाच लग्नाचा मुहूर्त पाहून, गोखले यांस जानवशास जागा खाजगीवाले ह्यांचे वाड्यांत दिली. तेव्हां खाजगीवाले यांस सरकारची आज्ञा झाली कीं, "तिकडील साहित्याची तयारी तुम्हीं करावी." सरकारांतून खर्चास दिलें.

मग शहरांत आमंत्रण लग्नाचें फिरलें. सरकारची मंडळी व मुत्सद्दी मंडळ व कारभारी तमाम व सरदार व पुणें मुक्कामीं मामलेदार होते त्यांस आमंत्रणें झालीं. नंतर देवकस्थापना होऊन, तेलफळ रुखवत होऊन वरप्रस्थान निघालें. लग्न दिवसास होतें. तेव्हां सरकारची स्वारी नवरीचे मंडपांत यावयास निघाली. ती अंबारींत बसून चालली. पुढें [१०]तक्करावे चालले आहेत, वाजंत्री वाजतात. अशा थाटानें स्वारी चालली. पाठीमागें सारे कारभारी चरणचाली

---

ठिकाणीं रंगांचा वर्षाव जेव्हां होऊं लागला, तेव्हां माधवरावांच्या वेळच्या व त्या पूर्वीच्या लोकांच्या डोळ्यांतुन टिपें पडलीं असावीं. खुद्द नानाफडणिसास तरी असे पोरकट चाळे खाचित आवडले नसतील. पण करतो काय बिचारा ? सांपडला होता हिंदुस्थानी वाघाच्या सपाट्यांत. या व्याघ्राचा अंतस्थ हेतू इतकाच दिसतो कीं, दाक्षिणेंतील सजातीयांस रंजवून शेळ्या करून टाकिल्या कीं राज्य आपलेंच. * 'गोळवलीस' कल्याण प्रत. १०. तक्करावा=विवाह वगैरे समारंभाच्या मिरवणुकींत अनेक तक्के एकत्र जोडून त्याजवर वेश्येनें नृत्य करावें म्हणून एक जोड-तक्का करितात तो. हा मनुष्यें डोकीवर नेत.

महादजी शिंदे, तात्या, नाना प्रमुख सारे होते. अवघ्यांनीं आपआपल्या कानांत चौकडे घालून निमिजामे अंगांत घातले. हत्तीच्या मागें बायकांचा समुदाय, त्यांच्या मागें कारभारी यांचा समुदाय चालला आहे असे मिरवत मिरवत खाजगीवाले ह्यांचे वाड्यांत स्वारी दाखल झाली. नंतर सकळ लग्न-विधी होऊन, विवाहहोम झाल्यानंतर सर्व मंडळीस भोजनास राहविलें. ते दिवशीं भोजन होऊन दुसरे दिवशीं आमंत्रण सोयऱ्यांकडील येऊन सारी मंडळी भोजनास गेली. रात्रौ साडे झाले. ते दिवशीं वरात मिरवत सरकारची स्वारी वाड्यांत दाखल झाली. नंतर सर्वत्रांस मेजवानी करून सर्वांचे आहेर आले होते ते परत केले. लग्नाची दक्षणा रमण्यांत वांटली.

असा कारभार होत असतां मध्यवर्ती अहल्याबाई होळकरीण यांचीं पत्रें सरकारांत आलीं कीं, " चिरंजीव§ मल्हारराव होळकर आम्हांपासून रुसून गेला त्याचा बंदोबस्त सरकारांनीं ठेवावा. " अशीं पत्रें सरकारांत येऊन पोहोंचलीं व आणखीही मुलखांतील बोभाट तहत नेमाडापासून सरकारांत आले कीं, " मल्हारराव होळकर १०-१५ हजार फौजेनिशीं येत आहेत. त्या फौजेचा उपद्रव मुलखांत होत आहे. " अशीं पत्रें महालोमहालींचीं सरकारांत बोभाटांचीं आलीं. चोहींकडून होळकरांचे बोभाट आले. त्याजवरून सरकारांतून त्यांचे बंदोबस्तासाठीं चाळीस हजार फौज, तोफखाना रवाना झाला. त्या फौजेंत कारभारी बहिरो अनंत म्हणजे अंताजी माणकेश्वर यांचे चिरंजीव यांस सरकारची ताकीद अशी कीं, " मल्हारराव होळकर यांशीं लढाई न घेतां व त्यांचे जिवास धक्का न लावितां त्यांचे फौजेचा उपद्रव मुलुखास न होतां, असें त्यांस घेऊन पुण्यास येणें. " अशी ताकीद होऊन फौज रवाना झाली. त्या फौजेनें होळकरासभोंवतीं कोस कोस छाट्यानें चालून खानदेशांत गांठ पाडिली. तेव्हां मल्हारराव ह्यांचा मुक्काम झाला म्हणजे सरकारच्या फौजेनें मुक्काम करावा. असे कूच मुक्काम करीत गंगा उतरून अलीकडे आले. तसेच पुढें चालले. [11]तों निंबे देहरे याचा घाट चढून होळकर येऊन वाफगांव येथें फौजेसुद्धां गांवांत उतरले. त्या समयीं सरकारची फौज गोळीचा व बाणाचा टप्पा चुकवून गांवाभोंवतीं

§ हा तुकोजीरावाचा मुलगा. ( मागें पृष्ठ ३७ टीप ६५ पाहा. ) ११. ' निंबेद्रेचा ' असें कल्याण प्रतींत दिसतें.

चौफेर उतरली. अशा मजकुराचीं पत्रें बाहिरो अनंत यांचीं आलीं. त्यांचीं उत्तरें सरकारचीं गेलीं कीं, " तुम्ही चौफेर घेरा देऊन उतरलां आहां, तसेंच बंदोबस्तानें असावें; त्यांच्या वाटेस कोणीं जाऊं नये. बाहेरची रसद वगैरे बाहेरून गांवांत जाऊं नये, अशा बंदोबस्तानें असावें." याप्रमाणें फौजेचा मुक्काम दोन महिने तेथें झाला. गांवांतील दाणा सरला. खाण्यापिण्याची अडचण पडूं लागली, दोन दोन फांके खाण्यावांचून सर्वांस पडूं लागले. मल्हारराव होळकरानें कौलास येऊन बोलणें लाविलें. त्या वेळेस सरकारची आज्ञा होळकर यांस अशी झाली कीं, " तुमचे दिवाण भगवंतराव आहेत ते सरकारच्या हवालीं करावे, म्हणजे तुमचा बंदोबस्त सरकारांतून तुमचे मनोदयानुरूप केला जाईल." त्या बोलण्यास तोड दुसरी नाहीं, असा विचार पक्का मल्हारराव यांणीं आपले ठिकाणीं करून भगवंतराव यास सरकारचे हवालीं केलें. नंतर भगवंतराव यास कैदेंत ठेवून, मल्हारराव यांस सरकारचीं पत्रें जाऊन, होळकर यांस पुण्यांत आणिलें. सरकारच्या भेटी झाल्यानंतर त्यांचे खर्चाचा बंदोबस्त सरकारांतून करून देऊन, सरकारची आज्ञा होळकर यांस अशी झाली कीं, " आतां तुम्हीं स्वस्थ असावें. पुढें तुमचा बंदोबस्त तुमचे चित्तानुरूप सरदारी प्रकरणीं करून देऊं. " असें आश्वासन सरकारचें झालें. हें बोलणें मल्हारराव यांणीं ऐकून पुणें मुक्कामीं स्वस्थ होते. पुढें भगवंतराव ह्यांचा जामीन घेऊन मोकळें केलें.

नंतर महादजी शिंदे यांस भाद्रपदमासीं[१२] नवज्वराची भावना होऊन देवाज्ञा झाली. मोठा सरदार! सरकारची एक बाजू खचली!! राज्यांतील मोहरा नाहींसा झाला! हरिपंत तात्या फडके यांस पोटसुळाची भावना होऊन, ती फारच झाल्यावर तात्यांस समजलें. त्यावरून सर्व निरावानिरव करून, नाना फडणीस यांजपाशीं बहूत प्रकारचीं राज्यप्रकरणीं बोलणीं बोलून, घरगुती मजकूर समजावून, नानांचा निरोप घेऊन, सरकारची आज्ञा घेऊन, तात्या सिद्धटेकास श्रीगणपतीजवळ मरावयास गेले. तेथें महिना दीड महिना तात्या गणपतीपाशीं होते. पुण्याहून गेल्यापासून प्रकृती दिवसेंदिवस जडकावत चालली त्या व्यथेनें कार्तिकमासीं तात्यांस देवाज्ञा झाली. दोन्ही माणसें राज्यांतील राज्य चालविण्याजोगतीं गेलीं. त्यामुळें बहुतांस खेद झाला.

---

१२. माघ शु॥ १३ असें इतरत्र सांपडते. ता. २१ फेब्रवारी सन १७९४. ग्रांट. ड.

पुढें तात्यांचें संस्थान त्यांचे चिरंजिवांकडे चालविलें. महादजी शिंदे वारल्यानंतर त्यांचे दिवस झाल्यावर कारभारी यांचीं बोलणीं सरकारांत लागलीं कीं, " दौलतराव शिंदे यांचे नांवे सरकारचीं वस्त्रें द्यावीं. " तेव्हां वस्त्रें द्यावयाचीं कीं न द्यावयाचीं याविषयीं शिंदे यांजकडील वकील रामजी पाटील व रायाजी पाटील यांशीं सरकारांतून बोलणें झालें कीं, " नजर सरकारांत घ्यावयाची तेव्हां सरदारी प्रकरणीं वस्त्रें द्यावयाचीं. " त्या समयीं शिंदे यांजकडील वकील यांनीं सरकारांत विनंती केली कीं, नजर किती घ्यावयाचा मानस आहे. " तें बोलणें ऐकून सरकारचा जबाब झाला कीं, " दोन कोट रुपये नजर द्यावी. " असें बोलणें सरकारचें पडलें. त्या वेळेस शिंदे यांचे कारभारी वकील यांस गोष्ट मोठी अवघड लागली. त्या बोलण्यांत दुसरी तोड नाहीं असें शिंदे यांजकडील कारभारी यांणीं जाणून सरकारास विनंती केली कीं, "पाटीलबोवा यांचे मागें जिवबादादा[१३] बक्षी राज्यकारभाराचे मुखत्यार आहेत. तेव्हां त्यांस लिहून पाठवून त्यांचें उत्तर आलें म्हणजे काय विनंती करणें ती करूं. असें बोलणें जिवबादादा यांस पत्रीं लिहून त्याचा जाब नजर द्यावी असा आल्यास सरकारांत विनंती करूं. " अशी गोष्ट सरकारांत कबूल करून दौलतराव शिंदे यांस दुखोटा करावयास कारभारी सरकारांतून गेले. त्यांणीं दुखोटा मात्र केला, सरदारीचीं वस्त्रें दिलीं नाहींत. शिंदे यांणीं सरकारांत जवाहीर दिलें. त्यांत नानांचे मनांत दोन जिनसा शिंदे यांजकडे होत्या त्या घेण्याचा मानस होता. म्हणून " एकेक मोतीं जांभळा एवढालें, अशा शंभर मोत्यांची माळ एक, व तशाच शंभर चांफेकळ्यांची माळ एक, अशा दोन माळा सरकारांत घेतल्यावर मग सरदारी प्रकरणीं काय बोलणें तें बोलूं " अशी सरकारची आज्ञा शिंदे यांजकडील वकील कारभारी यांस झाली.

[इकडे] गोविंदराव काळे हे सरकारांतून वकिलीच्या कामावर भागानगरास मोंगल यांजकडे होते. तेव्हां गोविंदराव पिंगळे पुण्यांत होते ते सरकारांतून वकिलीच्या कामावर बोलण्यांत हैदराबादेस गेले. त्या वेळेस नबाब यांचे कचेरीस रात्रौ तमाशा झाला. त्यामध्यें मश्रुन्मुलुख यांनीं श्रीमंत रावसाहेब यांचीं व नाना फडणीस यांचीं सोंगें आणिलीं. त्या तमाशामध्यें कचेरीस काळे व

---

१३. जिवबादादा व बाळोबानात्या हे दोन शेणवी गृहस्थ शिंद्यांच्या कारभाऱ्यांत प्रमुख होते.

पिंगळे बसल होते, त्या उभयतांनीं सोंगें पाहून दोघे कचेरींतून उठून चालले. त्या समयीं कचेरीस नबाब निजामअल्लीखां व मश्रुन्मुलुख हा दिवाण, वरकड मुत्सद्दी राजे रायराय व मीर अलम व जहांजंग धोंसे व रावरंभा निंबाळकर, व बहारमल्ल पठाण व मोठमोठे सरदार, रघोत्तम हैबतराव, राव राजेंद्र, असे मोठमोठे मुत्सद्दी व सरदार त्या सभेंत बसले असतां, इतक्यां देखत सरकारचीं सोंगें तमाशांत आणिलीं. हें पाहून गोविंदराव बापू व गोविंदराव मामा असे उभयतां उठले. त्यांच्या बरोबर त्यांजकडील पागे व पथके होते तें सारें मंडळ उठलें. ते उठण्यासमयीं मश्रुनमुलुख व मुत्सद्दी व सरदार बसले होते, त्या सर्वांनीं उभयतांस विचारलें कीं, "तम्ही उठून कां जातां?" त्या वेळीं उभयतांनीं उत्तर केलें, "आमचे खावंदांचीं सोंगें तमाशांत आलीं तेव्हां आमची बसावयाची योग्यता नाहीं," नंतर खासे नबाब यांनीं गोविंदराव यांस हांक मारून जवळ बलावून सांगितलें, " तुमची जाण्याची गरज नाहीं. हा तमाशा आहे. ह्याचा विधिनिषेध तुम्ही काय बाळगतां ? " असें नबाब ह्यांचें बोलणें ऐकून गोविंदराव बापू यांनीं उत्तर केलें कीं, " हा राजदरबार आहे. येथें आमच्या खावंदांचीं सोंगें आलीं. आतां आमची बसण्याची मजा नाहीं. आपणही आम्हांस बसावयाचा आग्रह करूं नये. आतां या कचेरींत आम्ही सर्वांदेखतां सरकारांस अर्ज करतों एवढा समजून ठेवावा. आमचे खावंदांचीं सोंगें आपण तमाशांत आणविलीं आणि लोकांस दाखविलीं, याचें उसनें आपलेकडील दिवाण वगैरे मंडळी पुण्यांत नेऊन दारोदार फिरवून लोकांस दाखवूं हें पक्कें समजून ठेवावें. आम्ही असें करून दाखवूं तरच गोविंदराव काळे होऊं, यांत अंतर व्हावयाचें नाहीं. " असें बोलून नबाबांस मुजरा करून, तेथून उभयतां निघून आपले मकाणास येऊन दाखल झाले.

पुढें मसलतीस प्रारंभ झाला. प्रातःकाळीं गोविंदराव बापू व गोविंदराव मामा असें तेथें वकिलीच्या कामावर कारकून ठेवून आपण उभयतां तेथून निघाले. ते कूच दरकूच पुण्यास येऊन दाखल झाले. नंतर श्रीमंतांची व नानांची भेट झाली. भेटीअंतीं भागानगरचा मजकूर सर्व खावंदांस विदित करून आणखी म्हणतात, " याची आज्ञा काय ती करावी. आम्ही तर तेथून तोंडांत खाऊन दरबारांत प्रतिज्ञेचें उत्तर बोललों कीं, 'आमचे खावंदांचीं सोंगें आणिलीं त्यापेक्षां मश्रुन्मुलुख यांस धरून दारोदार फिरवूं' असें प्रतिज्ञेचें

बोलणें बोलून तेथून निघालों. तेव्हां आतां मोंगलावर मोहिम करणें अगत्य. याविषयीं आज्ञा व्हावी." असा मजकूर श्रीमंतांनीं ऐकिल्यानंतर श्रीमंतांस मोठा राग येऊन उत्तर केलें कीं, "मसलत करून मोंगलावर स्वारी करावयाची." असें उत्तर होतांच गोविंदराव बापू यांनीं तीच शकुनगांठ[14] बांधिली. असें बोलणें झाल्यानंतर दरबार बरखास्त झाला.

त्याजवर दुसरे दिवशीं नानांचे वाड्यांत काळे, पिंगळे व नाना हे त्रिवर्ग खलबतास बसले. त्या वेळेस नानांनीं सर्व विचार भागानगरचा, बारीक मोठे मजकूर फौजेचे व सरंजामाचे व नबाबाचे मर्जीचा कल कसा, तो सर्व मजकूर विचारला. तेव्हां परस्परें बोलण्याचे खुलासे सर्व झाले. तेव्हां मसलतीची तयारी करण्याचा उद्योग नानांनीं मांडिला. असें नित्य खलबत काळे व पिंगळे यांचें होऊं लागलें. त्या खलबतांत विचार मिळून मोंगल यांजवर स्वारी करण्याचा उद्योग. तेव्हां फौजेचा जमाव मोठा झाला पाहिजे. असे विचार ठरले असतां पुढें जमायत करण्याचा उद्योग मांडिला.

हिंदुस्थानांत तुकोजी होळकर यांस बलावण्याचीं पत्रें सरकारचीं गेलीं कीं, "मोंगलावर मोहिम करावयाची, तर तुम्हीं आपला सरंजाम तोफखान्यासुद्धां देखतपत्र सारी फौज घेऊन दरकूच पुण्यास येऊन दाखल व्हावें." शिंदे यांजकडील कारभारी वकिलांस सरकारची आज्ञा झाली कीं, "तुम्हींही हिंदुस्थान येथें पत्रें लिहून पाठवून तेथें तुमची फौज आहे त्यापैकीं तुमच्या तेथील मुलखाचा बंदोबस्त राखून बाकी फौज हुजूर पुण्यास बोलवावी. जिवबा बक्षी तुमचे त्यांसही बोलवावें. अशीं पत्रें ताबडतोब डाकेंत रवाना करावीं." याप्रमाणें शिंदे यांस आज्ञा झाली. अशीं पत्रें फत्तेसिंग[15] गायकवाड यांस गुजराथेंत गेलीं. "तुम्ही आपले संस्थानचा व मुलखाचा बंदोबस्त ठेऊन, बाकी फौज पोक्त सरंजाम करून, उभयतां पितापुत्र व तुमचे दिवाण रावजी[16] आपाजीसुद्धां सरकारची मोहिम मोंगलावर

---

१४. शकूनगांठ = कालांतरीं होणाऱ्या वर्तमानाविषयीं आढळलेल्या शकुनाचें (तत्सूचक लक्षणाचें) स्मरण राहावें म्हणून जी पदरास गांठ बांधितात ती. हिच्या योगें त्या शकुनाचा मान केला असें होतें. १५ फत्तेसिंग १७८९ च्या डिसेंबरांत बडोद्याचे मुख्य अधिकारी झाले. ग्रांट. ड. १६. ह्या हुशार परभू गृहस्थानें पुढें मोठ्या युक्तीनें गायकवाडीचें रक्षण करून लौकिक मिळविला.

होत आहे तर देखतपत्र दरकूच निघून पुण्यास यावें." अशीं पत्रें गुजराथेंत गायकवाड यांस गेलीं.

असा तयारीचा बेत पुणें मुक्कामीं होत आहे तो मजकूर नबाबाचे वकिलांनीं भागानगरास लिहिला. त्याजवरून पुर्वीं गोविंदराव काळे रुसून आले सबब हैदराबादेहून नबाब यांनीं समजुतीसाठीं मीरअलम् व रघोत्तम हैबतराव रावगजेंद्र व राजे रायराय यांचे नांवें रेणुराव धोंडजीराव रायराय हा किताब [ दिलेले ] असे त्रिवर्ग यांची रवानगी पुण्यास हजार दोन हजार सरंजाम देऊन केली. ते पुण्यास येऊन दाखल झाले. सरकारच्या भेटी झाल्या, व नानांचीही भेट झाली.नबाब यांणीं श्रीमंतांस पोशाग वगैरे पाठविले होते ते सरकारांत प्रविष्ट झाले. पुढें बरसात आली त्यामुळें मोंगलांचे कारभारी आले होते त्यांचा मुक्काम चार महिने पुण्यास झाला. त्या चार महिन्यांत सलुख्याचीं बोलणीं बहूत प्रकारचीं सरकारांत त्यांनीं आपले तर्फेनें केलीं. त्या बोलण्यांत मजकूर जमावे असें न झालें. परंतु बोलण्यास आले होते त्यांनीं आपले अकलेनें श्रीमंतांपाशीं नबाबांचा निरोप सांगितला कीं, "आम्ही आतां म्हातारे झालों. आतां तुम्हीं आम्हांशीं लढावें ही गोष्ट तुम्हांस मुनासिब[१७] नाहीं." अशीं बहूत प्रकारचीं बोलणीं बोलले. परंतु मजकूर जमला नाहीं व सरकारची मर्जी लढाईच करावी असा इत्यर्थ ठरला. त्या वेळेस नबाबाकडील कारभारी बोलण्यास आले होते त्यांस सरकारांतून रुस्कत दिली. त्या समयीं नबाब निजामअल्लीखां यांस पोषाग कारभारी नबाबाकडील आले होते त्यांचे हवालीं केले. जसे नबाब ह्यांनीं श्रीमंतास पाठविले होते त्याप्रमाणें श्रीमंतांकडून नबाबास दिले. मिरअलम् व रेणुराव धोंडोजी, रघोत्तम हैबतराव यांसही वस्त्रें सरकारांतून दिलीं. नबाबाकडील त्रिवर्ग होते त्यांनीं सलुख्याचीं बोलणीं बहुता प्रकारीं सरकाराशीं केलीं, परंतु नाना व गोविंदराव बापू व गोविंदराव मामा यांच्या कोणतीही गोष्ट खात्रीस आली नाहीं म्हणून बिघाड ठरला आणि मिरअलम् यांची रवानगी हैदराबादेस केली. त्या वेळेस नाना व गोविंदराव काळे यांनीं त्यांस समक्ष सांगितलें कीं, "आमची लढाईची तयारी झाली. तुम्हांस काय तयारी करणें ती करावी. आतां सुस्तीवर राहूं नये. आम्ही त्या दरबारांतून प्रतिज्ञा करून उठून आलों.

---

१७. मुनासब = योग्य. १८ भिवपूरच्या प्रतींत 'बेणुराव' असें सर्व ठिकाणीं आहे.

ही गोष्ट अन्यथा व्हावयाची नाहीं. श्रीमंतांचे पुण्य-प्रतापें करून मैंश्रुदौला यास पुण्यामध्यें आणून दारोदार फिरवूं. " असें साफ उत्तर गोविंदराव काळे यांनीं त्यांस सांगितलें. नबाबाकडील कारभारी सरकारचा निरोप घेऊन भागानगरास गेले.

इकडे पाठीमागें सरकारची तयारी होऊं लागली. नागपुरास रघोजीराजे भोसले यांस सरकारचीं पत्रें डाकेंत रवाना झालीं कीं, "तुम्हीं फौज घेऊन सावडतोब पुणें मुक्कामीं यावें. आमचा व नबाब निजामअल्लीखां यांचा बिघाड झाला आहे. तेव्हां मोंगलावर मोहीम करावयाची म्हणून तुम्हीं आपला कट्टा सरंजाम तोफखाना व बाणांच्या कैच्या वगैरे तयारीनें देखतपत्र पुण्यास यावें. आतां येथील आमची तयारी झाली. तुम्हीं लौकर यावें." अशीं पत्रें नागपुरास भोसले यांस सरकारचीं गेलीं. त्याजवरून रघोजी भोसले फौजेसुद्धां तयारी करून डेरेदाखल झाले. मग तेथून कूच करून पुण्यास येऊन पोहोंचले. त्या समयीं श्रीमंत पुढें सामोरे जाऊन, श्रीमंतांच्या भेटी होऊन सर्व मजकूर परस्परें बोलण्यांत आले. मग भोसले येऊन आपल्या तळावर पन्नास हजार फौजेनिशीं उतरले. तसेच हिंदुस्थानांतून तुकोजीराव होळकर साठ हजार फौजेनिशीं समागमें तोफखानासुद्धां येऊन दाखल झाले. त्यांच्या भेटी सरकारशीं झाल्या. नंतर होळकरही आपले तळावर जाऊन उतरले. त्याप्रमाणें गुजराथेंतून फत्तेसिंग गायकवाड व गोविंदराव गायकवाडसुद्धां चाळीस हजार फौजेनिशीं पुण्यास येऊन पोहोंचले. त्यांच्या व सरकारच्या भेटी झाल्या. त्याप्रमाणें शिंदे यांजकडील जिवबादादा बक्षी हिंदुस्थानांत होते, त्यांस बलावणें पोहोंचतांच तेही पंचवीस हजार फौजेनिशीं वानवडीच्या तळावर शिंदे यांचे लष्करांत येऊन पोहोंचले.

नंतर जिवबाबदादा बक्षी ह्यांच्या व सरकारच्या भेटी व नानांचीही भेट झाली. बोलणीं चालणीं झालीं. सरदारी प्रकरणीं नजर द्यावयाची व वस्त्रें द्यावयाचीं याविषयीं बोलणीं बहूत झालीं. तेव्हां सरकारचे मर्जीचा कल नजर द्यावयाचा जिबाबदादा ह्यांनीं पाहिला. त्या वेळेस जिवबादादा बक्षी यांनीं सरकारांत विनंती केली कीं, "आम्ही सरकारचे खानाजाद. सरकारानीं आम्हास

१९. 'मैनत दौला' व 'मैनात दौला' असें अनुक्रमें कल्याणच्या व भिवपूरच्या प्रतींत आहे. २०. खानाजाद = चाकरांचीं मुलें.

मोठ्या वैभवास आणिलें. सगळ्या मुलखांत लौकिक वाढला असतां[21] सरकारची मर्जी नजर घ्यावयाची याविषयीं मी विनंती करितों ही ध्यानांत आणावी. 'हल्लीं सरकार मोंगलावर स्वारी करून जाणार.मोठा कट्टा सरंजाम करण्याची तयारी चालली आहे. त्यापेक्षां हीच मोहिम सेवकास सांगावी म्हणजे मसलत बिन पेशावांचून [पार नेतों व ] सरकारची चाकरी बजावून मोंगल याचा मोड करून, सरकारची फत्ते करून येतों." अशी गोष्ट शिंदे यांचे कारभारी यांची ऐकिल्यावर सरकारचे मर्जीस ती गोष्ट येऊन "बरें आहे," असें बोलून दौलतराव शिंदे यांचे नांवें सरदारीचीं वस्त्रें सरकारांतून दिलीं, आणि नजर घेण्याची मना झाली. आणि त्यांत सरकारची आज्ञा झाली कीं, "मसलती[22] संबंधीं तुम्हांस पैका मिळावयाचा नाहीं." ती गोष्ट ऐकून शिंदे यांनीं [ तें ] कबूल केलें.

पुढें तयारीचा बेत चालला. आणखी सरदार विंचुरकर, पटवर्धन, रास्ते, राजेबहादर, बहिरो अनंत, रंगराव ओढेकर, घोरपडे, निंबाळकर, जाधव वाघोलीकर, भोइंजकर व गांडापूरकर—भोइटे, पाटणकर, दरेकर, शितोळे, ऐतोळे, आटोळे, पोंवार सुपेकर, मलठणकर, आमदाबादकर, नगरदेवळेकर, सोमौशी, धारकर पोंवार, थोरात, मोहिते, शिर्के, पुरंदरे, पानशे, कुरुंदवाडकर पटवर्धन, मिरजकर पटवर्धन, विंचुरकर, कितूरकर देसाई, सुरापुरकर बेरड, सिंदखेडकर जाधव, असे लहान थोर सरदार जमा झाले. किती म्हणून नांवें लिहावीं !

खेरीज सरकारची हुजुरात बावन्न पागा, निळकंठराव रामचंद्र पागे, बळवंतराव थोरात, भास्कर जगन्नाथ, बाबुराव अनंत, निकम, धायबर, भोइटे व अमृतराव यशवंत, अशा बावन्न पागा आपल्या तयारीनें दाखल झाल्या. शिवाय पथकी यशवंतराव तापकीर व रणनवरे यांचें पथक अशीं झाडून पथकें जमा झालीं. खेरीज शिलेदार, एकांडे, अक्कलकोटवाले भोसले व किरकोळ सरंजामी असे कुल[23] जमा झाले. तोफखान्याचे सरदार पानसे यांणीं तोफखान्याची तयारी करून, दारूगोळा पक्कें सामान करून, दोनशें तोफा सरकार-तोफखान्यांतील गाड्यांवर चढवून तोफखाना बाहेर निघाला.

२१. भिव० प्रतींत 'आतां' असें आहे. २२.इंदूर प्रतींत 'लढाई संबंधीं' असें आहे. २३ कुल=सर्व

पंचवीस हजार गारदी पायदळ तोफखान्याचे रखवालीस. शिवाय कामाठी, बेलदार, गोलंदाज, खलाशी व तबलदार खलाशी[24], दारूगोळ्यांचे छकडे, असा सरंजाम पन्नास हजार बैलसुद्धां जमावचा जमाव शहरा बाहेर जाऊन उतरला.

तसेच जितके सरदार आले होते तितकेही आपआपल्या जागांवर जाऊन उतरले. अष्टप्रधान, पंतप्रतिनिधी, पंतसचिव, असे आपल्या सरंजामानिशीं बाहेर जाऊन उतरले. सरकारचे डेरे सुमुहूर्तानें बाहेर जाऊन गारपिरावर दिले. त्यांचे सभोंवतीं फौज, सरदार, मानकरी, पागे असे जाऊन आपआपल्या मिसळीनें[25] उतरले. शिवाय पायदळ, गारदी यांचे रिसालदार[26] राघोपंत गडबोले, विनायकपंत परांजपे, गणेश हरी पंडित, बळवंतराव काशी, असे झाडून रिसाले गारदी यांचे, शहामीरखां रोहिले, सरकारचीं पलटणें, मु सौं मु त्र क व मु सा ना र द[27] असें सारें पायदळ साठ हजार डेऱ्याभोंवतें येऊन उतरलें. होळकर, गायकवाड, शिंदे, भोसले, असे सरकारच्या डेऱ्यांजवळ ज्या ठिकाणीं उतरावयाचे त्या ठिकाणीं जाऊन उतरले. शिंदे सरकारच्या डेऱ्याची उजवी बाजू संभाळून, लाख फौजेनिशीं, तोफखाना पसरून उतरले. सरकारची स्वारी निघण्यास मुहूर्तांचा अवकाश होता, सबब झाडून फौजेचा मुक्काम बाहेर झाला. मानाजी फांकडे रुसले होते त्यांची समजूत करून, त्यांसही बरोबर जाण्याची आज्ञा सरकारची झाली. याप्रमाणें मानाजी शिंदे आपले सरंजामानिशीं गारपिरावर जाऊन उतरले. तसेच राघोबादादा पटवर्धन, चिंतामणराव पटवर्धन, तसेच मिरजकर पटवर्धन, असे आपआपल्या फौजेनिशीं बाहेर जाऊन उतरले. असा सारा समुदाय गारपिरापासून आसपास चौफेर जाऊन उतरल्यावर बेरीज घेतां तीन लक्ष घोडा, खेरीज पायदळ लाख दीड लाख, एकूण चार साडेचार लक्ष फौजेचा तळ पडला.

पुण्याचा बंदोबस्त माधवराव रामचंद्र कानडे यांजकडे सांगून त्यांजला

---

२४. तबलदार = फरासखान्यांतला कामाठी. खलाशी = तोफा ओढण्यासाठीं ठेविलेले लोक. २५. मिसळीनें (मिसल) योग्यनेमुरूप नेमिलेल्या जागांवर, २६. रिसालदार = रिसाल्याचा मुख्य. रिसाला = घोडदळ, कवाइती घोडेस्वार. २७. 'मुसा' इत्यादि आरब लोकांच्या जमादारांचीं नांवें होत. 'मुसा हा हुद्दा किंवा पदवी.

पुणें मुक्कामीं ठेविलें. त्यांचे तैनातीस शहरचे बंदोबस्तासाठीं ७-८ हजार स्वार खेरीज पायदळ ५-७ हजार, खेरीज हशमी लोक. शहरची नाकेबंदी वगैरे सारा बंदोबस्त कानडे यांच्या मुखत्यारीनें ठेविला.

बाहेरच्या फौजेचा कूच मुक्काम तोफेवर होऊं लागला. बारा कोसांचा तळ मुक्काम होईल तेथें पडूं लागला. लष्करचे बाजार बाहेर जाऊन लष्करचे लष्करांत उतरले. सरकारी जामदारखाना पोतनीससुद्धां व कारकून मंडळी व खासबदार व जामदार जामदारखान्याचे रखवालीचे लोक स्वार सरकारच्या डेऱ्या जवळ पिछाडीस जामदारखान्याचा डेरा व राहुट्या उभ्या करून उतरले. तसाच फडणिशीकडील डेरा उजवे बाजूस उतरला. जेथें नाना फडणीस यांचा डेरा होता तेथें दफतराचा डेरा दफतरासुद्धां उतरला. अशी स्वारीची तयारी झाली. वरकड दरकदार, मुजुमदार व चिटणीस असे बाहेर जाऊन डेऱ्यापाशीं उतरले. पुढें श्रीमंतांची स्वारी जाण्याचा मुहूर्त आठ पंधरा दिवस राहिला असतां त्याच्या आगोदर नाना फडणीस सुमुहूर्तानें जाऊन उतरले. तेव्हां साडेचार लक्ष फौजेवर हुकूम नानांचा! त्या वेळेस नबाबाचे वकिलांनीं पत्रें डाकेंत रवाना केलीं कीं, "पेशवे ह्यांची तयारी होऊन खांसा स्वारी डेरे-दाखल झाले.

याप्रमाणें हैद्राबादेस पत्रें पोहचतांच मोंगल आपली तयारी करून खांसा नबाब भागानगराच्या बाहेर तमाम फौजेसुद्धां डेरे-दाखल झाला. नबाब यानेंही सरंजाम मोठा लढाईचा केला. दोन लाख स्वार, खेरीज पायदळ, शिवाय पलटणें, समागमें तोफा व बाणांच्या कैच्या, असा पक्का सरंजाम करून, खेरीज सरंजामी रावरंभा निंबाळकर, माने, जाबरजंग घोंसा, सुबानखां व सलाबतखां. वगैरे झाडून कुल सरंजाम आपआपले फौजेनिशीं व भारमल असे आले त्यांनीं लढाईची हिंमत धरली. अशीं पत्रें सरकारचे वकील तेथें होते त्यांनीं सरकारांत लिहिलीं तीं येऊन पोहोंचलीं.

मग सारी तयारी झाल्यानंतर श्रीमंत रावसाहेब पौषमासीं, सुमुहूर्तानें प्रातःकाळीं, बारा घटिका दिवसास, वाड्यांतून देवांस नमस्कार करून, ब्राह्मणांस दक्षिणा वांटून बाहेर निघाले. त्या दिवशीं गारपिरावर सरकारची स्वारी डेऱ्यास न्यावयास खासे खासे अवघे आलेः—१ रघोजी भोसले, २ दौलतराव शिंदे,

---

२७. जाबरजंग घोंसा=जफरजंग घोंसा.

३ तुकोजीराव होळकर, ४फत्तेसिंग गायकवाड, ५जानराव नाईक निंबाळकर, ६तुळाजीराव घोरपडे, ७ फत्तेसिंग भोसले अक्कलकोटवाले, ८जोत्याजी जाधव, ९ हणमंतराव जाधव, १० खंडेराव जाधव, ११ पोंवार नगरदेवळेकर, १२ धारकर, १३ मलठणकर, १४ अहमदाबादकर, १५ सुपेकर, तसेच १६ सोमोशी, सरकारचे पागे, १७ निळकंठराव रामचंद्र, १८ भास्कर जगन्नाथ, १९ बाबूराव अनंत, २० निकम धायबर, २१ थोरात, २२ चव्हाण, २३ भोइटे, २४ अवधूतराव यशवंत, असे बावन्न पागे; नांवें लिहितां दुसरें भारत व्हावयाचें! किती नांवें लिहावीं? ब्राह्मण सरदार परशुरामभाऊ पटवर्धन, रघुनाथराव पटवर्धन, चिंतामणराव पटवर्धन, विंचुरकर, राजेबहाद्दूर, बाळासाहेब मिरजकर पटवर्धन, रंगराव ओढेकर, पंतप्रतिनिधी, पंतसचिव, बाहिरो अनंत, पानशे, पुरंदरे, असे किती लिहावे! खेरीज मानकरी पाटणकर, दरेकर, जाधव, भोइटे, असे आपआपल्या सरंजामानिशीं श्रीमंतांस न्यावयास आले. तसेच पायदळाचे रिसालदार व दफेदार व *चाऊस असे खासे खासे शहरांत आले; तरी दहा पंधरा हजार फौज शहरांत जमा झाली.

तेव्हां श्रीमंतांची स्वारी ब्राह्मणांस देकार वांटून निघाली. त्या दिवशीं हत्तीवर रुप्याची अंबारी, हत्ती मोठा सजविलेला, रुप्याच्या घांटा, घांगुरमाळा सोन्याच्या, सोन्याचीं पिंपळपानें, पायीं तोडे, अशा हत्तीवर सरकारची स्वारी बसली. पाठीमागें खवासखान्यांत आपा बळवंत व अमृतराव पेंठे, एकाचे हातीं चवरी व एकाचे हातीं मोरचेल, असे वारीत बसले. पुढें जरीपटक्याच्या हत्तीं, शिवाय शेंपन्नास जिलबीचे हत्ती चौघड्यासह चालले होते. तसेच पायदळाचे रिसालदार व जमादार वगैरे आपापल्या निशाणाचे फरारे सोडून तासे मर्फे वाजवीत जिलबेस चालले. हत्तीवर नौबदी वाजों लागल्या. अशी सरकारची स्वारी बाहेर निघाली. त्या दिवशीं पुण्यांतील मंडळी समागमें जाण्याचीं [ पैकीं ] कोणी पाठीमागें राहिला नाहीं. तमाम झाडून कारकून व दरकदार व पागे, पथके मागें राहिले होते ते झाडून निघाले. अशा थाटानें स्वारी भर दोन प्रहरीं गारपिरावर डेऱ्यास दाखल झाली. पुण्याचा बंदोबस्त झाडून

---

*चाऊस=आरब लोकांच्या जमादारांचा हुद्दा.

माधवराव रामचंद्र यांस सांगितला तो मजकूर पूर्वींच लिहिला आहे. त्याप्रमाणें मशारनिल्हे यांनीं शहरचा बंदोबस्त केला.

स्वारी गारपिरावर दाखल झाल्यानंतर आठ दहा दिवस मुक्काम तेथेंच होता. सारी मंडळी [ तेथेंच असून ] दरबार, मुलकी कारभार तेथेंच होत होता. असें होत असतां गारपिरावरून सरकारचा कूच होऊन पुढें नक डाळिला†. त्या दिवशीं अघाडी पिछाडी झाली. तेथें दोन मुक्काम होऊन तेथून कूच झाला तो पांच कोसांवर मुक्काम झाला. त्या मुक्कामीं फौजेची हजिरी गणती सारी झाली; कोणी पाठीमागें राहिला नाहीं. कूच झाल्यानंतर गार-दौंडेवर मुक्काम सरकारचा गेला. गार-दौंड पुण्यापासून अठरा एकोणीस कोस आहे. त्या मुक्कामीं गेल्यानंतर सरकारची आज्ञा झाली कीं, " जेथून मोंगलाई मुलूख आहे त्या मुलखांच्या जप्त्याकरून सरकारचीं ठाणीं बसवावीं. अशी आज्ञा होतांच कारभारी यांणीं सनदा पत्रें करावयास आरंभ केला. त्या समयीं मामलेदार समागमें होते व कित्येक पुणें मुक्कामीं होते त्या अवघ्यांस ताकिदी सरकारच्या झाल्या, तेव्हां मामलेदार लष्करांत दाखल झाले. मग तेथून मामलेदार खानदेश, बागलाण, गंगथडी, भिवरथडी, इकडे माणदेश ते तहत वऱ्हाड पावेतों सरकारच्या जप्तीच्या सनदा घेऊन गेले. तसेंच बेदर पावेतों अंमल सरकारचा बसला. साऱ्या मुलखाच्या जप्त्या झाल्या. सरकारचा अंमल चालूं लागला. असा कारभार गार-दौंडचे मुक्कामीं झाला. नंतर स्वारी तेथून कूच होऊन पुढें चालले. त्या मुक्कामाहून नवाबाचे वकिलांनीं नबाबास लिहिलें कीं, " श्रीमंत गार-दौंडच्या अलीकडे आले. सारा मुलूख आपला जप्त करून सरकार पेशवे यांचे मामलेदार ठाणीं बसवावयास मुलुखांत गेले." तशींच श्रीमंतांच्या वकिलांचीं पत्रें हैद्राबादेहून आलीं कीं, " नबाब येथून कूच करून चार मजला सरंजामसुद्धां गेले."

सरकारच्या सनदा घेऊन मोंगलाई मुलखांत अंमल बसवावयास गेले होते त्यांपैकीं कित्येकांचे अंमल चालू झाले. कित्येकांचीं ठाणीं बसलीं नाहींत. त्यांचे बोभाट लष्करांत आले. त्यासमयीं सरकारची आज्ञा त्यांस अशी गेली कीं, " सरंजाम नवा ठेवून अंमल बसवावा. यांत कोणी कमती करूं नये." अशी आज्ञा सरकारची जातांच तमाम मामलेदार यांनीं त्याप्रमाणें सरंजाम

† डाळिला = हालविला.

ठेवून सर्व मुलुखांचीं ठाणीं घेतलीं. सरकारचा अंमल चालू केला. औरंगाबाद प्रांतीचे महाल येथें अंमल बसावयास थोडीशी दिक्कत लागली होती. परंतु श्रीमंतांचा पुण्य-प्रताप सबळ, सर्व मुलुखांचा अंमल चालू झाला. असा बंदोबस्त झाल्यानंतर सरकारचा कूच गार-दौंडेहून होऊन पुढें मजल दरमजल चालले.

तिकडून मोंगलही कूच दरकूच चालून आले.ते खरड्याच्या मैदानांत आले. खरडें हा गांव मोंगलांचा म्हणून नबाबांनीं मुक्काम गांव पाठीशीं घालून केला. श्रीमंतांची स्वारी मजल दरमजल जाऊन खर्ड्याचे मैदानांत जाऊन पोहोंचली. त्या वेळेस पुढें जाऊन नदी वाहत होती ती पाठीशीं घालून सरकारच्या फौजा तमाम झाडून उतरल्या. मध्यें हुजुरात उतरली. बाबा फडके यांनीं जरीपटका घेऊन चाळीस हजार हुजुरातीनिशीं तेथें मुक्काम केला. त्यांच्या पुढें सरकरची बिनी लागली. त्याच बेतानें सारे सरदार शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरवाले भोसले, पटवर्धन मंडळी, विंचुरकर, ओढेकर, किरकोळ सरंजामी, जाधव, भोइटे, घोरपडे, निंबाळकर, थोरात, असे तमाम उतरले. शिंदेही उतरले. त्यांनीं आपले लष्करचे तोंडावर तोफखाना उतरविला. पुढें झाडून पायदळ कंपू तोफखान्या सभोंवतीं उतरले. त्यांचे पाठीमागें सारें लष्कर उतरलें. त्याच बेतानें होळकरही त्या मुक्कामीं तसाच तोफखाना तोंडीं देऊन राहिले. त्याचप्रमाणें सरकारचाही तोफखाना जाऊन उतरला. त्यांचे मागें पुढें फौजेचा तळ झाला. त्याचे मागें श्रीमंत रावसाहेब यांचा मुक्काम झाला, तो त्या फौजेपासून दोन कोसांच्या छाट्यानें पाठीमागें झाला. जेथें श्रीमंत उतरले त्या ठिकाणीं पन्नास साठ हजार स्वार खासे खासे मोठे धारकरी[२९] श्रीमंतांसमागमें राहिले. तसेंच पायदळ पाठीमागें पंचवीस हजार निवडक शिद्दी, आरब, रोहिले, व पठाण असे कडवे माणूस जेथें श्रीमंतांचा मुक्काम झाला तेथें त्यांचे समागमें राहिले. बाकीचे लोक पुढें तोंडीं, पाणी पाठीमागें घालून, मोंगल ह्यांचे तोंडावर जाऊन उतरले. मोंगलांच्या फौजेस व श्रीमंतांच्या फौजेस दोन कोसांचा छाटा दरम्यान राहिला. अशा फौजा तमाम जाऊन उतरल्या.

जेथें श्रीमंतांचा डेरा अघाडीस दिला होता, त्याचे पुढें सरकारची बिनी व

---

२९. धारकरी = तरवार बहादर, वीर.

ढाल[30] उभी राहिली. त्यांच्या रखवालीस पागा सरकारच्या ढालेपाशीं उतरल्या. त्यांचे मागें बिनीवाले उतरले. ज्या ठिकाणीं सरकारचा डेरा झाला होता त्याच्या मिसळींनीं जशी ज्याची मिसळ आली तसे उतरले. सरकारच्या डेऱ्याजवळ हुजरात, जरीपटका फौजेसुद्धां बाबा फडके व नारोपंत चक्रदेव उतरले. बाकी सरदार आपआपल्या मिसळीनें डेऱ्याची डावी उजवी बाजू संभाळून पाठीमागें पुढें तमाम फौजा व सरदार शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन, विंचुरकर, घोरपडे, निंबाळकर, असे मानकरी व सरदार लहान थोर उतरले. दर खेपेस नांवें किती लिहावीं ? श्रीमंतांचे फौजेचा मुक्काम झाला त्याचे उजवे बाजूस रघोजी राजे भोसले आपल्या सरंजामानिशीं उतरले. सरकारचा तोफखाना अघाडीस उतरला, तसाच शिंदे होळकर यांचाही उतरला. मोंगल व पेशवे ह्यांचा मुक्काम झाला. कांहीं लढाईचें तोंड लागलें नाहीं.

असे पंधरा दिवस मुक्काम करून अवघ्यांची तयारी लढाईची झाली. लष्कराच्या कह्या मुलकांत दोन्हींकडून होऊं लागल्या. असें होत असतां एके दिवशीं मोंगलांकडील कहीवाले[31] व पेशवे ह्यांजकडील कहीवाले यांचा कज्जा झाला तो मोठा झाला. तेव्हां मोंगलाकडील कहीवाले यांणीं श्रीमंतांकडील कहीवाले कज्ज्यामध्यें हटविले. तेव्हां कही समागमें कांहीं पागा रखवालीस होत्या. तेव्हां पागादाल्यांशीं व नबाबाकडील रखवालीस स्वार होते त्यांशीं कटकट जुंपली. त्यासमयीं कटकट मोठीच झाली. तेव्हां मोंगलांकडील स्वार बहूत होते. श्रीमंतांकडील पागा दोनचार रखवालीस होत्या त्यामुळें सरकारच्या पागेचा मोड झाला व सरकारचे कहीवाले ही मारले गेले.

तेव्हां सारे पळ काढून फौजेंत आले. मोंगलांचे स्वार पाठीमागें लागले. सरकारच्या पागा पळत पळत आल्या. त्यामुळें लष्करांत तयारीची हूल पडली. तें पाहून बाबा फडके तयार होऊन चाळीस हजार स्वार हुजुरातीचे व जरीपटका घेऊन पुढें सरसावले. ते समयीं नबाबाकडील दहा वीस हजार स्वार तोंडावर होता त्यांशीं व यांशीं लढाईचा प्रारंभ होतांच मोंगलांकडील

---

३०. बिनी व ढाल. ( बिनी = सैन्याचा अग्रभाग किंवा पागोट्याचा अग्रभाग. ढाल = निशाण किंवा चर्म ) निशाणें. ३१. कहीवाले = दाणा वैरण आणणारे. कही = दाणा वैरण आणणारांची टोळी.

चाळीस हजार पठाण, मोठमोठे धारकरी, आंगांत चिलखतें असे, बंदुकीचे आवाज करीत बाबा फडके यांजवर उठावले. त्या समयीं लढाई मोठी मातबर होऊं लागली. बाबा फडके मोठे शूर [ पण ] जन्मांत कधीं लढाई पाहिली नाहीं व आंगावर कधीं जखम नाहीं, त्यामुळें लढाईमध्यें कच खाऊन पळ काढिला. हें पाहून परशुराम भाऊ पटवर्धन [ व ] वरकड मानकरी अशी वीस हजार फौजेची मांड उठली. तेव्हां अगोदर परशुराम भाऊ पटवर्धन पुढें धावून सरकारचे जरीपटक्याचा हत्ती माघारा फिरला होता त्याजवर मोंगलांकडील पठाण जरीपटक्यावर चालून आले आणि जरीपटका घेऊन जातात हें पाहून पंधरा हजार फौजेनिशीं जरीपटक्याचे हत्तीपाशीं जाऊन पोहोंचले. तेव्हां हत्ती माघारा फिरून, उभा करून लढाईचें तोंड लागलें.

इतक्या मजकुराचें वर्तमान सांडणीस्वार घेऊन माघारे गेले. जेथें श्रीमंत उतरले होते तेथें येऊन वर्तमान कळविलें. ते समयीं नाना फडणीस घाबरले आणि श्रीमंतांचा तळ मागें हटवावा अशी मसलत नानाचे मनांत आली. त्या समयीं श्रीमंतांजवळ पागे, पथके व मानकरी व सरदार असे पन्नास साठ हजार स्वार निवडक होते त्यांनीं नानांस विनंती केली कीं, “ इतके आपण घाबरलां कां ? अजून लढाईचें तोंड पुरतें लागलें नाहीं तोंच आपण एवढे हवालदील होऊं नये. अशी मसलत करूं नये. हें नीट नाहीं. आम्ही आज पन्नास साठ हजार स्वार एक्या मांडीचे आहोंत. इतक्या फौजेनिशीं सारा मोंगल बुडवूं. ” अशी हिमतीची गोष्ट नाना ह्यानीं ऐकिल्यावर दोन चार चिठ्या लिहून एक शिंदे यांस व [एक] होळकर यांस व [एक] गायकवाड यांस व [एक] भोसले यांस अशा लिहिल्या कीं, “ मोंगलांची फौज सरकारचे जरीपटक्यावर धांवली असतां अजून तुम्हीं सारे स्वस्थ पाहतां, यास काय म्हणावें ? आतां लढाईची तयारी करून नवाब आपले कबजांत आणावा. ” अशा चिठ्या सांडणीस्वार घेऊन येऊन पोहोंचे तों इकडे लढाईचें तोंड लागलें होतें तें पाहून साऱ्या फौजा तयार होऊन पुढें सरसावल्या. लढाई मोठ्या शर्तेची झाली. तेव्हां सांडणी स्वार सरकारच्या चिठ्या घेऊन आला. तो ज्याप्रमाणें ज्यांच्या नांवाच्या चिठ्या होत्या त्याप्रमाणें सर्वांस पोहोंचत्या करता झाला. त्याप्रमाणें सारे सरदार तयार होऊन लढाईस निघाले. त्या वेळेस जिवबा बक्षी निसबत शिंदे यांणीं ती चिठ्ठी पाहून सरकारांत विनंती लिहिली कीं, “ थोडेसें

लढाईचें तोंड लागलें इतक्यामुळें सरकार घाबरून सांडणीस्वार रवाना केला त्यास हल्लीं विनंती लिहिली आहे. लढाईची सरसी करून नबाब निजामअलीखां यांस जिवंत धरून आणूं किंवा डोकें कापून आणूं ? याची काय ती आज्ञा यावी." ते वेळेस चिट्ठी नानांनीं वाचून त्याचें उत्तर लिहून पाठविलें कीं, " नबाबाचे जिवास धक्का न लागतां लढाई फत्ते करून ज्यांस आणावयाची गरज ते धरून आणावे " असें चिट्ठीचें उत्तर लिहून पाठविलें.

इकडे शिंदे तयार होऊन, तोफखाना तयार करून, पुढें तोंडीं तोफखाना पसरून, पाठीमागें सारी फौज उभी राहिली. तसेच तुकोजी होळकर ५०।६० हजार स्वार तयार करून समागमें १०।२० हजार पेंढार घेऊन नबाबाचा मुक्काम होता त्याचे पिछाडीस जाऊन मोंगल यांची होळकर यांनीं दुमदारी[३२] संभाळली. तसेच गायकवाड ४० हजार फौजेनिशीं तयार होऊन कमरग्यामध्यें[३३] शिरले. पुढें तोंडीं सरकारची हुजुरात, घोरपडे, निंबाळकर, दरेकर, पाटणकर, भोइटे, पोंवार, असे पुढच्या तोंडीं झटून पडले. इकडे रघोजी राजे भोसले तयार होऊन लढाईस सिद्ध झाले.

पूर्वी बाबा फडके लढाईस कच खाऊन माघारे फिरले.त्या वेळेस परशुराम भाऊ पटवर्धन वगैरे, रास्ते, विंचुरकरसुद्धां, वीस हजार फौजेची मांड उठून नबाबाचे फौजेवर धावले. त्या वेळेस परशुराम भाऊ वगैरे यांची लढाई मोठी मातबर झाली. त्या लढाईत परशुरामभाऊ यांचे पुतणे विठ्ठलराव लढाईत कामास आले. ती लढाई मोठी जुरतीची[३४] होऊं लागली. त्या समयीं नबाबा-कडील सरदार रावरंभा निंबाळकर व भारमल माने व जहाजंग[३५] धोंसा व मोठमोठे पठाण असे दोन लाख स्वार सरकारचे फौजेवर चालोन आले. त्या समयीं लढाईची मोठी गर्दी झाली. तेव्हां भोसले यांणीं बाणांचा मार मोठा केला व शिंदे यांजकडील तोफखाना सुरू झाला. तसाच सरकारचा तोफखाना [ चालू झाला. ] नबाबाचा तोफखाना जेथें उभा होता त्या ठिकाणीं पानशे यांणीं आपल्या तोफा लागू केल्या. इकडे शिंद्यांचा तोफखाना सुटूं लागला. भोसले यांजकडील बाणांचा मार पाठीमागून. गायकवाड मध्यें. अशी

---

३२. दुमदारी=( शेंपूट ) पिछाडी. ३३. कमरगा=पार्श्वभाग. ३४. जुरतीची= आवेशाची. ३५. पृष्ठ १६४ यांतील ' जाबरजंग '

लढाईची मोठी एकच गर्दी झाली. तोफेच्या धुरानें कोणी कोणास दिसेनासें झालें. पाठीमागून होळकर यांणीं फौजेची लांडगेतोंड[३६] फार केली. असे दोन अडीच प्रहरपर्यंत लढाईचा सारे फौजेनें भारी जोर मांडला. त्या लढाईत हजारों लोक जखमी झाले व कितीक ठार पडले. अशी लढाई तीन प्रहरपर्यंत होत होती. तेव्हां भोसल्याकडील बाणांनीं मोठा मार केला. त्या समयास मोंगलांकडील सरदार रावरंभा व भारमल्ल, सुभानखां व सलाबतखां असे पठाण मोठे मोठे एक्या मांडीचे चाळीस हजार उठले. त्या वेळेस मोठी गर्दी त्यांणीं लढाईची केली. त्या समयीं श्रीमंतांकडील मार चोहींकडून होऊं लागला. होळकर पाठीमागून शिरले. मध्यें कमरग्यांत गायकवाड. तोंडीं समोर भोसले, सरकारी हुजुरात, परशुराम भाऊ पटवर्धन व शिंदे असे एकदांच हर हर! महादेव! म्हणोन लढाईस घसरले. त्या वेळेस शिंद्यांचा तोफखाना सुटूं लागला. भोसले यांजकडील बाणांचा मार व सरकारची हुजरात व परशुराम भाऊ असे एकदांच लढाईस अवघे झटून पडले. त्या समयीं नबाबाकडील सरदार रावरंभा निंबाळकर वगैरे सर्व एकदांच जुटून पडले. त्या समयास एक प्रहरपर्यंत लढाई मोठी शरतेची झाली. त्यांत भोसले यांजकडील सरदार एक दोन फार जायां झाले. भोसले यांजकडील मार कठीण. एक बाणानें पांच सात असामी घेत.

अशी गर्दीची लढाई होत असतां मोंगलांची फौज कचली. त्या समयास नवाब निजामअल्लीखां अंबारींत बसले होते, त्यांणीं तें पाहून हत्ती आपला माघारा फिरविला. त्या वेळेस नबाबांनीं आपले ठिकाणीं विचार केला. "हा वक्त मोठा आला आहे. मराठे आतां लढाईस मागें हटत नाहींत." असा विचार करून माघारे फिरले. ते खरड्यामध्यें शिरले. त्यांजकडील फौजेनें हें पाहून सारे सरदार माघारे उलटले. पाठीमागें होळकर लढाईत होते त्यांणींही फौज बहूत खराब केली. त्यामुळें चोहीं कडून लढाईचें तोंड लागलें. नबाब गांवांत शिरले त्यामुळें त्यांजकडील सरदार सारे गांवांत शिरले. त्या वेळेस पेशव्यांकडील व नबाबाकडील मिळून १०-१५-हजार माणूस युद्धांत ठार झालें. व मोठे मोठे नामांकित सरदार नबाबाकडील बहूत जखमी झाले. त्यामुळें या अल्ला! या खुदा! असा वक्त आम्हांवर अणलास!" असें म्हणून सारी फौज

३६. लांडगा मेंढराची तोड (=नाश) करितो तशी.

लढाईचें तोंड सोडून माघारी फिरली. श्रीमंतांची फत्ते झाली. नबाबाची फौज कांहीं खरड्यांत गेली व कांहीं बाहेर होती. अशी धुळधाणी फौजेची झाली. पाणी प्यावयास कोणास नाहीं. श्रीमंतांचे फौजेनें पाणी पाठीमागें घातलें. त्यामुळें मोंगलाचे लष्कराचे लोकांस पाण्याचा मोठा तारोळा[३७] झाला. रुपयाचें कटोरा पाणी विकूं लागलें. असे अडचणींत मोंगल पडून हाईस[३८] आले. त्या समयीं सल्ल्याचें बोलणें लाविलें.

ही बातमी पाठीमागें श्रीमंत उतरले होते त्या तळावर आली. लढाई फत्ते झाल्याचें वर्तमान घेऊन सांडणीस्वार आला. तेव्हां तें पाहून मोठी हुशारी[३९] झाली. नबाब तीन दिवस खरड्यांत कोंडलेले राहिले. त्यामुळें जनावरांस व माणसांस पाणी नाहीं. इतके जेर झाले. नंतर तेथून नबाब यांणीं वकील आपले कडील श्रीमंतांकडे सल्ल्याचें बोलणें बोलावयास पाठविले. त्यांचे हातीं नबाब यांणीं आपली शिक्केकटार श्रीमंतांकडे पाठविली आणि वकिलाचे हातीं सांगून पाठविलें कीं, "जो मुलुक तुम्हांस घ्यावयाचा असेल तितका घेऊन आम्हांस काय ठेवावयाचा असेल तो ठेवावा." असें वकील यांस सांगून श्रीमंतांकडे पाठविलें. तेव्हां ते वकील श्रीमंतांचे लष्करांत येऊन, सरकारची भेट घेऊन नबाबानीं जो मजकूर सांगितला होता त्याप्रमाणें सरकारांत विनंती केली आणि शिक्केकटार पुढें ठेविली. हें पाहून नाना फडणीस यांणीं वकिलांस उत्तर केलें, "आम्हांस मुलूख घ्यावयाचा तो मुलूख आम्ही घेऊं. आमचा अंमल त्या मुलखांत चालतो. आतां तुम्ही सल्ल्याचें बोलणें बोलावयास आलां हें उत्तम आहे. तर मश्रुन्मुलुख आमचे स्वाधीन करावा आणि स्वारीखर्च आमचा काय झाला असेल तो द्यावा, शिवाय खंडणी. या प्रमाणें तह होत असल्यास होईल. तुम्ही शिक्केकटार आणिली आहे ती माघारी न्यावी. आतां तुम्हांशीं दुसरें बोलणें बोलावयास राहिलें नाहीं."

असें बोलणें सरकारचें होतांच मोंगल यांजकडील वकील माघारे जाऊन तेथें मजकूर झाला तो नबाबांस समजाविला. तो मजकूर ऐकून घेऊन

---

३७. तारोळा = तोटा. ३८. हाईस आले = थकले, व्याकुळ झाले, जेरीस आले. ३९. ग्रांट डफ. म्हणतो कीं, "विजयाची बातमी नानांनीं श्रीमंतांस सांगितल्यावर त्यांस हर्ष होण्याचें एकीकडे राहून मोंगलाची कमकुवत व मराठ्यांच्या रिकाम्या फुशारक्या पाहून त्यांस वाईट वाटलें!"

नबाब मोठे दिलगीर झाले. दिलगीर होऊन बोलतात, "खुदानें ऐसा वख्त हमारेपर लाया, क्या करना ? ए बात इन्की हम न सुने तो तह होता नहीं. क्या करना ?" असें बोलून मश्रुन्मुलूख यांस बलावून आणून झाला मजकूर त्यांस कळविला. आणि नबाब म्हणतात, "अब अघाडी कैशी बात करना ? मराठेका तो बडा जोर हुवा है. उनने जो कहां है [सो] किये बिगर पीछे फिरने नहीं." असें बोलणें ऐकून मश्रुन्मुलुख यांणीं नबाबास हात जोडून अर्ज केला कीं, "बहूत अच्छा है, आपके जीमे इस बातकी खतरा नही करना; सरकार हुकूम हुवा तो मैं उनके साथ जाता हूं." असें मश्रुन्मुलुख यांचें बोलणें ऐकून नबाब यांणीं फिरून वकील श्रीमंतांकडे सांगून पाठविलें कीं, "जसें तुम्ही म्हणतां त्या बोलण्याप्रमाणें आम्ही कबूल आहों. आतां फौज उठवून पाणी मोकळें करावें." अशी वकिलांनीं येऊन विनंती करतांच सरकारची मर्जी त्या वेळेस झाली. "बरें आहे. नबाब म्हणतात त्यापेक्षां याच्याहून आमचा आग्रह अधिक नाहीं." असें बोलून त्या वकिलांसमागमें आपलेकडील मोठे गृहस्थ पाठविले. त्यांणीं जाऊन नबाबांची भेट घेऊन सारें बोलणें केलें. त्या वेळेस नबाब यांणीं सांगितलें कीं, "मश्रुन्मुलुख यांस तुमचे स्वाधीन करतों. स्वारी-खर्च काय झाला असेल तो देतों." असे करारमदार होऊन श्रीमंतांकडील गेले होते ते माघारे येऊन नबाब निजामअलीखां याशीं बोलणें झालें तो मजकूर सारा सरकारांत समजाविला. तें नानांनीं ऐकून नाना बोलले "बरें आहे." मग उभयतांकडील वकील एक जागीं होऊन मोंगल यांचीं व पेशवे यांचीं तहपत्रें परस्पर होऊन वरतीं शिक्के झाले. त्यांत ४० लक्षांचा मुलूख मोंगल यांजपासून घेतला व दौलताबाद किल्ला घेतला व मश्रुन्मुलुख स्वाधीन करून देतों." असें ठरवून दोन्हीं कागदपत्रें परस्पर झालीं. मग ते वकील श्रीमंतांचे वकिलांसुद्धां श्रीमंतांचे लष्करांत येऊन तहपत्रें झालीं होतीं तीं सरकारांत समजावलीं. मग मश्रुन्मुलुख हवालीं करून घेण्यासाठीं नारोपंत चक्रदेव १० हजार फौज समागमें देऊन नबाब यांजकडे रवाना केले. ते मोंगल यांचे लष्करांत येऊन नबाबांची भेट घेऊन सारा मजकूर नबाब यांस विदित केला. त्याजवरून नबाब यांणीं ४० लक्षांच्या सनदा करून दिल्या व दौलताबाद किल्ल्याची सोडचिठ्ठी हवालीं केली. मग मश्रुन्मुलुख

त्यांस बलावून आणून नबाब यांणीं नारोपंत चक्रदेव यांचे हवालीं केलें. नारोपंत यांस पोषाग देऊन मार्गस्थ केलें. मग मशीर यांस घेऊन, नबाब यांचा हुकूम घेऊन मशीरसुद्धां माघारे फिरले. त्या समयीं मश्रुन्मुलुख हे आपला घरचा सरंजाम ५०० स्वार व दोन हत्ती असा घेऊन श्रीमंतांचे लष्करांत येऊन उतरले. सभोंवतीं फौज रखवालीस ठेविली व झाला मजकूर सरकारांत नारोपंत यांणीं समजाविला.

नंतर सांडणीस्वार शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले [व] वरकड सरदार यांस सरकारची आज्ञा घेऊन गेले कीं,नबाब निजामअल्लीखां यांणीं तह करून आपला दिवाण सरकारचे हवालीं केला. आतां तुम्हीं सारे त्यांचा शह सोडून पाणी मोकळें करून यावें." अशी आज्ञा जातांच सारे सरदार साऱ्या फौजांसुद्धां तेथून कूच करून माघारे फिरले. ते जेथें श्रीमंतांचा मुक्काम होता तेथें येऊन उतरले.

नंतर नबाब यांणीं ढाला[४०] माघाऱ्या भागानगराकडे फिरविल्या. त्यावेळेस नबाबाकडील सरकारांत बोलणीं बोलावयास नबाब यांणीं श्रीमंतांकडे पाठविले ते वकील येऊन श्रीमंतांची भेट घेऊन श्रीमंतांस त्यांणीं विनंती केली कीं,"आमच्या मुलखाच्या जप्त्या केल्या आहेत त्यांच्या सोडचिठ्ठ्या मामलेदार यांस द्याव्या, तो मजकूर ऐकून सरकारचें उत्तर वकिलांस असें झालें कीं, " आमची स्वारी पुण्यास दाखल झाल्याशिवाय सोडचिठ्ठ्या द्यावयाच्या नाहींत." असें उत्तर झाल्यानंतर मोंगलांकडील वकील माघारे गेले. स्वारीखर्चाचा पैका छकड्या भरून पाठवून दिला.

मग सरकारचा कूच तेथून होऊन पुण्याकडे ढाला फिरविल्या. तसेंच मोंगलही खरडें सोडून हैदराबादेस जाण्यासाठीं माघारे फिरले. श्रीमंत पुण्यास यावयास निघाले. मोठा जय संपादन केला.श्रीमंतांचा पुण्यप्रताप मोठा म्हणून लढाई फत्ते होऊन मोंगल यांचा दिवाण धरून आणिला. एरवीं चार महिन्यांत म्हणजे ही मसलत आटोपावी असा संकेत[४१] कोणाचा नव्हता. परंतु प्रभूचें

४०. ढाला फिरविणें=निशाणें फिरविणें(हें निघून जाण्याच्या सिद्धतेचें सूचक आहे.)
४१. संकेत=अटकळ ह्या अर्थी.

दैव उत्कृष्ठ ! पुण्याई मोठी! म्हणूनच ही मसलत पार झाली. एरवीं मोंगल म्हणून लढाईस हटतो असें नव्हतें. तोही पोक्त सरंजाम करून दोन लाख स्वार ज्याचे बराबर, खेरीज तोफखाना, शिवाय पायदळ, अशा सरंजामानिशीं आला होता. परंतु सरकारचें दैव मोठें याजमुळें मसलत शेवटास लागली.

श्रीमंत तेथून पुण्यास यावयास निघाले. तसेंच मोंगल फौजसुद्धां कूच करून हैदराबादेस जाण्यास निघाले. ते दर कूच भागानगरास जाऊन पोहोंचले. तसेच श्रीमंत, गायकवाड, भोसले, होळकर, शिंदेसुद्धां मजल दरमजल निघून पुण्यास आले. पुण्याचे बाहेर येऊन शहरापासून पांच कोसांवर सरकारचा मुक्काम झाला. शहरांत जावयास मुहूर्त वैशाख शुद्ध ५, शके १७१७, सन खंमस तिसैन मया व अलफ [ ११९५. ] त्या दिवशीं रात्रौ बारा घटिका रात्रीस शहरांत यावयास मुहूर्त होता. यासाठीं चार दिवस मुक्काम तेथें होऊन, कूच करून, शहरच्या दोन कोस छावणीनें येऊन झाला. मग तेथून शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड आपले तळावर जाऊन उतरले.

मग पंचमीचे दिवशीं सारे सरदार यांस सरकारची ताकीद झाली कीं, "आज रात्रौ शहरांत जावयाचें, त्यास सर्वांनीं आपआपले खांसे असतील, त्या मुख्य खांशांनिशीं सायंकाळचे चार घटिका दिवसास सरकारचे डेऱ्याजवळ यावें." त्याप्रमाणें सर्व सरदार होळकर व शिंदे, गायकवाड व भोसले, निंबाळकर, पटवर्धन, विंचूरकर, राजे बहादर, दरेकर, पाटणकर, पोंवार, शितोळे, आयतोळे, तसेच पंतप्रतिनिधी, पंतसचिव व आणखी संस्थानी तसेच पागे असे सर्व खासे अंबारी समवेत सरकारचे डेऱ्यापाशीं आले. तुकोजी होळकर, रघोजी राजे भोसले, फत्तेसिंग गायकवाड, गोविंदराव गायकवाड, दौलतराव शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, माधराव रास्ते, रघुनाथराव पटवर्धन, चिंतामणराव पटवर्धन व बाळासाहेब पटवर्धन, खंडेराव जिवाजी, विंचुरकर, राजे बहादर, बहिरो अनंत, कितुरकर देसाई, सुरापूरकर बेरड, व मालोजी राजे घोरपडे, जानराव नाईक निंबाळकर, फत्तेसिंग भोसले अक्कलकोटवाले, बहिरोजीराव भाटणकर, खंडेराव दरेकर, जोत्याजी जाधव व त्रिवर्ग जाधव, तसेच भुईंजकर, शिंदखेडकर, गांडापूरकर, भोइटे, थोरात, तसेच पोंवार, धारकर, सुपेकर, नगरदेवळेकर, मलठणकर, शिरके, मोहिते, असे मानकरी, किती

गणतीस धरावे ! तसेच सारे पागे घायबर, पायधुडे, थोरात, निकम, भोइटे, बापूराव अनंत, भास्कर जगन्नाथ, निळकंठराव रामचंद्र, अशा ५२ पागा इत्यादिकांचीं नांवें लिहितां मोठा विस्तार होईल म्हणून एकंदर पागा सांगितल्या. पुरंदरे, पानशे, आपा बळंवत, रंगराव ओढेकर, बन्याबापू मेहेंदळे, माधवराव रामचंद्र, चिनीवाले, शिवाय मुत्सद्दीमंडळ, मुख्य नाना फडणीस, नारोपंत चक्रदेव, बाबा फडके व महादाजीपंत गुरूजी, त्रिंबकराव परचुरे, बापू लेले, बाहिरोपंत, चिटणीस, पोतनीस, मुजुमदार, आंगरे असा किती लहान थोर सरदारांच्या नांवांचा विस्तार सांगावा ! असे सायंकाळचे समयीं सरकारचे डेऱ्यापाशीं येऊन आपआपले सरंजामानिशीं तयार होऊन उभे राहिले. खेरीज हुजरात जरीपटक्यासुद्धां, तसेच मानकरी, खेरीज शिलेदार व एकांडे व किरकोळ सरंजामी असे सर्वत्र लहान थोर तयार होऊन डेऱ्यापाशीं आले.

याच्या पूर्वी राघोपंत गडबोले दिवसा शहरांत तयारीसाठीं पाठविले होते त्यांणीं शहरांत येऊन आनंदराव काशी शहरचे कोतवाल यांस बलावून ताकीद केली कीं, " आज सरकारची स्वारी सुमुहूर्तानें येत आहे यासाठीं शहरचे रस्ते झाडून कुंकमाचे सडे घालावे. घाशीराम याचे तळ्यापासून सहत दरवाज्यापावेतों दुरस्ता बढाई बोलावून चिरागदानांची तयारी करावी आणि गुलालाच्या रांगोळ्या घालाव्या. " अशी ताकीद होतांच कोतवाल यांणीं सांगितल्यापेक्षां अधिक तयारी केली. तेव्हां सरकारची स्वारी घाशीराम याचे तळ्यापासून नीट शुक्रवारच्या रस्त्यानें बुधवारांतून वाड्यांत यावयाची तेथपर्यंत तळ्यापासून वाड्यापावेतों बढाई यांणीं दुरस्ता खांब ठोकून, वरतीं तक्के मांडून, त्यांजवर पणत्या दर पणतीस पावशेर तेल मावे अशा मोठ्या, लाविल्या. अशीं चिरागदानें लाविलीं. हजारों बुधले तेलाचे हमाऊ घेऊन उभे आहेत.

सरकारची स्वारी पहिल्या चार घटिका रात्रीस निघाली तेव्हां खासे खासे हुजरातीचे मानकरी व जरीपटका सर्वांपुढें चालता केला. हजार[४२] स्वार जरीपटक्या समागमें चालले. त्यांच्यामागें जितके सरदारांचे चौघडे होते तितके वाजूं लागले. त्यांच्या मागें माही-मरातबचे हत्ती पांच[४३]. त्यांच्या मागें नालकी

४२. " तों १०;००० स्वार " इंदूर व भिवपुरी प्रतींचा पाठ. ४३. " पुढें जिलबेस ५० हत्ती होते " इंदूरप्रत.

चाललीं. त्यांच्या मागें कोतवाल घोडे चारशें, सोन्याचे गंडे पट्टे घालून, गळ्यांत पुतळ्यांच्या माळा, पाठीवर भरगच्ची किनखापी झुली घातलेले, असे दुरस्ता मोतद्दार घेऊन चालले. त्यांचे पाठीमागें झाडून गारदी यांचे जमादार व *चाऊस, दफेदार व आरब व शिद्दी व रोहिले पठाण खांसे खांसे दोन हजार, निशाणांचे फरारे सोडून, ताशे मरफे वाजवीत चालले. त्यांच्या मागें खास जिलीब व सरकाराकडील व शिंदे यांजकडील व गायकवाड यांजकडील व भोसले यांजकडील बोथाट्या, विटे, बाण, बल्लम, खासबरदार, लगीसुद्धां हजार माणसें पुढें चालली आहेत. त्यांच्यामागें रुप्याची अंबारी हत्तीवर ठेवलेली, त्या अंबारींत खांसे श्रीमंत बसले. पाठीमागें खवासखान्यांत आपा बळवंत व अमृतराव पेंठे असे उभयतां बसले आहेत. एकाचे हातीं चवरी व एकाचे हातीं मोरचेल, असे श्रीमंतांवर वारितात. त्या हत्तीभोंवतीं मशाली हजारों लागल्या. पुढें जिलबेचे हत्ती होते त्यांजवर हवया लाविल्या. त्यांच्यापुढें शें दोनशें सांडणस्वार चालले आहेत. श्रीमंतांचे अंबारीबरोबर रघोजी राजे भोंसले, तसेच शिंदे, होळकर, गायकवाड, जितक्या सरदारांस अंबारी होती तितके सरदार अंबारींत बसून चालले. नाना फडणसिही ते दिवशीं अंबारींत बसले. अशी स्वारी थाटानें चालली असतां त्यांचे मागें साहेबनौबती हत्तीवर वीस पंचवीस वाजत चालल्या आहेत. त्या हत्तींच्या मागें दहा हजार स्वार खांसे खांसे चालले आहेत. त्यांच्या पाठीमागें उंटावरील नौबती शें दोनशें वाजतात. अशा थाटानें स्वारी शहरांत चालली. त्या समयीं पानसे यांच्या वाड्यापासून श्रीमंतांवर सोन्यारुप्याचीं फुलें उधळावयास प्रारंभ केला, तो तहत सरकारचे वाड्यापावेतों. सर्वांच्या पाठीमागें मश्रुन्मुलुख धरून आणिला होता तो हत्तींचे हौद्यांत त्याचे सरंजामाबरोबर [येत होता.] सरकारचे स्वार गारदी पांच हजार सरंजाम [ त्याचे ] रखवालीस होता. ते सर्वांच्या पाठीमागें [ चालले. ]

याप्रमाणें मोठ्या थाटानें, बादशाही डौलानें चालत असतां चौदा घटका रात्रीचे अमलांत वाड्यांत स्वारी सरकारची दाखल झाली. दिल्लीदरवाज्यांत अंबारीखालीं उतरल्यानंतर कित्येक दहींभाताच्या पांट्या श्रीमंतांवरून

* आरब शिपायांच्या जमादारास चाऊस म्हणतात.

ओंवाळून टाकिल्या. सरकारांत सोन्यारुप्याचीं फुलें केलीं होतीं तीं श्रीमंतांवर थोरल्या चौकाच्या बाहेर दिल्लीदरवाज्यांत तेथें उधळिलीं. मग श्रीमंत आंत जाऊन देवांस नमस्कार करून येऊन, दरबारास बसले. त्या समयीं झाडून सरदार लहान थोर, दरकदार व मुत्सद्दी व कारकून येऊन बसले.

इतक्यांत मश्रुन्मुलुख यांचा हर्त्ता गणेश दरवाज्याजवळ येऊन उभा राहिला. त्या समयीं राघोपंत गडबोले व आनंदराव काशी कोतवाल वाड्यांत जाऊन सरकारचे कानावर मजकूर घातला. तेव्हां सरकारची आज्ञा राघोपंतांस झाली कीं, " तुम्हीं त्यांचे समागमें जाऊन खजिन्याचे विहिरीपाशीं बंगल्यांत बागेंत त्यांस नेऊन ठेवावें. तेथें जागा मोठी आहे. सरकार कारखाने त्यांजकडील व आपल्याकडील तेथें राहतील. " अशी आज्ञा होतांच राघोपंत बाहेर येऊन, घोड्यावरतीं स्वार होऊन, त्यांजला समागमें घेऊन, नीट वाडा डावा घालून, आपा बळवंत यांचे वाड्यावरून नारायण पेठेंतून, सदाशिव पेठेंतून खजिन्याचे विहिरीपाशीं बंगल्याचे बागेंत नेऊन उतरविलें. सरकारचा सरंजाम त्यांच्या रखवालीस होता तेथेंच उतरविला. त्या बंगल्यांत खासा मश्रुन्मुलुख राहिले. त्यांच्या मुजरातीस दोन कारकून त्यांचे जवळ ठेविले. जो पदार्थ मश्रुन्मुलुख यांचे तोंडांतून निघेल तो तेथें त्यांनीं पुरवीत असावें. याप्रमाणें त्यांचा बंदोबस्त करून त्या बागेंत ठेविलें.

इकडे वाड्यामध्यें सकळ दरबार झाला होता तेथें सर्व नजर नजराणें सरकारांत झाले. मग सर्वांस पानसुपारी, अत्तरगुलाब, हार, तुरे, गजरे वांटिले. आणि सर्वांस आपआपल्या ठिकाणीं जावयाची आज्ञा झाली.

इकडे पानशे यांस खुषीच्या तोफा सोडावयास आज्ञा झाली. मग सर्व मंडळी सरकारची आज्ञा घेऊन आपआपल्या ठिकाणास गेली. सरकारच्या तोफखान्याची सरबत्ती होऊं लागली. ती एक समयें सहा घटकापर्यंत झाली. दोन तीनशें अवाज निघाले. नंतर शिंद्याकडील तोफखाना सुरू झाला. पहाटेच्या सहा घटका रात्रीपासून प्रातःकाळच्या चार घटका दिवसपावेतों सुटत होता. पांच सातशें तोफा शिंदे यांणीं सोडल्या. नंतर दादासाहेब यांचा तोफखाना भांबुरड्यास होता, त्याचें काम राघोपंत गडबोले[४४] यांजकडे होतें. तेव्हां त्यांनींहि सर्वांच्या

४४. दादांच्या बंदोबस्तास नेमून दिलेले गोविंदपंत गडबोले यांचा हा संबंधी असावा (मागें पृष्ठ १०९ पाहा.)

मागून शें दोनशें तोफांचे अवाज काढिले. अशी मागील प्रहर रात्रीपासून दुसरे दिवशीं प्रहर दिवसपर्यंत तोफांची सरबत्ती झाली.

त्यानंतर मोंगल यांजकडील वकील समागमें होते, त्यांच्या हवालीं मुलखाच्या जप्त्या केल्या होत्या त्यांच्या साडचिठ्या केल्या. चाळीस लक्षांचा मुलूख नवाब यांणीं सरकारांत दिला. तेथें अंमल सरकारचा बसला. दौलताबाद किल्ला सरकारांत दिला होता तो सरकारचे स्वाधीन झाला. तेथील काम धोंडो महादेव निसबत नगरकर यांजकडे सांगितलें. सर्व बंदोबस्त झाला.

नंतर रघोजी राजे भोसले यांणीं नागपुरास जाण्याचा निरोप मागितला. तेव्हां भोसले त्यांस सरकारांत मेजवानी करून, वस्त्रें अलंकार देऊन, त्यांजकडील खासे होते तितक्यांस पोषाग सरकारांतून दिले. नंतर भोसले निरोप घेऊन नागपुरास गेले. तसेंच फत्तेसिंग गायकवाड यांणीं विनंती केली कीं, " आम्हांस जाण्यास आज्ञा सरकारची व्हावी. "त्यावेळेस गायकवाड यांस सरकारचें बोलणें झालें कीं, " तुम्हांकडील खंडणी ऐवज दोन वर्षें येत नाहीं तो ऐवज आल्याशिवाय तुम्हांस जाण्याची आज्ञा व्हावयाची नाहीं " असें गायकवाड यांणीं ऐकिल्यानंतर सरकारास विनंती केली कीं, " सालगुदस्तांचा ऐवज आम्ही तेथें गेल्या नंतर रवाना करतों. " तेव्हां सरकारचें उत्तर त्यांस असें झालें कीं, " तुम्हीं खाशांनीं जावें. तुमचे कारभारी हुजूर ठेवावे. ऐवज आल्यानंतर हिशेब पाहून त्यांस जाण्याची आज्ञा देऊं. " असा जाबसाल सरकारचा होतांच फत्तेसिंग गायकवाड व गोविंदराव गायकवाड फौजेसुद्धां सरकारची आज्ञा घेऊन निघाले. त्यांस वस्त्रें अलंकार देऊन मार्गस्थ केलें. तेथें गेल्यानंतर खंडणीचा ऐवज पाऊण कोट रुपये छकडे भरून, रोख रुपये पुण्यास पाठविले. नंतर त्यांचे कारभारी निरोप घेऊन गेले. मागून दौलतराव शिंदे यांणी सरकारांत विनंती कीं, आम्हांस हिंदुस्थानांत जाण्याची आज्ञा असावी. त्या समयीं जिवबा दादा बक्षी यांचीं सरकारशीं राज्यप्रकरणीं बोलणीं बहूत झालीं. या गोष्टीस आठ पंधरा दिवस अवकाश पडला. नंतर शिंदे यांस निरोपाचीं वस्त्रें हिंदुस्थानांत जाण्याविषयीं सरकारचीं झालीं. पुण्यास बोलण्यास शिंदे यांजकडील वकील रामजी पाटील व रायाजी पाटील असे राहिले. नंतर शिंदे वानवडीहून कूच करून निघाले ते जांबगांवास जाऊन पोंचले. पुढें बरसात आली त्यामुळें शिंदे जांबगांवीं छावणी करून राहिले.

तसेंच तुकोजी होळकर यांस निरोप व्हावयाचा, त्या वेळेस मल्हारराव होळकर यांणीं सरकारांत विनंती केली कीं, " माझा बंदोबस्त सरकारांतून व्हावयाचा करार सरकारचा होता, तो आतां करून द्यावा. " असा बोलण्याचा घाट पडल्यानंतर तुकोजी बोवांस सरकारचा निरोप झाला नाहीं. होळकर यांस अशी आज्ञा झाली कीं, " तुम्हीं आपला सरंजाम हिंदुस्थानांत वाटेस लावावा. तुम्हीं येथें राहावें. " अशी आज्ञा होतांच त्यांणीं आपली फौज हिंदुस्थानांत रवाना केली. आपण पुणें मुकामीं खडकीचे तळावर दहा पांच हजार फौजेनिशीं राहिले.

असा कारभार चालत असतां ज्येष्ठमास गेला. आषाढही तसाच समारंभाखालीं गेला. पुढें श्रावणमासाचा उत्साह मोठ्या समारंभाचा झाला. स्वारी फत्ते झाली म्हणून त्या सालीं सर्वांस दाक्षिणा वांटली. राज्य कळसास आलें. दौलतीचाही कळस झाला. त्याचें वर्णन किती करावें ? पूर्वीं सत्ययुगाचे ठिकाणीं पांडवांच्या दौलतीचें वर्णन, तसें कलियुगीं पेशवे यांचे दौलतीचें वर्णन करावयाजोगें. पण पुढें होणार तें खरें. अवघ्या गोष्टी उत्कृष्ट झाल्या. परंतु जसा पांडवांनीं राजसूय यज्ञ केला आणि त्यांस अवचिन्हें जाणवलीं तसेंच येथें झालें.

बाजीराव कैदेंत होते त्यांनीं प्रयोग रावसाहेब यांजवर केला. प्रयोग सिद्ध झाल्यावर त्या प्रयोगवाले ब्राह्मणांनीं ताईत भारून दिले, आणि सांगितलें कीं, " या ताइतांस श्रीमंतांचा स्पर्श झाला म्हणजे त्यांचे मतीस भ्रंश होईल." असें सांगितल्यावर तेथें विचार पडला कीं, " हे ताईत नेऊन श्रीमंतांस दाखवितो कोण ? आणि त्यांचा ताइतास स्पर्श होतो कसा ?" तेव्हां बळवंतराव नागनाथ वामोरीकर हे पागे सरकारांतून बाजीराव साहेब यांचे रखवालीस पागेसुद्धां होते. तेव्हां बळवंतराव नागनाथ यांची लगत बाजीराव साहेब यांजपाशीं पडली होती. त्यामुळें बळवंतराव नागनाथ हे फितुरांत वश झाले. दरबारांत नागनाथांची श्रीमंतांपावेतों जाण्यायेण्याची चाल पूर्वींपासून होती, या योगानें बळवंतराव ताईत घेऊन, पुण्यास येऊन, आठ पंधरा दिवस राहून, नेहमीं जाण्यायेण्याचा पाठ चालवून, श्रीमंत रावसाहेब एकटे आहेत अशी संधी पाहून, त्या समयास ताईत काढून, श्रीमंतां पुढें ठेविला. तेव्हां

श्रीमंतांनीं त्यास हात लाविला आणि ताईत नागनाथ यांणीं उचलिला. इतक्यानें प्रकृती बिघडली.[५५] तेथपर्यंत नागनाथ पुण्यास होते.

प्रकृती बिघडावयाचें कारण [ व तत्संबंधीं ] सारा मजकूर यांची बातमी नाना फडणवीस यांस समजतांच बळवंतराव नागनाथ यांस कैद करून, पायांत बिडी ठोकून, किल्ल्यावरतीं टाकिलें, असा मजकूर झाला. दिवसेंदिवस सरकारचे प्रकृतीस चढ होत चालला. उपाय कोणाचा चालला नाहीं. होणार तें चुकत नाहीं. पुढें बाजीराव साहेब यांची पुण्याई उभी राहिली. यांची राज्य करण्याची पुण्याई सरली. तदनुसार सान्या गोष्टी जमून आल्या. दिवसेंदिवस प्रकृती फारच बिघडत चालली, तेव्हां उपाय चालेनासा झाला. असें होत असतां भाद्रपदाचे महिन्यांत गणपतीचा उत्सव झाल्यानंतर फारच प्रकृती भ्रांतिकर झाली. ते समयीं नाना फडणीस यांनीं वैद्योपाय बहूत केले. परंतु गुणास कांहीं न येई. तस्मात् ईश्वरी संकेतापुढें कोणाच्यानें जाववत नाहीं. पुढें भाद्रपद मास गेल्यावर आश्विन मास लागला तों फारच प्रकृती बिघडली. बोलणें चालणें देखील भ्रांतिकर होऊं लागलें. कोणतीही गोष्ट शुद्धीची नाहीं. असें होत असतां दसन्याच्या दिवशीं स्वारी अंबारींत बसून, खवासखान्यांत आपा बळवंत होते, स्वारी शिलंगणास गेली. सरकारची प्रकृती ताळ्यावर नसल्यामुळें अंबारींतून उडी घालावयास लागले. तेव्हां आपा बळवंत यांणीं हात धरून बसविलें. आणि सालाबादप्रमाणें मशाली लावून स्वारी वाड्यांत यावयाची ती त्या दसन्यास सायंकाळचे चार घटिका दिवसासच शहरांत माघारी आली त्या दिवशीं बहूत प्रकृती व्यात होऊन बेशुद्ध झाली. सबब स्वारी वाड्यांत दाखल झाली.

दुसरे दिवशीं एकादशी झाल्यानंतर द्वादशीस आश्विन आदितवार म्हणून सरकारची स्वारी खालीं येऊन स्नानास बसली. इतक्यांत खिजमतगार यानें जाऊन विनंती केली कीं, " वैद्य प्रकृती पाहावयास आले आहेत." म्हणून श्रीमंत उठून वरतीं दिवाणखान्यांत आले. वैद्य प्रकृती पाहून गेले. तों इतक्यांत ताई साठी, ही श्रीमंतांची आजी, येऊन श्रीमंतांपाशीं बसली.

---

५५ बाजीरावाबरोबर पत्रव्यवहार ठेविल्याबद्दल त्याच दिवशीं नाना पेशव्यांस फार टाकून बोलले व तुम्हांस स्वतंत्रता अगदीं नाहीं असें त्यांणीं स्पष्ट दर्शविलें त्यामुळें पेशव्यांचें चित्त उदासीन झालें. ह्या गोष्टी बखरींत दिलेल्या नाहींत.

तिशीं बोलत बसले. दोन घटका दिवस आला. ताई उठून गेल्यानंतर, खिजमतगार व चोपदार व शागिर्द व जवळची मंडळी नेहमीं वागणारी कोणी नाहीं अशी गोष्ट झाली. माशी जाण्यास फरक[४६] नाहीं असा बंदोबस्त असतां तो समय येऊन ठेपला तेव्हां कोणी जवळ नाहीं! प्रातःकाळच्या तीन घटका दिवसास गणपतीचे दिवाणखान्यांतून उडी टाकिली. खालीं कारंजें होतें त्याजवर जाऊन उडी पडली. कारंज्याची तोटी मांडींत शिरली. त्यानें मांडी मोडली व तोंड वांकडें झालें. बेशुद्ध झाले. त्या समयास कामाठी तेथें झाडीत होता, तो काय वाजलें म्हणून जवळ पाहाण्यास गेला तों श्रीमंतांस पाहिलें. त्याच्यानें हात लाववतो कीं काय! तेव्हां त्यानें पांचजन्य केला. तें ऐकून वाड्यांतील लोक धांवून येऊन जमा झाले. त्या वेळेस दाजीबा आपटे व मोरोपंत भावे जवळ येऊन श्रीमंतांस उचलून [त्यांणीं] दिवाणखान्याच्या खालच्या मजल्यांत आणिलें.

तो समय प्रातःकाळचा असल्यामुळें लोक व मुत्सद्दी नाना फडणीस सुद्धां घरोघर स्नान केले* [होते] ती बातमी बाहेर येतांच जसें ज्यानें ऐकिलें तसें लागलेच निघाले. कित्येक रस्त्यांत धावतांनां पडले. नाना फडणीस आपले दरवाज्यांत पडले. आपा बळवंत तसेंच महादाजीपंत गुरुजी, माधवराव रामचंद्र बिनीवाले, पानशे, कितीक गणतीस धरावे? पोतनीस चिटणीस, मुजुमदार, फरासखानेवाले; [हे सर्व आले ते] किती सांगावे! शहरांत मोठी गर्दी झाली. वाड्यापाशीं दाटी झाली. सगळे हुजरातीचे मानकरी, परशुरामभाऊ पटवर्धन, रास्ते, बाबा फडके असे तमाम वाड्यांत जमा झाले. तेव्हां नाना फडणीस वगैरे प्रमुख जे होते ते श्रीमंत होते तेथें आंत गेले. तेव्हां पहातात तों शुद्धी नाहीं. मग तबीब[४७] आणून मांडी मोडली होती ती नीट करून शिवली. तसेंच तोंड नीट केलें. परंतु रायास शुद्धी नाहीं. दोनप्रहरपर्यंत तो घोळ वाड्यांत झाला. नंतर अवघी मंडळी आपापले घरोघर गेली. नेहमीं बसावयाचे ते बसले.

असा रविवारचा व सोमवारचा दिवस होते. मंगळवारीं आश्विन शुद्ध पौर्णिमेस सायंकाळचे दोन घटका दिवस पावेतों कांहीं शुद्धी, कांहीं गैरशुद्धी,

---

४६. फरक (फिरीक)=अवकाश, रीघ. *हा जुना प्रघात आतां मोडत चालला आहे. ४७. तबीब=शस्त्रवैद्य.

असा तो दिवस गेला. दीप-दर्शनाचे अगोदर श्रीमंत महाराज यांणीं कैलासवास केला. आश्विन शुद्ध १५ शके १७१७ राक्षस-नाम-संवत्सरे सन सीत तिसैन मया व अल्लफ [ ११९६ ] या समयास श्रीमंत निजधामास गेले. त्या वेळेस वाड्यांत कारकून मंडळी होती ती घरोघर आली. शहरची नाकेबंदी सारी झाली. माणूस फिरेनासें झालें. शहरचें माणूस बाहेर जाण्याचें बंद केलें व बाहेरील आंत येण्याचें बंद केलें. नंतर श्रीमंतांस नदीवर नेलें. ही खबर कोणास नाहीं. असे दहा दिवस झाल्यानंतर क्रियाकर्मांतर तेरा-दिवस झाले. पुढें मुलुखांत व पृथ्वींत बंदोबस्ताचीं पत्रें गेलीं. पुढला विचार करावयाचे मसलतीस लागले. तेव्हां नाना फडणीस यांचे मनांत कोणी तरी दत्तक घेऊन राज्य चालवावें. असा मानस नानांचा. परंतु या विषयास सर्वांचे रुकार पाहिजेत. तेव्हां राजदरबार होऊन, मानकरी व शिलेदार व मुत्सद्दी [ यांचीं ] अवघ्यांचीं संमतें घेऊन, मग एकाद्या विचार करावयाचा म्हणून संमत-पत्र केलें. त्याजवर अवघ्यांचीं संमतें घ्यावीं [ असें ठरलें. ] तेव्हां कितीकांचे मनास आलें कीं, दत्तक घ्यावा. कितीकांचे मनांत न घ्यावा असें होतें, त्यांणीं संमतें घातलीं नाहींत. असा विचार करीत असतां कार्तिक लोटला. मार्गशीर्ष मासीं शिंदे जांबगांवीं होते ते पुण्यास माघारे आले. त्या समयीं शेणवी कारभारी होते. त्यांचे अनुमतानें नानांनीं मसलत केली ती खांशे दौलतराव शिंदे व झाडून कारभारी यांचे मनास येईना. त्यामुळें शिंदयांचा आग्रह बहूत पडला कीं, दोन खांसे औरस असतां बाहेरचा आणून गादीवर बसवावा, हें आमचें मतें चांगलें नाहीं. तुम्ही आणीत असलां तर उत्तम, नाहीं तर आम्ही फौज पाठवून त्यांस घेऊन येतों. अशा डौलाखालीं

---

५८. ही व पुढील हकीकत मोठी घोंटाळ्याची, अंदाधुंदीची, व कारस्थानाची आहे ग्रांट डफच्या ग्रंथांतुन घेतलेल्या खालीं लिहिलेल्या गोष्टी ध्यानांत ठेविण्याजोग्या आहेत:
( १ ) नानांच्या मनांत बाजीराव किंवा त्याचे भाऊ यांस गादीवर बसविण्याचें नव्हतेंच. म्हणून त्यांनीं यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याचें ठरवून सर्व सरदार मंडळीचें संमत घेतलें. त्यांत बहुतेकांचें मत नानांस अनुकूल होतें. शिंद्यांचे दिवाण बाळोबा तात्या शेणवी यांच्या पसंतीस ही मसलत आली नाहीं. त्यांचा कल बाजीरावाकडे होता. परंतु जिवबादादा बक्षी शिंद्यांच्या लष्कराचे मुख्य यांचे पाठबळ नसल्यामुळें बाळोबाचें कांहीं चाललें नाहीं व सर्वांनुमतें दत्तक घ्यावा असें ठरलें.

पौषाचा महिना सारा गेला. शिंद्यांचा आग्रह बहुत, असा सरदार दुसरा फौजेबक्ष कोणी नाहीं, असें पाहिलें तेव्हां नाना फडणीस यांणीं माघ शुद्धपक्षीं परशुराम-

(२) पुढें बाजीरावानें बाळोबा तात्या आपणांस अनुकूल आहे असें पाहून त्याजकडे संधान लाविलें. इतक्यांत जिवबादादा मरण पावला. त्याणेंही मरते वेळीं शिंद्यास सांगितलें कीं, "बाळाजी विश्वनाथाचे वंशज असतां बाहेरील मनुष्य गादीवर बसवावा हें बरोबर नाहीं. मागें मी जी नानांचे म्हणण्यास संमती दिली ती बरोबर नाहीं." त्यांत शिंद्यास बाजीरावानें कांहीं देणग्याही कबूल केल्या. तेव्हां बाजीरावास पेशवा करण्याचें बाळोबानें ठरविलें. (३) ही सर्व खटपट नानांस कळली. तेव्हां शिंदे जबरदस्तीनें जें करणारच तें आपण त्यांच्या आधींच करून सर्व श्रेय आपणांकडे कां न घ्यावें? असा विचार करून परशुराम भाऊंस नानानीं बाजीरावास आणण्यास पाठविलें व आणिल्यावर दोन्हींपक्षीं आणाभाका करारमदार झाले व बाजीराव पेशवे बनले. (४) हें बाजीरावाचें व नानांचें कृत्य बाळोबा तात्यास आवडलें नाहीं व त्यास फार राग आला. त्याणें शिंद्याची सर्व फौज पुण्यावर बलाविली. तें पाहून नाना घाबरले व परशुरामभाऊ लढण्यास तयार असतांही "माझ्या खातर शिंद्याचा राग. तेव्हां मी गेलों म्हणजे सर्व तंटे मिटतील," असें म्हणून नाना साताऱ्यास गेले व तेथें साताऱ्याच्या राजास मुक्त करून कांहीं खटपट करावी म्हणून प्रयत्न करूं लागले, पण तें जमेना. तेव्हां ते उठून वांईस गेले. (५) इकडे पुण्यास बाळोबा व परशुरामभाऊ यांचे मतें चिमाजी आपास यशोदाबाईच्या मांडीवर देऊन परशुराम भाऊनें कारभार करावा व बाजीरावास कैद करावें असें ठरलें तें नानांस कळविलें. नानांनीं आपलें मत त्यास दिलें, पण बाजीरावास आपल्या कबज्यांतून जाऊं देऊं नये असा त्यांणीं परशुराम भाऊस निरोप पाठविला. परंतु भाऊनीं बाजीरावास बाळोबाच्या हातीं जाऊं दिलें व नानांस आणण्याकरितां म्हणून आपल्या मुलास ५ हजार स्वार देऊन पाठविलें. ही नानांस बातमी कळतांच ते माहाडाकडे पळून गेले.

(६) अशा खटपटीनें नानांचा व बाजीरावाचा बनाव होण्यास कारण झालें; कारण दोघेही बाळोबातात्याचे शत्रू झाले होते. तेव्हां बाळोजी कुंजर बाजीरावातर्फे बोलूं लागला व त्याच्या मार्फत दोघांचीं बोलणीं चाललीं. नानांनीं निजामाला बाजीरावाकडे फोडून आणिलें, व सखाराम घाडग्याच्या मार्फत दौलतराव शिंद्यांस बाजीरावाचा पक्ष घेण्यास सिद्ध केलें. (७) हा बेत ठरल्यावर बाळोबातात्या वगैरे शेणवी कारभाऱ्यांस शिंद्यानें कैद केलें, व परशुराम भाऊंस धरण्याचा बेत त्यास विलक्षण चुकीनें समजला. तेव्हां तो चिमाजी आपास घेऊन शिवनेरीस एकदम निघून गेला. तेथें त्यास कैद केलें, शेवटीं बाजीराव तारीख ४ डिसेंबर १७९६ रोजीं गादीवर बसले. चिमाजी आपाचें दत्तविधान अशास्त्र ठरविलें. (८) ही हकिकत, बखरींतील वृत्तांत, व आनंदफंदीच्या माधव ग्रंथांतील माहिती ताडून पाहावी.

भाऊ पटवर्धन व आपा बळवंत यांच्या समागमें दहा हजार फौज देऊन जुन्नरास श्रीमंतांस आणावयास त्यांची रवानगी केली. हें पाहून शिंदे आपली फौज रवाना करीत होते ती [त्यांणीं] तहकूब केली. परशुराम भाऊ व आपा बळवंत हे जुन्नरास जाऊन पोहोंचले. श्रीमंतांच्या भेटी झाल्या. झाडून वर्तमान श्रीमंतांस विदित केलें.

बाजीराव साहेब व चिमणाजी आपा या दोघांस तेथून घेऊन आपा बळवंत व परशुराम भाऊ निघाले. त्यांनीं दरकूच कवडीचे मुक्कामीं येऊन मुक्काम केला. तेथून कूच करून पुण्यापाशीं दोन तीन कोसांवर मुक्काम झाला. तेथें सारे लोक भेटावयाचे तों इतक्यांत पाठीमागून बाजीराव यांची बायको निवर्तली तें वर्तमान तेथें आलें. तेव्हां पुण्याची मुत्सद्दी मंडळी भेटावयास जाण्याची राहिली. अशौच फिटून तेरा दिवस होत तोंपर्यंत कोणी भेटावयास गेले नाहींत. पुढें माघकृष्ण गेला. पुढें मंडळी भेटावयाशी निघाली. सर्वांच्या भेटी झाल्या. सर्व भेटून आले.पाठीमागून सर्वांच्या नाना फडणीस भेटीस गेले. नानांची भेट झाली. नानाही भेटून पुण्यास आले. सर्वांच्या पहिल्या भेटी भेटून सर्व आले. त्या बैठकीस कोणाचें बोलणें झालें नाहीं. मग दौलतराव शिंदे भेटावयास गेले. त्यांची भेट झाल्यानंतर बोलणीं झालीं. त्या बोलण्याचा भाव मिळून, या कारभारांत नाना नसावे. असा घाट होत असतां फाल्गुन मास आला. तेव्हां नानांची बातमी नानांस पक्की लागली. फिरून फाल्गुन शुद्ध १४ स नाना भेटावयास गेले. त्या बैठकीस बोलणीं चालणीं बहूत झालीं; परंतु नानांचा हेतू कीं, या वंशास नमस्कार करावयाचा नाहीं; हा मनाचा संकल्प. त्या मुळें साताऱ्यास जाण्याचा निरोप श्रीमंतांचा घेऊन आले.वाड्यांत येतांच साताऱ्यास जाण्याची तयारी झाली. तयारी होऊन लागलेच पालखींत बसून लागलेच निघाले ते उजडायाला साताऱ्यास जाऊन पोहोंचले. मग साताऱ्यास नाना यांचा मुक्काम झाला. तेथपर्यंत श्रीमंत पुण्यास आले नाहींत.

मग तेथून नानांनीं राज-कारण केलें. त्यांत हंशील मिळून बाजीराव यांस कैद करून, चिमाजी आपा यांस पुण्यास आणून, यशोदाबाई यांचे मांडीवर देऊन,दत्तविधान करून चिमाजी माधवराव असें करावें.या राजकारणास शिंदे वश व्हावयास दीड महिना लागला. तेव्हां मसलत सिद्ध झाली. मग वैशाखमासीं श्रीमंतांचा मुक्काम झाला होता तेथें शिंद्याकडून पलटणें

श्रीमंतामोंवतीं येऊन उतरलीं. त्या समयांत पुण्यामध्यें परशुरामभाऊ पटवर्धन व बाबा फडके व त्रिंबकराव परचुरे व गोविंदराव पिंगळे [ व काळे ] हे उभयतां, बहिरोपंत मेहेंदळे, नारोपंत चक्रदेव, आपा बळवंत असे सर्वत्र लहान थोर सरदार मंडळी वगैरे नानांच्या मसलतीस अनुसरली. तेव्हां परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मुख्यत्वें लष्करांत जाऊन चिमाजी आपा यांस उचलिलें. त्या वेळेस तेथें मोठा घोळ झाला. परंतु मोठ्या जबरदस्तीनें आपासाहेब यांस कडेवर घेऊन निघाले, ते लागलेच पालखींत घालून पुण्यास आणिलें. तिकडे बाजीराव यांस शिंदे आपले लष्करांत घेऊन गेले. लष्करांत घेऊन, डेऱ्यांत ठेवून सभोंवती पलटणें बसविलीं. आपासाहेब यांस पुण्यास आणिल्यावर शके १७१८ नलनाम संवत्सरे सन सीत तिस्सैन मय्या व अलुफ [११९६] वैशाख शुद्ध १० त्या दिवशीं चिमाजी आपा यांचें दत्तविधान[४९] झालें. साताऱ्याहून वस्त्रें चिमाजी माधवराव म्हणून आलीं. बाजीराव यांस कैद केलें ते शिंद्यांच्या येथें राहिले.

नंतर पुण्यामध्यें कारभार मुख्यत्वें परशुरामभाऊ पटवर्धन करूं लागले. तेव्हां सारी मंडळी जुनीच कारभारामध्यें महिना दीड महिना होती. असा कारभार चालत असतां बहिरोपंत मेहेंदळे, राघोपंत थत्ते असे उभयतां परशुरामभाऊस अनुकूल झाले. तेथेंपर्यंत नाना फडणीस यांणीं पुण्यास यावें असा सर्वांचा मानस परशुरामभाऊसुद्धां होता. मेहेंदळे मिळाल्यानंतर अवघ्यांस विपर्यास वाटला. त्या समयीं त्रिंबकराव परचुरे यांणीं भाऊंस विनंती केली, कीं "आतां माझ्यानें कारभार होत नाहीं." असें सांगून भाऊंस विचारून पुण्याहून निघाले ते आपले बागेंत जाऊन राहिले. त्यांचे कामावर हरिपंत फडके यांचे हाताखालीं सदाशिवपंत करमरकर होते त्यांचे चिरंजीव गणपतराव करमरकर, यांस परशुरामभाऊ यांणीं उभे केलें. गोविंदराव काळे बारामतीस निघून गेले. तसेच गोविंदराव मामाही घरीं बसले. अशी चोहींकडे मंडळी विस्कळीत झाली. परशुरामभाऊ कारभार चालवूं लागले. शिंदे यांजकडील प्राबल्य फार झालें. बाळोबा तात्या पागनीस धोंडोबादादा व सदाशिव मल्हार, नारायणराव बक्षी, जिवबादादा यांचे चिरंजिव बाजीबा मोदी असे शेणवी मस्त झाले. नेहमी पुण्यांत येऊन परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या व त्यांच्या मसलती होऊं लागल्या त्या मसलतींत ठरलें कीं,

---

४९. सवाईमाधवरावांची दुसरी बायको यशोदाबाई हिचे मांडीवर आपास दिलें.

" नाना यांस कैद करावें." हा मजकूर नानांस सातातान्यास कळला. परंतु असें घडणार नाहीं या भिस्तीवर नाना तेथेंच होते. तेव्हां बहिरोपंत मेहेंदळे व विसाजीपंत वाडदेकर, या उभयतांबरोबर फौज देऊन, नानांकडे सातान्यास रवाना केले. ते सातान्यास गेल्यानंतर नाना यांच्या भेटी झाल्या भेटी होऊन खलबतास बसले. त्या वेळेस मेहेंदळे यांचें बोलणें पडलें कीं, आपण पुण्यास चलावें. तेव्हां नाना म्हणाले, " तूर्त येत नाहीं." तेव्हां वाडदेकर यांणीं नानांस इशारत केली. कानावर जानवें ठेविलें. इतक्या इशारतीवर नाना तें जाणून तेथून उठून चालले. उभयतांस सांगितलें, " तुम्ही चला आम्ही येतों." असें सांगून गेले ते लागलेच मागले वाटेनें पालखींत बसून चालते झाले. माहाडास गेले. तेव्हां या उभयतांस बातमी समजली. नाना गेले ते लागलेच माहाडास जाऊन दाखल झाले. पाठीमागून सारा अंजवाब[५०] नानांकडील सातान्यास होता तो गेला. नाना माहाडास गेल्यावर दोन चार हजार फौज जमा केली. पांच हजार आरब चाकर ठेविले. नंतर मेहेंदळे व वाडदेकर निघून पुण्यास आले. नानासमागमें चिंतोपंत देशमुख प्रमुख होते. वरकडही कारकून मंडळी नानाकडील तेथें जमा झाली. दादा गद्रे, बज्याचा शिरोळकर वरकडचे फडचे कारकून असे सर्वत्र महाडास जमा झाले.

इकडे पुण्यांत बहुतेक मंडळी जुनी घरीं बसली. नवीच मंडळी कारभारास लागली. बाबा फडके, नारोपंत चक्रदेव हेही दरबारास येतनासे झाले, असें होत असतां आषाढाचे महिन्यांत मश्रुन्मुलुख कैदेंत होते त्यांचें बोलणें सरकारांत लागलें कीं, " आम्हांस सोडावें." त्या समयीं सरकारचें बोलणें पडलें कीं, " कांहीं दिल्याशिवाय सोडावयाचें नाहीं." तेव्हां कोट रुपये ठरले. हें समस्त सरकारांतून नानांस लिहिलें. नानांनीं उत्तर पाठविलें कीं, " उत्तम आहे." सोडावयाच्या अगोदर ज्येष्ठमासीं दौलतराव शिंदे यांणीं आपलें लग्न केलें. ती कन्या सखाराम घाटगे यांची केली. लग्न मोठ्या समारंभानें केलें. तेव्हां सखाराम घाटगे यांस 'सरजेराव' असा किताब दिला. तेव्हांपासून सरजेराव घाटगे कारभारामध्यें बोलूं लागले. मश्रुन्मुलुख यांचें बोलणें लागलें होतें, त्याजवरून त्यास मोकळें केलें. त्या

५०. अंजवाब = चीजवस्त, सरंजाम

समयीं मश्रुन्मुलुख यांची फौज हैदराबादेहून पुण्यास दहा हजार आली. त्या फौजेचा मुक्काम गुलटेंकडीवर झाला. तेथें मश्रुन्मुलुख जाऊन आपले फौजेंत उतरले. नंतर श्रावणमासीं 'नारोपंत चक्रदेव यांस कैद करावें' ही बातमी चक्रदेव यांस लागतांच पुण्याहून निघून गुलटेंकडीवर मोगलांचे लष्करांत येऊन राहिले.[५१]

पुढें बाबा फडके यांस कैद करावयाचे त्या दिवशीं आदितवारांत सरकारची हुजुरात तमाम पागे असे तयार लेश होऊन, फडके यांच्या वाड्याशीं उभे राहिले, आणि बाबा फडके यांस सारे मानकरी वगैरे यांणीं सांगून पाठविलें कीं, "तुम्हीं तयार होऊन आम्हांमध्यें यावें, मग परशुरामभाऊ व शिंदे कसे आहेत तें पाहूं." असें बोलणें होत असतां साहा घटका रात्र झाली. परंतु बाबा फडके यांचें अवसान बाहेर येण्याचें झालें नाहीं. तेव्हां सारी फौज कंटाळून मानकरी वगैरे झाडून आपआपल्या ठिकाणास गेले. दुसरे दिवशीं बाबा फडके यांस कैद केलें व नेऊन चाकणच्या किल्ल्यावर ठेविलें. पुण्यास नानांच्या पक्षपाताचे गृहस्थ बापू लेले वगैरे होते ते बहुतेक आणून कैद करून [ त्यांजपासून ] पैका घेतला. अशी धूम पुण्यांत चालली. बाजीराव साहेब कैदेंत होते. त्यांस शिंदे यांणीं काढून मंडळेश्वराकडे घालविलें.

इकडे नाना फडणीस यांणीं महाडास राजकारण नवें चालविलें. शिंदे यांजकडील सूत्र लावून, सरजेराव घाटगे व बाणाजी शेटे यांच्या विद्यमानें राजकारण दौलतराव शिंदे फोडावयाचें चालविलें. पुण्यास परशुरामभाऊ कारभार करीत होते, परंतु कोंकण-पट्टीमध्यें एकाद्या मामल्याची घालमेल करून किल्ला स्वाधीन होई असें झालें नाहीं. तसाच मजकूर देशांतील मामल्यांचाही [ कारण ] कोण्या मामल्याची घालमेल केली नाहीं. तेव्हां भाद्रपद मास निघाल्यावर शिंद्याकडील राजकारण सिद्ध झालें. त्यांत मुख्यत्वें मजकूर परशुरामभाऊ यांस कैद करून शेणवी मंडळ कैद करावें [व] असा इत्यर्थ करून बाजीराव साहेब यांस राज्यावर बसवावें" असा मजकूर होत असतां पुण्यांतील सरकार हुजुरातीचे लोक वगैरे झाडून निघून मश्रुन्मुलुख यांजकडे चाकरीस राहिले. पन्नास साठ हजार सरंजाम मश्रुन्मुलुख

५१. हें नानांचेंच 'राजकारण' पुढें पाहा.

यांचे लष्करांत जमा झाला. पुण्यांत कारभार करतात त्यांजला खबर कोणत्या गोष्टीची नाहीं! बाजीराव साहेब गंगेपावेतों गेले होते त्यांचा मुक्काम तेथेंच झाला इकडोन [मश्रुन्मुलुख] यांचे लष्करांत खर्चावयास नानांकडून पोंचूं लागलें. नारोपंत चक्रदेव नेहमीं मश्रू यांचे लष्करांत राहिले. निळकंठराव[52] पागे हे पुण्यामध्यें राहिले होते त्यांस कैद करावें अशा डौलानें धरणें परशुरामभाऊ यांजकडील गेलें. त्या समयीं निळकंठराव हे हुशार आणि शिपाई असल्यामुळें लागलेच घोड्यावर स्वार होऊन दहावीस स्वार समागमें घेऊन चालिले. त्यांच्या मागें परशुरामभाऊंकडील पागेचे स्वार लागले. परंतु निळकंठराव त्यांच्या देखत निघोन गेले ते लागलेच महाडास दाखल झाले. निळकंठराव निघून गेले त्या समयीं त्यांचे आंगावर कोणाचीही जाण्याची प्राप्ती झाली नाहीं. इतक्या कर्मास भाद्रपदमास लागला.

पुढें आश्विन मासीं नानाफडणीस यांचे वाड्याची जप्ती केली. परशुरामभाऊ यांणी जप्ती करून वाड्यांतील अजबाब झाडून काढिला. त्या वेळेस आंत सांपडावयाचें मिळोन दहा वीस चाळीस लक्षांचें कापड मात्र सांपडलें, त्याची मोजदाद करून जामदारखान्यांत सरकारांत नेलें. तेंच कापड दरुन्यास सर्वांस सालाबादप्रमाणें वांटिलें.

तेव्हां आश्विनवद्य ११ सुरू सन सब्बा तिस्सैन मय्यां [व अल्लफ] ते दिवशीं झाडून शेणवी कैद[53] केले. आणि पुण्यांत हलकारे दोन पाठविले. त्यांचे हातीं दोन चिठ्या [दिल्या]. एक चिठ्ठी आपा बळवंत यांचे नांवाची, व, दुसरी हरिपंत तात्या फडके यांचे भाचे परशुरामभाऊ वैद्य यांचे नांवाची, अशा दोन चिठ्या घेऊन हलकारे आपा बळवंत यांच्या वाड्यांत चार घटका रात्रीस आले. त्या समयीं आपा बळवंत यांणीं चिठ्या पाहून; आपली चिठ्ठी घेऊन, दुसरी चिठ्ठी हलकारे यांचे स्वाधीन केली. आणि हलकारे यांस सांगीतलें कीं, "परशुरामभाऊ यांजकडे घेऊन जा." तेव्हां हलकारे यांणीं आदितवारांतील परशुरामभाऊ वैद्य टाकून शेजारीं परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या वाड्यांत शिरून त्यांस चिठ्ठी[54] दिली. तीचिठ्ठी परशुरामभाऊ यांणीं पाहातांच

---

५२. निळकंठराव हा परभू गृहस्थ पाग्यांपैकीं एक मोठा प्रसिद्ध होता. ५३. हेंही नानांचेंच ' राजकारण. ' ५४. त्या वेळेस नानांचें ' राजकारण 'बाहेर फुटलें.

लागलेच पोषाग करून घोड्यावर स्वार होऊन वाड्यांत गेले.आणि श्रीमंत [आपा-साहेब ]निजले होते त्यांस जागें करून, पोषाख आंगावर घालून,परशुरामभाऊ यांचे चिरंजीव बाबा व दाजिबा हे वाड्यांत श्रीमंतांपाशीं नेहमीं राहात असत त्यांसही इतक्या अवकाशांत उठाविलें. तेही तयार झाले. तों दिवस निघाला. इतक्यांत मश्रुन्मुलुख व नारोपंत चक्रदेव असे पन्नास हजार फौजेनिशीं शहरांत आले. वाड्यांत येतात तों परशुरामभाऊ दोघां चिरंजिवांसमवेत श्रीमंतांस आपलेपाशीं घोड्यावर घेऊन बरोबर बाहेर पडले. तेव्हां पटवर्धन यांचे खासगी पथकाचे स्वार पांचशें बरोबर होते. असे बुधवारांतून चालले. हें पाहून पाठीमागें ही फौज लागली. त्या वेळेस चिमाजी आपा यांस भाऊ यांणीं आपले पुढें घेऊन, कंबरेस शेल्यानें बांधून हातांत पट्टे चढवून [ भाऊ ] चालले. तेव्हां आपा बळवंत, नारोपंत चक्रदेव, सरकारची हुजुरात व मानकरी, मोंगलांची फौज पाठीमागें लागली. तेव्हां परशुरामभाऊ यांचा गोट पर्वतीखालीं होता. त्या गोटांत [ ते ]जाऊन मिळाले. आणि ते सारे स्वार तयार होऊन समागमें चालिले. हे पुढें पळतात फौज पाठीमागें लागली आहे, असे चारी प्रहर दिवस पळत होते. त्या दिवशीं कोणास अन्न व पाणी नाहीं. श्रीमंतसुद्धां उपाशीं होते. वाटेमध्यें रात्रीं भात करून श्रीमंतांस घातला. पुढें पळूं लागले ते पळतां पळतां जुन्नरावरून शिवनेरी किल्ल्याखालीं आले. त्या समयीं शिवनेरीचा किल्लेदार याणें श्रीमंत आपासाहेब यांस किल्ल्यावरतीं घेऊन परशुरामभाऊसुद्धां खालीं राहिले. तेव्हां पाठीमागें फौज लागली होती [ तिणें ] परशुरामभाऊ यांस घेरा देऊन कैद केलें आणि आणून मांडवगणास ठेविलें.

इकडे पुण्यामध्यें परशुरामभाऊ पळाले त्या दिवशीं त्यांजकडील मंडळी कैद केली. ते नाना फडणीस यांचे वाड्यांत आणून ठेविले. ते कोण कोण? बहिरोपंत मेहेंदळे, त्यांचे चिरंजीव अन्याबा मेहेंदळे, राघोपंत थत्ते,गणपतराव करमरकर, चिंतोपंत [ ? ]व चिंतोपंत आठविले, बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे, बिसाजीपंत वाडदेकर, असे पंचेचाळीस असामी धरून, पायांत बिड्या ठोकिल्या. या कारणास पुण्यास मुख्यत्वें त्रिंबकराव परचुरे, परशुरामभाऊ वैद्य व बापू लेले हे [ होते. ] यांणीं इतक्या असाम्या धरून, कैद करून पत्रें नानांस महाडास गेलीं. त्या समयीं नाना फडणीस यांस राग आला. "आमच्या वाड्यांत बिड्या ठोकावयाच्या नव्हत्या " [असें ते म्हणाले व ]

त्यांचीं उत्तरें पुण्यास तिघांस आलीं कीं, "सगळे मंडळीस किल्लोकिल्ली पाठवावें त्यांत बहिरोपंत मेहेंदळे यांस रायगडास रवाना करावें. विसाजीपंत वाडदेकर यांस त्यांचे घरीं ठेवून त्यांचे दरवाज्यावर शिपाई ठेवावा." अशीं पत्रें येतांच त्याप्रमाणें बंदोबस्त करून लिहिल्याअन्वयें मंडळी किल्लोकिल्लीं पोहोंचविली.

इकडे श्रीमंत बाजीराव यास मंडळेश्वरास नेत होते ते गंगेच्या पार गेले होते ते माघारे आणून लष्करांत पोंहचविले. अमृतराव साहेब जुन्नरास होते त्यांसही पुण्यास आणिलें. शिवनेरीवर चिमाजी आपा यांस ठेविले होते त्यांस किल्लेदार यांणें फौजेंत चालविलें. मग आपासाहेब यांस घेऊन फौज माघारी पुण्यांस आली. त्रिवर्ग बंधू एके जागीं झाले. कार्तिक महिन्यांत पुण्यांत वाड्यांत दाखल झाले.

---

## बाजीराव रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब.

## —इ० स० १७९६—१८१८

[ पुण्यास आल्या ] नंतर मार्गशीर्ष मासीं शके १७१८ नलनामसंवत्सरे सन सब्वां तिसैन मय्या व अल्लफ साताऱ्याहून बाजीराव साहेब यांचे नांवचीं वस्त्रें पेशवाईचीं आणावयास त्रिंबकराव पेंठे पाठविले. वस्त्रें शिक्केकटार नवी करून आणिली. त्या दिवसापासून बाजीराव रघुनाथराव प्रधान असा किताब व शिक्का चालू झाला. पुण्यांत कारभार त्रिंबकराव परचुरे व बापू लेले व नारोपंत चक्रदेव, गोविंदराव मामा पिंगळे व गोविंदराव बापू काळे करीत होते. बाजीरावसाहेब यांस वस्त्रें झाल्यानंतर नाना फडणीस माहाडाहून पुण्यास यावयास निघाले ते दुसरे तिसरे दिवशीं पुण्यास आले. ते पुण्याजवळ तीन कोसांवर नऱ्हे आंबेगांव आहे, तेथें येऊन मुक्काम झाला त्या ठिकाणीं आठ पंधरा दिवस मुक्काम होता. पुण्यांतील सर्वत्र आंबेगांवीं भेटावयास गेले. सर्वांच्या भेटी झाल्या. मग सुमुहूर्त पाहून नाना पुण्यास आले. ते आपले राहाते वाड्यांत राहावयास गेले नाहींत. बेलबागेपाशीं त्यांचा वाडा

खासगत होता तेथें राहिले. पुण्यांत कारभार चालूं लागला. बाजीराव साहेब कारभार करूं लागल्यावर त्यांणीं आपले बरोबरीची मंडळी कारभारांत घातली. ती कोण ? बाळाजीपंत पटवर्धन व सदाशिवपंत उगले व आपाजी राम सहस्त्रबुद्ध व गोविंदपंत गडबोले अशी जवळची मंडळी सर्वत्र वाढविली. आपाजी राम सहस्त्रबुद्धे यांस गारद्यांच्या रिसाल्याचें काम सांगितलें. उगले यांजकडे वाड्यांतील वाकनिशीचें काम सांगितलें. जुने वाकनीस घरीं बसविले. बाळाजीपंत यांस, नेहमीं घरीं ठेवून, काम करण्यामध्यें घातले. असा मजकूर जाहला.

परशुरामभाऊ यांणीं नानांच्या वाड्यांतील कापड नेलें होतें तितकें वांटलें होतें तें कापड परशुरामभाऊ धरितांच जितक्यांनीं नेलें होतें तितक्यांनीं घड्या करून जामदारखान्यांत पोंचविलें. तें कापड नाना पुण्यास येतांच नानांच्या वाड्यांत दाखल झालें. मग सुमुहूर्तानें नानांच्या व श्रीमंतांच्या भेटी झाल्या. बोलणीं चालणीं राज्य-प्रकरणीं सर्व झालीं, नंतर कांहीं कारणावरून शिंदे यांचीं पलटणें वाड्याभोंवतीं येऊन उतरलीं. सभोंवत्या तोफा पसरिल्या. पहिल्या हशमी लोकांच्या चौक्या होत्या त्या सान्या[1]उठवून दिल्या. मग नाना आपले वाड्यांत राहावयास गेले. त्या वेळेस बुधवारांत नानांच्या वाड्यापासून चावडीपावेतों आरब छपरबंदी करून राहिले.

पुढें कारभार होत असतां शके १७१८ पौषांत गोविंदराव काळे यांजवर कांहीं आरोप येऊन, कैद करून किल्ल्यावर टाकिलें. पुढें माघमासीं बाजीराव साहेब यांचें लग्न झालें. दाजिबा फडके यांची कन्या श्रीमंतांस दिली. तो समारंभ चार दिवस झाल्यानंतर चैत्रमासीं गोविंदराव काळे यांस सोडवून आणिलें. काळे [व] पिंगळे कारभारांत वागूं लागले. नंतर वैशाखमासीं मोरोबा दादा फडणीस हे नगरच्या किल्ल्यांत कैदेंत होते त्यांस सोडवून आणिलें. असा कारभार होत असतां पुढें श्रीमंत यांणीं आपले मंडळचे कारभारी गोपाळराव मुनशी, वैजनाथभट भागवत, बाळाजीपंत पटवर्धन, असे कारभारांत घातले. त्रिंबकराव परचुरे यांणीं काशीस जाण्याचा सरकारचा निरोप मागितला. ते काशीस जाण्याची तयारी करून काशीस निघाले. पुढें कारभारांत फडावर चिंतोपंत देशमुख नानांनीं नेमिले. असे त्रिवर्ग वाड्यांत राहून कारभार पाहूं

१. 'कामगार यांमधी' भिंवपुरीच्या प्रतीचा पाठ.

लागले. मनस्वी कामें होऊं लागलीं. फौजेस खर्चास नाहीं, रोज धरणीं होऊं लागलीं. पागेस चंदी मिळेनाशी झाली. इकडे शिंद्यांच्या लष्करांत सरजेराव घाटगे कारभार करूं लागले. तो कारभार मनस्वी अनान्वित होऊं लागला. त्याचें वर्णन काय करावें? जुने मुत्सद्दी यांस धरून पैका घेऊं लागले. मामलती मुलखांतल्या घालमेली करून भलत्याला भलतेंच काम सांगावें. पुढें नारोपंत चक्रदेव नानांकडून कारभार करूं लागले. अशा गोष्टी होत असतां खर्चाची अडचण मोठी [झाली.]

असा कारभार होत असतां साताऱ्याचे महाराज किल्ल्याखालीं उतरून त्यांणीं बंड केलें. दहा पंधरा हजार फौज ठेवून मुलखामध्यें धूम मांडिली. त्या समयीं पुण्याहून फौज बाळाजीपंत पटवर्धन यांजवळ देऊन रवाना केले. परंतु त्यांत कोणी नांवाचा माणूस नाहीं. त्यामुळें राजे यांचा बंदोबस्त झाला नाहीं. त्याच्या अगोदर परशुरामभाऊ पटवर्धन हे मांडवगणास कैदेंत होते. " त्यांस सोडवून मोकळें करावें, सरदार मोठा, माणूस नांवाचा," असें नानांचे चित्तांत आलें. परंतु श्रीमंतांची मर्जी सोडावयाची नाहीं. तेव्हां ही संधी [चांगली होती.] राजांचा बंदोबस्त कोणाच्यानें होईना. त्या वेळेस श्रीमंतांनीं नानांस विचारलें, " याचा विचार पुढें कसा करावा ? " तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, "कोणी नांवाचा मनुष्य गेल्या शिवाय राजांचा बंदोबस्त व्हावयचा नाहीं." त्या समयीं श्रीमंतांनीं नानांस विचारलें कीं, "पाठवावा तरी कोण?" मग नानांनीं उत्तर केलें कीं, " परशुरामभाऊ पटवर्धन यांस कैदेंतून सोडवून आणून, त्यांची खातरजमा करून राजांवर पाठवावें, म्हणजे राजांचा बंदोबस्त करतील. " ही मसलत श्रीमंतांचे मनास येऊन परशुरामभाऊ यांस मांडवगणाहून सोडवून आणून श्रीमंतांच्या भेटी होऊन बोलणीं झालीं. त्या समयीं पटवर्धन यांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, "साताऱ्याचे राजे [यांनीं] खालीं उतरून बंड केलें आहे. त्यांच्या बंदोबस्तासाठीं तुम्हीं जाऊन, राजांचा बंदोबस्त करून, राजांस किल्ल्यावरतीं पोहोंचवून, पूर्ववत प्रमाणें ठेवावें." अशी आज्ञा होतांच परशुरामभाऊ यांणीं ती गोष्ट मान्य केली. नंतर भाऊंस वस्त्रें देऊन राजांवर त्यांची रवानगी केली. त्या समयीं परशुरामभाऊ पुण्याहून निघून शिरोळच्या मैदानांत येतांच राजांचे फौजेची पुण्याहून नेलेल्या फौजेची गांठ

पडली. तेथें लढाई मोठी झाली. राजांचे फौजेचा मोड झाला. राजे पळूं लागले. त्यांच्या मागें खांसा परशुरामभाऊ लागले त्यांणीं लागलेच राजांस सातान्यांत घातलें. फौज राजांकडील उधळून गेली. नंतर राजांस किल्ल्यावर चढवून पहिल्यासारखें ठेविलें. बंड करण्यास जे सामील होते त्यांचा बंदोबस्त यथास्थित करून परशुरामभाऊ तासगांवास गेले.

इकडे पुण्यांत कारभार होत असतां तुकोजी होळकर पुणें मुक्कामीं होते ते मृत्यू पावले. त्यांचे चिरंजिवांस वस्त्रें द्यावयाचीं. त्या समयीं मल्हारराव होळकर बापापाशीं होते. परंतु अहल्याबाईनें[२] तुकोजीस मांडीवर घेतल्या पूर्वींचा काशीराव होता. तुकोजी होळकर यांचें दत्तविधान झाल्यावर मल्हारराव होळकर तुकोजीबावांस झाले. त्यांस वस्त्रं न देतां काशीराव यांस द्यावीं असा ठराव झाला त्या वेळेस मल्हारराव यांणीं वस्त्रांस अडथळा केला हें काशीराव यांणीं पाहून [ व ] शिंदे यांचें प्राबल्य मोठें [ जाणून ] शिंद्यांचा आश्रय करून, दौलतराव यांचें पक्कें अभय घेऊन, मल्हारराव यांस कैद करावें [ असें ठरलें. ] त्या समयीं शिंदे यांणीं मल्हारराव यांस कैद करण्याचा विचार मांडिला. परंतु मल्हारराव म्हणजे जिवंत हातीं लागतो असें नाहीं. तथापी शिंदे यांणीं आपले तर्फेनें त्यास धरावयाचा उद्योग मांडिला. तेव्हां मल्हारराव होळकर आपले खासगत हजार दोन हजार स्वारानिशीं पर्वतीखालीं[३] राहात होते. त्या वेळेस शिंदे यांणीं आपले कडील मुजफरखां पठाण यास हजार फौजेनिशीं मल्हारराव यांस धरावयाकरितां वानवडीहून रवाना केलें व त्यांचेबरोबर पलटण एक दिलें होतें. ते पर्वतीखालीं येऊन उभे राहिले. तेव्हां मल्हारराव होळकर आपला गोट आवळून, तयार होऊन उभे राहिले. तेव्हां परस्पर कोणी कोणाच्या आंगावर जाऊन लढाई कांहीं झाली नाहीं. सायंकाळचे प्रहर दिवसापासून तयार होते. चार प्रहर रात्र तशीच गेली. तेव्हां शिंद्यांकडील पठाण पलटणें पहांटेच्या प्रहररात्रीस माघारे फिरून गेले. हें पाहून मल्हाररावही आपले गोटांत येऊन कंबर सोडून उतरले. नंतर मल्हारराव होळकर यांणीं पहांटेच्या चार घटका रात्रीस स्नानाचा उद्योग केला. स्नान करून देवाची पूजा करीत बसले आहेत ही बातमी शिंदे यांस कळल्यावर त्यांजकडील

२. अहल्याबाईनें तुकोजीस थोरले मल्हाररावाचा पुत्र असें म्हणून होळकरांच्या वंशांत घेतलें; आपल्याच मांडीवर घेतलें नाहीं. ३. 'भांबुड्यांवर' ग्रांट डफ.

पठाण अर्धे वाटेंतून माघारे उलटले ते नीट यांजवर चालून आले त्या समयीं होळकरांचे अगदीं बेसावध सारे लोक होते. तेव्हां शिंद्यांकडील फौज बेलाशक गोटावर चालून आली, हें पाहून मल्हारराव होळकर तसेच उघडे बोडके हातीं खांडा[४] घेऊन घोड्यावर स्वार होऊन, फौजेच्या तोंडावर [त्यांणीं] चालून घेतलें. लाख्या[५] बारगीर होळकर त्यांणीं चाकर ठेविला होता तो खांशा बरोबर निघाला, त्या अवकाशांत जे लोक सावध होते ते बरोबर गेले. तेव्हां मोठी लढाई झाली. मल्हारराव यांणीं दहा वीस स्वार जखमी करून ठार केले. लाख्या बारगीर याणें खांशाप्रमाणेंच तरवार गाजविली. त्यावेळेस सारी फौज दोघांवर येऊन पडली. त्या लढाईत मल्हारराव होळकर ठार झाले. दुसरा लाख्या बारगीर तोही ठार झाला. दोघांचे मुरदे एके ठिकाणीं पडले. त्या समयीं खांसा पडल्यावर सारी फौज भणाणा झाली. जशी ज्याला वाट फुटली तसे जिकडे तिकडे गेले. सारी लुटालूट शिंदे यांजकडील फौजेनें केली. इतक्या अवकाशांत मल्हारराव यांची बायको गरोदर होती तिला कारभारी घेऊन पुण्यांत आले. त्यांच्या बरोबर यशवंतराव होळकर व विठूजी होळकर हे उभयतां बंधू तुकोजीचे मुलगे राखेचे पोटचे होते, ते त्या बाई बरोबर पुण्यांत आले. वरकड गोट शिंदे यांच्या लोकांनीं लुटला. सारी दौलत त्यांणीं नेली. यशवंतराव होळकर हे पुण्यांत आले होते. ते युक्तीचे वाटेनें नाना फडणीस यांस भेटले. तेव्हां नानांनीं त्यांस शेले पागोटीं देऊन खर्चासही मुबलख दिलें. आणि सांगितलें कीं, " मल्हारराव यांचा सूड घेणें, तरच तुमचें सार्थक." त्या वेळेस यशवंतराव यांणीं उत्तर केलें कीं, "काय घडेल तें खरें." असें बोलून उभयतां बंधू नानांची आज्ञा घेऊन गेले. मल्हारराव यांचें कुटुंब पुण्यांत राहिलें. त्यांचा खर्चाचा बंदोबस्त सरकारांतून करून दिला. बाईचे दिवस भरल्यावर बाई प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव खंडेराव होळकर असें ठेविलें. बाकी कारकून मंडळी दिवाण वगैरे जशी

---

४. खांडा=रुंद पात्याची, दुधारी व सरळ अशी तरवार. ५. लाख्या बारगीर— लोणीचा रविराव शिंदा (?) रविराव पडल्याची बातमी त्याच्या बायकोस कळतांच, ती पृथ्वीवर मृतप्राय पडली ती पडलीच! ग्रांट डफ. या लाख्या बारगिराचें वर्णन मल्हाररावावरच्या पोवाड्यांत आहे (अक्वर्थ व शालिग्राम यांचे ऐतिहासिक पोवाडे पोहा) दरमहा लाख रुपये देण्याचें ठरविल्यावरून 'लाख्या' असें नांव त्यास पडलें होतें.

ज्याला वाट फुटेल तसे तिकडे गेले. असा मजकूर मल्हारराव यांचे गर्दीचा झाला. पुढें काशीराव होळकर शिंद्यांचे बहादरीमुळें सरदारी चालवूं लागले.

असा कारभार होत असतां पुण्यास नाना फडणीस होते त्यांजला कैद करावें अशी मसलत शिंदे व श्रीमंत यांची झाली. तेव्हां नाना कैद होतात कसे! पांच हजार आरब चाकर,नाना कैद होतात कसे! अशी गोष्ट घडावयाची नाहीं. असें जाणून शिंदे यांजकडील कंपूचे सरदार पेरू साहेब व मुकील साहेब हे दोघेजण या बोलण्यांत घातले. ते नेहमीं नानाकडे येऊन बोलणीं करूं लागले. असे मास पक्ष पर्यंत खेपा घालून बोलणें नमुदांत आणिलें. तेव्हां निश्चय झाला कीं, " आम्हीं लष्करांत भेटावयास येतों. " असा मजकूर झाला. तेव्हां त्या समयीं लष्करांतून बातम्या नानांच्या आल्या कीं, आपण लष्करांत येऊं नये.असें समजलें तथापी होणार तें चुकत नाहीं.साहा चार महिने कैद भोगावयाची प्रालब्धीं होती, तशी बुद्धी झाली! त्यावेळेस पौष शुद्ध १३ शके १७१९ सुरू सन समान तिस्सैन मय्या व अल्लफ [११९८ ]त्या दिवशीं नाना फडणीस लष्करांत जाण्यास निघाले. तेव्हां अपशकूनही बहूत झाले व शंकर जोशी यांणींही सांगितलें कीं, " आपण जाऊं नये. " इतकें होऊन जाण्यास निघाले. ते भवानी पेठेंत जात तोंपावेतों पालखी भोंवतीं पांच हजार आरब चालला होता. माशी जाण्यास फिरीक नाहीं. मुकील व पेरू यांणीं वाटेंत दोन चार वेळां नानांस विनंती केली कीं, " इतके आरब घेऊन लष्करांत यावयाचें कारण कांहीं नाहीं. " तेव्हां आरबांस नानांनीं सांगितलें कीं, " तुम्हीं माघारें जावें. " त्या वेळेस आरबांचा जमादार चाऊस याणें नानांस विनंती केली कीं, " आम्हांस माघारें फिरवूं नये. आजपर्यंत आम्हीं आपलें अन्न खाल्लें त्याचें सार्थक आज आहे." असें ते बोलले, तत्रापी गोष्ट नानांचे मर्जीस न येतां पेरू व मुकील यांचे विश्वासावर आरबांस शहरांत वाटेस लाविलें. आणि आपण लष्करांत गेले. जाऊन ज्या डेऱ्यांत बैठक केली होती तेथें जाऊन नाना बसले. नंतर दौलतराव शिंदे तेथें येऊन नानांस भेटून बोलणीं चालणीं होऊन शिंदे उठून गेले. पाठीमागें नाना बसले होते त्या डेऱ्याभोंवतीं पलटणाचें कडें बसलें. तेव्हां सर्वांस समजलें कीं, " नाना फडणीस यांस कैद

---

६. पेरू=पेरोन्, मुकील=मिकेल फिलोज. ग्रांट डफ दुसऱ्याचें नांव मात्र देतो.
७ नमुदांत=ठरावांत, निश्चयांत.

केलें." ती बातमी लागलीच शहरांत आली. आल्यानंतर शहरांत आरबांनीं मोठा प्रळय केला. त्या समयीं आरबांची तलफ चढली होती. ती सरकारानें तलफ दिली व आरब शहराबाहेर निघाले.

नंतर पाठीमागें शिंद्यांकडील सरजेराव घाटगे शहरांत कारभार करूं लागले. तेव्हां बहूत गृहस्थ नानांकडील नागविले. विशेष पैका घेतला. त्यांत कित्येकांचे प्राणही गेले. नाना फडणीस आठ दिवस लष्करांत होते. तेथून काढून नगरच्या किल्यांत नेऊन पोहोंचविलें. नानांनीं शिंदे यांचे लष्करांत प्रवेश केल्यामुळें [ तेथें ] फाटाफाट होऊन महादजी शिंदे यांच्या बायका बाहेर निघाल्या. तें एक बंड झालें. पुढें पठाण निघाले. कंपूही निघाले. अशी लष्कराची दाणादाण आपसांमध्यें झाली. इकडे सरजेराव घाटगे पुण्यांत कारभार करीत असतां बहूत नाश गृहस्थांचा झाला. त्यांत गंगाधरपंत भानू हे शिंद्यांकडील तसदीनें तोफेवर बसविल्यामुळें ठार झाले, अशी धूम शहरांत होऊं लागली. तेव्हां तें लष्कर अगदीं फिकें झालें. सगळे सरदार उठून बायांकडे गेले. त्यांचा बंदोबस्त दौलतरावांच्यानें होईना. इतक्या कर्मास ४ महिने झाल्यानंतर दौलतराव शिंदे यांस मोठा विचार पडला. त्या समयीं नाना फडणीस यांजकडे बोलण्यास वानवडीहून नगरास शहाणे मनुष्य पाठविले. त्यांत आपले लष्करचे लोक झाडून उठून गेले, तमाम बाहेर बंडें झालीं, त्याचा विचार कसा करावा? असा बोलण्याचा घाट नानाकडे सांगून पाठविला. तो मजकूर नाना फडणीस यांणीं ऐकून घेऊन उत्तर सांगिलें कीं, "मी किल्ल्याबाहेर आल्यानंतर सर्व बंदोबस्त होईल." तेव्हां तो मजकूर दौलतराव शिंदे यांस समजल्यानंतर नानांस सोडावें अशी मसलत झाली. याप्रमाणें शके १७२० ज्येष्ट मासीं किल्यांतून सोडवून नाना यांस वानवडीस आणिलें. वानवडीस दाखल झाल्यानंतर महिनाभर लष्करांत होते. नाना लष्करांत असतां सारे सरदार, पठाण वगैरे उठून गेले होते ते सर्व बायांसुद्धां लष्करचे लष्करांत आले. नंतर नाना फडणीस यांणीं शिंदे यांस द्यावयाचें केलें होतें तें देऊन नाना पुण्यास आपले वाड्यांत येऊन राहिले. मागती आरब वगैरे सरंजाम नानांनीं चाकरीस ठेविला. त्या समयीं वाड्यांतील कारभार झाडून श्रीमंतांकडे जाणें येणें, बोलणें

८. तलफ चढली होती=पगार तुंबला होता.

चालणें व फडणिशीची तारीख घालणें, हें सारें काम नारोपंत चक्रदेव यांजला आपले तर्फेनें नानांनीं सांगितलें. तेव्हांपासून, सन तिसां सन सब्लास पासून नारोपंत चक्रदेव कारभार करूं लागले. झाडून मुकत्यारीनें काम नानांचे तर्फेने करीत होते. तेथपर्यंत फौज वगैरे सर्व काईम होते. असा कारभार होत असतां सन तिसां [ ११९९ ] तिस्सेन पावेतों नानांच्या अनुमतानें कारभार चालत होता. सुरू सन मय्यातैन [ १२०० ] सालांत शके १७२१ फाल्गुन वद्य ३ या दिवशीं नाना फडणीस यांस देवाज्ञा झाली.

नंतर शके १७२२ चैत्र व वैशाख असे दोन महिनेपर्यंत तसाच कारभार चालत असतां नाना फडणीस यांस दत्तकपुत्र द्यावा, असा डौल शिंदे व श्रीमंत यांचे मसलतींत आला. तेव्हां ज्येष्ठ मासीं सन इहिदे मय्या तैनांत "आजच पुत्र द्यावयाचा" म्हणून सर्वत्र मंडळी सरकारच्या वाड्यांत जमा केली. त्या मंडळींत नानांकडील व सरकारचे मुत्सद्दी जमा झाले. शिंदे वानवडीहून आले. श्रीमंतांची भेट झाली. मंडळी बसली होती, तेथें येऊन सर्जेराव घाटगे त्या मंडळींत बसले. आणि मंडळी सभोंवतीं संत्री लोकांचे पहारे उभे राहिले. कोणी कारकून बाहेर राहिला नाहीं. हें वर्तमान नानांचे वाड्यांत समजतांच राघोपंत पेंडसे व भाऊ कापशे असे उभयतां कागदांचे रुमाल नानांचे जाळून पळाले. ते मात्र कैदेंत सांपडले नाहींत. बाकी झाडून मंडळी कैदेंत सांपडली.[१]

त्या वेळेस बाजीराव साहेब व अमृतराव साहेब एकजागीं होऊन बाजीराव साहेब यांणीं अमृतराव साहेब यांस विचारलें कीं, "आतां आपणांस माहितगार हातीं धरावयास कोण आहे? अवघे कैद झाले." त्या वेळेस अमृतराव साहेब श्रीमंतांस म्हणतात, "चिंतोपंत देशमुख आहेत त्यांस आपण बलावून आणून जवळ ठेवावें. ते आज्ञेप्रमाणें चालतील." तेव्हां चोपदार सर्जेराव घाटगे यांजकडे पाठविला कीं, "चिंतोपंत देशमुख यांस पाठवून द्यावें." असा निरोप घेऊन, चोपदार जाऊन, सर्जेराव घाटगे यांस सरकारची आज्ञा सांगून चिंतोपंत यांस श्रीमंतांकडे घेऊन आला. देशमुख श्रीमंतांस नमस्कार करून बसले. तेव्हां श्रीमंतांनीं देशमुख यांस

१. हें सर्व कृत्य बाजीरावाचें होय. त्याच्या मनांत नानांच्या बायकोचे मांडीवर दत्तक न देतां त्यांचें नाईनाट होईल तें करावयाचें होतें. ग्रांट डफ.

विचारलें कीं, "आजपासून तुम्ही आमचे संधानानें वागावें." असें विचारतांच देशमुख यांणीं उत्तर केलें, "जशी आज्ञा होत जाईल तसे चालूं. आज्ञेशिवाय चालणार नाहीं." अशी शपथ चिंतोपंत यांजकडून करून घेतली. आणि रुमाल फडाणिशीचा चिंतोपंत यांचे हवालीं केला. श्रीमंतांची आज्ञा झाली कीं, "तुम्ही जाऊं नये. वाड्यांत राहावें. घरीं जाण्याचें काम लागल्यास आज्ञा घेऊन जात जावें." ती गोष्ट चिंतोपंत देशमुख यांणीं कबूल करून ते वाड्यांत राहिले. बाकी मंडळी अवघी कैद झाली, ती कोण कोण? नारोपंत चक्रदेव, २ लक्ष्मणराव चक्रदेव, ३ परशुरामपंत चक्रदेव, ४ शंकराजीपंत, चक्रदेव, ५ धोंडोपंत लिमये, ६ चिमणाजी खंडेराव, ७ राघोपंत गडबोले. ८ बजाबा शिरोळकर; अशी किती नावें लिहावीं? चाळीस असामी कैद करून किल्लोकिल्लीं रवाना केले. तेव्हांपासून चिंतोपंत देशमुख व वैजनाथभट[१०] भागवत, कारभार करूं लागले. पुढें साहा चार महिने गेल्यावर बाबा फडके व गोपाळराव मुनशी व मोरोबा दादा फडणीस चिरंजीवसमवेत व बिनीवाले असे सारे कैद केले.

पुढें बाळाजी[११] कुंजर हे बाजीराव यांजकडून शिंदे यांजकडे बोलण्यास जात असत, सबब बाळाजी कुंजर हे कारभारी उभे केले. बाळाजी कुंजर कारभार करूं लागल्यापासून त्यांणीं अवघे कारखाने थोडे थोडे शाबीत राखले. असें होत असतां यशवंतराव होळकर हिंदुस्थानांत पळून गेल्यावर त्यांणीं बंड मोठें केलें. असा सन इहिदे मया तैन व अल्लुफ [१२०१] शके १७२२ पावेतों कारभार झाला. पुढें इसन्ने मय्या तैनांत [१२०२] शके १७२३ सांत दौलतराव शिंदे हिंदुस्थानांत जाण्यासाठीं सरकारचा निरोप घेऊन निघाले ते

---

१०. हे वैजनाथभट मामा, मोरुनाना दीक्षित वगैरे मंडळी कारभारांत पडल्यापासूनच 'तुझ्या कामांत भट पडो' हा आणा प्रचारांत आला काय? ११. बाळाजी कुंजर हा पुरंदरानजीकचें बंगापूर येथील पाटलाचा राखपुत्र. हा नाना पुरंदरे यांचे लष्करांत शिलेदारी करीत असे. पुढें बाजीरावाला शिवनेरीहून बंदींतुन काढिल्यावर त्याचे पदरीं हा राहिला. पुढें बाजीरावास एकीकडे टेवून चिमाजी आपास गादीवर बसविण्याचा बेत झाल्यावर यानें माहाडास नाना फडणिसाकडे वरचेवर जाऊन बाजीरावाचा पक्ष त्याजकडून घेवविला. ह्या कामागिरीबद्दल बाजीरावाची कृपा त्याजवर होऊन त्याजकडे हा कारभार सांगितला. ग्रांट डफ. परंतु कुंजर हा पुरंदऱ्यांचा लेकावळा असल्याचें ऐकिवांत आहे.

दरकूच हिंदुस्थानांत चालले. शिंदे यांजकडील वकील लिंबाजी भास्कर पाठीमागें सरकारांत बोलण्यांत राहिले. बाकी झाडून खटलें जरा बाजरासुद्धां[१२] लष्कर कूच करून दौलतराव शिंदे निघाले. ते दरकूच हिंदुस्थानांत चालले. अजिंठ्याचा घाट उतरून खानदेशांतून बऱ्हाणपुरावर गेले. आठ पंधरा दिवस मुक्काम झाला. नंतर तेथून कूच करून निघाले ते नर्मदा उतरून मंडळेश्वरावरून उज्जनीस जाऊन दाखल झाले.

इकडे वर्तमान [ असें झालें ] पुण्यामध्यें श्रीमंत असतां झाडून सरंजामी यांचे सरंजाम जप्त करूं लागले. बहुतांचे सरंजाम घेतले. आपा बळवंत यांचा सरंजाम जप्त केला. तसाच फडक्यांचा जप्त केला. रामचंद्र गणेश कानडे यांचाही सरंजाम जप्त केला. तसाच बिनीवाले यांचा जप्त केला. जुने सरदार [१३]बुडविले. शेवटीं माधवराव रास्ते यांजवर शक ठेवून त्यांचाही सरंजाम जप्त केला. माधवरावांस कैद करावयाचें, पण ते अगोदरच पळून[१४] गेले. पाठीमागें त्यांच्या वाड्यावर जप्ती पाठविली. तेव्हां दोन मुलें—बळवंतराव रास्ते व शामराव रास्ते—व त्यांचे भाचे बाबा साठे असे धरून आणून वाड्यांत कैदेंत ठेविले. वाड्याची जप्ती झाली. दौलत पुष्कळ सांपडली. मुलूख जप्त केला. स्वदेशीं व खानदेशांत महाल होते ते जप्त केले. कर्नाटकांत महाल होते त्यांचा अंमल बसला नाहीं. पांडवगड व कुंवारी* हे किल्ले हस्तगत झाले नाहींत. बाकी जप्ती दौलतीची केली. वाड्यांत रास्त्यांकडील तीन आसामी धरून आणून ठेविले होते. पांच सात महिने कैदेंत होते. बाहेर निघण्याचा प्रयत्न बहुत केला. त्या वेळीं बळवंतराव रास्ते वाड्यांतून पळून गेले ते नीट कर्नाटकांत अथणी बागलकोट[१५] येथें जाऊन त्यांणीं बंड केलें. कुंवारी[१६], पांडवगड हे किल्ले सरकारांत आले नाहींत. तसाच नाना फडणिसांचा लोहगड किल्ला सरकारांत आला नाहीं. अशीं बंडें चोहींकडे झालीं. तेव्हां शके १७२३, इसन्ने मय्यातैनपावेतों बहुत गृहस्थ नागविले.

---

१२. जराबाजरा = चीजवस्त, किरकोळ सामान. १३. 'मोडिले' भिंवपुरी प्रत. १४. माधवराव रायगड येथें कैदेंत टेविला होता. ग्रांट डफ. * 'तुमवारी' असें एका प्रतींत दिसतें. १५. 'बाणकोट' असा भिंवपुरी व इंदूर प्रतींचा पाठ आहे तो अर्थात चुकीचा होय. १६. 'तुमावरी' पाठांतर.

पुढें अमृतराव पेशवे यांचें व श्रीमंतांचें वांकडें येऊन अमृतराव आपले खटल्यासुद्धां पुण्याहून निघाले. ते नगरापावेतों जाऊन भिंगारास मासपक्ष होते. तेथें राहून यशवंतराव होळकर यांस पुण्यास आणावयास बापू खटावकर व दुसरा एक असामी पाठविला. कारण हेंच कीं होळकर यांणीं पुण्यांत येऊन यशोदा बाईचे मांडीवर विनायकराव[17] यांस दत्तक देऊन गादीवर बसवावें. यानिमित्य होळकर यांस कोट रुपये देऊं केले. अशी मसलत केली. आणि तेथून निघाले ते कोंकणांत भिंवडी वगैरे ठिकाणीं राहून, कुसुरघाटाखालीं येऊन भिवपुरीस राहिले. ते सात आठ महिने कोंकणांत होते.

इकडे पुण्यामध्यें वर्तमान असें झालें. यशवंतराव होळकर हिंदुस्थानांत जाऊन त्यांनीं बंड केलें. लाख दोन लाख फौज जमा केली. शिंद्यांचा मुलूख मारूं लागले. सबब यशवंतराव होळकर यांचा धाकटा भाऊ विठोजी होळकर याणें स्वदेशीं बंड केलें. त्याजवर सरकारांतून फौज रवाना झाली. ती फौज जाऊन, बंडाचें पारिपत्य करून, विठोजी होळकर यास धरून, पुण्यांत आणून, कैद करून ठेविले. शके १७२४ सह्लास मय्यातैन या सालीं विठोजीस हत्तीचे पायांखालीं बांधून मारिलें. येवढी गोष्ट श्रीमंतांनीं मोठी अनुचित केली. ही गोष्ट बाळाजी कुंजर यांचे अनुमतानें झाली. हें वर्तमान हिंदुस्थानांत यशवंतरावास लागतांच होळकर यांचे मनांत रावसाहेब[18] यांचे म्हणणें सिद्धीस न्यावयाचें होतेंच. दुसरें कारण विठोजीस मारिलें हें. याकरितां त्यांच्या ढाला पुण्याकडे फिरल्या.

ही बातमी सरकारची आली. यशवंतराव पुण्यास येतात म्हणून शिंद्यांचे वकिलांस बाजीराव साहेब यांणीं सांगितलें कीं, "शिंद्यांस देशीं येण्याविषयीं लिहून पाठवावें." त्याजवरून त्यांणीं शिंद्यांस लिहून पाठविल्यावर चार पलटणें सरंजामसुद्धां पुण्याचे रखवालीस आणविलीं. इतक्यांत शिंदे उज्जनीपलीकडे जातात तों यशवंतराव होळकर यांची फौज तिकडून येत होती. त्या समयीं शिंदे यांची गांठ पडून लढाई मोठी मातबर झाली. त्यांत शिंदे जेरीस आले[19].

---

१७. विनायकराव हा अमृतरावाचा पुत्र. १८. म्हणजे अमृतराव यांचें. १९. ही उज्जनीची लढाई. हींत यशवंतरावानें मोठा पराक्रम केला.

नंतर यशवंतराव पुण्यास यावयास निघाले. ही बातमी सरकारची येतांच लढाईची तयारी करूं लागले. त्यासमयीं बाळाजी कुंजर दिवाणगिरीचे कारभारी व मुलकी कारभारी चिंतोपंत देशमुख. असा कारभार होत असे. नित्य उठून दरबार फौजेचा[२०]. सारे मानकरी व हुजुरातीचे लोक यांस नित्य उठून बलावणीं वाड्यांतील येऊन वाड्यांत दरबार होऊं लागला. तेव्हां सरकारचे मनोधारणास्तव अवघ्यांनीं रुकार भरला. परंतु पैका कोणास खर्चास नाहीं. चार वर्षे हिशेबही नाहीं. असें पाहून मालोजीराजे घोरपडे यांणीं सरकारांत विनंती केली कीं, "यशवंतर व होळकर पुण्यावर चालून येतो याचा अर्थ काय? आम्ही म्हणजे याला भिऊन राहूं असें नाहीं. परंतु सरंजाम साऱ्यांचे खराबीचे, कोणास पैसा खर्चास नाहीं, अशी दशा झाली आहे. त्याची तजवीज सरकारांतून झाली म्हणजे लढाईस कोणी मागें हटतो असें नाहीं." अशा रोज मसलती होऊं लागल्या. तेव्हां यशवंतराव उज्जनीचे अलीकडे इंदूरपावेतों येऊन ठेपले. पुण्यांत जुन्या फौजेचीं अशीं बोलणीं पडलीं. परंतु श्रीमंत बाबासाहेब यांस जुने लोकांचा विश्वास नाहीं म्हणून नवे लोक ठेविले. जमादुलीखां पठाण चांदेरस्तापूरकर हा येऊन सरकारास भेटला. तेव्हां त्यास चार हजार स्वार ठेवण्याची आज्ञा झाली. त्या समयीं पठाण यांचें बोलणें सरकारांत पडलें कीं, "फौज ठेवावयाची परंतु या फौजेबद्दल मला खर्चास नेमून द्यावें." असें बोलणें सरकारांत पडतांच तें बोलणें सरकारांनीं जमेस धरून त्याजला बारा लक्षांचे महाल गंगथडी वगैरेच्या सनदा करून दिल्या. दुसरे धोंडो गोविंद गडबोले यांस तीन हजार नवे स्वार ठेवण्यास सांगितलें. त्याणींही तीन हजार स्वार नवे ठेविले. आणखी जवळचे मंडळीपैकीं बाळाजीपंत पटवर्धन वगैरे यांस स्वार ठेवण्यास सांगितलें. असा दहा हजार स्वारांचा भरणा झाला. जुने फौजेपैकीं पागे व एकांडे शिलेदार यांची बेरीज घेतली. असा भरणा जुने सरंजामीसुद्धां चाळीस हजार फौजेचा झाला. अशी श्रावण मासची तयारी होत चालली. शिंदे यांजकडील चार पलटणेंही सरंजामसुद्धां येऊन पुण्यांत दाखल झालीं. फौजेची बक्षीगिरी नाना पुरंदरे यांजकडे सांगून जरीपटका हवालीं केला.

---

२०. फौजेचा=फौजेबद्दल.

अशी तयारी होत असतां यशवंतराव होळकर भरपावसांत, फौजेसुद्धां नर्मदा उतरून अलीकडे आले. अशी बातमी सरकारची येऊन पोहोंचली. होळकरांकडील वकिलांनीं हा मजकूर सरकारांस समजाविला. त्याजवरून मोठी तयारी लढाईची होऊन पानशे यांस तोफखान्याची तयारी करण्याची आज्ञा झाली. सरंजामाची तयारी होत आहे तों यशवंतराव होळकर येऊन खानदेशांत दाखल झाले. मोठा दंगा फौजेचा, जेथें मुक्काम होईल तेथें दहा वीस कोस मुलूख वैराण होऊं लागला.[21] तेव्हां पाराजीपंत वकील हे होळकरांचे बोलण्यांत पडले. सरकारांत बोलणीं बोलून सरकारचा निरोप घेऊन होळकर यांजकडे निघून गेले. तेथें यशवंतराव यांची भेट झाल्यानंतर श्रीमंतांचीं बोलणीं झालीं होतीं तीं सारीं यशवंतराव यांस समजाविलीं. त्या समयीं यशवंतराव होळकर यांणीं तो मजकूर ऐकून घेऊन त्यांणीं आपल्या बोलण्याची याद चवदा कलमांची करून दिली. त्यांत हांशील कीं, " खंडेराव[22] होळकर यांस आमचे स्वाधीन करावें; त्यांचे नांवें सरदारीचीं वस्त्रें द्यावीं, बाळाजी कुंजर यास आमचे स्वाधीन करावें, पुढें शिंदे यांशीं मल्हारराव होळकर [ यांस ] मारण्याचा दावा आम्ही समजून घेऊं, त्यांत सरकारांनीं कोणतीही गोष्ट बोलूं नये." अशा प्रकारच्या बोलण्याची याद करून दिली व "याप्रमाणें सरकार कबूल करीत असल्यास मग आम्ही सरकाराशीं वांकडे नाहीं." असा मजकूर पाराजीपंत यांजपाशीं सांगून त्यांस श्रीमंतांकडे होळकर यांणीं रवाना केलें. ते पुण्यास येऊन पोहोंचतात तों पाठीमागून यशवंतराव होळकर फौजेसुद्धां कूच करून, घाट चढून वरतीं आले. ते नाशिक मुक्कामीं येऊन पोहोंचले. पाराजीपंत पुण्यास येऊन, श्रीमंतांची भेट घेऊन, यशवंतराव यांजपाशीं मजकूर झाला तो श्रीमंतांस त्यांणीं समजाविला. यादी बरहुकूम श्रीमंत कबूल नाहींत असें झालें. तेव्हां होळकराच्या फौजा पुणें प्रांतांत येऊन ठेपल्या. पंढरपुरापावेतों होळकराच्या फौजा आल्या. पाराजीपंत आपलें बोलणें कबूल करीत नाहींत असें झाल्यानंतर लागलेच यशवंतराव होळकर दरकूच

---

२१. होळकराकडील फत्तेसिंग माने व दुसरा अमीरखान यांनीं सर्व मुलूख लुटून फस्त केला. २२. खंडेराव = हा पर्वतीखालीं झालेल्या दंग्यांत मयत झालेल्या मल्हारराव होळकराचा पुत्र. ( मागें पृष्ठ १९४।१९५ पाहा. ) हा वयानें अगदीं लहान होता. होळकर घराण्यांतील काशीरावाखेरीज औरस वारस हाच होता. तो बाजीरावाच्या कबजांत होता.

पुण्यावर येऊन दाखल झाले. सरकारची फौज जरीपटका घेऊन बाहेर पडली. बाराजीपंत बोलणें जमलें नाहीं म्हणून हिरकणी खाऊन मृत्यू पावले.

नंतर आश्विन वद्य १४, दिवाळीचा दिवस, शके १७२४ सन सल्लास मय्यातैन व अल्लफ [ १२०३ ] त्या दिवशीं होळकराशीं लढाई नेमिली. श्रीमंत बाजीराव साहेब तयार होऊन बाहेर पडले. पर्वतीपाशीं उभे राहून पाहातात तों पलटणांची लढाई होऊं लागली. एक आराबा[23] तोफांचा यशवंतराव याणें आंगावर घेतला. त्या आराब्यांत हजार दोन हजार चार हजार स्वार पडले. दुसऱ्यानें तोफा भरावयाच्या तों चाळीस हजार स्वारांची मांड यशवंतरावाकडील तुटून पलटणांवर येऊन पडली, तेव्हां चार फलटणांचा शेणसडा केला. ज्याणें तृण तोंडांत धरिलें तो वांचला. बाकी फडशा झाला. कांहीं राहिलें नाहीं. त्यासमयीं सरकार हुजरात व मानकरी व सरंजामी यांशीं लढाई होऊं लागली. त्या वेळेस मालोजीराजे घोरपडे यांस जखमा बहूत लागल्या. श्रीमंतांच्या फौजेचा मोड झाला. फौज सारी उधळली. हें पाहून बाजीराव साहेब पाठीमागें होते त्यांणीं रस्ता कोंकणचा धरिला[24].

इकडे शहरचा बंदोबस्त केला. तेव्हां पुण्यामध्यें सरकारचे कारभारी चिंतोपंत देशमुख व वैजनाथ भट भागवत असे होते.

इकडे श्रीमंत बाजीराव साहेब निघाले ते नीट सुवर्णदुर्गास पोहोंचले. तेथें आठ पंधरा दिवस मुक्काम करून होते. त्या मुक्कामाहून बाळाजी कुंजर सरकार आज्ञेवरून शिंद्यांचे लष्करांत गेले. तसेच सदाशिव माणकेश्वर[25]ही हैदराबादेस रवाना केले.

---

२३. आराबा=सरबत्ती, एका सरबत्तीची आग. २४. ही पुण्याची लढाई हल्लीं इंग्रजांची छावणी आहे तेथें झाली. दोन्हींकडे पलटणें होतीं. होळकराचा पराभव हुजुरातीनें प्रथम केला. पण यशवंतरावानें त्वरा करून, मोठ्या शौर्यानें व मेहनतीनें जय मिळविला. ग्रांट डफ. २५. सदाशिव माणकेश्वर–टेंभुरणीचा कुळकर्णी. जातीचा देशस्थ ब्राह्मण. प्रथमतः हा पुण्यास कथा करून आपला निर्वाह करी. पुढें गोविंदराव पिंगळे म्हणजे हैदराबाद येथील पेशव्यांचे वकील, यांचा हा मुतालीक झाला. इसवी सन १७९९ सालीं इंग्लिश लोक टिपूशीं युद्ध करीत असतां, बाजीराव व शिंदे यांच्या तर्फे निजामाकडे जाऊन टिपूला आपण सर्वजण मिळून मदत करूं असें त्याशीं बोलणें यानें लाविलें असें म्हणतात. हा मूळचा गरीब होता. तथापि तो प्रौढ, सभ्य, व गोड बोलणारा असून मोठा मुत्सद्दी होता. पुढें ह्याजकडे इंग्रजांकडील वकिली बाजीरावानें सांगितली.

इकडे पुणें मुक्कामीं काय वर्तमान झालें. ! श्रीमंत पळून गेले ही बातमी चोंहींकडे गेल्यानंतर अमृतराव पेशवे पुण्यांत येऊन दाखल झाले. यशवंतराव होळकर व रावसाहेब यांच्या भेटी झाल्या. परस्परें बोलणीं उभयतांचीं झालीं. त्या बोलण्यांत यशवंतराव होळकर यांणीं अमृतराव साहेब यांस सांगितलें कीं "तुम्हीं आम्हांस फौज घेऊन बलाविलें त्या बेतानें फौजसुद्धां पुण्यावर आलों. तेथें येऊन लढाई होऊन श्रीमंत पळून गेले.आतां तुम्हीं मसलतीनें चालत असल्यास साह्य करितों. विनायकराव यांस यशोदाबाईचे मांडीवर देऊन वस्त्रें सातान्याहून आणवितों" तें ऐकून अमृतराव साहेब यांणीं उत्तर केलें कीं, "झाडून मुत्सद्दी कारभारी कैदेंत पडले आहेत त्यांस सोडवून आणावें म्हणजे एकादी मसलत करूं." यावरून होळकर यांणीं विचारलें, "कोण कोण पडले आहेत तें सांगावें." तेव्हां बाबा फडके व नारोपंत चक्रदेव, मोरोबादादा फडणीस चिरंजिवासुद्धां मंडळी कैदेंत होती ती किल्लोकिल्लीहून सोडवून आणिली. नंतर वाड्यांत ताईसाहेब व यशोदाबाई व चिमणाजी आपा यांची बायको अशा होत्या त्यांच्या भेटीस यशवंतराव होळकर वाड्यांत जाऊन बायांस भेटले. आणि ताईसाहेब[२६] यांजपाशीं बोलणें बोलले, "आम्ही गादीचे चाकर असतां श्रीमंतांनीं आम्हांस न भेटतां पळून जावें ही गोष्ट चांगली नाहीं. त्यांस धरण्यास आलों नव्हतों. सरकारचीं वस्त्रें घेऊन जी कामगिरी सांगतील ती बजावून सरकारची शाबासकी मिळवावी, या इराद्यानें फौज घेऊन आलों. तों येथें अशी गोष्ट झाली. आतां [आपण] आम्हांस धनी, जी आज्ञा कराल ती मान्य." असें बोलणें होळकर यांचे ऐकून ताईसाहेब यांनीं उत्तर केलें, "आम्ही कोणती आज्ञा करावी! तें ऐकून होळकर यांणीं उत्तर केलें "जें आपलें मनांत असेल तें बोलणें." तेव्हां ताईसाहेब यांणीं सांगितलें कीं, "आम्हांस सुवर्णदुर्गास पोहोंचवून द्यावें." ती गोष्ट यशवंतरायानें मान्य करून दोघी बायांस आपला सरंजाम देऊन सुवर्णदुर्गास पोहोंचत्या केल्या.

नंतर पुण्यामध्यें श्रीमंतांकडील कारभारी चिंतोपंत देशमुख व वैजनाथ भट भागवत अशा उभयतांस पाहान्यांत ठेवून खंडणी मागूं लागले. पुढें किल्लोकिल्लीहून मंडळी आणिली. मग मसलती होऊं लागल्या. घाटत घाटत

२६. ताईसाहेब म्हणजे बाजीरावाचें कुटुंब वाराणशीबाई असाव्या.

घातलें कीं साताऱ्यास पाठवून वस्त्रें आणावीं. तेव्हां त्रिंबकराव पेंठे यांस साताऱ्यास पाठवून वस्त्रें पुण्यास आणविलीं इतक्या घाटास दोन महिने लागले. पुढें वस्त्रें आणिल्यावर अमृतराव यांचे मनास ती गोष्ट न येई. तेव्हां यशवंतराव होळकरांनीं अमृतराव यांस सांगितलें कीं, "तुम्हीं आम्हांस कोट रूपये कबूल केले ते आम्हांस द्यावे. म्हणजे आम्ही निघून माघारे जाऊं. कोणती मसलत तुमच्या मनांत येत नाहीं त्यापेक्षां तुमचे दैवीं राज्य नाहीं असें समजलें. आम्हांस जाण्याची निकड, ऐवज आम्हांस लवकर द्यावा."

इकडे बाजीराव साहेब सुवर्णदुर्गाहून निघाले ते जलमार्गानें वसईस येऊन दाखल झाले. त्या समयीं खंडेराव निलकंठ रास्ते यांजकडे वसई सरसुभा होता. त्यामुळें श्रीमंत येऊन तेथें राहिले. खंडेराव यांणीं सरकारची तरतूद चांगली राखिली. पुढें इंग्रजांशीं राजकारण करून मसलत केली. "तुम्हीं आम्हांस सामील होऊन आमचे राज्यांतील बंड बखेडे मोडून राज्य सुरळीत चालूं करून द्यावें, म्हणजे तुम्हांस आम्ही आपले राज्यांतील चार आणे आमचे वडील दादासाहेब यांणीं तुम्हांस देऊं केले ते तुम्हांस देऊं, व आणखी दोन आणे नवे तुम्हांस कबूल करितों. परंतु शिंदे, होळकर यांचें पारिपत्य आमच्या मनाजोगें करून दिलें पाहिजे. आम्हीं तुम्हांशीं करार केला आहे त्याप्रमाणें करूं. यांत अंतर पडावयाचें नाहीं." अशी मसलत सिद्ध होण्यास दीड मास लागला. तेव्हां त्या बोलण्यास कर्नल कॅलकुश[२७] साहेब व वेंसली[२७] साहेब हे दोघे मुख्य होते त्यांनीं रुकार दिला. गोष्ट कबूल[२८] करून पलटणांची व दारूगोळ्याची तयारी करून पंचवीस तीस पलटणें घेऊन निघाले.

ही बातमी पुण्यास होतीच. त्या समयीं यशवंतराव होळकर याणें अमृतराव पेशवे यांस ऐवजाची तसदी लाविली. निकड बहूत केली. तेव्हां अमृतराव यांणीं शहरांत पट्टी करून लुटायाचा आरंभ केला. त्या समयीं यशवंतराव होळकर [याणें] शेहाजतखां[२९] पठाण यांस त्याच्या रिसाल्यासुद्धां वीस हजार स्वारांनिशीं अमृतराव यांजपाशीं ठेविलें आणि आपण कूच करून निघाले. शहाजतखां पठाण यांस यशवंतराव यांचा हुकूम झाला कीं, "अमृतराव

---

२७. कर्नल कलकुश = कर्नल क्लोज. हा ह्या वेळीं पुण्यास रेसिडंट होता. वसली = लॉर्ड वेल्स्ली. २८. हा वसईचा तह. १८०२. २९. 'हामीरखान' भिवपुरी प्रतीचा

त्यांजपासून कोट रुपये घेऊन मग त्यांस सोडावें. ” असें सांगून यशवंतराव यांनीं आपल्या फौजेचा तळ ढाळिला. शहरांत मोठी लुटालूट मांडिली. एक कोटीच्या ठिकाणीं सात कोटीची दौलत सांपडली. इंग्रज घाट चढूं लागला ही बातमी पुण्यास जातांच झाडून फौज तेथून कूच करून निघाली. अमृतराव नाशिक येथें जाऊन नाशिक लुटलें. त्याचें वर्णन काय करावें ? अशी दौलत जमा करून अमृतराव निघाले.

इकडे श्रीमंत वसईस होते तेथें सदाशिव माणकेश्वर हैदराबादेस गेले होते तेही येऊन पोहोंचले. इंग्रज घाट चढून वरतीं आला. पूर्वीं बाळोजी कुंजर हे शिंद्यांच्या लष्करांत शिंदे यांस आणावयास गेले होते. तो मजकूर दौलतराव शिंदे यांणीं ऐकून ते उज्जनीपासून माघारे फिरले. बऱ्हाणपुरावरून खानदेशांत घाट चढून वरतीं आले. त्यांच्या पूर्वीं होळकरांचे फौजेचा वेरोळा[30] चोंहींकडे झाला. त्या समयीं रघोजी राजे भोंसलेही फौजेसुद्धां नागपुराहून निघाले. ते फिरत फिरत शिंदे यांजकडे येऊन मिळाले. त्याच्यापूर्वीं यशवंतराव होळकर पुण्याहून कूच करून निघाले. ते मोंगलाईतून औरंगाबादेवर येऊन, मुक्काम करून, नबाब यांजकडील सुभा शहरांत होता त्याच्यापासून शहराचा खंड एकें[31] लाख रुपये घेऊन, तेथून कूच, करून, खानदेशांत उतरून, नंदुबार सुलतानपूर यांजवरून सिंदेंव्यास[32] [ ! ] मुक्काम करून सिंदव्याचा किल्ला काशीराव होळकर यांजकडे होता तो लढाई करून किल्ला घेऊन आपला अंमल बसविला. त्यांच्या पुढें सिंदेवें [!] आजिंठा घाट उतरून नेमाडांत यशवंतराव फौजेसुद्धां गेले. त्या समयीं काशीराव होळकर तेथें होते त्यांचा मोड झाला. ते वेळेस काशीराव यास धरून कैद करून बापू होळकरसुद्धां पायांत बिड्या ठोकून सिंदव्याचे किल्ल्यांत ठेविलें. त्यांचा काळ तेथें झाला. यशवंतराव महेश्वरास दाखल झाले.

इकडे पुणें लुटून, नासिक लूटून, अमृतराव पेशवे यांणीं हिंदुस्थानचा रस्ता धरिला. पुण्यांत असतां कैदेंतील मंडळी सोडली होती त्यांपैकीं नारोपंत

---

३०. वरोळा=प्रसार (?) ‘ चोळा ’ भिवपुरी प्रत. ‘ रोळे ’ इंदूर प्रत. ३१. ‘ अकरा लाख ’ इंदूर प्रत, ‘ बारा लाख ’ भिवपुरी प्रत. ३२. ‘ शिंदे पुण्यास मुक्काम करून ’ असा एका प्रतीचा पाठ आहे. शिंदे-व्याचा=सेंदव्याचा.

चक्रदेवखेरीज बाकी मंडळी झाडून अमृतराव यांचे समागमें गेली. त्यांतून बाबा फडके फुटून चालले ते शिंद्याकडे गेले. असा मजकूर झाला.

इंग्रज घाट चढून, पुण्यावर येऊन लागलेच सरंजामसुद्धां कर्नल साहेब व वसली साहेब नगरावर गेले. नगरचा किल्ला शिंदे यांजकडे होता तो इंग्रज यांणीं फिरून घेऊन किल्ल्यांत ठाणें आपलें बसवून, पुढें इंग्रज चालले. ते लागलेच गंगा उतरून औरंगाबाद प्रांतीं आले. तेव्हां शिंदे दौलतराव खुद्द हिंदुस्थानांतून माघारे पुण्यास यावयाच्या उद्देशें येत होते त्यांजला इंग्रज आल्याची बातमी लागली. सबब त्यांचा मुक्काम भोकरदनावर[३३] झाला. त्या वेळेस शिंद्यांचा सरंजाम मोठा पोक्त कट्टा होता. इंग्रजही त्या रोखानें चालला. त्या समयीं रघूजी राजे भोसले नागपूरवाले हेही शिंद्यास मिळाले होते. बाबा फडके तेथें जाऊन मिळाले. असा जमाव तेथें झाला असतां इकडून वसली साहेब व कर्नल साहेब शिंद्यांचे तोंडावर चालून आले. तेथें लढाईचें तोंड झालें. बोकरदनच्या[३४] मुक्कामीं शिंद्यांचें व इंग्रजांचें [तोंड] लागलें. त्या वेळेस इंग्रजापाशीं पलटणें तीस होतीं. शिंद्यांचे चार कंपू लढत असतां मोठी कट्टी लढाई होऊं लागली. दोहींकडील आगीचा मार. तोफेवर तोफ चालूं लागली. त्या समयीं शिंद्यांकडील सिंगरूप[३५] यांचीं पलटणें व जय कंपू यांणीं मोठी गर्दी केली. अशी लढाई मोठी झाली. तेव्हां सात आठ हजार माणूस त्या लढाईंत पडलें. इंग्रजांचीं सात आठ पलटणें शिल्लक राहिलीं. त्या वेळेस साहेब लोक उभयतां तोंडांत बोटें घालून आश्चर्य करूं लागले. साहेब लोक म्हणतात "दौलतरायासारखा कोणी [शिपाई] पाहिला नाहीं. पुढें या लढाईंत तरणोपाय होतो असें दिसत नाहीं." अशी मसलत मनांत आणून रघोजी राजे भोसले यांजकडे सूत्र लावून फितूर केलें[३६]. त्या समयीं रघोजी भोसले यांणीं दौलतराव शिंदे यांस सांगितलें कीं, "आतां इंग्रज थोडा राहिला. त्याची कथा काय आहे? आपण लुटून घेऊं" अशी मसलत करून दौलतराव शिंदे चाळीस हजार

---

**३३.** भोकरदनावर, 'भोलारदनावर' इंदूर व भिवपुरी प्रतींचे पाठ. **३४.** 'बादरच्या बारल्याच्या' इंदूर प्रत. 'मौजे करदनच्या' भिवपुरी प्रत 'बोकरदन' ग्रांट डफ. ही आसईची लढाई. जवळच बोकरदन आहे. **३५.** एकदां 'शिंगरूपखां' व एकदां 'सिंगरूप' असा हा सरदार कोण होता तें समजत नाहीं. ह्या लढाई पूर्वी सर्व इंग्रज लोक शिंद्यांच्या लष्करांतून निघून गेले. **३६.** 'फितूर करून' कल्याण प्रत 'फितुरानें घेऊन' भिवपुरी प्रत. यास इंग्रजी ग्रंथाचा आधार नाहीं.

स्वारांनिशीं निघाले. समागमें रघोजी भोसले चालले. त्या वेळेस शिंद्यांकडील कंपूयाणें व सिंगरूपचे पलटणचे सरदार यांणीं दौलतराव शिंदे यांस विनंती केली कीं, "आपण घोडे आमचे लढाईमध्यें घालूं नये. इंग्रजांचा हिशेब काय? इंग्रज सारा मोडून टाकितों. आपण आमचे पाठीवर उभे राहून लढाईचा तमाशा पाहावा. हें न ऐकतां आपण घोडे मध्यें घातले तर आमची तोफ मना होऊन माघारे फिरूं. असें झालें असतां इंग्रजांचीं चार पांच पलटणें राहिलीं आहेत तितकींच तुम्हांस पुरतील. तितक्या पलटणांनीं तुम्हांशीं लढाई घेऊन, तुमची दाणादाण करतील. इतका मजकूर कंपूवाले यांणीं सांगितला असतां तो न ऐकतां दौलतराव शिंदे यांणीं घोडे पुढें घातले. त्या समयीं शिंदे यांजकडील कंपूनीं तोफा मावाल्या ओढिल्या. हें पाहून इंग्रजांची तोफ सुरू झाली. त्या समयीं इंग्रजांची व शिंद्यांची लढाई मोठी झाली. त्या लढाईंत शिंदे यांचा मोड झाला. इंग्रज पाठीमागें लागला. त्या समयीं शिंद्यांची खराबी मोठी झाली. दौलतराव शिंदे यांनीं इंग्रजांशीं तह केला. तेथें तह होऊन दौलतराव शिंदे लष्कर संभाळून कंपूसुद्धां माघारे फिरले. ते नर्मदा उतरून नेमाडांतून माळव्यांत गेले. जाते समयीं होळकर यांजकडील इंदूर शिंद्यांनीं लुटलें. व तें वर्तमान यशंवतराव यास समजतांच दोन लाख फौजेनिशीं जाऊन उज्जनीस लागले. ते वेळेस उज्जनी यशवंतरावानें लुटली. हा मजकूर दौलतरायास समजतांच दौलतराव शिंदे जाऊन उज्जनीस पोहोंचले; त्या समयीं शिंदे होळकर यांची लढाई झाली. त्या लढाईत दौलतराव शिंदे यांणीं आपला कमजोर पाहून लागलाच यशवंतरायाशीं सनेट केला. आणि उभयतांच्या भेटी झाल्या. दौलतराव शिंदे आपण होऊन भेटावयास गेले. तेव्हां यशवंतरावयांनीं दौलतरावास बोलून दाखविलें कीं, "आतां तुम्ही होऊन भेटावयास आलां आतां तुमचें काय करावयाचें? एरवीं मल्हाररायाचा सूड घ्यावा असा हेतू फार होता. परंतु तुम्ही होऊन भेटावयास आलां, आतां ती गोष्ट मला करतां येत नाहीं. बरें, जें झालें तें माघारें येत नाहीं. असें बोलले. शिंदे होळकर यांचा सल्ला होऊन परस्परें मेजवान्या होऊन पोषाग वगैरे एकमेकांस देऊन तह झाले[३७].

इतका मजकूर होत असतां इंग्रज कर्नल साहेब व वसलीसाहेब यांणीं साहा पलटणें तयार करून यशवंतरायावर चाल केली. त्या समयीं दौलतराव शिंदे

---

३७. ह्या भेटी भरतपूरचा वेढा उठण्याच्या सुमारास झाल्या, १८०५.

होळकराचा निरोप घेऊन पुढें चालते झाले. ते नीट ग्वालेरीस जाऊन छावणी करून राहिले. इकडे इंग्रजांशीं व यशवंतरायाशीं लढाई मोठी कट्टी झाली. इंग्रज जेरीस आले. त्या वेळेस इंग्रजांनीं आणखी सरंजाम तयार करून दुसरी लढाई यशवंतराव यांशीं घेतली. त्या लढाईत होळकर हटले नाहींत. अशा चार पांच लढाया होळकराशीं व इंग्रजांशीं झाल्या. अशा लढाया घेत घेत सारें हिंदुस्थान फिरले. शेवटीं यशवंतरायाचा मोड झाला. त्या समयीं होळकर यांनीं पळ काढिला. ते पळत पळत चालले. पाठीमागें इंग्रज लागला आहे. असे पळतां पळतां सैत्रंज नदीचे काठीं आले. त्या समयीं नदी दुथडी भरून चालली आहे. त्या वेळेस होळकर यांस मोठें संकट प्राप्त झालें. पाठीमागें इंग्रजांचा सरंजाम पोक्त आहे. अशा अडचणीमध्यें होळकर पडले असतां त्यांणीं ईश्वरास स्मरून नदींत आपला हत्ती लोटला. तेव्हां त्यांच्या मागें दोन लाख फौजेस नदीनें वाट दिली. झाडून लष्कर पार झालें. नदी तर भरून चालली आहे !" तों आलीकडील कांठीं इंग्रज सरंजामासुद्धां येऊन पाहातात तों नदी भरून चालली आहे. त्या समयीं साहेब लोक यांणीं मोठें आश्चर्य मानून तोंडांत बोटें घातलीं. आणि म्हणतात, "ईश्वर ज्यास रक्षितो त्यास आपण काय करावें ?" असें म्हणून शिकाचे विद्यमानें होळकरांचा व इंग्रजांचा तहे[३९] झाला. नंतर परस्परें बोलणीं होऊन यशवंतराव होळकर आलीकडे आले आणि रामपुरावर त्यांची छावणी झाली.

नंतर इंग्रज नागपुराकडे आले. तेथें रघूजीराजे भोंसले यांशीं लढाई मोठी मातबर झाली. त्या वेळेस इंग्रज यांणीं भोंसल्याकडील गाविलगड किल्ला घेतला. त्या किल्ल्यावर बहूत द्रव्य इंग्रज यांस सांपडलें. नंतर भोंसले यांणीं इंग्रजांशीं तह केला त्या समयीं किल्ला माघारा दिला. असें होऊन इंग्रजांचें लष्कर माघारें फिरलें. इतका मजकूर इकडे झाला.

इकडे बाजीराव साहेब पेशवे वसईस गेले होते ते शके १७२५ चे वैशाख मासीं पुण्यास सन आर्बा मयातैनांत येऊन दाखल झाले. पाहतात तों पुणें शहर सारें उध्वस्त झालें. होळकर यांणीं शहरची व्यवस्था चांगली ठेविली

---

३८. सत्रंज = सतलज. ३९. तह सर जॉर्ज बार्लो यांणीं केला. होळकराचा पिच्छा पुरवून त्यास जेरीस ज्याणें आणिलें तो जनरल लेक होय, 'बसली' नव्हे.

नाहीं, व सरकारी दौलत, हत्ती, घोडे वगैरे व तोफा आणखी जिन्नस शेलका होता तो तितका यशवंतराव होळकर घेऊन गेला. श्रीमंत पुण्यास आल्यावर बंदोबस्त शहरचा वगैरे करून वाड्यांत राहिले. श्रीमंत पुण्यास आल्यावर शहरची मंडळी, उदमी व सावकार व गृहस्थ व मुत्सद्दी व भिक्षुक वगैरे झाडून सरदार असे सर्व पुण्यांत येऊन दाखल झाले. सरकारच्या बावन्न पागा होत्या, त्यांपैकीं साहाशें घोडे सरकारांत पागे यांणीं दाखल केले. बाकी पागा बरबाद[४०] झाल्या. अशी व्यवस्था सारे दौलतीची झाली.

इंग्रज होळकराच्या मुलखांतून माघारे दक्षिणेंत आले. त्यांणीं घोडनदी येथें दोन छावण्या केल्या. परंतु इंग्रजांस होळकराची दहशत मोठी बसली, त्यामुळें इंग्रजास स्वस्थ वाटत नाहीं. असें होत असतां इंग्रज याणें होळकरावर प्रयोग करून यशवंतरावास वेड लाविलें.[४१] त्या वेडांत यशवंतराव अगदीं बेकाम झाले. असें दोन तीन वर्षेपर्यंत रामपुऱ्याचे छावणींत यशवंतराव होळकर वेड लागून पडले होते. शेवटीं होळकर त्या वेडांत मृत्यू पावले. मल्हारराव होळकर यांचे चिरंजीव खंडेराव होळकर. तो यशवंतराव फौजेसुद्धां फिरत असतां तेव्हां तो खंडेराव मृत्यू पावला होता. दौलतीचा खावंद वारस होता. पुढें यशवंतराव यांचा वंश चालला. यशवंतराव हे औरस नव्हत. तुकोजी होळकर यांचे नाटकशाळेचे[४२] पुत्र. याप्रमाणें मजकूर होळकरांचा झाला. पुढें सरदारीचीं वस्त्रें श्रीमंत यांणीं दिलीं नाहींत.

इंग्रज यांणीं श्रीमंतांस दोन चार वेळां उपदेश केला. "आम्ही तुमचें राज्य घ्यावयास आलों आहों, तर तुम्हीं ५०।६० हजार फौज पुणें मुक्कामीं आपलेजवळ बाळगावी, म्हणजे तुमचें राज्य काईम राहून आमचा रोजगार चालेल." असा [४३]हितोपदेश कर्नल साहेब, वसली साहेब यांणीं केला असतां ती गोष्ट श्रीमंतांच्या ध्यानांत न येतां आपल्या पदरचीं माणसें, सरदार मोडीत चालले. मुलखांतलि किल्ले, कोट वगैरे यांचे खर्च तोडिले; अवघे मामले मक्त्यानें लाविले;

---

४०. बरबाद=खराब, रिकाम्या. ४१. यशवंतरायास वेड लाविलें—कोणत्याही गोष्टीचें कारण नीटपणें समजलें नाहीं म्हणजे ती कांहीं तरी अमानुष प्रकारानें घडून आली असें म्हणण्याचा साधारण पुरुषांच्या वहिवाटीचें हें एक उदाहरण होय. मागें पृष्ठ १८० पाहा. ४२. नाटकशाळा=वेश्या, राख. ४३. ह्या हितोपदेशास इंग्रजी ग्रंथांचा आधार नाहीं.

रयतेची दाद नाहीं. अशी व्यवस्था राज्य करण्याची झाली. नंतर कर्नेल वसली साहेब यांची बदली झाली. त्या बदलीवर दुसरे साहेब लोक आले. ते दिवसें दिवस राज्य व्यापीत चालले. अलीबहादर याणें कोट रुपयांचा मुलूख नवा सोडवून त्या मुलखाचें राज्य ते करीत असतां त्या मुलखाच्या सनदा बाजीराव साहेब यांनीं इंग्रजांस करून दिल्या. तेव्हां तें संस्थान इंग्रजांनीं घेतलें अमृतराव साहेब हे हिंदुस्थानांत गेले त्या समयीं त्यांजला इंग्रज खर्चायास देऊं लागले. त्यांचे खर्चांत गुजराथचे महाल श्रीमंतांपासून १४ महालां-पैकीं सात महाल नेमून घेतले. असें राज्य निर्बळपणाचें बाजीरावसाहेब यांनीं केलें. सारा हुकूम इंग्रजांचा चालू जाहला. श्रीमंतांस कोठें स्वारीस जाणें झाल्यास इंग्रजांचा हुकूम होईल तेव्हां कोठें बाहेर कोपरगांव व नाशिक, गुहागर व पंढरपूर येथें जावें. असा इंग्रजांचा हुकूम चालता झाला. पुण्यामध्यें राज्याचा कारभार चिंतोपंत देशमूख करीत होते. कारभार मिळून महाल सांगावयाच्या घालमेली करावयाच्या मसलती. कारभार सदाशिव माणकेश्वर करीत होते. इंग्रज यांजकडून सरकारांत बोलण्यास खुर्शेटशी[४४] शेट मोदी हे होते. असा कारभार होत असतां दोन चार बदल्या साहेब लोक यांच्या झाल्या. शेवटली बदली झाली तेव्हां अलपिष्टण साहेब त्या कामावर आले. त्यांजकडे बोलण्यास नेहमीं जाण्या येण्यास चिमणाजी नारायण व रामचंद्र भिकाजी करंदीकर हे दोन शास्त्रीत ठेविले. हुजऱ्यांमध्यें त्रिंबकजी डेंगळे यांस बेटांत जाऊन बोलण्याची सरकारची आज्ञा जाहली. तेही जाऊं लागले.

असा कारभार करीत असतां अलपिष्टण साहेब आल्यावर राज्याची चौकशी व कागदपत्र पाहावयास फारच बारीक पाहूं लागले. त्या समयीं चिंतोपंत देशमूख यांस मजकूर समजाविण्याची व बेटांत जाऊन कागदपत्र दाखविण्याची आज्ञा जाहली. त्याप्रमाणें जाऊन मजकूर समजावूं लागले. असा आपला[४५] हुकूम चालूं लागला; या समयीं गंगाधर शास्त्री पटवर्धन हे बडोद्यास इंग्रजांकडून गायकवाड यांचे राज्यांत होते, त्यांणीं गायकवाडाचे राज्याचा बंदोबस्त करून

४४. हा पारसी होता. पारसी लोक मराठ्यांच्या अमलांत इतके दिवस असतां त्यांच्या सर्व इतिहासांत पारसी लोकांच्या नांवाचा उल्लेख ह्या मोदीच्या संबंधानेंच काय तो एकदां आलेला दृष्टीस पडतो. याचें नांव खुसरु शेट मोदी. ४५. आपला—इंग्रजांचा, ह्या सर्वनामाचा संबंध पुढें आहे.

इंग्रजांस काय मुलूख द्यावयाचा तो देऊन, गायकवाडाचा व इंग्रजाचा तह करून, बंदोबस्त केला; तसा पेशवे यांचे राज्याचा बंदोबस्त करावा या उद्देशें शास्त्री पटवर्धन पुण्यास आले. पुण्यांत श्रीमंतांच्या भेटी होऊन राज्य प्रकरणीं बोलणीं बहूत जाहलीं. परंतु तें कांहीं श्रीमंतांच्या खात्रीस न येई. या प्रभूला कोणाचा विश्वास नाहीं व वचनाची खंबीरता[46] नाहीं. वसईहून आल्यावर असा कारभार सारा जाहाला. इंग्रज यांनीं पेशवे यांचें वजन ओळखून ठेविलें त्यामुळें ते जसें म्हणत गेले तसें त्यांचें ऐकून हेही तसेच वर्तू लागले. जेथपावेतों मोदी शेटजी कारभार वकिलीचे बोलण्यांत होते तेथपर्यंत त्यांनीं दोन्हीं पारडीं समान राखिलीं होतीं. इकडची जरब तिकडे व तिकडची जरब इकडे अशी ठेवून काम चालविलें होतें. परंतु अलपिष्टण साहेब वकिलीचे कामावर आले त्या दिवसापासून मोदी यांचें तेज कमी पडत चाललें. अलपिष्टण शाहणा उत्कृष्ट, त्याच्या शाहाणपणापुढें मोदी वगैरे कोणाचें शाहाणपण चाललें नाहीं. गंगाधर शास्त्री पुण्यांत आल्यावर सारा मजकूर मोदी यांचा उघडा पडला. त्या समयीं मोदी कैद करावा अशी मसलत केली. तेव्हां हा सारा मजकूर मोदी यास समजला. नंतर मोदी यानें श्रीमंतांस सांगितलें "मला इंग्रजांकडे पाठवूं नये. त्यांचें मागणें तुम्हांकडे आलें असतां आपण त्यांस सांगावें कीं, 'आमचे मामले मोदीकडे आहेत त्यांचा हिशेब आम्ही समजून घेऊन आमचा हिशेबाचा उलगडा झाला म्हणजे मोदीस तुमचे हवालीं करूं.' अशी तुम्हीं गोष्ट सांगून मास पक्ष लोटावा तों या साहेबाची बदली विलायतेहून करून आणवितों. दुसरा साहेब या कामावर आला म्हणजे पहिल्याप्रमाणेंच चालेल." असा मोदी यानें घाट घातला असतां तसें बोलणें जरबीचें[47] श्रीमंतांच्यानीं सांगवेना, व यांचें अवसान रगडून बोलावयाचें नाहीं असें समजून, मोदी यांनीं दुसरे दिवशीं हिरकणी खाऊन प्राण दिला.

तेव्हांपासून पुढें गंगाधर शास्त्री बोलण्यांत पडले. परंतु बाजीराव साहेब यांचा मानस गंगाधर शास्त्री या कामांत नसावे. असा मनांत हेतू, परंतु बोलून दाखवितां येत नाहीं. कारण श्रीमंतांमध्यें तितकी हिंमत नाहीं. असें असून पंढरीस आषाढी एकादशीस स्वारी जाण्याचा बेत झाला, त्या समयीं पटवर्धन शास्त्री यांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, "तुम्ही स्वारीबरोबर चलावें." त्या

४६ 'खरेपणा' इंदुर प्रत.' ४७. 'जबरी' किंवा 'जहरीचें' इं. प्रत.

समयीं शास्त्री जात नव्हते. परंतु श्रीमंतांचा मोठा आग्रह पाहून येतों म्हणून बोलले आणि आषाढीचे यात्रेला स्वारी समागमें गेले. पंढरपुरास पोहोंचल्यानंतर आषाढी एकादशी झाल्यावर श्रीमंतांचा मुक्काम तेथें आठ चार दिवस होता. तेव्हां रात्रीचे ठिकाणीं देवास स्वारी गेली त्या समयीं गंगाधर शास्त्री समागमें होते. देवदर्शन होऊन प्रदक्षणा घालावयास गेले. यात्रेची दाटी, रात्रीचा समय, त्या गर्दींत गंगाधर शास्त्री यांजवर मारेकरी जाऊन प्रदक्षणेच्या वाटेंत अगोदर मशाली गर्दीमध्यें विझविल्यानंतर शास्त्रीबोवा यांजवर वार केले. ते लागलेच ठार जाहले. जेव्हां मोठा गलबला झाला त्या समयीं शास्त्री यांजकडील लोक, माणसें व कारकून वगैरे मशाली लावून धावले. तसेच सरकारी लोकही धावले. पाहातात तों गंगाधर शास्त्री ठार झाले. असा मजकूर पंढरपुरास झाला. ती बातमी पुण्यांत इंग्रजांस तिसरे दिवशीं लागली. गंगाधर शास्त्री यांसाठीं इंग्रज यांची मर्जी फार जात राहिली.

पुढें श्रीमंतांची स्वारी पुण्यांत आल्यावर इंग्रज त्या शोधांत होते. त्यांनीं मुद्दा मारल्याचा शाबीद केला. तो त्रिंबकजी डेंगळे यांनीं मारिलें असा निश्चय झाल्यावर इंग्रजाचें बोलणें श्रीमंतांस लागलें कीं, " त्रिंबकजीस आमचे स्वाधीन करावा." असें बोलणें आठ चार दिवस लागलें असतां इंग्रजांची निकड श्रीमंतांस लागली व जरबही बसली. त्या समयीं त्रिंबकजीस इंग्रजांचे हवालीं केला. त्यानीं लागलेंच तेथून काढून *साष्टीच्या किल्ल्यांत त्रिंबकजीस पोहोंचविला. पाहारे मोठे कडोविकडीचे ठेविले. तेव्हांपासून इंग्रज यांची व श्रीमंतांची परस्परें मनामध्यें दहल येऊन वांकडें पडलें. नंतर इंग्रज व्यापीत चालले. आपला सरंजाम मिळवूं लागले. त्रिंबकजी कैदेंत पडल्यावर त्रिंबकजी सात आठ महिने कैदेंत होता. इकडे पुण्यामध्यें दोहोचोहों दिवशीं देशमूख यांस श्रीमंतांची आज्ञा झाली, " तुम्ही बेटांत जाऊन मजकूर राज्यप्रकरणीं अलपिष्टण साहेबांस समजावीत जावा."

असा पाठ इकडे चालला असतां त्रिंबकजी डेंगळे साष्टीच्या किल्ल्यांत कैदेंत असतां तेथें त्यांनीं फितूर करून इंग्रजांकडील पहारे होते त्यांसुद्धां

---

* साष्टीच्या=ठाण्याच्या ४८. दहल ? वितुष्ट ४९. त्यांसुद्धां=त्यांस न जुमानतां किंवा त्यांसही आपणाबरोबर घेऊन.

किल्ल्यांतून पळाला, तो खाडी उतरून अलीकडे आला. तो देशांत येऊन त्यानें बंड केलें. कोंकणपट्टी लुटूं लागले. पेंढारी म्हणून बाहेर आवाई, परंतु सारें बंड त्रिंबकजी डेंगळे याचें. त्यांस खर्चास पैका श्रीमंतांकडून पोंचूं लागला, अशी शाबिती इंग्रज यानें श्रीमंतांकडे लाविली, व त्रिंबकजीचें बंड मोडण्याविषयीं कंपनी सरकारचीं पलटणें फिरूं लागलीं. इतक्यांत शके १७३८ फाल्गुन शुद्ध चतुर्दशी त्यादिवशीं चिंतोपंत देशमूख यांस नवज्वराची भावना होऊन देवाज्ञा झाली.

देशमूख मृत्यू पावल्यावर इंग्रजांचा व सरकारचा बिघाड झाला. शके१७३९चे वैशाखांत इंग्रजाचा वेढा शहराभोंवता बसला. त्यांनीं बोलणें सरकारांत लाविलें कीं, "आमचा पूर्वीचा करार ६ आणे आपले राज्यांत मुलूख देण्याचा, तो मुलूख आमचा आम्हांस द्यावा नाहीं तर लढाईस ऊभें राहावें." असें म्हणून घेरा शहराभोंवता बसून तोफा शहरावर फिरविल्या. त्या समयीं सदाशिव माणकेश्वर हे इंग्रजांचे बोलण्यांत होते. तेव्हां त्यांनीं बोलण्यांत समेट घातला आणि घेरा उठविला. त्या समयीं लोहगड व पुरंदर व सिंहगड असे तीन किल्ले इंग्रजाचे ओलीस दिले. कारण "तुमचा मुलूख साहा आणे यांचा द्यावयाचा तो देऊं आणि आम्ही आपले किल्ले माघारे घेऊं." असा तह ठरवून घेरा उठविला. तेव्हां इंग्रजांनीं गोष्ट कबूल करून स्वस्थ राहिले.

---

५०. मागेंपृष्ट २०४ टीप २५ पाहा. "रामजोशांच्या पुढें लोकप्रसिद्ध हरदास विशेषें करून नांव घेण्यासारखे असे एक दोनच आहेत. एक संगमनेरास राहणारा अनंतफंदी; आणि दुसरे बाजीरावाचे पुढें जे दिवाण झाले ते माणकेश्वर. यांपैकीं दुसऱ्या विषयींच्या लोकप्रसिद्ध दोन आख्यायिका मागें एका अंकांत सांगितल्या आहेत [ निबंधमाला अंक ७ पृष्ठ २७–२८. ] ग्रांट डफ साहेबांनीं आपल्या इतिहासांत वरील ऐतिहासिक पुरुषाविषयीं लिहितांना त्याचें थोडेंसें वृत्त टिपेंत लिहिलें आहे. तिजवरून असें समजतें कीं, माणकेश्वर हे मोठे गवय्ये असून शिवाय त्यांनीं पुष्कळ कवनेंही केलीं आहेत. त्यांची वरील इतिहासकारानें बरीच प्रशंसा करून तीं जमविण्याविषयीं आपल्या स्वदेशीयांस शिफारस केली आहे. त्या शिफारसीप्रमाणें कांहीं झाल्याचें आजपर्यंत कोठें समजण्यांत नाहीं; आणि मूळ इतिहासाचीच कोण दुर्दशा झाली हें मनांत आणिलें असतां त्यांतील टिपेकडे कोणीं विशेष लक्ष न दिलें याचें मोठेंसें आश्चर्यही वाटावयास नको ! असो. वरील शिफारस आम्ही आमच्या वाचकांसही करितों. ती वरच्यासारखी फुकट न जावो म्हणजे झालें." निबंधमाला अंक २० पृष्ठ १९ पाहा.

परंतु ते त्रिंबकजी डेंगळे याच्या धरण्याच्या उद्योगांत होतेच. तेव्हांपासून श्रीमंतांचा बिघाड झाला. त्या समयीं मोरदीक्षित[51] मराठे वसईकर हे श्रीमंतांनीं इंग्रजांचे बोलण्यांत घातले. तेव्हांपासून सदाशिवपंत भाऊ यांचें तेज कमी पडलें व श्रीमंतही फौज ठेवूं लागले. अवघे बोलावून पुण्यास आणिले. नवे फौजेची कलमजारी केली. आला स्वार, पायदळ, याची हाजिरी घेऊन चाकरीस ठेविले. १०,००० आरब चाकरीस ठेविले व ३,००० गोसांवी नंगे असे चाकर ठेविले. तेव्हां इंग्रजांचा नेट भारी होत चालला. त्यांनींहि पलटणांची तयारी केली. श्रीमंतांची लाख फौजेची हजेरी झाली. तोफखाना पानशे यांजकडून करवीत चालले. नवे बाण करण्याचा आरंभ केला. दारूगोळा याचाही सरंजाम चालविला. असें चालत असतां इंग्रजांची जरब बहूत पडली. त्या समयीं उत्तर कोंकण हा मुलूख तहत रायगडापावेतों, रेवदंडा व तळा, घोंसाळा वगैरे अवचितगड, बिरवाडीपावेतों झाडून मुलुखाच्या सनदा इंग्रजांस करून दिल्या. त्याचा अंमल ज्येष्ठ मासापासून चालता झाला.

श्रीमंतांनीं लढाईची तयारी केली. परंतु मसलतदार कोणी नाहीं. अवघें मंडळ नवेंच. त्यांत इंग्रजांचा फितूर सगळ्या सरदारांत जाहालेला. कोणी इंग्रजांचा पैका खाल्ल्याशिवाय[52] राहिला असें नाहीं. याचा बंदोबस्त मात्र कोणाचा सरकाराच्यानें जाहाला नाहीं. एक बापू गोखले खेरीज करून बाकी सगळें मंडळ इंग्रजानें भारून ठेविलें. अलपिष्टन साहेब अक्कलवान मोठा, असें असतां पेशवे यांचे येथें अक्कलवान कोणी नाहीं. त्या समयीं गोविंदराव काळे हे जुन्यांपैकीं होते, ते घरीं बसले होते, त्यांजला बारामतीहून पुण्यास आणिलें. तेव्हां सारा मजकूर काळे यांस समजाविला. त्या समयीं गोविंदराव काळे यांणीं मसलत सांगितली कीं, " तूर्त इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग घालूं नये. तुमचा सरंजाम अवघा नवा. काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें घडत नाहीं. वर्ष दोन वर्षें फौज अशी बाळगावी व इंग्रजांशीं सख्यत्व आहे तेंच चालवावें. दुसरें, लढाईचा प्रसंग शहरापाशीं करूं नये. एकादी मोहीम परराज्यांत सरकारची स्वारी बाहेर काढावी आणि इंग्रजास समागमें घेऊन जावें व तिकडे गेल्यानंतर लढाईचा प्रसंग करावयाचा [ तो ] करतां येईल. सध्यां

---

५१. मागें पृष्ठ १९९ टीप १० पाहा. ५२. ह्यास इंग्रजी ग्रंथाचा आधार नाहीं.

लढाई उभी केली असतां इंग्रज म्हणजे हटला जातो असें घडत नाहीं." अशी मसलत काळे यांची जाहली. परंतु तें कोणाचे स्वात्रेस न येई. त्यांत लढाईचा मोठा दम बापू गोखले यांचा. त्यामुळें कोणाचें सांगितलें चालत नव्हतें. सारे सरदार फितुरलेले, इंग्रजांचा पैका खाल्लेला, तेव्हां ती फौज इंग्रज यांशीं म्हणजे लढते असें घडत नाहीं.

इकडे लढाईचा प्रसंग ठरला त्याप्रमाणें अवघ्यांनीं होळकर व शिंदे [ व ] भोंसले व गाइकवाड इतक्यांस सरकारचीं पत्रें गेलीं कीं, "आम्ही लढाई इंग्रजांशीं घेतों त्याच दिवशीं तुम्हीं इंग्रजांशीं लढावें." अशीं पत्रें चोहोंकडे गेलीं. पुण्यांत तमाम सरदार जमा झाले. निपाणकर, अक्कलकोटवाले भोसले, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचुरकर, पटवर्धन, बापू गोखले, राजे बहादर, भोइटे, पुरंदरे, किरकोळ सरंजामी असे मिळून [ व ]नवीन ठेविलेली फौज मिळून लाख सव्वालाख घोडे मिळाले. खेरीज पायदळ आरब, रोहिले, पठाण, सिद्धी, गोसावी, शिवाय रजपूत रांगडे, मुसलमान असे ५०,००० पायींचे लोक नवे चाकर ठेवलेले, असा सरंजाम तयार जाहाला. या बिघाडाचे पूर्वीं दोन वर्षें अगोदर पोट[५३] साहेब इंग्रज यांस श्रीमंतांनीं चाकर ठेवून दोन पलटणें नवीं शिकविलीं. त्यास दोन चार लक्ष रुपये खर्च पलटण तयार व्हावयास लागला. त्या कामावर गोपाळपंत रानडे [ व ] परशुरामपंत सांवरकर नेमिले होते. शेवटीं तीं पलटणें लढाईच्या उपयोगीं श्रीमंतांच्या पडलीं नाहींत। तीं इंग्रजांस मिळालीं. लढाईचे पूर्वीं अलपिष्टन साहेब पुण्यांत मोरदीक्षित मराठे यांजकडे विश्रामबागेंत १०० गोऱ्यांनिशीं२०० घण तुरुप समागमें, सोजीर यांचीं पलटणें [ घेऊन आले. ] ते दिवशीं बैठक विश्रामबागेच्या वाड्यांत झाली. परंतु कांहीं बोलणें जमलें नाहीं. अलपिष्टन साहेब तोंडांत खाऊन उठून गेले. पुढें भाद्रपद मासीं वद्य पक्षांत सदाशिव माणकेश्वर यांचे शरिरास विकृती होऊन ते मृत्यू पावले. त्याचे दिवस होऊन, त्यांस दत्तक देऊन, त्यांचें संस्थान चालविलें.

दसरा झाल्यावर फारच गोष्ट बिघडली. तेव्हां आश्विन वद्यपक्षीं बापू गोखले सप्तमी अष्टमी या दिवसांत फौजेची तयारी करून संगमाचे बेटावर चढाई करून गेले. ती बातमी अलपिष्टन साहेबांस नव्हती. एकाएकींच बापू गोखले चालून

५३. पोट साहेब = क्यापटन् फोर्ड. ह्याची छावणी दापोडीस होती.

गेले तेव्हां अलफिष्टन साहेब मेण्यांत बसून निघाले. [ नंतर ] सरकारच्या फौजेनें बेट लुटिलें व जाळिलें. त्या वेळेस नदीच्या पलीकडून विंचुरकर यांचे फौजेचा फरा उभा होता. साहेब मेण्यांत बसून त्या फऱ्यावरून चालला. एकटा असून त्यास कोणीं आडविलें नाहीं. असा फितूर फौजेचा ! एक बापू गोखले मात्र लढाईचे उद्योगांत. तेव्हां एकट्याचा निभाव कसा लागतो ? बडे साहेब निघाले ते गणेशखिंडीवर गेले. सरकारची फौज बेट जाळून माघारी आली. गारपीरही उधळिलें. असा मजकूर त्या दिवशीं झाला.

तेथून आश्विन वद्य ११ त्या दिवशीं बापू गोखले श्रीमंतांची स्वारी फौजेची तयारी करून पर्वतीस गेले. त्या समयीं श्रीमंत पर्वतीस राहिले. बापू गोखले व मोरदीक्षित मराठे, चिंतामणराव आपा पटवर्धन व तासगांवकर व मिरजकर झाडून पटवर्धन, आपाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे, राजेबहादर, अक्कलकोटवाले झाडून फौजेसुद्धां तयार होऊन गणेशखिंडीवर इंग्रज जेथें उतरला होता तेथें जाऊन इंग्रजांस घेरा दिला. ते वेळेस इंग्रज यांजपाशीं लढवाई थोडे होते, परंतु लढाईस उभे राहिले. दोन तीन हजार माणूस जखमी व ठार झालें. खेरीज घोडीं. अशी लढाई मोठी कठीण झाली. इंग्रजांच्या लोकांपाशीं दोन तीन तोटे राहिले. त्या लढाईंत मोरदीक्षित नाना गोळी लागून ठार झाले. दुसरे गणेशपंत सहस्रबुद्धे पटवर्धन यांजकडील, तेही ठार झाले. त्या समयीं इंग्रज यांचें बोलणें श्रीमंतांकडे आलें. अलफिष्टण साहेब फार घाबरले. त्या समयीं श्रीमंत यांचीं बोलावणीं बापू गोखले यांस गेलीं. परंतु बापू गोखले माघारे न फिरत. इंग्रज कोंडला [ असता ] व इंग्रज यांचे लोकांस खावयास कांहीं नाहीं तशी निकड बसली, असती म्हणजे इंग्रज कौलांत आले असते. परंतु बापू गोखले यांचा लढाईचा आग्रह मोठा. खावंदाचे मनांत इंग्रज मोडावयाचा नाहीं. तेव्हां बोलावण्यावर बोलावणीं बापू गोखले यांस श्रीमंतांचीं गेलीं. शेवटीं निशान श्रीमंतांनीं मागून पाठविलें, तेव्हां बापू गोखले शह सोडून माघारे आले.[५५]

त्या दिवसापासून आठ दिवसपर्यंत लढाईची ढील झाली. त्या अवकाशांत इंग्रज यानें आपले पलटणांची तयारी केली. घोडनदीहून जरनेल इसामित[५६] हा

५४. मागें पृष्ठ १८६ टीप ५२ पाहा. ५५. ही खडकीची लढाई. हींत बरसाहेब व फोर्ड साहेब यांणीं मराठ्यांचा पराभव केला. माहे नवंबर १८१७. ५६. जरनेल इसामित =जनरल स्मिथ्.

सरदार मोठा लढवाई दोन चार पलटणें दारूगोळ्यासुद्धां तयारी करून पुण्यावर आला. इंग्रजांची तयारी लढाईची झाली. इकडे श्रीमंत दिवाळी होऊन बाहेर पडले ते डेन्यास येऊन दाखल झाले. तेथें अवघी फौज जमा जाहली. तोफखानाही तयार होऊन तेथें आला. अशी तयारी होऊन कार्तिक शुद्ध ८, तिसरे प्रहरीं, लढाईस प्रारंभ झाला. तेव्हां इंग्रज येऊन येरवड्यावर तयार होऊन उभा राहिला. इकडे बापू गोखले फौजेची तयारी करून लढाईच्या उद्देशानें निघाले ते येरवड्यावर गेले. तेथें गेल्यानंतर टेंकडी येरवड्यानजीक आहे, ती श्रीमंतांचे फौजेनें आटोपली. त्या टेंकडीवर आरब, गोसांवी चढले. असें होत असतां दिवेलावणीच्या संधींत लढाई सुरू झाली. कांहीं लढाई होत आहे महाकाळ तोफ पुरंदरास होती, ती अगोदर पुण्यास आणली होती. तीच तोफ तोफखान्यांतून ओढून लढाईस नेली.

आरब, गोसांवी लढत होते. दारूगोळ्याचा पुरावा व खाण्यापिण्याचा कांहीं पाठीमागून जाहला नाहीं. इंग्रजांचे तोफेची मारगिरी मोठी होऊं लागली, त्या समयीं रात्र दहा बारा घटका जाहली. त्या वेळेस श्रीमंत [ यांणीं ] स्वारी तयार करून, सगळा आपला अजबाब आटोपून, दिव्याचे घाटाचा रस्ता धरिला. घाटांत स्वारी गेली ते वेळेस हजारों मशाली लाविल्या. असे पळाले. हें बापू गोखले यांनीं पाहून तेही त्याच रस्त्यानें चालले. सारी फौज उधळली. तो उजेड इंग्रज याणें * पाहिला. तेव्हां त्यानें लढाईचा लगट भारी केला. आरब, गोसांवी लढत होते त्यांजवळ दारूगोळा नाहींसा झाला. त्यांत बहुतेक माणसें ठार झालीं. आरब, गोसांव्यांनीं पळ काढिला. टेकडी इंग्रजांनीं सही केली आणि तेथून पुढें चाल केली.

श्रीमंत पळतात हें पाहून इंग्रजांचीं पलटणें पाठीमागें लागलीं.तों पहांटेचा समय व्हावयास आला. इंग्रज श्रीमंतांचे तळावर येऊन पोहोंचला. येऊन पाहतो तों डेरे राहुट्या रिकाम्या उभ्या आहेत ! त्या गर्दींत दौलत कित्येकांचे हातीं लागली,ते आभर झाले. अलपिष्टन साहेबांनीं श्रीमंतांचे तळाचा बंदोबस्त करून, श्रीमंतांचे पाठीमागें पलटणें रवाना करून आपण माघारे फिरले, ते गारपिरावर

* "तें उजाडतां इंग्रजानें पाहिलें" इंदूर प्रत. ५७. सही केली=ताब्यांत घेतली.

येऊन शहरचा बंदोबस्त करावा म्हणून हलकारे पुण्यांत चकर्त्या[५८] देऊन पाठविले. एक शनवारच्या वाड्यांत व एक शुक्रवारच्या वाड्यांत व एक विश्राम बागच्या वाड्यांत व एक बुधवारच्या वाड्यांत व एक बापू गोखले यांचे वाड्यांत [अशा] पाठविल्या. त्यांत हांशिल मिळून वाड्याची तसनस न व्हावी. दोन प्रहारच्या समयास, कार्तिक शुद्ध नवमी, शके १७३९ त्या दिवशीं अलपिष्टन साहेब पुण्यांत येऊन कंपनी सरकारचा बावटा शनवारचे वाड्यावर लावला.तसेंच शहरांत चावडी चावडीनें झेंडे सरकारचे होते त्या झेंड्याप्रत इंग्रजी बावटे[५९] लाविले. आणि शहरांत द्वाही फिरविली कीं,"बाजीराव साहेब यांची द्वाही कंपनीसरकारचा हुकूम" अशी द्वाही फिरवून चारी वाड्यांत[६०] चौकीदार व पाहारेकरी, ब्राह्मण मंडळी आचारी व खटपटे, कुळंबिणी, कामाठी वगैरे श्रीमंतांकडील होते तितकेही चोहों वाड्यांतून काढून इंग्रजी पहारे वाड्यांत ठेविले. शहरच्या बंदोबस्तास नवी शिबंदी इंग्रजांनें ठेविली. पेठोपेठीं चावडीवर कारकून ठेविले. शहरच्या चौक्या जागजागीं जशा होत्या तशा बसविल्या. असा बंदोबस्त करून चावडी चावडीनें संत्री लोकांचे पहारे ठेविले. वाड्यांतही संत्री यांचे पहारे ठेविले. शहरचे कामावर राबिसन साहेब ह्यांस ठेविले.

असा शहरचा बंदोबस्त करून दुसरे दिवशीं बडे साहेब आपले लष्कराचा कूच करून श्रीमंत पळत होते त्यांच्या पाठीवर गेले. श्रीमंतांची फौज पुढें पळते. पाठीमागें इंग्रजांचीं पलटणें लागलीं. मध्यें वाटेंत एक दोन लढाया झाल्या, परंतु श्रीमंत लढाईस पळूं लागले ते ब्राह्मण- वाड्याच्या घाटापावेतों पळाले. तेथें घाटावर मुक्काम झाला. त्या ठिकाणीं बापू गोखले यांचे चिरंजीव मृत्यू पावले. त्यांची बायको सती गेली. म्हणून दहा बारा दिवस मुक्काम तेथेंच होऊन इंग्रजसुद्धां मुक्काम होता. बापू गोखले यांचे [ मुलाचे ] दिवस झाल्यावर कूच

५८. चकत्या=तिकिटें, बिल्ले. ५९. कोतवालचावडी जवळील झेंड्यास व शनवारचे वाड्यावरील झेंड्यास निशाणें नेऊन लावण्याचें काम उरकण्याचा साहेब लोकांचा हिय्या होईना, तेव्हां तें काम माजी बाळाजीपंत नातू यांणीं पतकरून मोठ्या धैर्यानें सिद्धीस नेलें असें म्हणतात. ६०. चारी वाडे–पैकीं शनवारचा व शुक्रवारचा असे दोन वाडे पूर्वीच जळून गेले. बाकी राहिलेले दोन–विश्रामबागचा व बुधवारचा हे थोडे वर्षांपूर्वीं पुण्यांतील दोन पेठांस शोभवीत होते, तेही ता० १३ माहे मे सन १८७९ या रोजीं आपल्या दुसऱ्या दोन बंधूंप्रमाणें विलक्षण रितीनें एकाच समयीं अग्निमुखीं पडून सर्व लोकांस हळहळविते झाले.

होऊन, श्रीमंत माघारे फिरले व मागती पुण्याचे रोखानें आले. ते भीमा उतरून कोरेगांव येथें श्रीमंतांचा मुक्काम झाला. तेथें कोरेगांवास श्रीमंतांची व इंग्रजांची मोठी लढाई झाली. श्रीमंतांच्या फौजेपैकीं दहा पांच हजार फौज नारो विष्णू आपटे घेऊन वाघोलीपावेतों आले. तेव्हां पुण्यामध्यें इंग्रज यांची पळण्याची तयारी झाली.[61] कोरेगांवीं इंग्रज लढत होता तेथें लढाई मोठी आरबांनीं व पायदळांनीं दिली. त्या समयीं इंग्रज कच खाऊन गांवामध्यें शिरला. तेव्हां श्रीमंतांकडील लोक गांवांत शिरले. तेथेंही लढाई मोठी मातबर झाली. दोन चारशें लोक इंग्रजांचे राहिले. ते कोरेगांवांत बांकडे यांचे वाड्यांत शिरले. त्या वाड्यास श्रीमंतांकडील लोकांनीं घेरा देऊन लढत होते. परंतु खावंद बेहिमती, तेथून कूच करून साताऱ्याकडे फिरले. इंग्रज पाठीमागें लागला आहे. तसे पळत जाऊन साताऱ्यास राजे यांस घेऊन निघाले. पुनः मागती पळावयास प्रारंभ केला. तों सोलापूरपावेतों पळाले. तितक्या वाटेंत पळतांना राजे पळतनासे झाले. श्रीमंत पुढें गेल्यावर पाठीमागून इंग्रज आला.त्यानें राजे यांचा बंदोबस्त केला.[62] पुढें इंग्रज श्रीमंतांच्या फौजेच्या पाठीमागें लागले. त्या वेळेस फौजेच्या दोन टोळ्या केल्या. बापू गोखले पांच पन्नास हजार फौज घेऊन इंग्रजांचे गोटावर उभे राहिले. पाठीमागें श्रीमंत पळूं लागले. तोफखाना वगैरे सोलापुरावरच राहिला. श्रीमंत सडे झाले. बापू गोखले पाठीमागून निघाले ते सोलापुराहून सदाशिव माणकेश्वर यांजकडील कारकून सोलापुरावर होते ते [ घेऊन ] बापू गोखले यांनीं टेंभुरणीपावेतों जाऊन सदाशिव माणकेश्वर यांचा वाडा लुटला. पावड्यावारी रुपये काढिले. ते कोट कोट रुपये [ भरले. ] अशी कोट रुपयांची दौलत काढून, फौजेस वांटून मागती तेथून बापू गोखले उलटले. श्रीमंत नागपूरपावेतों पळाले. तेव्हां गारपगारी[63] श्रीमंतांपाशीं येऊन भेटले. श्रीमंतांस म्हणत होते, " आम्हांस कांहीं रुपये द्याल तर इंग्रजांचे लष्करावर गारांचा पाऊस पाडून लष्कर उधळितों. " तेव्हां श्रीमंतांनी तें न ऐकलें. तसेच गारपगारी इंग्रजांकडे गेले. तेथें जाऊन इंग्रजांस असाच मजकूर सांगितला. तेव्हां साहेब लोकांनीं गोष्ट कबूल करून, गारांचा पाऊस श्रीमंतांचे

६१. यास इंग्रजी ग्रंथाचा आधार नाहीं. ६२. राजे अष्ट्याची झटपट झाल्यानंतर इंग्रजांचे हातीं लागले. ग्रांट डफ. ६३. गारपगारी = गारांचा पाऊस पाडण्याचें सामर्थ्य ज्याचें आंगीं आहे असा मनुष्य.

लष्करावर पाडिला. त्यानें लष्कराची दाणादाण होऊन लष्कर उधळिलें. तेथून सारे लष्कराची, फौजेची फाटाफाट झाली. ते बापू गोखले सोलापुराकडे फिरले. श्रीमंत ब्रह्मणपुराकडे फिरले. ज्या समयीं लढाईचा बेत ठरला त्या वेळेस चौघां सरदारांस लढाईविशीं पत्रें गेलीं होतीं. त्यांत होळकर व भोसले मात्र इंग्रजांशीं लढले. बाकी शिंदे गायकवाड कांहीं लढले नाहींत. होळकर व भोसले यांचा मोड होऊन दोन्ही [ संस्थानें ] इंग्रजांनीं घेतलीं. परंतु त्या दोघांनीं इंग्रजांशीं तह करून, कांहीं मुलूख इंग्रजांस देऊन, आपलीं संस्थानें काईम राखून जागेवर राहिले. त्यांचा बंदोबस्त करून मालकम साहेब इकडे आले. बापू गोखले मोठे शर्तीनें इंग्रजांशीं लढले. शेवटीं त्याचें पाणपत जाहलें. तेव्हां इंग्रज याणें तेथून बापू गोखले याशीं लढल्यावर बापू गोखले यांचे ठिकाण नाहीं असें झालें. फौज सारी उधळली. जशी ज्याला वाट फुटली तसे तिकडे ते गेले. सोलापुरावर तोफखाना सरकारचा होता त्याची अवस्था अशी जाहली. तेव्हां इंग्रज माघारे फिरले.

बाजीराव साहेब पळतां पळतां आशेरीवर येऊन मुक्काम केला. तेथें मालकम साहेबही तिकडून आले. त्यांचाही मुक्काम तेथेंच जाहला. त्या मुक्कामीं श्रीमंत असतां त्या समयांत मालेगांव येथें आरब होते त्यांची लढाई इंग्रजांशीं झाली. मालेगांव मात्र एक मास लढलें. शेवटीं किल्ला पाडला, तेव्हां मालेगांव हस्तगत झालें. इंग्रजांनीं बापू गोखले नाहींसे झाल्यावर राज्याचा बंदोबस्त केला. त्रिंबकजी डेंगळा यास वैजापूरच्या मैदानांत धरला, तो लागलाच चांडाळगडास नेऊन ठेविला. श्रीमंत जातीनें बेहिमती, शिपाईगिरी आंगीं नाहीं, लढाईचेंही सामर्थ्य नाहीं; तेव्हां राज्याचा बेदावा लिहून देऊन ब्रह्मवर्ताकडे गेले. चिमाजी आपा हे इकडे पुण्याकडे आले. त्या वेळेस कल्याणपावेतों अप्पासाहेब येऊन माघारे फिरले. त्या समयीं अलपिश्टन साहेब यांनीं त्यांस सांगितलें कीं, "दहा वीस लक्षांचा मुलूख तुम्हांस देतों. तुम्हीं पुण्याचें संस्थान संभाळून राहावें."

---

६४. आप्पासाहेब भोसल्यानें नागपुरास सिताबळदीवरील रेसिडेन्सीवर हल्ला केला व होळकराचें सैन्य दक्षिणेंत बाजीरावाकडे येत असतां महीदपूर येथें सर टॉमस हिस्लाप याणें गांठिलें. दोन्ही ठिकाणींही इंग्रजांचाच जय झाला. ६५. अष्टे येथें. यांजबरोबर गोविंदराव घोरपडे व आनंदराव बाबर हेही पडले. ६६. पाणपत जाहलें=पाणिपतास भाऊंची जी अवस्था झाली तीच येथें बापूंची झाली. भाऊ जसे पडले तसे बापूही पडले.

तें चिमाजीअप्पा यांणीं ऐकिलें नाहीं. तेव्हां त्यांस नेऊन वसईस ठेविलें. तेव्हां चिमाजी आप्पा यांचें बोलणें पडलें कीं, " आम्ही काशीस जातों. " त्यांची रवानगी काशीस केली. बाजीराव साहेब ब्रह्मवर्तास गेले. तेव्हां सातारे यांचे राजांचा बंदोबस्त अलपिष्टन साहेब यांणीं केला. चौदा लक्षांचा मुलूख त्यांस देऊन त्याचें संस्थान चालविलें. रायगड किल्ला श्रीमंतांकडे होता. त्या किल्ल्यावर वाँरणशीबाई होती. त्या किल्ल्यावर इंग्रज चढाई करून जाऊन किल्ला लढाई करून घेतला. वारणशीबाई यांचें बोलणें पडलें कीं, " आम्हांस हिंदुस्थानांत पाठवावें. " त्याप्रमाणें बाईची रवानगी केली. रायगड किल्ल्यावर दौलत मुबलक सांपडली. अशी श्रीमंतांची दौलत इंग्रजांचे हातीं पुष्कळ लागली.

असा राज्याचा बंदोबस्त इंग्रज यांणीं केला. राज्याचा खावंद पेशवे यांचे वंशांत बाजीराव साहेब यांसारखा बेहिमती, दुसऱ्याचा विश्वास नाहीं, शाहाणे मनुष्य जवळ ठेवावयाचें नाहीं, आंगीं शिपाईगिरीही नाहीं, त्याची वर्णना काय करावी! कलियुगीं ब्राह्मणकुळांत प्रभू होऊन शंभर वर्षें पृथ्वीचें राज्य करील असा वर ईश्वराचा होता. पुराणांतरीं व्यासवचनही असेंच आहे त्याप्रमाणें झालें. शके १६३५ [ या वर्षीं ] पेशवाई त्यांस झाली. ती शके १७३९ यांत [ हातची जाऊन ] राज्य गेलें ! त्यांत सवाई माधवरावपावेतों राज्य मोठें जुरतीचें, सारे शत्रू हात जोडून पादाक्रांत [ होत्साते ] पेशवे यांजपुढें उभे होते. त्यांच्या मागें बाजीराव रघुनाथ राज्यावर बसल्यापासून कोठें स्वारी, शिकारी किंवा मोहीम झालीच नाहीं, व प्रभूस फौजेची गरज लागली नाहीं. त्यामुळें अशी अवस्था झाली. येथून बखर समाप्त झाली.

ग्रंथ समाप्त

---

६७. ही बाजीरावाच्या अनेक स्त्रियांपैकीं एक होय. ६८. कोणत्या पुराणीं ?

'पेशव्यांची वंशावळ' या नांवाचा स्वतंत्र निराळा लेख आम्हांस अद्याप कोठें उपलब्ध झाला नाहीं. खालीं दिलेली वंशावळ ग्रांट डफ यांचा ग्रंथ, कांहीं जुन्या बखरी, व पुणें येथील एका वृद्ध गृहस्थाकडून मिळालेली माहिती यांजवरून तयार केली आहे. दांपत्यसंबंधदर्शक × असें चिन्ह केलें आहे. विशेष माहितीच्या टिपांचे आंकडे कौंसांत दिले आहेत. अलीकडे उपलब्ध झालेली माहिती जागजागीं नमूद केली आहे

जनार्दनपंत भट.

१ विश्वनाथपंत.    २ दुसरा एक (१).

(विश्वनाथपंत यांचे :) १. कृष्णाजीपंत.   २. जनार्दनपंत. (२)   ३. रुद्राजीपंत.   ४. (३) बाळाजीपंत × राधाबाई. (४) बहीण × भैरवभट* मेहेंदळे

(बाळाजीपंत यांचे :) १. विश्वनाथ ऊर्फ बाजीराव (५) × (६) काशीबाई; मस्तानी रक्षा   २. अनंत ऊर्फ चिमाजी आपा (७) × १. रखमाबाई पेठे. २. अन्नपूर्णाबाई (८)   ३. भिऊबाई × आबाजी नाईक बारामतीकर (९)   ४. अनूबाई × व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर (१०)

(बाजीराव व काशीबाई यांचे :) १. बाळाजीपंत (जन्मकाल मार्ग. व. १३ शके १६४२.)   २. रामचंद्र.   ३. रघुनाथराव दादा (ज. का. श्रा. शुद्ध ३ शके १६५६.)   ४. जनार्दनबाबा × सगुणाई भिडे

(मस्तानीचा :) (११) समशेर-बहाद्दर

(चिमाजी आपा यांचे :) १. सदाशिवरावभाऊ (१२) × १ उमाबाई २ पार्वतीबाई   २. बयाबाई × गंगाधरपंत ओमकार

विश्वनाथ ऊर्फ विसाजी ऊर्फ बाजीराव बल्लाळ.

बाळाजीपंत ऊर्फ नानासाहेब ( १३ )
×
गोपिकाबाई लग्न शके १६५१. (१४) २. राधाबाई लग्न शके १६८२. (१५)

रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब (२५)
×
१ जानकीबाई लग्न शके १६५३. (२६)
२ आनंदीबाई लग्न शके १६७७. (२७)

समशेर बहादर ( ३२ )
अलीबहादर ( ३३ )
समशेरबहादर

१ विश्वासराव (१६) जन्म शके १६६४. × लक्ष्मीबाई लग्न शके १६७१. (१७)
२ माधवराव (१८) जन्म शके १६६७. × रमाबाई लग्न शके १६७५. (१९)
३ नारायणराव (२०) × गंगाबाई (२१)
सवाईमाधवराव (२२)
१ रमाबाई (२३) २ यशोदाबाई (२४)
४ यशवंतराव

१ भास्करराव (२८) जन्म शके १६८४.
अमृतराव दत्तक (२९) शके १६९०.
विनायकराव
२ बाजीराव (३०) जन्मदिन पौष शु॥ ६ शके १६९६.
१ बयाबाई. २ धोंडोपंत नाना (दत्तक)
३ चिमाजी (३१)
द्वारकाबाई × राघोपंत थत्ते
४ दुर्गाबाई*
× पांडुरंग बाबूराव बारामतीकर

—०००—

(१) हा राजमाचीकरांचा पूर्वज असें ऐकिवांत आहे. (२) ह्यास हबशी यांनीं समुद्रांत बुडविलें म्हणतात. (३) हे सासवडीं आश्विनमासीं मृत्यू पावले. शके १६४१. * ह्यांचा पुत्र गणपतराव, त्यांचा बळवंतराव मेंहेंदळें, त्यांचा आपा बळवंत. (४) ही अंताजी मल्हार ड्डबेरकर बर्वे यांची कन्या. (५) बाळाजी विश्वनाथाच्या अपत्यांत बाजीराव ज्येष्ठ; बाकीच्यांचा क्रम माहीत नाहीं. (६) यांचा मृत्यू शके १६६२ वै० शुद्ध १३ नर्मदातीरीं मौजे कलमेंडें परगणें रावेर येथें. यांची स्त्री काशीबाई ही महादाजी कृष्ण जोशी यांची कन्या (७)आपास तिसरी एक स्त्री होती ती कृष्णराव महादेव चासकर यांची कन्या. आपांचा काळ छ ८ सवाल, पौष, शके १६६२ सालीं झाला. (८) रखमाबाई ही त्रिंबकराव पेठे यांची बहीण–तिचा मुलगा सदाशिव. अन्नपूर्णाबाई सती गेली तिचीमुलगी बयाबाई. (९) हे बाबूजी नाईक जोशी बारामतीकर यांचे बंधु. (१०) हे फिरंग्याशीं कोंकणांत लढत होते. (११) जन्म शके १६४९. मृत्यू शके १६६८. सगुणाबाई ही भिडे यांची कन्या मृत्यू हिचा शके १७०६. (१२) जन्म शके १६५२ मृत्यू शके १६८२. (पौष शुद्ध ८) स्त्रिया दोन (१) उमाबाई व (२) पार्वतीबाई लक्ष्मणराव कोल्हटकर पेणचे यांची बहीण. पार्वतीबाई १७०६ मृत्यू पावली-भाऊंस दोन्हीं स्त्रियां-पासून कृष्णराव वगैरे पुत्र झाले ते अल्पायुषी झाले. (१३) यानीं तीन लग्ने केलीं व तिसरी स्त्री कऱ्हाडे ब्राह्मणाची मुलगी होती असें म्हणतात. मृत्यू पर्वतीवर शके १६८३ ज्येष्ठ वद्य १. (१४) भिकाजी नाईक रास्ते (गोखले) यांची कन्या. मृत्यू शके १७११. (१५) ही नारोबा नाईक वाखरे पैठणकर देशस्थ ब्राह्मण यांची कन्या मृत्यू शके १६९३. (१६) मृत्यू पाणिपत येथें पौष शुद्ध ८ शके १६८२. (१७) सदाशिव महादेव दीक्षित पटवर्धन यांची कन्या. मृत्यू शके१६८५(१८) मृत्यू थेऊर येथें कार्तिक वद्य ८ शके १६९४. (१९) शिवाजी बल्लाळ जोशी सोलापूरकर पागे यांची कन्या. सती, कार्तिक वद्य ८ शके १६९४. (२०) जन्म शके १६७७. वध भाद्रपद शुद्ध १३, शके १६९५. (२१) कृष्णाजी हरी साठे यांची कन्या. लग्न पुरंदरीं शके १६८२. मृत्यू १६९९ (२२) जन्म अधिक वैशाख शुद्ध ७ शके १६९६. मृत्यू आश्विन शुद्ध १४ शके १७१७.(२३) केशव नाईक थत्ते यांची कन्या,लग्न१७०४.मृत्यू शके १७१४(२४)गणेशपंत गोखले यांची कन्या. लग्न १७१४. (२५) मृत्यू कोपरगांवीं कचेश्वरीं, मार्ग वद्य ३ शके १७०५. (२६) ही गणेशभट बर्वे यांची कन्या. मृत्यू शके १६७७. (२७) रावो महादेव आक यांची कन्या. हिचें लग्न कृष्णातीरीं गलगलें येथें झालें. मृत्यू आनंदवल्लीस शके १७१५ फाल्गुन वद्य ११. (२८) भास्करराव १ वर्षाचा असतां त्यास दादांनीं प्रतिनिधी करून राजेबहादर यांस त्याचे मुतालीक नेमलें होतें, पण भास्करराव पुढें लवकरच मृत्यू पावला. (२९) हा भुसकुटे यांचा पुत्र. मृत्यू चित्रकूट येथें शके १७४५. (३०) बाजीरावाचीं देशीं ६ व ब्रह्मावर्तीं ५ मिळून ११ लग्नें झालीं. १ धोंडभट भागवत यांची कन्या भागिरथीबाई २ धोंडोपंत मंडलीक यांची कन्या सत्यभामाबाई. ३ चिंतामणराव हरी फडके यांची कन्या राधाबाई. ४ नाना रास्ते ऊर्फ फाटक यांची

कन्या वाराणशीबाई.५ हरी रामचंद्र देवधर ऊर्फ ढमढेरेयांची कन्या वेणूबाई.६बळवंतराव पेंडसे यांची कन्या सरस्वतीबाई.७मुखरीकर अभ्यंकर यांची कन्या सत्यभामाबाई८ बळवंतराव आठवले यांची कन्या. ९।१०।११ चितळे, गोखले व रिसबूड यांच्या कन्या. बाजीरावास वामनराव वगैरे अपत्यें झालीं तीं सर्व अल्पायुषीं झालीं. मात्र बयाबाई नांवाची कन्या ग्वालेरचे आपटे यांजकडे दिली होती. त्या बयाबाई बहुत वृद्ध होऊन अलीकडेच मृत्यू पावल्या. बाजीरावाचा मृत्यू ब्रह्मावर्तीं पौष शु॥ १२, शके १७७२. (३१) जन्म चै० शु॥ ९ १७०६. मृत्यू काशींत ज्येष्ठ वद्य ३० शके १७५२. * दुर्गाबाई ही जानकीबाईची मुलगी. ( ३२ ) पाणिपतास जबर जखमा लागून नंतर लौकरच हा जाटाचे मुलखांत मृत्यू पावला. ( ३३ ) त्याजकडे बुंदेलखंडीं बांदें होतें. हा इसवी सन १८०२ सालीं मृत्यू पावला.

# चित्रमय जगत् काय म्हणतें ?

शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र मल्हार रामराव चिटणीस विरचित. रा. ब. काशिनाथ नारायण साने यांचा इतिहाससाधनप्रकाशनाचा उद्योग गेलीं पंचेचाळीस वर्षें अव्याहत चालू आहे. आणि अलीकडे तर जुने ऐतिहासिक ग्रंथ कसे प्रकाशित करावे याचे उत्तम नमुने महाराष्ट्रवाचकांपुढें मांडण्याचा त्यांचा निर्धार झालेला दिसतो. अनेक प्रतींच्या आधारें पाठांतरें देऊन व आजपर्यंत प्रसिद्ध झालेली इतिहाससामग्री जमेस धरून अर्थनिर्णायक टिपा कशा द्याव्या व विचिकित्सकपद्धति कशी स्वीकारावी याचें प्रस्तुत ग्रंथाच्या संपादकांनीं सक्रिय उदाहरण घालून दिलेलें आहे. सध्यां राष्ट्रीय, खाजगी व सरकारी शाळांतून आणि कालेजांतून बखरी वाचणें हा मराठी भाषेच्या अभ्यासांतला अवश्यक भाग म्हणून गणला जातो. अशा वेळीं विद्यार्थ्यांच्या हातीं हा ग्रंथ अभ्यासासाठीं देण्यांत येईल तर भाषेचें व इतिहासाचें सूक्ष्म अध्ययन होण्यास चांगलीच मदत होणार आहे. मुंबई युनिव्हर्सिटीनें ही चिटणिसी बखर एम्. ए. च्या परीक्षेस नेमली आहे; कारण, चिटणिसांची भाषा म्हणजे मराठी गद्याचा उत्तम नमुना आहे. आमच्या मतें राष्ट्रीय विद्यालयांतील विद्यार्थी व सामान्य मराठी वाचकवर्ग यांच्या हातीं देखील ही रा. साने यांनीं संपादलेली आवृत्ती पडल्यास महाराष्ट्रांतील चालू वाचनाभिरुचीस चांगलें वळण लागेल. या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत रा. साने यांनीं हस्तलिखित प्रती मिळविण्यास कसकसे अडथळे येतात व मोठमोठी नामांकित मंडळी देखील या कामीं किती अक्षम्य आळस करतात याची हकीकत बऱ्याच स्पष्टोक्तीनें दिली आहे. ती संशोधकांना फार बोधप्रद वाटेल. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं टिपा स्वतंत्रपणें दिल्या आहेत व हीच पद्धति श्रेयस्कर दिसते. कारण ज्यांना मूळ ग्रंथ आपणच उकलावा अशी आस्था असेल त्यांनाहि वाव मिळतो आणि ज्या सामान्य वाचकांना दुर्बोध शब्दांवर टिपा पाहून ग्रंथ वाचावा असें वाटेल त्यांचीहि सोय यांत होते. सारांश ग्रंथसंपादनाच्या दृष्टीनें प्रस्तुत पु[illegible]र्षेत पहिल्या वर्गांत पडेल असें आम्हांस वाटतें. किंमत दो[illegible]